

# क्तेश्वर कृत
# फुटकाव्ये

संपादक : डॉ. वा. के. लेले

मुक्तेश्वरकृत

# स्फुटकाव्ये

विवेचक प्रस्तावना, मूळ संहिता, पाठभेद व विस्तृत टीपा यांसह

संपादक

प्रा. डॉ. वामन केशव लेले

एम्. ए., पीएच्. डी.

प्रमुख-मराठी विभाग, नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय, पुणे १.

अनमोल प्रकाशन, पुणे २.

**मूल्य : वीस रुपये**

**प्रथमावृत्ती :** माघ शुद्ध अष्टमी, शके १८९६ : दिनाङ्क १९ फेब्रुवारी, १९७५

**सर्वाधिकार :** सौ. मालती वामन लेले, 'रामधुन', ६५/१ एरंडवणे, प्रभात रस्ता गल्ली क्रमांक १५, पुणे–४११ ००४

**प्रकाशक :** मो. द. नांदुरकर, अनमोल प्रकाशन, ६८३ बुधवार पेठ, पुणे २

**मुद्रण :** संहिता : ना. बा. म्हसकर, ज्योतिष प्रकाश प्रेस, कालभैरव मार्ग, वाराणसी–१

प्रस्तावना व टीपा : ले. कर्नल वि. वा. जोशी, व्यवस्थापक, सकाळ प्रेस, ५९५ बुधवार, पुणे २

माझे अनिमित्त बंधू

कै. डॉ. अनंत हरि लिमये

यांच्या

पवित्र स्मृतीस--

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| मनोगत | एक–दोन |
| प्रस्तावना | तीन–पंचेचाळीस |
| प्रस्तावनेतील अंकनिर्दिष्ट संदर्भ | सेहेचाळीस–सत्तेचाळीस |


## मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये


| | | |
|---|---|---|
| १. | गजेंद्रमोक्ष | १–३ |
| २. | हनुमंताख्यान | ३–७ |
| ३. | मूर्खांची लक्षणे | ८–१७ |
| ४. | भगवद्गीता | १७–६८ |
| ५. | विश्वामित्रभोजन | ६८–७१ |
| ६. | दुर्योधनशल्यपरिस्फोट | ७२–७६ |
| ७. | अर्जुनकामनापूर्ति | ७६–८० |
| ८. | शतमुखरावणवधाख्यान | ८०–९१ |
| ९. | शुकरंभासंवाद | ९२–१२७ |
| १०. | हरिश्चन्द्राख्यान | १२७–१७५ |
| ११. | एकनाथचरित्र | १७५–१८२ |
| १२. | पदसंग्रह | १८२–१८६ |
| १३. | आरतिसंग्रह | १८६–१९२ |
| | टीपा | १–४१ |
| | संहितेचे शुद्धिपत्र | ४२–४४ |

# मनोगत

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने १९७४–७५ या शैक्षणिक वर्षामध्ये एम.ए. ( मराठी ) च्या विद्यार्थ्यांना मुक्तेश्वराची स्फुटकाव्ये शिकविण्याची कामगिरी मजवर सोपविली. तेव्हा मी मूळ संहिता मिळविण्याच्या खटपटीस लागलो. त्याबाबतीत सर्व स्थानिक ग्रंथविक्रेत्यांकडे जाऊन जातीने चौकशी केली व परगावच्या पुस्तक-विक्रेत्यांशी पत्रव्यवहार केला. अशा प्रकारे मुद्रित प्रत मिळविण्याचे खूप प्रयत्न केले, परंतु ते सफल झाले नाहीत. दरम्यान नौरोसजी वाडिया महाविद्यालयाच्या ग्रंथालयामधून एक मुद्रित प्रत मिळविण्यात मला यश आले. त्या प्रतीच्या साहाय्याने मी अध्यापनास सुरुवात केली. अशा प्रकारे माझी म्हणजे शिकविणाऱ्याची गरज भागली होती. परंतु, शिकणाऱ्यांपाशी पुस्तकाची प्रत नसल्यामुळे त्यांची खूपच गैरसोय होत होती. ती दूर करण्याच्या हेतूने मी विद्यार्थ्यांना स्फुटकाव्यांतील आख्याने उतरवून देऊ लागलो. आदल्या तासाला स्फुटकाव्य विद्यार्थ्यांना लिहून द्यावयाचे. त्यांनी त्याची नक्कल करून घ्यावयाची व मग पुढील तासाला ते शिकवावयाचे असा क्रम मी सुरू केला. जोपर्यंत उतरवून काढावयाची काव्ये ओवीसंख्यादृष्ट्या लहान होती तोपर्यंत ही व्यवस्था मला व विद्यार्थ्यांना फारशी गैरसोयीची वा जाचक वाटली नाही. परंतु, रचनादृष्ट्या प्रदीर्घ अशा काव्यांच्या अभ्यासास सुरुवात झाल्यावर मात्र ही पद्धत सर्वांनाच अत्यंत गैरसोयीची वाटू लागली. आम्हा सर्वांचा खूप वेळ (काव्यांच्या) 'नकला' करण्यात जाऊ लागला ! या परिस्थितीवर काहीतरी तोडगा काढावा असे वारंवार वाटू लागले व त्यामधूनच स्फुटकाव्यांचे संपादन करून ती पुस्तकरूपाने प्रकाशित करावी ही कल्पना मूळ धरू लागली. त्याच सुमारास माझे सहकारी प्रा. डॉ. म. वि. गोखले यांनी या कल्पनेला साग्रह दुजोरा दिला. तेव्हा मी हे काम करण्याचे ठरवून त्यासंबंधी अनमोल पुस्तकालयाचे श्री. नांदुरकर यांच्यापाशी बोललो. त्यांनी संकल्पित प्रकाशनाच्या व्यावहारिक बाजूंचा साधकबाधक विचार करून स्फुटकाव्ये पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे मनावर घेतले. मूळ संहिता सोयीसाठी म्हणून काशीत छापावी व टीपांचा व प्रस्तावनेचा मजकूर पुण्यात छापावा असे ठरले. त्यानुसार मूळ संहितेची मुद्रणप्रत १९७४ सालच्या डिसेंबर महिन्यात काशीस रवाना झाली व बाकीचा मजकूर स्थानिक मुद्रणालयाकडे पाठविण्यात आला. दोन्ही ठिकाणच्या मुद्रणालयांनी मनापासून सहकार्य केले व इतक्या अल्पावधीत हा ग्रंथ छापून दिला. म्हणूनच आज तो वाचकांच्या हाती देणे शक्य झाले आहे.

निर्णयसागर मुद्रणालयाने १९०६ साली प्रसिद्ध केलेली 'महाराष्ट्रकविवर्य-मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें' प्रस्तुत संस्करणासाठी 'आदर्श प्रत' म्हणून स्वीकारली आहेत. सदरहू प्रकाशनाच्या तळटीपांत दिलेले बहुसंख्य पाठभेद प्रस्तुत पुस्तकातही

अंतर्भूत केले आहेत. परंतु, तसे करताना अनवधानाने काही पाठभेदांचा समावेश करावयाचा राहून गेला असल्यास त्याबद्दल तद्विदांनी प्रस्तुत संपादकास उदारपणे क्षमा करावी. या पाठभेदांचा चिकित्सक वाचकांस व संशोधकांस उपयोग होईल. ग्रंथाच्या शेवटी टीपा जोडल्या आहेत. त्या तयार करताना निर्णयसागर प्रतीच्या विद्वान संपादकांनी दिलेल्या टीपांचा भरपूर उपयोग करून घेतला आहे. टीपांमध्ये भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायातील प्रत्येक श्लोकाची मुक्तेश्वरी ओवीशी तुलना करून तिच्या आधारे टीपा दिल्या आहेत. जिज्ञासू अभ्यासकांनी त्याच पद्धतीने इतर अध्यायांचा तुलनात्मक अभ्यास करावा. सुरुवातीस जोडलेल्या प्रस्तावनेत प्रारंभी मुक्तेश्वराच्या चरित्राविषयी अतिशय संक्षिप्तपणे माहिती दिली आहे. मुक्तेश्वराच्या चरित्रातील विवाद्य प्रश्न विचारात घ्यावयाचे नाहीत, केवळ त्याच्या स्फुटकाव्यांचा परामर्श घ्यावयाचा असे सुरुवातीपासूनच निश्चितपणे ठरविलेले असल्यामुळे कवि-चरित्रविषयक तपशिलाचा विस्तार केला नाही. प्रस्तावनेत चरित्राच्या आराखड्या-नंतर प्रत्येक स्फुटकाव्याची शक्यतो सांगोपांग गुणदोषचर्चा करून प्रत्येक काव्याचे मूल्यांकन केले आहे. कोणत्याही काव्याच्या मूल्यमापनाचे बाबतीत मतभेदाला नेहमीच वाव असतो. म्हणूनच प्रस्तावनेत या संदर्भात केलेली चर्चा अभ्यासपूर्ण आहे इतका निर्वाळा जरी चिकित्सकांनी दिला तरी प्रस्तुत संपादकाला संतोष होईल.

शेवटी या प्रकाशनाच्या कार्यास प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे ज्यांनी साहाय्य केले त्यांच्या-विषयी वाटणाऱ्या कृतज्ञतेचा निर्देश करतो. मित्रवर्य प्रा. डॉ. गोखले यांनी या प्रका-शनाच्या प्रगतीविषयी वारंवार चौकशी केली. त्यांनी दाखविलेल्या आस्थेबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. नौरोसजी वाडिया महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी स्फुटकाव्यांची प्रत अभ्यासार्थ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आजच्या महा-गाईच्या व कागद-टंचाईच्या काळात हे अत्यल्प खपाचे पुस्तक प्रकाशित करण्याची जबाबदारी पत्करल्याबद्दल अनमोल पुस्तकालयाचे श्री. नांदुरकर यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. शेवटी ज्योतिष प्रकाश प्रेस, वाराणसी व सकाळ प्रेस, पुणे यांचे व्यवस्थापक व कर्मचारी यांनी हे पुस्तक अल्पावधीत मुद्रित करून दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

पुणे, १९–२–१९७५ **डॉ. वा. के. लेले**

# प्रस्तावना

**रससिद्ध कविवर्य**

मध्ययुगीन मराठी साहित्यात ज्या अनेक कवींनी मोलाची भर घातली त्यांमध्ये कविवर्य मुक्तेश्वराची प्रामुख्याने गणना होते. त्याने आपल्या अपूर्व प्रतिभाविलासाने रसिकांची मने जिंकून घेतली व आपले नाव त्यांच्या जिभेवर निरंतर खेळत ठेवले. मुक्तेश्वरी रामायण, महाभारत, शुकरंभासंवाद व हरिश्चन्द्राख्यान ह्या काव्यकृती तत्कालीन काव्यरसिकांच्या कौतुकादराचा विषय बनल्या होत्या. अशा या प्रतिभाशाली व रसिकप्रिय कवीच्या चरित्रासंबंधी निश्चित व विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. ह्या बाबतीत खूप संशोधन करून विद्वानांनी जी माहिती संकलित केली आहे ती संक्षेपत: अशी–

**घराणे**

मुक्तेश्वर हा प्रसिद्ध मराठी संतकवी एकनाथ यांचा नातू म्हणजे मुलीचा मुलगा होय. ह्याच्या वडिलांचे नाव चिंतामणी ऊर्फ विश्वंभर असून आईचे नाव गंगा असे होते. गंगा ही एकनाथांची मुलगी. ती त्यांनी चिंतामणी मुद्गल यांस देऊन त्यांना घरजावई केले होते. त्यामुळे चिंतामणिशास्त्री पैठणचे रहिवासी बनले होते. एकनाथ आपल्या मुलीला प्रेमाने 'लीला' असे संबोधीत असत. मुक्तेश्वरालाही आपल्या आईचे ते नाव आवडले व त्याने ते 'लीला-विश्वंभर' अशा स्वरूपात आपल्या काव्यांत उल्लेखिले. मुक्तेश्वराचे आडनाव मुद्गल होते. त्याचे गोत्र अत्रि असून सोनारीचा भैरव हा त्याचा कुलस्वामी होता. कोल्हापूरची महालक्ष्मी ही त्याची कुलस्वामिनी होती.

**जन्म–सन**

मुक्तेश्वराचा जन्म पैठणास इ. स. १६०९ साली झाला असे भावे व भिडे हे अभ्यासक मानतात. पांगारकर व पंगु या विद्वानांनी मुक्तेश्वराचा जन्मसन १५७३ असा मानला आहे. पहिल्या पक्षाच्या मतानुसार मुक्तेश्वर १६६० साली दिवंगत झाला तर दुसऱ्या पक्षानुसार १६४५ साली मुक्तेश्वराचे निधन झाले. अर्थात् मुक्तेश्वराचे जन्म-मृत्यु-सन विवाद्य आहेत.

**शिक्षण–व्यासंग**

मुक्तेश्वराचे बालपण व प्राथमिक शिक्षण एकनाथांकडे झाले. पुढे त्याने न्यायमीमांसादी शास्त्रे, महाभारत, पुराणे, भागवत, हनुमन्नाटकादी संस्कृत काव्ये, ज्ञानेश्वरादी प्राकृत कवींची आध्यात्मिक कविता इत्यादी ग्रंथांचे व्यासंगपूर्ण अध्ययन केले. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्षातल्या अनुभवांची जोड लाभावी म्हणून तो अनेक ठिकाणी प्रवास करून आला.

**ग्रंथसंपदा**

मुक्तेश्वराची एकूण ग्रंथनिर्मिती अठरा हजार पद्यांहून अधिक आहे. त्याच्या ग्रंथांमध्ये प्रस्तुत स्फुटकाव्यांत समाविष्ट केलेल्या ग्रंथांखेरीज महाभारताची पाच पर्वे (एकूण पद्यसंख्या सुमारे १४ हजार), श्लोक-रामायण (श्लोक १७२५), व ओवी-रामायण यांचा अन्तर्भाव होतो. काही विद्वानांच्या मते मुक्तेश्वराने कालिया-मर्दन व अहिमहिआख्यान ही काव्येही लिहिली होती. परंतु, मुक्तेश्वराला कविश्रेष्ठ म्हणून जी कीर्ती लाभली ती त्याच्या भारत व रामायण या दोन ग्रंथांमुळे. मुक्तेश्वराच्या भारतादी ग्रंथांच्या अध्ययनाचे येथे प्रयोजन नसल्यामुळे आता सरळ त्याच्या स्फुटकाव्यांच्या परामर्शाला प्रारंभ करू.

## १. गजेंद्रमोक्ष

**मूळ आधार**

विष्णूने गजेन्द्राची मगरीच्या तडाख्यातून सुटका करून त्यास मुक्ती दिली ही कथा प्राचीन व प्रसिद्ध आहे. ती पुढील ग्रंथांमध्ये वर्णिलेली आढळते—आनंद-रामायण (सारकांड, नववा सर्ग), पद्मपुराण (उत्तरखण्ड, अध्याय ११२), स्कन्द-पुराण ( वैष्णवखण्ड, अध्याय २८ ) व श्रीमद्‌भागवत ( स्कंध आठवा, अध्याय १ ते ४). ह्यांपैकी आनंदरामायणातील कथा संक्षेपाने अशी आहे – त्रिकूट पर्वता-वरील एका रम्य सरोवरात एक क्रूर नक्र राहात होता. तो मोठ्या हत्तींना पकडून मारीत असे. एकदा असाच एक प्रचंड हत्ती आपल्या कळपासह सरोवरावर आला व पाणी पिऊ लागला. तेव्हा नक्राने त्यास धरले व पाण्यात ओढले. ते बघून इतर हत्ती ओरडू लागले. पण ते त्याला सोडवू शकले नाहीत. नक्र हत्तीला पाण्यात ओढू लागला व हत्ती नक्राला पाण्याबाहेर खेचू लागला. पण नक्रापुढे हत्तीचे चालेना. तेव्हा हत्तीने विष्णूचे ध्यान केले. विष्णू संतुष्ट होऊन गरुडावर बसून आला व त्याने हत्तीची सुटका केली. पूर्वी पाण्ड्य देशात इंद्रद्युम्न नावाचा राजा होता. तो एकदा ध्यानमग्न असता अगस्त्य ऋषी तेथे आले. परंतु ध्यानस्थ राजाने त्यांना पाहिले नाही. त्यामुळे मुनी रागावले व त्यांनी राजाला 'तू मदोन्मत्त हत्ती होशील', असा शाप दिला. राजाने विनवणी केल्यावरून मुनींनी त्याला ' तुला नक्राने पकडले असता विष्णू तुला मुक्त करील,' असा उ:शाप दिला. त्या शापाच्या प्रभावामुळे राजा हत्ती झाला, तोच गजेन्द्र. पूर्वी हूहू नावाचा गंधर्व अप्सरांसह सरोवरात क्रीडा करण्यासाठी गेला असता अघमर्षण करण्यासाठी देवल ऋषी तेथे आले होते. त्यांना घाबरून देण्यासाठी हूहू पाण्याखाली गेला व त्याने खालून मुनींचे पाय धरले. तेव्हा संतापलेल्या मुनींनी 'तू नक्र हो' असा प्रथमत: शाप दिला व तदनंतर हूहूने प्रार्थना केल्यावरून 'तुला स्वत: विष्णू उद्धरील', असा उ:शाप दिला. त्या शापामुळे हूहू नक्र झाला. विष्णूने दोघांचाही उद्धार केला.

त्यामुळे दोघेही वैकुंठास गेले.[१] पद्मपुराणान्तर्गत कथेचा सारांश असा :– जय व विजय हे देवहूती नामक तृणबिन्दूच्या कन्येचे मुलगे होते. ते दोघेही परम विष्णुभक्त असून नित्य विष्णुजप व वारंवार विष्णुव्रत करीत असत. त्यामुळे प्रसन्न होऊन विष्णूने त्यांना दर्शन दिले होते. एकदा त्यांनी अनुक्रमे ब्रह्मा व याचक बनून मरुत्ताचा यज्ञविधी यथासांग पार पाडला. तेव्हा मरुत्ताने त्यांना विपुल दक्षिणा दिली. त्यांनी ती सारख्या प्रमाणात आपापसांत वाटून घेण्याचे ठरविले. परंतु त्या निमित्ताने दोघांचे कडाक्याचे भांडण झाले. तेव्हा जयाने विजयाला 'तू मगर होशील' असा शाप दिला तर विजयाने जयाला 'तू हत्ती होशील' असा प्रतिशाप दिला. दोघांनी विष्णूकडे जाऊन शाप–निवारणार्थ प्रार्थना केली. पण विष्णूने तसे करण्याचे नाकारले. तरीही 'शापाच्या अखेरीस तुम्ही माझ्याकडे याल,' असा दिलासा विष्णूने त्यांना दिला. शापांमुळे ते दोघे अनुक्रमे हत्ती व मगर झाले. परंतु, त्यांना पूर्वजन्मांचे स्मरण राहिल्यामुळे ते विष्णु-व्रत आचरीत राहिले. पुढे कार्तिक महिन्यात तो हत्ती एकदा गण्डकी नदीवर स्नाना-साठी गेला असता मगरीने त्याला विळखा घातला. तेव्हा हत्तीने विष्णूचे स्मरण केले असता शंखचक्रगदाधारी विष्णू प्रकट झाला व त्याने सुदर्शन चक्र फेकून दोघांनाही पाण्याबाहेर काढले; स्वतःचे रूप अर्पण केले, वैकुंठास नेले व आपले द्वारपाल म्हणून नेमले.[२] भागवतातील कथा थोडक्यात अशी आहे—एकदा त्रिकूट पर्वतावरील सरोवरा-वर एक मत्त गजेन्द्र हत्तिणींसह आला, तेव्हा सारी श्वापदे भयभीत झाली. तहानेने व्याकुळ झालेल्या त्या हत्तीने प्रथमतः जलपान केले व मग हत्तिणींना व छाव्यांनाही प्रेमाने पाणी पाजून स्नान घातले. इतक्यात एका बलाढ्य मगरीने खालून हत्तीचा पाय धरला. तेव्हा अगतिक व दुःखी झालेल्या त्या गजेन्द्राला बघून हत्तिणी आक्रोश करू लागल्या. इतर हत्ती त्याला सोडवू शकले नाहीत. हत्ती व मगर यांचे युद्ध हजार वर्षे चालू होते. लवकरच गजेंद्र आहाराभावी दुर्बल झाला व परमेश्वराला शरण जाऊन पूर्वजन्मी अभ्यासलेले स्तोत्र गाऊ लागला. गजेंद्राचा तो धावा ऐकून विष्णू गरुडा-रूढ होऊन आला व त्याने गजेन्द्रासकट मगरीस सरोवराबाहेर काढून तिचे मुख फाडले व गजेन्द्राला मोकळे केले. ती मगर म्हणजे पूर्वजन्मीचा हूहू गंधर्व व तो गजेन्द्र म्हणजे पूर्वजन्मीचा इंद्रद्युम्न राजा. दोघांनाही अनुक्रमे देवल व अगस्त्य या ऋषींच्या शापांमुळे मनुष्येतर योनी प्राप्त झाली होती. हे आख्यान प्रातःपठनीय असून स्वर्गप्रापक, यशो-वर्धक व पापनाशक आहे.[3] प्राकृत कवींपैकी एकनाथांनी आपल्या भागवतात गजेंद्र-मोक्षाची कथा चार ओव्यांत पुढीलप्रमाणे सांगितली आहे – 'गज सरोवरीं ग्रहग्रस्त । स्त्रियापुत्रीं सांडिला जीत । तो अंतकाळीं मातें स्मरत । आर्तभूत अतिस्तवनें ।। सांडूनि समस्तांची आस । पाहोनि वैकुंठाची वास । राजीव उलचूनि राजस । पाव परेश म्हणे वेगीं ।। त्या गजेंद्राचे तांतडी । वैकुंठींहूनि लवडसवडी । म्यां गरुडापुढें घालोनि उडी । बंधन तोडीं गजाचें ।। त्यासी पशुयोनीं जन्म होतें । परी तो अंतीं स्मरला मातें । पावला माझ्या निजधामातें । गाइजे त्यातें पुराणीं ।। [४]

## मूळ व मुक्तेश्वरी आख्यान : तुलना

मूळ संस्कृत ग्रंथांतील आख्याने श्लोकबद्ध आहेत, मुक्तेश्वरी रचना ओवीबद्ध आहे. मुळातील कथा प्रदीर्घ आहे, मुक्तेश्वरवर्णित कथा फक्त ३६ ओव्यांची म्हणजेच संक्षिप्त आहे. मुळातील भागवती कथानक काव्यमय व परिणामरमणीय आहे. त्रिकूट पर्वत, गजेन्द्राच्या आगमनाच्या वेळी झालेली पशूंची धावपळ, गजेन्द्राचे सपरिवार सरोवराकडे जाणे, गृहस्थवत् आचरण, गजेन्द्रकृत विष्णुस्तवन, गजेन्द्रकृत प्रणाम, नक्राचे पूर्ववृत्त, गजेन्द्राचे पूर्वचरित्र, भगवंतांची रूपे, इत्यादी भागवती वर्णने हृदयंगम आहेत. मुक्तेश्वराने त्यांना फाटा दिल्यामुळे काव्यहानी झाली आहे. ह्या वर्णनांतील काही तपशील तर नितान्तरमणीय आहे. उदाहरणार्थ, क्षीरसागराच्या लाटांनी त्रिकूट पर्वताचा पायथा नित्य धुतला जात असे, किन्नरांचे गायन ऐकून उन्मत्त सिंह प्रचंड गर्जना करू लागले, वाळवंटातील वाळू रत्नकणांची बनलेली होती, सरोवराचे पाणी देवांगनांच्या स्नानामुळे सुगंधी झाले होते, मासे व कासव यांच्या हालचालींमुळे पराग पाण्यात मिसळून पाणी गढूळ बनले होते, हत्तींच्या चालण्यामुळे पर्वत हालू लागला. मुक्तेश्वराने या सूक्ष्मसुन्दर काव्यच्छटा आपल्या कथानकात समाविष्ट केल्या असत्या तर त्या कथानकाची रम्यता वाढली असती. भागवतकारांनी स्वभावदर्शनात देखील हृद्य बारकावे निर्माण केले आहेत. उदाहरणार्थ, गजेन्द्र एखाद्या गृहस्थाप्रमाणे हत्तिणींना पाणी पाजतो व छाव्यांना स्नान घालतो या वर्णनात त्याचे स्त्री-प्रेम व वात्सल्य यांचे मनोरम दर्शन घडते. अगतिक हत्तिणींच्या आक्रोशाचे वर्णन वाचून रसिकाला कारुण्याची प्रतीती येते तर गजेन्द्रकृत ईश्वरस्तुतीमुळे भक्तीला उठाव मिळतो. अशा प्रकारे व्यक्तिदर्शन व रसनिर्मिती या दोन बाबतींतही मुक्तेश्वरी कथेत काही प्रमाणात उणीव उत्पन्न झाली आहे.

मुक्तेश्वराने गण्डिकेचा (ओवी १) व गजेन्द्र-नक्रांच्या पूर्ववैराचा उल्लेख (ओवी ६) पद्मपुराणाधारे केला असावा. विष्णूने गजेन्द्र-नक्रांना द्वारपाल नेमले हे मुक्तेश्वरी वर्णनही (ओवी ३५) पद्मपुराणातील वर्णनाशी जुळणारे आहे. भागवती आख्यानात ईशस्तुतिप्रीत्यर्थ २९ श्लोक खर्ची पडले आहेत तर मुक्तेश्वराने ती स्तुती (ओव्या १३ ते १९) ७ ओव्यात वर्णिली असून तिच्यात स्तुतीखेरीज मानवी स्वभावांतील गुणदोषांवरील भाष्य व गजेन्द्राची अगतिकता यांचेही वर्णन साधले आहे. सर्वच मूळ संस्कृत ग्रंथांमध्ये हत्ती व नक्र यांच्या पूर्वचरित्रांचे वर्णन आहे. मुक्तेश्वराने ते अजिबात वगळले आहे.

### प्रयोजन

मुक्तेश्वराने हे कथानक नियतीची सर्वंकषता (ओव्या ३, ४), धर्माचरणाची अपरिहार्यता व श्रेष्ठता (ओवी १०), जीवनाची व्यर्थता (ओव्या १४, १५,) भक्तिभावाची स्वार्थनिष्ठता (ओव्या १६–१८, २३, ३५, ३६), परमेश्वर-प्राप्तीसाठी

आपत्तींची आवश्यकता (ओवी १८) व परमेश्वराची भक्तवत्सलता (ओव्या २३, ३५, ३६) हे विचार वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठी रचिले आहे असे स्पष्ट-पणे जाणवते.

### इतर दोष व निष्कर्ष

मुक्तेश्वरी कथानकाचा प्रारंभ आकस्मिक असल्यामुळे चित्ताकर्षक वाटत नाही. पुढीलसारख्या शब्दार्थांची पुनरुक्ती फारच खटकते – होणार गतीसारिखें (ओव्या ३, ४), नक्रें येऊनि अकस्मात (ओव्या २, ५), शुंडा करकमळ घातला (ओव्या २, ५), श्रीदेवें वाचविलें, ईश्वरें रक्षिलें (८), जाऊं आपुल्या आश्र-मासी (८, १०), विमानावरी बैसविला (२८), घालुनि विमानीं (२९). एकंदरीने रम्य कल्पना, उठावदार व्यक्तिदर्शन, रसोत्कट प्रसंग व परिपुष्टता यांच्या अभावी प्रस्तुत मुक्तेश्वरी आख्यान हृदयाची पकड घेऊ शकत नाही.

## २. हनुमंताख्यान

### मूळ आधार

मुक्तेश्वररचित प्रस्तुत आख्यानाचा मूळ आधार रामायणपुराणादी ग्रंथांमध्ये प्राप्त होत नसल्यामुळे याबाबतीत रेव्हरण्ड फादर कामिल बुल्के यांच्या पुढील अभ्यास-पूर्ण विवेचनावर अवलंबून राहावे लागते – 'गरुड़ के गर्वनिवारण की कथायें अपेक्षा-कृत अर्वाचीन प्रतीत होती हैं। फिर भी कृत्तिवास (दे. अनु. ५८६) तथा तुलसी-दासने (दे. विनयपत्रिका २८. ३) इसकी ओर संकेत किया है। गरुड़ के साथसाथ प्राय: सुदर्शन चक्र तथा सत्यभामा के गर्वनिवारण का भी वर्णन मिलता है। इसके विषयमें सबसे प्रचलित कथा इस प्रकार है –

"कृष्णावतार के समय भगवान् ने हनुमान् को बुलाकर उनको द्वारका के पास किसी उपवन में निवास करने का निमंत्रण दिया था। किसी दिन कृष्ण ने सत्यभामा, सुदर्शन तथा गरुड़ तीनों का गर्व दूर करना चाहा। उन्होंने गरुड़ से कहा – अमुक वन में रहनेवाले बन्दर को पकड़ लाओ। गरुड़ हनुमान् के पास पहुँचे और हनुमान् ने उन्हें ६०,००० योजन पर समुद्रमें फेंक दिया। बाद में कृष्णने गरुड़ को पुन: भेज दिया कि वह हनुमान् को द्वारका के राजभवन में पधारने का निमंत्रण दे दें। इतने में वह स्वयं धनुर्धारी राम बन गए तथा सत्यभामा को सीता का रूप धारण करनेको कहा। सुदर्शन से उन्होंने कहा – 'सावधान रहो, कोई भी प्रवेश करने न पावे।' हनुमान् गरुड़ के बहुत पहले द्वारका पहुँच गए तथा उन्होंने सुदर्शन चक्र को मुँह में डालकर राजभवन में प्रवेश किया। उन्होंने रामरूपी कृष्ण के सामने नतमस्तक होकर तुरन्त पहचान लिया कि सत्यभामा सीता नहीं है, जिससे सत्यभामा को हार माननी पड़ी।

उसी अवसर पर कृष्णने हनुमान् को अपना द्वारपाल नियुक्त किया ।' ५ फादर बुल्के यांनी उल्लेखिलेला कृत्तिवास रामायणाचा संबंधित भाग प्रस्तुत संपादकास पाहावयास मिळाला नाही. त्यामुळे या आख्यानाच्या मूळाधाराविषयी काहीही अधिक लिहिता येत नाही. मुक्तेश्वरासमोर 'कृत्तिवास' रामायणासारखी एखादी संस्कृत रचना असावी.

**आख्यानाचा सारांश**

हे आख्यान फारसे प्रसिद्ध नसल्यामुळे त्याचा सारांश येथे देणे इष्ट वाटते. गरुड व सत्यभामा यांचे गर्वहरण करण्याचे कृष्णाने एकदा ठरविले. त्याने गरुडाला बोलावून हनुमंताला भेटण्याची आपल्याला इच्छा झालेली असल्यामुळे त्याला लवकर घेऊन येण्यास फर्माविले. तसे करताना कृष्णाने गरुडाला हनुमंताचा मोठेपणा समजावून सांगितला. एका क्षुद्र माकडाला बोलावून आणण्याचे काम आपल्याला सांगितले गेले या जाणिवेने गरुड नाराज झाला. पण सेवाधर्माच्या पालनार्थ तो लंकेकडे निघाला. तेथे पोचल्यावर त्याने ध्यानस्थ हनुमंताला बघितले. गरुडाने हनुमंताचे लक्ष वेधण्यासाठी टाळ्या वाजविल्या पण उपयोग झाला नाही. शेवटी गरुडाने 'ए मर्कटा ऊठ, कृष्ण तुला बोलावीत आहे', असे म्हणताच हनुमंताने संतापाने गरुडाला एक जोराची थप्पड मारली. परिणामी गरुड एकदम द्वारकेत जाऊन पडला. तो खाली मान घालून कृष्णापुढे उभा राहिला व झाला प्रकार त्याने कृष्णाला सांगितला. कृष्णाने गरुडाची समजूत काढली व त्याला पुनः हनुमंताकडे पाठविले व 'राम तुझी वाट बघत आहे', असे सांगण्यास सांगितले. गरुड पुनः हनुमंताकडे गेला व कृष्णाने सुचविल्याप्रमाणे बोलला. तेव्हा हनुमंत सद्‌गदित झाला व त्याने गरुडापुढे लोटांगण घातले. मग दोघेही 'राम'दर्शनार्थ द्वारकेकडे निघाले. तिकडे श्रीकृष्णाने द्वारकेचे अयोध्येत रूपांतर केले होते, स्वतः रामाचे रूप धारण केले होते व रुक्मिणी सीता बनली होती. सत्यभामा सीतेचे रूप घेण्यास असमर्थ ठरली होती. हनुमंताने रामादींना भक्तिपूर्वक प्रणाम केला व रामास आलिंगन दिले. राम व हनुमंत यांच्या भेटीने सृष्टीस अपार हर्ष झाला. एतावता रामभक्तीचे मुख्य अवर्णनीय असून रामायणास तुलना नाही.

**सौन्दर्यस्थळे**

अवघ्या ५७ ओव्यांच्या या संक्षिप्त कथानकात काही सौन्दर्यस्थळे अवश्य आढळतात. उदाहरणार्थ, गरुड व हनुमंत यांची पहिली भेट, गरुडाचे औद्धत्यपूर्ण वर्तन, हनुमंताने गरुडाला चपराक मारणे, गर्वहरण झालेल्या गरुडाचे व श्रीकृष्णाचे संभाषण, गरुड-हनुमंतांची दुसरी भेट इत्यादी लहान लहान प्रसंगांच्या वर्णनांत हास्य, अनुकंपा, भक्ती इत्यादी भावनांचा मर्यादित प्रमाणात परिपोष झाला आहे. शिवाय. दोन-तीन ठिकाणचे भावचित्रण परिणामकारकही उतरले आहे. उदाहरणार्थ, परमे-

/

श्वराची हनुमंतविषयक कृतज्ञता यथार्थतेने व्यक्त झाली आहे (ओव्या ७, ८); हनुमंताची रामविषयक भक्तिभावनाही योग्य शब्दांत मुखरित झाली आहे (ओ. ४०–४२). कवीने स्वभावदर्शनाचेही काही बारकावे साधले आहेत. उदाहरणार्थ, गर्विष्ठ गरुडाची नाराजी (ओ. १२) हृद्यतेने प्रकट झाली आहे. त्याचा राग (ओ. १४), लज्जित गरुडाचे वर्तन (ओ. २६), त्याचे रडणे (२७), धाकामुळे 'पाउले माझी न चलती', असे म्हणणे (३६), धास्तावून जाऊन दुरूनच हनुमंतास बघणे (३८), रामदर्शनाभावी हनुमंत ठोकून काढील असे स्वतःशीच म्हणणे (४५–४६) इत्यादी तपशिलांनी आख्यानात माफक रंगभरणी अवश्य झाली आहे.

## इतर गुण

या अल्पविस्तृत आख्यानातील ओव्यांची रचना एकंदरीने प्रवाही असल्यामुळे कथानकात स्वाभाविकपणे गतिशीलता उत्पन्न झाली आहे. तिच्यामुळे जाणवणाऱ्या अल्पप्रमाण मनोरंजकतेमध्ये अतिशयोक्ती (ओ. २५, ५०), उपमा (५, २०, ३२, ४६), स्वभावोक्ती (१९), रूपक (६, ११) इत्यादी निवडक अलंकारांनी किंचित भर घातली आहे. मात्र या अलंकारांत कवीचा प्रतिभाविलास एखाद्याच स्थळी जाणवतो. इतर सर्व स्थळी हे अलंकार कवीच्या आध्यात्मिक-नैतिक उद्दिष्टालाच पूरक असल्याचे ध्यानात येते.

## उद्दिष्ट

मुक्तेश्वराने आत्मोद्धाराच्या उद्देशाने हे लहानसे काव्य रचल्याचे स्पष्टपणे प्रतीत होते. त्याने म्हटलेच आहे की, या आख्यानाच्या श्रवणाने कोटयवधी पापांचा नाश होतो, मोक्षाची प्राप्ती होते (ओ. ५८) व भवसागर क्षुल्लक वाटू लागतो (६२). कवीने या मध्यवर्ती हेतूला पूरक अणी पुढील अनेक अनुभवसिद्ध सत्ये ध्वनित केली आहेत – जितेन्द्रिय मनुष्य कामविकारावर मात करतो (६), पतिव्रता स्वपतीस मनातून दूर सारीत नाही (५), भक्ताच्या नामोच्चाराने पापे जळतात (७), सामान्य माणसाला समर्थाची/श्रीमंताची चाकरी बजावणे कठिणच असते (१२), लक्ष्मीवंताला कोणी अडपता-दडपता नसतो (१३), पंचसतीच्या नामस्मरणाने महापातक्यांचाही उद्धार होतो (४१), परमेश्वराला कोणताही चमत्कार अशक्य नाही (४९), भक्त-भगवंतांच्या भेटीने सृष्टीस आनंद होतो (५६), हरिभजनाने काळ सुखात जातो (५७). अर्थात कवीला सदाचार, इंद्रियजय, पातिव्रत्य, नीतिमत्ता, हरिनामस्मरण, परमेश्वराचे अतर्क्य सामर्थ्य व अव्यभिचारी भक्ती यांचा आदर्श वाचकांपुढे ठेवावयाचा आहे. एकंदरीने, 'काही तरावया गावे' हीच या आख्यानर्निर्मितीमागील प्रेरणा असल्याचे ध्यानात येते.

### दोष व निष्कर्ष

या आख्यानातील ओव्या अक्षरसंख्यादृष्ट्या अनियमित आहेत. काही ओव्यांत तर अक्षरांची भरताड केलेली आढळते (उदाहरणार्थ, ओव्या ४, १४, २०, ३९, ४८, ५२ इ.). ४७वी ओवी ४८व्या ओवीच्या स्थानी असावयास हवी होती व ४८वी ४७व्या ओवीच्या स्थानी हवी होती. म्हणजे कथांशातील सध्याच्या विसंगतीचा परिहार झाला असता. कवीने ओवीच्या सौंदर्यासाठी अनेक जागी व्याकरणदृष्ट्या सदोष रूपे वापरली आहेत. उदाहरणार्थ, मानी ऐवजी मनी (५), पक्षीश्वरेऐवजी पक्षीश्वर (११), इ. प्रस्तुत आख्यानाचा आरंभ आकस्मिक वाटतो. कृष्णाच्या मनात गरुड-सत्यभामेच्या गर्वहरणाचा विचार का आला त्याचा खुलासा कवीने करावयास हवा होता. तशा प्रास्ताविकाभावी कथानकाला आवश्यक ती पार्श्वभूमी लाभत नाही. क्वचित्स्थळी पुनरुक्ती झाली आहे. उदाहरणार्थ, त्वरें, एकसरें (४७), क्षण एक न लागतां (४८), अर्ध क्षणही न लगतां (४९), रुद्रावतार, अकरावा शंकर (११), क्षीरसमुद्र, क्षीराब्धि (१५), वहिला, झडकरुनी (२१). कवीने रुक्मिणीचा निर्देश नपुंसकलिंगी सर्वनामाने करून लिंगविषयक अनौचित्याचा दोष पत्करला आहे (५२). सन्मुख (२५) हे रूप व महिमा शब्दाचा स्त्रीलिंगी प्रयोग (५३) यांतील अशुद्धता खटकते. सर्वसामान्यपणे रचना सुबोध व प्रवाही मराठी भाषेत झालेली असली तरी मध्येच खडबडीत संस्कृतप्रचुर रचनाही आढळते (६); अशी विषम रचना रसिकाचा विरस करते. रामअवतारीचे अंतीं (३), कृष्णअवतारीचे अंतीं (३), क्रोधऊर्मी (३६) इत्यादी ठिकाणी संधी अपेक्षित असूनही न केल्यामुळे विसंधी दोष झाला आहे. कवीला तत्त्वता (८,१६), तेणें (१८), तंव (२५) ही पादपूरके वापरण्याची सवय दिसते, ती त्याज्य आहे. न विसंबे (५, १७), हृदयकमळीं (२४, ६०) अशा शब्दसंहृती रचनेत वरचेवर येनात. ही लकब असमाधानकारक आहे. एकंदरीने गुणदोषांचा साकल्याने विचार केला तर आध्यात्मिक व नैतिक उपदेशावर भर देणारे हे एक मध्यम प्रतीचे काव्य आहे असाच निष्कर्ष निघतो.

## ३. मूर्खांची लक्षणे

### मूळ आधार

कवीने लिहिलेले हे एक अतिशय वाचनीय व उद्बोधक प्रकरण आहे. वरील दोन्ही स्फुटकाव्ये आख्याने होती. अर्थात त्यांत पुराणप्रसिद्ध कथानके [६]होती. प्रस्तुत काव्य तसे नाही. हे एक नीत्युपदेशपर लघुकाव्य आहे. महाभारताच्या उद्योग---पर्वाच्या ३३व्या अध्यायात विदुराने धृतराष्ट्रास पंडितांची व मूढांची लक्षणे सांगितली आहेत. त्यांपैकी मूढलक्षणे या भागाच्या आधाराने मुक्तेश्वराने हे प्रकरण

रचिले असावे, असा तर्क कै. दा. के. ओक[७] यांनी केला होता. परंतु तो पुढील दोन-तीन कारणांवरून ग्राह्य वाटत नाही. पहिले कारण असे की, मुळात मूळलक्षणांचे निरूपण अवघ्या १० श्लोकांत आटोपलेले आहे, मुक्तेश्वराने तत्प्रीत्यर्थ एकूण ११३ ओव्या रचिलेल्या आहेत. मुक्तेश्वरी प्रकरणात निरूपिलेल्या विषयांची संख्याही अधिक आहे. मुळात विदुराने धृतराष्ट्राला कार्याकार्याचा उपदेश केला आहे. मुळातले प्रकरण वाचून व स्वकालीन धार्मिक-सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करून मुक्तेश्वराला आपण एक स्वतंत्र व विस्तृत प्रकरण रचावे असे वाटले असावे. ह्या अनुमानास उपोद्बलक प्रमाणे अशी – मुक्तेश्वरी प्रकरणास मंगलाचरण नसले तरी कवीने ह्या प्रकरणाचे विशेषलक्षणपर (ओव्या १–१३) व सर्वसाधारण लक्षणपर (ओव्या १४–११२) असे दोन स्पष्ट भाग कल्पिले आहेत. शिवाय, कवीने 'एकशत बारोत्तरें । ओंव्या लिहिल्या मुक्तेश्वरें । हें परिसोनियां चतुरें । मूर्खलक्षणें सांडावीं ।।' (ओ. ११३) असा निःसंदिग्ध समारोप केला आहे. त्यावरून त्याने हे एक सुटे व स्वतंत्र प्रकरण कल्पिले असावे असेच वाटते. कदाचित संस्कृतातील नीतिशतक त्यास प्रेरक झाले असावे.

**प्रयोजन**

आपण सांगत असलेली ही मूर्खलक्षणे चतुर पुरुषांनी सोडावीत असे प्रतिपादन करणे हेच कवीचे प्रयोजन आहे. ते त्याने पुढील दोन ओव्यांत असंदिग्ध शब्दांत सांगितले आहे– (अ) 'आतां सर्व साधारणें । अनेक मूर्खांचीं लक्षणें । सांगीजेतील सज्ञानें । त्यागार्थ बुद्धी परिसावीं ।।' १४ ।।, (ब) 'एकशत बारोत्तरें । ओंव्या लिहिल्या मुक्तेश्वरें । हें परिसोनियां चतुरें । मूर्खलक्षणें सांडावीं ।।' ११३ ।।.

**वैशिष्ट्यपूर्ण रचना**

वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे मुक्तेश्वराने सुरुवातीच्या तेरा ओव्यांत विशेष लक्षणे सांगितली असून १५ ते ११२ पर्यंतच्या ओव्यांत सर्वसाधारण लक्षणे निरूपिली आहेत. मधल्या म्हणजे चौदाव्या ओवीत कवीने अशा द्विदल रचनेची प्रस्तावना केली आहे. ही प्रास्ताविक व समारोपाची एकशे तेरावी अशा दोन ओव्या वगळल्यास उरलेल्या १११ ओव्यांत कवीने सुमारे ३०० मूर्खलक्षणे सांगितल्याचे ध्यानात येते. कवीने आपला हेतू अन्वय-व्यतिरेक-पद्धतीने साध्य केला आहे. मनुष्याने गुणांचा स्वीकार करावा व दोषांचा परिहार करावा ही कवीची भूमिका आहे. ती वाचकांच्या मनावर बिंबावी म्हणून त्याने ईश्वरविषयक यथार्थ ज्ञान संपादणे, हरिहरांत अभेद मानणे, सज्जनांविषयी प्रेम बाळगणे, विद्याव्यासंग करणे, गर्व न बाळगणे, सिद्धान्तज्ञान मिळविणे, प्राण्यांवर दया करणे, पवित्राचरण करणे, क्षमाशीलता, नम्रता, उदारता, ऋजुता, सभ्यता, दक्षता, व कर्तव्यतत्परता बाळगणे, आरोग्य-संपन्न असणे, शिष्टाचार पाळणे, संयम बाळगणे, कुटुंबावर प्रेम करणे या गोष्टी

स्पृहणीय असल्याचे सुचविले आहे. अर्थात हे गुण होत. यांचे विपर्यय ते दोष होत. ते त्याज्य असल्यामुळे त्यांचा समावेश कवीने मूर्खलक्षणांत केला आहे. उदाहरणार्थ, ईश्वरविषयक अज्ञान, सज्जनांबद्दल तिटकारा, विद्याभ्यासंगाविषयी नावड, गर्विष्ठपणा, सिद्धान्ताविषयी अज्ञान, प्राण्यांविषयी निर्दयता, पापाचरण, उद्धटपणा, अनुदारता, पोकळ बडबड, ग्राम्यता, शिष्टाचारशून्यता, कर्तव्यभ्रष्टता, बेसावधपणा, वृत्तीचा वाकडेपणा, असभ्यता, अनीतिमत्ता, अनिर्बंधपणा, व्यवहारशून्यता इ.

**सर्व उपदेश पुरुषांना उद्देशून**

कवीने केलेला हा सर्व उपदेश पुरुषांना उद्देशून असल्याचे पुढील उक्तींवरून स्पष्ट होते – तो मूर्ख, तो एक मूर्ख, तो एक मूर्ख जाणावा, तो द्वितीय मूर्ख जाणावा, तो तृतीय मूर्ख जाणावा, ते हे तिघे मूर्ख जाणावे व हे महामूर्ख जाणावे ही सर्व ध्रुवपदे पुरुषांना उद्देशून आहेत. खेरीज, उभा राहूनि वस्त्र फेडी (१६), समर्थवनिता न्याहाळी दृष्टी (२०), एकला एकट चाले पंथी (२१), स्त्री ठेवी जारशेजारी (२३), गुप्त स्त्रियेपाशीं मांगे (२६), दासी, तरुणी, रूपवंता । गृहीं ठेवूनि निभ्रांता (३२), मित्रदारा. . .यांशीं एकांतीं मैत्री करी (३९), स्त्रीसमाजीं आवडे बसणें (४१), शिष्यिणी करूनि त्यागी जाया (६२), स्त्रियेचें वचन घेऊनि कानीं (६५), कुरूप म्हणोनि स्वस्त्री त्यागी (६८), स्त्रियेशीं कटकट करी सर्व काळ (८२), साली अथवा मेहुणी । . . .स्त्रियेच्या बाळंतपणा आणी (८३), परांगनेशीं मैत्री कर्ता (८५), स्त्रीजनासी विश्वास धरी (९१), सापत्नमाता. . . । समीप धांवे तो. . .(९७), ही सर्व वचनेही वरील विधानाचेच समर्थन करतात. मुक्तेश्वराला स्वकालीन पुरुषवर्गाची खालावलेली नीती व संस्कृती चिंताविषय वाटली असावी व म्हणून त्याने त्या वर्गाला हा काहीसा प्रदीर्घ उपदेश केला असावा.

**लोकनिरीक्षण**

कवीने समाजाचे बारकाईने निरीक्षण केलेले असल्याची अनेक प्रमाणे या काव्यात उपलब्ध होतात. उदाहरणार्थ, जो निरर्थक पाठांतर करतो तो मूर्ख (३); सिद्धान्त न समजावून घेता जो केवळ इतरांच्या मतांचे संकलन करतो तो मूर्ख (४); दुसऱ्यांचे अपराध फुगवून सांगणारा (६), लहानांस उपदेश करणारा पण स्वतः कोरडा राहणारा (१०), निर्धन असून प्रपंच थाटणारा (१३), वाऱ्याकडे पाठ करून विहिरीत डोकावून पाहणारा (१५), चालताना बोटाने गवत तोडणारा (१५), बांधावरून घाईने धावणारा (१६), दाताने बोटाचे नख तोडणारा (१७), सभेत बसून सारखा खोकणारा, शिंकणारा किंवा खाकरणारा (१८), देवळात थुंकणारा (१८), लोभी माणसाच्या हाती पैसा देणारा (२३), वस्तू उधार विकून मग तोटा झाला म्हणून ओरडणारा (२४), तीर्थक्षेत्री सोवळेओवळे पाळणारा (२५), हे सारे मूर्ख होत. ह्यांपैकी काहींना आपण अविवेकी, कांगावखोर, अदूर-

दर्शी, अव्यवहारी, अचतुर, निष्काळजी, शिष्टाचारशून्य इत्यादी विशेषणे लावू व त्या दृष्टीने पाहाता मुक्तेश्वराने त्या सर्वांना सरसकट मूर्ख हे भडक विशेषण लावण्यात चूक केली आहे असे म्हणू. तथापि, मुक्तेश्वराच्या ह्या उपदेशावरून त्याची व्यवहार-चतुरता प्रत्ययास येते हे निश्चित.

**समाजदर्शन** [८]

या काव्यात विशिष्ट समाजाचे दर्शन झाले आहे असे हमखास म्हणता येत नाही. कारण यात वर्णिलेल्या अनेक सदसत्प्रवृत्ती सनातन आहेत. त्या आदिमानवाच्या काळापासून चालत आल्या आहेत. तरी देखील मुक्तेश्वरकालीन समाजाच्या काही तुरळक दोषांचे ओझरते दर्शन या काव्यात निश्चितपणे घडते. ते दोष वा त्या दुष्प्रवृत्ती अशा – धार्मिक बाबतीत मतमतांतराचा गलबला माजला असावा (१, २, ४), काही सांप्रदायिक मतांविषयी आग्रही विचारसरणी उत्पन्न झाली असावी (७९), समाजात ईश्वर, मृत्यू, पापाचरण, वेदशास्त्रे, वडीलधारी माणसे, लोकटीका इत्यादींची भयभीती बाळगण्याची प्रवृत्ती कमी होऊ लागलेली असावी (८), अर्थशून्य पाठांतरावर भर देणारा ब्राह्मणवर्ग उत्पन्न झाला असावा (२, ३), दऱ्याखोऱ्यांतील प्रवास असुरक्षित झाला असावा (४३), सर्वसामान्यांची आर्थिक स्थिती बेताचीच असावी (३८, ४४, ५२, ५९, ६१, ८९, १०९), समाजात बळवंतांचा दरारा असावा (१९, ४२, ५३, ५७, ७२, ९३), द्विभार्यापद्धती रूढ असावी (५९), संतमहंतांचे (९९, १०७) व त्यांच्या मठांचे (६२) स्तोम माजलेले असावे, मठांतील नीतिमत्तेची पातळी घसरलेली असावी (६२), स्वच्छतेच्या कल्पना प्रगल्भ झालेल्या नसाव्यात (१७, १८, ७१), भांग वगैरे व्यसनांचा प्रचार असावा (९६). म्हणूनच मुक्तेश्वराला या दुष्प्रवृत्तींचा परामर्श घ्यावासा वाटला असावा व त्यांच्या परिहारासाठी मनुष्याने आत्मनिग्रह करावा कारण तो आत्मप्रापक आहे (१०३), हरिनामस्मरण करावे कारण तेच एकमेव प्रायश्चित्त आहे (१०४), आणि दया हे ज्ञानाचे भूषण आहे हे आळशायरास शिकावे (१०६) असा हितोपदेश कवीने मधून मधून केला आहे.

**दोष व निष्कर्ष**

या काव्यात इतर काव्यांतल्याप्रमाणे लांबलचक, बेडौल व बेंगरूळ चरण अनेक ओव्यांत आढळून येतात. या दृष्टीने पुढील चरण बघावेत – २।२, ४।२, ११।३, १८।३, २०।२, २२।२, २३।२, २५।२, ४४।३, ४५।३, ५१।२, ६०।२, ६४।३, ७०।२, ७८।३, ९२।१, ९५।२, ९६।१, ९८।२, १०६।३ इत्यादी. एकंदरीने रचनेत सौष्ठव असा कमीच आहे. बत्तिसाव्या ओवीतील दुसरा चरण तिसऱ्याच्या जागी व तिसरा दुसऱ्याच्या जागी असावयास हवा होता. ज्ञानअभिमान (३), वेदआज्ञा (८४) अशी विसंधी दोषांची उदाहरणेही मधून मधून आढळतात. पुढील-सारखी व्याकरणदुष्ट रूपे खटकतात – माने (३), मना (७), मनी (३४, १०४

१०६), राजपुरोहिताशीं मत्सर (५३) इ. वेदशास्त्रपुराणज्ञानी (५), शरीर-संपत्तिवयसा (७), करपाददंतधावन (५२), सांप्रदायमताभिमानी (७९), असे प्रदीर्घ समास संस्कृत रचनेत खपून जात असले तरी मराठी रचनेशी ते विसंगत आहेत. मुक्तेश्वराने हे प्रकरण रचल्यावर त्यावरून पुन्हा हात फिरविला नसावा किंवा त्याचे परिष्करण केले नसावे. त्यामुळेच पुढीलप्रमाणे अनेक पुनरुक्ति-स्थळे तशीच राहून गेली आहेत व परिणामी पद्यसंख्या निष्कारण वाढली आहे–अनाहूतपणे परघरी जाणे (२५, ४८), आत्मस्तुती करणे (२६, ५०), आईवडिलांपासून दूर राहणे (६५, ६७), पत्नीचा त्याग करणे (६२, ६८), हरिभजन न करणे (४०, ७४), जाणूनबुजून पापाचरण करणे (५, ८०), परस्त्रीशी मैत्री करणे (३९, ८५), समर्थाशी स्पर्धा करणे (१९, ९३), अहंकार वाळगणे (२७, ९२), नदीच्या पुरात उतरण्याचे साहस करणे (४४, ९४) आणि भाग्योदय झाला असता उन्मत्त होणे (७४, ९८). ह्या सर्व ठिकाणी झालेली पुनरुक्ती कवीला सहज टाळता आली असती. जरी ह्या काव्यात हे दोष दृग्गोचर होत असले तरी मुक्तेश्वराचे हे काव्य तत्कालीन समाज – स्थितीच्या अभ्यासाचे साधन ह्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. कवीने वाचकाला बारीक-सारीक गोष्टींसंबंधी उपदेश करून ‘जगात वागावे कसे’ ते शिकविले आहे. मुक्तेश्वराला व्यापक समाजसुधारणा अभिप्रेत होती असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल. तथापि, ह्या काव्याच्या द्वारे वैयक्तिक सदाचाराचा आदर्श समाजापुढे ठेवावा इतका नेमस्त हेतू त्याने मनात निश्चित बाळगला असावा व तो हेतू सफल झाला आहे असे निःशंकपणे म्हणता येते. तात्पर्य, कवीने व्यवहारचातुर्याचे हे सारे भांडार आपल्या वाचकांसमोर उघडे केले असून ते त्यांनी लुटून आपले जीवन यशस्वी करावे असा जणू मंत्रच कवीने वाचकांना शिकविला आहे.

## ४. भगवद्गीता

### मूळ आधार

भगवद्गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे या तीन ग्रंथांना प्रस्थानत्रयी म्हणतात. त्यांवर भाष्ये लिहून आपल्या पाण्डित्याचा कस अजमाविण्याचा प्रघात प्राचीन काळात होता. त्याच दृष्टीने मुक्तेश्वराने ही टीका लिहिली असावी. मुक्तेश्वरापूर्वी ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ, सोपानदेव, दिवाकरमुनी, बाळापूरकर, कान्होपाठक, नृसिंह, दर्यापूरकर, दासोपंत, माधवदास, रंगनाथस्वामी, रमावल्लभदास, देवदास इत्यादींनी गीताटीका लिहिल्या होत्या. अर्थात मुक्तेश्वरासमोर अशा अनेक भाष्यग्रंथांचे आदर्श होते. खुद्द मुक्तेश्वराची ही कृती अठराव्या शतकात मान्यता पावली होती हे, प्रबोधचंद्रिकेत [१] मोरोपंती आर्या व वामनी श्लोक यांच्या जोडीला मुक्तेश्वरी ओवीला स्थान लाभले होते, या घटनेवरून सिद्ध होते. मुक्तेश्वरासमोरील गीतासंहिता मात्र सध्याच्या प्रचलित गीतासंहितेहून वेगळी असावी असे अनेक ओव्यांवरून जाणवते.

**टीका प्रकाशित की अप्रकाशित ?**

डॉ. वि. य. कुलकर्णी यांनी 'प्राचीन मराठी गीताटीका–तुलनात्मक अध्ययन' या आपल्या पीएच.डी.च्या प्रबंधग्रंथात (पृ.१४३) मुक्तेश्वरी टीका अप्रकाशित असल्याचा उल्लेख केला आहे. तो बरोबर नाही. कारण मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये निर्णयसागर मुद्रणालयाने १९०६ साली छापून प्रकाशित केली होती. त्यांत ही टीका समग्रपणे आली होती. शिवाय बा. अ. भिडे–संपादित सार्थश्रीज्ञानेश्वरीतही वामनी श्लोक व मोरोपंती आर्या यांच्याशिवाय मुक्तेश्वरी टीकाही उद्‌धृत करण्यात आली आहे. (दुसरी आवृत्ती १९३४). यावरून ही गीताटीका अर्वाचीन काळात दोन वेळा प्रसिद्ध झालेली आहे. म्हणून डॉ. कुलकर्णी यांचे उपर्युल्लिखित मत बरोबर नाही.

**वैशिष्टये**

डॉ. कुलकर्णी[१०] यांच्या मते या टीकेत कोणतेही वैशिष्टच नाही. त्यांच्या मते 'दोघा चौघा मुलांनी केवळ छंद म्हणून हे लेखन केले आहे. . . मूळ गीतेचे श्लोक नाहीत. केवळ अनुवाद आहे.'[११] परंतु वस्तुस्थिती तशी नाही. या अनुवादरूप टीकेतही पुढील वैशिष्टये आढळतात.–(अ) मुक्तेश्वरापूर्वी फक्त सोपानदेवाने समपद्य टीका लिहिली होती. मुक्तेश्वराने मूळातल्या एका श्लोकाला एक ओवी या पद्धतीने रचना केली आहे. याला अपवाद फक्त तेराव्या अध्यायातील पहिल्या ओवीचा आहे. मुळात श्रीकृष्णोक्तीनेच त्या अध्यायाचा आरंभ होतो. तर मुक्तेश्वराने एक ओवी अर्जुनाच्या तोंडी घालून श्रीकृष्णाच्या पुढील विवरणास निमित्त उपलब्ध करून दिले आहे. अर्थात ही अधिकची ओवी निश्चितच सुखावह आहे. (आ) मुळातल्या सातशे श्लोकांचा अर्थ तेवढ्याच ओव्यांत बसविण्यात मुक्तेश्वराचे बुद्धिकौशल्य व रचनाचातुर्य दिसून येते. (इ) मुक्तेश्वराने चौदाव्या अध्यायाच्या अखेरच्या ओवीत स्वतःचे नाव मार्मिकपणे गुंफून दिले आहे. त्या ओवीचा अन्तिम चरण 'प्रतिष्ठा सोहळा मुक्तेश्वर ।।' (१४।२७) असा आहे. (ई) मुळातील काही श्लोकांचे मुक्तेश्वरी अनुवाद मुळापेक्षाही चांगले उतरले आहेत. उदाहरणार्थ, ६।२६, ७।२५, ८।१३, ९।४, ९।३१, ९।३२, १०।२३, १३।२९ व १८।६१ या ओव्यांचे अनुवाद अवलोकावेत. या ओव्यांत रचनेची सुगमता व चारुता हे गुण आहेत. मुक्तेश्वराने ११।२० या ओवीत 'लोकांचे भयही भ्याले' अशी सर्वथा स्वतंत्र व रम्य कल्पना केली आहे. आणि ११।२३ मध्ये रम्य सहोक्ती अलंकार साधला आहे. (उ) ओव्या क्रमांक १०।२३ व १३।२९ या रचनादृष्टया आदर्श आहेत. अर्थात ही टीका सर्वथा वैशिष्टयहीन नाही. शिवाय हे दोघाचौघा मुलांचेही लेखन नाही. छंद म्हणून मुले गीताटीका लिहितील? म्हणूनच डॉ. कुलकर्णी यांचा वर उद्‌धृत केलेला अभिप्राय पटत नाही.

**वैगुण्ये**

परंतु या गीतेत वर नमूद केली तेवढीच वैशिष्ट्ये आढळतात. वैगुण्ये मात्र बरीच आढळून येतात. ती अशी–(अ) मुक्तेश्वरी ओवी रचनादृष्ट्या अतिशय विषम आहे. ओवी हा जरी अमळ अघळपघळ रचनाबंध असला तरी त्याचेही जे काही किमान नियम आहेत तेही मुक्तेश्वराने अनेक ठिकाणी मोडले आहेत. या दृष्टीने ओव्या क्रमांक २।९, २।१०, २।१४, २।१५ इत्यादी कितीतरी ओव्या तपासून पाहाण्यासारख्या आहेत. या विषमतेमुळे या काव्याच्या आकृतिबंधात ओबडधोबडपणा उत्पन्न झाला आहे. (आ) या विषमतेमुळे अनेक ओव्या गद्यप्राय बनल्या आहेत; त्यांत पद्याचे सौष्ठव मुळीच नाही. पुढीलसारख्या चरणांतील गद्यप्रायता इतकी उघड आहे की ती वाचकाला प्रथमवाचनीच जाणवते–तयावेगळें कर्म अन्यत्र अर्पितां बद्ध होती (३।९), ऐसें अर्जुन बोलला श्रीकृष्णासी (२।९), ब्रह्मयाने यज्ञ आणि सृष्टी केली (३।१०), अज्ञानियांस कर्म आचरवावें दाटूनी (३।२६), म्हणोनी ज्ञानियाचा नित्य वैरी मी म्हणे (३।२९). अभ्यासकांनी याच दृष्टीने ४।९, ४।३८, ५।८, ७।१, ८।११, ८।२३, ९।१२, १०।८, १०।१०, १०।१९, १२।३, १३।२८, १३।३५ इत्यादी ओव्याही नजरेखालून घालाव्यात. अशा गद्यसदृश रचनांमुळे ओव्यांची प्रवाहिताही खंडित होते. (इ) ही प्रवाहिता विसंधी दोषामुळेही अनेक स्थळी खंडित झाली आहे. लाभअलाभ २।३८, देहअवसानीं ३।८, वैराग्यअग्नीनें ३।४३, दिशाअवलोकन ६।१३, सर्वउत्पत्तिकारण ८।९, मजउद्देशें ९।३४, अज्ञानअंधकार १०।११, शुभअशुभत्यागी १२।१७, शीतउष्ण १२।१८, ज्ञानतपअनुष्ठानहीन १८।६७ अशी सदोष स्थळे सर्व रचनेत विखुरलेली आहेत त्यामुळे विरस होतो. (ई) रसिकाचा असा विरस होण्यास व्याकरणदुष्टता व बोजड समास हे दोन दोषही कारणीभूत होतात. उदाहरणार्थ, माझी भक्ति केलियान ९।३२, होण ११।५५, कंठ सद्‌गदिलें अर्जुनाचें ११।३५, हे महिमा आहे तुझी १०।१५. (उ) मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यांच्या निर्णयसागर – संस्करणाच्या प्रस्तावनेत दा. के. ओकांनी या गीतेचा पुढील शब्दांत गौरव केला आहे–'मुक्तेश्वराने ही छोटेखानी टीका अगदीं मुळास धरून अर्थाची हानी होऊं न देतां रचिली आहे.'[१२] हा गौरव अर्थवादात्मक आहे. कारण प्रस्तुत टीकेत **भावार्थ/सारांश देणे** (ओव्या १।१, २।५६, ३।२१, ७।८, ८।२६ ९।४, १२।१२, १२।१५, १६।१५), **शब्द वगळणे** (युयुत्सवः १।१, तत्, इदं १।१०, तुमुलो १।१९, आततायिनः १।३६, अनार्यजुष्टं २।२, शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्, निश्चित्म, २।७ अगतासून् २।११, अव्ययस्य २।१७, इमां पुष्पितां वाचं प्रवदन्ति २।४२, न बुद्धिभेदं जनयेत् कर्मसंगिनाम् ३।२६, कवयोऽप्यत्र मोहिताः ४।१६, परिप्रश्नेन ज्ञानिनः तत्त्वदर्शिनः ४।३४, अचिन्त्यरूपं आदित्यवर्णं तमसः परस्तात् ८।९, तुल्यप्रियाप्रियो धीरः १४।२४, वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः १५।१५, इ. इ.). **चुकीचे भाषांतर करणे** (नभश्च पृथिवीं–पाताळशिखरें १।१९, धार्तराष्ट्राणां – दुर्योधनासी

१।१९, नो गरीय :–अधिकउणें २।६, चेता:–देहीं २।७, अन्त–दोन्हीपण २।१६, अन्यत्–अधिक २।३१, मा ते संगोऽस्त्वकर्मणि–कर्म करावें २।४७, अकर्मणश्च बोद्धव्यं–अकर्मा चित्त न द्यावें ४।१७, कालेन–ज्ञानेंकरून ४।३८, सांख्ययोग दोन्ही । हे वेगळे म्हणती ज्ञानी ।।५।४, स योगी परमो मत:–तो थोर मम संमत ६।३२, स्वभाव:–सद्भाव ८।३, आकाशस्थित:–सर्वांचे ठायीं ९।६, ऊर्जितं–जय १०।४१, वेदवित्–अर्थवक्ता १५।१, इ. इ.), **पदरमोड करणे** (प्रौढी १।१०, अशी स्थिती जाहली १।२९, फल टाकूनि कर्म करी २।४२, तेणें पावन होशील ४।३४, सूकर ५।१८, तत्त्व इच्छिती सहज ७।१६, ज्ञानअज्ञान यांसि म्हणती ८।२६, तुज न सांगूं मायीक १८।४), **शब्द-विचारादींचा मुळातील क्रम बदलणे** (भ्रमनसे माझें मन, उभें राहूं शकेना १।३०, निद्रा गमन ५।८, बुद्धिमन ५।२८, सुवर्णमृत्तिका ६।८, अर्थकामी, जिज्ञासु ७।१६, ज्ञानवंतांत ज्ञानमुंड, गुह्यांमाजी मौन मी१०।३८, स्तुतिनिंदा समानी १२।१९, ऐसा मोहजाळें वेष्टूनी । अनेक चित्तें भ्रमोनी १६।१६ इ. इ.), **शब्दकल्पनादींची पुनरुक्ती करणे** (मी उद्धरीं तयांसी । . . .तारक त्यातें होतसें १२।७, वाढवी सुख प्रीति विस्तार १७।८, सकाम कर्म निष्काम करावें । निष्काम करावें काम ३।१९ इ.) **आणि मुळातील प्रश्नाला विधानाचे वा विधानाला प्रश्नाचे रूप देणे** (का प्रीति: स्यात् जनार्दन ?–सुख न वाटे १।३६, एतान् हत्वा पापमेव आश्रयेत् अस्मान् –शस्त्रें मारितां पाप जाऊनि हें केंवी घडे? १।३६ इ.) असे अनेक दोष उतरले आहेत. त्यांमुळे प्रस्तुत टीकेची प्रमाण-भूतता उणावणे, अनुवादात बिनचूकपणाचा अभाव उत्पन्न होणे, मुळातील समस्त अर्थाचे वाचकाला आकलन न होणे, टीकेचे तात्त्विक किंवा शास्त्रीय अवमूल्यन होणे, गीताकारांवर अन्याय होणे, वाचकाचा बुद्धिभेद होणे, गीताकारांचा उद्देश बाधित होणे व रचनेत क्लिष्टपणा उत्पन्न होणे असे अनेक दुष्परिणाम घडून आले आहेत.

### प्रयोजन व निष्कर्ष

मुक्तेश्वराने उपसंहारपर भागात गीताटीकेमागील प्रयोजन स्पष्ट केले आहे. त्यावरून असे ध्यानात येते की,पुण्य व मोक्ष यांची प्राप्ती आणि संसारबंधनापासून सुटका होणे हे मुक्तेश्वराच्या मते गीतेच्या पठणपाठणाचे फळ होय. त्याच्या अभिमतानुसार गीतेच्या वाचनाने पुण्यराशी जोडता येते, गीतार्थात गोडी वाटू लागली की प्राणी स्वत:च मुक्त होतो व गीतावाचनाने प्राण्यास चालू किंवा पुढील जन्मी नि:संशय मुक्ती मिळते (उपसंहार २–८). अर्थात, मुक्तेश्वराने गीतेचा अर्थ निवृत्तिपर लावला आहे हे स्पष्ट आहे. जरी मुक्तेश्वराने श्लोकास ओवी अशी समासन करून दाखविली असली व त्याच्या काही ओव्यांचा अनुवाद सरस उतरला असला तरी समग्र ग्रंथात गद्य-प्रायता, व्याकरणदुष्टता, बिनचूकपणाची उणीव, भाषांतरातील प्रामादिकता व एकूण रचनेतील शिथिलता इत्यादी वैगुण्येच अधिक असल्यामुळे ग्रंथ सामान्य दर्जाचाच झाला

आहे. आणि भावार्थदीपिका, संकेतगीता, नारायणकीर्ति, चमत्कारी इत्यादी मुक्तेश्वर-पूर्वकालीन उज्ज्वल व प्रौढ टीकाग्रंथांच्या तुलनेने तर तो अधिकच सामान्य वाटतो !

## ५. विश्वामित्रभोजन

### मूळ आधार

मुक्तेश्वराने प्रस्तुत आख्यानाच्या समाप्तिपर ओवीत आपण ही कथा भविष्योत्तर पुराणातून घेतली असल्याचे म्हटले आहे. अर्थात भविष्योत्तरपुराण या आख्यानाचा मूळ आधार ठरते. परंतु, तसे मानण्यात अडचण आहे. कारण प्रस्तुत संपादकाला बराच शोध घेऊनही भविष्योत्तरपुराण नामक स्वतंत्र पुराण उपलब्ध झाले नाही. भविष्यपुराणाच्या[१३] उत्तरपर्वालाच भविष्योत्तरपुराण म्हणतात.[१४] त्या सबंध पर्वात विश्वामित्रभोजनाची मुक्तेश्वरवर्णित प्रस्तुत कथा आढळत नाही. यावरून एक तर मुक्तेश्वराने केलेला उल्लेख चुकीचा असावा किंवा त्याला सध्याच्या भविष्योत्तर-पुराणाहून वेगळे पुराण उपलब्ध झाले असावे व त्यात त्याने वर्णिलेले हे आख्यान असावे, असे अनुमान करावे लागते.

### कथासार

प्रस्तुत आख्यान इतर आख्यानांप्रमाणे प्रसिद्ध नसल्यामुळे त्याचे सार देणे इष्ट ठरेल—दुर्योधन हस्तिनापुरास सुखाने राज्य करीत असता एकदा काही ब्राह्मण त्याचेकडे आले. त्यांनी पांडवांची स्तुती केली. ती ऐकून पांडवांचा निर्वंश करण्याचा क्रूर विचार दुर्योधनाच्या मनात आला. त्याने शापाने पांडवांना भस्मसात करणारा ऋषी अद्याप जन्माला आलेला नसल्याबद्दल हळहळ व्यक्त केली. तेव्हा शकुनीने एक नामी युक्ती सुचविली. ती अशी की, विश्वामित्रावर पांडवछळाची कामगिरी सोपवावयाची. दुर्योधन स्वत: विश्वामित्राकडे गेला व त्याने आंब्याची कोय भाजून विश्वामित्राच्या हाती दिली व त्यास विनविले, ' ही कोय घेऊन आपण युधिष्ठिरास भेटावे व त्याला तळहातावर आंब्याचे झाड लावण्यास सांगून त्या झाडाच्या फळांचे भोजन तत्काळ देण्यास सांगावे. ' विश्वामित्रानेही धर्माला छळण्याची प्रतिज्ञा केली व तो कामगिरीवर निघाला. त्याने धर्माकडे जाऊन ती बिकट अट सांगितली. ती ऐकून युधिष्ठिराला मूर्च्छाच आली. द्रौपदीही म्लानवदन झाली. पण तिने विश्वामित्राची अट मान्य करून त्यास स्नान करून येण्यास विनविले. तो स्नानासाठी गेल्यावर तिने श्रीकृष्णाचा धावा केला. तो ऐकून कृष्ण द्वारकेहून तातडीने आला व त्याने धर्माच्या हातावर कोयीचे झाड लावले. ते कृष्णाच्या अद्‌भुत शक्तीमुळे पाहता-पाहता वाढले व अमृतमधुर फळांनी भारावले. द्रौपदीने त्या फळांच्या रसाचे सुग्रास जेवण विश्वामित्रादींना वाढले. तेव्हा संतृप्त झालेल्या विश्वामित्राने बहात्तर कोटी वर्षांच्या अनुष्ठानाचे स्वत:चे पुण्य धर्माला दिले. विश्वामित्राने हस्तिनापुरी जाऊन सर्व हकीकत दुर्योधनास निवेदिली

व 'तुझा वंश नाश पावेल', असा त्यास शाप दिला. नंतर तो बद्रिकाश्रमाकडे व श्रीकृष्ण द्वारकेकडे निघून गेला. जाण्यापूर्वी कृष्णाने मायानिर्मित वृक्ष अदृश्य केला.

**वैशिष्ट्ये**

(अ) चमत्कृतिपूर्णता हे या लहानशा आख्यानाचे आद्य वैशिष्ट्य म्हणता येईल. दुर्योधनाने घातलेल्या अटीतच चमत्कृती आहे. त्या अटीनुसार विश्वामित्र धर्माला छळण्याचा विडा उचलतो, द्रौपदीचा धावा ऐकून हजारो योजने दूर असलेला कृष्ण क्षणार्धात प्रकट होतो, धर्माच्या हातावर कोय रुजते, तिचे क्षणभरात वृक्षात रूपांतर होते, विश्वामित्र बहात्तर कोटी वर्षे अनुष्ठान करतो इत्यादी सर्वच तपशिलाच्या वर्णनात भरपूर अद्‌भुतता आहे. त्यामुळे हे कथानक प्रौढ व विचारी वाचकाच्या मनाची पकड घेऊ शकणारे नाही, ते अप्रगल्भ बुद्धीच्या वाचकाच्या मनाला कदाचित भुरळ घालू शकेल.

(आ) दुर्योधनाचा पांडवद्वेष (ओ. ४, ५), विश्वामित्राचा कावेबाजपणा (१५), धर्मराजाची मानसिक दुर्बलता (१७), द्रौपदीचा वज्रनिर्धार (२२), श्रीकृष्णाचे पांडवप्रेम (२८) इत्यादी काही बारकावे सूचित झाले आहेत. परंतु, अतिसंक्षेपामुळ त्यांत आवश्यक तेवढी उत्कटता मात्र उत्पन्न झालेली नाही.

(इ) द्रौपदीचा केवळ दोन ओव्यांचा धावा (२५-२६) हा या लघुकाव्याचा उल्लेखनीय विशेष आहे. त्या धाव्यात द्रौपदीची असहायता व कृष्णभक्ती यथार्थपणे व्यक्त झाली आहे. तिने वापरलेली 'करुणासागरा, जगज्जीवना व कृपाळुवा' ही तिन्ही संबोधने अर्थपूर्ण आहेत.

(ई) **संवाद**– मुक्तेश्वरी काव्यात अनेकदा चटकदार संवाद आढळतात. या लहानशा काव्यातील पुढील संवादस्थळेही बऱ्यापैकी आहेत–मत्सरग्रस्त दुर्योधनाचे शकुनि-कर्णाशी भाषण (४, ५), शकुनीचा सल्ला (६), दुर्योधन–विश्वामित्रांचे संभाषण (९–१२), विश्वामित्र–धर्मांचे परस्परभाषण (१४–१७), द्रौपदी-विश्वामित्रांची प्रश्नोत्तरे (१८–१९, २१–२२), द्रौपदी–कृष्णांचे हार्दिक संभाषण (२९), कृष्णाचे दिलासाचे भाषण (३१-३२), विश्वामित्राची शापवाणी (४१-४२). या संभाषणांत त्या–त्या व्यक्तींच्या स्वभावच्छटा अल्पांशाने व्यक्त झाल्या आहेत.

(उ) या आख्यानात 'रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम्।' हा संस्कृत श्लोकार्ध कवीने मराठी रचनेत उद्‌धृत केला आहे, हा प्रकार लक्षवेधक आहे.

**दोष** – (अ) एकूण कथानक परिपुष्ट नाही. पांडवांची भरभराट, त्यांचा उत्तम राज्यकारभार, प्रजेचे सुख, धर्माघरचे षड्रसयुक्त भोजन इत्यादींची विस्तृत वर्णने असती तर काव्याला भरदार स्वरूप आले असते. त्यांच्या अभावी काव्य बसकट वाटते.
(आ) द्वेषाने भडकलेला दुर्योधन, तपोभंगामुळे संतापलेला विश्वामित्र, अट ऐकून भांबावलेला धर्मराज, अट पूर्ण झाल्याचे पाहून भांबावलेला विश्वामित्र व शापवाणी

ऐकून म्लानवदन झालेला दुर्योधन इत्यादींची ठसठशीन शब्दचित्रे कवीने काढली असती तर हे लहानसे कथानकही रंगले असते. पण कवीने तसा प्रयत्नच केला नाही. (इ) भाषेत भयाभीत (२०), सध्या (११), स्विकारिली (१२), विकस्मीत (३६) इत्यादी व्याकरणदोषांखेरीज माग प्रश्न (९), आठविला हृत्कमळीं (२४), असे अरूढ प्रयोगही आढळतात. कंठीं दाटला प्राण । प्राण व्याकुळ जाहला (२७) या पंक्तींत खटकणारी पुनरुक्ती आहे. (ई) या काव्यात धर्मराज (१४), श्रीकृष्ण (२८), धर्मराजाने (३८), अशा काही शब्दांचा अध्याहार करावा लागतो तरच ओव्यांचा अर्थ लागतो. (उ) रचनेत सफाईदारपणाचा काहीसा अभाव जाणवतो. उदाहरणार्थ, कवीने श्रीकृष्ण द्वारकेस गेल्याचे एकदा वर्णन करून (ओ. ४३), मग त्याने वृक्षास अदृश्य केल्याचा निर्देश केला आहे (४४) व मग पुन्हा श्रीकृष्ण आपल्या स्थानी गेला असे म्हटले आहे (४४). या वर्णनात साक्षेपीपणा नाही हे उघड आहे.

**निष्कर्ष** – दुर्योधनाने हात दाखवून अवलक्षण करून घेतले, विश्वामित्राचा शाप ओढवून घेतला व पांडव सत्त्वपरीक्षेत उत्तीर्ण झाले, हे वाचकांच्या मनावर बिंबते. पण प्रस्तुत आख्यान मात्र काव्यदृष्ट्या सर्वसामान्य असल्याचाच रसिकांचा पक्का ग्रह होतो.

# ६. दुर्योधनशल्यपरिस्फोट

## मूळ आधार

कवीने या आख्यानाच्या बाबतीतही 'हें भविष्योत्तरपुराणींचें निरूपण' (ओ. ७१) आहे असे म्हटले आहे. परंतु, पूर्वी विश्वामित्रभोजन– आख्यानासंबंधी म्हटल्याप्रमाणे स्वतंत्र भविष्योत्तरपुराण उपलब्ध नाही व उपलब्ध भविष्यपुराणाच्या उत्तर पर्वात प्रस्तुत आख्यान आढळत नाही. त्यामुळे मुक्तेश्वराचा वरील उल्लेख चुकीचा असावा किंवा त्याला हे आख्यान ज्यात आहे असे भविष्योत्तरपुराण ज्ञात व उपलब्ध असावे असे म्हणावे लागते.

## अपूर्व कथेच्या द्वारे जीवनभाष्य

कवीने या आख्यानाचे स्वतःच 'अपूर्व कथा पुण्यपावन' (ओ. ७१) असे वर्णन केले आहे व ते प्रत्यक्ष कथानक वाचल्यावर खरोखरच पटते. हे कथानक चटकदार व सरस आहे. त्याच्या द्वारे कवीने मानवी जीवनावरील व स्वभावावरील जे भाष्य ध्वनित केले आहे ते मार्मिक व प्रत्ययोत्पादक आहे. दुर्योधनासारख्या श्रेष्ठ सम्राटालाही एकदा बलाढ्य शत्रूची कुचेष्टा करण्याचा बालिश मोह झाला, तशी कुचेष्टा झाल्याने अर्जुनासारखा परंतपही दीन बनला, भानुमतीसारख्या पतिपरायण साध्वीच्या हातून घडलेल्या प्रमादाचे प्रायश्चित्त दुर्योधनासारख्या अहंकारी अधिराजाला भोगावे लागले, शेषालाही भानुमतीशी समागम करण्याचे भाग्य अनपेक्षितपणे लाभले, दुरभिमानी दुःशासन–

शकुनींनाही चांगली अद्दल घडली व नाकदुऱ्या काढाव्या लागल्या आणि पांडवांच्या संकटकाली त्यांचा सच्चा मित्र कृष्ण तत्परतेने धावून आला या प्रमुख घटना-प्रसंगांच्या वर्णनाच्या द्वारे कवीने कुचेष्टेने प्रतिष्ठा वाढत नसते तर घटत असते; तेजस्वी पुरुषांची दीनता दीर्घ काळ टिकत नसते; क्षुल्लक निष्काळजीपणाही मनुष्यास मोठ्या प्रमाणात नडतो; पुरुषाचा भाग्योदय केव्हा होईल ते कोणालाच सांगता येत नाही; वर्म कोणाचे काढू नये अशा स्वरूपाचा जीवननिरीक्षणपूर्वक कांतासम्मित उपदेश केला आहे. तो अत्यन्त हृदयंगम आहे.

### दोष

परंतु, प्रस्तुत कथानकातील कौतुकास्पद भाग इतकाच. या आख्यानाचा सूक्ष्म बुद्धीने विचार करू लागल्यावर अनेक दोष जाणवू लागतात. त्यांपैकी पहिला दोष म्हणजे (अ) हे कथानक प्रतिबिंबरूप किंवा पडछायारूप वाटते. मुक्तेश्वराने स्वतःला उपलब्ध असलेल्या भविष्योत्तरपुराणातील कथा जशीच्या तशी मराटीत सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळेच हे कथानक वाचकांच्या मनावर सखोल ठसा उमटवू शकत नाही. मुक्तेश्वराने एका अर्थाने भारवाहकाचे काम केले आहे. त्याला वस्तुतः पुढीलसारख्या कित्येक बारीकसारीक छटांचे हृद्य वर्णन करता आले असते— दुर्योधनाचा दरबार, शकुनीप्रभृतींचे सभागृहात आगमन, दुर्योधनाचा जळफळाट, कुत्सित प्रश्न विचारला गेल्यावर अर्जुनाची झालेली प्रतिक्रिया, अधोवदन अर्जुनाचा सभात्याग, अर्जुनाच्या पाणउताऱ्याचे धर्माकडून निर्विकार श्रवण, श्रीकृष्णभाषणास प्रारंभ, दुर्योधनकृत त्यागानंतरची भानुमतीची मनःस्थिती, विरहाचा कालावधी, व्यासागमनप्रसंगी उडालेली भानुमतीची धांदल, व्यासांकडून आशीर्वाद मिळाल्यावर तिला वाटणारी कृतज्ञता, दुर्योधनाच्या दर्शनामुळे झालेला आनंद, शेषागमनप्रसंगी अवाक् झालेली भानुमती, पतीच्या परवशीमुळे तिला होणारे परमावधीचे दुःख, आणि शकुनीच्या म्हणजेच मामंज्याच्या आगमनामुळे तिला वाटणारी लज्जा. कवीने हा बारीक तपशील कल्पनेने भरला असता तर कथानकातील सगळे धागेदोरे एकमेकांशी तर्काने, अपरिहार्य कलात्मक बंधनाने व भावनात्मयतेने गुंफले गेले असते. शिवाय संपूर्ण कथावस्तू सुघटित व सुसूत्र वाटली असती. तिची भावपोषकता व भावोत्पत्तिक्षमता वृद्धिगत झाली असती. पण मुक्तेश्वराला यांपैकी कशातच स्वारस्य वाटले नाही. त्यामुळे कथानक या नात्याने हे आख्यान निर्जीव झाले आहे. त्याला सरळसोट निवेदनाचे रूप आले आहे, वक्रोक्तिरम्य वर्णनाचे रूप लाभलेले नाही. (आ) **आकस्मिकता**—कवीने द्रौपदीकृत कृष्णस्मरण व कृष्णाचे आगमन या दोन्ही घटना एका दमात, नव्हे एकाच ओवीत, वर्णिल्या आहेत (१६). त्यामुळे त्या असंभाव्य वाटतात. भानुमतीच्या दालनात व्यास येतात न येतात तोच भानुमती त्यांना पतिकृत निजत्यागाचे वृत्त ऐकवू लागते (२०). कविकृत हे वर्णनही आत्यंतिक आकस्मिक वाटते. व्यास निघून गेल्यावर भानुमती लगेच जल

प्रोक्षण करून व्यासांनी दिलेल्या वराची जणू परीक्षा घेते (२४). या प्रसंगवर्णनातही असंभाव्यतेचा दोषच जाणवतो. **(इ) प्रामादिक रूपे/शब्दप्रयोग** –ओवी क्र. ३ मध्ये दुर्योधनादी बंधूंनी भीष्मादींना सभास्थानी आणले असे म्हटले आहे. त्या भीष्मादींत विकर्णाचा जो समावेश केला आहे (ओ.४) तो चुकीचा आहे. 'अवलोकी' ऐवजी अवलोकिती (ओ.७), 'पावले' ऐवजी जालें (११), 'कुपित' ऐवजी लज्जित (१२), 'विद्यांनी' ऐवजी विद्येनें (७), 'पुसे' ऐवजी म्हणे (१३)'कथन' ऐवजी श्रवण(१८, ३६ व ४६), 'करील'ऐवजी होईल (२२), 'दु:खित' ऐवजी लज्जित (२९), 'न्यून'-ऐवजी नून्य (६९), 'मौन' ऐवजी मौन्य (७०) अशी अनेक सदोष रूपे आढळतात. **(ई) पुनरुक्ती**–तों आला (५), अर्जुन सभेसी आला (६); बाण(१३) शर (१४); सहोदर (२, ३); तात्काळ त्वरेनें (२२); तंव, तेव्हां (५०), इत्यादी पुनरुक्तिपर शब्दप्रयोग कवीला सहजतया टाळता आले असते. परंतु कवीने त्याबाबतीत हलगर्जी-पणाच केलेला दिसतो. **( उ ) यमकसुखार्थ अर्थहीन चरण** – पुढीलसारखे चरण केवळ यमकसुखार्थ रचले गेलेले आहेत, हे वरवर पाहणाऱ्याच्याही सहज लक्षात येते– ज्यासी म्हणती श्वेतवाहन ( ५ ), समस्त देखती नयनीं (८), ऐसा एक संवत्सर। रायें टाकिला सुंदर (१९), लावितां पात्र पडलें क्षितीसीं (२५). **( ऊ ) अध्याहार**–कवीने अनेक ओव्यांत आवश्यक असलेल्या शब्दांचा साक्षात् प्रयोग केलेला नसल्यामुळे वाचकांना त्यांचा अध्याहार करावा लागतो. ही गोष्ट श्लाघ्य नाही. अशा प्रकारच्या अध्याहाराची काही उदाहरणे अशी–भानुमतीने (२५), तेल (२५), भानुमतीने दिले (४७), ते (४७), त्याने (४८), बांधिले (४८), लागला (५९), नशिबीं (५५), श्रीकृष्णें (६३), जो बोले (६९). **(ए) गद्यप्रायता**–पडलें शेषाच्या मस्तकावर (२६), निशीचें वर्तमान सर्व सांगे (३०), अशा ओळी उघडपणेच गद्यप्राय आहेत.

**अलंकार**

मुक्तेश्वराने या आख्यानातील काही ओव्यांत अलंकार साधले आहेत. त्यांचे पृथक्करण करणे उद्बोधक ठरेल. या आख्यानातील अलंकार असे :

**व्यतिरेक** :– धृतराष्ट्राच्या पुत्रांच्या पराक्रमापुढे मेरू पर्वतही ठेंगणा होता (२). पराक्रम व मेरू यांत सादृश्य नसल्यामुळे हे वर्णन सदोषच आहे.

**उपमा** :– जसा तारकांमध्ये चंद्र शोभावा तसा कौरवांमध्ये अर्जुन शोभला (६), कोंदणात बसविलेल्या अनेक रत्नांमध्ये जसा मोठा मणी चमकावा तसा सर्वांमध्ये धनंजय शोभला (८), देवदारू इत्यादी नानाविध वृक्षांमध्ये जसा मलय-चंदनवृक्ष शोभावा तसा इतरांमध्ये अर्जुन शोभला (९), चाफा वगैरे फुलांमध्ये जशी चमेली खुलून दिसते तसा कौरवांत अर्जुन उठून दिसला (१०), अग्नीवर तूप शिंपडावे त्याप्रमाणे दुर्योधन लज्जित झाला (१२), महादुर्धर शेष क्रोधाग्नीप्रमाणे

प्रकटला (४०) आणि श्रीकृष्ण पक्ष्याप्रमाणे आला (५५). वरीलपैकी ओव्या ६, ८ व ४० यांतील उपमा सुखावह आहेत. परंतु नवव्या ओवीतील उपमेत असादृश्य आहे तर दहावीत लिंगदोष आहे. बाराव्या ओवीतील तुलनेत साम्याभाव आहे तर ओवी क्र. ५५ मधील उपमेत जातिभिन्नतारूप अनौचित्य आहे.

**रूपक** :– दुर्योधनाचे शब्द हेच बाण (ओ. १३) हे वर्णन यथायोग्य आहे. परंतु, एकंदरीने वरील काव्यालंकारांनी काव्यसौन्दर्यात भर घातली आहे असे म्हणता येत नाही.

**निष्कर्ष** :– मुळातील कथानक आशयपूर्ण व चटकदार आहे. त्यात हृद्य बारीक स्थळे बरीच आहेत. परंतु, कवीने ती स्थळे ओकीबोकीच ठेवली आहेत, त्यांना प्रतिभेच्या मदतीने सजविले–खुलविले नाही. त्यामुळे मुळातील संस्कृत कथावस्तू आपण मराठीत वाचली व तिच्याशी ओळख करून घेतली एवढेच माफक समाधान रसिकाला लाभते. मुळातल्या कथानकाचे कथनमात्र झाले आहे, वर्णन किंवा पुर्ननिर्माण झाले नाही. या कथानकात मुळातच आनंददायकता आहे. तिच्यात मुक्तेश्वरी प्रतिभा भर घालू शकली नाही किंवा तिचे पूर्णपणे आविष्करणही साधू शकली नाही. उलट मुळातील कथावस्तूत काही वैरस्यकारक दोष मात्र मुक्तेश्वरी प्रतिभेने उत्पन्न केले आहेत. तात्पर्य, मुक्तेश्वरवर्णित प्रस्तुत काव्य उत्तम नाही, फार तर मध्यम प्रतीचे म्हणता येईल.

## ७. अर्जुनकामनापूर्ती

**मूळ आधार**

ह्याबाबतीत प्रस्तुत आख्यानाचीही स्थिती मागील दोन आख्यानांसारखीच आहे. त्यामुळे त्यांच्या बाबतीत वर जे विवेचन केले आहे ते या आख्यानालाही लागू पडते.

**प्रयोजन**

हरिहरांचे ऐक्य प्रतिपादन करणे अर्थात भक्त व भगवंत यांत सख्य उत्पन्न झाले की, दोहोंतील द्वैत गळून पडते हा मुख्य सिद्धान्त वाचकांच्या गळी उतरविणे हा मुक्तेश्वराचा प्रधान हेतू आहे. त्याच्या अनुषंगाने कवीने पुढीलसारखे अनेक सद्‌विचार वाचकांच्या मनावर ठसविले आहेत – परमेश्वरी लीला अतर्क्य असते; परमेश्वरचरणी लीन झालेल्या भक्तालाही कधी कधी मोह होतो म्हणून त्याने सावध राहावयास हवे; कामविकार सर्वकष आहे, तो कोणाचा तपोभंग, कोणाचा चारित्र्यभंग तर कोणाचा कीर्तिभंग करतो, एकंदरीने तो प्राणिमात्राला विवेकभ्रष्ट बनवितो; खरी पतिव्रता तीच की जी पतीने स्मरण केल्याबरोबर तत्काळ येते; सच्छील भक्ताला मोहाच्या क्षणीही ईश्वराचे स्मरण होते व तेच त्या भक्ताचे रक्षण करते;

स्त्रियांना दागिन्यांचा व द्रव्याचा हव्यास उपजतच असतो; स्त्रिया खोटारड्या असतात, त्यांच्यावर विश्वास ठेवू नये; सात्त्विक मनुष्याला ऋणाची परतफेड न झाल्यास मेल्याहून मेल्यासारखे वाटते. कवीने प्रस्तुत काव्यात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे केलेला वरील सर्वच उपदेश मोलाचा आहे.

**वैशिष्टये**

प्रस्तुत काव्याचे कथानक लहानसेच असले तरी कवीने ते चांगले रंगविले आहे. त्याने कृष्णाच्या कपटनाटयाचे अतिशय चित्ताकर्षक वर्णन केले आहे. कवीचे निवेदन गतिशील असल्यामुळे कथानकातील प्रसंग नजरेसमोरून झरझर सरकतात व त्यामुळे उत्कंठा वाढतच जाते. ती ओवी क्र. ५२ मध्ये अगदी शिगेस पोचते. कवीने काही स्थळी एखाद-दुसऱ्या औचित्यपूर्ण शब्दाने काव्य उत्पन्न केले आहे व नाटय फुलविले आहे. उदाहरणार्थ, विसरला हस्तिनापुर (१५), चिंता करी अर्जुन (३२), सहसा बोले वचन (३५), क्रोधें भरला अर्जुन (३६), सांगता लज्जित मन (४३), कज्जळपूर्ण पार्थाचे नयन (५२) आणि करिता जाला अधोवदन (५४) ह्या पंक्तींतील अनुक्रमे विसरला, चिंता करी, सहसा, क्रोधें, लज्जित, कज्जळपूर्ण व अधोवदन हे शब्द अर्थगर्भ व भावपोषक आहेत. या कथानकातील अशी सूक्ष्म सौंदर्यस्थळे हृदयंगम आहेत

**दोष**

(अ) **वर्णनाभाव**–कवीने कुंजवनाचे वर्णन अतिशय संक्षिप्तपणे ( ओ. १०-११) केले आहे. ते थोडे विस्तृत असते म्हणजे परिणामकारक झाले असते. अर्जुन रात्र पडण्यापूर्वी कुंजवनातून हस्तिनापुरी परतल्याचे वर्णन ३४ व्या ओवीनंतर केले जावयास हवे होते, म्हणजे कथानकातील दुवे नीट सांधले गेले असते. (आ) **क्रमभंग** – ओव्या क्र. ३ व ५५ मध्ये कृष्ण-अर्जुन व नरनारायण अशा जोड्या पडल्या आहेत, त्यात क्रमभंग झाला आहे. तसेच ओवी क्र. ८ मधील दुसरा व तिसरा हे चरण अनुक्रमे तिसरा व दुसरा असे असावयास हवे होते. (इ) **गद्यप्राय रचना** – हें अभिनव मजला वाटतसे (६), हें मज आश्चर्य जाहलें (२८) ह्या व अशा ओळी गद्यप्राय आहेत. (ई) तत्काळ त्वरेनें (२५) अशी एखादी गंमतीदार पुनरुक्ती आढळतेच. (उ) **चुकीचे प्रयोग** – 'करोनि' ऐवजी केलें (८), 'देवतार्चना'-स्थानी 'देवतार्चनीं' (४), अनुपम्य (१०), 'न करिता विवेक' ऐवजी न विचारतां ज्ञान (१८), दरुपण (४०), 'तिलोत्तमेतें देखून' ऐवजी तिलोत्तमा ते देखून (१९), रुक्मीण (४३, ४६) इत्यादी प्रामादिक शब्दप्रयोग खटकतात.

**निष्कर्ष** – कवीने आख्यानाचा पुरेसा परिपोष केलेला नसल्यामुळे जरी त्यात अपेक्षित उत्कटता उतरलेली नसली तरी काम, आश्चर्य, लज्जा, लडिवाळपणा, चिंता, क्रोध, उद्वेग, प्रसन्नता इत्यादी अनेकविध व संकीर्ण भावनांच्या सूक्ष्म छटा

आविष्कृत केलेल्या असल्यामुळे व दोषांची संख्या सापेक्षतया कमी असल्यामुळे हे आख्यान हृदयंगम झाले आहे

## ८. शतमुखरावणवधाख्यान

### मूळ आधार

कवीने प्रस्तुत काव्याच्या अखेरच्या ओवीत आपण हनुमंतनाटकातील या कथेचा मराठी भाषेत तर्जुमा केला असल्याचे म्हटले आहे (हे हनुमंतनाटकींची कथा। महाराष्ट्र-भाषा यथार्थ उलथा।). अर्थात हनुमंतनाटक ह्या आख्यानाचा मूळ आधार ठरते. हनुमंतनाटकाच्या संहितेच्या दोन परंपरा उपलब्ध आहेत. पैकी एक १४ अंकांची व ५७९ श्लोकांची असून ती दामोदरमिश्रांनी सिद्ध केल्याचे मानले जाते.[१५] तर दुसरी ९ अंकांची व ७९१ श्लोकांची असून तिचे कर्तृत्व मधुसूदन मिश्रांकडे देण्यात येते.[१६] पहिली महाराष्ट्रात विशेष प्रसिद्ध असून दुसरी बंगालमध्ये किंवा पूर्व भारतात प्रसिद्ध आहे. परंतु यांपैकी कोणत्याही परंपरेत मुक्तेश्वररचित शतमुखरावणवधाख्यान मिळत नाही. अर्थात मुक्तेश्वराने आख्यानांती केलेला निर्देश चुकीचा असावा किंवा हे आख्यान ज्यात आहे अशी हनुमंतनाटकाची संहिता त्याच्यासमोर असावी. रेव्हरंड फादर कामिल बुल्के[१७] यांनी हे आख्यान आनंदरामायण व तत्त्वसंग्रह रामायण या दोन ग्रंथांमध्ये असल्याचे नमूद केले आहे. पैकी तत्त्वसंग्रह रामायणातील कथा अशी आहे.–एकदा काही मुनींनी अयोध्येस येऊन शतानन रावण रक्तबिंदू नामक असुराबरोबर सप्तसमुद्रांच्या दुसऱ्या किनाऱ्यावर राहात असल्याचे रामास सांगितले. ते सीतेने ऐकले व त्या रावणाचा वध करण्याची इच्छा प्रदर्शित केली. रामाने तिची इच्छा मान्य केली आणि तिला हनुमानासह पुष्पक विमानामधून ससैन्य धाडले. सीतेने १८ हातांचे उग्र रूप धारण केले व शतमुख रावणाचा वध केला.[१८] परंतु, मुक्तेश्वरी कथानक याच्याशी जुळत नाही. आनंदरामायणातील[१९] प्रस्तुतचे कथानक सारांशरूपाने असे आहे–गोदावरीच्या काठी नृसिंह नावाचे मुनी राहात होते. त्यांचा पुत्र राम व त्याचा शिष्य विष्णू हे दोघेही रामसेवारत असल्यामुळे त्यांना अनुक्रमे रामदास व विष्णुदास म्हणत असत. एकदा रामदास विष्णुदासाला म्हणाले, 'कुंभकर्णपुत्र निकुंभाची पत्नी रावणवधाच्या वेळी गरोदर होती. रावणवधानंतर ती प्रसूत झाली. तिला झालेल्या मुलाचे नाव पौंड्रक असे ठेवण्यात आले. त्याने मायापुरीत राहाणाऱ्या शतमुखी रावणाच्या मदतीने बिभीषणाला पदच्युत करून मारण्याची भीती घातली. तेव्हा घाबरलेला बिभीषण रामाकडे गेला व त्याने रामाला सर्व हकीकत सांगितली. रामाने पौंड्रकावर स्वारी करून त्याला व शतमुखी रावणाला मारले आणि बिभीषणाला लंकेचे राज्य पुन: दिले. परंतु, पुन: काही काळानंतर बिभीषण रामाच्या राजवाड्यात आला व घळघळा रडत त्याने रामाला पुढील हकीकत सांगितली–'कुंभकर्णाला पूर्वी

मूळ नक्षत्रावर एकमुलगा झाला होता. त्याला पित्याने एका झाडाखाली टाकले होते. त्याला माशांनी मध पाजून वाचविले. तोच मूलकासुर. तो आता तरुण झाला असून त्याने तपश्चर्या करून ब्रह्मदेवाचा वर मिळविला आहे. त्याने पातालवासी असुरांच्या मदतीने मला मारण्याचा व तुझ्याशीही युद्ध करण्याचा निश्चय केला आहे. तेव्हा माझे रक्षण कर व तूही सावध राहा.' बिभीषणाचे हे वृत्तनिवेदन ऐकून रामाने तत्काळ मूलकासुरावर स्वारी करण्याचे ठरविले. राम लक्ष्मण-सुग्रीव-प्रभृतींना बरोबर घेऊन निघाला. लवकरच त्याचे मूलकासुराशी युद्ध जुंपले. कुशाने मूलकासुरास वायव्यास्त्राने लंकेत उडवून दिले तेव्हा पराजित असुर यज्ञ करू लागला. बिभीषणाला ही बातमी कळली. रामाने वानरांना यज्ञनाश करण्यासाठी पाठविण्याचे ठरविले. तेव्हा सीतेला बोलावून घेऊन तिच्याकरवी मूलकासुराचा वध कर, असा निरोप रामाला ब्रह्मदेवाने पाठविला. त्याप्रमाणे रामाने गरुड व हनुमंत यांस धाडून सीतेला घेऊन येण्यास आदेशिले. तिकडे राम अयोध्येतून गेल्यापासून सीता व्रतस्थ होती. तिला गरुड-हनुमंतांकडून निरोप कळताच ती युद्धार्थ जावयास तयार झाली. तिने रामाज्ञेनुसार चंडीचे रूप घेतले व लवकरच तिचे मूलकासुराशी युद्ध सुरू झाले. तिचे भयंकर रूप पाहिल्यावर व ती रामाची शक्ती आहे हे समजल्यावर त्या मूलकासुराने तिच्यावर निर्भयपणे प्रहार करावयास सुरुवात केली. दोघांचे घनघोर युद्ध झाले. शेवटी सीतेने मूलकासुराचे मस्तक उडवून धड लंकेच्या दारात पाडले. तेव्हा देवांनी स्वर्गातून पुष्पवृष्टी केली व ब्रह्मदेवाने तिची नऊ श्लोकांनी स्तुती केली. नंतर सीतेने पूर्वरूप धारण केले व ती रामापाशी आली. वानरांनी तिचा अद्भुत पराक्रम बघून तिची स्तुती केली. रामाने बिभीषणाची पुन्हा लंकेच्या राज्यावर स्थापना केली व त्याला वर दिला. बिभीषणाने राम व सीता यांचे सत्कारपूर्वक आभार मानले. मग रामाने सीतेसह अयोध्येकडे प्रयाण केले.

वरील आनंदरामायणीय कथेची ठळक वैशिष्ट्ये अशी–१ या कथेत दोन उपकथा आहेत–एक शतमुखी रावणाच्या वधाची व दुसरी मूलकासुराच्या वधाची. २ शतमुखी रावणाचा वध रामाने केला व मूलकासुराचा वध सीतेने केला. ३ एक सबंध सर्ग (पाचवा) सीताविरहवर्णनाचा आहे. ४ मूलकासुराचा जन्म, त्याचे पोषण, त्याला ब्रह्मदेवाकडून झालेली वरप्राप्ती व त्याने बिभीषणाला दिलेली धमकी इत्यादी सर्व तपशील विस्ताराने सांगितला गेला आहे. ५ सीतेला घेऊन येण्याची सूचना ब्रह्मदेवाने केली. ६ मूलकासुरास ब्रह्मदेवाच्या वरामुळे व एका मुनीच्या शापामुळे स्त्रीकडून मरण यावयाचे होते. ७ ब्रह्मदेवाने रचिलेले सीतास्तोत्र पुण्यकारक व मृत्युभयनिवारक आहे.

**मुक्तेश्वरकृत परिवर्तन :**

मुक्तेश्वराचे आख्यान आनंदरामायणातील कथेवर आधारित असावे. परंतु, त्यातही कवीने काही फेरबदल केलेले आहेत असे लक्षात येते. ते फेरबदल असे– १. मुक्तेश्वराने रामकृत पौंड्रक-शतमुखरावणवध व सीताकृत मूलकवध अशी दोन

कथानके एकत्र आणली व त्यांचे एक जोड कथानक तयार केले. परंतु तसे करताना मुक्तेश्वराने मूलकासुराचा निर्देश अजिबात गाळून टाकला आणि सीतेनेच शतमुखाचा वध केला असे वर्णन केले. २. मुळातील केवळ पौंड्रक-शताननवधाचे आख्यान जेमतेम सहा श्लोकांचे आहे, मुक्तेश्वराचे संयुक्त कथानक १३३ ओव्यांचे आहे. ३. मुळात रामाने पौंड्रक व शतानन या दोघांचाही वध केल्याचे वर्णन आहे. तर मुक्तेश्वरी आख्यानात पौंड्रक रामाला शरण आला, तेव्हा रामाने त्याला जीवदान दिले असे वर्णन केलेले आहे (ओ.१२४–१२५). ४. मुळात सर्वत्र पौंड्रक असेच नाव आहे, मुक्तेश्वरी आख्यानात सर्वत्र (ओ. ५, १७, २५, १२३, १२५) पौंड्रिक असे नाव आहे. ५. हनुमंत शरीराने प्रचंड झाला व त्याच्या त्या पर्वतप्राय शरीरावर राम, लक्ष्मण व वानरसैन्य चढून बसली (ओ. ४९) असे वर्णन मुक्तेश्वराने केले आहे. मुळात तसे नाही. ६. मुक्तेश्वराने सीताविरहाचे वर्णन पूर्णपणे वगळले आहे. ७ हनुमंताच्या शरीरावर सैन्य चढल्यावर त्याने डावा पाय शरयू तीरावर ठेवला व उजवा पाय मायापुरीत ठेवला असे जे वर्णन मुक्तेश्वराने केले आहे (ओ. ५१), ते मुळात आढळत नाही. ८. रामाकडील सर्व वीर अंबेचा उदो उदो करू लागले (ओ. ५३) हे मुक्तेश्वरकृत वर्णनही मुळात नाही. ९. शतमुखाने कालिक नामक पंचाक्षऱ्याला रामसैन्यावर पाठवले (ओ. ५७) व त्याचे वानरांशी युद्ध झाले हेही वर्णन मुळात आढळत नाही. १०. ब्रह्मदेवरचित चंडिकास्तुती मुक्तेश्वरी काव्यात नाही. ११. मुळात नारद युद्धभूमीवर गेल्याचे वर्णन नाही. परंतु मुक्तेश्वरी आख्यानात (ओ. ४९) नारदही रणभूमीवर सैन्याबरोबर जातो असे वर्णिले आहे. १२. सीतेला घेऊन येण्याची सूचना, मूळ कथेनुसार, ब्रह्मदेवाची; तर मुक्तेश्वरी कथानकात तसा सल्ला नारद रामाला देतो (ओ. ७५). अशा प्रकारे मुक्तेश्वराने मूळ कथानकात बरेच फेरबदल केले आहेत.

**कथानकाच्या आकर्षकपणाची कारणे**

(अ) दशमुख रावण हे नाव व त्याचा रामकृत वध ही घटना सर्वप्रसिद्ध आहेत. शतमुख हे नाव मुळातच अप्रसिद्ध असल्यामुळे त्याच्या वधाचे कथानक चित्तवेधक ठरते. शिवाय, त्यात नाट्यपूर्ण स्थळे अनेक आहेत.

(आ) मुक्तेश्वराने हे समस्त काव्यच जणू रूपकमय बनवून टाकले आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत कवीने पुढीलप्रमाणे अनेक रूपके रचिली आहेत—१. सद्गुरुकृपारूप वसंतकाळी मनरूप बागेमध्ये जिव्हारूप कोकिळ कूजन करू लागला (ओ १), २. कुलक्षयवृत्तान्तरूप बाण निकुंभपत्नीच्या कर्णरूप मर्मावर जाऊन आदळला (५), ३. त्यामुळे ती शोकरूप नदीच्या पुरात वाहात गेली (७), ४. तिला बिभीषणाच्या उत्कर्षरूप रोगाने पछाडले तेव्हा पुत्रप्रौढत्वरूप दिव्यौषधीचा दिलासा तिला वाटू लागला (८), ५. पौंड्रकाची बाल्यरूप स्वप्नस्थिती व कौमार्यरूप सुषुप्ती संपल्यावर

त्याला तारुण्यरूप जागृती प्राप्त झाली (९), ६. कुंभकर्णरूप दांडा रामरूप कुऱ्हाडीवर आदळल्यामुळे वंशरूप वृक्ष उत्सन्न झाला (११), ७. राक्षसकुळरूप गृह रामरूप अग्नीने भस्मसात् केले (१८), ८. शत्रुशस्त्ररूप सिंहांनी बिभीषणरूप हत्तीवर चाल केली असता त्यांना प्राणरूप कीर्ती लाभली नाही (२३), ९. बिभीषणाचे नेत्ररूप भृंगे रामाच्या पदकमलरूप परागांचे सेवन करू लागले (२९), १०. शतमुखरावणरूप कोल्ह्याच्या दुराचरणाचे वृत्त ऐकून रामरूप सिंह अग्नीप्रमाणे प्रक्षुब्ध झाला (३२), ११. रामाच्या पश्चात्तापरूप नदीला नारदरूप तारू लाभले (३८), १२. प्रतिज्ञारूप पर्वत ओलांडून जाण्यासाठी आपल्यापाशी सामर्थ्यरूप हात नाहीत असे रामाला वाटले (४२), १३. कपिशरीररूप वृक्षावर सर्व वानरसैन्य चढले (४८), १४. रामाचे सर्व सैन्य कपिशरीररूप पर्वतावर चढले (४९), १५. कपिशरीररूप आकाशात वीररूप नक्षत्रे चमकली (५०), १६. रामरूप देवीच्या पुजाऱ्यांनी मशालीरूप काकडे पाजळले (५२), १७. रामरूप महामृत्यूने बाणरूप जाळे पसरून शरीररूप पाण्यामधून राक्षसप्राणरूप मत्स्य बाहेर काढले (६०), १८. वृत्तान्तरूप तूप कर्णरूप कुंडात पडताच क्रोधरूप अग्नी धडधडू लागला व कुशब्दरूप ज्वाळा ओकू लागला (६४), १९. हनुमंत मनरूपी सागरात युक्तिरूप मोती धुंडाळू लागला (८३), २०. हनुमंतरूप कृष्णाने सीतारूप गोवर्धनाला उचलले (८५), २१. रामरूप गजेंद्राला जेव्हा शतमुखरावणरूप नक्र त्रास देऊ लागला तेव्हा सीतारूप श्रीधर मदतीसाठी धावला (८८), २२. शक्तीने राक्षसरूप जोंधळ्याची शंभर मुखरूप कणसे स्वकर्मरूप विळ्याने तोडली (११३), २३. रामाने वानरशरीररूप जहाजात बसून आज्ञारूप वाऱ्याच्या मदतीने मार्गरूप सागर ओलांडला (१२१), २४. राम कपिशरीररूप घोड्यावर चढला (१२७) आणि २५. रामप्रतिज्ञारूप द्राक्षवेल कपिशरीररूप मंडपात विस्तारली व तिच्यावर शक्तिसामर्थ्यरूप अमृतफळांनी युक्त असे सुकीर्तिरूप घोस दिसू लागले (१३२). वाचकाला सामासिक शब्दांचा विग्रह करून ही रूपके समजावून घ्यावी लागतात. ही बौद्धिक कसरत ज्या वाचकांना आवडते त्यांना ह्या रूपकापासून काहीसा बौद्धिक आनंद होतो.

(इ) शतमुखाचा वध हाच विषय असल्यामुळे कथानकच वीर, अद्भुत व रौद्र या रसांनी ओतप्रोत भरलेले आहे. ती रसप्रतीती आणून देणारी काही वर्णने परिणामकारक वठली आहेत. उदाहरणार्थ, मायापुरीतील सार्वत्रिक अंधार (ओ. १५), बिभीषणाच्या सैन्याचे आक्रमण (२१–२३), रामाचा प्रक्षोभ (३२), रामाची रावणवधप्रतिज्ञा (३४–३५), कालिक व वानरसैन्य यांचे युद्ध (५७–६०), राम व शतमुख यांचे युद्ध (७०–७४), सीतेचे आगमन (८५–८७), सीतेचा मानसिक गोंधळ (९५–९६) रामकृत सीताप्रार्थना (१०२–१०३), सीतेने धारण केलेले चंडिकेचे रूप (१०६–१०९), चंडिका-रावणयुद्ध (११०–११५) व देवांनी केलेली पुष्पवृष्टी (११७). यांपैकी ओ. ७०–७४, १०६–१०९ व ११०–११५ ही वर्णने विशेष रसमय आहेत

वरीलपैकी इतर वर्णने फार त्रोटक असल्यामुळे भावपरिपोष साधू शकत नाहीत एवढे मात्र खरे.

(ई) **सुसंगती**–'मी आज रात्री शतमुखाचा वध करून उद्या अयोध्येला जाऊन पारणे फेडीन' (३५), अशी प्रतिज्ञा रामाने केली होती. सीतेने शतमुखाचा वध केल्यावर तिला घेऊन राम द्वादशीच्या दिवशी अयोध्येस परतला व त्याने पारणे फेडले (१३०–१३१). ही वर्णनगत सुसंगती सुखावह आहे.

(उ) **संवाद**–चटकदार व पात्रोचित संवाद हे मुक्तेश्वराच्या अनेक कथाकाव्यांचे वैशिष्ट्यच आहे. ते या काव्यातही काही स्थळी जाणवते. उदाहरणार्थ, पौंड्रक व त्याची माता यांची प्रश्नोत्तरे (ओ. १०–११) भावपूर्ण आहेत. तर शतमुखाचे एकशब्दी भाषण ('अवश्य' ओ.२०) त्याचा अढळ निश्चय व्यक्त करते. राम व बिभीषण यांचा संवाद (ओ. ३०) अभिप्रायपूर्ण आहे. तसेच रामाचे ओ. ४१–४२ मधील भाषण त्याची चिंता व्यक्त करणारे आहे. शतमुखाचे भाषणात (६६–६९) त्याचा रणावेश, आत्मविश्वास, त्याला शत्रूविषयी वाटणारी तुच्छता व शत्रूला धडा शिकविण्याचा त्याचा निर्धार हे सर्व स्वभावविशेष सुस्पष्टपणे व्यक्त झाले आहेत. राम व हनुमंत यांचे संभाषण (ओ. ८०–८१) सरळ व चांगले आहे. तर रामाने सीतेला युद्ध करण्याविषयी केलेल्या विनंतीपर भाषणात (ओ. ९७–१००) त्याची व्यथा, असमर्थता व अपेक्षा ह्या भावना प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत.

(ऊ) वर म्हटल्याप्रमाणे या काव्यातील मुख्य व काव्यव्यापी अलंकार रूपक हाच आहे. पण त्याखेरीज उपमा (ओ. ३२, ४७, ७३), अतिशयोक्ती (ओ. ४७, ५४, १०९) इत्यादी अन्य अलंकारही प्रतीत होतात.

**दोष**

वर कथानकाच्या आकर्षकपणाची कारणे नमूद केली आहेत. त्यात (आ) कलमात प्रस्तुत काव्यातील रूपकांचा आढावा घेतला आहे. त्या रूपकांमुळे काव्यार्थाचे चटकन आकलन होत नाही. रसिक वाचकाला प्रथमत: रूपक समजावून घ्यावे लागते. त्यात रसिकाची बरीच शक्ती वाया जाते. शिवाय, काव्यातील प्रसाद गुणाची त्या रूपकांमुळे हानी झाली आहे. वर दाखल केलेल्यांपैकी क्रमांक ५ चे रूपक कृत्रिम आहे, क्र. ६ व १२ ही चुकीची आहेत, क्र. १० मधील उपमा निष्प्रयोजन आहे, १६ व २१ यांत लिंगभेदाचा दोष आहे, तर २० व २२ यांमध्ये अर्थाचे अनौचित्य आहे. शिवाय, कवीने 'कपि' या एकाच उपमेयाची वृक्ष, पर्वत, आकाश, जहाज, घोडा व मंडप (रूपक क्र. १३, १४,१५, २३, २४ व २५) अशा परस्परविरुद्ध, सचेतन-अचेतन व मूर्तामूर्त उपमानांशी तुलना केली आहे (कवीने कपीला खूपच राबवून घेतले आहे !). ती विरस करते.

रूपकांप्रमाणेच काही संवादस्थळेही वैरस्यकारक आहेत. उदाहरणार्थ, पौंड्-काच्या (ओ. १२ व १३) मधील भाषणात आलेल्या 'कुंभकर्णाची पुत्रवंती स्नुषा' या शब्दांचे प्रयोजन काय? पौंड्रक बिभीषणाला केवळ देशोधडीला लावण्याची प्रतिज्ञा करतो, तीही योग्य वाटत नाही. त्याने वस्तुत: शत्रुसंहाराचा निर्धार बोलून दाखवावयास हवा. ओव्या १८–१९ मधील पौंड्रकाच्या भाषणात त्याच्या स्वभावाची प्रखरता व तेजस्विता जाणवावयास हवी होती, ती मुळीच जाणवत नाही. ३१व्या ओवीतील बिभीषणाचे उद्गार अगदीच सामान्य व निष्प्रभ आहेत. त्या उद्गारांवरून त्याच्या मन:स्थितीचा बोध अजिबात होत नाही. नारदाचा प्रश्न (ओ. ४०) 'विटाळ' शब्दाने विटाळलेला आहे! नारद रणांगणावरील डावपेचांच्या बाबतीत रामाला सल्ला देतो हे पाहून अचंबा वाटतो (ओ. ४३–४५, ७७–७९). एकंदरीने निम्म्याहून अधिक भाषणे सौंदर्यघातक आहेत.

रामाने शतमुखाच्या वधाची प्रतिज्ञा केल्यावर बिभीषणाला काय वाटले त्याचे वर्णन कवीने ओवी ३५ मध्ये करावयास हवे होते. त्याचा अभाव खटकतो. रामासारखा त्रिकालज्ञ पुरुषोत्तमही प्रतिज्ञा पूर्ण कशी होणार या विवंचनेत पडतो (ओ. ३७) हे कविकृत वर्णन पटत नाही. चिज्ज्योतीला पाचारण करण्याविषयी (ओ. ७७) नारदाने केलेली सूचना रामाला कळू नये ही आश्चर्याची बाब आहे. मारुतीने सीतेला रणभूमीवर आणण्यापूर्वी रामाने शतमुखाला युद्धात गुंतवून ठेवले होते (ओ. ८२) पण सीता येताच राम रणभूमी सोडून तडक सीतामंदिरात निघून जातो (ओ. ९०), हे विचित्र वाटते ! रामाने जीव वाचवण्याची भाषा बोलणे (ओ. ८०) हे रामाच्या उज्ज्वल चरित्राशी विसंगत आहे.

या काव्यात मृत्यूऐवजी मृत्य ( ६१ ), जगज्जीवनाऐवजी जगजीवना (७६), सम्मुखऐवजी सन्मुख (९५,११०) इत्यादी सदोष रूपे मधून मधून आढळतात. शिवाय, पूशिलें वास्तव्य त्याचें कोठें ( ३५ ), तुम्ही गेलें पाहिजे युद्धा (५६) अशा शुद्ध गद्यमय व अनाकर्षक रचनाही दिसून येतात. इतर काव्यांतल्याप्रमाणे पितृभवना पाठविली ( ३ ) सगर्भा पातली माहेरी (४), निबिड दारुण (१५), यशकीर्ति ( २३ ) अशी पुनरुक्तीची स्थळे या काव्यातही आहेत.

एकंदरीने मुक्तेश्वरकृत फेरबदल, रूपकनिर्मिती, वर्णने, संवाद, व्यक्तिदर्शन, अलंकार व भाषा इत्यादी सर्व काव्यांगांचा विचार करता हे काव्य मध्यम प्रतीचे वाटते. कवीने रूपकांचा अतिरेकी वापर वर्ज्य करून सुगम कथानिवेदन केले असते तर ते कदाचित रसाळ झाले असते.

# ९. शुकरंभासंवाद

## मूळ आधार

कवीने या काव्याच्या उपसंहारात 'सरला रंभेचा अनुवाद । पुढें व्यासाचा संवाद । पुत्रपित्याचा विवाद । ऐकतां बोधू ये भेटी ।।' असे म्हटले आहे. त्यावरून रंभेचे भाषण संपल्यावर मग व्यास व त्यांचा मुलगा शुक यांचा बोधप्रद संवाद सुरू झाला असा स्पष्ट अर्थ निघतो. परंतु, मूळ महाभारताच्या शांतिपर्वाच्या अध्याय २३१ ते २३५ मध्ये जो शुक–व्यासांचा संवाद आहे त्यापूर्वी रंभेचे भाषण नाही. यावरून असे अनुमान होते की, मुक्तेश्वरासमोर असलेल्या भारताच्या पोथीत[२०] हा रंभाशुक-संवाद असावा व त्याचा मराठी अनुवाद मुक्तेश्वराने केला असावा. अर्थात जोपर्यंत मुक्तेश्वराला उपलब्ध असलेली भारतीय संहिता आपल्याला उपलब्ध होत नाही तोपर्यंत मुक्तेश्वररचित प्रस्तुत प्रकरण काल्पनिक आहे व ते कल्पिण्याचे श्रेय मुक्तेश्वरी प्रति-भेला आहे असे मानणेच श्रेयस्कर आहे.

## वैशिष्टचपूर्ण रचना

हे सबंध काव्य संवादात्मक आहे. यात कथावस्तू वगैरे काही नाही. इंद्र रंभेला शुकाचार्यांकडे जाण्यास व त्यांचा तपोभंग करण्यास सांगतो. त्याप्रमाणे रंभा अप्सरांचा तांडा घेऊन निघते. जेथे शुक तपश्चर्या करीत बसलेला असतो तेथे ती सपरिवार पोचते व मग त्याला कामवश करण्यासाठी नाना परींनी प्रयत्न करते. त्या संदर्भात शुक व रंभा यांची जी संभाषणे होतात त्यांची एकत्र व सुसूत्र गुंफण करून कवीने हे काव्य सिद्ध केले आहे. अशा प्रकारे कवीच्या मूळ कल्पनेत व तिच्या यशस्वी अंमलबजावणीत या काव्याची अभिनवता सामावलेली आहे.

## नाटचमयता

रंभा शुकाचा तपोभंग करण्याची प्रतिज्ञा करून आली, पण शुकाने तिचा उत्साहभंग केल्यामुळे तिचा मनोभंग व त्याबरोबरच प्रतिज्ञाभंगही झाला व ती परतली. रंभा ही साक्षात शृंगाराची जणू सजीव मूर्ती. तिचे तारुण्य, सौंदर्य व विभ्रम यांत अद्वितीय धगधगीतपणा. तर शुकाच्या प्रत्येक शब्दात कडकडीत वैराग्य. शुक म्हणजे जणू वैराग्याचा मूर्तिमंत पुतळा ! त्या दोघांच्या युक्तिवादपूर्ण संभाषणांतच जिवंत नाटच आहे. कारण त्या संभाषणांत शृंगार व वैराग्य या भावनांचा किंवा काम व मोक्ष या पुरुषार्थांचा अटीतटीचा सामना आहे. त्यामुळेच हे काव्य रसिक-मनाची पकड घेते.

कवीने काम व मोक्ष यांमधील ही चुरशीची स्पर्धा अखेरपर्यंत चित्तवेधक राहावी यासाठी काही खुब्या योजिल्या आहेत. त्यांपैकी पहिली म्हणजे रंभेचे वाग्ला-घव व बिनतोड युक्तिवाद ही होय. रंभा सुरुवातीस शुकाच्या अकाली वैराग्याची निंदा

करते (ओ. ७०–८१) व अशा प्रकारे त्याला डिवचते. परंतु, आपल्या भाषणाचा त्याच्यावर काहीही परिणाम न झाल्याचे पाहून त्याला वनाधिवासाची दुःखदायकता पटविते (ओ. १०४–१३६). तसेच त्याला राजकन्या, देवकन्या व गंधर्वकन्या यांच्या उपभोगयोग्य शरीरांचे आमिष दाखविते. पण हाही बाण बोथट ठरल्याचे पाहून ती त्याच्या मनावर स्त्रीच्या स्तन, ओठ, नेत्र इत्यादी अवयवांची व चुंबनालिंगनादी रतिक्रीडांची उपभोगार्हता व आनंददायकता ठसविण्याचा खूप प्रयत्न करते (ओ. १७१–२१४). इतकेच नव्हे तर तारुण्यसुलभ उपभोग न घेणाऱ्याचा जन्म व्यर्थ, त्याचे ज्ञान व्यर्थ,त्याचे तप व्यर्थ,त्याचे सारे काही व्यर्थ असा त्याला धाक दाखवते व त्याचे मन विचलित करण्याचा प्रयत्न करते. पण ही मात्रा देखील लागू न पडल्याचे पाहून ती बेंबी, मांड्या, स्तन, अधर, गुह्य इत्यादी अवयवांपासून होणाऱ्या विषयसुखाचे उत्तान वर्णन करते (ओ. २९८–३०७). पण ते ऐकून शुक चलित होण्याऐवजी उलटा विटतो. शेवटी ती आपल्या भात्यातले अखेरचे अमोघ अस्त्र काढते. ती वस्तुवस्तूंत अंतर असते असा प्रस्ताव करून देवांगनांच्या उपभोगाचे व तज्जनित अपूर्व आनंदाचे भरघोस वर्णन करते (ओ. ३८०–४०१). पण तिचे ते अस्त्रही फुकट जाते. तेव्हा ती खूप चिडते व नखांनी छाती फाडून आपले निर्मळ अंतरंग शुकाला दाखविते (ओ. ४२९). येथे या संवादपर काव्यातील नाट्यमयता कळसाला पोचते. शेवटी ती शुकाच्या वैराग्याचा जय व आपला पराजय मान्य करते व अशा प्रकारे या नाट्यमयतेची अकल्पित व अनपेक्षित अखेरी होते.

कवीने शुकाच्या संवादांनही तितकीच प्रभावसंपन्नता साधली आहे. शुक प्रथमतः रंभेला इंद्राचे क्षेमकुशल विचारतो, रानातील रहिवास आपल्याला प्रिय असल्याचे तिला सांगतो,तिची हेटाळणी करतो,जन्ममरणांची दुःखकारकता वर्णन करतो, क्षमा-संतोष-विवेक-सत्संगांची मोक्षप्रापकता तिला पटवितो, स्त्रीशरीराच्या बीभत्सतेचे वर्णन करतो, देहाचे सार्थक करण्यासंबंधी उपदेश करतो, 'तत् त्वं असि' हा वेदान्त ऐकवितो, देवांगनांचे शरीर उष्टे असल्यामुळे ते कोणीही उपभोगावे असे म्हणून तिचा धिक्कार करतो व शेवटी तिला आई असे संबोधून तिच्यासारखी निर्मळ माता आपल्याला लाभली असती तर दीर्घकाळ व्यथा भोगावी लागली नसती असे सांगून रंभा-शुकसंवादही संपवितो आणि तिच्याबरोबर इंद्राचाही पराजय करतो! तात्पर्य, कवीने विषयसुखांचे वर्णन जितके ठसठशीत व विकारोत्पादक केले आहे, तितकेच विरक्तीचे वर्णनही कौतुकास्पद व शमोत्पादक केले आहे. अशा प्रकारे कवीने शृंगार व शांत हे दोन टोकांचे रस सारख्याच उत्कटतेने निर्माण करून सव्यसाचित्व प्रकट केले आहे.

**रम्य वर्णने व सजीव शब्दचित्रे**

कवीने या काव्यात जागोजागी रमणीय वर्णने साधली आहेत. उदाहरणार्थ, शुकाकडे सपरिवार निघालेल्या रंभेच्या विमानाचे तेज सूर्याला दिपविणारे आहे, त्या

विमानाच्या शिखरांची प्रभा विजेलाही लाजविणारी आहे, तर रंभेबरोबर असलेल्या अप्सरांची नखे तरवारींमारखी, नेत्रकटाक्ष बाणांमारखे, त्रिवळया कटधारींसारख्या, कुचाग्रे भाल्यांसारखी व कस्तुरीचे टिळे टोपांमारखे आहेत (ओ. १५–३९). हे वर्णन जितके शृंगारपोषक किंवा कामोद्दीपक आहे तितकेच शुकाच्या पुण्यारण्याचे वर्णन पवित्रोदात्त आहे (ओ. ३९–४३). त्या पुण्यारण्यात पवित्र वृक्षांची राने आहेत, तेथील वातावरण तापपापांचा शीण घालविणारे आहे व त्या रानाला जणू वनदेवतांनी व्यापिले आहे. कवीने या वर्णनांखेरीज जी काही वेचक शब्दचित्रे काढली आहेत त्यांचे सौंदर्य अनुपम आहे. उदाहरणार्थ, जितेंद्रिय, सत्त्वमूर्ती व कडकडीत निष्ठावान अशा शुकाचे तेजस्वी मुखमंडळ जणू ब्रह्मरसाने ओतले आहे; त्याच्या निश्चयकमंडलूत ज्ञानोदक भरले आहे; तो पद्मासनी बसलेला असून कृष्णोऽहम्‌चा जप करीत आहे; त्याने सारे लक्ष परतत्त्वावर खिळविलेले आहे (ओ. ५६–६२). हे शुकाचे शब्दचित्र म्हणजे प्रखर तपश्चर्येचा जणू शब्दमय पुतळाच! शुकाने रंभेला जेव्हा माता मानले तेव्हा रंभेची झालेली स्थिती कवीने रसिकांपुढे हुबेहूब उभी केली आहे. शुकाचे उद्‌गार ऐकून रंभा गदगदा कापली, तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या, सर्वांगाला घाम सुटला व सारे शरीर थरथरा कापू लागले (ओ. ४४५). या एकाच ओवीत वर्णनाचा केवढा कातीवपणा आहे !

### कल्पनांचे नावीन्य

शुकरंभासंवादाची मूळ कल्पनाच नवाभिनव असल्याचे वर म्हटलेच आहे. त्याखेरीज संवादवर्णनांच्या ओघात कवीने कल्पनांचे अभिनवत्व अनेक स्थळी प्रकट केले आहे. त्यांपैकी वेचक दोनच स्थळे येथे उद्धृत करतो. शुकाने रंभेला माता मानल्यावर ती थरथरा कापू लागली. तेवढ्यात नकळत तिचा पाय जवळच्या शंकराच्या पिंडीला लागला. त्यासरशी ती पश्चात्तप्त होऊन अवाक् बनली. तिच्या तोंडून शब्द फुटेना. ही क्षणिक स्थिती नावीन्यपूर्ण कल्पनेचा पुढील साज लेऊन प्रकट झाली आहे–पोटात साठविलेले युक्तिवादाचे शब्द परत फिरले, प्रसूतीनंतर तारुण्य सरावे किंवा विशाखा नक्षत्रानंतर मेघ विरावेत किंवा नाटकाच्या अखेरीस गायकाच्या हृदयात गीतांचे शब्द भरून राहावेत किंवा संतापानंतर मन शांत व्हावे किंवा युद्धात अचानक सलोखा व्हावा किंवा मार्गावरून जात असता समोर अकस्मात समुद्र दिसताच प्रवाशाने थबकावे किंवा गुरुदर्शन होताच प्रपंच सरावा किंवा विवेकाने पापाचरणाचे खंडन करावे त्याप्रमाणे शुकाचे बोलणे ऐकल्यावर त्याच्या तपाचा भंग करण्याचा रंभेचा सारा विचार मनातल्या मनात थिजला (ओ. ४४८–४५१). शुकाच्या 'वैराग्यधीरा'चे रंभाकृत वर्णनही असेच नावीन्याने नटलेले व वक्तृत्वपूर्ण आहे. रंभेने उजेवा हात उभारून मोठ्याने म्हटले – 'क्वचित्प्रसंगी मेरू आपले

स्थान सोडील, घरदार परदेशी नेता येईल, ग्रहनक्षत्रे पृथ्वीची सेवा करतील, ध्रुव ढळेल, मंदारपर्वत पृथ्वीप्रदक्षिणेसाठी निघेल, हिमालयावरील आगीत गंगानदी आटेल, पूर्वेचा सूर्य चळेल, वायू घड्यात कोंडला जाईल किंवा समुद्राला आज्ञेमरशी मागे फिरविता येईल पण शुकाचा अचळ नेम कल्पांतीही डळमळीत होणार नाही, हे विचार सत्य आहे.' (ओ. ४६१–४६४)

**गुण व अलंकार**

या काव्यात प्रसाद, माधुर्य, सुकुमारता, अर्थव्यक्ती व उदारत्व या काव्य-गुणांचा आढळ ठिकठिकाणी होतो. त्याशिवाय उपमा (ओ. १३, ४५, ६५, १०८, १३८, १३९, २३७, २५३, २६१, ३७७), पर्यायोक्ती (१५), उदात्त (१६–१७), अतिशयोक्ती (४६), रूपक (२३–२५), विभावना (८०), श्लेष (४५२, ४६१) इत्यादी अभिप्रायानुकूल, समर्पक, विचारसुंदर, भावमधुर, चित्रमय व मनोरंजक अलंकारही प्रतीत होतात.

**दोष**

देहाचे कोडकौतुक पुरविणारा हा जणू मोहमल्हारीचा कुत्रा होय; मुळात मनुष्य असून मनुष्यपण सोडून श्वानपण स्वीकारतो व मिरवितो. तो विषयहळ-दीच्या चूर्णाला भंडार हे श्रेष्ठ नाव देतो; ते चूर्ण ममतारूप कपाळावर फासून सर्वत्र भुंकत फिरतो (ओ. २८३–२८४), या वर्णनात कालविपर्यासाचा दोष आहे. कारण मल्हारी मार्तंड, भंडार ह्या कल्पना मुक्तेश्वरकालीन आहेत, शुककालीन नाहीत.

रंभेने कामोपभोग न घेणाऱ्या पुरुषाच्या जीवनव्यर्थतेचे वर्णन शुकाला ऐक-विले (२९८–३०७). ते ऐकून शुकाचे मन विटले, त्याने कानात बोटे घातली व खाली मान घालून तो निश्चलपणे उभा राहिला (३०८), असे जे वर्णन मुक्तेश्वराने केले आहे ते खटकते. कारण त्या वर्णनाने शुकासारख्या विरक्ताच्या वैराग्याला बाध येतो. खरे पाहाता त्या विरक्ताने प्रतिक्रियाच व्यक्त करता कामा नये होती कारण त्याच्या ठायी कोणतीही प्रतिक्रिया उत्पन्नच होता कामा नये होती.

**निष्कर्ष**

कवीने केवळ प्रभावी संवादांच्या द्वारे शुकाच्या वैराग्याची व रंभेच्या विका-राची उत्कट जाणीव रसिक-हृदयात उत्पन्न करण्यात भारंभार यश मिळविले आहे. रचनेतील वेगळेपणा, संवादातील नाट्यमयता, वर्णनांची रम्यता, शब्दचित्रांची मोहकता, कल्पनांची नवीनता व गुणालंकारांची सुन्दरता ही या काव्याची उज्ज्वल अंगे आहेत. त्यामुळेच वरील दोन किरकोळ दोष ह्या गुणसंनिपातात लुप्त होतात व रसिकाला एका प्रतिभाशाली कवीचे उत्तम काव्य आस्वादिल्याचा अनिर्वचनीय आनंद होतो.

# १०. हरिश्चंद्राख्यान

## मूळ आधार

हे आख्यान श्रीमद्‌भागवत (स्कंध९), मार्कंडेयपुराण (अ. ७–९) ब्रह्म-पुराण (१०४) व देवीभागवत (स्कंध ७) या संस्कृत ग्रंथांत आढळते. त्याखेरीज महाभारताच्या सभा, शांति व अनुशासन या पर्वांतही हरिश्चन्द्रासंबंधी माहिती मिळते. परंतु, मुक्तेश्वररचित प्रस्तुत आख्यान सदरहू ग्रंथांपैकी कोणत्याही ग्रंथातील मूळ आख्यानाशी पूर्णपणे जुळत नाही. मुक्तेश्वराने मूळ आख्यानात अनेक जागी भर घातलेली असल्यामुळे व इतर फेरबदल केलेले असल्यामुळे मुक्तेश्वरी आख्यान मूळ कथानकाची परिष्कृत आवृत्ती आहे असे म्हणता येते.

## संघर्षस्थळे

प्रस्तुत चित्तवेधक आख्यान पाच अध्यायात विभागलेले असून त्याची एकूण ओवीसंख्या, उपसंहारपर ओव्या वगळून, ६०२ आहे. या घटनाप्रचुर आख्यानात किती तरी नाटयपूर्ण संघर्षस्थळे आहेत. नारदाकडून हरिश्चंद्राची स्तुती ऐकून विश्वामित्राचे पित्त खवळते (ओ. ११२६–२७) व तो हरिश्चंद्राला छळण्याची प्रतिज्ञा करतो (११३५–३६) येथेच मूळ संघर्षाची ठिणगी पडते. विश्वामित्राची प्रतिज्ञा ऐकून वसिष्ठ हरिश्चंद्राच्या हितरक्षणाची प्रतिज्ञा करतो (११३७–४०). अशा प्रकारे दोघा तपोनिष्ठांच्या चकमकीनेच या अपूर्व काव्यास प्रारंभ होतो. पुढे प्रजाहितरक्षणार्थ हरिश्चंद्र वसिष्ठांच्या आज्ञेचे उल्लंघन करून वनात व विश्वामित्राश्रमात जातो. तेथे त्याच्या मनोरंजनासाठी नृत्यगान करणाऱ्या नर्तिकांना तो रत्नजडित सुवर्णकंकण बक्षीस म्हणून देतो. परंतु त्या ते नाकारतात. तेव्हा राजाला राग येतो व तो प्रधानाकरवी त्यांना मारपीट करून घालवून देतो. (११९३३–१३४). ते वृत्त ऐकताच विश्वामित्र संतापाने फणफणत येऊन राजास अद्वातद्वा बोलतो. तेव्हा राजा विश्वामित्राची क्षमा मागतो (११४८-१५३). पुढे हरिश्चंद्र तारामतीच्या मांडीवर झोपलेला असताना विश्वामित्र त्याच्या मस्तकावर लोखंडी कांबीचा प्रहार करतो (२।१३). नंतर राजा विश्वामित्रास २८हजार तोळे सोने देण्याचे कबूल करतो (२।३२). दिलेला शब्द पाळता यावा म्हणून हरिश्चंद्र अयोध्येस येतो पण येताना विश्वामित्रास दारातच सोडून येतो (२।३९). त्यामुळे खवळलेला विश्वामित्र राजपत्नीस काठीने झोडपतो व तिच्या वेणीस धरून दरादरा ओढतो (२।४०). पुढे राजा सोने मोजून देऊ लागला असता विश्वामित्र त्यास हटकतो व 'गाढवा, माझेच धन मला देण्याचा हा तुझा कोठला धर्म?' (२।४६) असे डाफरून बोलतो. केवळ राज्यदान घेऊन विश्वामित्राचा संतोष होत नाही, तो कनकदानाचा आग्रह धरून बसतो व ते मिळविण्यासाठी राजाला खांबाला बांधून दंडुक्याने ठोकून काढतो (२।५३). कर्जफेडीसाठी काशीस जावयास निघालेल्या हरिश्चंद्र, तारामती व रोहिदास यांच्या अंगांवरील सर्व दागिने विश्वामित्र काढून घेतो (२।८०).

राजा पत्नी व पुत्र यांसह अरण्यातून जात असताना विश्वामित्र त्यांची पादत्राणे मागून घेतो (२।१०४). परिणामी राजाचे पाय पोळून निघू लागतात.पुढे तारामती व रोहिदास विश्वामित्राच्या कपटास बळी पडत नाहीत, त्यामुळे तो अतिशय संतापतो (३।३५), रानात वणवा लावून देतो (३।३८) व त्रिवर्गांची चुकामूक घडवितो (३।४१). वणवा बघून त्यात हरिश्चंद्र व रोहिदास मेले असावेत असे तारामतीस वाटते व ती शोक करू लागते. विश्वामित्र मायावी वाघाचे रूप धारण करून तारामतीच्या देखत दोन प्रेते फाडून खाऊ लागतो (३।७२–७३). त्यामुळे तारामती अधिकच भयभीत होते. पुढे ऋषीच्या कर्जाची फेड करण्यासाठी हरिश्चंद्र आपल्या प्रिय पत्नीस व मुलास काशीतील एका धनवंतास विकतो (४।२५–२८). हरिश्चंद्र स्वतः वीरबाहू डोंबाचे दास्य पत्करतो (४।४२-४३). त्या डोंबाच्या घरी सम्राट हरिश्चंद्र पाणी भरण्याचे काम करू लागतो पण विश्वामित्र पाण्याचा घडा फोडून टाकतो (४।५६) तेव्हा तो डोंब राजाच्या श्रीमुखात भडकावतो (४।५७). डोंब राजाला दुसरी घागर देतो. तीदेखील विश्वामित्र फोडतो (४।६०–६१). दुपारच्या भोजनाच्या वेळी राजा तोंडात घास घालणार इतक्यात विश्वामित्र हजर होतो व सर्व अन्न स्वतःच खाऊन बसतो व असा प्रकार सतत वर्षभर चालू राहतो. (४।७४–८१). राजाकडून पाणी भरण्याचे काम नीटपणे होत नसल्यामुळे डोंबाघरच्या दासदासी त्याला बदडून काढतात (४।८२). पुढे विश्वामित्र-हरिश्चंद्रांचा संघर्ष शिगेस पोचतो. विश्वामित्र तक्षकाकरवी रोहिदासाला सर्पदंशाने मारवितो (५।१०). बिचारी तारामती रोहिदासाला अग्निसंस्कार करण्याचा प्रयत्न करते (५।३१) तोच खुद्द तिचाच पति परंतु आता वीरबाहूचा दास बनलेला हरिश्चंद्र, परवानगीवाचून प्रेत जाळल्याबद्दल, तिला ठोकून काढतो (५।३५) पुढे विश्वामित्र तारामतीस घोर निद्रा लावतो, प्रेताची चिरफाड करतो व त्याच्या रक्तामांसाचे गोळे तारामतीच्या तोंडात कोंबून तिची घोर विटंबना करतो (५।५२–५४) आणि शहरात जातो व देवालयात एक जखीण आलेली असून तिने एका मुलाला फाडून खाल्ले असल्याची अफवा पसरवून देतो. (५।५७–५८). तेव्हा राजरक्षक येऊन तारामतीस पकडतात, तिला फरफटत देवळाबाहेर ओढून आणतात, दोन्ही दंडांना करकचून आवळून बांधतात व फाशी देण्याची तयारी करतात (५।६१–६६). तेव्हा प्रत्यक्ष आपल्या पत्नीस मारण्याचा दुर्धर प्रसंग हरिश्चंद्रावर ओढवतो (५।७१). वरील अनेक स्थूल संघर्ष-स्थळांखेरीज सूक्ष्म व मानसिक संघर्षस्थळेही या कथानकात कमी नाहीत. त्यांपैकी दोहोंचा उल्लेख अवश्य करावासा वाटतो. विश्वामित्र जेव्हा तारामतीस काठीने झोडपतो व फराफरा ओढीत नेतो (२।४०) तेव्हा ते दृश्य पाहून राजा कमालीचा दुःखोकृष्टी बनतो व धावत ऋषीपाशी जाऊन त्याला विनवितो, 'दयासागरा ! माझ्या पत्नीने जो अपराध केलेला असेल तो मीच केला आहे असे मानून माझे हवे तर तिळाएवढे तुकडे कर, पण प्रिय पत्नीला सोड' (२।४२). परवानगीवाचून बालकाचे शव जाळणाऱ्या स्त्रीची ओळख पटताच व ती आपली पत्नीच आहे असे कळताच राजा व

तारामती अतिशय शोक करू लागतात. ती दोघे इतकी आसवे गाळतात की बालकाच्या प्रेताला जणू त्या आसवांचे स्नान घडते. (५।४६). हा साराच संघर्ष-प्रसंग कमालीचा हृदयद्रावक आहे.

**प्रसंगवर्णने व शब्दचित्रे**

कवीने या काव्यात विविध प्रसंगांची हुबेहूब वर्णने केली असून काही व्यक्तींची जिवंत शब्दचित्रे रेखाटली आहेत. त्यांनी या काव्याची चित्ताकर्षकता वाढविली आहे. वसिष्ठ ऋषी हरिश्चंद्राच्या भेटीस आल्याचे कळताच सर्वांची एकच धांदल उडते. स्वत: राजा ऋषींना सामोरा जातो व त्यांना पालखीत बसवून घेऊन येतो. लोक घरोघरी गुढ्यातोरणे उभारतात, वसिष्ठांचा जयजयकार करतात व आनंदाप्रीत्यर्थ मंगलवाद्ये वाजवितात. राजा ऋषींना सुवर्णासनावर बसवतो, तारामती व रोहिदास त्यांच्या दर्शनास येतात, षोडशोपचारांनी पूजा करतात व राजा ऋषींसमोर हात जोडून नम्रपणे उभा राहातो (१।५३–५८). विश्वामित्रनिर्मित नृत्यांगनांच्या नृत्यगायनाचे पुढील वर्णनही मोठे अपूर्व आहे–नृत्यांगनांनी हावभावांसह ठेका साधला आणि राजाचा चित्तमृग नयनबाणांनी विद्ध केला. त्यांच्या गायनाचे स्वरूप असे काही विचित्र होते की, शिळांमधून निर्झर पाझरू लागले, वाऱ्याला पेंग आली, गंगेचे पाणी वाहीनासे झाल्यामुळे तिला पूर आला, त्यांचे नृत्य बघण्यासाठी व गायन ऐकण्यासाठी नाना जातींची श्वापदे आपापसांतील वैर विसरून शांतपणे बसली होती (१।१२५–१२७). हरिश्चंद्राच्या काशीगमनप्रसंगीचा सजीवनिर्जीवांचा विलाप (२।६८–७८), तृषार्त कुटुंबाची दारुण स्थिती (२।९२–९८), सैन्याचे कूच (१।९१–९६), विश्वामित्राच्या आश्रमाजवळील वनश्री (१।१०६–११३), विश्वामित्रकृत कठोर तपश्चर्या (१।८८–८६), पाणपोया (२।१०९–११४) इत्यादी अन्य वर्णनेही कल्पनारम्य आहेत. कवीने वृद्धाचे सोंग घेतलेल्या विश्वामित्राचे जे शब्दचित्र काढले आहे ते अजोड आहे. कवियुक्त ते वर्णन असे- वृद्धाचे शरीर जराजर्जर झाले होते, त्याची मान लटलटत होती, शरीर वाळले होते व तो मधून मधून खोकत होता (२।१०१). हे वाचून जसा एक म्हातारा आपल्या डोळ्यांसमोर उभा राहातो तसाच पुढील वर्णनाच्या योगे एक उपाशी ब्राह्मण नजरेसमोर येतो–त्याच्या पोटाला घड्या पडल्या होत्या, त्याची पावले वेडीवाकडी पडत होती, त्याच्या झोकांड्या जात होत्या, तोंडातून शब्द फुटत नव्हता, तो काठीच्या आधाराने शरीराचा तोल सावरण्याचा प्रयत्न करीत होता आणि खुणेने भूक लागल्याचे सुचवीत होता (४।७१–७२). राक्षसीला मारावयास धावलेल्या जनसंमर्दाच्या पुढील वर्णनात मुक्तेश्वराचे मानवी स्वभावाचे अवलोकन व सूक्ष्म विनोदबुद्धी यांचे हृद्य दर्शन घडते–शहरात राक्षसिणीची वार्ता पसरली तेव्हा सर्व लोक शस्त्रे घेऊन धावले, पण देवळाच्या आत पाऊल टाकण्याची कोणाची हिंमत होईना. सगळे जण दुरूनच

तिला दगड मारू लागले. काही जण मोठमोठ्याने आरडाओरड करू लागले. काहींनी शस्त्रे परजली व शौर्याचे हावभाव केले, पण ते मारे दुरूनच ! (५।५९–६०).

**संवाद**

मुक्तेश्वरी वर्णने व शब्दचित्रे यांनी जशी काव्यांना खुलावट लाभते तशीच चटकदार संवादांनीही लाभते, असे प्रत्ययास येते. या काव्यातील विश्वामित्र – वसिष्ठ (१।३१–३६), विश्वामित्र-वसिष्ठ – प्रतिज्ञापर (१।४१–४७), वसिष्ठ – हरिश्चन्द्र (१।५९–६३), हरिश्चंद्र-मातंगकन्या (१।१३१–१३२), विश्वामित्र-हरिश्चन्द्र (१।१४६–१४८) इत्यादी अनेक संवाद पात्रांच्या स्वभावांचा परिपोष करणारे असून त्या त्या प्रसंगांना उठाव देणारे आहेत.

**अलंकार**

कवीने पुढील अलंकार साधून या काव्याची शोभा निःसंशय वाढविली आहे – रूपक (१।५, १।६, १।९, १।१५, १।२६–२७, १।३४, १।४३, १।६०, १।६१, १।८६, १।९४, १।१०५, १।१५७, २।३, २।७, २।९, २।३७, २।७०, २।८२), परिकर (१।८, १।३०, १।१२४), व्यतिरेक (१।१०६), निरुक्ती (१।६–७), उत्प्रेक्षा (३।३५, ५।११०), परिवृत्ति (२।८३), अनन्वय (१।२५), अतिशयोक्ती (१।१२६), पर्यायोक्त (१।१४६), व्याजस्तुती (५।४२) व श्लेष (५।१०९).

**नमन व भाविकथासूचन**

कवीने या काव्याच्या आरंभी गणेश (१।१), शारदा (१।२), गुरू (१।३) व श्रोते (१।४) यांना नमन केले आहे. असे मंगलाचरण त्याच्या इतर स्फुटकाव्यांत आढळत नाही. त्यामुळे हे नमन या काव्याचे वेगळेपण ठरते. संस्कृतात सर्गबद्ध महाकाव्याच्या लक्षणात ‘सर्गान्ते भाविसर्गस्य कथायाः सूचनं भवेत् ।’ असा एक नियम म्हणून सांगितला आहे. कवीने प्रस्तुत काव्यातील १।१५८, २।११७, ३।११६–११७, ४।८७ या ओव्यांत या नियमाचे पालन करून आपण जणू महाकाव्यरूप रचना करीत असल्याचे सुचविले आहे. हे काव्य आशयदृष्ट्या ‘महतां च महत् च’ असल्यामुळेही महाकाव्यरूप बनले आहे.

**कान्तासम्मित उपदेश**

मुक्तेश्वराने हरिश्चन्द्राची करुणरम्य कहाणी सांगण्याच्या ओघात पुढीलसारखी काही शाश्वत जीवनसत्ये ध्वनित केली आहेत, त्यांच्या योगे काव्याला प्रौढता व भारवत्ता प्राप्त झाली आहे – कधीकधी आत्मकेन्द्रित व्यक्तींना सरळ हृदयाच्या सज्जनांची सत्त्वपरीक्षा पाहाण्याची लहर येते, सज्जनांचा गुणप्रकर्षही क्वचित्प्रसंगी इतरांच्या मत्सरास प्रज्वलित करतो, संभावित व्यक्तीस संकटसमयीही अनपेक्षितपणे साह्य लाभते, दैव उलटले म्हणजे जीवनातील आनंद मावळतो व जीवन असह्य बनते, विपत्काळी शहाण्यासुरत्यांचाही मानसिक तोल ढळतो व

त्यांना हितचिंतकांचाही सल्ला झिडकारावासा वाटतो, सत्यवचनी सज्जन संकट-प्रसंगीही आत्मरक्षणाहून स्वकर्तव्याला श्रेष्ठ मानतात, सदाचारी मनुष्य वचनपूर्ती-साठी सर्व आपत्ती मुकाट्याने सहन करतो, पतिपत्नींची परस्परांवर निष्ठा असली की त्यांना विपत्तींचे हालाहलदेखील सहज पचविता येते, आईवडिलांचे गुण मुलात उतरतात, स्त्री आपल्या अब्रूला जास्त जपते, कर्तव्यकठोर सज्जन कर्तव्यपालनाच्या बाबतीत नात्यागोत्याचा मुलाहिजा मुळीच बाळगत नाही, सत्त्वशीलता, उदारता, कर्तव्यनिष्ठा व एकवचनीपणा हे गुण समाजात मान्यता पावतात व ते पिढ्यान्‌पिढ्यांना मार्गदर्शक व स्फूर्तिदायक ठरतात.

### दोष

या काव्यात काही किरकोळ दोष आढळतात. पण ते संख्यादृष्टचा अल्प व स्वरूपदृष्टचा सौम्य आहेत. ते असे – (१) **व्यक्तिदर्शन** – जो तृषार्त रोहिदास विश्वा-मित्राने पाण्याचा पेला समोर धरला असता ' आम्ही अशा पाण्यास शिवत नसतो.शिवलो तर आमच्या सूर्यवंशाला कलंक लागेल. तरी कृपा कर व मला आपल्या आईवडिलांकडे जाऊ दे ' (३।३१–३२), असे बाणेदार उत्तर देतो तो वयाने मोठा आहे हे उघड आहे. त्यामुळे तो मेल्याचे जाणवल्यावर शोक करणारी तारामती 'कवणा वोपूं स्तनपान ? । ' (३।६२) असे जे म्हणते, ते निःसंशय खटकते. (२) **कालविपर्यास**–विश्वामित्राच्या कृपेने हरिश्चन्द्राला पुनः राज्य प्राप्त होते. तेव्हा होणाऱ्या राज्या-रोहण-समारंभप्रसंगी ' शाण्णव कुळींचे राजकुमार आले ' असे वर्णन कवीने केले आहे (५।११२). ते कालदृष्टचा विपर्यस्त आहे कारण हरिश्चन्द्राच्या काळात ' शाण्णव कुळींचे ' राजकुमार नव्हते. (३) **अपुष्टता**–नारदाने इंद्राच्या दरबारात हरिश्चन्द्राचे वर्णन केवळ एका ओवीत केले (१।२४) तरी देखील कवीने मात्र 'परिसोनी नार-दाच्या गोष्टी' (१।२५) असा त्याचा अनेकवचनी उल्लेख केला आहे. वस्तुतः नारदाने विस्तृत वर्णन करावयास हवे होते व ते केल्यावर विश्वामित्र खवळला असे कवीने म्हणावयास हवे होते, म्हणजे ते स्वाभाविक वाटले असते. (४) **खटकणारी रूपे** – ऊठिला (१।१०२), आंगणीं (१।१३७) अशी काही रूपे खटकतात. (५) **क्रमभंग**–शंकराला बेल आवडतो व विष्णूला तुळस प्रिय असते, असे असताना कवीने ' बिल्व, तुळसी, हरि, हरू । ज्यांचे पत्रें तापती । ' (१।११२) अशा क्रमाने त्यांचे जे निर्देश केले आहेत त्यांत क्रमभंग झाला आहे.

### निष्कर्ष

कवीने हरिश्चन्द्राचे हे पुराणप्रसिद्ध कथानक कल्पनेची भर घालून चमत्कृति-पूर्ण, चित्ताकर्षक व रससंपन्न बनविले आहे. त्याने कथानकाची गुंफण कलात्मक रीतीने केली आहे. त्याने केलेली प्रसंग–घटनांची वर्णने उत्कंठा वाढविणारी व चित्र-मय आहेत. कवीने मधून मधून रेखीव शब्दचित्रे काढून कथेची हृदयंगमता वाढविली

आहे आणि अर्थपूर्ण व भावानुकूल संवादांच्या द्वारे विविध व्यक्तींचे यथार्थ स्वभावदर्शन घडविले आहे. कविकृत अलंकार-योजना मार्मिक व सौंदर्यसम्पन्न आहे. कवीने विविध घटना प्रसंगांतील नाट्य हेरून त्या त्या घटना-प्रसंगांच्या वर्णनात करुण, अद्‌भुत, भयानक बीभत्स इत्यादी रसांचा प्रमाणबद्ध व हृदयंगम उठाव साधला आहे. सत्त्वधीर हरिश्चन्द्र, पतिनिष्ठ तारामती, प्रेमळ रोहिदास व तामसी विश्वामित्र ही पात्रे आपापल्या स्वभावच्छटांसह आपल्यासमोर जणू सजीव होऊन उभी राहातात. त्यामुळे संपूर्ण काव्यापासून रसिकाला उत्कट आनंदाची प्राप्ती होते. हे काव्य प्रथम श्रेणीचे आहे, असे निःसंदिग्धपणे म्हणता येते.

## ११. एकनाथचरित्र

### उद्देश

एकनाथमहाराजांचे संपूर्ण चरित्र वर्णन करण्याचा कवीचा हेतू नाही. कवीने नाथांच्या चरित्रातील एका चमत्काराचे विस्ताराने वर्णन केले आहे. त्याने नाथ ही एक विभूती होती असा दृष्टिकोण स्वीकारला आहे. नाथांनी सदाचाराने व अनन्यभक्तीने परमेश्वराला संतुष्ट केल्यामुळे परमेश्वराने ह्या भक्तोत्तमाची सेवा करण्याचे ठरविले असा सारांश असलेले हे ' चरित्र ' लिहिण्यामागे भक्ताचा महिमा वाढविणे हा मुख्य रोख आहे (ओ. ९३) व त्याच्या अनुषंगाने १. कर्ता व भोक्ता जनार्दनच आहे असे मानून जो वागतो त्याचे कोड भगवंत पुरवितो, २. परमेश्वराचे चरित्र वेदादींनाही अगम्य आहे, ३. परमेश्वर सगुणोपासकांना व निर्गुणोपासकांना सारखेच फळ देतो व ४. परमेश्वर निष्ठावान भक्तांचा उद्धार करतो, ही भक्तितत्त्वे भक्तांच्या मनावर बिंबवून त्यांना भक्तिमार्ग—सम्मुख करण्याचा कवीचा प्रच्छन्न उद्देश आहे.

### वैशिष्ट्ये

**संभाषणे**—या अल्पविस्तृत काव्यात संभाषणे फार नाहीत, पण आहेत ती भक्ति-भावप्रधान आहेत. ओव्या १०–१५ मधील एकनाथ व ईश्वर यांच्या संभाषणात ईश्वराची भक्तवत्सलता व एकनाथांची सद्‌गृहस्थोचित ऋजुता व अभ्यागताविषयीचे अगत्य हे गुण व्यक्त झाले आहेत. नाथांच्या प्रश्नांना ईश्वराने दिलेले उत्तर (ओ. १४–१५) भक्तिमधुर आहे. तपस्व्याच्या प्रश्नाला पाणक्याच्या स्वरूपातील ईश्वराने दिलेले उत्तर पाणक्याला शोभण्याजोगेच आहे (ओ. ४०). आपल्याला कृष्णदर्शन घडवा, नच घडविल्यास आपण प्राणत्याग करू (ओ. ५१–५२) या तपस्व्याच्या विनंतीत व निर्वाणीच्या उद्‌गारांत त्याची कृष्णदर्शनविषयक तीव्र ओढ जाणवते.

**प्रसंग** — या लहानशा प्रकरणात ईश्वराने नाथांच्या घरी मुक्कामास येणे (ओ. ९), ईश्वराने तपस्व्याला स्वप्नात येऊन दृष्टान्त देणे (२८), तपस्व्याने तातडीने पैठणास जाणे व तेथे त्यास कृष्णदर्शन होणे पण त्याला ते न कळणे (३६),

तपस्व्याने कृष्णालाच 'तू कोण?' म्हणून विचारणे (ओ. ३८), तपस्व्याने गंगास्नान न करताच कृष्णदर्शनाच्या ओढीने नाथांच्या घरी जाणे (४३–४४), आपल्याला श्रीकृष्णाचे दर्शन न घडविल्यास आपण आत्महत्या करू अशी नाथांना धमकी देणे (५३), एकनाथांचा धावा समाप्त होताच चंदनाने माखलेल्या हाताने कृष्णाने प्रकट होणे व तपस्व्याला दर्शन देणे (६६), आणि तो भक्त-भगवंतांच्या भेटीचा सोहळा स्त्री-पुरुषांनी डोळे भरून पाहणे (७३), हे सर्वच लहान लहान प्रसंग भक्तिमधुर आहेत.

**संकीर्ण वैशिष्टये व निष्कर्ष :**

श्रीकृष्ण एकनाथांच्या घरी जी सेवाचाकरी वजावतो तिचे स्वभावोक्त वर्णन (ओ.१६–२१) कवीने केले आहे. स्वप्नात ईश्वराचे दर्शन झाल्यामुळे आनंदनिर्भर झालेल्या तपस्व्याच्या मन:स्थितीचे कवीने यथार्थ शब्दांकन केले आहे. (३२–३३) जीवन वाहे जगज्जीवन (१७) व जीवना आला जगज्जीवन (३६) या चरणांतील श्लेष हृद्य व भक्तिभावपोषक आहे. एकनाथकृत श्रीकृष्णाच्या धाव्यात (ओ. ५७–६४) लघुस्तोत्राचे सर्व गुण प्रकट झाले आहेत. 'नकळे, नकळे हरिचरित्र' (९०) व 'तारिलें, तारिलें निश्चयीं ।' (७६) या चरणांतील शाब्दी पुनरुक्ती भक्तिभावाची उत्कटता वाढविणारी आहे. एकंदरीने जो एक विशिष्ट व मर्यादित उद्देश मनात बाळगून कवीने हे लघुभक्तिकाव्य लिहिले आहे तो उद्देश पूर्ण झाला आहे. एकंदर रचनेची प्राय: निर्दोषता ध्यानात घेता, मुक्तेश्वराने काव्यरचनेस सुरुवात करण्यापूर्वी अल्प वयात हे प्रकरण रचिलेले असावे, मुक्तेश्वराची ही अगदी पहिलीच कृती असावी[२१] अशा आशयाचा जो अभिप्राय 'स्फुटकाव्ये' ग्रंथाचे संपादक देतात तो मात्र पटत नाही.

## १२. पदसंग्रह

प्रस्तुत ग्रंथात मुक्तेश्वररचित एकूण सात पदे मुद्रित केली आहेत. पैकी पहिले आकारदृष्टया सर्वांत लहान असून दुसरे सर्वांत मोठे आहे. उरलेली मध्यम आकारमानाची आहेत. पहिल्या सहा पदांचे विषय १ अध्यात्मनिरूपण, २ लोक-स्थिति-वर्णन व ३ गुरु-शिष्यसंबंध-कथन असे आहेत. शेवटच्या पदाची रचना वैशिष्टयपूर्ण झाली आहे. कवीने त्यात पहिल्या कडव्याच्या प्रत्येक चरणाच्या आरंभी व अंती ए हे अक्षर, दुसऱ्या कडव्याच्या प्रत्येक चरणाच्या सुरुवातीस व अखेरीस क हे अक्षर, तिसऱ्या कडव्याच्या प्रत्येक चरणाच्या प्रारंभी व अंती ना हे अक्षर व चवथ्या कडव्याच्या प्रत्येक चरणाच्या सुरुवातीस व शेवटी थ हे अक्षर योजून एकूण सर्व कडव्यांत मिळून 'एकनाथ' हा मंत्र रचिला आहे.

कवीने या पदांमध्ये विविध विषयांसंबंधी जे विचार व्यक्त केले आहेत त्यांचा सारांश असा :

**आध्यात्मिक** – मोक्षाची प्राप्ती जीवन्मुक्तालाच होते. वासनांवर विजय मिळवणे हाच खरा संन्यास. मुक्तीच्या प्राप्तीसाठी हार्दिक भक्तीची आवश्यकता असते. खरा भक्त साधा, सच्चा, निर्मत्सरी, अंतर्बाह्य निर्मळ व विनम्र असतो. त्यालाच मोक्ष मिळतो. खरे वैराग्य अंतःकरणपूर्वक, स्वाभिमानयुक्त व सात्त्विक स्वधर्माचरणात असते. (पद-क्रमांक १, ३, ४ व ५).

**सामाजिक** – मुक्तेश्वरकालीन कौटुंबिक व सामाजिक जीवन आजच्यासारखेच होते. तेव्हाही सासवासुनांची कडाक्याची भांडणे होतच असत. भांडणाच्या वेळी दोघीही आत्महत्येची भाषा करीत असत. जहांबाज स्त्री प्रपंचात शिरजोर होऊन बसत असे व ती क्वचित्प्रसंगी पतीला वेठीला धरीत असे (पद क्र. २).

**गुरुशिष्यसंबंध** – मुक्तेश्वरकाळी गुरुशिष्यसंबंध कदाचित बिघडलेले असावेत. शिष्य बेगुमान झालेले असावेत. ते गुरूला गुरू म्हणण्यास तयार नसावेत. मुक्तेश्वराच्या मते गुरुस्मरणही मोक्षदायक असते. त्यामुळे शिष्याच्या ठायी गुरुनिष्ठा, नम्रता व समर्पणाची भावना असणे अत्यावश्यक आहे (पद क्र. ६)

**एकनाथ** – मुक्तेश्वराच्या मते एकनाथ म्हणजे पृथ्वीवर प्रकटलेले परब्रह्म. एकनाथ मुमुक्षूला संसारापासून मोक्ष देऊ शकतात. एकनाथ म्हणजे 'एक'च=विश्वंभर. त्यांचा महिमा अपार असून खुद्द ईश्वरही त्यांचा दास बनतो. नाथांची ईश्वरभक्ती अनन्य व उत्कट आहे. नाथांचे सान्निध्य जीवमात्राचा उद्धार करण्यास समर्थ आहे. (पद क्र. ७)

एकंदरीने 'आध्यात्मिक' पदे वैशिष्ट्यशून्य आहेत. पद क्र. २ व ६ ही मुक्तेश्वरकालीन समाज व संस्कृती यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. पद क्र. ७ वरून मुक्तेश्वराची नाथांवरील अपार श्रद्धा दिसून येते.

## १३. आरतिसंग्रह

मुक्तेश्वराने लिहिलेल्या एकूण ९ आरत्या या पुस्तकात मुद्रित केल्या आहेत. त्यांपैकी ४ देवतांच्या (गणपती, बहिरोबा, महालक्ष्मी व विश्वंभर यांच्या प्रत्येकी एक याप्रमाणे), २ तुळसीच्या व ३ मानवी संतांच्या (ज्ञानदेवाची एक व एकनाथांच्या दोन) आहेत. एकनाथस्वामींची ( पहिली ) व विश्वंभराची अशा दोन आरत्या अपूर्ण आहेत, त्यांतील मधल्या काही चरणांतील अक्षरे लोप पावली आहेत.

**आरतीची वैशिष्ट्ये**

आरती हे उपास्य दैवताच्या पूजेच्या अखेरीस म्हणावयाचे भक्तिगीत होय. आरतीने पूजेची समाप्ती होत असते. आरती झांजा, टाळ, मृदंग इत्यादी वाद्यांच्या वा त्यांच्या अभावी केवळ टाळ्यांच्या साथीवर म्हणावयाची असते. तिच्यात प्रारंभी उपास्य देवतेचा जयजयकार असून शेवटी आरतीकाराचे नाव गोवलेले असते.

आरतीत त्या देवतेच्या स्वरूपाचे, स्वभावाचे, पराक्रमांचे व महिम्याचे श्रद्धापूर्वक वर्णन केलेले असून, शेवटी करुणा कर, संकटी प्रसन्न हो, निर्वाणी रक्षण कर अशा आशयाची प्रार्थना इष्ट देवतेला केलेली असते. क्वचित उपास्य दैवताच्या नावाची व्युत्पत्तीही ( उदाहरणार्थ, 'नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले' ) आरतीत अन्तर्भूत केलेली आढळते. आरतीच्या कडव्यांसंबंधी निश्चित वा काटेकोर असा नियम आढळत नाही, तरी सर्वसाधारणपणे आरती पाचसहा कडव्यांची असते.[२२]

**मुक्तेश्वरी आरत्या**

(अ) वरील कसोटीने मुक्तेश्वरकृत आरत्यांचे विश्लेषण करता असे लक्षात येते की, त्याने रचलेल्या देवतांच्या आरत्यांमध्ये त्या त्या देवतेच्या रूप, गुण, स्वभाव, पराक्रम, माहात्म्य व प्रभाव यांचे वर्णन आले आहे. उदाहरणार्थ, गणपतीची आरती कडवी १, ३, बहिरोबाची आरती कडवी ३, ४, महालक्ष्मीची आरती कडवी १, ४, विश्वंभराची आरती कडवी १, २. मुक्तेश्वराने ज्या देवतांना आळविले आहे त्या देवतांचे स्तोत्र एक तर इतर शास्त्रे तरी गातात किंवा इतर देव गातात. उदाहरणार्थ, गणपती ब्रह्मादिकांना पूज्य वाटतो (गणपतीची आरती, कडवे २), महालक्ष्मीचा महिमा शास्त्रे गातात (महालक्ष्मीची आरती, कडवे ३) तर विश्वंभर ब्रह्मादिदेवांना वंद्य असून शेष आपल्या सहस्रमुखांनी त्याचा महिमा गातो. (विश्वंभराची आरती, कडवी ३, ४). या सर्व देवता पापनाशक, संकटनिवारक व मोक्षदायक असून त्यांचे नामस्मरण सद्‌भावना उत्पन्न करणारे व त्यांची सेवा नरकापासून तारणारी आहे, याविषयीची मुक्तेश्वराची श्रद्धा विविध आरत्यांत व्यक्त झाली आहे. मुक्तेश्वराने या सर्व देवतांसमोर लीन होऊन आपण शरण आलो आहोत, आपले रक्षण कर, संकटापासून सोडव, मुक्ती दे अशी त्या त्या देवतेची आर्ततेने प्रार्थना केली आहे. त्याच्या या आरत्या अनुप्रासपूर्ण, सफाईदार, सुबोध, अर्थपूर्ण व भक्तिभावमधुर आहेत. याबाबतीत विशेषकरून गणपतीची आरती कडवी १, ३, बहिरोबाची आरती कडवे २, महालक्ष्मीची आरती कडवे ४ व विश्वंभराची आरती कडवी १ व २ ही ध्यानात घेण्याजोगी आहेत.

(ब) मुक्तेश्वराने तुळसी या वृक्षाच्या पहिल्या आरतीत तिला 'माता' संबोधून ती सर्व तीर्थे, देव, वेद व शास्त्रे यांची माऊली आहे, असा तिचा गौरव केला आहे (कडवे १). नंतर तिच्या पापनाशकता, शरीरपावकता, रोगहारकता व मृत्युनिवारकता या गुणांचे वर्णन (कडवे २) करून अखेरच्या कडव्यात तिच्या नामस्मरणात सद्‌भाव उत्पन्न करण्याचे व सेवेत नरकापासून संरक्षण करण्याचे सामर्थ्य असल्याचे म्हटले आहे. तुळसीच्या दुसऱ्या आरतीत कवीने तिच्या मोक्षप्रदता, देववंद्यता, भवसंकटनिवारकता इत्यादी गुणांच्या उल्लेखाबरोबर तिच्या रोगहरणक्षमतेचा ( तुळशीच्या मुळाची माती, तुळसीदलांचे स्नान व तुळसीमाळ गळ्यात

धारण करणे या सर्व गोष्टी रोगांचे निवारण करणाऱ्या असतात) निर्देशसुद्धा आवर्जून केला आहे. कवीने अशा प्रकारे तुळसीच्या व्यावहारिक उपयुक्ततेची जी दखल ह्या आरत्यांत घेतली आहे ती वैशिष्टयपूर्ण वाटते.

(क) मानवांच्या आरत्यांपैकी ज्ञानदेवांची आरती विशेषरहित आहे. परंतु, एकनाथांच्या दोन आरत्यांत मुक्तेश्वराने त्यांचे चरित्र, त्यांची गुरूपासना, ग्रंथरचना, कर्तव्यनिष्ठा, ईश्वरभक्ती, त्यांचा निर्मळ आचारविचार, त्यांची 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती, व त्यांचे कवीवरील प्रेम या सर्वांचे अत्यादराने वर्णन केले आहे. त्या वर्णनावरून वाचकाला नाथांचे जणू संक्षिप्त चरित्रच उपलब्ध होते. त्या दृष्टीने या दोन्ही आरत्या महत्त्वपूर्ण आहेत.[२३]

तात्पर्य, मुक्तेश्वररचित आरत्यांत संख्यादृष्टया विपुलता, विषयदृष्टया विविधता, रचनादृष्टया श्रुतिसुभगता, भावदृष्टया उत्कटता व संतचरित्रदृष्टया माहितीपूर्णता आहे. तुळसी व एकनाथ यांच्या प्रत्येकी दोन आरत्या त्यांतल्या त्यांत संस्मरणीय व उल्लेखनीय आहेत.

**समारोप**

मुक्तेश्वराच्या स्फुटकाव्यांचा येथवर एकैकशः यथामती सविस्तर परामर्श घेतला. त्याच्या आधारे मुक्तेश्वरी रचना, प्रतिभा व वाङमयीन कामगिरी याबाबतींत खालील निष्कर्ष काढता येतील–

१. पदे व आरत्या वगळता बाकी सर्व काव्यरचना ओवी या प्राकृत छंदात झाली आहे. भगवद्गीताप्रभृती प्रकरणांतील ओवी ओबडधोबड आहे तर शुकरंभासंवाद-हरिश्चन्द्राख्यानप्रभृती प्रकरणांतील ओवी सुभग आहे.

२. मुक्तेश्वराने स्फुटकाव्यांत आख्याने, महाकाव्य, उपदेशपर कविता, तात्त्विक कविता, संवादात्मक कविता, पदे, आरत्या व संतचरित्र असे विविध साहित्यप्रकार हाताळलेले आहेत. ही विविधता लक्षात ठेवण्यासारखी आहे.

३. मार्कंडेय–स्कंद–ब्रह्मप्रभृती पुराणे, महाभारत, वाल्मीकि–रामायण, आनंदरामायण, भागवत, हनुमंतनाटक इत्यादींतील आख्याने, सामाजिक चालीरीती व आचारविषयक संकेत, भगवद्गीता, संतचरित्रांतील चमत्कार, अध्यात्म, लोकजीवन, संस्कृती व ईश्वरभक्ती अशा विविध विषयांवर आधारलेली काव्ये मुक्तेश्वराने लिहिली आहेत. त्यांवरून त्याच्या विस्तृत वाचनाची, बहुशास्त्र व्यासंगाची व व्यापक कुतूहलाची चांगलीच ओळख पटते.

४. प्रस्तुत पुस्तकात छापलेल्या काव्यांचे काव्यशास्त्रीय निकषांच्या आधारे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल–(अ) उत्तम काव्ये–अर्जुनकामनापूर्ति, मूर्खलक्षणे, शुकरंभासंवाद, हरिश्चंद्राख्यान, एकनाथचरित्र व आरत्या. (ब) मध्यम काव्ये–हनुमंताख्यान, दुर्योधनशल्यपरिस्फोट व शतमुखरावणवधाख्यान. (क) अधम काव्ये–

गजेंद्रमोक्ष, भगवद्गीता, विश्वामित्रभोजन व पदसंग्रह. यांपैकी शुकरंभासंवाद व हरिश्चंद्राख्यान ही दोन काव्ये सर्व अर्थांनी सरस काव्ये किंवा जणू काव्यरत्ने म्हणता येतील इतक्या मोठ्या योग्यतेची आहेत.

५. मुक्तेश्वरी प्रतिभा बहरली की, ती शृंगारापासून शांतापर्यंत कोणत्याही रसाची उत्कट निर्मिती लीलया करू शकते; ती सर्वरस आहे. अरण्ये, ऋषींचे आश्रम, राजभवने, नृत्यगायनाचे प्रसंग, सैन्याच्या हालचाली इत्यादींच्या वर्णनात मुक्तेश्वराच्या प्रतिभेला विशेष स्वारस्य वाटते; व्यक्तींच्या विशिष्ट अवस्थांची व मन:स्थितींची मोहक शब्दचित्रे काढण्यात ती मनापासून रंगून जाते; अलंकारांच्या योजनेत ती रम्य कल्पनाविलास प्रकट करते आणि चटकदार व पात्रस्वभावानुरूप संवाद रचण्यात तिचा हातखंडा आहे. मुक्तेश्वरी प्रतिभेची ही बलस्थाने आहेत.

६. मुक्तेश्वराला क्वचित चित्रकाव्याची निर्मिती करण्याची लहर येते. मुक्तेश्वर एकनाथांच्या गुणगानाची एकही संधी वाया दवडीत नाही. उलट तिचा तो पुरेपूर उपयोग करून घेतो, हा त्याच्या स्वभावाचा एक विशेष धर्मही वरील काव्यांमध्ये प्रत्ययास येतो.

गेले काही महिने मुक्तेश्वराच्या स्फुटकाव्यांच्या सहवासात आनंदात गेले हे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. तसेच हे लहानसे पुस्तक अगदी अल्पावधीत सिद्ध करण्यास आवश्यक ते मनोबुद्धिबल परमेश्वराने दिले त्याबद्दल त्याच्याविषयीही कृतज्ञता व्यक्त करतो.

टीप : पुढे छापलेल्या मूळ संहितेतील तळटीपांत पाठ हा संक्षेप पाठभेद शब्दासाठी योजिला आहे.

# प्रस्तावनेतील अंकनिर्दिष्ट संदर्भ

१. **आनंदरामायण**–भाषां. वि. वा. बापट, मुंबई, तिसरी आवृत्ती १९२८, पृ. ६२–६३.

२. **पद्मपुराणम्**–संशो. वि. ना. मंडलीक, पुणे, इ. स. १८९४, अध्याय ११२.

३. सान्वय सार्थ **श्रीमद्भागवत**–दा. सा. यंदे प्रकाशन, मुंबई, १९२७, स्कंध ८, अध्याय १ ते ४.

४. सार्थ श्रीएकनाथी **भागवत**–के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, शके १८८०, अध्याय बारावा, ओव्या ८५–८८.

५. **रामकथा** (उत्पत्ति और विकास)–रेवरेंड फादर कामिल बुल्के, प्रयाग, द्वितीय संस्करण, १९६२, पृ. ६७२.

६. 'आख्यानम्–(३) A tale, story, especially a legendary story, legend...' — Prin. V. S. Apte's "**The Practical Sanskrit - English Dictionary,**" Vol. I (Ed. Gode & Karve), Prasad Prakashan, Poona, 1957, p. 312.

७. महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत **स्फुटकाव्यें** – संपा. दा. के. ओक, संशो. बा. अ. भिडे, निर्णयसागर, मुंबई, १९०६, पृ. १ व प्रस्तावना पृ. २.

८. चिकित्सक वाचकांना तुलनात्मक अभ्यास करता यावा यासाठी श्री. वा. सी. बेंद्रे यांनी शिवकालीन समाजस्थितीविषयी केलेल्या विवेचनाचे सार येथे देत आहे–जातिजातींमध्ये तेढ नसली तरी राष्ट्रांत ऐक्यभाव नव्हता; विचारक्रांतीला नीतितत्त्वे व संस्कृती यांचा पाठिंबा नव्हता; समाजात शिस्त व संघशक्ति नव्हती; शिवाजी-महाराज पठिक ब्राह्मणांवर विसंबत नसत; आचारकांडास फाजील महत्त्व प्राप्त झाले होते; स्त्रिया व मुले यांना शासनाकडून संरक्षण मिळत असे; समाजातील भ्रष्टाचारांना आळा बसला होता; शिवाजीराजांनी घडवून आणलेल्या क्रांतीमुळेच हिंदू समाजाला जगता आले.–

वा. सी. बेंद्रे–**श्री छत्रपति शिवाजी महाराज** (उत्तरार्ध), मुंबई, प्रथमावृत्ती, १९७२, पृ. १११५–१११९.

९. डॉ. वि. य. कुलकर्णी–**प्राचीन मराठी गीता टीका** – तुलनात्मक अध्ययन (प्रबंध), पुणे, १९७४, पृ. ३२०.

१०. तत्रैव, पृ. १५४.

११. तत्रैव, पृ. ३३१.

१२. महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत **स्फुटकाव्यें** – संपा. ओक, संशो. भिडे, निर्णयसागर, मुंबई, १९०६, प्रस्तावना पृ. ३.

१३. महर्षिव्यासप्रणीत **श्रीभविष्यमहापुराण**– उत्तरपर्व-भाग तिसरा, भाषां. वि. वा. बापट, वाई, शके १८३१.

१४. '**भविष्योत्तरमेतत्ते कथयामि युधिष्ठिर ।। २१७**' तत्रैव.

१५. **हनुमन्नाटकम्**–व्याख्याकार : पं. जगदीश मिश्र, चौखंबा, वाराणसी, १९६७.

१६ Mahanataka – Hanumat : ed. Ramtaran Siromani, Calcutta, 1870.

१७. **रामकथा** (उत्पत्ति और विकास)–रेवरेंड फादर कामिल बुल्के, प्रयाग, द्वितीय संस्करण, १९६२, पृ. ६२६–६२७.

१८. तत्रैव, पृ. ६२७.

१९. **आनंदरामायण** – भाषां. वि. वा. बापट, दामोदर सावळाराम मंडळी, मुंबई, आवृत्ती तिसरी, १९२८, पृ. १८६–१९०.

२०. तुळा–'मुक्तेश्वराजवळील संस्कृत भारताची पोथी हल्लींच्या मुद्रित भारती पोथीहून भिन्न होती.'–महाराष्ट्रकविवर्यमुक्तेश्वरकृत **स्फुटकाव्यें**–संपा. ओक, संशो. भिडे, निर्णयसागर, मुंबई १९०६, प्रस्तावना पृ. १५.

२१. तत्रैव, प्रस्तावना पृ. १७–१८.

२२. तुळा–"सारांश, पांचसहा कडव्यांपर्यंत साधारणतः लांबी असलेलें, ध्रुव-पदांत, 'आरती' किंवा 'ओवाळणें' हे शब्द व जयजयकार येणारें, पूजोपचाराच्या वेळींच म्हटलें जाणारें, असें जें गेय पद्य त्यास सामान्यपणें आरती ही संज्ञा द्यावयास हरकत नाहीं."–डॉ. म. वि. गोखले – **मराठी आरती** – सावित्री प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९६७, पृ. अठ्ठावीस.

२३. तुळा–'एकनाथांच्या चरित्रावर यानें लिहिलेल्या आरत्या नावीन्य व माहिती यांनीं परिपूर्ण आहेत.' तत्रैव, पृ. तेरा. शिवाय, 'तसेंच एकनाथांच्या चरित्रा-वरील मुक्तेश्वराची आरती (९१) यामुळें महत्त्वाची ठरते.' तत्रैव, पृ. एकेचाळीस.

# मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्यें

## १. गजेंद्रमोक्ष

वसंतमासाचे अंतीं ।
उष्णकाळ रवितप्तीं ।
गज कुटुंबेंसी तृषार्थी ।
गंडिकेप्रती पातला. ॥ १ ॥

गज जाऊनि उदकाआंत ।
शुंडे उदक घेऊनि प्राशीत ।
नक्रें येऊनि अकस्मात ।
शुंडा करकमळ घातला. ॥ २ ॥

सर्व नदींप्रति जाय ।
परी गंडिकेसी न जाय ।
अंत पावतां विसरता होय ।
होणार गतीसारिखें. ॥ ३ ॥

उभी राहतां होणार गती ।
ज्ञाते तेंचि पावती भ्रांती ।
ब्रह्मादिक हे नेणती ।
होणार गतीसारिखें. ॥ ४ ॥

म्हणोनि टाकिलें जळ ।
उदकामाजी करी खेळ ।
नक्रें येऊनि तात्काळ ।
शुंडा करकमळ घातला. ॥ ५ ॥

वोढी काढितां बाहेरी ।
नक्रें नेला जळाभीतरीं ।
दोघे भांडती पूर्ववैरी ।
अति आक्रोशें करूनियां. ॥ ६ ॥

मग अवघीं एकवटोनी ।
गंडिकेतीरीं उभीं राहुनी ।
स्त्रीपुत्रादीकरोनी ।
नानापरी रुदताती. ॥ ७ ॥

मग म्हणती एकमेकांशीं, ।
'श्रीदेवें वांचविलें आम्हांसी ।
जाऊं आपुल्या आश्रमासी ।
ईश्वरें रक्षिलें म्हणोनी. ॥ ८ ॥

मुख्य नायक झालिया निःपात ।
आम्हीं काय करावें येथ ।
पुरला आयुष्याचा अंत ।
त्यांहीं निजधाम टाकिलें. ॥ ९ ॥

आतां जाऊं आपुल्या आश्रमा ।
पुढें जाऊनि करूं संसारकाळक्रमा ।
वडिलांचिया कुळधर्मा ।
तया नेमा न चुकावें.' ॥१०॥

ऐसें धरूनियां चित्तीं ।
सकळ गेलीं आश्रमाप्रती ।
दुर्घट दुःखाचे आवर्तीं ।
गजेंद्रातें सांडुनियां. ॥११॥

मग गजेंद्र तो ग्रोभाये ।
तंव धावण्या कोणीच न ये; ।
'व्यर्थ स्त्रीपुत्राची सोये ।
भ्रांतिमय मी जालों. ॥१२॥

आतां पाहें कृष्णा ! कमळनयना ! ।
तूंचि धांव गा ! जनार्दना ! ।
माधवा ! मुकुंदा ! मधुसूदना ! ।
जगज्जीवना ! विश्वेशा ! ॥१३॥

सर्वही सुखाचे अंतीं ।
मज सोहिरीं मिळालीं होतीं ।
नाहीं मज आजिचे अंतीं; ।
उपेक्षिले दयाळा ! ॥१४॥

आतां मज कोणी नाहीं ।
कृपेनें अवलोकूनि पाहीं ।
आजी भासलें, सर्वही ।
व्यर्थ, ऐसें मनातें. ॥१५॥

संसारसंपत्तीचे काळीं ।
तुझा आठव न ये हृदयकमळीं ।
विपरीत होतां, वनमाळी ! ।
आठव ते काळीं होतसे. ॥१६॥

झालिया भाग्याचा उदयो ।
म्हणे मी कर्ता होय ।
वोहट झालिया, तुझे पाय ।
सर्वदा ध्याय मानसीं. ॥१७॥

एवं आपदा झालियाविण ।
नातुडती तुझे चरण ।
कीं करावें योगसाधन ।
प्राप्ती संपूर्ण पैं तूझी. ॥१८॥

परि मज खातो वैरी ।
धांव, पाव, गा ! श्रीहरी ! ।
तुजवांचोनि संसारीं ।
नाहीं मुरारी ! सोडविता.' ॥१९॥

ऐसी गजेंद्र करितां स्तुती ।
श्रवण झाली, श्रीपती ।
कळवळोनी कृपामूर्ती ।
ते समयीं उठीला. ॥२०॥

सुखसदनीं द्वारकाभुवन ।
मुनिजनांचें विश्रामधाम ।
ऐसिये स्थळीं मधुसूदन ।
सुखस्वानंदें क्रीडतसे. ॥२१॥

आपण बैसोनि वृंदावनीं ।
मुनी तोषविती कीर्तनीं ।
नारदतुंबर उभे राहोनी ।
गायन करिती सुस्वरें. ॥२२॥

मुनिजनांचें ध्येयध्यान ।
कीं देवांचें देवतार्चन ।
ऐकतां भक्तांचें दीनवचन ।
सर्वदा त्यातें नुपेक्षी. ॥२३॥

गजेंद्र गंडिकेभीतरीं ।
उपेक्षिला सहोदरीं ।
म्हणोनी हृदयीं श्रीहरी ।
प्रेमेंकरुनी आठविला. ॥२४॥

ऐकोनि गजेंद्राचें दीनवचन ।
स्वयें धाविन्नला जनार्दन ।
जेथें गजेंद्रनक्रग्रहण ।
शीघ्र तेथें पातला. ॥२५॥

येरीकडे गजेंद्र- ।
शुंडासि झोंबला नक्र ।
तेणेंकरूनि जर्जर ।
शरीर झालें गजाचें. ॥२६॥

/

ऐसें पाहोनि भगवंतें ।
कृपा उपजली तेथें ।
उडी मारूनी घातला हात ।
धरावया दोघांतें. ॥२७॥

दोघे काढूनि बाहेरी ।
नक्र हाणोनि चक्रीं ।
धरोनी गजेंद्रातें करीं ।
विमानावरी बैसविला. ॥२८॥

गजेंद्र घालुनि विमानीं ।
हरी चालिला घेवोनी ।
तें नक्रें पाहोनि नयनीं ।
हास्य करोनि बोलिला. ॥२९॥

'ज्याणें केलें तुझें स्मरण ।
तो पावला दिव्य विमान ।
ज्यासी झालें तुझें दर्शन ।
त्याणें बंधन पावावें ? ॥३०॥

सकळ दुःखाचें निर्दळण ।
करावया तुझें नामस्मरण ।
तें तुजें प्रत्यक्ष जालिया दर्शन ।
पावलों मरण तत्काळीं. ॥ ३१ ॥

आतां तूं चाल वहिला ।
परंतु माजा घात केला ।
मी जालों जळावेगळा ।
अंत आला मज आजी. ॥३२॥

तुझ्या दर्शनाचा लाभ ।
मातें घडला जी ! दुर्लभ' ।
ऐसें ऐकतां श्रीवल्लभ ।
केला लोभ तयातें. ॥३३॥

करें स्पर्शोनि नक्रातें ।
विमानीं बैसविला त्यातें ।
दोघे घेऊनि संगातें ।
वैकुंठासी चालिला. ॥३४॥

देवोनि आपली स्वरूपता ।
द्वारपाळ केलें उभयतां ।
श्रीवत्सलांच्छन सर्वथा ।
नेदी भक्तां आपुल्या. ॥३५॥

भक्तां साह्य श्रीभगवंत ।
तारी आपुले निजभक्त ।
मुनीश्वराचें चित्त ।
हरिचरणीं सर्वदा. ॥३६॥

---

## २. हनुमंताख्यान

गरुडसत्यभामेचा अभिमान ।
विशेष वाढला जाणोन ।
काय करिता झाला नारायण ।
तें तूं परीस राया ! ॥ १ ॥

गरुडासि म्हणे मधुसूदन ।
पाहों इच्छीतसें हनुमान ।
तयालागीं त्वां जाऊन ।
शीघ्र आणावें, बळिवंता ! ॥ २ ॥

रामअवताराचे अंतीं ।
भेटला होता मारुती ।
तयासि बोलिलों निरुतीं ।
कृष्ण-अवतारीं भेटी देईन. ॥ ३ ॥

सागरांचे पैल प्रांतीं ।
हृदयीं धरूनि राममूर्ति ।
पद्मासन घालुनियां, चित्तीं ।
अखंड मातें ध्यातसे. ॥ ४ ॥

रामावांचूनि आणिकांतें ।
सर्वथा न मनी निश्चितें ।
जैसी पतिव्रता पुरुषातें ।
जीवें भावें न विसंबे. ॥ ५ ॥

भक्तांमाजी तो अग्रणी ।
योगियांचा शिरोमणी ।
जितेंद्रियत्वचरणीं ।
तोडर गर्जे मन्मथ. ॥ ६ ॥

ज्याचें नाम घेतां वदनीं ।
पातकें जळतीं अंतःकरणीं ।
त्याचे उपकारें मी दंडपाणी ।
भार जालों अवनीचा. ॥ ७ ॥

तो लक्ष्मणाचा प्राणदाता ।
संजीवनी आणुनी तत्त्वता ।
ख्यात केली, जगा देखतां ।
रावणा लाज लाविली. ॥ ८ ॥

काय वानूं तयाचा पराक्रम ।
दृष्टि देखिला गुणोत्तम ।
तूं अनुभवी परम ।
पुरुषार्थ पैं बळाचा. ॥ ९ ॥

तो हनुमंत वायुकुमर ।
नेणसी त्याचा बडिवार ।
मी जाण त्याचा किंकर ।
दृढनिर्धार तो भक्त. ॥१०॥

तो साक्षात् रुद्रावतार ।
हा अकरावा शंकर' ।
हें आयकोनी पक्षीश्वर ।
मनीं विकल्प मानिला. ॥११॥

म्हणे, समर्थाची करणें सेवा ।
परम कठिन लघु जीवा ।
लक्ष्मीवंतासि पर्वा ।
पैं कोण्हाची असेना. ॥१२॥

त्यासी कोणी नाहीं नाथ ।
तो स्वतंत्र रमाकांत ।
त्यासी नलगे सेवक दूत ।
तो सकळांहि वेगळा. ॥१३॥

मज वानराप्रति पाठविणें ।
हें अनुचित कोण्ही नेणे ? ।
'निकें' म्हणोनि क्रोधें सत्राणें ।
उड्डाण केलें पक्षीश्वरें. ॥१४॥

क्षीरसमुद्र, क्षारसिंधु ।
पक्षें उल्लंघिले पैं मदू ।
क्षीराब्धि आणि विशदू ।
साही समुद्र उल्लंघिले. ॥१५॥

साही समुद्रांपरता ।
मारुती बैसला होता ।
आसन घालुनि तत्त्वता ।
रामनाम स्मरतसे. ॥१६॥

सूर्योदयीं सारुनी स्नान ।
जंववरी पावे मध्याह्न ।
तंववरी श्रीरामचरण ।
हृदयीं ध्यान न विसंबे. ॥१७॥

गरुड जाऊनी निकट उभा ।
तेणें सकळ जीवां देतसे शोभा ।
देखोनी आंगींची प्रभा ।
वनचरें भयभीत. ॥१८॥

मग हाक देऊनियां प्रबळ ।
उभा राहिला सबळ ।
दोन्ही पिटूनियां करतळ ।
'उठीं वानरा !' म्हणतसे. ॥१९॥

लक्ष्या नाणी अंजनीतनुज ।
हृदयीं ध्यातसे रघुराज ।
ऐकोनियां गरुडाचा गजबज ।
मेरू जैसा ढळेना. ॥२०॥

मागुती गरुड बोले वाणी ।
'तूज पाचारितो चक्रपाणी ।
उठीं वहिला चाल झडकरुनी ।
उशीर न लावीं, मर्कटा !' ॥२१॥

येरें बहुत क्षमा केली ।
रामनामीं वृत्ति गुंतली ।
वामांगीं सीतामाउली- ।
सहित ध्यातो श्रीराम. ॥२२॥

गरुडें धरूनी हस्तक ।
उठविला कपिनायक ।
येरें कर पसरूनियां देख ।
वोपिता झाला चडकण. ॥२३॥

तणें लागली भोंवरी ।
भ्रमित झाला गगनोदरीं ।
मग प्राणसंकटें मुरारी ।
हृदयकमळीं स्मरियेला. ॥२४॥

गगनमार्गें फिरत फिरत ।
तंव पातला द्वारकेआंत ।
सिंहासनीं उपविष्ट श्रीकृष्णनाथ ।
तयासन्मुख पडियेला. ॥२५॥

अधोमुख लज्जित ।
मुख न दाखवी सभेआंत ।
मग पुसता झाला वृत्तांत ।
मधुसूदन गरुडासी. ॥२६॥

'काय झालें बा ! कथन ?' ।
येरु खेदें करीतसे रुदन ।
मग सन्मानुनीयां श्रीकृष्ण ।
'शिणलासी मम वत्सा !' ॥२७॥

गरुड बोले सखेद शब्द ।
'जरी अंतरी होता क्रोध विषाद ।
तरी येथेंचि मारणें हा विध ।
हे तो नीत स्वामीची. ॥२८॥

मज वानराकरवीं दंड ।
प्राप्त केला जी उदंड ।
आतां प्राणा त्यागीन दृढ ।
वनप्रयाण करीन.' ॥२९॥

कृष्ण म्हणे, 'विहंगोत्तमा ! ।
तूं नेणसी वानराचा महिमा ।
तो साक्षात्कार ( ? ) उमा- ।
श्रीशंकरू. ॥३०॥

तयाचा दाखवावया पुरुषार्थ ।
म्हणोनि धाडिलें तुज तेथ ।
तेथें वर्तला जो वृत्तांत ।
तो सांग रे ! मज वहिला.' ॥३१॥

मग बोले पक्षीश्वर, ।
'नाम घेतां यादववीर ।
अति क्षोभला वानर ।
प्रळयानळासारिखा. ॥३२॥

हस्तें करितां मजला ताडण ।
तेणें पावलों द्वारकापट्टण ।
देखिले श्रीचरण ।
क्लेशनाशन स्वामीचे.' ॥३३॥

कृष्ण म्हणे, "चुकी पडली ।
'कृष्ण' अक्षरें कां उच्चारिलीं ? ।
घेतां श्रीरामनामावळी ।
लोटांगणें तुज येता. ॥३४॥

आतां पुढती जाईं वहिला ।
रामनाम ऐकवीं त्याला ।
मग वंदील पाउलां ।
हनुमंत तुझ्या." ॥३५॥

गरुड म्हणे, 'नवजें स्वामी ! ।
देखतां वानरक्रोधऊर्मी ।
शंका अद्भुत अंतर्यामीं ।
पाउलें माझीं न चलतीं.' ॥३६॥

तंव कृष्ण म्हणे, "आग्रह न करीं ।
वदें 'श्रीराम पाचारी' " ।
मग गरुड निघाला झडकरी ।
धाके अंतरीं प्रबळ. ॥३७॥

दुरूनि देखिला अंजनीतनुज ।
म्हणे, 'नीघ वहिला, पाचारी तुज ।
अयोध्यावासी रघुराज ।
भेटीलागीं इच्छीत.' ॥३८॥

तंव रघुनाथनाम ऐकोनि कानीं ।
अश्रू लोटले तयाचे नयनीं ।
धांवोनि लागला गरुडाचे चरणीं ।
लोटांगण घातलें. ॥३९॥

'कोठें माझा रघुराज ? ।
तो मज दाखवीं तेजःपुंज ।
कोठें आहेत ते अनुज ? ।
भरत आणि शत्रुघ्न. ॥४०॥

कोठें माता जानकी ? ।
जीचें नाम घेतां मुखीं ।
उद्धरती महापातकी ।
अगमोगमीं ब्रह्महत्या. ॥४१॥

जो मुनिजनांचें ध्येयध्यान ।
जो देवांचें देवतार्चन ।
जो जगाचा जगज्जीवन ।
राम निधान भेटवीं.' ॥४२॥

देखोनी हनुमंताचा प्रेमा ।
गहिंवर दाटला विहंगोत्तमा ।
'अयोध्यावासी परमात्मा ।
भेटीलागीं इच्छीत.' ॥४३॥

मग हस्तक धरूनि द्वयमूर्ति ।
निघते झाले ऊर्ध्वपथीं ।
त्याचा वेग देखोनि चित्तीं ।
लज्जाभूत पैं झाला. ॥४४॥

मार्ग क्रमितां नभपोकळीं ।
गरुड धाके अंतराळीं ।
'श्रीराम न देखतां जवळीं ।
प्राणसंकट मांडेल. ॥४५॥

आधींच कोपिष्ठ वानर ।
दृष्टी न पडतां रघुवीर ।
मग मारील महामार ।
प्रळयरुद्रासारिखा.' ॥४६॥

येरीकडे यादवेश्वरें ।
द्वारका पालटोनियां त्वरें ।
अयोध्या रचियली एकसरें ।
शरयूतीररमणीया. ॥४७॥

ऐसी जंव गरुड चिंता करी ।
तंव बोलिला विश्वसूत्रधारी ।
'द्वारके केली अयोध्यापुरी ।
क्षण एक न लागतां.' ॥४८॥

जो अनंत ब्रह्मांडाचा कर्ता ।
त्यासी काय अयोध्येची अशक्यता ? ।
अर्धक्षणही न लगतां ।
कृष्ण जाहला श्रीराम. ॥४९॥

सौमित्र शोभे सव्यभागीं ।
पाठी शोभती उभयवर्गी ।
मेघश्याम प्रभा आंगीं ।
कोटी सूर्यांची प्रकाशे. ॥५०॥

सत्यभामेसी सांगे मुरारी, ।
'सीता होईं झडकरी' ।
नाना वेश घेतां अळंकारीं ।
पैं रूप न पालटे. ॥५१॥

येरें रुक्मिणीकडे अवलोकिलें ।
तंव ते तात्काळ जानकीरूप जालें ।
वामांकावरी बैसलें ।
तेज मिरवलें अर्धांगीं. ॥५२॥

गरुडें अयोध्या अवलोकिली ।
म्हणे, 'कृष्णमहिमा न वचे वर्णिली' ।
समीप आले तंव देखिलीं ।
पांचही दिव्य रूपडीं. ॥५३॥

हनुमंत वंदी श्रीरामचरणा ।
म्हणे, 'आजि सुफळ झाली मनकामना ।
आवडी देतां आलिंगना ।
साही एकचि पैं झालीं. ॥५४॥

ऐसीं अनेक प्रवृत्ती ।
आत्मरूपें का स्मरती ।
तैसा दाशरथी आणि मारुती ।
स्पर्शले निजस्वरूपीं. ॥५५॥

ऐसी श्रीरामहनुमंतभेटी ।
तेणें हर्ष झाला सृष्टी ।
आनंद वर्तलासे पोटीं ।
काय बोलों कौतुक ? ॥५६॥

येथींचें सुख जाणत ।
जे का रामभजनीं निरत ।
अखंड रामनाम स्मरत ।
काळ क्रमीत निरंतर. ॥५७॥

## उपसंहार

हें ऐकतां हनुमंताख्यान ।
पापें कोटी नाशती जाण ।
आणि प्राप्त वैकुंठभुवन ।
हें वाल्मीकीचें पैं वाक्य. ॥५८॥

वाल्मीकिकाव्य शतकोटी ।
रामायण असे सृष्टी ।
जयास, प्रेम असे पोटीं ।
सदा सन्मुख, सांगतां. ॥५९॥

शंकर जपे हृदयकमळीं ।
श्रीरामनामावळी ।
उमेलागीं उपदेशिलीं ।
दोन्ही चांग अक्षरें. ॥६०॥

सर्वांसी असे तुळणा ।
परी उपमा नाहीं रामायणा ।
हें मानलें कवीच्या मना ।
निश्चयेंसी सर्वदा. ॥६१॥

मुक्तेश्वराचा श्रीगुरू ।
दत्तात्रय परब्रह्मअवतारू ।
स्मरतां, झाला भवसागरू ।
गोष्पदप्राय सद्भक्ता. ॥६२॥

## ३. मूर्खांचीं लक्षणें

सर्वही एकापासुनी झालें ।
सर्वही एकासीच पावलें ।
परी तेणें कांहीं नाहीं केलें ।
हें ज्या न कळे तो एक मूर्ख. ॥ १ ॥

हरिहरांतें मानी भेद ।
साधुसज्जनांतें देखोनी पावे[1] खेद ।
नेणोनि करी वितंडवाद ।
तो द्वितीय मूर्ख जाणावा. ॥ २ ॥

नाहीं अर्थाचें अनुसंधान[2] ।
पाठमात्रें[3] ज्ञानअभिमान ।
गर्वें जगासि माने न्यून ।
तो तृतीय मूर्ख जाणावा. ॥ ३ ॥

अर्थ नेणोनी भाषा दूषी ।
सिद्धांत नेणोनी मतांची[4] राशी ।
ईश्वर नेणोनि भूतांचा द्वेषी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ४ ॥

वेदशास्त्रपुराणज्ञानी ।
पाप म्हणोनि निंदिती जनीं ।
बळेंच आचरे ते करणी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ५ ॥

आपुले अवगुण नाठवी ।
पुढिलांचे[5] अपराध माजवी ।
निर्दोषियां दोष लावी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ६ ॥

शरीरसंपत्तिवयसा जाणा ।
हे[6] साचार मानी मना ।
गर्वें जगासी चाले उताणा ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ७ ॥

ईश्वर काळ आणि पापाचें ।
वेद वडील लोकनिंदेचें ।
भय नाहीं जया[7] साचें ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ८ ॥

चंचळ आंवरावया मन ।
शक्ति नाहीं अर्ध क्षण ।
मेरुतुल्य शब्दज्ञान[8] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥ ९ ॥

पुढिलां उपदेशी अमाप ।
आपण झांकून करी पाप ।
करूनि म्हणे मी निःपाप[9] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१०॥

विरक्त आणि[10] इच्छावंत ।
योगी आणि इंद्रियासक्त[11] ।
वादी क्रोधी शास्त्रज्ञ पंडित ।
ते[12] हे तिघे मूर्ख जाणावे. ॥११॥

ब्रह्मनिष्ठ आणि अहंकारी ।
तपस्वी कोपें[13] अपस्मारी ।
शिष्ट अंतरीं अनाचारी ।
हे तिघे मूर्ख जाणावे. ॥१२॥

---

१. पाठ-पावबी. २. पाठ-अनुष्ठान. ३. पाठ-आपण मात्रें. ४. पाठ-मताचरेसी (?) ५. पाठ-परछर्मी दृष्टी ठेवी. ६. पाठ-हें साच मानुनियां मना. ७. पाठ-आयासाचें. ८ पाठ-शब्द जाण. ९. पाठ-निष्पाप. १०. पाठ-मनीं. ११. पाठ-विषयासक्त. १२. पाठ-तो एक मूर्ख जाणावा. १३. पाठ-कोपी.

ज्ञान[1] आणि वैराग्यहीन ।
भक्ति करी विश्वासावीण ।
कुटुंबसंग्रही निर्धन ।
हे तिघे मूर्ख जाणावे. ॥१३॥

आतां सर्व साधारणें ।
अनेक मूर्खांचीं लक्षणें ।
सांगीजेतील सज्ञानें ।
त्यागार्थ[2] बुद्धी परिसावीं. ॥१४॥

वारिया देऊनि पाटी ।
वापीकूपीं घाली दिटी[3] ।
चालतां तृण तोडी बोटीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१५॥

प्रकाशाचिये तांडीं ।
उभा राहूनि वस्त्र[4] फेडी ।
सांडव्यावरून[5] धांवे तांतडी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१६॥

नीच बैसोनि उंचीं मुतें ।
नाकींचा मळ काढी हातें ।
बोटींचें[6] नख तोडी दांतें ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१७॥

बैसोनिया सभास्थानीं ।
खाकरे शिंकरे[7] प्रतिक्षणीं ।
पिका टाकी पवित्र भवनीं[8] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१८॥

समर्थें करितां विनोद ।
आपण[9] परतोनि दे शब्द ।
बळवंताशीं चालवी द्वंद्व ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१९॥

श्मश्रूकर्म करितां निकटी ।
चिरकाळ बैसोनि सांगे गोष्टी ।
समर्थवनिता न्याहाळी दृष्टी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२०॥

एकला[10] एकट चाले पंथीं ।
हाटचोहटा करी वस्ती ।
वर्ते कुसंगाचिया संगती ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२१॥

उदकपात्रावीण भोजनीं ।
चूर्णावीण फोडणी घाली वदनीं ।
परवस्त्र मागे स्नान करूनी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२२॥

अर्थ[11] दे लोभियाचे करीं ।
पुस्तकें ठेवी पंडिताचे घरीं ।
स्त्री ठेवी जारशेजारीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२३॥

उधार देऊनि थोटा ।
मग व्यवहार सांगे चोहटा ।
नसती[12] करी खटपटा ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२४॥

दुजयाचे घरा जाणें ।
अपमानाचेनि दुःखें शिणणें ।
क्षेत्रीं सोवळें ओंवळें म्हणे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२५॥

---

१. पाठ–ज्ञानी. २. पाठ–कौतुकार्थं. ३. पाठ–दृष्टी. ४. पाठ–वस्त्रें वेढी. ५. पाठ–संग्रामीं. ६. पाठ–बोटींचीं नखें. ७. पाठ–शिंके. ८. पाठ–भुवनीं. ९. पाठ–आपण दे प्रतिशब्द. १०. पाठ–एकटिया. ११. पाठ–(सम्पूर्ण ओवी) 'अर्थलोभियाचे घरीं। पुस्तकपंडिताचे घरीं। स्त्रीजाराचे शेजारीं। वसे तो एक मूर्ख. ॥ २३ ॥' १२. पाठ–नास्ती काळीं.

उधार देऊनि मित्रा मागे ।
गुह्य स्त्रियेपाशीं सांगे ।
आपला गुण आपण श्लाघे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२६॥

नीचाचे[१] तोंडीं लागे ।
शिकवी तयाची बुद्धि नलगे ।
अहंपणें सर्वदा वागे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२७॥

अल्पभोजी शीघ्रभोजी ।
अथवा समर्थप्रभु शेजीं ।
भोजनीं बैसे तया शेजीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२८॥

संबंधेंवीण वार्ता पुसे ।
उगाचि[२] लोकांशीं रुसे ।
तापियाकोपियांसि[३] हांसे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥२९॥

बहुत हानीतें नाठवी ।
स्वल्पासाठीं कलह वाढवी ।
वेळ[४] न पहातां आडवी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३०॥

भोजनकाळीं परगृहा जाय ।
स्त्रीपुरुषांचा एकांत पाहे ।
हाटचोहटा[५] खाय कीं गाय ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३१॥

दासी[६] तरुणी रूपवंता ।
राहे कुटुंबिनी विरक्ता ।
गृहीं ठेऊनि निभ्रांता (?) ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३२॥

दरिद्री आणि गोड खाय अंगें ।
घरींचा सुरवाड[७] पंथी मागे ।
अभाग्यकाळीं भाग्य सांगे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३३॥

करूनि अनुचित करणी ।
पश्चात्ताप न मनी मनीं ।
छळूनि करी बुझावणी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३४॥

मळमूत्रविसर्जना ।
अथवा भुकेलिया[८] भोजना ।
जातया गोंवी त्वरें वचना ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३५॥

भोजनीं बैसे विषमासनीं ।
उदक प्राशी खट्वासनीं[९] ।
प्रभुशेजे[१०] उंचासनीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३६॥

वर्जितां अन्याय[११] राहाटणें ।
अपाय लागल्यावर शिणणें ।
माझें प्रारब्ध ऐसें म्हणणें[१२] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३७॥

---

१. पाठ-( संपूर्ण ओवी ) 'नीचाचिये तोंडीं लागे । नेदी तया बळें मागे । झकवी त्याचे बुद्धी वागे । तो एक मूर्ख जाणिजे ॥' २. पाठ-उगलाचि लोकांवरी रुसे. ३. पाठ-तपी कोपी यांसि. ४. पाठ-समय लक्षुनि आडवी. ५. पाठ-हाटबिदी. ६. पाठ-दासी तरुणी रूपवंत । आपण भगवद्भक्त विरक्त । गृहीं ठेवितो निभ्रांत । ७. पाठ-सुरवाडमार्गीं मागे. ८. पाठ-सुखें करीं. ९ पाठ-उभा राहुनी. १०.पाठ-प्रभुसन्मुख बैसे उंचासनीं. ११. पाठ-अन्यायीं. १२. पाठ-म्हणे.

फिटेल कैसें हें न विचारी।
रीण[1] घेऊनि घाली उदरीं।
मग भंडमा भोगी अपारीं।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३८॥

मित्रदारा मित्रवैरी।
यांशीं एकांतीं मैत्री करी।
धणी[2] नसता रिघे घरीं।
तो एक मूर्ख जाणावा. ॥३९॥

परहातें[3] संपादूनी।
यशलाभाचा भरंवसा मानी।
ईश्वरभजन न ऐके कानीं।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४०॥

जागतया[4] पुढें निजणें।
कीं निद्रिस्थापुढें बैसणें।
स्त्रीसमाजीं आवडे बैसणें।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४१॥

निद्रा करी समर्थशयनीं।
जाऊनि बैसे समर्थासनीं।
आरुढे जो समर्थवहनीं।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४२॥

विसांविया उतरे वाटे।
अस्तमानीं चढे घांट।
ओस पंथीं चाले पहांटे।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४३॥

निद्रा करी मांडके[5] घरीं।
स्वल्प मानूनि रिघे[6] पुरीं।
समीप म्हणोन न ये घरीं[7]।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४४॥

कुटुंबेंसीं परतीरा जाय।
अपत्य घेऊनि अवघडीं धांवे।
एकदांचि अवघीं बैसवी नावे।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४५॥

माध्यान्हीं उष्णकाळीं।
सकुटुंबी चाले वाट निर्जळीं।
दाटीमाजी रिघे देउळीं।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४६॥

बोल न खंडितां दुजयाचा।
आपण असत्य करी वाचा।
आपण मध्येंच संचरी वाचा।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४७॥

न बोलवितां परगृहा जाणें।
न पुसतां मात सांगणें।
समर्थ प्रभु सांगरा म्हणे।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४८॥

आपण नेणे सारासार।
नायके श्रेष्ठाचा विचार।
बोले[9] तांतडीभरें थोर।
तो एक मूर्ख जाणावा. ॥४९॥

---

१. पाठ-रिण घेवोनि संसार करी. . पाठ-गृहस्वामी नसतां प्रवेशे घरीं. ३. पाठ-संग्राम उदीम दोन्ही। परहस्तें संपादूनी। यशलाभाचा भरंवसा मानी। ४. पाठ-जागतियापुढें निद्रा करणें। निद्रिस्ता समीप बैसणें। परस्त्रियां संबंधी बैसणें। ५. पाठ-भंगले. ६. पाठ-निघे. ७. पाठ-चाले रात्रीं. ८. पाठ-शब्द न खंडितां दुजयाचा। आपण मध्यें संचरी वाचा। आग्रहें संग्रह करी पापाचा। ९. पाठ-स्वमुखें म्हणे मी थोर.

घडला[१] जरी उपकार नाठवी ।
अपकार तो जीवीं आठवी ।
आपुलें केलें तें मुखीं रूढवी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५०॥

पंक्तिभेद करूनि कदन्न वाढी ।
आपण एकला मिष्टान्न झोडी ।
मज न साहे हे संपादी प्रौढी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५१॥

मळीण वस्त्र अंग मळीण ।
न करी करपाददंतधावन ।
भक्ष्य भक्षी स्नानावीण[२] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५२॥

समर्थशेजे बांधी घर ।
बळवंताशीं[३] अर्थव्यवहार ।
राजपुरोहिताशीं मत्सर ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५३॥

पुढें स्तुति, मागें निंदा ।
स्वल्प अपराधें चढे क्रोधा ।
समयीं जो न मिळे संवादा ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५४॥

एकांत करितां दोघेजण ।
समीप[४] जाऊनि लावी कान ।
श्रेष्ठा[५] आधीं इच्छी मान ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५५॥

अकारणें[६] हांसे बहु हांसणें ।
हांसतचि गोष्टी सांगणें ।
कोण्ही न हांसतां बहु हांसणें ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५६॥

प्रभु हांसतां आपण न हांसे ।
जेठा[७] घालूनि सभे बैसे ।
प्रभु रूदतां आपण हांसे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५७॥

मळमूत्र सारी जनाचिये[८] दृष्टी ।
जपतप[१०] नाहीं लोकांचे दृष्टि ।
सभेंत फळ तांबूल सेवी एकटीं[११] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५८॥

बहु व्यवसायी ऋणग्रस्त ।
द्विभार्यापति व्याधिग्रस्त ।
यांचिया वचनीं विश्वासत ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥५९॥

परगुणपरीक्षा परवेदना ।
हे दोन्ही न कळे ज्याचिया मना ।
त्याचिया[१२] संगती सुखवासना ।
इच्छी तो एक मूर्ख. ॥६०॥

अल्प पडदणी अल्प वसन ।
अल्प पात्रीं बहु भोजन ।
अल्प स्त्रीस दाखवी मन ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६१॥

गृह त्यागूनि मठाची माया ।
शिष्यिणी करूनि त्यागी जाया ।
सुहृद त्यागूनि धरी शिष्यसमुदाया ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६२॥

---

१. पाठ–केले उपकार नाठवी । अपकार सर्वदा आठवी । केला स्वधर्म तो रूढवी । २. पाठ–स्नातेवीण. ३. पाठ–बळिष्ठासीं द्रव्यव्यवहार. ४. पाठ–आपण. ५. पाठ–श्रेष्ठत्व आधी इच्छी मन. ६. पाठ–अपकारण. ७. पाठ–गेंठा. ८. पाठ–देखतां. ९. पाठ–लोकदृष्टी. १०. पाठ–जपतप मांडी हाटचोहटीं. ११. पाठ–एक दिठी. १२. पाठ–त्याचे संगतीची धरी वासरा.

परोपदेशीं कुशल भारी, ।
आपण अधर्म अकर्म करी, ।
त्याच्या वचनाचा विश्वास धरी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६३॥

तोंडें म्हणे सर्व ही ब्रह्म[१] ।
आचरे वेदविरुद्ध कर्म ।
त्याचा शिष्य होय तो परम अधम ।
महामूर्ख[२] या नांव. ॥६४॥

स्त्रियेचें वचन घेऊनि कानीं ।
दुऱ्हावी पिता बंधू जननी ।
वेगळा[३] राहे सुहृदांतुनी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६५॥

अर्थ अथवा वृत्ति स्वार्थ[४] ।
व्यवहारा बोलावी बापभावांत[५] ।
अपाय चिंती आप्तांत[६] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६६॥

मायबापाची हेळणा करी ।
आर्जवें आदरें उचित करी[७] ।
विश्वीं वर्ते मिथ्याचारी[८] ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६७॥

कुरूप[९] म्हणोनि स्वस्त्री त्यागी ।
दासीवेश्यापरस्त्रीसंगीं ।
लज्जाविरहित कुमार्गी ।
वर्ते तो एक मूर्ख. ॥६८॥

वडिल सुहृद निद्रिस्थ घरीं ।
अबला अभुक्त रुदितस्वरीं ।
बळात्कारें संग करी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥६९॥

परगृहीं गोड तें म्हणे, 'वाढीं,' ।
स्वगृहीं 'घाल तें' पुसी न रूढि ।
जेवितया[१०] आधीं हात आंखडी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७०॥

भोजनाभ्यंगीं मळ सर्गीं[११] ।
रहस्य बोलता राजवर्गीं ।
निद्रिस्थ प्रभुस्त्रियांसगीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७१॥

झोंपीं जातया कां ध्यानस्था ।
दाटूनि बोलवी आग्रहता ।
प्रभूतें पुसे राज्यवार्ता ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७२॥

प्रज्ञा असोनि अभ्यास न करी ।
तरुणपणीं प्रवास करी ।
समर्थाश्रयें अनपकारी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७३॥

ज्ञाता आणि ईश्वर न भजे ।
भाग्यकाळीं मित्राग माजे ।
उपदेश घेउनी गुरुगी लाजे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७४॥

कृपणपणें हेम सांची ।
उदारपणें कांहींच न वेंची ।
हा[१२] विचारू नेणे आपणची ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७५॥

---

१. पाठ–खल्विदं ब्रह्म. २. पाठ–मूर्खांहुनी मूर्ख जाणावा. ३. पाठ–नांदों लागे श्वशुरसदनीं. ४. पाठ–स्वार्थें. ५. पाठ–दायादांतें. ६. पाठ–आप्तांतें. ७. पाठ–सारी. ८. पाठ–मित्राचारीं. ९. पाठ–कुरूप म्हणोनि स्वस्त्रियें त्यागी । दासी, वेश्या, परस्त्री भोगी । निर्लज्ज राहाटे कुमार्गी । तो एक मूर्ख जाणावा । १० पाठ–स्वगृहींची सांगे प्रौढी. ११. पाठ–मलोत्सर्गीं. १२. पाठ–हा विचार न करी मन ज्याचें.

ब्रह्म ईश्वर भविष्यार्थु ।
जाणोनि[१] म्हणे सुवर्ण धातु ।
त्याचिया वचनीं विश्वासितु ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७६॥

प्रपंचकृत्या लगबग करी ।
धर्मकृत्या[२] लगबग न करी ।
न्यायें बोले तयातें वारी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥७७॥

इहलोक[३] परलोक जोडणें ।
तेथ कपर्दिक न वेंची म्हणे ।
अकीर्ति[४] अंगें करी जीवें प्राणें ।
सर्व वेंची तो मूर्ख. ॥७८॥

सांप्रदायमताभिमानी[५] ।
श्रेष्ठ[६] अश्रेष्ठ मानी मनीं ।
अयोग्य योग्यत्वें पूजणें[७] ।
तो एक मूर्ख. ॥७९॥

केलें पाप हें झांकेल[८] ।
या[९] न्यायें ते संपादेल ।
विष भक्षिलें तें जिरेल ।
आंगीं[१०] मानी तो मूर्ख. ॥८०॥

अविश्वासिया अतिविश्वास ।
विश्वासस्थळीं अति अविश्वास ।
स्वहितकर्ता[११] त्यासी अविश्वास ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८१॥

सभेमाजी खेळवी बाळ ।
स्त्रियेशीं कटकट करी सर्व काळ ।
आळसनिद्राकुसंगीं सारा वेळ ।
क्रमी . तो एक मूर्ख. ॥८२॥

साली[१२] अथवा मेहुणी ।
रूपवंत कुशल तरुणी ।
स्त्रियेच्या बाळंतपणा आणी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८३॥

ब्रह्मद्वेषी वेदआज्ञा लोपी ।
कर्मभ्रंशी[१३] वेदविकल्पी ।
भोगीं[१४] लोलुपता आसक्ति ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८४॥

खाटीक[१५] तस्कर मत्स्यविक्रेता ।
यांसि द्रव्य व्यवहारिता ।
परांगनेशीं मैत्री कर्ता ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८५॥

गृहदासीसी[१६] दे हात ।
पलांडु सेवी श्रोत्रियांत ।
अविधी राहाटी श्रेष्ठांत ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८६॥

१. पाठ-जाणोनि म्हणे मिथ्या उद्धत. २. पाठ-धर्मकृत्या विलंबें वारी । न्याय बोलतयातें सारी. ३. पाठ-इह परत्र जोडे जेणें. ४. पाठ-कुमार्गीं वेंची जीवें प्राणें । तो एक मूर्ख जाणावा. ५. पाठ-शुद्ध साम्प्रदायमताभिमानी. ६. पाठ-वंद्य तें निंद्य मानी मनें. ७ पाठ-पुसणें. ८. पाठ-आच्छादेल. ९. पाठ-अन्याय जो संपादेल. १०. पाठ-म्हणे तो एक मूर्ख. ११. पाठ-स्वहितकर्त्याशीं उदास. १२. पाठ-कमनीय रूप मेहुणी । सभाग्य आणि तरुणी. १३ पाठ-कर्मभ्रष्ट अतिविकल्पी. १४. पाठ-भोगी लोल्यंग वागजल्पी. १५. पाठ-हिंसक तस्कर मद्यविक्रित । तयाशीं व्यवहार करीत । पण्यांगनेसीं प्रीति धरीत. १६. पाठ-गृहदासीस घाली हात । पलांडु सेवी पिशितांत । अविहित आचरणीं तृप्त.

बाळविधवा[1] वरी घरीं राहत ।
नपुंसकाहातें[2] पढवी सुत ।
शूद्राहातीं अभ्यास[3] करवीत ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८७॥

बहुत काम बहुत कोप ।
बहुत निद्रा बहुत जल्प ।
बहु आहार बहुत विकल्प ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८८॥

उत्तर[4] वयीं करी लग्न ।
जीविकेवीण बांधे सदन ।
प्राणत्यागीं न वेंची धन ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥८९॥

बोल बोलुनी सांडी ।
मध्येंच व्रतनेम खंडी ।
स्वदत्त[5] परदत्त विखंडी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९०॥

अनुचित कर्मारंभ करी ।
स्वजनासी विरोध[6] करी ।
स्त्रीजनासी[7] विश्वास धरी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९१॥

आपण नेणे शिकविलें न करी ।
विद्याधनावीण अहंकारी ।
जनीं[8] बळें पाखांड करी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९२॥

जेठियाशीं झोंबी घेणें ।
व्युत्पन्नाशीं वाद सांगणें ।
धन्वंतरीशीं होड बांधणें ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९३॥

झोंपी जाय घोड्यावरी ।
आडसांगडी निघे पूरीं ।
रोगपरीक्षेवीण औषध करी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९४॥

राजगृहीं पैशून्य बोले ।
परनाश देखूनि हीरखें डोले ।
स्तुति[9] ऐके तंव तंव खुले ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९५॥

विजया[10] भक्षुनि लावी ध्यान[11] ।
ममता[12] अंगीं आणि कथी ज्ञान ।
बोले एक करी आन ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९६॥

सापत्नमाता कन्या भगिनी ।
स्नुषा दासी परस्त्री तरुणी ।
एकगृहीं एक शयनीं ।
समीप बांधे तो एक मूर्ख.[13] ॥९७॥

भार्ये माजे दरिद्रें झिजे[14] ।
परकीर्ति[15] ऐकूनि मत्सर भजे ।
निंदितयातें निवेद नवाजे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९८॥

१. पाठ–बाळविधवेशीं घरवात. २. पाठ–नपुंसकापाशीं पाठवी. ३. पाठ–अभ्यासित. ४. पाठ–उत्तरकाळीं. ५. पाठ–अन्यायीं उभारी दिंडी. ६ पाठ–विरोधाचारी. ७. पाठ–योषितांचा. ८. पाठ–पंडितेसीं. ९. पाठ–स्वशक्ति ऐसें मित दर (?) बोले. १०. पाठ–बीजा. ११. पाठ–ज्ञान. १२. पाठ–बोल आणि करणें वीण. १३. ह्या ओवीनंतर काही हस्तलिखितांत पुढील ओवी आढळते–स्वगुणदोष जाणणें। परदोष न देखणें। हेंचि चातुर्य ऐसें नेणणें। तो एक मूर्ख जाणावा.॥ १४. पाठ–झिजे. १५. पाठ–परकीर्ति ऐकूनी उभजे.

गर्व[1] करी संतभजनीं ।
विश्वासुनी महंतसंतवचनीं ।
दोषारोपी साधूचिये गुणीं ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥९९॥

निंदूनि स्वहितधर्मा[2] ।
स्तवी अविहित परधर्मा ।
तोचि[3] आचरे परधर्मा ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१००॥

विलंबे धन प्राप्त संकटीं ।
त्याची दुराशा धरूनि पोटीं ।
प्रयत्नालागीं होय हिंपुटी ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१०१॥

उपजोनियां संसारीं ।
आयुष्य वेंची विषयावरी[4] ।
आत्मप्राप्ति[5] नव्हे पुरी ।
हें नेणे तो मूर्ख. ॥१०२॥

आत्मप्राप्तीचें साधन ।
एक मनोनिग्रह हाचि जाण ।
यासि वैराग्य मुख्य कारण ।
हेंचि नेणें तो मूर्ख. ॥१०३॥

हरिहरनामापरतें आन ।
नाहीं प्रायश्चित्त गहन ।
हें विश्वासें न मनी ज्याचें मन ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१०४॥

काशीमरणें विष्णुस्मरणें ।
मोक्षप्राप्ती वेदवचनें ।
यातें अर्थवाद[6] म्हणे ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१०५॥

सर्वभूतीं भगवंत परिपूर्ण ।
सर्वदया हें ज्ञानभूषण ।
हें विश्वास[7] न मनी जयाचें मन ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१०६॥

संन्यासी आणि सालंबी ।
गृहस्थ आणि निरालंबी ।
सत्यशील आणि दंभी ।
हे तिघे मूर्ख जाणावे. ॥१०७॥

पुण्य बन्धु पाप वैरी ।
लोभ तो क्षयरोग शरीरीं ।
आपदीं धैर्यचि साहकारी ।
हें नेणें तो एक मूर्ख. ॥१०८॥

दरिद्री तपातें नाचरे ।
धनिक अदाता[8] निर्धारें ।
हे[9] दोघे मूर्खचि महाधुरे ।
हे महामूर्ख जाणावे. ॥१०९॥

झालिया[10] विश्वेश्वरकृपा ।
हें मत न बांधी या संकल्पा ।
धरुनी आचरे जो पापा ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥११०॥

---

१. पाठ–गर्व करीत साधुभजनीं । विश्वास न मानी वेदवचनीं । दोषारोप विद्वज्जनीं । तो एक मूर्ख जाणावा. ॥ २. पाठ–विहित स्वधर्मा. ३. पाठ–तेंचि आचरे तो अधम. ४. पाठ–विषयाचारीं. ५. पाठ–आत्मप्राप्ती न साधी पुरी । तो एक मूर्ख जाणावा. ६. पाठ–अर्थ दुजे. ७. पाठ—वर्म. ८. पाठ–कृपण. ९. पाठ–गुरुशी न भजे अव्यभिचारें. १०. पाठ– झालिया ईश्वराची कृपा । हे मज न बाधी ।

बहु याचक राज्यधर ।
यांसी करूनि उचित पाचार ।
प्रसन्न करूं म्हणे जो नर ।
तो एक मूर्ख जाणावा. ॥१११॥

देहीं[1] अहंकार गळाला ।
भूतीं मत्सरु नाहीं झाला ।
तो आत्मानुभवें भला ।
हेंचि जो नेणे तो मूर्ख.[2] ॥११२॥

एकशत बारोत्तरें ।
ओंव्या लिहिल्या मुक्तेश्वरें ।
हें परिसोनियां चतुरें ।
मूर्खलक्षणें सांडावीं. ॥११३॥

# ४. भगवद्गीता

## कर्मकांड

### अध्याय पहिला

धृतराष्ट्र म्हणे, 'संजया ! ।
धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राच्या ठायां ।
कौरव पांडव मिळोनियां ।
तेथें काय करिताती ? ॥ १ ॥

संजय म्हणे रायासी, ।
पांडवसैन्य परियेसी, ।
राजा सांगे द्रोणापाशीं ।
तयाजवळी येऊनी. ॥ २ ॥

'आचार्या ! पांडवसैन्य पाहें ।
द्रुपदपुत्रें रचना केली आहे ।
तुझाच शिष्य होय ।
बुद्धिबळें अधीक. ॥ ३ ॥

पांडवसेनेंत वीर जाण ।
युद्ध करणार भीमार्जुन ।
यांसम विराट युयुधान ।
द्रुपद ऐसे महारथी. ॥ ४ ॥

धृष्टकेतु चेकितान ।
काशीराज वीर्यवान ।
पुरुजित् अतितीक्ष्ण ।
कुंति शैब्य नराधिप. ॥ ५ ॥

युधामन्यु पराक्रमी बहुत ।
उत्तमौजा वीर्यवंत ।
सौभद्रेय आणि द्रौपदीचे सुत ।
हे सर्वही महारथी. ॥ ६ ॥

१. पाठ-देहीं विदेहत्व पावला । भूतीं भेदाभेद गळाला । तो आत्मा अनुभविला । त्यातें नेणे तो एक मूर्ख जाणिजे ॥ २. पाठ-काही प्रतीत पुढील अधिकच्या ओव्या आढळतात-बहुतां जन्मांच्या अंतीं । नरदेहनिधानप्राप्ति । तें वेंचिलें विषयभ्रांतीं । तो एक मूर्ख जाणावा ॥१०९॥ स्ववर्णाश्रमीं स्वधर्मीं । वेदविहित सत्कर्मीं । निस्पृह निरहंकृति वर्मीं । नेणे तो एक मूर्ख जाणावा ॥११०॥ ब्रह्मार्पणबुद्धी हरिगुरुभजनें । वयव्यय करावा आत्मज्ञानें । हें न मानिजे ज्याचिये मनें । तो एक मूर्ख जाणावा. ॥१११॥

आम्हामध्यें जे विशिष्ठा ।
ते तूं ऐक गा ! द्विजश्रेष्ठा ! ।
माझिया सैन्यांत सुभटा ।
ते तुजलागीं सांगतों. ॥ ७ ॥

तूं आणि भीष्म कर्ण ।
कृपाचार्य नीतिसंपूर्ण ।
अश्वत्थामा विकर्ण ।
सोमदत्ती ऐसे हे. ॥ ८ ॥

आणीक ही बहुत वीर ।
माझ्यानिमित्तें मरणार ।
नाना[1] शस्त्रांचे प्रेरणार ।
सकल कुशल युद्धासी. ॥ ९ ॥

आमुची सेवा असे गाढी ।
भीष्म रक्षिताहे प्रौढी ।
त्यांची सेना बलहीन थोडी ।
भीम राखी बलानें. ॥१०॥

ठायीं ठायीं रणभूमीसी ।
जतन करावें भीष्मासी ।
तो तुम्हां समस्तांसी ।
रक्षील जाणा प्रतापें. ॥११॥

वडील भीष्म प्रतापिया ।
दुर्योधना हर्ष उपजावया ।
सिंहनाद करूनियां ।
प्रतापें[2] शंख वाजवी. ॥१२॥

मग शंख आणि भेरी ।
पणवानकें घेऊनि करीं ।
गोमुखादि गर्जिलीं एकसरीं ।
थोर नाद जाहला ॥१३॥

श्वेतवर्ण घोडे महारथीं ।
वरी पाण्डव श्रीपती ।
दिव्य शंख घेऊनि हातीं ।
वाजवीते जाहले. ॥१४॥

पांचजन्य घेतला कृष्णें, ।
देवदत्त तो वीर अर्जुनें, ।
भीम वृकोदर तेणें ।
पौंड्रशंख वाजविला. ॥१५॥

अनंतविजय गजरें ।
वाजविला युधिष्ठिरें ।
नकुलें सहदेववीरें ।
मणिपुष्पक वाजविले. ॥१६॥

काशीराज धनुर्धर ।
शिखंडी महारथी वीर ।
धृष्टद्युम्न विराट थोर ।
सात्यकी अपराजित. ॥१७॥

द्रुपद आणि द्रौपदीसुत ।
सुभद्रापुत्र विख्यात ।
हेही मिळोनी समस्त ।
वेगळाले शंख वाजवीले. ॥१८॥

तया नादाचेनि गजरें ।
दुमदुमलीं पाताळशिखरें ।
दुर्योधनासि दुःखानळ भरे ।
हृदय फुटे खेदानें. ॥१९॥

सिद्ध झाले दळभार ।
ते अवसरीं कपिध्वजवीर ।
देखोनि शस्त्रबडिवार[3] ।
धनुष्य घे हातीं वहिलें. ॥२०॥

---

१. पाठ–नाना शस्त्रां हाणणार. २. पाठ–प्रतापी शंख. ३. पाठ–शस्त्रभडिमार.

अगा राया भूपती ! ।
अर्जुन बोले अच्युताप्रती, ।
'दों सैन्यांत निगुती ।
रथ माझा नेइजे. ॥२१॥

मी पाहेन सर्वांशीं ।
युद्धउत्कण्ठा कवणाशी ।
ममहातें[1] कां मारविशी ।
या रणामध्यें केशवा ! ॥२२॥

दुर्बुद्धि कौरवपती ।
इष्ट इच्छूं आले भूपती ।
कोण कोण ते निगुती ।
पाहेन दृष्टीं रणीं मीं. ॥२३॥

अगा ! ये धृतराष्ट्रराया ! ।
ऐसें अर्जुन बोलोनियां ।
कृष्णें रथ नेऊनियां ।
दों सैन्यांत स्थापिला. ॥२४॥

भीष्म मुख्य करूनि ।
पृथ्वीचे राजे मिळोनी ।
कौरव मिळाले देखोनी ।
अर्जुन पाहे तयातें. ॥२५॥

पार्थ सकळही देखे ।
पितृव्य पितामह विशेषें ।
आचार्य भ्रातृपुत्र अनेक ।
पुत्र सखे अवघेची. ॥२६॥

श्वशुर सोयरे दों सैन्यीं ।
बंधुवर्गातें जाणोनी ।
कृपा उपजली मनीं ।
कौंतेय बोलों लागला. ॥२७॥

पाहें परम कृपेंकरून ।
विषाद पावलेंसें मन ।
युद्ध करूं इच्छिती स्वजन ।
पाहें पां श्रीकृष्णदेवा ! ॥२८॥

दुःख होतसे गात्रांसी ।
मुख शोषतें हृषीकेशी ! ।
कंप रोमांच अंगासी ।
अशी स्थिती जाहली. ॥२९॥

धनुष्य पडे हातींहून ।
त्वचा जळे संतापान ।
भ्रमतसे माझें मन ।
उभें राहूं शकेना. ॥३०॥

आपले स्वजन म्यां मारुनी ।
मज सुख व्हावें, नुपजें[2] मनीं; ।
विपरीत चिह्नें दिसती नयनीं ।
केशवराया ! पैं मज. ॥३१॥

कृष्णा ! विजयाची चाड नाहीं ।
राज्यमुखाची गोष्टी नाहीं ।
राज्यभोग सकळही ।
नलगे मज स्वामिया ! ॥३२॥

ज्यांकारणें भोग बहुत ।
आपण होतों जी ! इच्छित ।
प्राणधन टाकूनि समस्त ।
युद्धा आले सर्वही. ॥३३॥

पितृपुत्रपक्षींचे ।
वडील भीष्म आमुचे ।
द्रोण गुरू बोलिजे वाचे ।
मामे मेहुणे अवघेची. ॥३४॥

१. पाठ-मज हातें. . पाठ-नुमजे.

हे मज मारिती जरी ।
परी मीं न यांतें मारीं ।
त्रैलोक्यराज्य झालें जरी ।
पृथ्वीचा कोण केंवा ? ॥३५॥

धृतराष्ट्रपुत्र मारुनी ।
सुख न वाटे माझे मनीं ।
शस्त्रें मारितां पाप जाऊनि ।
हें केंवी घडे ? श्रीहरी ! ॥३६॥

म्हणोनियां नारायणा ! ।
न मारीं बंधूंतें जाणा ।
यांचिया आपण वधूनि प्राणा ।
सुख कैंचें मज ? माधवा ! ॥३७॥

जया वंशीं कुलक्षय जाहला ।
तयाचा कुलाचार बुडाला ।
हा विचार त्यांहीं सोडिला ।
मित्रद्रोहेंच पातक. ॥३८॥

पापापासाव परतिजे ।
ऐसें आम्हीं काय नेणिजे ? ।
कुलक्षय करितां दोष आणिजे ।
ऐसें आहे केशवा ! ॥३९॥

ज्या वंशी कुलक्षय झाला ।
त्याचा कुलधर्म बुडाला ।
धर्म गेलियावरी कुला ।
पाप अवश्य होतसे. ॥४०॥

कृष्णा ! अधर्म झालियावरी ।
दुष्ट होती कुलाच्या नारी ।
अधर्म चाललियावरी ।
वर्णसंकर होतसे. ॥४१॥

वर्णसंकर झालियावरी ।
कुल बुडे पैं अघोरीं ।
पिंडोदकक्रिया अवधारीं ।
नाहीं करावयासी. ॥४२॥

म्हणोनि कुलघ्नांचे दोष थोर ।
तेणें होय वर्णसंकर ।
बुडे कुलधर्म आचार ।
जातिधर्म तेही. ॥४३॥

अधर्म झालियावरी ।
नरकीं वास अघोरीं ।
हें आयकें श्रीहरी ! ।
स्वामी जनार्दना ! ॥४४॥

हें तंव आश्चर्य थोर ।
राज्यलोभें दोषकर ।
स्वजन मारूनि सुखकर.[1] ।
इच्छितां जी श्रीकृष्णा ! ॥४५॥

जरी निःशस्त्र मी उगला ।
रणीं मारो कोणी मला ।
मी न मारीं धार्तराष्ट्रांला ।
हो कां मज हें क्षेम. ॥४६॥

संजय म्हणे, 'राया ! ।
ऐसें अर्जुन बोलोनियां ।
धनुष्यबाण टाकोनियां ।
दुःखें बैसला असे.' ॥४७॥

—❀❀❀—

१. पाठ–सुख फार.

## अध्याय दुसरा

संजय म्हणे धृतराष्ट्रातें ।
अर्जुन वेष्टिला मोहें बहुतें ।
अश्रुपात आले नेत्रांतें ।
देखोनि बोलिला श्रीकृष्ण. ॥ १ ॥

'अर्जुना ! कश्मल कोठूनी ।
उदेलें विषमकाळीं मनीं ? ।
हें स्वर्गातें नासोनी ।
अपकीर्तीतें देईल. ॥ २ ॥

नपुंसकपण न धरीं मनीं ।
तुज योग्य नव्हे जाणोनी ।
क्षुद्र टाकीं हृदयींहुनी ।
ऊठ त्वरित युद्धासी.' ॥ ३ ॥

पार्थ म्हणे, मधुसूदना ! ।
भीष्मद्रोणांकडे वडीलपणा, ।
पूजावया योग्य जाणा ।
बाणीं कैंवी मारूं तया ? ॥ ४ ॥

गुरू वधोनि राज्य करणें ।
त्याहून बरें भिक्षा मागणें ।
वडील वधोनि भोग भोगणें ।
तें रुधिराक्त (?) भोग जाण पां. ॥ ५ ॥

अधिकउणें होईल कोणा ? ।
जयो त्यां कीं आपणां ।
कौरव मारूनियां जाणा ।
काय जीवित्व आमुचें. ॥ ६ ॥

मज देहीं असे भ्रम ।
म्हणोनि तुम्हां पुसें धर्म ।
मज मूर्खाचा असंभ्रम ।
श्रेय तें मज सांगिजे. ॥ ७ ॥

न दिसे जें ऐसें शोकनाशी ।
शोक तो शोषक इंद्रियांसी ।
पावलिया त्रिदशेंद्रलक्ष्मीसी ।
तरी सुख न पवें मी.' ॥ ८ ॥

संजय म्हणे धृतराष्ट्रासी, ।
'ऐसें अर्जुन बोलला श्रीकृष्णासी ।
युद्ध न करीं मीं तयांसी ।
म्हणूनि उगाच राहिला. ॥ ९ ॥

हांसोनिया देव ।
अर्जुनास सांगे भाव ।
विषाद सांडाया हांव ।
उपदेश करी. ॥१०॥

'अशोच्यांतें शोचणें ।
जाणिवेचें बहु बोलणें ।
गेलिया मेलियांचें दुःख करणें ।
न करितीच पंडित. ॥११॥

मज तुज रायांसी ।
गणित नाहीं जन्ममरणांसी ।
आणि पुढें सर्वांसी ।
असंख्यात जाण पां. ॥१२॥

जीव असतां देहीं ।
बाळतरुणवृद्ध हो कांहीं ।
जीव देहधारी पाहीं ।
सत्त्वधीर मोह न पावती. ॥१३॥

मात्रा तीं इंद्रियें जाण ।
विषय असती त्यांचे प्राण ।
देती सुखदुःख शीतउष्ण ।
म्हणोनि असत्य जाण पां. ॥१४॥

सुखदुःख तुल्य मानिती ।
जे सुखःदुखा न धरिती ।
ते उत्तमपुरुष होती ।
तयां मोक्ष असे. ॥१५॥

'नाहीं' तें नुपजे काहीं ।
'आहे' त्यासि अभाव नाहीं ।
दोन्हींत दोन्हीपण पाहीं ।
तत्त्वज्ञानी पाहती. ॥१६॥

आत्मा अविनाश तुवां जाणिजे ।
सर्व व्यापक असे सहजें ।
तया नाश करूं न शके दुजें ।
हें ज्ञान धरूनि शोक न करीं. ॥१७॥

देह तंव नाशवंत ।
आत्मा नाशरहित ।
ज्यासि अज्ञान म्हणिजेत ।
पार्था ! ऊठ युद्धासी. ॥१८॥

ऐसें म्हणती 'हा मारितो,' ।
दुसरा म्हणे 'हा मारवितो' ।
दोघे नेणती कोण मारिता ।
मारणें मरणें असेना. ॥१९॥

आत्मा नाशरहित ।
उपजों न लाहे निश्चित ।
हा अज नित्य पुराण शाश्वत ।
यास नाश नाहीं सर्वथा. ॥२०॥

आत्मा जाण अविनाश ।
अव्यय म्हणती तयास ।
अर्जुना ! ऐशिया जीवास ।
कवण मारूं शके ? ॥२१॥

[वस्त्रें] जीर्ण झालियावरी ।
परिधान नवीं करी ।
कलेवर त्यजुनी धरी ।
देही अन्य. ॥२२॥

शस्त्रीं न तुटे कांहीं ।
अग्नी न जाळी पाहीं ।
जळ बुडविणार नाहीं ।
वायूच्यांनें न शोषवे. ॥२३॥

बुडे न तुटे शोषे ।
जीव व्यापूनि असे ।
स्थाणुवत् अचळ दिसे ।
परिपूर्ण भरला. ॥२४॥

नकळे चित्तीं, न ये अव्यक्तीं ।
तयासि अविकार्य म्हणती ।
ऐसें जाणोनि तूं किती ।
वृथा शोक करितोसी ? ॥२५॥

जीव न उपजे न नासे ।
हें तुला ज्ञान असे ।
अर्जुना ! जाणोनि ऐसें ।
शोकासि काय कारण ? ॥२६॥

उपजलियास मृत्यू ।
मेलियास जन्म सत्यू ।
हा ऐसा अपरिहार्यू[1] ।
शोक न करीं मानसां. ॥२७॥

प्रकृतिपासोनि होती ।
मरणपर्यंत दीसती ।
मागुतीं प्रकृतीं सामावती ।
हा शोक तुज अयोग्य. ॥२८॥

---

१. पाठ–अपरिहार अर्थ.

आश्चर्यरूप कोणी देखती ।
आश्चर्य कोणी बोलती ऐकती ।
आइकोनि विसरती ।
आश्चर्य थोर. ॥२९॥

देहीं नित्यवंत पाहीं ।
जीव वधिला न वचे कांहीं ।
हा सर्व भूतांचे ठायीं[1] ।
वृथा शोक करूं नको. ॥३०॥

स्वधर्म जाणशी जरी ।
भयासि नव्हसी अधिकारी ।
धर्मयुद्धाहुनी श्रेय तरी ।
क्षत्रियां अधिक नसे.' ॥३१॥

देव म्हणे पार्थासी, ।
'दैवें आणिला रणासी ।
मुक्तस्वर्गद्वारासी ।
युद्धीं क्षत्रियां लाभू. ॥३२॥

आपला स्वधर्म सांडोनी ।
संग्राम न करिसी रणीं ।
उत्तम श्रेय हारवूनी ।
पावसी पापातें. ॥३३॥

अधर्म अपकीर्ति ।
लोक निंदा बोलती ।
तुझे शत्रू हांसती ।
तेणें[2] मरणातुल्य. ॥३४॥

भयें करूनि परतसी ।
हें कळेल रथियांसी ।
शूरीं थोरपण पावलासी ।
तेथें पावसी अपमान. ॥३५॥

बोलों नये ते बोलती ।
तव सामर्थ्य वैरी निंदिती ।
लाज होईल क्षितीं ।
हें मोठें दुःख. ॥३६॥

मेलिया स्वर्गप्राप्ती ।
वांचल्या होसील पृथ्वीपती ।
हें धरूनियां चित्तीं ।
युद्धालागीं ऊठीं गा ! ॥३७॥

सुखदुःख सम करूनी ।
लाभ अलाभ न धरीं मनीं ।
अजयो जयो सांडुनी ।
युद्ध करितां पाप नाहीं. ॥३८॥

बुद्धी सांख्यमतीची ।
सांगेन तुला मुळींची ।
तेणें तुटतील भवबंधाचीं ।
कर्मबंधनें. ॥३९॥

निष्काम कर्में करणें ।
प्रत्यवाय नव्हे बोलणें ।
थोडिया धर्मातेंनि करणें ।
महाभयें तरशील. ॥४०॥

बुद्धि निश्चयात्मिक ।
यालागीं बुद्धि एक ।
बहुभाष्य[3] बुद्धि देख ।
कामुकाचिया. ॥४१॥

वेदवाचा पुष्पित ।
स्वर्गफूल त्यजावें सांगत ।
अज्ञिया वसे निश्चित ।
फल टाकूनि कर्म करी. ॥४२॥

---

१. पाठ–पायीं. २. पाठ–तैं. ३. पाठ–बहुभागबुद्धि.

सकामबुद्धि आचरती ।
स्वर्गसुखातें पावती ।
पुण्य सरलिया अंतीं ।
पुनरपि भोगिती भोग. ॥४३॥

भोगभोग्यांत आनंद ।
कामनाहृत स्वरूपानंद ।
एकाग्रता समाध ।
तयाची हे न बुद्धी. ॥४४॥

त्रिगुणात्मक वेद जाण ।
अर्जुना ! होय तूं निर्गुण ।
सत्त्वें राहें द्वंद्व त्यजून ।
आत्मत्वीं असोनियां. ॥४५॥

स्वल्प उदकीं घडे जें कांहीं ।
तें सर्व संपादिती ऱ्हदाचे ठायीं ।
वेदशास्त्रज्ञासही ।
तें सुख ब्रह्मीं मिळे. ॥४६॥

कर्माधिकारी होऊनी ।
तें फल न धरीं मनीं ।
फलविरहित होऊनी ।
कर्म करावें. ॥४७॥

योग आचरोनी ।
कर्मफलसंग त्यजूनि ।
सिद्धिअसिद्धि सम धरूनो ।
तो अनुरागी. ॥४८॥

बुद्धियोगाहुनी हीन ।
ज्ञानयोगातें इच्छून ।
कर्म करीं फल टाकून ।
तुच्छफल. ॥४९॥

ज्ञान अंगीकारूनी ।
फलें हरपती दोनी ।
योगातें अंगीकारुनी ।
कुशल होय. ॥५०॥

म्हणोनि योगी कर्म करिती ।
फलसंगादिकें त्यजिती ।
जन्मबंधावेगळे होती ।
पद पावती अनामय. ॥५१॥

ज्ञान जाणितलिया ।
मोहसागरीं तरसी धनंजया ! ।
पाविजे तया ठाया ।
वैराग्य पावसी. ॥५२॥

श्रवणसंदेह वाटेल जरी ।
संदेह टाकूनि सांवरी ।
तर्णे पावसी अवधारीं ।
योगाभ्यास.' ॥५३॥

'स्थितप्रज्ञाची बुद्धी कैसी ? ।
योगीं वर्तणूक कैसी ? ।
योग झालिया त्यासी ।
स्थितप्रज्ञ जाणिजे.' ॥५४॥

देव म्हणे, 'पार्था ! ।
जो नातळे काममनोरथा ।
आत्मसुखीं स्थिरता ।
तो स्थितप्रज्ञ बोलिजे. ॥५५॥

दुःखें निश्चल, सुखसंगीं ।
भयक्रोध टाकूनि वीतरागी[१] ।
तो मुनि जाण जगीं ।
स्थितप्रज्ञ बोलिजे. ॥५६॥

---

१. पाठ–विरागी.

शुभाशुभ प्राप्त झालिया ।
ममत्वें न गुंते तया ठाया ।
आनंदबुद्धि तया ।
त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिली. ॥५७॥

कांसव अंग जैसें ।
हातपाय आंवरी सरसें ।
इंद्रियें आंवरूनि विशेषें ।
तया ज्ञान प्रतिष्ठिलें. ॥५८॥

निराहारी असे ।
विषयवर्जे तुटती फांसे ।
त्याची वासना असे ।
ती जातसे ब्रह्मदर्शनें. ॥५९॥

पुरुष प्रयत्नविचक्षण ।
आपण ज्ञानी असोन ।
इंद्रियें मन नेती हरून ।
कौंतेया ! जाण तूं. ॥६०॥

सर्व नेमालागुनी ।
युक्त नाहीं योगाहुनी ।
इंद्रियें वश करुनी ।
त्याचें ज्ञान प्रतिष्ठित. ॥६१॥

विषयांचें ध्यान करी ।
विषयसंगें काम अंतरीं ।
कामापासूनि क्रोध भारी ।
ऐसे हे होती निर्माण.[1] ॥६२॥

क्रोधापासूनि मोहो ।
स्मृतीचा भ्रंशो ठावो ।
स्मृति बुडलिया भावो ।
मूर्ख होतसे. ॥६३॥

रागद्वेष असे वर्जून ।
तो आत्मा वश करून ।
इंद्रियासंगें भोग भोगून ।
तो प्रसाद भोगील. ॥६४॥

प्रसाद पावलियावरी ।
सर्व दुःख होय बोहरी[2] ।
आत्मप्रसादें चित्त आंवरी ।
प्रतिष्ठा पावतो. ॥६५॥

ज्ञानाविना न सांपडे बुद्धि ।
बुद्धिविना भावशुद्धि ।
ध्यानावांचूनि शांति ।
कोठूनि ये सुख ? ॥६६॥

इंद्रियें विचरत असतां ।
आवरीना आपुलें चित्ता ।
प्रज्ञा नाशे पाहतां ।
उदकीं नाव वायुबळें. ॥६७॥

या कारणें अर्जुना ! ।
विषयापासाव करी वंचना ।
टाकी इंद्रियवासना ।
त्याची प्रज्ञा प्रतिष्ठिली. ॥६८॥

जे रात्री सर्वभूतीं ।
ते समयीं जे[3] जागती ।
जेथें[4] भूतांची जागृती ।
ते रात्री मुनींसी. ॥६९॥

संपूर्ण समुद्रीं जाण ।
तेथें उदक जाय मिळोन ।
तेंवी कामनालीन ।
शांति पावे. ॥७०॥

१. पाठ–निर्वाण. २. पाठ–बाहेरी. ३. पाठ–योगी. ४. पाठ–जेतें.

सर्व काम सांडूनी ।
संगत्यागें निस्पृह होऊनी ।
मोह अहंकार त्यजुनी ।
शांति पावे. ॥७१॥

अशा ब्रह्मीं स्थिति वर्तती ।
मोहरूप संसार न पावती ।
देहावसानीं स्मरती ।
ते मुक्त जाण.' ॥७२॥

## अध्याय तिसरा

अर्जुन म्हणे, 'कृष्णनाथा ! ।
कर्माहून ज्ञान श्रेष्ठ असतां ।
अघोरकर्मी कां अनंता ! ।
प्रवर्तवितोसि मज ? ॥ १ ॥

मिश्रितवाक्यें येणें ।
भुलविसी माझीं अंतःकरणें ।
तरी एक निश्चयेंसी सांग, ज्यार्णे ।
श्रेय पाविजेल.' ॥ २ ॥

'दों प्रकारची निष्ठा ।
पूर्वी सांगितली भारता ! ।
सांख्यमती ज्ञानदाता ।
योगियास कर्मयोग बोलिजे. ॥ ३ ॥

जे कर्मारंभ न करिती ।
ते पुरुष मोक्ष न पावती ।
कर्मे उगीच त्यजिती ।
तयांसि सिद्धी नाहीं. ॥ ४ ॥

कोणी कर्महीन नसती ।
क्षण एक कर्मे न सांडिती ।
दाटूनियां कर्म करविती ।
प्रकृतीचे गुण जाण. ॥ ५ ॥

कर्मेंद्रियांतें दंडी ।
मनकल्पना न सांडी ।
तया नाहीं विषयांची सांडी ।
म्हणोनि मूर्ख म्हणावें. ॥ ६ ॥

इंद्रियांचें दमन करी स्वभावीं ।
इंद्रियां हातीं कर्म करवी ।
कर्मफलाची आशा न धरवी ।
तोचि श्रेष्ठ म्हणिजे अर्जुना ! ॥ ७ ॥

वर्णाश्रमकर्म करीं ।
कर्म श्रेष्ठ हो ! अवधारीं ।
न करितां कर्म त्यजिसी जरी ।
देहअवसानीं सिद्धी नाहीं. ॥ ८ ॥

'यज्ञ विष्णु' ऐसी श्रुती ।
तयावेगळें कर्म अन्यत्र अर्पितां बद्ध होती ।
म्हणूनि कौंतेया ! तत्प्रीत्यर्थ देती ।
फल टाकूनि आचरें तूं. ॥ ९ ॥

ब्रह्मयानें यज्ञ आणि सृष्टी केली ।
मग आशीर्वादांचीं उत्तरें बोलिलीं ।
यज्ञकामधेनु दुहिली ।
भक्तांस्तव. ॥१०॥

तुम्ही देवांतें भावें पूजा ।
ते प्रसन्न होती सहजा ।
परस्परें तुमचिया भावें काजा ।
श्रेय देतील. ॥११॥

इष्ट भावें करूनी।
यज्ञमुखें समर्पोनी।
तें देव अंगीकारुनी।
फल देत कल्पनेचें. ॥१२॥

यज्ञशेष जे भक्षिती।
त्यांचीं पातकें जाती।
उदरार्थ पशु भक्षिती।
पाप भोगिती देख. ॥१३॥

अन्नापासूनि भूतें होती।
धान्यें पर्जन्यें निपजती।
पर्जन्य यज्ञाचेनि सुकृतीं।
यज्ञ कर्मापासुनी. ॥१४॥

कर्में ब्रह्मयापासोनी।
ब्रह्म अक्षराहूनी।
या कारणें ब्रह्मा अज्ञुनी।
नित्य कर्म करीत. ॥१५॥

ब्रह्मचक्रा प्रतिष्ठिलें।
तें जन्म पावोनि भलें।
न संपादिलें तें पापी जन्मलें।
भूभार होवोनियां. ॥१६॥

आत्मत्वीं जे राहिले।
आत्मसुखें तृप्त झाले।
स्वरूपींच समावले।
तयां कर्में न लागती. ॥१७॥

कर्म न केलिया कांहीं।
परस्परें गुंतलें नाहीं।
तैसेंच सर्वभूतांचे ठायीं।
फलेच्छा न करी. ॥१८॥

या कारणें निष्काम।
कर्म करावें सकाम।
निष्काम करावें काम।
तो ब्रह्मीं मिळे. ॥१९॥

विदेहादि जनक[1] बोलिले।
ते कर्में सिद्धी पावले।
म्हणोनि श्रेष्ठ बोलिले।
यास्तव तूं कर्म करीं. ॥२०॥

जें जें श्रेष्ठ वर्तती।
लोक तैसेंच आचरती।
जैसें ते प्रमाण करिती।
जन त्यामार्गें असे. ॥२१॥

त्रैलोक्याचे ठायीं।
पार्था! मज करणें कांहीं नाहीं।
अवाप्त पावणें नाहीं।
तरी कर्में करीतसें. ॥२२॥

जरी कर्म मीं न वर्तवीं।
तरी कर्म पडे स्वभावीं।
म्यां आचरणूक करावी।
लोक तेसेंच करितील. ॥२३॥

मी कर्म जरी न करीं।
संकर होईल अवधारीं।
लोक भ्रष्टती यापरी।
तें करणें मज नाहीं. ॥२४॥

हे लोक नेणती कांहीं।
वडिलांसारिखे वर्तती पाहीं।
म्हणऊनि श्रेष्ठीं दोनी सोई।
लोकसंग्रहार्थ धर्म कीजे. ॥२५॥

---

१. पाठ–अनेक.

ज्ञानीं एकचित्त होऊनी ।
सर्व कर्मे उत्कृष्ट करूनी ।
अज्ञानियांस कर्म आचरावें दावूनी ।
ज्ञानी स्वयें. ॥२६॥

प्रकृतिगुणांचें कार्य ।
क्रिया निपजे गुणमय ।
नेणत्या संतोष होय ।
'मी कर्ता' मानी. ॥२७॥

प्रकृतिगुण मोहिती ।
मूर्ख फळां आसक्त होती ।
ते ज्ञानियांची युक्ती ।
इंद्रियगुण. ॥२८॥

प्रकृतिचेष्टा करी माया ।
विषयीं आसक्त होऊनियां ।
मूढगती पावोनियां ।
मूर्खांसि खवळू नये. ॥२९॥

सर्व कर्मे मज अर्पी ।
चित्त आत्मयातें समर्पी ।
उदासपणें वोपीं ।
ऊठ युद्धासी. ॥३०॥

हें माझें ज्ञानमत ।
नर हृदयीं ठेवी अखंडित ।
निर्द्वंद्व करी श्रद्धायुक्त ।
तो कर्मी विमुक्त असे. ॥३१॥

हें तुला सांगीतलें ।
तें न अनुष्ठितां तामसगुणी झाले ।
ज्ञानापासोनि चेवले ।
महामूर्ख. ॥३२॥

ज्ञानी असतील जरी ।
प्रकृति चेष्टा करी ।
पंचभूतांतें अवधारी ।
तया निग्रह काय ? ॥३३॥

विषयकल्पना बहुत ।
रागद्वेषीं वर्तत ।
जे तेथें होती आसक्त ।
विषयां वश होऊं नये. ॥३४॥

आपला धर्म असोनी ।
परधर्म बरवा मनीं मानी ।
आपला धर्म टाकुनी ।
परधर्मी भय असे.' ॥३५॥

'हा कोणी प्रेरिला प्राणी ? ।
पाप आचरतो कोठुनी ? ।
वार्ष्णेया ! इच्छिल्यावांचोनी ।
बलात्कारें कोण करितसे ?' ॥३६॥

देव म्हणे, 'गा ! पार्था ! ।
हे कामक्रोध वैरी जाण निभ्रांता ।
रजोगुणापासोनि होत असतां ।
निपजती पापातें. ॥३७॥

अग्नि झांकला धूम्रमळें ।
दर्पण जैसा मळें ।
गर्भ वेष्टिला जाळें[1] ।
तैसा आत्मा अज्ञानें करूनी. ॥३८॥

तैसें ज्ञान झांकोळलें तेणें ।
म्हणोनि ज्ञानियाचा नित्य वैरी मी म्हणे ।
कामरूप देह दहनें ।
दूर करूनि त्यजिती. ॥३९॥

१. पाठ-नाळें.

इंद्रियें आणि मनबुद्धी ।
यांसि काम अधिष्ठान आधीं ।
यांतें भुलवोनि त्रिशुद्धी ।
ज्ञान लोपतसे. ॥४०॥

याकारणें इंद्रियदमना[1] ! ।
तूं नियमीं गा ! अर्जुना ! ।
जाळोनि पापकामना ।
ज्ञानविज्ञाना हित असें. ॥४१॥

इंद्रियांत श्रेष्ठ मन ।
मनाहूनि पर बुद्धि जाण ।
बुद्धिपलीकडे आत्मा जाण ।
ऐसी गती. ॥४२॥

बुद्धीनें परमात्मा जाण ।
आणि आत्मा स्थिर करून ।
वैराग्यअग्नीनें जाळून ।
काम अजिंक्य जिंतीं.' ॥४३॥

—❀❀—

## अध्याय चवथा

'हा योग कीं पूर्वीं ।
म्यां उपदेशिला रवी ।
सूर्य मनूसी दावी ।
मनूनें इक्ष्वाकुसी सांगितला. ॥ १ ॥

ऋषि परंपरा बोलिला ।
हा योग जरी ओळखिला ।
तूं भक्त म्हणूनि सांगितला ।
अति अपूर्व. ॥ २ ॥

आणि म्यां तुज बुद्धी ।
योग सांगितला अनादी ।
तूं सखा भक्त आधीं ।
म्हणोनि रहस्य सांगीतलें.' ॥ ३ ॥

पार्थ म्हणे, 'कृष्णनाथा ! ।
तुम्हां जन्म आलीकडे असतां ।
अनादि सूर्याची कथा ।
म्यां केंवी जाणावें ?' ॥ ४ ॥

देव म्हणतो[2], 'तुज मज ।
बहु जन्म झाले सहज ।
तें सर्व आठवे मज, ।
जीवत्वें तुला नाठवे. ॥ ५ ॥

अज अव्यय अवतार ।
सर्व भूतांचा मी ईश्वर ।
प्रकृति अधिष्ठान निरंतर ।
मायाधीन जन्म. ॥ ६ ॥

जे जे काळीं धर्मासी ।
स्थानभ्रष्टता होय परेसीं ।
त्या काळीं अवतरोनि त्यासी ।
दुष्टांतें मारितसें. ॥ ७ ॥

पवित्र साधु तारावे ।
दुष्टांसि नाश करावे ।
धर्मस्थापन व्हावें ।
अवतरें युगायुगीं. ॥ ८ ॥

माझें जन्म कर्म दिव्य जाण ।
तयां नाहीं जन्ममरण ।
ते खूण ज्ञानी धरून ।
ते मज पावती. ॥ ९ ॥

---

१. पाठ-इंद्रियां दमना. २. पाठ-म्हणे तो.

कामक्रोधभय त्यजिती।
माझ्या आश्रयें असती।
मम प्रसादें ज्ञान पावती।
स्वरूपीं मिळोनी. ॥१०॥

जैसे जे मजला भजती।
त्यांसि मी भजें तेच रीती।
माझे मार्गीं वर्तती।
सर्व लोक. ॥११॥

जे कर्मसिद्धी इच्छूनी।
चित्त ठेविती अन्यदेवभजनीं।
मनुष्यलोकीं क्षणीं।
सिद्धि होती सत्वर. ॥१२॥

म्यां सृजिले चारी वर्ण।
गुणकर्म विभागून।
त्यांचा कर्ता मी जाण।
परी अव्यय असें. ॥१३॥

कर्मीं जाणते पाहीं।
कीं मज कर्मइच्छा नाहीं।
ऐसे जो जाणे कांहीं।
कर्मीं तो न बांधिजे. ॥१४॥

ऐसें जाणोनि करीं कर्म।
मोक्ष इच्छूनि न करीं धर्म।
या कारणें वर्णाश्रम।
केला पाहिजे. ॥१५॥

अकर्म कर्म तें कोण?।
कर्में वोळखावीं जाण;।
आईक तें सांगेन।
अशुभांतूनि सूटसी. ॥१६॥

कर्माचें ज्ञान असावें।
विकर्म तें ओळखावें।
अकर्मा चित्त न द्यावें।
कर्मगती गहन म्हणोनियां. ॥१७॥

कर्म तेंचि अकर्म पाहे।
अकर्म तें कर्म होऊनि राहे।
मनुष्यांत बुद्धिवंत आहे।
जो सर्वज्ञ सर्वकर्ता. ॥१८॥

सर्व कर्मारंभ करी।
कामना त्यजूनि अवधारी।
ज्ञानाग्नीनें[1] दाहकारी।
म्हणती तोचि पंडित. ॥१९॥

फलेच्छा त्यजी।
तृप्त असोनि निराश्रयो जी!।
प्रकृतिकर्मीं सहजीं।
न बाधिजेल. ॥२०॥

शरीरचित्त स्ववश करिशी।
आशापरिग्रह टाकिशी।
शरीरें कर्म करिशी।
असा न पावे बंधातें. ॥२१॥

सुखदुःखातें न धरी।
लाभालाभीं चाड न करी।
द्वंद्वातीत विचारी।
तो बंध न पावे. ॥२२॥

कर्तृत्वापासूनि मुक्त।
अखंड स्वरूपीं जयाचें चित्त।
यज्ञार्थ कर्म आचरत।
तेणें तें पावत लयातें. ॥२३॥

१. पाठ–दाह करी.

कर्ता, हव्य आणि अग्नि ।
होम, ब्रह्म जाणोनि ।
कर्मब्रह्मसमाधि लावुनी ।
ब्रह्मींच पावे. ॥२४॥

इंद्रातें भावेंचि यज्ञ ।
कर्मयोगी उपासिती जाण; ।
ब्रह्माग्नींत चित्त मन ।
ज्ञानी यज्ञरीतींच[1] होमिती. ॥२५॥

श्रोत्रादि ज्ञानेंद्रियें ।
संयमाग्नीं होमिती तयें ।
शब्दादिक विषये ।
इंद्रियाग्निषु[2] होमिती. ॥२६॥

इंद्रिय कर्मप्रधान ।
कर्म सर्वांसि जाण ।
संयमाग्नींत होमून ।
निरोधाग्नींत होमिती. ॥२७॥

एक द्रव्य वेंचिती ।
त्रिविध तप करिती ।
एक योगातें अनुष्ठिती ।
स्वाध्याय यज्ञ. ॥२८॥

अपान होमिती प्राणीं ।
अपानीं प्राण अर्पुनी ।
हठयोग हा जाणोनी ।
यत्नें यज्ञफल पावती. ॥२९॥

अल्प नेमूनि आहारें ।
प्राणीं प्राण नेमिती खरे ।
हठयोगी निर्धारें ।
यत्नेंचि यज्ञफल. ॥३०॥

यज्ञशेष जे भक्षिती ।
अमृतपानें ब्रह्म पावती ।
यज्ञशेष जे न करिती ।
तयां नाहीं परलोक. ॥३१॥

ऐसे बहु विस्तारले ।
यज्ञ ब्रह्म झाले ।
सर्व कर्म विस्तारलें ।
हें उमजल्या सूटसी. ॥३२॥

सांगीतला द्रव्ययज्ञ ।
ब्रह्मार्पण हुतयज्ञ[3] ।
लौकिक वैदिक यज्ञ ।
ज्ञानीं हे सर्व संपती. ॥३३॥

रिघावें सद्गुरूसी शरण ।
करावें पादसेवन ।
मग ते तुज उपदेशिती ज्ञान ।
तेणें पावन होशील. ॥३४॥

ऐसें ज्ञान जाणितल्यावरी ।
मग मोह न पावसील संसारीं ।
आत्मरूप देखसी चराचरीं ।
ऐक्यतंत्री. ॥३५॥

सकळ पापियांमाझारी ।
थोर पातकी तूं अससी जरी ।
तरी या ज्ञाननावेंत निर्धारीं ।
तरसी पापसागर. ॥३६॥

जैसें महाभार इंधन ।
भस्म होय अग्निसंगें जाण ।
सर्व कर्में जाळून ।
ज्ञानाग्नी भस्म करी. ॥३७॥

१. पाठ–यज्ञरीतींत. २. पाठ–इंद्रियाग्नींत. ३. पाठ–बहुत यज्ञ.

ज्ञानासारिखें पवित्र ।
आणीक नाहीं सर्वत्र ।
तें ज्ञान सिद्धियोग करितां निरंतर ।
ज्ञानेंकरूनि पाविजे. ॥३८॥

ज्ञान पाविजे भक्ति करूनि ।
इंद्रियें नेमिजे तत्पर होऊनी ।
ज्ञाननिष्ठा पावोनी ।
थोरत्व पावती. ॥३९॥

श्रद्धाहीन ज्ञानहीन ।
तो संशयबुद्धी जाण ।
त्या दोन्हीं लोक नाहीं जाण ।
सुख त्या नसे. ॥४०॥

कर्मयोगातें करिती ।
जे शास्त्रें मुक्त होती ।
आत्मज्ञानातें पावती ।
धनंजया ! ॥४१॥

या कारणें अज्ञान ।
हृदयीं उपजे संशय करून ।
तें ज्ञानें तोडून ।
योग करीं.' ॥४२॥

—×*×—

## अध्याय पाचवा

पार्थ म्हणे, 'श्रीकृष्णनाथा ! ।
संन्यासकर्म सांगतां ।
कर्म कीं संन्यास तत्त्वता ।
निश्चय सांग.' ॥ १ ॥

श्रीकृष्ण म्हणे, 'पार्था ! ।
कर्मसंन्यास दोन्ही उभयतां ।
फल एक दोहींचें विचारितां ।
परंतु कर्म श्रेष्ठ. ॥ २ ॥

असा जाणावा 'संन्यासी' ।
इच्छाद्वेष नसे मानसीं ।
द्वंद्व तोडोनि पावे ज्ञानासी ।
बंधापासोनि मोकळा. ॥ ३ ॥

सांख्ययोग दोन्हीं ।
हे वेगळे म्हणती ज्ञानी ।
पंडित म्हणती जनीं ।
दोहींचें फल एक. ॥ ४ ॥

सांख्यें जें स्थान पाविजे ।
योगानें ते स्थळीं जाइजे ।
सांख्ययोग जाणिजे ।
तोचि जाणता. ॥ ५ ॥

ऐसा संन्यास न जाणिजे ।
कर्माविण केंवि पाविजे ।
कर्मयोगें जाइजे ।
ब्रह्मलोकीं. ॥ ६ ॥

योगकर्म केलिया ।
शुद्धत्व होय आत्मया ।
जितेंद्रिय विषयां ।
करूनि अलिप्त जो. ॥ ७ ॥

कर्म करूनि म्हणती नाहीं ।
देखणें आइकणें पाहीं ।
गंध भोजन निद्रा गमन तेंही ।
श्वास टाकणें ही आठ. ॥ ८ ॥

बोलणें आणि घेणें देणें ।
पातें पातया लावणें उघडणें ।
हा[1] इंद्रियें व्यापार करणें ।
ऐसें मानूनि वर्तती ॥ ९ ॥

ब्रह्मार्पण कर्म करी ।
संग त्यजूनि असे निर्धारीं ।
पापें न लिंपे ऐशिया परी ।
पद्मपत्र उदकीं जैसें ॥१०॥

कर्मफलाची इच्छा त्यजुनी ।
शांतीनिष्ठा पावे मनीं ।
कायामनेंयुक्त आचरोनी ।
फल टाकुनी कर्म करी. ॥११॥

ज्ञानी मुक्तीतें पावती ।
कर्म करूनि फलेच्छा टाकिती ।
कामनाबंधें पडती ।
ते बद्ध होत. ॥१२॥

मनें करूनि कर्में जो त्यजी ।
ज्ञानी त्यास म्हणिजे जी ! ।
देही नवद्वारपुरीं जी ! ।
न करी, न करवी ॥१३॥

ईश्वर नाहीं कर्म करित ।
कर्तृत्व या लोकांत ।
न कर्मफलभोगातें ।
संसारचक्र असे. ॥१४॥

कोणाचें पाप न घे जाण ।
पुण्याचें नलगे कारण ।
अज्ञानें वेष्टिले जन ।
त्याणें भोग भोगिती. ॥१५॥

अज्ञान गेलियावरी ।
ज्ञान प्रगटवी अंतरीं ।
तो[2] ईश्वररूप निर्धारीं ।
ज्ञानवंत जाण तूं. ॥१६॥

जो मन आणि बुद्धीतें ।
ईश्वरीं स्थापी निश्चितें ।
भय नाहीं तयातें ।
मुक्त होय. ॥१७॥

विद्याविनयसंपन्न ।
गायगजसूकरश्वान ।
हे जयासि सम जाण ।
तोचि ज्ञानी पंडित ॥१८॥

सम ज्यांचे जीवीं वसे ।
त्यांहीं संसार जिंकिलासे ।
निर्दोषही वसतसे ।
ब्रह्मीं तो सम. ॥१९॥

सुख झालिया हर्ष नाहीं ।
दुःख झालिया क्रोध नाहीं ।
बुद्धी करूनि स्थिर तेही ।
ते ब्रह्मीं पावती ॥२०॥

बाह्यसुखातें त्यजी ।
हृदयीं आत्मसुख जाणोन जी ! ।
ब्रह्मसुखीं निरंतर जी ! ।
अक्षयसुख भोगी. ॥२१॥

स्पर्शे संसार गरलसार ।
तें दुःखाचें मूळ निरंतर ।
नाश होत अपार ।
कौंतेया ! ज्ञानी सुखी. ॥२२॥

---

१. पाठ–ही. २. पाठ–तों ईश्वरस्वरूपी.

योगियातें हा योग ।
कामक्रोधांचा वेग ।
साहूं सके सांग ।
तो योगी सुखी असे. ॥२३॥

ज्याचें हृदय प्रकाशे ।
अंतरसुख आराम भासे ।
तोचि योगी असे ।
ब्रह्मीं निर्वाण पावतो. ॥२४॥

प्राणी पाप टाकीत ।
ब्रह्मीं जे लीन होत ।
त्यांचें सुख त्यांचे हृदयांत ।
सर्वभूतहितरत असे. ॥२५॥

कामक्रोधविरहित ।
आत्मा जाणोनि वश करित ।
तोचि ज्ञानवंत म्हणत ।
ब्रह्मात्मवित्. ॥२६॥

बाह्य विषय संसार ।
त्यजोनि, दृष्टी भोवयांवर ।
प्राणायाम समकर ।
प्राण अपान सम करूनियां. ॥२७॥

इंद्रियबुद्धिमन जिंकिलें ।
मुक्तीसाठीं मन घातलें ।
इच्छाभयक्रोध त्यजिले ।
मुक्तपद पावला. ॥२८॥

जपतप यज्ञांचा भोक्ता ।
सर्वलोकांत ईश कर्ता ।
शांति पावे जाणता ।
सर्वांचा सखा जाण मीं.' ॥२९॥

—×०×—

## अध्याय सहावा

,कर्माचें फल' नापेक्षितां कर्मकरी।
तोचि संन्यासी योगी अवधारीं ।
जो साग्निककर्माचा अधिकारी।
तो कर्मयोगी नव्हे. ॥ १ ॥

ज्यातें संन्यासी म्हणती ।
तो योग जाणें निश्चितीं ।
संकल्प न टाकिला किरीटी ! ।
तो योगी नव्हे. ॥ २ ॥

योगारूढ जो इच्छित ।
तया कर्म हें निभ्रांत ।
योग पावल्या शांत ।
शमबुद्धि तोची. ॥ ३ ॥

इंद्रियार्थी झाला हीन ।
कर्म निपजों राहे आपण ।
तयासि संन्यासी म्हणोन ।
योगारूढ बोलिजे. ॥ ४ ॥

निज आत्मा उद्धरत ।
उद्योगावांचूनि मन ठेवित ।
आपला शत्रु आपण जाणत ।
मित्र आपुलें चित्त पैं. ॥ ५ ॥

बंधुरात्मा चित्त जिंतोनि ।
तें चित्त बंधू जाणोनि ।
स्वरूपीं वोळखी नाणी ।
चित्त शत्रुवत् वर्ते. ॥ ६ ॥

मन जिंकोनि शांति पावे ।
तया परनिष्ठा जाणावें ।
ऐसियासि सुखदुःख न पावे ।
तैसेंच मानापमान. ॥ ७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्त झाले ।
अविनाश विषय गेले ।
जयां[1] सुवर्णमृत्तिका हें नकळे ।
ते योगी जाण तूं ॥ ८ ॥

सोयरे बंधु मित्रजन ।
वैरी, सखा, उदासीन ।
यांतें मानी समान ।
तो समबुद्धी ॥ ९ ॥

योगी एकांतीं बैसोनी ।
असावें रहस्य ध्यानीं ।
चित्त आत्मा जिंतोनी ।
टाकी आशापरिग्रह. ॥१०॥

पवित्र शुद्धदेशीं जाण ।
स्थिर करावें आसन ।
उंचनीच नसावें जाण ।
कुशचर्मवस्त्र आंथरोनी. ॥११॥

मन इंद्रियें चित्त नेमुनी ।
बैसावें तये आसनीं ।
आत्मशुद्धी व्हावया लागोनी ।
योग करावा. ॥१२॥

काया सम करोनि कटि हनवटी ।
दृष्टि दीजे नासापुटीं ।
स्थिर कीजे श्वासाची परिपाटी ।
दिशाअवलोकन न करावें. ॥१३॥

निर्मळ मनें करूनी ।
निर्भय मनीं होऊनी ।
ब्रह्मचर्य आचरोनी ।
मज सांनिध्य होइजे. ॥१४॥

चित्त ठेवीं माझे ठायीं ।
मी निजवस्तू पाहीं ।
समाधि होऊनि राहीं ।
मज तत्पर अर्जुना ! ॥१५॥

सदा मन लक्ष्यीं असतां ।
नये बहु खातां ।
उपोषण न करितां ।
न जागतां अर्जुना ! ॥१६॥

अति आहार नसावा ।
कर्मी बोध असावा ।
बुद्धिवंतें साधावा ।
योग दुःखनाशक. ॥१७॥

युक्त आहार स्वल्प ।
कर्मचेष्टा करी अल्प ।
सुषुप्ति असे नेमस्त ।
सिद्ध तेव्हां खरा. ॥१८॥

चित्त नेमिलें असे ।
केवळ आत्माचि दिसे ।
निर्वातसदनीं दीप असे ।
तैसी उपमा योगियासी. ॥१९॥

चित्त नेमिलें असे ।
आत्मा केवळ दिसे ।
जेथें आत्मा वसे ।
संतोष पाहे. ॥२०॥

---

१. पाठ–तयां.

अतिसुख जें अनुभवें करूनी ।
इंद्रियां अगोचर, बुद्धिज्ञानें जाणोनी ।
जो स्थिर दृढ आपुले मनीं ।
तो न चळे कांहीं निश्चित. ॥२१॥

यापरता आणिक लाभ नाहीं ।
त्याहून अधिक न मानी कांहीं ।
राहूनि सुखाचे ठाहीं ।
अत्यंत दुःख न चळे. ॥२२॥

जेथें दुःखसंबंध नाहीं ।
तोचि योग जाणावा निश्चित पाहीं ।
वैराग्ययुक्त अंतःकरण करूनि राहीं ।
योगाभ्यासीं. ॥२३॥

संकल्पमात्रेंचि झाले ।
काम ते सर्व टाकिले ।
मनें इंद्रियग्राम धरिले ।
दंडूनियां सर्वत्र. ॥२४॥

बुद्धि करूनि धारणेनें ।
हळुहळु स्थिर करीं मन ।
चिन्मात्रीं योजीं चित्तालागून ।
मन कांहीं चिंतूं नये. ॥२५॥

मन चंचल, नाहीं स्थिर ।
धांवे सैराट, न धरी धीर ।
तया आंवरोनि, विचार ।
राहे आत्मतत्त्वीं. ॥२६॥

अंतःकरण ज्याचें शांत ।
त्या योगिया सुख अत्यंत ।
रजोगुणें मुक्त ब्रह्मभूत ।
ऐशिया प्रशांती. ॥२७॥

सदा आत्मचिंतन करितां ।
योगी किल्बिषें जिंती तत्त्वतां ।
सुखेंचि ब्रह्मीं सायुज्यता ।
अनंत सुख पावतो. ॥२८॥

आत्मत्वें सर्व भूतें देखे ।
सर्वात्मा आपण कौतुकें ।
योगयुक्त आत्मा देखे ।
सर्वत्र समान तया. ॥२९॥

मज सर्वांठायीं वोळखे ।
मी सर्वत्र त्यास देखें ।
माझे निमित्तें सुखें ।
मी त्याचा तो माझा पैं. ॥३०॥

सर्वभूतीं जो आत्मत्वें भजत ।
तो सर्वथा संसार नाहीं वर्तत ।
मजवेगळें नाहीं होइजेत ।
तोचि मीं असें. ॥३१॥

आपलें सुखदुःख सर्वत्र ।
जे देखती जीवमात्र ।
ते योगी परम पवित्र ।
ते थोर मम संमत.' ॥३२॥

पार्थ म्हणे,'योग सांगीतला ।
देवा ! नाहीं तो म्यां पाहिला ।
चंचल मन याला ।
निग्रह केंवि घडे ? ॥३३॥

मन चंचल बहु, कृष्ण ! ।
इंद्रियांहूनि बळकट गहन ।
वायूचे परी जाय घेवोन ।
त्याचा निग्रह दुष्कर असे. ॥३४॥

'खरेंचि सांगतां अर्जुना ! ।
मन चंचल आवरेना ।
अभ्यासवैराग्यें जाणा ।
जिंकिलें जातें. ॥३५॥

ज्याचें अंत करण स्थिर नाहीं ।
तो दुःखेंकरूनि योगासि न पवे कांहीं ।
ज्यास आत्मा वश्य झाला पाहीं ।
तो उपायें योगासी पावे सत्य. ॥३६॥

पार्थ म्हणे, 'कृष्णनाथा ! ।
भक्तियुक्त होवोनि प्रयत्न करितां ।
योगी चळोनि सिद्धि न पावतां ।
कोण गती पावे ? ॥३७॥

मूढपणें न पावतां ।
उभयभ्रष्ट तो तत्त्वतां ।
याची गती विचारितां ।
नामे जैसें अभ्र दिसे वितळे.' ॥३८॥

पार्थ म्हणे, 'कृष्णा ! ।
हा संशय छेदेना ।
तुजवांचूनि दीनजना ।
न दिसे संशयपरिहरिता.' ॥३९॥

देव म्हणे, 'योगाभ्यासी नाहीं ।
ऐसें कवणासी घडलें नाहीं ।
मोक्षमार्गी चालतां कांहीं ।
दुर्गती न जाय. ॥४०॥

पुण्यश्लोक स्वर्गवासी ।
वर्षें बहुत स्वर्गासी ।
शेवटीं श्रीमंताचे कुशी ।
जन्म घेणें. ॥४१॥

योगियांचे कुळीं जन्मोन ।
आपुल्या पुण्यें करून ।
लोकीं दुर्लभ होऊन ।
या लोकीं; हे रीती. ॥४२॥

तया जन्मीं पूर्वदेहबुद्धी ।
तो मोक्षप्रयत्न करी बोधीं ।
ज्ञानाभ्यासबळें सिद्धी ।
साधी, हे कुरुनंदना ! ॥४३॥

पूर्वी अभ्यासाचा धडा ।
म्हणोनि योग स्मरला पुढां ।
योगाचा विचार गाढा ।
वेदांतें अतिक्रमी. ॥४४॥

ज्ञान प्रयत्न करी ।
पाप दोष होती दुरी ।
मग जन्मांतरीं ।
मुक्ति पावे. ॥४५॥

तपस्वियांहूनि अधिक ।
ज्ञान्यांहूनि संमत असे एक ।
कर्मियांहूनि अधिक ।
यास्तव योगी होय तूं. ॥४६॥

योगीश्वरांमाझारी ।
अंतःकरण ठेवी निर्धारीं ।
तो भक्त अवधारीं ।
तो योगी मज मानला.' ॥४७॥

—× ×—

## उपासनाकांड

## अध्याय सातवा

'अर्जुना ! अवधारीं ।
मन माझे ठायीं ठेवोनि योग करीं ।
तुझे संशय नासतील जयापरी ।
तें सांगेन आतां. ॥ १ ॥

ज्ञान विज्ञानसहित ।
तुज सांगेन समस्त ।
जें जाणितलिया निश्चित ।
जाणणें न उरे. ॥ २ ॥

मनुष्यांचिया सहस्रांमध्यें ।
सिद्धीतें पावती एखादे ।
ऐसिया सिद्ध सहस्रांमधें ।
मज जाणे एखादा. ॥ ३ ॥

पंचभूतें मन बुद्धि श्रेष्ठ ।
ऐसीं हीं अहंकार आठ ।
ऐसी प्रकृति जुनाट ।
असे वेगळाली. ॥ ४ ॥

यांहींहुनी आणीक असे प्रकृति ।
जीवभूतां[1] ते महाबाहो ! धरिती ।
उत्पत्तिप्रलयस्थिती ।
तयामाजी. ॥ ५ ॥

सर्वभूतांची योनी ।
वर्ते तया अधिष्ठुनी ।
सती झाली मजपासुनी ।
सर्वांचें उत्पत्तिप्रळयस्थान मी असें. ॥ ६ ॥

यापरतें कांहीं ।
अर्जुना ! दुसरें नाहीं ।
मीच अवघे ठायीं ।
जैसा सूत्रीं मणी, पटीं तंतू. ॥ ७ ॥

सर्व रसांची गोडी ।
चंद्रसूर्य माझी प्रौढी ।
पुरुषीं पुरुषत्वाची गाढी ।
ॐकार तो वेदीं जाण मी. ॥ ८ ॥

मी पृथ्वीचा गंधविषय ।
अग्नींत जठराग्नी मीं होय ।
जीवांचा जीवनठाय ।
तापसीयांत तप मी. ॥ ९ ॥

सर्वभूतांचें बीज मी होऊन ।
सर्व वर्तणूक मजपासून ।
बुद्धिवंताची बुद्धि आदिकरून ।
तेजस्वियांचें तेज मीं. ॥ १० ॥

बलवंताचें जें बळ ।
कामरागविवर्जित सकळ ।
धर्माविरुद्ध भूतीं मी केवळ ।
काम तो मीच जाण. ॥ ११ ॥

सात्त्विकराजसतामस भाव ।
मजपासूनि झाले सर्व ।
तें मज आधीन आहे तत्त्व ।
तयांमाजी मी नाहीं. ॥ १२ ॥

त्रिगुण मजपासोनि झाले ।
तथूनि हें विश्व रचिलें ।
तेणें भुलोनि, मज चुकले ।
नेणती परम अव्यय. ॥ १३ ॥

माझी माया हे त्रिगुण ।
त्यजावया अशक्य जाण ।
जे करिती माझें भजन ।
मम मायेतें ते तरती. ॥ १४ ॥

पापी मूर्ख जाण ।
मज नेणती अधम जन ।
मायेनें हरपलें ज्ञान ।
असुरभाव पावले. ॥ १५ ॥

---

[1]. पाठ–जीवभूतांतें.

लोक चतुर्विध भजती मज ।
जे नर आहेति सुकृतांचें बीज ।
तत्त्व इच्छिती सहज ।
दुःखी, अर्थकामी, जिज्ञासु, ज्ञानी. ॥१६॥

त्यांमध्यें नित्ययुक्त म्हणोनी ।
मम मत श्रेष्ठ ज्ञानी ।
ज्ञानियासि आवडें म्हणोनी ।
ज्ञानी तो मज प्रिय. ॥१७॥

सर्व हे उदार असती ।
त्यांमाजी ज्ञानी ते माझा आत्मा होती ।
म्हणूनि आश्रयें असती ।
माझिया ते सुखें. ॥१८॥

बहुत जन्म कष्टोनी ।
ज्ञान पावे कृपेकरूनी ।
वासुदेव सर्व जाणोनी ।
तो मज, ऐसा दुर्लभ. ॥१९॥

अभिलाषें ज्ञान गेलें ।
अन्यदेवता भजों लागले ।
स्वप्रकृतीवश झाले ।
त्या त्या नेमें करूनियां. ॥२०॥

जे ज्यां देवातें भजती ।
श्रद्धेनें सिद्धी इच्छिती ।
तयांची मनकामना तृप्ती ।
त्या देवतेनें मी करीं. ॥२१॥

श्रद्धेकरूनि अन्य देवतीं ।
त्यांची आराधना करिती ।
जे इष्टकामना पावती ।
तयां अचळश्रद्धा मीच असें. ॥२२॥

हीनबुद्धि मागती ।
ते नाशवंत फळ पावती ।
जयांचें भजन तयां तेचि गती ।
मज भजती ते पावती. ॥२३॥

मातें कोणी नेणती ।
अव्यक्त व्यक्तीं आलें म्हणती ।
माझा उत्कृष्टभाव नेणती ।
मूढपणें. ॥२४॥

मी सर्वांस प्रगट नाहीं ।
योगमायेनें वेष्टिलें पाहीं ।
अज अव्यय असोनही ।
मूढ नेणती. ॥२५॥

पूर्वी जीं झालीं भूतें ।
आतां वर्तमान जीं वर्ततें ।
भविष्यही मज कळतें ।
मला कोणी नोळखें कीं. ॥ ६॥

इच्छाद्वेषापासून ।
द्वंद्वमोह उपजला तथून ।
ते भूतसृष्टीचे आदि जाण ।
मोहातें पावती, अर्जुना ! ॥२७॥

ज्यांचें पाप गेलें ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्त झाले ।
माझे भजनीं निघाले ।
दृढबुद्धी करूनियां. ॥२८॥

जरामरणनाशार्थी ।
आश्रयें मम यत्न करिती ।
ते ब्रह्म जाणती ।
कर्म अध्यात्म अवघें. ॥२९॥

आधिभूत आधिदैवत माझे ठायीं ।
जाणती यज्ञवेत्ते यज्ञासही ।
मरणकाळीं मज जाणितलें पाहीं ।
ते योगयुक्त झाले.' ॥३०॥

—××—

## अध्याय आठवा

पार्थ म्हणे, 'पुरुषोत्तमा ! ।
कैसा निवाडा कर्मब्रह्मा ? ।
अधिभूत अधिदैवत आम्हा ।
निवडूनी सांगिजे. ॥ १ ॥

अधियज्ञ कसा ? कोण ? ।
देहांत वोळखावा कवण ? ।
अंतकाळीं तूं मधुसूदन ! ।
यतच्चित्तीं केंवि जाणिजे ?' ॥ ॥

अक्षर तेंचि ब्रह्म ।
सद्भाव तोचि अध्यात्म ।
भूतभावांचें विसर्गकर्म ।
तें कर्म जाणिजे. ॥ ३ ॥

अक्षर तें अधिभूत ।
जीवात्मा अधिदैवत ।
आदि अनंत सर्वांत ।
अधियज्ञ देहीं मी. ॥ ४ ॥

अंतकाळीं मज स्मरोनी ।
जो जाय कलेवर टाकोनी ।
तो पावे मज लागूनी ।
येथें नाहीं संशय. ॥ ५ ॥

ज्या ज्या भावें स्मरतां ।
होय देह त्यजिता; ।
त्यांतें[1] पावे, कुंतीसुता ! ।
सदा तद्भाव म्हणोनियां. ॥ ६ ॥

यास्तव मज सर्वकाळीं उच्चारीं, ।
मज स्मरोनियां युद्ध करीं; ।
माझे ठायीं मनबुद्धि दृढ धरीं ।
तेणें मज पावसी निश्चित. ॥ ७ ॥

अभ्यासयोगें करून ।
चित्त अन्यत्र न करी गमन ।
स्थिर चित्त झालिया जाण, ।
पार्था ! ते परमपुरुषातें पावती. ॥ ८ ॥

कवि आणि पुराण ।
लोकशिक्षा करी जाण ।
सर्वउत्पत्तिकारण ।
सूक्ष्माहूनि सूक्ष्म; ॥ ९ ॥

ऐसा जो अंतकाळीं ।
मन चंचळ करी ते वेळीं ।
भक्तियोगें तो बळी ।
प्राणं भ्रकुटीभेदी, परमपुरुषातें पावे. ॥ १० ॥

ज्यास अविनाशपद ज्ञान बोलती ।
जें इच्छूनि ब्रह्मचर्य आचरिती ।
तयातें संन्यासी विरक्त होवोनी पावती ।
तें संक्षेपें सांगेन मी ॥ ११ ॥

सर्व द्वारें रोधूनी ।
मन हृदयीं ठेवूनी ।
प्राण मस्तकासि नेऊनी ।
अनुष्ठिती योगी योग. ॥ १२ ॥

ॐमिति ब्रह्म उच्चारितां ।
माझें स्मरण करितां ।
जो होय देह त्यजिता ।
तो पावे परमगतीस. ॥ १३ ॥

चित्त ठेविजे माझे ठायीं ।
जे मज ध्याती नित्य पाहीं ।
तयां मी सुलभ होई ।
योगयुक्त म्हणूनि पार्था ! ॥ १४ ॥

---

[1] पाठ-त्या त्या भावें.

योगयुक्त जे पावले मज।
तयांसि पुनर्जन्म नाहीं सहज।
ऐसें हें आहे चोज।
थोरगती पावल्याचें. ॥१५॥

जे ब्रह्मलोकादि करून।
तयां असे मागुती पतन।
मज पावल्या अर्जुना ! जाण।
जन्मा नये मागुता. ॥१६॥

सहस्रयुगपर्यंत।
ब्रह्मयाचा दिवस होत।
तैसाच रात्रीचा संकेत।
ही अहोरात्रिज्ञानी जाणती. ॥१७॥

अव्यक्त जे असती।
ते ब्रह्मदिवसा व्यक्त होती।
रात्रि झालिया प्रळय पावती।
अव्यक्ताचे ठायीं. ॥१८॥

ही पंचभूतांची सृष्टी।
उपजे जाय पुढतपुढती।
नाश पावे ब्रह्मदिनांतीं।
पुन्हा दिवसीं उत्पत्ति होय, अर्जुना ! ॥१९॥

मायेपासूनि ईश्वर।
अव्यक्त व्यक्त नित्य स्थिर।
सर्वभूतांत निरंतर।
तो न नाशे, जग नासतां. ॥२०॥

अव्यक्त अक्षर ऐसें बोलती।
तीच माझी परमगती।
तेथें पावलिया पुढती।
तयां जन्म नाहीं. ॥२१॥

तो परमपुरुष जाण गा ! पार्था !।
तया भक्ति पाविजे तत्त्वतां।
भूतीं प्रपंच निरुता।
ज्यानें जग व्यापिलें. ॥२२॥

ज्या काळीं योगी मरण पावोनी जन्मा नयेती।
आणि मरण झालिया पुनरावृत्ती होती।
तें सकळ अर्जुना ! तुजप्रती।
सांगेन मी. ॥२३॥

दिवस आणि शुक्लपक्षदैवत अग्नी।
षण्मास उत्तरायण जाणोनी।
तेथें जाती, देह त्यजुनी,।
तें ऐक्य होती ब्रह्मीं जाण. ॥२४॥

कृष्णपक्ष, रात्री, धूम, जाण।
दैवत एक दक्षिणायन।
योगी जे त्यजितीं प्राण।
त्यां पुनरावृत्ति होय. ॥२५॥

शुक्लकृष्ण या दोनी गती।
ज्ञान अज्ञान यांसि म्हणती।
एक गतीपासूनि होय मुक्ती।
एकेंकरून जन्म धरी. ॥२६॥

दोन्ही आहेत सृती।
यांस योगी जाणती।
ते मोहातें न पावती।
यास्तव योगयुक्त होय; अर्जुना ! ॥२७॥

वेदयज्ञतपदान।
यांचें जें बोलिजे पुण्य।
ज्या असे शुक्लकृष्णगतीचें ज्ञान।
तो पुण्यवंत परमगतीतें पावे.' ॥२८॥

—××—

## अध्याय नववा

अर्जुनासी म्हणे कृष्ण, ।
'हें गुह्य असे परमपावन ।
तूं भक्त माझा म्हणोन ।
सांगेन ज्ञानविज्ञानसहित. ॥ १ ॥

गुह्य राजविद्या जाण ।
उत्तम तें पवित्रपण ।
हें प्रत्यक्ष धर्म जाण ।
सुख देतसे नाशरहित. ॥ २ ॥

या धर्मीं श्रद्धा नाहीं ।
तो मज न पवे कांहीं ।
जन्मसंसारीं वर्ते पाहीं ।
जीवरूपें. ॥ ३ ॥

मी सर्व जगाचे ठायीं ।
व्यापक सर्वभूतीं पाहीं ।
सर्वभूतें माझे ठायीं ।
मज आश्रयो नसे. ॥ ४ ॥

माझे ठायीं न राहती भूतें ।
माझें ऐश्वर्य तें निरुतें ।
भूतांतें मी धरीं आरुतें ।
भूतांवेगळा असोनी. ॥ ५ ॥

वायू सर्वांचे ठायीं ।
अव्यक्तमूर्ति पाहीं ।
भूतें सर्व माझे ठायीं ।
वायूचे परी. ॥ ६ ॥

सर्वभूतें अर्जुना ! ।
प्रकृतीतें पावती जाणा ।
कल्पांतीं सांठवून ।
कल्पादीं सृजीं मी. ॥ ७ ॥

प्रकृतीचे बळें करूनी ।
सृजीं मागुतेमागुतेनी ।
हा सर्व भूतग्राम आदिकरोनी ।
प्रकृतीचे आधीन असती. ॥ ८ ॥

म्हणोनि कर्म तयांचिया ।
मला न बाधे धनंजया ! ।
उदास होऊनियां ।
आसक्त तेथें नव्हें. ॥ ९ ॥

प्रकृति माझ्या अधिष्ठानें करून ।
चराचरातें प्रसवे जाण ।
याकारणें हे अर्जुन ! ।
जगास जन्ममरण होतसे. ॥१०॥

मज मनुष्य मूढलोक म्हणती ।
मनुष्यांची अज्ञानगती ।
मी ईश ऐसें नोळखती ।
ते मूर्ख जाण पैं. ॥११॥

या पुरुषांची आशा निष्फळ ।
तैसेंच कर्म आणि ज्ञान चंचळ ।
त्यांची गति न निर्मळ ।
राक्षसीआसुरी मोहिनी योनी पावती. ।१२॥

महासुबुद्ध निगुती ।
अर्जुना ! ते सदाश्रित होती ।
मनोभावें तत्पर असती ।
अंती एक म्हणोनियां. ॥१३॥

माझें कीर्तन सदा करी ।
हेंच व्रत मनीं दृढ धरी ।
आणि भक्ति उपासना करी ।
मन तत्पर होवोनी. ॥१४॥

कितीएक ज्ञानयज्ञें करून ।
माझी उपासना करिती जाण ।
पृथकत्वें एक जाणून ।
मी विश्वतोमुखी. ॥१५॥

मीच याग, आणि यज्ञ करणें ।
मीच स्वधाकर, औषधी जाण ।
मंत्र, आज्य आणि अग्नि आदिकरून ।
हुत मीचि असें. ॥१६॥

मी जगाचा मातापिता ।
मी पवित्र ॐकार असें तत्त्वता ।
चहूं वेदांचा वक्ता ।
तो मीच असें. ॥१७॥

मी गती, साक्षी, पोषक ।
समस्तां स्थान एक ।
अधिष्ठान, रक्षक ।
द्रव्य, बीज हें जाणणें. ॥१८॥

उत्पत्तिप्रलयस्थान ।
मीच असें सर्वांचें कारण ।
मोक्षकाळ मी जाण ।
सदसत् मीच असें. ॥१९॥

ते शांत सोमपान करिती ।
स्वर्गलोक पावावया इच्छिती ।
तेणें पुण्यें इंद्रलोकीं पावती ।
दिव्य देवभोग. ॥२०॥

ते स्वर्गीं वास करिती ।
क्षीणपुण्यें मृत्युलोका येती ।
मायीक धर्म आचरिती ।
कामी काम. ॥२१॥

अन्यठायीं मन न घालिती ।
मम उपासना जे करिती ।
त्यांचा योगक्षेम निश्चितीं ।
करणें मज पडे. ॥२२॥

पूजन अन्य देवताठायीं ।
तेंही माझेंच घडे पाहीं ।
विधिपूर्वक सोई ।
नाहीं तयांची कीं. ॥२३॥

मी सर्व यज्ञांचा भोक्ता, ।
स्वामी सर्वांचा, अधिष्ठानकर्ता ।
तत्त्व नेणती[1] तत्त्वता ।
मज न पावतां च्यवतील. ॥२४॥

देवपितृआराधना करिती ।
भूतें देवतांतें भजती ।
ज्यां भजे त्या लोकां जाती; ।
मज भजती; मज पावती ते. ॥२५॥

पत्रपुष्पफळउदक ।
जें मज देती भक्तिपूर्वक ।
तें मी अंगीकारीं आईक ।
भक्तिभावें करूनियां. ॥२६॥

जें करणें आणि भक्षणें ।
जें अग्नीसि होम करणें ।
जें तपीं तप साधणें ।
तें मज अर्पण करीं. ॥२७॥

शुभाशुभफळ ।
कर्मबंध सुटे सकळ ।
संन्यासयोगयुक्त होऊनि केवळ ।
तूं मज पावसी. ॥२८॥

---

१. पाठ–न नेणतां.

सर्व भूतांचे ठायीं ।
मी समबुद्धी असें पाहीं ।
मज वैरी, मित्र, द्रोही ।
समचि असे. ॥२९॥

असो दुष्ट दुराचारी ।
मातें भजे अनन्यभक्तीनें जरी ।
तरी तुंवा तो साधूच मानावा परी ।
कीं त्याचा दिव्य निश्चय. ॥३०॥

ते तत्काळ धर्मी होऊन ।
निरंतर शांतितें असती पावून ।
माझिया भक्तांसि जाण ।
नाश नाहीं; अर्जुना ! ॥३१॥

स्त्रीवैश्यशूद्रआदिकरून ।
पापयोनि असोन ।
माझी भक्ति केलियान ।
तयांसी जाण परमगती. ॥३२॥

यापरी द्विजभक्त पुण्यवंत ।
राजऋषी पावती समस्त ।
अनित्य सुखलोक पावुनी त्वरित ।
मज भजें तूं. ॥३३॥

माझे ठायीं अंतःकरण ।
भक्तिरूप मज अर्पण ।
मजउद्देशें योग करून ।
योजितां मज पावसी.' ॥३४॥

—××—

## अध्याय दहावा

कृष्ण म्हणे, 'अर्जुन ! ।
ऐक माझें परमवचन ।
तूं सखा म्हणून ।
हितोपदेशितां तुझिया हितालागीं. ॥ १ ॥

माझी उत्पत्ति नेणती सुरवर ।
आणि ऋषीही समग्र ।
'हे नेणती ?' याचें उत्तर; ।
यांची उत्पत्ती मजपासुनी. ॥ २ ॥

मज अनादित्वें मातें ।
जाणे मज सर्वेश्वरातें ।
तोचि सुज्ञ मनुष्यांतें ।
बंधापासूनियां सुटे. ॥ ३ ॥

बुद्धि, ज्ञान, मोह नाहीं ।
क्षमा, सत्य, शम, दमही ।
सुख, दुःख, उत्पत्ति, नाश नाहीं ।
भूतांचे भाव हे पृथक् ; ॥ ४ ॥

अहिंसा, समता, संतोष, ।
तप, दान, यश, अपयश, ।
सर्व भाव उपजती जीवांस ।
ते वेगळे मजपासुनी. ॥ ५ ॥

ऋषी आणि चारी मनू ।
हे सर्व मजपासून; ।
सृष्टि झाली त्यांपासून ।
म्हणोनि हे लोक माझी प्रजा. ॥ ६ ॥

ऐसा मजपासुनी विस्तार ।
मज जो जाणे नर ।
तो दृढ योग पावे निर्धार ।
ऐथें नाहीं संशयो. ॥ ७ ॥

मी सर्वांसि उत्पत्तिस्थान ।
प्रवृत्ति सर्व मजपासून ।
ऐसें जाणोनि सर्व माझें करिती भजन ।
ज्ञानी भावयुक्त होवोनिया. ॥ ८॥

माझे ठायीं चित्त ठेऊनी ।
माझी गाथा करूनी ।
राहे संतोषी होऊनी ।
गात नाचत. ॥ ९ ॥

ऐसे निरंतर भक्तियुक्त ।
ते प्रीति करोनि मज भजती अत्यंत ।
तयांसि योगज्ञान देईन बहुत ।
जेणें ते मज पावती. ॥१०॥

तयां उपजलिया अज्ञानअंधकार ।
त्यांवरि मी कृपा करीं करुणाकर ।
ज्ञानदीप हा सोज्वळ निरंतर ।
अज्ञान नाशी तयाचें.' ॥११॥

अर्जुन म्हणे 'अगा परब्रह्मा ! ।
पवित्र तूं परंधामा ! ।
सत्य पुरुष शाश्वतनामा ।
आदिदेव तूं नित्य प्रभू. ॥१२॥

हें मज सांगितलें ऋषीश्वरीं सर्व ।
देवर्षि नारदादिक देव ।
असित देवल व्यासादिक देव ।
तेंच स्वयें तूं सांगसी. ॥१३॥

सर्वही तुवां मज सांगितलें ।
तितुकें मज साच[1] मानवलें ।
भगवंता ! ज्ञान उपजलें ।
देवदानवां न कळे कीं. ॥१४॥

तूं आपआपणातें आत्मा ।
जाणशी, तूं पुरुषोत्तमा ! ।
भूतभावन हे महिमा ।
देवाधिदेवा ! आहे तुझी. ॥१५॥

समस्त दिव्य तुझिया विभूती ।
तूं सांग गा ! मजप्रती ।
जिहीं विभूतीं श्रीपती ! ।
त्रिभुवन व्यापुनी आहेसी. ॥१६॥

योगेश्वरा ! तुझें चिंतन करितां ।
तुज कैसिया रीतीं जाणणें ? अनंता ! ।
तुझें ध्यान कोणे स्थळीं आतां ।
तें भगवंता ! सांगें मज. ॥१७॥

तुझ्या विभूती आत्मयोग विस्तारें करून ।
वेळोवेळां ऐकतां होय अमृतपान; ।
हें मज प्रसन्न होऊन ।
सांग स्वामी ! जनार्दना !' ॥१८॥

कृष्ण म्हणे अर्जुनाप्रती, ।
'माझ्या दिव्य विभूति बहुत असती, ।
त्यांमाजी सांगेन श्रेष्ठ तुजप्रती, ।
येरां पाहतां अंत नसे. ॥१९॥

पार्था ! गा ! अवधारीं ।
मी आत्मा सर्व भूतांचे शरीरीं, ।
मी आदिमध्य निर्धारीं, ।
मीच अंत सर्व भूतांचा. ॥२०॥

अदितिपुत्रांत मी विष्णु, ।
तेजांत मी असें भानु, ।
मरुद्गणांमाजी मरीचि होऊनू, ।
नक्षत्रांत शशी मी. ॥२१॥

वेदांमध्यें सामवेद, ।
देवांत इंद्र मी प्रसिद्ध, ।
इंद्रियांत मन संबंध ।
जीवांचें चैतन्य मी. ॥२२॥

---

१. पाठ–साचित मानिलें.

रुद्रांमध्यें मी शंकर, ।
यक्षांमाजी धनेश्वर, ।
वसूंमध्ये वैश्वानर, ।
पर्वतांत मेरू मी. ॥२३॥

पुरोहितांत बृहस्पती, ।
सेनापतींत स्वामीकार्तिक म्हणती, ।
सरितांत[1] सागरपती, ।
सर्व मीच जाण. ॥२४॥

ऋषींमाजी भृगुऋषीश्वर, ।
वाचांमाजी एकाक्षर, ।
यज्ञांत जपयज्ञेश्वर, ।
स्थावरीं मी हिमालय. ॥२५॥

वृक्षांत अश्वत्थ प्रसिद्ध , ।
देवर्षींमाजी नारद, ।
गंधर्वीं चित्ररथ, ।
सिद्धांत कपिलमहामुनी मी. ॥२६॥

अश्वांमाजी उच्चैःश्रवा वारू, ।
गजांत ऐरावत कुंजरू, ।
मनुष्यांत राजा नरू ।
मीच असें. ॥२७॥

शस्त्रांत मी वज्र, ।
धेनूंमध्यें कामधेनु परिकर, ।
संतानहेतु काम निर्धार,[2] ।
सर्पांत मी वासुकी. ॥२८॥

नागांमाजी अनंत, ।
वरुण मी जलचरांत, ।
अर्यमा पितृगणांत ।
संयमांत यम मी. ॥२९॥

प्रह्लाद मी दैत्यांत, ।
काळ मी महाकाळांत, ।
सिंह मी श्वापदांत, ।
पक्ष्यांत मी गरुड जाण. ॥३०॥

चालकांमाजी पवन, ।
शस्त्रधरांत मी दशरथनंदन, ।
झषांमाजी मगर होऊन, ।
सरितांमाजी जान्हवी. ॥३१॥

सृष्टीचें आदिअंतमध्यस्थान, ।
विद्यांत अध्यात्मविद्या जाण, ।
वादांत तत्त्वकथन, ।
सर्व जाण मीच असें. ॥३२॥

अक्षरांमाजी अकार देख, ।
समासीं द्वंद्वसमासक, ।
मी अक्षयी काळ देख, ।
ब्रह्माविष्णु मीच असें. ॥३३॥

सर्वहरांमाजी मरण, ।
जन्मकाळींचें जनन, ।
कीर्ति, श्री, वाणी, नारींत जाण।
स्मृति, प्रज्ञा, धृति,क्षमा मी. ॥३४॥

बृहत्साम सामवेदांत, ।
आणि छंद तो गायत्रींत, ।
मार्गशीर्ष मी मासांत, ।
ऋतूंमध्ये वसंत मी. ॥३५॥

छलकांमाजी द्यूत, ।
तेजस्वियांत तेजदीप्त, ।
व्यवसायांमाजी जयो समस्त, ।
सत्त्ववंतांमध्ये सत्त्वगुण मी. ॥३६॥

---

१. पाठ–सरोवरांत सरितापति. २. पाठ–निरधार.

यादवांमाजी वासुदेव, ।
पांडवांमाजी धनंजय, ।
मुनींमध्येंही मी व्यासदेव, ।
कवींमाजी शुक्र मी. ॥३७॥

दंडकर्त्यांत मी दंड, ।
नयांत जयवंत निवाड, ।
ज्ञानवंतांत ज्ञानमुंड, ।
गुह्यांमाजी मौन मी. ॥३८॥

सर्व भूतांचें बीज असें मी जाण, ।
मजवेगळें नाहीं स्थान ।
चराचरीं झालें जाण ।
ऐसें जाण अर्जुना ! ॥३९॥

माझ्या दिव्यविभूती, अर्जुना ! ।
अंत नाहीं यांसि जाणा ।
ही सांगीतली खुणा ।
संक्षेपें तुला. ॥४०॥

जे ऐश्वर्यवंत सत्यवंत देखसी ।
लक्ष्मी आहे ज्यांपासी ।
अथवा जय असे ज्यांपासी ।
ते जाण अंश माझे. ॥४१॥

अर्जुना ! ऐक ज्ञान ।
बहु सांगितलिया काय कारण ? ।
विश्व झालें मजपासून ।
एक अंशें; जाण पां तुज.' ॥४२॥

—× ×—

## अध्याय अकरावा

अर्जुन म्हणे, 'चक्रपाणी ! ।
अध्यात्म निरूपिलें कृपेंकरुनी ।
जें बोलिलेति तुम्ही आपुल्या वचनीं ।
तेणें मोह गेला माझा. ॥ १ ॥

भूतांची उत्पत्ति प्रलयो ।
तो तुम्हांपासोनि ऐकिला अनुभवो ।
तूं कमलपत्राक्षदेवो ।
महात्म्य आइकलें तुझें. ॥ २ ॥

परम ऐश्वर्य सांगितलें ।
तें उत्तम म्यां आइकलें ।
आतां मनीं उपजलें ।
जें पाहावें रूप तुझें. ॥ ३ ॥

जरी मज दाखवूं येईल ।
पहावें ऐसें असेल ।
तरी तें अपूर्व नवल ।
दाखवी अव्ययरूप तुझें.' ॥ ४ ॥

देव म्हणे, 'पार्था ! रूप पाहें ।
शतसहस्र अनुपम हें ।
नानावर्णांची सोये ।
नानाकृती आसती. ॥ ५ ॥

आदित्य रुद्र वसु पाहें ।
अश्विनीदेव मरुद्गण ते हे ।
हें पूर्वीं देखिलें नोहे ।
आश्चर्यरूप. ॥ ६ ॥

जग अवघें एकाठायीं ।
चराचर व्यापोन ही ।
याहूनि आणिक इच्छिसी कांहीं ।
तें माझे देहीं पाहीं; पार्था ! ॥ ७ ॥

या चर्मचक्षूनें न देखवे मज ।
ज्ञानचक्षु देतों तुज ।
मग ईश्वरयोग सहज ।
पाहाशील तूं.' ॥ ८ ॥

संजय म्हणे, 'राया ! ।
ऐसें वासुदेव बोलोनियां ।
आपलें ईश्वरत्व धनंजया ।
निज विश्वरूप दाखविता झाला. ॥ ९ ॥

अनेक नयन मुखें ।
अनेक अद्भुत रूपें देखे ।
दिव्याभरणें अनेकें ।
दीप्तिवंत आयुधें ज्यामाजी. ॥१०॥

दिव्यमाळा आणि पीतांबरधारण ।
दिव्यगंधाचें लेपन ।
सर्व अपूर्वरूप पाहातां गहन ।
दशदिशांमध्यें सन्मुख. ॥११॥

सहस्र सूर्यप्रभा आकाशीं ।
उगवोनि दीप्त होय एकसरसी[1] ।
तरीच साम्यता घडे काहीं त्यासी ।
ऐसें तेज परम याचें. ॥१ ॥

तेथें सर्व एके ठायीं पाहिलें ।
जग सर्वत्रही वेगळालें ।
देवाचे देहीं देखिलें ।
पांडुपुत्रें. ॥१३॥

त्यानंतर आश्चर्य वाटलें ।
अर्जुना रोमांच दाटले ।
मग दोन्ही कर जोडिले ।
केला नमस्कार. ॥१४॥

'तुझे देहीं सर्व देखिले ।
ब्रह्मदेव नाभीं बैसले ।
ऋषिआदि नागकुळातें पाहिलें ।
तुझ्या देहीं. ॥१५॥

अनंत बाहु, उदरें, नेत्रें, मुखें ।
अनंतापरीचीं देखें ।
आदि अंत नोळखे ।
विश्वेश्वरा ! ऐसें विश्वरूप. ॥१६॥

मस्तकीं मुगुट, गदाचक्र करीं, ।
सर्व तेजोमयदीप्ति अवधारीं ।
तैसें तेज देखिलें शरीरीं ।
दावाग्नीसारिखें. ॥१७॥

तूं परम अक्षर आणि ज्ञेय ।
या विश्वाचें तूं निधान मूळमय ।
तूं शाश्वत, धर्मरक्षक, अक्षय ।
आदिपुरुष मज मानला. ॥१८॥

अनंतवीर्या ! नकळे आदिमध्यअंत ।
अनंत भुजा, शशिसूर्य नेत्र, ।
प्रज्वलित अग्नि जैसा तेजरेखित ।
त्रिजगत्प्रकाशा ! ॥१९॥

तुझेनि एकें स्वरूपतेजें ।
पृथ्वीनभ व्यापिलें सहजें ।
दशदिशांत दाटलें उग्ररूप अद्भुत जें ।
तें देखोनि व्यालें लोकभय. ॥२०॥

तुझे ठायीं देव प्रवेशती ।
कितीक भयेंकरुनि स्तुति करिती ।
देवऋषी स्तविती ।
देवा ! तुजकारणें. ॥२१॥

---

१. पाठ–एक रसीं.

रुद्रादित्यवसु ।
आणी विश्वेदेवमरुद्गण आणि जेसु ।
यक्ष आणि राक्षसु ।
देखतां आश्चर्य पावलों. ॥२२॥

रूप आहे बहु मुखें नेत्र ।
महाबाहो ! ऊरुपदादि विचित्र ।
बहुत उदरें, विक्राळ दाढांचें चरित्र ।
तेणें लोकांसहित माझें मन भय पावलें.२३।

अत्युत्कट विचित्र ।
प्रचंडदीप्त नेत्र ।
ऐशासि देखोनि सर्वत्र ।
धैर्य आणि शांति न पवे. ॥२४॥

दाढा विक्राळ मुखाभीतरी ।
जैसा अग्नि प्रगटला प्रळयअवसरीं ।
तेणें तेजें दिशा[1] न कळती, मुरारी ! ।
सुख न पवें, जगन्निवासा ! ॥२५॥

दुर्योधनादि सर्व ।
जयांचे समुदाव ।
भीष्मद्रोणादि देव ।
मुखीं प्रवेशती. ॥२६॥

ऐशा भयानक मुखाभीतरी ।
एक रिघतां अडकले दाढमाझारीं ।
एक चूर्ण मुखांतरीं ।
शिरें अडकलीं मज दीसताती. ॥२७॥

जैसीं सरिताउदकें वाहती ।
तीं अवघीं सागरीं मिळती ।
तैसे नरलोक भूपती ।
तव वदनीं प्रवेशले. ॥२८॥

जाज्वल्य दीपावरी ।
जैसा पतंग रिघे अवधारी ।
तैसे नाशावया मुखाभीतरी ।
प्रवेशती लोक. ॥२९॥

तुझी मुखज्वाळाच जिव्हेचें ललन ।
तेणें होतसे सर्व लोकग्रसन ।
त्या ज्वाळें भरलें त्रिभुवन ।
ऐसें विष्णु ! उग्ररूप तुझें. ॥३०॥

तूं उग्ररूप मज सांग कवण ।
तुजला नमन, होय प्रसन्न, ।
पहिलें रूप पाहां इच्छी मन ।
तुझी प्रवृत्ती नकळे, स्वामी !' ॥३१॥

देव झाला बोलता, ।
म्हणे, 'मी काळ, लोकांचा सहर्ता ।
तुज वेगळें करोनि पार्था ! ।
हे युद्धीं सर्व संहार पावती. ॥३२॥

या कारणें ऊठ तूं यश घेईं ।
वैरी जिंतोनि राज्य वाहीं ।
म्यां मारिले सर्वही ।
युद्धीं निमित्तभागी हो, अर्जुना ! ॥३३॥

भीष्मद्रोणजयद्रथकर्ण ।
वीर सर्व मारिले जाण ।
आतां ऊट तूं, अर्जुन ! ।
शत्रु मारीं.' ॥३४॥

संजय म्हणे, 'ऐसें वचन ऐकोनि कृष्णाचें।
कंठ सद्गदिलें अर्जुनाचें ।
मग अंजळी जोडोनि तयाचे ।
मागुती भीत भीत स्तवितसे.' ॥३५॥

---

१. पाठ-दिशा नमती.

अर्जुन म्हणे, 'नारायणा ! ।
तुमचेनि कीर्ति संतोषी झालों जाण ।
भयें दशदिशा पळताति राक्षसगण ।
नमस्कार करिती सिद्धादिक. ॥३६॥

तूं श्रेष्ठ म्हणोनि नमस्कार करिती ।
ब्रह्मयाची तूं उत्पत्ती ।
ऐसी देवा ! स्थिती ।
सत् तूंची. ॥३७॥

तूं आदिदेव पुरुष पुरातन ।
तूं विश्वाचें परमनिधान ।
तूं उत्कृष्ट ज्ञान यज्ञ ।
तूं अनंता ! व्यापिलें विश्व रूपें. ॥३८॥

वायु, अग्नि, वरुण, यम, ।
प्रजापति आणि सोम, ।
प्रपितामह तूं महात्म ।
सहस्र नमनें पुनः पुन्हा. ॥३९॥

अगणित पराक्रम तुझें वीर्य असे जाण ।
पूर्वपश्चिमे तुज नमन ।
तूं सर्वांसि पावतोस म्हणवून ।
तूं 'सर्व' होसी. ॥४०॥

'हे यादवा !' म्हणोनि बोलिलों ।
'कृष्णा ! सखया !' वदलों ।
प्रीतीनें जें बोलिलों ।
तें क्षमा कीजे. ॥४१॥

विहार आसन भोजन शयन ।
असत्कारिला लीलाविनोदाकारण ।
अच्युता ! थोर अपराध झाला म्हणोन ।
क्षमा करवितों, स्वामिया ! ॥४२॥

तूं पिता चराचरलोकांसी ।
अणि गुरु पूज्य होसी ।
आणिक अधिक नाहीं तुज ऐसी ।
त्रैलोक्यामाजी. ॥४३॥

याकारणें तुला नमस्कारितों ।
जसा सखा सख्यासि तो ।
पुत्रासि पिता क्षमा करितो ।
तैसी कृपा करीं, नारायणा ! ॥४४॥

कधीं नाहीं देखिलें तें देखून ।
हर्ष आणि भय पावलें माझें मन ।
आतां पहिलेंच रूप दाखवीं प्रसन्न होऊन ।
देवा ! जगन्निवासा ! ॥४५॥

माथां मुगुट, गदाचक्र करीं ।
पहावया इच्छितों अंतरीं ।
तें रूप तुझें ऐसें चतुर्भुज मुरारी ! ।
प्रगट करीं आतां.' ॥४६॥

'अर्जुना ! योगेंकरून ।
रूप दाविलें होऊनि प्रसन्न ।
हें तुजवांचून ।
देखिलें नाहीं कोणीं. ॥४७॥

वेदें यज्ञें अध्ययनें दानें ।
विधिनें कर्माचरणें ।
त्रैलोक्यामाजी कवणें ।
माझें रूप तुजवेगळें देखिलें नाहीं. ॥४८॥

माझें थोर रूप देखोनि नयनीं ।
तेणें भयव्यथा न धरीं मनीं ।
आतां भय टाकोनि, प्रीति धरोनी, ।
पहिलें पूर्वरूप पाहें माझें'. ॥४९॥

संजय म्हणे, 'देव ऐसें बोलोनी ।
आपलें रूप दाखविलें मागुतेंनी ।
आश्वासिला सौम्यरूप होवोनी ।
भ्यालिया अर्जुनासी'. ॥५०॥

अर्जुन म्हणे, 'जनार्दन ! ।
मनुष्यरूपातें देखोन ।
मोह गेला पळोन ।
ज्ञान मज जाहलें.' ॥११॥

'माझें हें दुर्लभ स्वरूप ।
तुला दाखविलें अनूप ।
पहावया करिती तप ।
देवांस दुर्लभ जें. ॥१२॥

वेदयज्ञदानेंकरून ।
हें रूप कोणा न दिसे जाण ।
तुवां पाहून झालें रूपाचें ज्ञान ।
आणिक कोणी पहावया शक्य नोहे. ॥१३॥

मज पाहणें जाणणें देखणें ।
तें सर्व भक्तीचेनि गुणें ।
ऐसें मज जें जाणणें ।
तें ममरूपीं[1] प्रवेशवी. ॥१४॥

मद्भक्तीनें जाण ।
'मी थोर' करी हें कीर्तन ।
सर्वभूतीं निर्वैर होण ।
तो मजमाजी समावे. ॥१५॥

—× ×—

## अध्याय बारावा

'तूं विश्वरूप म्हणून करिती भजन ।
एक अक्षर अव्यक्त ऐसें जाणोन ।
तरी दोहींमध्यें श्रेष्ठ कोण ? ।
तें सांग मजप्रती.' ॥ १ ॥

'माझे ठायीं मन नेमून ।
श्रद्धापूर्वक करी भजन ।
तो भक्त मज पावे जाण ।
निश्चयेंशीं. ॥ २ ॥

जें अक्षर अनिर्वाच्य अव्यक्त जाण ।
तें सर्वत्र व्यापक संपूर्ण ।
अंतःकरणास नित्य अगोचर जाणोन ।
त्याची उपासना करिती. ॥ ३ ॥

इंद्रियसमूह नेमून ।
सर्वां ठायीं बुद्धी समान धरून ।
सर्वहितीं तत्पर होऊन ।
ते मज पावती, गा ! अर्जुना ! ॥ ४ ॥

कष्टें करून अव्यक्तीं मन नेमिती ।
त्यांसि क्लेशचि होती ।
अव्यक्ताची गतीः दुःखें पावती ।
देहवंत हे. ॥ ५ ॥

सर्व कर्में माझ्या ठायीं ।
अर्पिती, जाणोनि माझी मोठी ।
मज ध्याती अहर्निशीं, पाहीं ।
माझें ध्यान सर्वदा. ॥ ६ ॥

मी उद्धरीं तयांसी ।
भवसागरीं, परियेसीं ।
चित्त माझे ठायीं नेमिसी ।
तारक त्यातें होतसें. ॥ ७ ॥

योगबळें करूनी ।
मनबुद्धि माझे ठायीं अर्पूनी ।
सुखी होसील मनमिळणीं ।
यांत संशय नसे कीं. ॥ ८ ॥

---

१. पाठ–मनरूपीं.

तुझिया चित्ता नये स्थिरपण ।
अभ्यास करीं आपण ।
योगाभ्यासें करून ।
पावसी, धनंजया ! ॥ ९ ॥

अभ्यासही जरी न करवे ।
तरी कर्म मज समर्पावें ।
कर्म करितां भावें ।
इच्छिली सिद्धी पावसी. ॥१०॥

कर्मही जरी न करवे ।
तरी माझे पाठीं रिघावें ।
कर्मफल टाकावें ।
सुखस्पृहा. ॥११॥

अभ्यासाहूनी ज्ञान श्रेष्ठ ।
ज्ञानाहूनि ध्यान वरिष्ठ ।
ध्यानाहूनि त्याग वरिष्ठ ।
तो जीवन्मुक्त कीं. ॥१२॥

सर्वभूतीं द्वेष नाहीं ।
मैत्री दयाळु पाहीं ।
सुखदुःखातेंही[1] ।
समसमान मानीतसे. ॥१३॥

योगी तृप्त सुखेंसी ।
स्थिर करूनि मनासी ।
मजमाजि मनबुद्धि अर्पी नेमेंसी ।
तोचि भक्त मम प्रिय. ॥१४॥

ज्यापासूनि लोक नव्हती दुःखी ।
लोकांपासाव आपण असे सुखी ।
हर्षक्रोधभय उद्वेग न घे विशेषीं ।
तोचि भक्त मज प्रिय. ॥१५॥

जया अपेक्षा नसे कांहीं ।
सदा शुची दक्ष पाहीं ।
कर्मारंभ टाकूनही ।
असे, तो मद्भक्त प्रिय. ॥१६॥

नाहीं हर्ष, ना द्वेषशोक ।
न करी कांक्षेचें सुख ।
शुभअशुभत्यागी देख ।
तो भक्त मज प्रिय. ॥१७॥

जया शत्रुमित्र समान जाण ।
नाहीं मान आणि अपमान ।
शीतउष्ण, सुखदुःख, समान ।
जया आसक्तता नाहीं. ॥१८॥

स्तुतिनिंदा समानी ।
आत्मलाभ संतोष दोन्हीं ।
निराश्रय स्थिर होउनी ।
जो राहे तो माझा भक्त. ॥१९॥

हें धर्मामृत ।
याची उपासना करित ।
तो जाण जीवन्मुक्त ।
माझा भक्त पैं. ॥२०॥

—××—

## ज्ञानकांड

### अध्याय तेरावा

अर्जुन म्हणे, 'देवा ! ।
प्रकृतिपुरुषांचिया भावा ।
क्षेत्र क्षेत्रज्ञ निवडावा ।
ज्ञान ज्ञेय इच्छितों.' ॥ १ ॥

१. पाठ-सुखदुःख तेंही.

श्रीकृष्ण म्हणे, 'पार्था ! परियेसी ।
हें देहक्षेत्र जाणावें यासी, ।
हें जाणे जो नेमेंसी ।
तो क्षेत्रज्ञ जाणावा. ॥ २ ॥

क्षेत्र क्षेत्रज्ञ दोन्ही ।
दोहींचा जाणता म्हणोनी ।
तोचि म्हणिजे ज्ञानी ।
तो मज मानला. ॥ ३ ॥

तें क्षेत्र कैसें जाणिजे ।
आणि क्षेत्रज्ञ कासया म्हणिजे ।
या दोहींचा निवाडा बोजें ।
संक्षेपें आइक. ॥ ४ ॥

ऋषींहीं बहुतीं सांगितलें ।
वेद विधी बोलिले वेगळाले ।
उपनिषदीं निश्चित केलें ।
हें सत्य जाण. ॥ ५ ॥

महाभूतें आणि अहंकार ।
बुद्धि अव्यक्त असे थोर ।
दशेंद्रियांचा विस्तार ।
पांच इंद्रियविषय जाण. ॥ ६ ॥

इच्छा, द्वेष, सुख, दुःख ।
देह, चेतना, धृति देख ।
इतुकियांतें क्षेत्रज्ञ म्हणती आइक ।
बुद्धिवंत पैं. ॥ ७ ॥

अहंकार ना दंभादि धरी ।
हिंसा न करी, शांति आर्जव करी ।
गुरूचें भजन अंतरीं ।
पवित्रपणें अंतःकरण निरोधी. ॥ ८ ॥

विषयवैराग्य, सुखदुःख ।
अहंकार हाही देख ।
जन्ममरणव्याधिदुःख ।
यांचे ठायीं दोषदर्शन. ॥ ९ ॥

स्त्रीपुत्रगृहाचे ठायीं संगरहित ।
विषयीं नाहीं आसक्त ।
इष्ट अनिष्टाचे ठायीं चित्त ।
समचि असे. ॥१०॥

असाधारणयोगें करूनी ।
दृढभक्ति धरूनी ।
एकांत स्थळीं बैसोनी ।
प्रीति नाहीं लोकांठायीं. ॥११॥

अध्यात्मीं तत्पर होणें ।
तत्त्वज्ञानें विषयांतें नेमणें ।
जाणिवेचें जें जाणणें ।
उलटीं अज्ञानलक्षणें ॥१२॥

आतां सांगतां ज्ञेय ।
भक्तिज्ञानें होय जय ।
आदि अंत शुद्ध होय ।
ब्रह्म 'सत् असत्' नसे. ॥१३॥

सर्वत्र हातपाय दिसती ।
शिरें मुखें तया असती ।
नेत्र कर्ण सर्वत्र भासती ।
दशदिशा व्यापूनि असे. ॥१४॥

सर्वेंद्रियगुण भासती ।
परी इंद्रियें तयाठायीं नसती ।
असक्त असोनि सर्वांभूतीं ।
निर्गुण होवोनि गुण भोगी. ॥१५॥

भूतीं असे अंतर्बाह्य ।
चर आणि अचरही होय ।
सूक्ष्म म्हणोनि जाणावया शक्य ।
दूरि असोनि जवळ तें. ॥१६॥

भूतांचे ठायीं अविभक्त असे ।
परी विभक्तपणें दिसे ।
गिळी उगळी अनायासें ।
धरी जाणोनी. ॥१७॥

ज्योतींत जें ज्योती ।
अज्ञानाहूनि पर बोलती ।
ज्ञानज्ञेय असें म्हणती ।
सर्वचित्तीं अधिष्ठूनि असे. ॥१८॥

क्षेत्र आणि ज्ञान ।
ज्ञेय सांगीतलें संक्षेपें करून ।
जो माझा भक्त जाणोन ।
माझा प्रसाद पावे. ॥१९॥

प्रकृतिपुरुषांची स्थिती ।
उभयवर्ग अनादि असती ।
प्रकृतीपासूनि विकार होती ।
ऐसें जाण तूं. ॥२०॥

कार्य कारण कर्तृत्व ।
तिहींचें प्रकृतीस कारणत्व ।
सुखदुःखभोगीं पुरुषास हेतुत्व ।
ऐसें बोलिजे. ॥२१॥

पुरुष प्रकृतीमाजी असोन ।
भोगी प्रकृतीचे गुण ।
ऐसें गुणसंगें[1] करून ।
नाना योनीं जन्मतो. ॥२२॥

पाहता, अनुमोदन देता, ।
ईश्वर, पोषक आणि भोक्ता ।
तोचि परमात्मा म्हणिजे तत्त्वतां ।
देहीं परमपुरुष तो. ॥२३॥

प्रकृती, पुरुष आणि गुण ।
ऐसें जयासी झालें ज्ञान ।
तो संसारी असोन ।
पुन्हा जन्मा न ये. ॥२४॥

ध्यानें पाहती कोणीं ।
कोणीं देखती आपण आपणेंनी ।
कोणीं सांख्ययोगेंकरूनी ।
कोणीं कर्मयोगें. ॥२५॥

आणि जे अज्ञान असती ।
गुरुपासाव जाऊनि उपासना करिती ।
ते मृत्युसंसारीं तरती ।
श्रुतिपरायण. ॥२६॥

जें आकारासी आलें ।
स्थावर जंगम बोलिलें ।
क्षेत्रक्षेत्रज्ञापासूनि झालें ।
तें जाण, भरतर्षभा ! ॥२७॥

सर्वभूतांतरीं ।
ईश्वर आहे सर्वांतरीं ।
भूतें नासून, आपण नाश न पावे निर्धारीं ।
हें पाहे, तो डोळस. ॥२८॥

परमात्मा सम आहे ।
असें समबुद्धी पाहे ।
तो आत्मघाती न होये ।
जो आपणा वोळखे. ॥२९॥

कर्में आणि सत्क्रिया ।
जाण प्रकृतीपासोनियां ।
असें पाहे आपणया ।
अकर्तृत्व पाहता तो. ॥३०॥

१. पाठ–सगुणसंगें.

म्हणूनि वेगळाली सर्वांभूतीं ।
जे बोलिली विस्तारस्थिती ।
आत्मयातें एकत्वें देखती ।
ते ब्रह्म पावती निश्चयेंसी. ॥३१॥

तो निर्गुण आत्मा त्या आदि नाहीं ।
असा परमात्मा अव्यय पाहीं ।
संसारीं असोनि कांहीं ।
अकर्ता लिप्त नोहे. ॥३२॥

जैसा आकाश घटीं सूक्ष्म होऊन ।
असे, घटा न लिंपे जाण ।
तैसा आत्मा देहीं असोन ।
अलिप्त पैं. ॥३३॥

जैसा सूर्य एक ।
सर्व जनां प्रकाशक ।
तैसा सर्वदेहीं जीव प्रकाशभासक ।
भारता ! ये रितीं. ॥३४॥

ऐसा क्षेत्रक्षेत्रज्ञांचा भेद ।
जो देखे ज्ञानचक्षु करोनि शुद्ध ।
पंचभूतें आणि प्रकृति मोक्ष जाणोनि निर्बंध ।
तो पावे परमगती.' ॥३५॥

—×❀×—

## अध्याय चवदावा

'मागुती सांगेन परम ।
ज्ञानाचें ज्ञान उत्तम ।
जाणोन ऋषी जें ब्रह्म ।
येथून सिद्धी पावले. ॥ १ ॥

हें ज्ञान जिहीं आश्रयिलें ।
माझें समानत्व पावले ।
भवसागरीं ते न आले ।
नाशकाळीं त्यां नाश नसे. ॥ २ ॥

प्रकृति माझें गर्भाधानस्थान ।
तेथें मी करीं बीजारोपण ।
तेव्हां सर्वभूतांचें जनन ।
होतसे गा ! भारता ! ॥ ३ ॥

सर्वांचे ठायीं कुंतीसुता ! ।
ज्या ज्या व्यक्ति होती त्यांची माता ।
प्रकृती, आणि असें पिता ।
बीजनिक्षेपकर्ता मीं. ॥ ४ ॥

सत्त्वरजतम हे गुण ।
झाले प्रकृतीपासोन ।
देहासवें देऊन ।
मीं गुणातीत अव्यय. ॥ ५ ॥

सत्त्वगुण हा निर्मळ ।
धर्मप्रकाशशील ।
सुखसंगीं बांधे[1] प्रबळ ।
ज्ञानसंगीं, अनघ ! ॥ ६ ॥

इच्छात्मक जाण रजोगुण ।
होय तृष्णा संगेंकरून ।
तो बांधे कर्मसंगेंकरून ।
पुरुषातें गा ! अर्जुना ! ॥ ७ ॥

अज्ञानीं झाला तमोगुण ।
सर्वां मोह करी जाण ।
विस्मरण अलसनिद्रेनें ।
तम बांधितसे. ॥ ८ ॥

---

१. पाठ-बाधे.

सुखेंशी योग करी सत्त्वगुण ।
कर्म करी रजोगुण ।
ज्ञान लपवी तमोगुण ।
प्रबळ तमें वेष्टुनी. ॥ ९ ॥

रजतमातें पराभवून ।
सत्त्वगुण होय, अर्जुन ! ।
रज होय सत्त्वतम मोडोन ।
सत्त्वरजेंसि तम होय. ॥१०॥

सर्वेंद्रियीं शरीरीं ।
प्रकाशज्ञान होय जरी ।
सत्त्वगुण वाढे तरी ।
असें होतसे. ॥११॥

विषयीं लोभप्रवृत्ती ।
कर्मारंभ आणि अशांती ।
इच्छा, भरतश्रेष्ठा होती ।
विलास रजोगुणाचा. ॥१२॥

अस्फूर्ति, आळस, विसर ।
असावध, मोह फार ।
तमोगुणाचा व्यापार ।
कुरुनंदना ! ॥१३॥

जेव्हां उदयातें पावे सत्त्व ।
तेव्हां मृत्यु पावे जीव ।
तयां स्वर्गादि ठाव ।
रहावया प्राप्त होय. ॥१४॥

रजोगुणांत मरिजे ।
तरी मनुष्यांमाजी जन्मिजे ।
तमोगुणीं देह सांडिजे ।
तरी होइजे वृक्षादिक. ॥१५॥

कर्म करी सांग सकळ ।
सात्त्विक शुद्ध त्याचें फळ ।
रजोगुणांत दुःख केवळ ।
अज्ञान तमापासुनी. ॥१६॥

सत्त्वगुणे होय ज्ञान ।
लोभ रजोगुणेंकरून ।
विस्मरण, मोह, अज्ञान ।
हें होय तमोगुणास्तव. ॥१७॥

सत्त्वीं राहिले जाती स्वर्गास ।
मनुष्यलोकीं राहें राजस ।
अधःपतन पावती तामस ।
नीचगुणीं जे राहिले. ॥१८॥

गुणाहूनि आणिक नाहीं कर्ता ।
असें पाहे जो तत्त्वतां ।
तो पावे मत्स्वरूपता ।
द्रष्टा असोनी. ॥१९॥

देहीं जे झाले तीन गुण ।
त्यां देही अतिक्रमून ।
जन्ममृत्युजरादुःखांपासून ।
सुटोन मोक्षातें भोगिती.' ॥२०॥

अर्जुन म्हणे, 'श्रीकृष्णा ! ।
कवणें लक्षणीं त्रिगुणा ।
उल्लंघिलेंसें जाणिजे या जना ।
काय त्याचा आचार वर्ततसे ?' ॥२१॥

'प्रकाश प्रवृत्ति जाणे ।
मोह सत्त्वादिलक्षणें ।
प्रवृत्ति कर्माचेनि गुणें ।
कर्मी द्वेष नसे जया. ॥२२॥

उदासीनापरी जो राहत ।
कर्मी चंचल न होत ।
असे हे गुण वर्तत ।
कांहीं काज न करी. ॥२३॥

स्तुतिनिंदा मानापमान ।
समान, आत्मनिष्ठता ध्यान ।
ज्या सुवर्णमृत्तिका समान ।
भासतसे ज्ञानिया. ॥२४॥

तुल्य मानापमान ।
मित्रारिपक्षीं समान ।
आरंभ सर्व टाकून ।
गुणातीत असे. ॥२५॥

अव्यभिचारी भक्ति करून ।
भक्तियोगें उपासून ।
तिन्ही गुणांतें लंघून ।
ब्रह्मीं जातसे. ॥२६॥

वेदांची आणि मोक्षाची ।
शाश्वत धर्माची ।
एकांत सुखाची ।
प्रतिष्ठा सोहळा मुक्तेश्वर.' ॥२७॥

—××—

## अध्याय पंधरावा

'ऊर्ध्व मूळ वृक्षाचें ।
अधः शाखाविस्तार त्याचे ।
सत्य वेद पर्ण त्याचे ।
जाणे तो अर्थवक्ता. ॥ १ ॥

अथ ऊर्ध्व विस्तारल्या शाखा ।
गुणफांदिया पसरिल्या देखा ।
कर्मे मूळें अधो गेलीं आइका ।
मनुष्यलोकीं. ॥ २ ॥

तयाचें स्वरूप नकळे ऐसें ।
आदि अंत प्रतिष्ठा न दिसे ।
तो दृढमूळ अश्वत्थ असे ।
असंगशस्त्रें तोडावा. ॥ ३ ॥

त्याचें त्यामध्यें धुंडणें ।
परतोन पैं न येणें ।
आदिपुरुषीं पावणें ।
जाणें, हें सत्य. ॥ ४ ॥

गेला मानमोह[१] तयांचा ।
विषयसंग त्यजूनि आरंभ अध्यात्माचा ।
कामना संबंध तोडी सुखदुःखांचा ।
ते ज्ञाते परमपद पावती. ॥ ५ ॥

सूर्यतेज आणि चंद्रप्रभा ।
अग्निदीप्ति नाहीं शाश्वतनभा ।
माझें तेजधाम अनादिशोभा ।
नाशरहित सर्वकाळ असे. ॥ ६ ॥

सर्व भूतीं ममांश जाण ।
असे मी सर्वव्यापून ।
माझी इंद्रियें मनआदीकरून ।
प्रकृतीं मीच चालवीं. ॥ ७ ॥

जे शरीरातें धरिती, ।
वागविती घेऊनि जाती; ।
वायो परिमळ येती ।
वारा गंध नेतसे. ॥ ८ ॥

श्रोत्रचक्षुत्वचाजिव्हाघ्राण ।
यांस मनचि अधिष्ठान ।
सकळ विषयांचें सेवन ।
येणेंचि होय. ॥ ९ ॥

१. पाठ–गेला माज ही.

असणें अथवा जाणें ।
गुणकर्म भोगणें ।
हें ज्ञानिया लागे देखणें ।
मूर्ख एक न देखती. ॥१०॥

योगी आपुले ठायीं ।
निजस्वरूपातें पाही ।
आत्मा ज्यां आधीन नाहीं ।
ते अबुद्धि न देखती. ॥११॥

जें सूर्यतेज जगीं भासे ।
जें चंद्रीं आणि अग्नीचे ठायीं असे ।
तें तेज माझेनि प्रकाशे ।
तेज तें माझें जाण तूं. ॥१२॥

पृथ्वींत प्रवेशोनी ।
आत्मबळें भूतें धरोनी ।
रसस्वरूप चंद्र होउनी ।
तेजें औषधी पोषितों. ॥१३॥

मी वैश्वानर होउनी ।
असें प्राणियांचे देहीं जाठराग्नी ।
प्राणापान समान करूनी ।
मी पचवीं अन्नें चतुर्विधें. ॥१४॥

मी प्रविष्ट असें सर्वांचे हृदयीं ।
मजपासोनि स्मृति, ज्ञान, अज्ञान, पाहीं ।
उपनिषद्भाग मींच केले तेही ।
वेदही मीच जाणणार. ॥१५॥

लोकीं पुरुष दोन जाण ।
एक क्षर, दुसरा अक्षर जाण[1] ।
सर्व भूतें हें क्षरप्रमाण ।
अक्षर परमात्मा. ॥१६॥

पुरुष उत्तम तो आणिक ।
परमात्मा बोलिजे तोचि एक ।
व्यापक असोनि धरी तीन लोक ।
अव्यय ईश्वर जो. ॥१७॥

याकारणें क्षराहूनि मी अतीत ।
अक्षराहूनि उत्तम म्हणिजेत ।
मी वेदीं आणि लोकांत ।
पुरुषोत्तम नाम माझें. ॥१८॥

जे ज्ञानी होऊनि असती ।
आणि पुरुषोत्तम जाणती ।
ते सर्व जाणूनि समजती ।
सर्वभावें गा ! अर्जुना ! ॥१९॥

हें[2] गुह्यतम शास्त्र ।
म्यां सांगितलें अतिपवित्र ।
हें उत्तम जें यंत्र ।
त्वां स्वतंत्र होइजे. ॥२०॥

—××—

## अध्याय सोळावा

श्रीकृष्ण म्हणे, 'ज्ञानयोगाची स्थिती ।
ज्ञानयज्ञ[3] दमयज्ञ म्हणिजेती ।
स्वाध्याय आर्जव करिती ।
सत्त्वें सर्वांसी अभय दे. ॥ १ ॥

---

१. पाठ–म्हण. २. पाठ–हें गुह्यतमशास्त्र बांधियलें । सख्या ! गुह्य सांगितलें; हें गुह्य उत्तम शास्त्र । जें सांगितलें अति पवित्र । हें जाणोनि जे होती बुद्धिमंत । ते कृतकृत्य जाण भारता !' ३. पाठ–दानयज्ञ.

हिंसा न करी, क्रोध न करी ।
सत्य, शांति, त्याग[१] असोनि, निंदा न करी ।
सर्वत्र मार्दवदयाधारी ।
लज्जा असोनि चपलता टाकी. ॥ २ ॥

सत्य, क्षमा, परमशुची ।
द्रोह साभिमान नाहींची ।
अशी बुद्धी जयाची ।
तया दैवीसपत्ती जाण. ॥ ३ ॥

दंभ, दर्प, अभिमान ।
क्रोध, निंदा, पारुष्य, जाण ।
हे अज्ञानाचे गुण ।
ऐसा तो आसुरसंपदी, पार्था ! ॥ ४ ॥

दैवीसंपत्तीनें मोक्ष होय ।
आसुरसंपत्तीनें बद्ध होय ।
तूं दैवीसंपत्तीचा होय ।
म्हणोनि शोका अयोग्य तूं. ॥ ५ ॥

यालागी भूतसृष्टी दोन्ही ।
दैवी आणि आसुरयोनी ।
दैवी सांगितली विस्तारोनी ।
आसुरी आतां आइक, पार्था ! ॥ ६ ॥

प्रवृत्ति आणि निवृत्ति ।
असुर ते नेणती ।
शौच आचार विसरती ।
आसुरीयोगें. ॥ ७ ॥

त्रैलोक्य असत्य अप्रष्ठित बोलती ।
ईश्वर नाहीं ऐसें म्हणती ।
मैथुनेंच प्रजोत्पत्ती[२] ।
मूढांचें ज्ञान हें. ॥ ८ ॥

ऐशा दृष्टीं स्वार्थी गुंतोनी ।
अल्पबुद्धी अल्पज्ञानी होऊनी ।
उग्र कर्में आचरोनी ।
क्षयाकारणें करिती जगीं. ॥ ९ ॥

दंभश्लाघामदेंकरूनी ।
बुडोनि कामकामनीं ।
मोहें दुर्बुद्धीकरोनी ।
अशुचिव्रत. ॥१०॥

मृत्युचिंतेनें व्यापिले ।
मृत्युचिंतनीं मृत्यु पावले ।
पुरुषार्थ भोग वेगळाले ।
प्रत्यक्ष, निश्चयो झाला. ॥११॥

आशापाशें बांधले ।
कामक्रोधें व्यापिले ।
अभिलाष आचरले ।
अन्यायधनें. ॥१२॥

लाभ झाला आजि मज ।
मनोरथ पावलों सहज ।
आजि हें आलें मज ।
पुन्हां आणिक धन होईल. ॥१३॥

म्यां वैरी मारिले ।
बहुतांचे प्राण घेतले ।
समर्थ मी, मज भोग झाले ।
मी सिद्ध, बळकट, सुखी. ॥१४॥

लोकांमाजी मी थोर ।
कोणी न राहे मजसमोर ।
यज्ञ दान करून होईन सुखतर' ।
ऐसा अज्ञानें झांकोळला. ॥१५॥

१. पाठ–अत्याग असोनि दान करी. २. पाठ–प्रजापती.

ऐसा मोहजाळें वेढूनी ।
अनेक चित्तें भ्रमोनी ।
कामभोगातें इच्छोनी ।
नरकीं पडती तें जाण. ॥१६॥

'सर्व' म्हणे, 'म्यां केलें' ।
ऐसे स्तब्ध, धनें मातले ।
त्यांहीं जरी सर्व यज्ञ केले ।
तरी ते नाममात्र. ॥१७॥

अहंकारबळदर्पेंकरोनी ।
कामक्रोधातें आश्रयोनी ।
मी परमात्मा असोनी ।
ज्यांहीं न देखिला. ॥१८॥

ज्यांहीं मज द्वेषिलें ।
ते नर अधम बोलिले ।
तेणें पापें जन्मले ।
दुष्ट योनींत. ॥१९॥

ते आसुरीयोनींत जन्मती ।
जन्मोजन्मीं मज अंतरती ।
तयां होय अधोगती ।
कौंतेया ! जाण पैं. ॥२०॥

आत्मया नासावयाकारण ।
द्वारें असती गा ! तीन ।
कामक्रोधलोभ जाण ।
तस्मात् हें त्रय टाकीं. ॥२१॥

हीं अज्ञनाचीं तीन द्वारें ।
त्यजोनियां जो सत्कर्म आचरे ।
तोचि प्राणी पावे निर्धारें ।
कौंतेया ! परमगती. ॥२२॥

शास्त्रविधी सोडूनी ।
जो वर्ते इच्छेकरूनि ।
तया सुख नाहीं म्हणोनी ।
परमगती नसे. ॥२३॥

शास्त्र तें कारण प्रमाणें ।
कार्याकार्यकारणें ।
वेदोक्त जें वर्तणें ।
त्यासी योग्य तूं.' ॥२४॥

—××—

## अध्याय सतरावा

पार्थ म्हणे, कृष्णनाथा ! ।
शास्त्रविधी टाकोनि याग करितां ।
त्यांची निष्ठा कोण ? समर्था ! ।
ते सांगिजे मज.' ॥ १ ॥

देव म्हणे, 'गा ! अर्जुना ! ।
श्रद्धा त्रिविध असे जाणा ।
सात्त्विक, राजस, तामस माना ।
ते आतां आइकें. ॥ २ ॥

सत्त्वरूप श्रद्धा सर्वांसी ।
परी ज्याची भक्ती ते परियेसी ।
तो पुरुष श्रद्धायुक्त ज्या देवांसी ।
तो तद्रूप होय. ॥ ३ ॥

सात्त्विक देवांतें यजिती, ।
राजस यक्षांतें पूजिती, ।
प्रेतभूतांतें यजिती ।
ते तामस जाणावे. ॥ ४ ॥

अशास्त्रविहितें घोरें ।
जो तप करी अविचारें ।
अहं दंभें अपारें ।
कामक्रोधें बांधला. ॥ ५ ॥

शरीरीं पंचभूतें पीडिती ।
मला देहीं कष्ट होती ।
ऐसे जे पुरुष असती ।
ते असुर जाण. ॥ ६ ॥

सर्व जीवांचा आहार ।
त्रिविध आवडती प्रकार ।
यज्ञतपदान, सार ।
तें तूं आइक. ॥ ७ ॥

सत्त्व आयुष्य बल आहार ।
वाढवी सुख प्रीति विस्तार ।
गोड आंबट तिखट प्रकार ।
प्रकार तेही सांगतों. ॥ ८ ॥

कडु, आंबट, खारट, तीक्ष्ण ।
तिखट, कोरडें, अतिउष्ण ।
अन्न राजसांचें जाण ।
दुःखशोक होती तयां. ॥ ९ ॥

अमंगळ चवीहीन ।
शिळें विटलें तें जाण ।
उच्छिष्ट अमंगळ भोजन ।
तामसांचें. ॥१०॥

फलेच्छा टाकुनी ।
यज्ञ करी भक्ति करूनी ।
एकास एकनिष्ठ भजनीं ।
ऐसा यज्ञ सात्त्विकांचा. ॥११॥

दंभें[1] कर्म जें करी, मनें ।
फलइच्छा तणें ।
भरतश्रेष्ठा ! ऐसें भजणें ।
तें कर्म राजस जाणावें. ॥१२॥

वेदशास्त्रांविरहित ।
श्रद्धा नाहीं आणि करित ।
मंत्रहीन दक्षिणारहित ।
तो तामस यज्ञ बोलिजे. ॥१३॥

देवगुरुब्राह्मण ।
तयांचें भक्तीसह पूजन ।
ब्रह्मचर्य अहिंसा जाण ।
तें तप शरीराचें. ॥१४॥

परापवादहीन बोले ।
सत्यप्रियहित बोलिलें ।
वेदपठणीं मंत्रीं आथिलें ।
तें तप वाचिक गा ! पार्था ! ॥१५॥

मन निश्चल करी शांत ।
कांहीं न बोले असत्य ।
आत्मशुद्धि निश्चित ।
तप हें मानसाचें. ॥१६॥

जें करणें तें श्रद्धासहित ।
नर तप त्रिविध करीत ।
तें सात्त्विक म्हणत ।
तप सात्त्विकांचें जाण पां. ॥१७॥

सन्मान पूजा करूनी ।
दुर्भर्त्सना दंभें करूनी ।
हें राजस तप जाणोनी ।
अशाश्वत चंचळ. ॥१८॥

१. पाठ-दंभ कर्म जें करी मानें.

मूढत्व झाला अंगीकारी ।
आणि पीडारूप तप करी ।
दुसरियासि धिक्कारी ।
तामसतप जाण गा ! ॥१९॥

यथाशक्ति दान देणें ।
पात्रापात्रविचार करणें ।
उपकाराविण देणें ।
हें सात्त्विकदान बोलिजे. ॥२०॥

सेवा करवूनि दान करी ।
फल इच्छूनि कर्म करी ।
कष्ट मानूनियां अतरीं ।
देणें दान राजस. ॥२१॥

अदेशीं अकाळीं करी ।
भलतियास भजे जरी ।
ज्ञान नेणतां असत्कारी ।
तें दान गा ! तामस. ॥२२॥

'ॐ तत्सदि'ति विचारणें ।
यज्ञदानतप करणें ।
ही ब्रह्मवादियाची खुण ।
जाणणें हेंची. ॥२३॥

'ॐ तत्सदि'ति उच्चारणें ।
हें ब्रह्मयाचें बोलणें ।
येणें करी वेद यज्ञ ब्राह्मण ।
निर्माण झालें पाहीं. ॥२४॥

मृत्तिका म्हणतां कुंभ जाण ।
कर्मब्रह्म हें अनुमान ।
मोक्षार्थी करिती यज्ञतपदान ।
निष्काम मनानें. ॥२५॥

भक्ति आणि सद्भाव ।
तेथें सत्कर्मी तोचि स्वभाव ।
तोचि विचारितां ठाव ।
सच्छब्द तोची. ॥२६॥

म्हणून यज्ञदानतपस्थिती ।
तो सच्छब्द बोलती ।
येणें गुणें जें करिती ।
सत्यात्मक सत्य कर्म. ॥२७॥

दान होम अश्रद्धेनें ।
तपहवन कीं करणें ।
असत्, साधु नेणें ।
मेल्या जितां निरर्थक. ॥२८॥

—××—

## अध्याय अठरावा

अर्जुन[1] म्हणे, 'नारायणा ! ।
मी इच्छितों तत्त्वलक्षणा ।
त्याग आणि संन्यास ही कवणा ? ।
वेगळे करोनी सांग मज.' ॥ १ ॥

'अर्जुना ! हीं ऐशीं ।
कामनाफळें त्यागशी ।
तया म्हणती संन्यासी ।
त्याग इश्वरार्पण. ॥ २ ॥

---

१. पाठ-संन्यासाचें दीनोद्धरणपटो ! । तत्त्व इच्छितों जाणों । त्यागाचेंही दानवदमना । मी वेगळें हृषीकेशा ! ॥ १ ॥

एक दोषरूप म्हणोनि कर्म त्यजिती ।
एक म्हणती तपयज्ञदान हेचि कर्माचीगती।
एक ऐसें पां सांगती ।
कर्म त्यजूं नये. ॥ ३ ॥

तो त्याग निश्चयेंसी आईक ।
तुज[1] न सांगूं मायीक ।
तो त्याग त्रिविध, लोक ।
आचरताती देख तूं. ॥ ४ ॥

यज्ञदानतपकर्म न टाकावें ।
कर्म निरंतर अवश्य करावें ।
यज्ञदानतप स्वभावें ।
ज्ञानी तो पवित्र. ॥ ५ ॥

फलसंग त्यजोनी ।
नित्यकर्म आचरोनी ।
हें जाणोनि मनीं ।
उत्तम मज मानिलें. ॥ ६ ॥

नित्यकर्म करावें ।
कर्में करून दुणवावें ।
अज्ञानें त्यजी स्वभावें ।
तामस त्याग बोलिला. ॥ ७ ॥

दुःखरूप आहे कर्मसंग ।
शरीरकष्टें भयें करी त्याग ।
यास म्हणती राजस जग ।
येणें त्यागाचें फल नाहीं. ॥ ८ ॥

कर्म अवश्य नित्य करी ।
फलाची अपेक्षा न धरी ।
ऐसा जो त्याग करी ।
तो सात्त्विक बोलिजे. ॥ ९ ॥

असत्कर्माचा द्वेष न करी ।
सत्कर्मी आसक्तता न धरी ।
त्यागी सत्त्वनिष्ठा वरी[2]।
बुद्धिच्छिन्नसंशय. ॥१०॥

पुरुषास कर्में करणें अवश्य ।
सर्वकर्मत्याग तोही अयोग्य ।
कर्मफलाचा त्याग ।
तो त्यागी बोलिजे. ॥११॥

अनिष्ट इष्ट आणि मिश्रित ।
हें त्रिविध कर्माचें फल त्वरित ।
त्याग न करी पावे सत्य ।
संन्यासी न पावती. ॥१२॥

या कारणें मजपासुनी ।
पार्था ! तूं आईक सावध होउनी ।
सांख्यमतीं बोलती म्हणूनी ।
कर्माचीं पांच कारणें ॥१३॥

अधिष्ठान तें शरीर ।
कर्ता तो आत्मापरिकर ।
करण[3] चेष्टा इंद्रियव्यापार ।
पांचवें अदृष्ट पैं. ॥१४॥

शरीरवाचामनाच्या युक्तीं ।
प्राणी जें आचरताती ।
बरें अथवा वाईट करिती ।
पांच कारणें त्या कर्माचीं. ॥१५॥

ऐसें असतां केवळ जाण ।
कर्ता म्हणून देखे बुद्धीकरून ।
तो दुरात्मा मूर्ख जाण ।
अंध शास्त्रदृष्टिही. ॥१६॥

१. पाठ–अर्जुना ! जाण हें थोर कौतुक. २. पाठ–बरी. ३. पाठ–कारणें.

जया अंहभाव नाहीं ।
मी कर्ता ही बुद्धी न लिंपे कांहीं ।
तो लोकांसि मारील जर्‍हीं ।
तरी पातकासी न लिंपे. ॥१७॥

ज्ञान, ज्ञेय आणि ज्ञाता ।
कर्म तिहींची कर्तव्यता ।
कर्म, करण आणि कर्ता ।
हा संग्रह कर्माचा. ॥१८॥

ज्ञान, कर्म आणि कर्ता ।
वेगळाले गुणभेद देखा ।
त्रिगुणांची संख्या ।
यथार्थ आइक. ॥१९॥

सर्व भूतांचे ठायीं ।
अव्यय देखे पाहीं ।
वेगळे पदार्थ एके ठायीं ।
सात्त्विकज्ञान देखें. ॥२०॥

वेगळाले पदार्थ देखे ऐसे ।
नाना भावांची वृत्ती दिसे ।
भूतांचे ठायीं वृत्ति असे ।
तें ज्ञान राजस म्हणावें. ॥२१॥

न करावें तेंचि करी ।
अभिमानबळ चित्तीं धरी ।
अत्यंत बुद्धी भरी ।
तें तामस ज्ञान होय. ॥२२॥

फळरहित नित्यकर्म करी ।
रागद्वेष तो न धरी ।
फळउद्देशें कर्म न करी ।
तें कर्म सात्त्विक बोलिजे. ॥२३॥

सकाम कर्म करणें ।
अंहकारदंभ धरणें ।
सायासें आचार दाखवणें ।
तें कर्म बोलिजे राजस. ॥२४॥

दुसरियासी बंधन करणें ।
हिंसामोहें पोसणें ।
आरंभूनि कर्म टाकणें ।
तें कर्म तामस. ॥२५॥

उत्साहें कर्म करी ।
फलेच्छा अहंकार न धरी ।
सिद्धी असिद्धी सरी ।
तो सात्त्विक जाण गा ! ॥२६॥

कर्म करूनि फल इच्छी ।
लुब्धक हिंसात्मक अशुची ।
जो सुखसंतोष पावे सदैची ।
तो राजस जाण गा ! ॥२७॥

अयुक्त देहाभिमानी ।
निश्चळ ठक आळसी अज्ञानी ।
रागीट अतिद्वेष जाणोनी ।
कर्ता तामस बोलिला. ॥२८॥

बुद्धिधृतीचे गुण ।
त्रिविध हा भेद सांगेन ।
ते वेगळाले करून ।
ऐक धनंजया ! तूं गा ! ॥२९॥

प्रवृत्ति, निवृत्ति आणि कार्य ।
अकार्य, भय अभय ।
जाणे बंधमोक्षाचें स्थैर्य ।
बुद्धी ते सात्त्विक जाणिजे. ॥३०॥

जो अधर्म धर्म धनंजया ! ।
अकार्य कार्य जाणिया ।
ऐसें जो यथाविधी नेणिया ।
ते बुद्धी राजस गा ! ॥३१॥

अधर्मातें धर्म जाणे ।
सर्व अर्थासि विपरीत म्हणे ।
आचार विपरीत असा जेणें ।
अर्जुना ! ते बुद्धि तामसी. ॥३२॥

धैर्य धरूनि मन ।
आणि प्राणेंद्रिय जाण ।
निश्चल योगपण ।
हें धैर्य सात्त्विकाचें. ॥३३॥

धर्म, अर्थ, काम जाण ।
अर्जुना ! राहे धैर्यें करून ।
फळाची आशा घेऊन ।
तें धैर्य राजसाचें. ॥३४॥

निद्राशोकभयांतीं ।
विषाद आणि मदप्रीती ।
दुर्बुद्धी न होय परती ।
धारणा तामस. ॥३५॥

आतां त्रिविध तें सुख ।
भरतर्षभा ! तूं आइक ।
दुःख जाऊनि, योगाभ्यासक ।
तो उत्तमगती पावतो. ॥३६॥

आरंभीं विषाचेपरी ।
शेवटीं अमृत होय अवधारीं ।
आत्मबुद्धीनें जें करी ।
तें सुख सात्त्विक जाण. ॥३७॥

विषयेंद्रियसंयोगें ।
भोग भोगी सुखसंगें ।
शेवटीं विषतुल्य सांगे ।
तें राजस सुख जाण. ॥३८॥

आरंभ दाखवी बंधमोक्षाचियेपरी ।
परिणामीं तोच पदार्थ विकारी ।
निद्रा, आळस, अज्ञान धरी ।
तें सुख तामसांचें ॥३९॥

या पृथ्वीवरी पाहीं ।
स्वर्गीं अथवा देवाचे ठायीं ।
त्रिगुणाविरहित मुक्त नाहीं ।
तें माझें तेज केवळ. ॥४०॥

ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र जाण ।
चारी वर्ण हे प्रमाण ।
त्यांसी कर्में वेगळालीं जाण ।
परि उपजती त्रिगुणापासुनी. ॥४१॥

शम, दम, तप, आचार, ।
शुचि, शांति, आर्जव पर, ।
ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य स्थिर, ।
हे कर्म गा ! ब्राह्मणाचें. ॥४२॥

शौर्य, तेज, धृति, दक्षपणें ।
संग्रामीं पाठ न देणें ।
दान समर्थपणें ।
हें कर्म क्षत्रियाचें. ॥४३॥

कृषि, गोरक्ष आणि वाणिज्य ।
हें वैश्यकर्म स्वभावज ।
शूद्रासि सेवाकर्म सहज ।
झालें वर्णासमागमें. ॥४४॥

आपुलाले कर्मीं वर्तत ।
तें नर सिद्धीतें पावत ।
आपुले कर्मीं सिद्धी होत ।
कैसी ते आइक पां. ॥४५॥

स्वकर्में जगाची प्रवृत्ती ।
तेणें सर्व बांधिले असती ।
म्हणोनि स्वकर्मा आचरती ।
ते सिद्धी पावती देख. ॥४६॥

स्वधर्म हीन परि तो कल्याण, ।
परधर्मापरिस उत्तम जाण ।
आपुलें कर्म आचरणें ।
येणें पाप न होय निश्चित. ॥४७॥

म्हणोनि स्वकर्म गा ! अर्जुन ! ।
दोषरूप म्हणून न त्यावें टाकून ।
येन्हवीं सर्व कर्म नाहीं दोषाविण ।
अग्नि तेथें धूम्र असे. ॥४८॥

सर्वत्र बुद्धी असक्त करूनी ।
निस्पृह वर्ते आत्मा जिंकोनी ।
तयासी कर्माची परमसिद्धी देवोनी ।
तो संन्यासें पावतसे. ॥४९॥

जैसें ब्रह्म तैसे सिद्धि पावती ।
तें आइक अर्जुना ! सांगेन यथास्थिती ।
तया ज्ञानाची प्रतीती ।
संक्षेपें करिता होय. ॥५०॥

आत्मत्वीं निष्काम चित्तीं ।
बुद्धी करूनियां धरिती ।
शब्दादि विषयांतें त्यजिती ।
प्रीति द्वेष टाकूनियां. ॥५१॥

एकांतीं बैसोनियां ।
लघु आहार असोनियां ।
मनोवाक्कायनिग्रह करूनियां ।
योगध्यानवैराग्य. ॥५२॥

कामक्रोधबलदर्पक ।
अहंकार परिग्रहादिक ।
सांडूनि होइजे निर्मम शांत निःशंक ।
जे ब्रह्म व्हावया इच्छिती. ॥५३॥

आत्मा प्रसन्न झालिया ब्रह्म होती ।
शोक इच्छाही न करिती ।
भक्ति माझी सर्व भूतीं ।
ते सर्व पावती सम. ॥५४॥

भक्तीनें सम जाणती ।
जशी आहे माझी स्थिती ।
आत्मत्वें तत्त्व जाणती ।
प्रवेशती तयांत. ॥५५॥

सर्व कर्में प्रारब्धें होती ।
मदाश्रयें जे करिती ।
माझ्या प्रसादें पावती ।
जें पद शाश्वत अव्यय. ॥५६॥

मनपूर्वक माझे ठायीं ।
सर्व कर्म अर्पी, पाहीं ।
सुबुद्धी धरूनि राहीं ।
मज तत्पर होउनी. ॥५७॥

माझे ठायीं चित्त ठेविसी ।
तरी माझ्या प्रसादें सर्व दुःखें तरसी ।
अहंकार धरोनि करिसी ।
तरी सर्व दुःखें होती तुज. ॥५८॥

मनी अहंकार धरोनी ।
'युद्ध न करीं' ऐसें मनी ।
तरी या उद्योगाची होईल हानी ।
प्रकृति युद्ध करवील तुज. ॥५९॥

अर्जुना ! तूं स्वभावें बांधलासी ।
अज्ञानें करूनि 'युद्ध न करीं' म्हणतोसी ।
तरी युद्धकर्म तूं अवश्य करिसी ।
यासि संदेह नाहीं. ॥६०॥

सर्वभूतीं असे ईश्वर ।
व्यापूनि जग निरंतर ।
खेळ खेळवी साचार ।
सूत्रधारी आपण असे. ॥६१॥

भारता ! सर्वभावें करूनी ।
शरण होय मजलागुनी ।
माझा प्रसाद पावुनी ।
पद शाश्वत पावसी. ॥६२॥

अंतरींचें गुह्यांतर ।
तुला उपदेशिलें सार ।
मना येईल तो करीं विचार ।
सांगणें तें सांगीतलें. ॥६३॥

सर्व गुह्यतम जाण ।
हें सांगतों मित्र म्हणून ।
तूं प्रीतीचा सखा माझा जाणून ।
तुझें हित सांगतसें. ॥६४॥

मन ठेवोनि माझी भक्ती करीं ।
मज वंदोन यज्ञ करीं ।
मज पावसी निर्धारीं ।
प्रियसख्या ! ॥६५॥

सर्व धर्मातें त्यजोनी ।
मज एकासी शरण होउनी ।
संचित क्रियमाण जाणोनी ।
मी सर्व नाशीन भिऊं नको. ॥६६॥

ज्ञानतपअनुष्ठानहीन ।
भक्तिविना जें श्रवण ।
अभक्तांतें दे आण ।
ते दोष लाविती. ॥६७॥

हें परमगुह्य पावन ।
जो माझ्या भक्तांसि उपदेशी जाण ।
माझी भक्ती असे करून ।
तो मज पावे निःसंदेह. ॥६८॥

मनुष्यांत सांगितलें करी ।
तो माझा भक्त अवधारीं ।
त्याहूनि मज पृथ्वीवरी ।
कोण्ही प्रिय नसे. ॥६९॥

धर्मकारण हा संवाद ।
पठण करी जो सांडोनी भेद ।
तो ज्ञानयज्ञें यजून पावे परमानंद ।
माझी बुद्धी निश्चित. ॥७०॥

भक्तियुक्त जो होउनी ।
आदरें करोनि आइके श्रवणीं ।
जो उत्तमलोकातें पावोनी ।
मुक्त होय, सत्य जाण. ॥७१॥

अर्जुना ! म्यां सांगीतलें ।
तुवां एकाग्रमनें ऐकिलें ? ।
अज्ञानमोह आहे कीं गेले ? ।
हें सांग धनंजया !' ॥७२॥

'गेला मोह', म्हणे पार्थ ।
'तुमचें प्रसादें सावचित्त ।
संदेह फिटला निश्चित ।
माच करीन वचन तुझें.' ॥७३॥

देवपार्थाचा संवाद ।
ऐकोनि अद्भुत परमानंद ।
रोमांच उभे स्यानंद ।
तें याचे काय सांगों ? ॥७४॥

वेदव्यासाचे प्रसादें ।
परमगुह्य अनुवादे ।
योगीश्वर श्रीकृष्णें आनंदें ।
स्वमुखें सांगीतलें. ॥७५॥

राया ! तो पुनःपुन्हा आठवत ।
जो संवाद अतिअद्भुत ।
केशवार्जुनांचा पुण्यपवित्र ।
तेणें पुनःपुन्हा आनंद होतसे. ॥७६॥

तें आठवे हरिचें रूप।
विस्मय होय अमूप।
सुख होय अकस्मात।
पुनःपुन्हा काय सांगों? ॥७७॥

जेथें श्रीकृष्ण योगीश्वर।
दुसरा पार्थ धनुर्धर।
श्री आणि विजय परिवार।
दोन्ही अचळ तेथे, राया!' ॥७८॥

## उपसंहार

जरी भजतो गोविंदा।
तरी जन्मा न ये कदा।
समूळ चुके भवबाधा।
तोचि मुक्ती पावला. ॥ १ ॥

परंतु गीता पढतां।
पुण्यांची राशी जोडतां।
अर्थी प्रीति उपजतां।
मग मुक्त स्वयेंचि तो.॥ २ ॥

या जन्मींच हरी त्याला।
गुरुरूपें देव भेटला।
अथवा पुढील जन्माला।
त्यातें मुक्ती न संशय. ॥ ३ ॥

अष्टादशाध्यायीं वर्णिलें।
योगभ्रष्ट जसा बळें।
पावोनि पुण्य तें झाले।
तो मुक्त न संशय. ॥ ४ ॥

आत्मा कळे गुरुमुखें।
अभ्यासयोगाचे सुखें।
तो पावे निकें।
मुक्तसुख. ॥ ५ ॥

सर्वात्मभावें शरण।
मज होय तूं लीन।
ज्ञानेंकरूनि ये शरण।
भवबंधापासोनि मुक्त करीं. ॥ ६ ॥

लीलाविश्वंभरवदनें।
अज्ञानासि झालें ज्ञान।
मुक्त मुक्तेश्वरप्राण।
झाला जाण सहजेंची. ॥ ७ ॥

## ५. विश्वामित्रभोजन.

हस्तिनावतीस दुर्योधन।
राज्य करी सुसंपन्न।
तंव अद्वैतवनींहूनि आले ब्राह्मण।
करिती स्तुती पांडवांची. ॥ १ ॥

म्हणती, 'सदाशिवाचे अवतार।
दूरी करावया भूमिभार।
प्रत्यक्ष ते हरिहर।
जन्मले सोमवंशीं. ॥ २ ॥

ऐकतां द्विजांचें वचन ।
सभेचा उठिला दुर्योधन ।
एकांतीं शकुनीकर्णा ।
विचार पुसता जाहला. ॥ ३ ॥

म्हणे, 'पांडवांचें अयुक्षण क्षीण ।
हें होईल कैसेन ? ।
ऐसा दृढविचार करून ।
मज सांगा, स्वामिया !' ॥ ४ ॥

म्हणे, 'दुर्वासऋषी पाठविला ।
तोही वृथा जाऊनि आला ।
ऐसा ऋषी नाहीं जन्मला ।
शापोनि त्यां भस्म करी.' ॥ ५ ॥

मग शकुनी म्हणे रायासी ।
'उपाय आठवला मानसीं ।
येथें आणावें गाधिसुतासी ।
तो प्रत्यक्ष अग्नी.' ॥ ६ ॥

ऐकतां शकुनीचें वचन ।
तत्काळ उठिला दुर्योधन ।
तंव गंगासागरीं संध्यास्नान ।
करीत बैसला विश्वामित्र. ॥ ७ ॥

मग घातलें लोटांगण ।
उभा राहिला कर जोडून ।
म्हणे, 'अनन्य भावें शरण ।
कृपा करावी, स्वामिया !' ॥ ८ ॥

मग ऋषी म्हणे, 'माग प्रश्न ।
तूं भूपतींमध्यें मान्य ।
तुज जाहलों जी ! प्रसन्न ।
जें मानसीं ये समयीं.' ॥ ९ ॥

मग अच्युतवृक्षबीज आणिलें ।
तें अग्नीं संस्कारिलें ।
मुनीचे करीं दिधलें ।
'हें द्यावें धर्माकरीं ॥१०॥

याचा वृक्ष करीं लावून ।
त्याचिया फळाचें शीघ्र भोजन ।
जेणें संतोषे माझें मन ।
सध्या दिधलें पाहिजे. ॥११॥

'अवश्य' म्हणोनी तपस्विराज ।
म्हणे, 'माझें हें सर्वदा काज.' ।
धर्म छळावयाची पैज ।
स्विकारिली कोपिष्ठें. ॥१२॥

मनोवेगें त्वरेंकरून ।
पावला अद्वैतवन ।
तां धर्मराज टाकीत बळिहरण ।
तंव पुढें उभा तत्काळ. ॥१३॥

प्रेमें धावोनि लागला पायां ।
म्हणे, जयजयाजी ! ऋषिराया !
उत्तम आलेती या समया ।
स्नान करावें, स्वामिया !' ॥१४॥

ऐसें धर्माचें वचन ऐकोन ।
ऋषी म्हणे,"अजी ! आम्हां कैचें अन्न ? ।
मज द्यावें इच्छिलें भोजन ।
अमृतफळाचें ये काळीं.' ॥१५॥

बीज दाखविलें धर्माला ।
'याचा वृक्ष करतळीं पाहिजे लाविला ।
त्याच्या फळाचें रसभोजन मजला ।
अजी ! द्यावें, आवड माझी. ॥१६॥

देसी, तरी करितां स्नान ।
'नाहीं' म्हणतां जातां परतोन" ।
ऐसें ऐकतां युधिष्ठिराकारण ।
आली मूर्च्छना तये वेळीं. ॥१७॥

तंव आली द्रौपदी धांवोन ।
नमस्कारी ऋषीचे चरण ।
म्हणे, 'स्वामी ! करावें स्नान ।
त्वरेंकरूनी मुनींद्रा !' ॥१८॥

ऋषी म्हणे द्रौपदीला ।
'धर्माकरीं वृक्ष पाहिजे लाविला ।
त्याच्या फळाचें मजला ।
अजी ! पाहिजे भोजन.' ॥१९॥

ऐसें ऐकतां ऋषिवचनासी ।
द्रौपदी भयाभीत मानसीं ।
म्हणे, 'देवा ! हृषीकेशी ! ।
हें अघटित कैसें होईल ?' ॥२०॥

तंव द्रौपदीचें म्लानवदन ।
बरवें पाहिलें ऋषीनें ।
म्हणे, 'हें नव्हे तुमचेनें ।
तरी मातें आज्ञा द्यावी.' ॥२१॥

हे ऐकोन जगत्त्रयजननी ।
म्हणे, 'स्नाना जावें महामुनी ! ।
तुमच्या कृपेंकरोनी ।
सर्वही पदार्थ परिपूर्ण.' ॥२२॥

ऋषी म्हणे द्रौपदीसी ।
'त्वरेनें जातों स्नानासी ।
जरी अंतर पडलें तुम्हांपाशीं ।
तरी शब्द न ठेवावा मातें.' ॥२३॥

मग तो गेला स्नानासी ।
द्रौपदी उभी धर्मापासीं ।
नेत्र लाऊनि हृषीकेशी ।
आठविला हृत्कमळीं. ॥२४॥

'ये रे ! माधवा ! मुकुंदा ! ।
त्वरें यावें आनंदकंदा ! ।
श्रीवरा ! स्वामी गोविंदा ! ।
करुणासागरा ! पावावें. ॥२५॥

अच्युता ! अनंता ! नारायणा ! ।
लक्ष्मीकांता ! मनमोहना ! ।
धाव, पाव, नारायणा ! ।
जगज्जीवना ! कृपाळुवा !' ॥२६॥

ऐसें करितां स्तवन ।
कंठी दाटला प्राण ।
नेत्रासी आलें जीवन ।
प्राण व्याकुळ जाहला. ॥२७॥

या ऐकोनी स्तवनासी ।
उभा द्रौपदीचे पाठीसी ।
'कोणतें संकट तुम्हांसी ? ।
मजप्रती सांगावें.' ॥२८॥

मग द्रौपदी म्हणे, 'हृषीकेशी ! ।
विश्वामित्र गेला स्नानासी ।
तो मागे अमृतरसभोजनासी ।
वृक्ष धर्माकरीं लावणें. ॥२९॥

मग बीज घेवोनि नारायण ।
धर्में पुढें कर पसरोन ।
म्हणे, 'तुम्हीं नेत्र झांका साही जण ।
उपाय करितों, भाग्य तुमचें. ॥३०॥

माझें दहा अवतारींचें पुण्य ।
तें समर्पिलें धर्माकारण ।
वृक्ष व्हावा उत्पन्न' ।
अणीक काय बोलता जाहला. ॥३१॥

'मी ब्रह्मचारी सत्यभावें ।
वृक्ष येथें वाढावे' ।
संकल्प सोडितां देवाधिदेवें ।
तरू जाहला पानीदुं ॥३२॥

न लागतां एक क्षणांत ।
वृक्ष जाला गगनचुंबित ।
शाखा, पत्रें, फळें, समवेत ।
पांडवासि म्हणे, 'अवलोकीं.'॥३३॥

भार होईल धर्माला ।
म्हणौनि पाणितळीं टाकिलें सुदर्शनाला ।
मग म्हणे, 'पाचारा ऋषीला' ।
आज्ञा केली सहदेवातें. ॥३४॥

तों त्वरें सहदेव धांवोन ।
ऋषीस घातलें लोटांगण ।
मग याचें होतां अघमर्षण ।
वृक्ष देखिला गाधिसुतें. ॥३५॥

मनीं जाला विकस्मीत ।
वारंवार अवलोकन करीत ।
तंव वृक्ष करीं दिसत ।
राया धर्माचिये. ॥३६॥

मग बैसविलें ऋषीकारण ।
षोडशोपचार केलें पूजन ।
कनकपात्रीं पक्वान्न ।
दिव्य पद्रमें वाढिलीं. ॥३७॥

अमृतरसाचें भोजन ।
तृप्त जाहले सकळ ऋषिगण ।
मग उठिले हस्तपाद प्रक्षाळून ।
दिधले तांबूल सर्वांसी. ॥३८॥

वेदोचार करून ।
सकळ देती आशीर्वचन ।
विश्वामित्र करीं अक्षता घेऊन ।
काय वदता जाहला ? ॥३९॥

श्लोकार्ध–'रिक्तपाणिर्न पश्येत
राजानं देवतां गुरुम् ॥

'बाहात्तर कोटी वरुषें अनुष्ठान ।
तें पुण्य अर्पिलें तुजकारण' ।
ऐसें देवूनि आशीर्वचन ।
गेला मुनी हस्तिनापुरा. ॥४०॥

सभे बैसला दुर्योधन ।
म्हणे, 'काय पांडवांचें वर्तमान ?' ।
ऋषी म्हणे, 'त्यांचें कल्याण ।
तुझा वंशक्षय व्हावा. ॥४१॥

मज कृपणाचें वेचलें धन ।
बाहात्तर कोटि वरुषांचें पुण्य ।
तें सकळही देऊन ।
अपुला प्राण संरक्षिला.' ॥४२॥

ऐसें बोलोनि निघाला ।
बद्रिकाश्रमा तपासी गेला ।
कृष्ण आज्ञा मागोनि पांडवांला ।
जाता जाला द्वारके. ॥४३॥

अदृश्य केलें वृक्षासी ।
आपण गेला स्वस्थानासी ।
पुढिले प्रसंगीं श्रोत्यांसीं ।
तें सावधान परिसावें. ॥४४॥

हे कथा भविष्योत्तरपुराणीं ।
महर्षि व्यासमुनीची वाणी ।
मुक्तेश्वराचें चित्त सुमनी ।
संतचरणीं सर्वदा. ॥४५॥

—××—

## ६. दुर्योधनशल्यपरिस्फोट.

सोमवंशाचीं रत्नें।
कौरव, पांडव नामाभिधानें।
व्यासवाक्यांचीं सुमनें।
प्रगटलीं वसुंधरे. ॥ १ ॥

धृतराष्ट्राचे कुमर।
एकोत्तरशत सहोदर।
प्रतापें झुंजती थोर।
मेरू तोही टेंगणा. ॥ २ ॥

सभे बैसला गांधार।
घेवूनि आले सहोदर।
भीष्म, द्रोण, कर्ण, वीर।
कृपाचार्य, अश्वत्थामा. ॥ ३ ॥

सुशर्मा, जयद्रथ, विदुर।
संशप्तक महावीर,।
भूरिश्रवा, विकर्ण, सोमदत्त, शूर।
सभास्थानीं बैसलें. ॥ ४ ॥

सभा झाली सनातन।
तों आला पांडुनंदन।
ज्यासी म्हणती श्वेतवाहन।
दाहा नांवें शोभती. ॥ ५ ॥

अर्जुन सभेसी आला।
सकळ अभ्युत्थान देती तयाला।
तो सभेमध्यें शोभला।
जैसा तारांमाजी मयंकु. ॥ ६ ॥

सकळ विद्येनें कुशल।
आचरे महाशील।
सभा तल्लीन सकळ।
अवलोकिनी पांडुसुता. ॥ ७ ॥

सकळ रत्नें कोंदणीं।
मध्यें जडिला महामणी।
समस्त देखती नयनीं।
तैसा धनंजय शोभतसे. ॥ ८ ॥

नानायाती तरुवर।
अगरचंदन, देवद्वार।
त्यांमध्यें मलयागर।
ऐसा पाहातां शोभला. ॥ ९ ॥

पुष्पें पाहतां संपूर्ण।
चंपकआदीकरून।
मध्यें मालतीसुमन।
तैसा पार्थ शोभला. ॥१०॥

सकळांसी त्या स्वरूपाचें ध्यान।
भीष्मद्रोणआदीकरोन।
चित्तीं जालें समाधान।
आशीर्वचन पैं देती. ॥११॥

हें पाहातां गयानें।
परम लज्जित अंतःकरण।
घृतें शिंपिला हुताशन।
मान्यता पाहोनी अर्जुनाची. ॥१२॥

पैशुन्य बोले दुर्योधन।
पार्थ विंधिला शब्दबाणेंकरून।
सभेमध्यें गर्जोन।
म्हणे, 'आज पाळी कोणाची?'॥१३॥

ऐकतां हें उत्तर।
करावया नसे निरुत्तर।
अंतःकरणीं लागला शर।
दुर्योधनाचा. ॥१४॥

पार्थ आला धर्मापासीं ।
म्हणे, 'गांधारें विंधिलें शब्दबाणासीं ।
समस्तां देखतां सभेसी ।
म्हणे, 'आज पाळीं कोणाची ?' ॥१५॥

हें ऐकतां धर्मानें ।
केलें कृष्णाचें स्मरण ।
कृष्ण आला द्वारकेहून ।
पांडवीं केला प्रणिपात. ॥१६॥

कौरवसभेचें वर्तमान ।
निवेदन केलें अर्जुनानें ।
सतेज मारिला बाण ।
म्हणे, 'आज पाळी कोणाची ?' ॥१७॥

हांसोनि बोले नारायण ।
'त्याचें वर्म तुज करितों श्रवण ।
तेणें अपराधावीण ।
केला त्याग भानुमतीचा. ॥१८॥

ऐसा एक संवत्सर ।
रायें टाकिला सुंदर ।
तों आश्रमा ऋषीश्वर ।
येता जाला व्यासमुनी. ॥१९॥

षोडशोपचारीं पुजून ।
उभी राहिली कर जोडून ।
म्हणे, 'अव्हेर केला रायानें ।
उपाय केला पाहिजे.' ॥२०॥

जाणोनि तिचा भावार्थ ।
व्यासें दिधलें चरणतीर्थ ।
'जेथें बैसेल कौरवनाथ ।
त्या आसनीं प्रोक्षावें. ॥२१॥

तेथें बैसतां दुर्योधन ।
होईल तुझें स्मरण ।
तात्काळ येईल त्वरेनें ।
न विलंबे तूज.' ॥२२॥

आणिक उपाय करून ।
स्नेह दिधलें अभिमंत्रून ।
'तें मस्तकीं मर्दून ।
वश्य होईल तूज.' ॥२३॥

ऐसें सांगोनि व्यासऋषी ।
गेला बद्रिकाश्रमासी ।
तीर्थ प्रोक्षितां सिंहासनासीं ।
बैसतांची आला दुर्योधन. ॥२४॥

सख्य जालें उभयतांसी ।
केलें मर्दन मस्तकासी ।
लावितां पात्र पडलें क्षितिसीं ।
स्नेह गेलें पाताळा. ॥२५॥

पडलें शेषाच्या मस्तकावर ।
तो प्रतापी दुर्धर ।
मंदिरीं निद्रा करितां गांधार ।
आला पाताळींहून. ॥२६॥

तों निद्रा करितां दीर्घजण ।
'शेषें बांधिला दुर्योधन ।
मंचकचरणीं बांधोन ।
आपण विषय भोगी. ॥२७॥

ऐसा उषःकाळपर्यंत ।
मंचकचरणीं गांधारीसुत ।
सोडोनि त्याच्या बंधनातें ।
आपण गेला स्वस्थळा. ॥२८॥

परमलज्जित दुर्योधन ।
म्हणे, 'देह कर्वत, सोडीन प्राण' ।
दुखें नेत्रासी आलें जीवन ।
प्राणांतक समय आला. ॥२९॥

'माझा सखा रविनंदन ।
त्यासि करावें निवेदन' ।
मग पावला त्याचें भवन ।
निशीचें वर्तमान सर्व सांगे. ॥३०॥

मग धरिला हृदयीं ।
'राया ! भय नसे तुज कांहीं ।
आपण येतों त्या समयीं ।
हें कार्य क्षुल्लक.' ॥३१॥

भाष्य दिधलें रायाला ।
आपण समागमें येता जाहाला ।
देखतां हर्ष भानुमतीला ।
म्हणे, 'निशी उगवला मार्तंड. ॥३२॥

अतुर्बळी हा कर्ण ।
अजी सौख्या पावेल दुर्योधन ।
करोनी चित्तसमाधान' ।
तों शेष पाताळींहुनी आला. ॥३३॥

आधीं बांधिला रविनंदन ।
मग बांधिला दुर्योधन ।
मंचकचरणीं दोघेजण ।
आपण निद्रा करी संतोषें. ॥३४॥

तंव प्रातःकाळ जाला ।
बंधमोचन उभयांला ।
शेष स्वस्थळासी गेला ।
संकटीं पडिला भानुसुत. ॥३५॥

चिंता करिती दोघेजण ।
म्हणती, 'आम्हांत बलाढ्य दुःशासन ।
हें त्यासी करावें श्रवण ।
तो हें विघ्न निवारी.' ॥३६॥

मग पाचारिला दुःशासन ।
एकांतीं बैसती तिघेजण ।
म्हणती, 'आलें असे मरण ।
शेषाकरीं बंधनाचें.' ॥३७॥

सविस्तारू दुर्योधन सांगता झाला ।
दुःशासन क्रोधें दाटला ।
म्हणे, 'संकट काय तुम्हांला ? ।
निमिषांत खंड करीन.' ॥३८॥

सवें घेवोन दुःशासन ।
येते जाले तिघेजण ।
भानुमतीनें देखोन ।
थोर आदर करिती जाली. ॥३९॥

निशी जाली एक प्रहर ।
त्रिवर्ग करिती विचार ।
शेष महादुर्धर ।
क्रोधाग्निजैसा प्रगटला. ॥४०॥

येतांचि बांधिला दुःशासन ।
दुसरे चरणीं रविनंदन ।
तिसरे चरणीं दुर्योधन ।
मंचकाच्या शोभतसे. ॥४१॥

मंचकी आपण करी शयन ।
अरुणोदयप्रमाण ।
जातां त्यांचें बंधमोचन ।
करोनि जाय स्वगृहा. ॥४२॥

कर्ण, दुर्योधन, दुःशासन ।
विचारा करिती तिघेजण ।
म्हणती, 'वृथा आलें मरण ।
यत्न कांहीं विचारा. ॥४३॥

युद्ध करिता समरंगणीं ।
तरी दाखवितों प्रतापकरणी ।
मौन्यरूपें येवोनी ।
बंधन करी त्रिवर्गा.' ॥४४॥

ऐसे एकांतीं तिघेजण ।
बैसले, करिती अधोवदन ।
राजदर्शनाकारण ।
येता जाहला शकुनी. ॥४५॥

मग तया अभ्युत्थान दिधलें ।
वर्तमान श्रवण केलें ।
'आज तुम्हीं पाहिजे आलें ।
कृपा करणें, स्वामिया ! ॥४६॥

मग ते आले चौघेजण ।
संतोष भानुमतीकारण ।
बैसावया कनकासन ।
सुखें तांबूल घेताती. ॥४७॥

शेष आला पाताळींहून ।
आधीं बांधिला प्रधान ।
मग बांधिला दुःशासन ।
तिसरिया चरणीं कर्णातें. ॥४८॥

मंचकाचा चौथा चरण ।
तेथें शोभा पावे दुर्योधन ।
शकुनी म्हणे, 'हा वीर कोण ? ।
सुब्रपर्णी मृत्यु आला.' ॥४९॥

ऐसे निशी चारी प्रहर ।
श्रम पावले महावीर ।
तंव पूर्वे उगवला दिवाकर ।
तेव्हां सुटका चौघांतें. ॥५०॥

शेष गेला आपुले भुवना ।
शकुनी म्हणे, 'दुर्योधना ! ।
अपकीर्ति जाली त्रिभुवना ।
आम्हांकारण पर्वतपात. ॥५१॥

ऐसा विचार करून ।
अरण्यांत गेले चौघे जण ।
पर्वत देखिला उच्च एक योजन ।
त्यावरी उभे राहिले. ॥५२॥

केलें दिशा अवलोकन ।
मुखें करिती हरिस्मरण ।
'तुझें नांव पतितपावन ।
ब्रीद आपुलें सांभाळी. ॥५३॥

महापातकी , वाल्मीक ।
तो त्वां केला पुण्यश्लोक ।
त्याहूनीही आम्ही रंक ।
कृपाघना ! पावावें.' ॥५४॥

ऐसें म्हणोनी सद्गदित ।
करूं पाहती पर्वतपात ।
तों आला अकस्मात ।
विहंगमासारिखा. ॥५५॥

येवोनी दिधलें दर्शन ।
चौघे घालिती लोटांगण ।
मग स्वगृहींचें वर्तमान ।
निवेदन करिती लज्जित. ॥५६॥

मग म्हणे चक्रपाणी ।
'भय भरूं नका मनीं ।
तुमच्या समागमें मदनीं ।
आपण येतों हा भरंसा. ॥५७॥

मग ते चौघेजण ।
पांचवा श्रीकृष्ण ।
भानुमती घाली लोटांगण ।
पूजन केलें षोडशोपचारीं. ॥५८॥

ऐसी एकी प्रहर निशी ।
शेष आला त्या भुवनासी ।
सन्मुख देखिला हृषीकेशी ।
सप्रेम मानिवासचरणीं. ॥५९॥

करुनी अधोवदन ।
लज्जित संकोचें मन ।
त्यातें पुसे श्रीकृष्ण ।
'कोण कार्य ये स्थळीं ?' ॥६०॥

शेष म्हणे, 'वासुदेवा !।
हा प्रारब्धाचा ठेवा ।
तुज देखिलें माधवा ।
सोडवीं वशीकरणापासुनी. ॥६१॥

ऐसें असतें माझें मन ।
तरी कैसें साहतां पृथ्वीकारण ?।
यासी साक्ष तूं नारायण ।
माझें कर्म हें दूर करीं. ॥६२॥

मग तो पसरला ।
पुच्छीं अंगुष्ठ दिधला ।
हात घालूनि फडेला ।
वशीकरणा काढिलें. ॥६३॥

कांती टाकिली तेंपासून ।
मुक्त केले पांचही जण ।
ऐसें अर्जुनासि सांगोन ।
वर्म दुर्योधनाचें. ॥६४॥

"तरी त्वां जावें सभेला ।
दुर्योधन पुसेल तुजला ।
त्वां म्हणावें तयाला ।
'पुसावें शेषातें.' " ॥६५॥

ऐसें शिकवी अर्जुनासी ।
मग पाठविला कौरवसभेसी ।
तेथें बैसतांचि पार्थासी ।
अधीरपणें दुर्योधन पुसे. ॥६६॥

'पाळी सांग कोणाची ? मजला ।'
अर्जुन म्हणे, 'पुसावें शेषाला' ।
खालुतें करूनी वदनाला ।
म्हणे, 'वर्म कोणाचें काढूं नये.'॥६७॥

'काय पुसा शेषाला ?' ।
'मंचकचरणीं बांधिलें चौघांला' ।
पार्था ! तुज ज्ञानसागराला ।
हें पैशुन्य कां आठवलें ? ॥६८॥

आजपासोनी पैशुन्य ।
न बोलावें कोण्हाचें नून्य ।
त्यासी होय अधःपतन ।
आणि रवरव इहलोकीं.' ॥६९॥

मग तो छंद टाकिला ।
मौन्य सभेमध्यें बैसला ।
सहसा न बोले अर्जुनाला ।
हें करणें श्रीकृष्णाचें. ॥७०॥

हें भविष्योत्तरपुराणांचें निरूपण ।
अपूर्व कथा पुण्यपावन ।
मुक्तेश्वराचें चित्तमुमन ।
संतचरणीं सर्वदा. ॥७१॥

---

## ७. अर्जुनकामनापूर्ति.

श्रीभागवतनिरूपण ।
ऐका भक्तीचें महिमान ।
नवविधा भक्ति संपूर्ण ।
नसे घडली एकासी. ॥ १ ॥

एकें केलें श्रवण ।
एकें केलें स्मरण ।
सख्य केलें अर्जुनानें ।
म्हणोनि, 'मम प्राणा ! ये पांडवा !'॥ २ ॥

कृष्ण अर्जुन दोघेजण ।
प्रत्यक्ष नरनारायण ।
हरिहररूपें धरून ।
भार दूरी करिती पृथ्वीचा. ॥ ३ ॥

कोण्ही एके दिवशीं ।
अर्जुन आला द्वारकेसी ।
तों स्नान केलें हृषीकेषीं ।
देवतार्चनीं बैसले. ॥ ४ ॥

सकळ भक्तांचें करी पूजन ।
सनकसनंदनआदीकरून ।
त्यांमध्यें पांडुनंदन ।
अतिप्रिय कृष्णातें. ॥ ५ ॥

तें देखिलें पार्थानें ।
आश्चर्य केलें अंतःकरणें ।
कृष्णासी म्हणे, 'तुझें देवतार्चन ।
हें अभिनव मजला वाटतसे.' ॥ ६ ॥

मग म्हणे नारायण ।
'जो करितो माझें स्मरण ।
त्याचें अखंड ध्यान ।
हृत्कमळीं माझिया. ॥ ७ ॥

किरीट, कुंडलं, कौस्तुभ कर्णी ।
अतिप्रेति अंतःकरणीं ।
त्यांतें दूर करोनी ।
एक अंतरीं जपमाळा.' ॥ ८ ॥

ऐसें म्हणतां हृषीकेशी ।
पार्थ लागला चरणासी ।
सप्रेमता दोघांसी ।
सौख्यचरित्रें कुंजवनींचीं. ॥ ९ ॥

'अनुपम्य रम्य तें वन ।
निबिड छाया मैलागिरीचंदन ।
मालतीआदीकरून सुमन ।
पंकज भ्रमर शोभती. ॥१०॥

तेथें मंचक देदिप्यमान ।
त्यावरी सेजसुमन ।
तेथें माझें शयन ।
सखया ! विश्रांत ते ठायीं.' ॥११॥

ऐसें श्रीकृष्णाचें वचन ।
ऐकोनि संतोषला अर्जुन ।
मग आज्ञा मागोन ।
जाता जाहला स्वनगरा. ॥१२॥

मार्गी आठविलें कुंजवन ।
म्हणे, 'पाहावें तें स्थान' ।
आला त्वरेंकरून ।
सकळ सौख्य देखिलें. ॥१३॥

मग पाहिलें मंचकाला ।
म्हणे येथें करावें शयनाला ।
अंग टाकिता जाहला ।
तों व्यापिला विषयबाणें. ॥१४॥

विसरला हस्तिनापुर ।
बाणें भेदिलें जिव्हार ।
विषय महादुर्धर ।
छळन केलें ब्रह्मादिकां. ॥१५॥

पराशरऋषी ।
देखोनि भुलला दुर्गंधसी ।
उर्वशीमागें ऋषी ।
विश्वामित्र लागला. ॥१६॥

सोडोनियां कैलासाला ।
शिव भिल्लिणीमागें लागला ।
इंद्र भगांकित जाला ।
विषयसंगें. ॥१७॥

हरी वृंदेच्चें स्मशान।
देखोनि कन्यारत्न।
न विचारितां ज्ञान।
भुलला विधी. ॥१८॥

बंधु सुंदोपसुंद दोघेजण।
तिलोत्तमा तें देखून।
एकमेकां करिती हनन।
हें चरित्र विषयाचें. ॥१९॥

साठी संवत्सर।
प्रसवला ब्रह्मकुमर।
ऐसा विषय दुर्धर।
प्राप्त जाला धनंजया. ॥२०॥

धन्य तो पांडुकुमर।
परनारी सहोदर।
चित्तीं आणिक विचार।
नसे सुभद्रेवांचोनी. ॥२१॥

सुभद्रेपासीं गुंतलें मन।
विकार करिती विषयघ्राण।
हें संकष्ट देखोन।
कृष्ण जाहला सुभद्रा. ॥२२॥

षोडशशृंगार करून।
प्रवेशली कुंजवन।
करीं आरती घेवून।
प्राणनाथा वोंवाळिलें. ॥२३॥

उभी राहिली तिष्ठत।
पार्थ स्वरूप अवलोकीत।
म्हणे,'तुज कोणें केलें श्रुत?।
हें मज आश्चर्य जाहलें.' ॥२४॥

येरी म्हणे,'पतिव्रतेचें लक्षण।
भ्रतारें करितां संकेतीं स्मरण।
तत्काळ यावें त्वरेनें।
तयेसी म्हणती पतिव्रता.' ॥२५॥

हें ऐकतां श्वेतवाहन।
परम लज्जित अंतःकरण।
म्हणे,'हें कृष्णाचें शयनस्थान।
येथें रमतां अधःपात.' ॥२६॥

मग म्हणे सुभद्रेसी।
'तुलंघीं माझ्या वचनासी।
तुवां जावें स्वगृहासी।
हें न कळतांची कृष्णातें.' ॥२७॥

मग सुभद्रा बोले वचन।
'मज द्यावी मुद्रिका खूण.'।
तंव बोले अर्जुन।
'हे मुद्रिका कृष्णाची. ॥२८॥

दहा अवतारांचीं चिन्हें।
क्षण एक दिधली नारायणें।
ते कैसी देऊं तुजकारणें?।
पुसेल तरी काय सांगूं तया?' ॥२९॥

येरी धरी दृढचरण।
'निशीसी देईन स्वामीकारण।
मज श्रीकृष्णाची आण।
सहसा अभिलाष न करीं.' ॥३०॥

मग विचारी अर्जुन।
'एका क्षणाचें कारण'।
मग करींची काढून।
देता जाहला सुभद्रे. ॥३१॥

ऐसी घेवूनि खूण।
पावली आपुलें भवन।
चिंता करी अर्जुन।
केव्हां निशी प्राप्त होय. ॥३२॥

'जरि कां पुसेल हृषीकेशी ।
काय म्हणावें तयासी ।
केव्हां प्रवतल निशी ।
मागणें मुद्रिका सुभद्रे.' ॥३३॥

तों रवि जाला अस्तमान ।
निशीसि एकांतीं दोघेंजण ।
पार्थ कर पसरोन ।
म्हणे,'मुद्रिका मज द्यावी. ॥३४॥

कुंजवनींची खूण ।
मज द्यावी त्वरेनें' ।
सुभद्रा बोले वचन ।
सहसा, 'नसे म्यां देखिली. ॥३५॥

मज श्रीकृष्णाची आण ।
आणि साक्ष तुमचे चरण' ।
ऐसें ऐकतां अर्जुन ।
क्रोधें भरला. ॥३६॥

म्हणे, 'स्त्रिया असती ।
सत्याचें असत्य करिती ।
आणि पतिव्रता म्हणविती ।
अभिलाष मांडिला मुद्रेचा. ॥३७॥

स्त्री असत्याची राशी ।
विश्वासां नये स्त्रियेसी ।
अभाग्य घालोनि विरोचनासी ।
वध केला तात्काळ. ॥३८॥

ऐसी यांची करणी ।
यांसी टाय वदे - धरणी ।
मिथ्या न वदें वाणी ।
याचा साक्ष श्रीकृष्ण.' ॥३९॥

मग पद्मासन घालून ।
पण केला अर्जुनानें ।
'मुद्रिकेंचे न होतां दरुषण ।
आलें मरण उभयवर्गा.' ॥४०॥

सुभद्रा म्हणे, 'नारायणा ! ।
कृपेनें रक्षणें आमुचिया प्राणां ।
विलंब होतां जगजीवना ! ।
प्राण देहीं न राहे.' ॥४१॥

ऐसें ऐकतां स्मरण ।
तों मंदिरीं होता श्रीकृष्ण ।
म्हणे, 'हें आश्चर्य कोण ?' ।
हास्य करिता जाहला. ॥४२॥

मग म्हणे रुक्मीण ।
'कां केलें हास्यवदन ?' ।
सांगतां लज्जित मन ।
तैं रुक्मीण लागे चरणीं. ॥४३॥

मग म्हणे नारायण ।
'कुंजवन पाहतां अर्जुनानें ।
तों विषयें व्यापिलें मन ।
त्यासि सुभद्रा आठवली. ॥४४॥

आपण जालों सुंदरी ।
खूण मुद्रिका घेतली करीं ।
तो भरला क्रोधें भारी ।
मुद्रिका मागे सुभद्रेसी.' ॥४५॥

ऐसें ऐकतां रुक्मीण ।
सौहस्य करिती हास्यवदन ।
मग उठिला नारायण ।
आला गृहा धर्माचिये. ॥४६॥

पार्थसुभद्रा लागलीं चरणीं ।
सविस्तर सांगती चक्रपाणी ।
'खूण मुद्रिका न दे मजलागुनी ।
अभिलाष मांडिला.' ॥४७॥

कृष्ण म्हणे सुभद्रेसीं ।
'लांच्छन लावूं नका कुळासी ।
वंचनार्थ स्वामीसीं ।
करितां अधःपात.' ॥४८॥

सुभद्रा म्हणे, 'जगज्जीवना ! ।
जरी असेल देखिली या नयना ।
तऱ्ही माझिया पंचप्राणां ।
भस्म व्हावें ये क्षणीं.' ॥४९॥

'सत्य' म्हणे श्रीकृष्ण ।
'अन्यथा नव्हे तुझें वचन' ।
मग म्हणे अर्जुनाकारण ।
'सुभद्रा आहे निष्कलंकी. ॥५०॥

माजी मुद्रिका द्यावी मजला ।
पसरोनि मागे पीतांबराला ।
दाहा अवतारींचीं चिन्हें तियेला ।
माजी वस्तू मज द्यावी.' ॥५१॥

ऐकतां श्रीहरीचें वचन ।
कज्जळपूर्ण पार्थाचे नयन ।
'आतां अग्निकाष्ठ घेईन ।
काय वदन दाखवूं तुज ?' ॥५२॥

ऐसें देखतां निर्वाण ।
मुद्रिका काढिली करींचें भूषण ।
'सत्य दोघांचें वचन ।
मी जालों सुभद्रा.' ॥५३॥

हें ऐकतां अर्जुन ।
करिता जाला अधोवदन ।
मग म्हणे नारायण ।
'नसे द्वैत उभयतां. ॥५४॥

तूं नर, मी नारायण ।
हरिहर दोघेजण ।
वेदव्यासाचें वचन ।
हें प्रसिद्ध त्रिलोकीं. ॥५५॥

हे भविष्योत्तरपुराणींची कथा ।
श्रोते व्हावें सा[ वधिता ] ।
मुक्तेश्वरकवि वदता ।
महाभारती. ॥५६॥

—××—

## ८. शतमुखरावणवधाख्यान.

सद्गुरुकृपावसंतकाळ ।
मनआरामी माजतां[१] प्रबळ ।
श्रीरामकथा जिव्हाकोकिळ ।
मधुरस्वरें आलापे. ॥ १ ॥

रावणवधाचिये आधीं ।
युद्धसमयप्राप्तसंधीं ।
कुंभकर्णाचे वंशवृद्धी ।
कारण जालें अवचट[२]. ॥ २ ॥

कुंभनिकुंभ या उभय कुमरां- ।
माजी निकुंभाची दारा ।
जाली देखोनि गरोदरा ।
पितृभुवना पाठविली. ॥ ३ ॥

ते लंघोनी द्वीपांतरा ।
सगर्भा पातली माहेरा ।
नवमास भरतां सुंदरा ।
दुष्ट कुमारा[३] प्रसवली. ॥ ४ ॥

१. पाठ–माजला. २. पाठ–परियेसा. ३. पाठ–कुपुत्रा.

पौंड्रिक ठेवूनी नामाभिधान ।
मुखें क्रमीत असतां दिन ।
तंव[1] कुलक्षयवृत्तांतबाण ।
श्रवणमर्मी[2] खडतरला. ॥ ५ ॥

रावणबंधुप्रधानकुमार ।
रामें वधिले सहपरिवार ।
बिभीषणासी राज्याधिकार ।
देऊनि केला अक्षयी. ॥ ६ ॥

हें ऐकोनी निशाचरी ।
वाहावली शोकसरितापूरीं ।
कुमारदृष्टी[3] रक्षण करी ।
वोढोनी आणी[4] तटाका. ॥ ७ ॥

परी बिभीषणऊर्जिताची व्याधी ।
लागली तये[5] दुर्बुद्धी ।
पुत्रप्रौढत्वदिव्यऔषधी[6] ।
अवधीमात्रा लक्षिती. ॥ ८ ॥

बाल्यकौमारस्वप्नसुषुप्ती ।
सरतां[7] आली तारुण्यजागृती ।
तव तो राक्षस दुष्कर्म जगतीं ।
कुबुद्धिदृष्टी[8] देखत. ॥ ९ ॥

माउलीलागी पुसे वृत्तांत ।
पूर्वजांची काय मात ।
तूतें वैधव्यअंधकूपांत ।
कोणें सूदलें ? सांग पां.' ॥१०॥

श्रीरामकुठार[9] अतिप्रचंड ।
तयाशीं[10] पितामहबंधु मिनला द्वंद्व ।
समूळेंमीं[11] करून खंडखंड ।
तव कुळतरू छेदिला'. ॥११॥

परिसतां[12] हे मातृगिरां ।
क्रोध नावरे[13] निशाचरा ।
म्हणे, 'गोत्रवधपापाचारा[14] ।
प्रायश्चित्त मी जाणें ॥१२॥

न[15] करूनियां प्राणनाशा ।
बिभीषण लंघवीन[16] दश दिशा ।
तरीच कुंभकर्णाची स्नुषा ।
पुत्रवंती एकली.[17] ॥१३॥

ऐसें[18] वदोनियां त्या अवसरा ।
सवेग भरला गगनोदरा ।
क्षीरसिंधूच्या पैलतीरा ।
मायापुरा पातला. ॥१४॥

तेथें नमती चंद्रसूर[19] ।
निबिड दारुण अंधकार ।
माजी असंख्य निशाचर ।
पर्वतप्राय एक एक. ॥१५॥

येउनी शोणितापुरा[20] ।
नित्य आशिती दिनकरा ।
तयां सकळांमध्यें[21] धुरा ।
नाम[22] रावण शतमुख. ॥१६॥

---

१. पाठ-तों. २. पाठ-हृदयवर्मी. ३. पाठ-मग कुमरें आशोचिया करी. ४. पाठ-आणिली. ५. पाठ-तव. ६. पाठ-पुत्रप्रौढत्व दिव्य आर्धा । औषधीमत्रा अक्षयी । ७. पाठ-सरला पावला जागृती. ८. पाठ-कुबुद्धि भ्रष्ट. ९. पाठ-श्रीरामबाणकुठार अति प्रसिद्ध. १०. पाठ-तयाशीं बिभीषण बंधु मिळाला द्वंद्व. ११. पाठ-समुळेंसीं केला निखंड. १२. पाठ-वृत्तांत परिसोनी मातृगिरा. १३. पाठ-न सांवरे. १४. पाठ-गोत्रबंधु पाचारा. १५. पाठ-न करिशं देहनाशा. १६. पाठ-लंघोनि दिग्दिशा. १७. पाठ-इह लोकीं. १८. पाठ-ऐसें बोलानी प्रतिज्ञात्तरः;इया बोलोनीयां प्रतिज्ञोत्तरा. १९. पाठ-सूर्यकिरा. २०. पाठ-श्रोनी नदीतीरा. २१. पाठ-सकळां मुख्यधरा. २२. पाठ-मुख्य.

त्याचे वंदुनीयां[1] चरण ।
पौंड्रिक रिघता[2] जाला शरण ।
पूर्ववृत्तांत करूनी श्रवण ।
पुढे[3] विनंती निवेदिली. ॥१७॥

जेणें राक्षसकुळधाम ।
रामाग्नि लाऊनियां केलें भस्म ।
तो मम पूर्वजांमाजी अधम ।
निर्भयपणें नांदतसे. ॥१८॥

त्यातें करूनी पदच्युत ।
त्यांची होणें[4] लंकानाथ ।
हा मज याचकाचा मनोरथ ।
पूर्ण करिजे,[5] दातारा ! ॥१९॥

'अवश्य' म्हणोनी शतमौळ ।
सवें[6] घेउनी अपार दळ ।
गगनपंथें[7] उतावेळ ।
मेघाकृती[8] चालिला. ॥२०॥

सर्वही उतरून[9] लंकापुरा ।
वेढोनी[10] वर्षती शस्त्रधारा ।
बिभीषण होउनी घाबरा ।
थोर झुंजार वीरां पाचारी. ॥२१॥

मज[11] करोनी सकळ दळ ।
युद्ध केलें अतितुंबळ ।
परंतु तें परचक्रदळ ।
असंभाव्य आगळें ॥२२॥

बिभीषणसैन्यभद्रजाती ।
शत्रुशस्त्रें सिंहाकृती ।
झगटतां[12] प्राणयशकीर्ति ।
एकही तेव्हां न लाहे. ॥२३॥

जाणोनी तें अलोट विघ्न ।
चौघां प्रधानासहवर्तमान ।
रावणानुज[13] पलायमान ।
उत्तरदिशे संचरला. ॥२४॥

पळतां[14] बिभीषणसद्भावो ।
दुर्जनीं मांडिला विजयउत्सवो ।
राज्यीं स्थापूनी पौंड्रिकरावो ।
शतशीर्ष गेला स्वस्थाना. ॥२५॥

येरीकडे लंकानाथ ।
जाला फार चिंताग्रस्त ।
अयोध्ये येऊनियां त्वरित ।
राजालयीं[15] प्रवेशला. ॥२६॥

तों[16] राम बैसले सिंहासनीं ।
भोंवत्या बिबुधांच्या श्रेणी ।
दाटल्या[17] असतां तेच क्षणीं ।
राक्षसराज पातला. ॥२७॥

श्रीरामचरण[18] देखतां दिठी ।
रावणानुजें घातली मिठी ।
रामें[19] आलिंगुनी कंठीं ।
अति सन्मानें बैसविला. ॥२८॥

---

१. पाठ–नमस्कारोनी. २. पाठ–निघाला. ३. पाठ–पुढील इच्छीत निवेदी. ४. पाठ–व्हावें. ५. पाठ–कीजे. ६. पाठ–संगे. ७. पाठ–व्योमपंथें. ८. पाठ–मेघापरी. ९. पाठ–येऊनी. १०. पाठ–वेढोनी वर्षती शस्त्रमार. ११. पाठ–सिद्ध. १२. पाठ–प्रगटतां. १३. पाठ–रावणानुजें यः पलायन. १४. पाठ–निघतां. १५. पाठ–राजांगणीं. १६. पाठ–श्रीराम बैसला सिंहासनीं । भोंवत्या बंधूच्या श्रेणी । १७. पाठ–सभा दाटली असतां तेच क्षणीं. १८. पाठ–रघुनाथचरण देखतां दृष्टी. १९. पाठ–श्रीवरें.

श्रीरामपदाब्जपराग ।
सेविती लंकेशनयनभृंग ।
[1]मंदहास्य जानकीरंग ।
निजभक्तासीं अनुवादे. ॥२९॥

म्हणे 'सोडोनी[2] राज्यासन ।
दुरी[3] केलें आगमन ।
वदनचंद्रीं लांच्छन ।
घन चिंतेचें दिसतसे.[4] ॥३०॥

सांग पां यासि[5] कारण कोण ?' ।
येरू बोले वंदुनी चरण ।
'तुवां[6] दिधलें लंकाधन ।
तें शताननें[7] हरितलें. ॥३१॥

शतमुखश्रृगालदुराचरण ।
ऐकोनी श्रीरामपंचानन ।
क्षोभला जैसा हुताशन ।
शुष्मे[8] इंधनीं स्पर्शतां. ॥३२॥

ते दिवशीं एकादशी ।
श्रीराम होते उपवासी ।
लोटली[9] असतां प्रहर निशी ।
तेव्हां वदतसे प्रतिज्ञा. ॥३३॥

'उदया[10] न येतां तमारी ।
शतशीर्षासी मारूनी रात्रीं ।
तुतें स्थापुनी लंकापुरीं[11] ।
पारणें करीन अयोध्ये. ॥३४॥

हें साच न करीं जरी बोलणें ।
तरी माझ्या पूर्वजा उणें ।
ऐसें वदुनी[12] रघुनंदनें ।
पूशिलें 'वास्तव्य त्याचें कोठें?'॥३५॥

रावणानुज सांगे गोष्टी ।
'क्षीरसिंधूच्या पैलतटीं ।
शोणितेचे[13] निकटीं ।
मायापुरीं वसतसे. ॥३६॥

जाणोनि[14] ते असाध्य मात ।
चिंता करीं अयोध्यानाथ ।
म्हणे, 'आमचें नेमव्रत ।
केवीं पावे सिद्धीतें ?' ॥३७॥

पश्चात्तापनदीआंत ।
श्रीराम वाहात[15] वाहात जात ।
नारदागमन अकस्मात ।
विशाल तारू[16] लाधला. ॥३८॥

नमस्कारूनी[17] देवमुनी ।
बैसविला हेमपीठासनीं[18] ।
ऋषि संतोषोनी सुधावचनीं ।
श्रीरामासी[19] अनुवादे. ॥३९॥

'तव चित्तनिर्मळगंगाजळ ।
चिंताकर्दमीं दिसतसे[20] गढूळ ।
कोणत्या[21] दुःखाचा विटाळ ।
पडला तूतें राघवा !' ॥४०॥

---

१ पाठ-मंदहास्ये. २. पाठ-सांडोन राज्यासन । दूरी जालें आगमन । ३. पाठ-दूरूनि झालें आगमन. ४. पाठ-भासतसे ५. पाठ-यावायसी. ६. पाठ-जी तुम्ही दिधलें लंकाधन । शतमुखरावणें हिरतलें । ७. पाठ-शतमुखरावणें हरियेलें. ८. पाठ-शुष्क इंधनीं. ९. पाठ-क्रमिली असतां. १०. पाठ-उदय न होतां क्षणमात्रीं. ११. पाठ-लंकाक्षेत्रीं. १२. पाठ-बोलोनि. १३. पाठ-श्रोणानदीच्या पैलतरीं; श्रोणनदीचे काठीं. १४. पाठ-ऐकतां हे; ऐकतांचि दूर पंथ । विस्मित रोह अयोध्यानाथ । १५. पाठ-चिंता. १६. पाठ-तारूं लागलें; तरू लाधला ; तारूं भेटलें. १७. पाठ-तंव नमस्कारिलें. १८ पाठ-कनकासनीं. १९. पाठ-श्रीराम तो. २०. पाठ-गढुळ. २१. पाठ-काय संशयाचा विचार प्रबळ । झाला तूतें राघवा.

भक्तकैवारालागून[1] ।
दुर्जनाचें कीजे हनन ।
यालागीं[2] युद्धीं पण ।
म्यां आजी केला, सर्वज्ञा ! ॥४१॥

तया प्रतिज्ञापर्वतातें ।
न उचलवे सामर्थ्यहस्तें ।
म्हणोनीयां माझ्या चित्तें ।
चिंतार्णवीं हिंडिजे.' ॥४२॥

ऐकोनि[3] हांसे ब्रह्मतनय ।
'देखिलें हें महदाश्चर्य[4] ।
मृगांबुसरितापूरभयें ।
अगस्ति कांपे थरथरां. ॥४३॥

तेवीं तूं गा ! सर्वेश्वर ।
आचरतोसी लौकिकाचार ।
असो[5], आतां हा विचार ।
सांगतां तो[6] आकर्णी. ॥४४॥

जवळ हनुमंत असतां मुधा ।
कायशी चिंताक्षयरोगबाधा[7] ?' ।
ह्या[8] ऐकुनी युक्तिशब्दा ।
रघुराज स्तवी[9] कपीतें. ॥४५॥

म्हणे,[10] 'सप्ताब्धिगर्ता ! प्रबळा ! ।
उलंघवीं आम्हां पांगुळां ।
मायापुरीं राक्षसमेळा ।
शीघ्र दावीं लोचनीं ' ॥४६॥

आज्ञा करितां त्रैलोक्यपाळ ।
कपी वाढिन्नला द्रुम विशाळ[11] ।
सत्यलोका[12] लाउनी मौळ ।
ठाकला मेरूसारिखा. ॥४७॥

गर्जोनि बोले, 'विश्रेयधामा !'[13] ।
वोळंघिजे[14] माझ्या शरीरद्रुमा ।
परिवारेंशीं शतमुखग्रामा[15] ।
आतांचि नेईन[16] क्षणार्धें. ॥४८॥

मग बिभीषण आणि ब्रह्मकुमर ।
बंधुसहित श्रीरामचंद्र ।
सर्व[17] घेउनी अपार वीर ।
कपितनुपर्वतीं[18] वळघले. ॥४९॥

अंजनीतनयकायांबरीं ।
वीरनक्षत्रांचिया हारी ।
अवयवसांधपर्वतागारीं[19] ।
बैसते जाले समस्त. ॥५०॥

कपी वामचरण शरयूतीरीं ।
सव्य ठेवी मायापुरीं ।
समस्त उतरोनियां भूमीवरी ।
कदनगांधळा घालिती.[20] ॥५१॥

श्रीरामजगज्जनींचे भुतें[21] ।
पाजळोनी दीपिकापोत ।
वीरश्रीप्रेमेंकरूनी[22] तृप्त ।
पट्टणचौका भोंवतें. ॥५२॥

---

१. पाठ-कैवारी लागून. २. पाठ-म्हणोनियां. ३. पाठ-हासोनि बोले विरंचितनय. ४. पाठ-परमाश्चर्य. ५. पाठ-असोनी येक विचार; असो मी एक विचार. ६. पाठ-तें अनुसीं. ७. पाठ-राक्षसक्षयरोग बाधा. ८. पाठ-परिसोनि मुनिच्या युक्त शब्दा. ९. पाठ-प्रार्थी. १०. पाठ-म्हणे बलाब्धि कार्या प्रबळा । लंघूनियां समुद्रजळा । ११. पाठ-अति विशाळ. १२. पाठ-सत्यलोकाहूनी मौळ. १३. पाठ-विश्रामधाम. १४. पाठ-लंघवीजे. १५. पाठ-शतमुखधाम. १६. पाठ-दावीन. १७. पाठ-संगें घेऊनि असंख्य वीर. १८. पाठ-कपीश्वरपर्वता वळंघले. १९. पाठ-अवयवसंधीं पवनचक्रीं. २०. पाठ-मिसळले. २१. पाठ-भृत्य. २२. पाठ-विरीं श्रीप्रेमेंकरूनि नृत्य । पाटणचौका भोंवती ।

जुंझारवीर अनेकी ।
सिंहनादाचे चौडंकीं ।
गर्जोनीयां[1] बोलती मुखीं ।
'उदो, उदो' श्रीअंबेचा. ॥५३॥

कपिभुभु कारसमेळ ।
त्राहटितां[2] कांपिन्नला भूगोळ ।
तो महाशब्दव्याळ ।
शतशीर्षकर्णी झोंबिला. ॥५४॥

सावध होउनी निशाचर ।
पाचारूनियां समस्त वीर ।
म्हणे,[3] 'शत्रुभूतसंचार ।
नगरा वेष्टित दिसत[4] आहे. ॥५५॥

'शीघ्र हरावयातें बाधा[5] ।
तुम्हीं गेलें पाहिजे युद्धा' ।
म्हणे काळकेतु[6] प्रबुद्धा ।
प्रधानातें आज्ञापी. ॥५६॥

शूर पंचाक्षरी काळिक ।
आंगवळें[7] तो मांत्रिक ।
घेउनी महावीरांचें कटक ।
वैरियां उजू लोटला. ॥५७॥

देखोनी श्रीरामसैन्यभूता ।
टाकिती श्रीबाणास्त्रमंत्रा[8] ।
येरीं न गणून निर्भयता ।
राक्षसांसीं जुंझती. ॥५८॥

हनुमंतमहाद्भुताकार[9] ।
देखोनी भ्याले निशाचर ।
काळकेतें धरूनियां धीर ।
युद्ध केलें सत्राणें. ॥५९॥

त्यातें[10] श्रीराममहाकाळें ।
घालोनियां बाणजाळें ।
तनुजळाहूनी वेगळे ।
प्राणमत्स्य काढिले.[11] ॥६०॥

कांळकेतक[12] पावतां मृत्य ।
अंगलंग[13] पळोन जात ।
शतशीर्षमुख्यालागीं मात ।
सांग सांगती[14] युद्धाची. ॥६१॥

म्हणती, 'आम्ही वीर विरवारी ।
बाणरदें[15] शत्रुजिव्हारीं ।
डंखिलें[16] परी ते धन्वंतरी ।
शस्त्रविष[17] बाधूं नेदिती.' ॥६२॥

हें देखोनी महानंदें ।
उसाळजे[18] कालेयकालकूटें ।
तें[19] श्रीरामनीलकंठें ।
घोटोनि केलें निर्विष.[20] ॥६३॥

१. पाठ-वाजवोनियां गर्जिजे मुखीं. २. पाठ-दुमदुमिला ब्रह्मांडगोळ। तो मायाशब्दनादव्याळ. ३. पाठ-म्हणती शत्रुभूतसंचार । नरां वेष्टित जालासे. । ४. पाठ-झालासे. ५. पाठ-ते बाधा. ६. पाठ-त्या काळिका अतिप्रबुद्धा. ७. पाठ-अपार मेळवुनियां कटक । आणिक मेळवुनियां मंत्रिक । वैरियां सन्मुख चालिले । ८. पाठ-बाणमंत्राक्षता. ९. पाठ-महाभूताकार. १०. पाठ-त्यांत. ११. पाठ-टाकिले. १२. पाठ-कालिक कुर्कुट. १३. पाठ-अगलंग पिलीं. १४. पाठ-सांगितली. ५. पाठ-बाणवदनें. १६. पाठ-खंडिलें, देशिलें. १७. पाठ-शस्त्रविष-बाधा न गणिती. १८. पाठ-उसळे जें कालेयकूटें; उसळती काळियाकुर्कुटें. १९. पाठ-त्यांत श्रीराम नीलकंठ । कोठांनी केलें निर्माण. २०. पाठ-निर्नाम.

वृत्तांतघृत श्रवणकुंडीं ।
पडतां क्रोधाग्नि धडाडी ।
कुशब्दज्वाला वमतां तोंडीं ।
रणांगणीं पातला. ॥६४॥

देखोनी[१] मानवांचे वृंद ।
शतमुखें केला सिंहनाद ।
मग[२] दुर्मति अतिकुशब्द ।
राघवउजू जल्पत. ॥६५॥

'शीघ्र[३] भक्षावया मृत्युफळें ।
जाले तुम्हांसी डोहळे ।
कीं पाश घालोनी मृत्युकाळें ।
भेटावया[४] आणिलें. ॥६६॥

तुटली आयुष्याची दोरी ।
मृगें[५] शिरती शबराघरीं ।
सिंह[६] वसे त्या कांतारीं ।
गजभार येरी चरावया. ॥६७॥

रामा ! नोहे हे लंकापुरी ।
प्रत्यक्ष[७] काळव्याघ्राची दरी ।
येथें तुम्हीं मानववीरीं ।
येईजे हें अपूर्व वाटे. ॥६८॥

'दवडावया[८] प्राणदैन्या ।
मार्गों आलेती मरणधना ।
तरी स्वहस्तकीं[९] मृत्युदाना ।
देतसें तुम्हां सकळांतें.' ॥६९॥

ऐसें बोलोनी दुराचारी ।
वर्षला[१०] बाणखदिरांगारीं ।
ते लागोनी सर्व शरीरीं ।
रामसेना पोळली. ॥७०॥

घायें परिवार जाला भस्म[११] ।
अरिवर्म देखोनी मेघश्याम ।
शरधारांचे अपार स्तोम ।
शतमुखक्षिती ग्विवीत. ॥७१॥

श्रीरामबाण असंख्य बिंदू ।
शतमुख गिळी राक्षससिंधू ।
कोपोनियां जगद्बंधू ।
संधान करी पुनरपि. ॥७२॥

बाणसर्प सोडी उदंड ।
तितुके खंडी[१२] निशाचरगरुड ।
राम शरें[१३] वर्षला प्रचंड ।
प्रळयरुद्रासारिखा. ॥७३॥

राम प्रेरी वज्रांतराच्या हारी ।
परी त्या पडती वदनागारीं ।
शतमुखवन्हिकुंडामाझारी ।
सायकतृणें भस्मती.[१४] ॥७४॥

आश्चर्य करती अंगलंग ।
विश्वतश्चक्षु जाला दंग ।
तों नारद म्हणे, 'प्रयोग ।
असे याचा निराळा. ॥७५॥

तुजसारिखे जगजीवना ! ।
जेथुनी अवतार[१५] निघती नाना ।
अनंत ब्रह्मांडांची रचना ।
संकल्पमात्रें संभवें. ॥७६॥

---

१. पाठ–लक्षुनी. २. पाठ–मग अति दुर्बोध दुर्मदें । राघवाउजू तळपत. ३. पाठ–शीघ्र भक्षावी मृत्युफळें । म्हणोनि तुम्हासि जाइले डोहळे. ४. पाठ–भविष्य गे; भविष्य भुरळें. ५. पाठ–तित्तीर प्रवेशे. ६. पाठ–सिंहवसति तयाभीतरीं. ७. पाठ–काळांत व्याघ्रवल्लींची दरी. ८. पाठ–दंडावया. ९. पाठ–स्वहस्तकें /जाणा. १०. पाठ–वर्षो लागला. ११. पाठ–अक्षम. १२. पाठ–प्राशी, ग्रासी. १३. पाठ–शर वर्षला उदंड. १४. पाठ–पतंगप्राय भस्म होती. १५. पाठ–होती, अवतरती.

ते आदिशक्ति चिरंज्योती ।
जाळील शतमुखकर्पूराप्रती' ।
राघव म्हणे, 'तये वस्तीं[1] ।
आकाश[2] येणं अघटित.' ॥७७॥

'वर्म नेणसी[3] रघुपती ! ।
ते चिज्ज्योती जानकीसती ।
तिर्ते आणोनी शीघ्रगती ।
नमस्कारूनी प्रार्थी कां.' ॥७८॥

मुनिवचनोक्तिपीयूषपान ।
घडतां[4] तोषला राजीवनयन ।
कपींद्रातें कर जोडून ।
विनयशब्दें[5] अनुवादे. ॥७९॥

'आम्हांसहित[6] परिवारा ।
अपेशशक्तीनें केले धुरा ।
तरी आतां जीववावया[7] त्वरा ।
तुवां केली पाहिजे. ॥८०॥

अयोध्ये जाउनी पवनबाळा ! ।
आणीं जानकीद्रोणाचळा'[8] ।
आज्ञा होतां चरणकमळा ।
आकर्षिलें मार्गीं. ॥८१॥

शतमुख[9] मांडूनीयां ठाण ।
अपार करी शरसंधान ।
तें वारीत रघुनंदन ।
रणांगणीं उभा असे. ॥८२॥

तंव येरीकडे अयोध्यापुरीं ।
सीता निद्रिस्त निजमंदिरीं ।
देखोनी, कपी मनसागरीं ।
युक्तिमुक्ता धुंडीत. ॥८३॥

म्हणे[10], 'करितां शब्दघोष ।
निद्राभंगाचा घडेल दोष ।
स्वामिकांतेतें करतां स्पर्श ।
कामा[11] नये सर्वथा. ॥८४॥

म्हणोन उर्वीतें[12] उकरोन ।
मग तो हनुमंतश्रीकृष्ण ।
जनकात्मजागोवर्धन[13] ।
उचलोनी घेतला[14] कराग्रीं. ॥८५॥

कपिहस्त ते भागीरथी ।
वरी सदननाव[15] सीता सती ।
कीं करआकाशीं गृहइंदुदीप्ती- ।
माजी जानकी सतरावी. ॥८६॥

असो तो कपींद्रसुपर्ण ।
करपृष्ठीं क्षितिजानारायण ।
घेउनी रणसरोवरस्थान[16] ।
एकांची पावलें पातला. ॥८७॥

धांवत रघुनाथगजेंद्र ।
जाचीतसे शतमुखनक्र ।
तें काळीं सीताश्रीधर ।
भक्तधांवण्या[17] धांविनला. ॥८८॥

१. पाठ–व्यक्ती. २. पाठ–आकारावया अघटित. ३. पाठ–नेणं. ४. पाठ–होऊनि तोषला शेषशयन. ५. पाठ–विनयवेशें विनविंत. ६. पाठ–आम्हांसहित वानरा । आपे शक्तानें खेळापुरा । तरी जीव वांचवावे त्वरा । त्वां केली पाहिजे. ७. पाठ–यश वांचवावया. ८. पाठ–गुणवेल्हाळा. ९. पाठ–शतवदन त्रासुनी बाण । अपार करी रणकंदन । तव वरी रघुनंदन । १०. पाठ–म्हणे केल्या शब्दघोष । निद्राभंग केल्याचा दोष. ११. पाठ–करूं. १२. पाठ–वपरी आदिकरोन; तळीं. १३. पाठ–उचलों जाता. १४. पाठ–धरी. १५. पाठ–धुरी पुण्यश्लोकाची संगती. १६. पाठ–क्षण न लागतां त्वरा करून. १७. पाठ–भक्तकैवारा पातला.

धाम ठेउनीयां अवनी ।
हनुमंत म्हणे, 'कोदंडपाणी ! ।
निद्रिस्त देखोनी जगज्जननी ।
मंदिरासहित आणिली.' ॥८९॥

ऐकोनी श्रीराम उताविळा ।
प्रवेशला सदनदेऊळा ।
वोवरीगर्भी[1] चिद्रत्नकळा ।
देखता जाला लोचनीं. ॥९०॥

स्वप्नजागृती उपाधी ।
निरसुनी, सुषुप्तिसमाधी ।
सेवीत ते जगदानंदी ।
तूलिकापीठीं[2] लयस्थ. ॥९१॥

जाणोनी श्रीराम महेश्वरें ।
करटाळीच्या[3] महामंत्रें ।
श्रवणानिकटीं बीजोच्चारें ।
पुरश्चरण मांडिलें. ॥९२॥

आत्मा नेउनी ब्रह्मांडकमळीं ।
सीतायोगिनी पहुडली ।
जाणोनी रामटाळिया[4] वल्ली ।
श्रोत्रमस्तकीं चर्चित. ॥९३॥

साचळ सजळघन गर्जतां ।
झळकली जागृतीविद्युल्लता ।
मग मूळपीठींची देवता ।
खडबडोनी उठिली. ॥९४॥

सन्मुख[5] पाहुनी रघुनंदन ।
म्हणे, 'मी देखतें काय स्वप्न ? ।
मायापुरा गेले रमण ।
अयोध्येमाजी मी असें. ॥९५॥

केवढी हे दुर्धर भ्रांती ।
साचचि दिसे[6] रघुनाथमूर्ती ।
किंवा संकट[7] पडलें पती ।
म्हणोनी[8] स्वप्नीं दिसत आहे.' ॥९६॥

रघुनाथ म्हणे, 'हें मायापुर ।
मीं साच कौशल्याकुमर ।
युद्धीं संकट पडलें[9] थोर ।
म्हणोनी तुम्हांसी आणिलें. ॥९७॥

असंख्य माझे बाणभार ।
गिळीत शतमुखअजगर ।
विजयजळचरा[10] राक्षसढिवर ।
उचलों[11] नेदी मस्तक. ॥९८॥

निशाचर[12] म्हैसा येई क्षिती ।
जिणोनी[13] गांजिल्या सैन्यपंक्ती ।
तयातें तुवां परंज्योती ! ।
सामर्थ्यमूळ[14] निवटावें. ॥९९॥

आतां न लाउनी उशिरा ।
निधनमत्र[15] शतशीर्षअसुरा ।
कीं अमृतपान आम्हां सुरां ।
जगन्मोहनी ! वाढीं कां' ॥१००॥

---

१ पाठ-वोवरीचि तूं रक्तझोळ. २. पाठ-स्थूळीं कपाटीं. ३. पाठ-करंतळीच्या हस्तमंत्रें ४. पाठ-म्हणोनि रघुनाथ टाळियावळी; रामटाळी पावली. ५. संनिध पाहतां ६. पाठ-भासली. ७. सांकडें. ८. पाठ-म्हणोनी स्वप्नामाजी ओल कीं. ९. पाठ-महाथोर. १०. पाठ-जैसा. ११. पाठ-उठूंच नेदी हो ! यशा; उरों नेदी सर्वथा. १२. पाठ-महिषासुर यशकीर्ति । जिणोनि गांजी सैन्यसंपत्ति । तयातें तूं परंज्योति । शार्ङ्गशूळें निवटावें. १३. पाठ-जाण गांजी सैम्यसुरपती. १४. पाठ-समुसळें. १५. पाठ-निर्दळा.

यापरी वृत्तांतश्रवणस्नान[1] ।
करूनियां स्तुतिपूजन ।
वर्णोपचार[2] मेळवून ।
सांगोपांग[3] मांडिलें. ॥१०१॥

'हरिहराची ध्यानमूर्ती[4] ! ।
जय जय चिद्रूपमूळशक्ती ![5] ।
जय जय अनादिशक्ती ! ।
परात्परे ! तुज नमो.[6] ॥१०२॥

ब्रह्मांडघट प्रसवती धरे ।
जय जय अरूपलावण्य त्रिपुरे ! ।
जय जय निर्गुणबीजाकारे ![7] ।
अजरामरे ! तुज नमो.' ॥१०३॥

समाप्त होतां स्तुतिपूजन[8] ।
नैवेद्य[9] अर्पिला धनुष्यबाण ।
साष्टांग घालोनी लोटांगण ।
'कृपा करीं'[10] म्हणतसे. ॥१०४॥

ते देखोनी भक्तिअनन्यता[11] ।
संतुष्ट[12] जाली जगन्माता ।
म्हणे,'प्रकटोनी[13] सामर्थ्य सविता ।
निशाचरतमा निर्दाळीन.' ॥१०५॥

ऐसे[14] बोल बोले महाशक्ती ।
आली रणभूमिकेआंतौती[15] ।
चौभुजांची आकृती ।
धरती जाली भ्यासुर. ॥१०६॥

पाशांकुश धनुष्यबाण ।
करीं[16] वसवी तों रणस्फुरण ।
पातलें, तें वज्रठाण ।
मांडोनियां ठाकली. ॥१०७॥

मग संहारवन्हीची ज्वाळा ।
दीर्घ वाढली[17] अंतराळा ।
राक्षसकुळप्रलयजळा[18] ।
शोषावया[19] लागोनी. ॥१०८॥

ब्रह्मांडामीं[20] महदाकाश ।
गिळी ऐसा अद्‌भुत वेश ।
देखोनी त्रास पावे शेष ।
सुरवर चळचळां कांपती. ॥१०९॥

शतमुख लक्षुनीयां सन्मुख ।
कार्मुकीं[21] एकची सायक ।
लाउनी सोडितां एक एक ।
प्रसवुनी[22] जाले शतवरी. ॥११०॥

१. पाठ-श्रवणस्तवन. २. पाठ-वर्णोचारें, वर्णगावर्ये. ३. पाठ-यथासांग मांडीत. ४. पाठ-ध्येयमूर्ति. ५. सदये स्वानुभूति. ६. पाठ-( संपूर्ण ओवी ) हरिहराची संध्येय मूर्ति । जय जय सदय स्वानुभक्ति जयजय आनंदी अव्यक्ति । परात्परे तुज नमो. ७. पाठ--लावण्यबीजाक्षरे. ८. पाठ-स्तवनार्चन. ९. पाठ-नैवेद्या वोपिलें. १०. पाठ-किजे. ११. पाठ-अन्योन्नता. १२. पाठ-तुष्टली ते. १३. पाठ-उगऊं नेदीं सामर्थ्यसविता । निशाचरतम-नाशिनी । म्हणे प्रकटोनी सामर्थ्यसविता । निशाचर मारीतसें. १४. पाठ-ऐसें बोलोनि महाशक्ती, वदोनि ऐसें आदिशक्ती. १५. पाठ-रणभूमीभोंवती. १६. पाठ-करीं वसवितां आलें स्फुरण । मांडोनियां वज्रठाण । रणीं उभी ठाकली. १७. पाठ-वोढवी विशाळा. १८. पाठ-प्राणजळा. १९. पाठ-ग्रासावया. २०. पाठ-(संपूर्ण ओवी)-ब्रह्मांडेशीं महदाकाश । गिळिलें ऐसा अति आवेश । दावितांचि पन्नगवेश । सुरनर चळीं कांप. २१. पाठ-घेऊनि अभंग कार्मुक । लाऊनि बाण सोडितां येक येक. २२. पाठ-प्रसवोनि होती शतावरी.

तिहीं झगटोनी शतकंधरीं ।
शिरें उडविलीं गगनोदरीं ।
गरगरां भोवोनी अंबरीं[1] ।
उलथोनी[2] पाडिला[3] अवनिये. ।।१११।।

चापीं मंत्रोनी यंत्रगोळ ।
उसळोनी एकें एक मौळ ।
उडवितां, राक्षसप्राणजळ ।
आटोनी गेलें निःशेष. ।।११२।।

मातला राक्षसजोंधळा ।
म्हणोनी स्वकर्माचा इळा ।
घेवोनि शक्तीनें एकचि वेळां ।
शतही कणसें खंडिलीं. ।।११३।।

भ्यासुर राक्षसकलेवर[4] ।
अंकुशें केलें क्षतजर्जर ।
अंगलग निशाचर ।
मारूनी केले निर्बीज. ।।११४।।

मायापुरीं अक्षोभजळें ।
पोशिलीं होतीं शतमुखकमळें ।
तीं चापशरकरांगुळें ।
सीतादेवीनें खंडिलीं.[5] ।।११५।।

राक्षसमृत्युलग्नसिद्धा ।
जालियावरी सीता निजानंदीं ।
आणि श्रीराम सैन्यमांदी ।
विजयधेंडा[6] नाचत ।।११६।।

अंबरीं तोषोनी सुरवर[7] ।
भूतळीं सांडिती पुष्पभार ।
सकळां मुखीं जयजयकार ।
घोष[8] झाला ते काळीं. ।।११७।।

मग जनकजा परब्रह्मशक्ती ।
परिमार्जुनी[9] दीर्घाकृती ।
येउनीयां पूर्वस्थितीं ।
रघुनाथअंकीं आरूढली.[10] ।।११८।।

भूमागंगाविशाळरूप ।
उगमा[11] येतां दिसे स्वल्प ।
योगमायेची[12] लीला अमूप ।
ब्रह्मादिकां नानुमाने.[13] ।।११९।।

विशाळरूपनग[14] अनेक ।
आटोनी पूर्वाकृतिकनक ।
सीता होतां, रविकुळटिळक ।
लंकापुरीं चालिले. ।।१२०।।

कपितनुजाहाजीं सहपरिवार ।
बैसोनि,[15] जलाब्धीचा वावर ।
आज्ञावार्ते करूनी शीघ्र ।
मार्गअंबुधी लंघिला. ।।१२१।।

हनुमंतें चरणमंदरगिरी ।
वंदुनी[16] श्रीरामआज्ञा शिरीं ।
लंकाक्षीराब्धींच्या तीरीं ।
उचलोनियां[17] टेविला. ।।१२२।।

---

१. पाठ–भ्रमती चक्राकारीं. २. पाठ–पुनरपी. ३. पाठ–अधोगती पडियेली. ४. पाठ–देंठकळिवर. ५. पाठ–धुंडाळी. ६. पाठ–झेंडा. ७. पाठ–नेणवे; नकळेची. ८. पाठ–विशाल रूपादार देख. ९. पाठ–बैसनां जलधिजावर । आज्ञावंत वेगें शीघ्र । मार्गाब्धि अंबु लंघिला; बैसोनियां जलधीवर । हर्षयुक्त अति सत्वर. १०. पाठ–उचलोनि आत्माराम आज्ञेवरी. ११. पाठ–उतरोनियां ठेविला; ठेवितां झाला तात्काळीं. १२. पाठ–जीवघात; प्राणघात. १३. पाठ–शरणांगता रक्षिलें. १४. पाठ–आज्ञावचन. १५. पाठ–वंदी. । १६. पाठ–उचलोनि आत्माराम आज्ञेवरी. १७. पाठ–उतरोनियां ठेविला; ठेवितां झाला तात्काळीं.

एका पदें लंकाद्वारीं ।
कपी प्रविष्ट जालियावरी ।
तळीं उतरोनी समस्त वीरीं ।
पौंड्रिक आणिला धरोनी. ॥१२३॥
त्याचा करावा जों घात[1] ।
तंव तो म्हणे, 'मी शरणागत' ।
हें ऐकोनी जनकजाकांत ।
राक्षसातें[2] रक्षीत. ॥१२४॥
'पितामहानुजाआधीन ।
होऊनि पाळीं आज्ञापन'[3] ।
'निकें' म्हणोनि श्रीरामचरण ।
पौंड्रिक नमी[4] सद्भावें. ॥१२५॥
अवलोकोनी[5] कृपादृष्टीं ।
बिभीषण स्थापिला राज्यपीठीं ।
येरीं जोडिल्या करसंपुटीं ।
राघवा नमिलें साष्टांगीं. ॥१२६॥
मग परिवारेंशीं कौशल्यातनय ।
वळंघे[6] कपिकायाश्रय ।
अयोध्यापुरीं वेगीं[7] जाय ।
निमिषार्धे[8] न लागतां. ॥१२७॥
कपिचरणउभयसरिता[9] ।
शरयूतीरीं संगम होतां ।
अवलोकोनी त्रिवेणीतीर्था[10] ।
रामसेना[11] उतरली. ॥१२८॥
जिरउनी ब्रह्मद्रोही सर्व ।
हनुमंत जाला[12] यथापूर्व ।
आज्ञा घेउनीयां सर्व[13] ।
जाते जाले स्वस्थळा.[14] ॥१२९॥
श्रीराम प्रवेशतां[15] राउळ ।
होता जाला प्रातःकाळ[16] ।
स्नान करूनी उतावेळ ।
संध्याजपनेम[17] सारिले. ॥१३०॥
पंक्ती घेउनी द्विजोत्तमांसी ।
साधनी[18] साधली द्वादशी ।
भोजन[19] करूनी सुखैकराशी ।
सिंहासनीं[20] बैसले. ॥१३१॥
श्रीरामप्रतीज्ञाद्राक्षावल्ली[21] ।
कपितनुमंडपीं[22] विस्तारली ।
शक्तिसामर्थ्यपीयूषफळीं ।
सत्कीर्तिघोस प्रसवली. ॥१३२॥
हे हनुमंतनाटकींची कथा ।
महाराष्ट्रभाषा[23] यथार्थ उलथा ।
विश्वंभर[24] जाला वक्ता ।
मुक्तेश्वर अनुवादे.[25] ॥१३३॥

१. पाठ-जीवघात, प्राणघात. २. पाठ-शरणागता रक्षिलें. ३. पाठ-आज्ञावचन. ४. पाठ-वंदी. ५. पाठ-बिभीषणातें कृपादृष्टी । लक्षोनि स्थापिला राज्यपटीं. ६. पाठ-वळघला. ७. पाठ-त्वरित. ८. पाठ-क्षणार्धेहा. ९. पाठ-कपिद्वयचरणसरिता । शरयूतीरा संगम होता. १०. पाठ-त्रिवेणीसरिता. ११. पाठ-रामसैन्य उतरलें. १२. पाठ-आला. १३. पाठ-वीर सर्व. १४. पाठ-स्वगेहा;स्वगृहा. १५. पाठ-प्रवेशले. १६. पाठ-उषःकाळ. १७. पाठ-जपजाप्यकर्म स्थापिलें. १८. पाठ-साधन साधावया द्वादशी. १९. पाठ-पारणें होतां गुणैकराशी. २०. पाठ-भद्रासनीं. २१. पाठ-द्राक्षवेली. २२. पाठ-कपींद्रमंडपीं. २३. पाठ-महाराष्ट्रशोभा. २४. पाठ-विश्वतोमुखी जाला वक्ता । मुक्तेश्वर गुरुप्रसादें. २५. पाठ एकापोथींतील समाप्तिलेख असा-इति श्रीहनुमंतनाटकीं शतशीर्षवधो नाम [ आख्यानं ] समाप्तम् । संपूर्णमस्तु ॥ शके ६९२ विकृतिनाम संवत्सरे माहे श्रावण वद्य ३० ते दिने संपूर्ण केलें । हस्ताक्षर शिवजी माधवजी प्रभु कायस्थज्ञाती माहिमकर यांहीं लिहिलें असे । पठणार्थं ॥

# ९. शुकरंभासंवाद.

तुज कामाक्षीचेनि वरें ।
कामनाजाणीव[१] अंगीं भरें ।
मग अविकारी[२] विकारभरें अवतरे ।
इंद्रियासनीं भोगार्थ. ॥ १ ॥

सुरतासनाची हे डाक ।
तुजपायीं[३] वाजतां देख ।
घुमों लागे अधिकाधिक ।
लोळती लोक तुजपायीं.[४] ॥ २ ॥

म्हणोनि त्रैलोक्यवेधके ! ।
त्रैलोक्यक्षोभकारके ! ।
तपसोमकांत[५] उदकें ।
मुखेंदुकिरणीं करितातीं.' ॥ ३ ॥

ऐशिया अमृतोपम वचनीं ।
रंभा गौरवी वज्रपाणी ।
सखियांसहित अप्सरगणीं ।
तेणें येरी संतुष्ट. ॥ ४ ॥

शक्रवाक्येंदुरश्मिस्पर्शें ।
रंभावदनकुमुद विकासे ।
हस्त जोडणीयाचेनि मिसें ।
संकोचलीं करपद्में.[६] ॥ ५ ॥

विनय चर्चोनि शरीरीं ।
रंभा वचनवाटोगारीं ।
सुरेंद्रश्रोत्रलिंगावरी ।
पूजा बांधी संभ्रमें. ॥ ६ ॥

म्हणे, 'आज्ञा देईं सुरनाथा ! ।
कवणा विघ्न करूं आतां ? ।
स्वर्गा येती त्यांच्या पंथा ।
अर्गळा[७] होऊनि राहूं ? ॥ ७ ॥

घालूं नेमिष्ठावरी धाडी ? ।
पाडूं योगियांच्या[८] मुरकुंडी ? ।
तपश्चर्येची[९] पोतडी ।
हिरोनि आणूं या ठायां ? ॥ ८ ॥

माझ्या देहाचें वोढण ।
आड असतां, तुम्हां विघ्न ।
स्वप्नींही परि नाहीं जाण ।
दुश्चित्त मन कां करिसी ?' ॥ ९ ॥

ऐकोनी रंभेच्या वचना ।
हर्ष न मंटे शक्रमना ।
आज्ञा देऊनी सुरांगना ।
शुकाश्रमा पाठविली.[१०] ॥१०॥

म्हणे, 'वेगीं जाय सुभद्रे ! ।
मदनांगनेसम सुंदरे ! ।
मदनमेखले ! मनोहरे ! ।
जेथें वसे[११] तो तपी. ॥११॥

---

१. पाठ–कामना आंगीं जाणीव भरें । २. पाठ–अविकार विकारीं अवतरे. ३. पाठ–पराच्या पायीं अडकतां. ४. पाठ–तिजपायीं. ५. पाठ–तपसोमकांताचिया उदकें. ६. पाठ–मुखपद्में. ७. पाठ–मार्गार्गळा. ८. पाठ–यतींचिया. ९. पाठ–तपश्चर्येची पोतडी । हिरोणि आणूं तयांची. १०. पाठ–पाठवीत. ११. पाठ–वसतो तपिया.

तया शुका क्षोभवी बळें ।
तपा विघ्न करीं वहिलें ।
समाधि भंगोनी, कामकळें ।
भुलवोनि करीं आपैसा.[1] ॥१२॥

जैसा निरपेक्ष अयाचित ।
तोही द्रव्यार्थ होय भ्रमित ।
कां, तत्त्वनिष्ठ विवेकवंत ।
गुरुत्वमानें नाचवीजे. ॥१३॥

तयापरी व्यासतनया ।
मोहोनि आणीं इया ठाया ।
जैसें पूर्वी उर्वसीया ।
विश्वामित्रालागोनी.' ॥१४॥

ऐशीं शचीवराचीं वचनें ।
रंभेनें केलीं कर्णभूषणें ।
मगशुकमोहार्थ[2] उत्साहमनें ।
निघती झाली तात्काळ.[3] ॥१५॥

आरूढली दिव्य विमानीं ।
तेजें लोपले द्वादश तरणी ।
रत्नमाळा, घंटा, किंकिणी ।
वरी[4] ढळती चामरें. ॥१६॥

उपमेरहित पुष्पकीं शोभा ।
शिखरें, गोपुरें ध्वजस्तंभा ।
पताका झळकती त्या प्रभा ।
विद्युल्लता लज्जित. ॥१७॥

पैजा बोलोनी शुभानना ।
प्रतापें चालिली ऋषिकानना ।
बाळा, मुग्धा, प्रौढांगना ।
नाना कन्या समवेत. ॥१८॥

हस्तिनी, चित्रिणी, शंखिणी ।
चांपेगोरटिया पद्मिनी ।
षोडशवर्षा सुरतासनीं ।
कुशल कळा जाणत्या. ॥१९॥

कटकें मांडिलीं शुकावरी ।
म्हणोनि कामाचीं दळें नारी ।
साह्य घेतल्या झुंझारी ।
वैराग्याशीं भिडती ज्या. ॥२०॥

वस्त्रें नितंबीं वेष्टिलीं[5] ।
तेंचि दुर्गें पन्नासिलीं ।
पुढें निरिया[6] त्याची पौळी ।
कडेलागीं[7] लागटा. ॥२१॥

चरणीं गर्जती नूपुरें ।
तींच वाजलीं रणतुरें ।
योगाभ्यासिया[8] भेदरें ।
तया ध्वनी मुरताती. ॥२२॥

रक्त रंगाचीं करार्ग्रे[9] ।
तीच मिरवती खड्गाकारें ।
नयनकटाक्षाचेनि शरें ।
नेमें विंधिती नेमियां. ॥२३॥

उदरीं त्रिवळीचिया रेखा ।
तेचि कटारा खोविल्या देखा ।
पांखरांचीं[10] कुळें ऐका ।
खेटकाकारें शोभती. ॥२४॥

कठिण कुचाग्र अणियाळी ।
तेचि भालियाची फळी ।
हृदयें नरांचीं कोंवळीं ।
विदारिती कौतुकें. ॥२५॥

---

१. पाठ–आपैता. २. पाठ–शुक्रविग्रहा. ३. पाठ–तत्काळीं. ४. पाठ–पाहालें रुळती चमराचीं. ५. पाठ–वेढिलीं. ६.पाठ–निरियाची पौळी. ७.पाठ–क्रीडेलागीं लागटा. ८. पाठ–योगाभ्यासीं भेदुरें । तया ध्यानीं सरताती. ९. पाठ–करारें १०. पाठ–पाखियाचीं कुडें येका.

अंगीं चंदनाची उटी।
तेंच वज्रकवच नेहटीं।
कस्तुरी रेखिली ललाटीं।
तेंचि टोप बाणले. ॥२६॥

भंगावया तपोदुर्गें।
गजभार प्रेरिला[1] अनंगें।
माजीं मुखरिणी निजांगें।
रंभा मिरवे मृगाक्षी. ॥२७॥

तुरें दुंदुभीचे घोष।
भेरी गर्जविती[2] आकाश।
रागोद्धारी विणे सुरस।
श्रुती[3] देती सुस्वर. ॥२८॥

यावेगळीं[4] अप्रसिद्धें।
वाद्यें वाजती नानाविधें।
सुरस अमृताचे स्वादें।
गंधर्व गायन करिताती. ॥२९॥

ताळमृदंगाच्या मेळीं।
नृत्य करिती सप्त ताळीं।
राग आलाप गद्यारोळीं।
विनोद करिती परस्परें. ॥३०॥

सरिसा वसंत कुसुमाकर।
परिमळें भरे अंबर।
आणिक नाना विभ्राकार[5]।
देखतां विकार उपजविती. ॥३१॥

मैथुन करिती क्षणक्षणा।
तया पक्षियांचीं युग्में जाणा।
करीं घेऊनी दिव्यांगना।
हास्य करिती विनोदें. ॥३२॥

हंस हंसिणींच्या प्रेमें।
थामा[6] कुरवाळिती संभ्रमें।
रमों लागती सकामें।
सुवर्णपक्ष पसरोनी. ॥३३॥

दोन मर्कटें दोहीं करीं।
मध्यें सोडिती[7] एक वानरी।
दोघे रमतां दों प्रकारीं।
कौतुकें नारी हांसती. ॥३४॥

एकीचे[8] हातीं कस्तुरीमृगें।
मुखा मुख लावोनि दोघें।
सुरतसुखालागीं स्वांगें[9]।
मृग मृगीवरी वोळघती. ॥३५॥

एकीचे हातीं चित्रीव[10] पट।
चौऱ्यांयशी आसनांचे प्रगट।
मैथुनें लिहिलीं, जीं वीट।
वैराग्यातें उपजविती. ॥३६॥

एकीं उघडे टाकिले[11] कुच।
एकीं मुक्त केले कच्छ।
एकीं फेडुनी आच्छाद।
वस्त्रें केलीं परौतीं. ॥३७॥

सुरतासनाची घडमोडी।
एक दाविती कडोविकडी।
ऐशा विघ्नरूपाचिया कोडी।
रंभा घेऊनी पातली. ॥३८॥

ताळतंत्राचा[12] निर्घोष।
गीत गायन करिती सुरस।
जेथें वसे शुकयोगीश।
तें पुण्यारण्य[13] टाकिलें. ॥३९॥

---

१. पाठ–पेलिले. २. पाठ–गर्जतसे. ३. पाठ–श्रुती देती काशळ. ४. पाठ–अर्थसिद्धें. ५. पाठ–विधिकर. ६. पाठ माना. ७. पाठ–सांडिला. ८. पाठ येकीच्या करा. ९. पाठ–चांगें. १०. पाठ–विचित्र. ११. पाठ–घातले. १२. पाठ–तालपत्राचा. १३. पाठ–पुण्यवन.

तेथें पवित्रतेचेनि तरुवरें ।
दाटों लागलीं अपारें- ।
ज्याचें नाम घेतां[1] हरे ।
शीण तापपापाचा.[2] ॥४०॥

जैसा[3] वनदेवतांचा मेळा ।
तैसें व्यापिलें वना सकळा ।
किंवा शक्तीचिया स्थळा ।
कोटीं कुब्जीं वेढिजे. ॥४१॥

ममता लोपी आत्मप्रभे ।
कार्पण्य विटंबी यशशोभे ।
नाना सत्याचें सामर्थ्य दंभें ।
आच्छादिजे ज्यापरी. ॥४२॥

तैसें व्यापुनी सर्व वना ।
शोधीत आल्या तया स्थाना[4] ।
त्यातें वेढोनी अंगना ।
पहात ठेल्या समस्त. ॥४३॥

शुकाभोंवत्या[5] कामिनी ।
जैशा रत्यर्थ याम्यकिणी ।
शुक योगियांचा शिरोमणी ।
कैसेनि पावे भ्रमातें ? ॥४४॥

श्रीरामासन्मुख शूर्पनखा ।
उभी व्हावया निर्नासिका ।
तैशापरी ते पुढारीं शुका[6] ।
रंभा उभी सखियांशीं. ॥४५॥

कीं मोहमाहेरींची[7] देवी ।
कामुकाचे नवस पुरवी ।
अळंकार ल्याली, तेणें रवी ।
झांकोळला अंबरीं. ॥४६॥

नागवुनी सुरांच्या श्रेणी ।
हरितलीं मनोलक्षणनाणीं ।
तीं[8] सांटवितां हृदयस्थानीं ।
तेणें[9] आलें जडत्व. ॥४७॥

सांटविलीं[10] तीं सांडती क्षणीं ।
यालागीं कंचुकीगोणी- ।
माजी दाटोनी[11] कसणी ।
बिरडें कशी सुबद्ध. ॥४८॥

मन्मथोत्सवें मदोन्मत्त ।
अक्षय तारुण्य हेलावत ।
कामदृष्टी अवलोकीत ।
चेंडू झेलीत सुमनाचे.[12] ॥४९॥

श्वेत कृष्ण इक्षुदंड ।
झाडी[13] तैसा कामकोदंड ।
मस्तक तुळीतसे[14] ब्रह्मांड ।
उणें मानूनी सौंदर्या. ॥५०॥

जे जे दिशे[15] न्याहाळी ।
ते ते जळ[16] कामानळीं ।
ऐसा न दिसे कोणी बळी ।
ज्या काम नुपजे देखिल्या. ॥५१॥

---

१. पाठ-ऐकतां. २. पाठ-तापसाचा. ३. पाठ-तेथें विचरे वनदेवतामेळ । तैसें वेढिलें वन सकळ । जेंवि का शक्तीचें स्थळ । कोढीं कुब्जीं व्यापिलें. ४. पाठ-शुकाच्या स्थाना. ५. पाठ-शुकासभोंवत्या. ६. पाठ योगिया शुका. ७. पाठ-ते महाकामेश्वरी देवी. ८. पाठ-तेणें भरिले कुचकुंभ दोन्ही. ९. पाठ म्हणोनि आलें जडत्व. १०. पाठ-सांठविलें तें सांडेल क्षणी. ११. पाठ--दाटुनियां. १२.पाठ-कुसुमाचे. १३. पाठ-झाडीतसे. १४. पाठ-तुळीतसे. १५. पाठ-दिशा उजू न्याहाळी. १६. पाठ--भरे.

देव, दानव, गंधर्व, ऋषी, ।
ब्राह्मण, महात्म्ये, तपोराशी, ।
लागतां कामबाणाचे पाशीं[1] ।
पिसे होती तात्काळ.[2] ॥५२॥

जिच्या कटाक्षाच्या घायीं ।
हुंबत घायाळ झाले हृदयीं ।
त्यांतें उपाय[3] तिसरा नाहीं ।
दुःखशमनार्थ[4] तिजविना. ॥५३॥

एक अधरामृतपान ।
तेंच रसराजसेवन ।
कुचालिंगन तें लेपन ।
औषधीचें वरौतें. ॥५४॥

असो, ऐशियापरी रंभा ।
धरोनि दांभिकतेची शोभा ।
शुक छळावयाच्या लोभा ।
पुढां उभी विनोदें. ॥५५॥

अवलोकी[5] ती शुकाची स्थिती ।
तो जितेंद्रिय सत्त्वमूर्ति ।
चर्चिली निष्ठेची विभूती ।
तेणें सर्वांग शोभलें. ॥५६॥

ब्रह्मरसें वोतिलें[6] ।
तैसें तेज मुखास आलें ।
निश्चयकमंडलीं भरलें ।
ज्ञानोदक सर्वदा. ॥५७॥

सत्य, धृती, अलोभ, क्षमा, ।
ऐशी तपोगुणमहिमा ।
दिधली नसे, तया गरिमा[7] ।
नाहीं[8] आथिलेपणाची. ॥५८॥

संकल्पप्राण मनोमृगाचा ।
गेलिया, निर्विकल्प त्वचा ।
त्यावरि विदेही तो साचा ।
पद्मासनीं निश्चळ. ॥५९॥

'कृष्णोहमस्मि'[9] बोध सतत ।
तेंची[10] कृष्णाजिन उपवीत ।
मेखळा गाढ[11] दृढ व्रत ।
मुद्रा मिरवी शांभवी. ॥६०॥

उत्पत्तिविनाशाचीं पातीं ।
विचारें सारोनी परौतीं[12] ।
अविनाश नासाग्रीं[13] निरुती ।
दृष्टि टेविली निजलक्षीं. ॥६१॥

परतत्त्वीं लय मनाचा ।
तेणें उदय प्रसन्नतेचा ।
सर्गीं परम धारणेच्या ।
कुशासनीं मिरवत. ॥६२॥

अगाध सत्त्वें सत्त्वाथिला ।
ऐसा रंभेनें देखिला ।
कामदृष्टी अवलोकिला ।
कटाक्षबाण[14] सजोनी. ॥६३॥

अनुपम्य लीला लक्षोनि[15] नयनीं ।
रंभा परम आश्चर्य मानी ।
'वयें[16] धाकटा परि हा महामुनी ।
तपोज्ञानें अतिवृद्ध. ॥६४॥

---

१. पाठ-पिशीं. २. पाठ-तत्क्षणीं. ३. पाठ-प्रकार. ४. पाठ-निववाक्या. ५. पाठ-अवलोकितां. ६. पाठ-ब्रह्मरसाचें वोतिलें. ७. पाठ-दिधली नाहीं. ८. पाठ-तया. ९. पाठ-सोहमस्मीति १०. पाठ-तोचि कृष्णाजिनी उपवीत. ११. पाठ-गाढली. १२. पाठ--परतीं. १३. पाठ--नगरी. १४. पाठ--मदनबाण. १५. पाठ--पाहातां. १६. पाठ--म्हणे.

कीं श्रीतुळशीचें रोप जेसें ।
दृष्टी पाहतां सान दिसे ।
परि पवित्रपणें मस्तकीं वसे[1] ।
विश्ववंद्य विष्णूच्या. ॥६५॥

तेंवि वयासी नाहीं च्याड ।
ज्ञान वसे तोचि[2] वाड ।
वांचोनि बाभळेचें खोड ।
काय करावें बहुकाळींचें ? ॥६६॥

असो, ऐसाही जरी जाला ।
तपोवैराग्यें थोरावला ।
तरी 'मी जिंकीन' जया बोला ।
आन नाहीं सर्वथा. ॥६७॥

पुण्याचें अक्षोभ्य[3] बळ ।
एकली निंदा करी विकळ ।
कीं कोटिदानाचे असंख्य मेळ ।
निष्ठुर वाक्यें विध्वंसी. ॥६८॥

तेंवी शुकाचे नेम गहन ।
भंगोनि, क्षोभवीन मदन ।
माझिया भोगापुढें तृण ।
वैराग्य मानितें[4] करीन." ॥६९॥

ऐसा भिवसा धरोनि चित्तीं ।
बोलती झाली शुकाप्रती ।
तें अनुपम निरूपण श्रोतीं ।
एकचित्तें[5] परिसावें. ॥७०॥

'अहो ! सकळ मुनींच्या नाथा ! ।
ज्ञानवैराग्यऐश्वर्यवंता[6] ।
मिनल्या सुकृताच्या सरिता ।
तपोनिधी ! तुजलागीं. ॥७१॥

तुझिया कीर्तीचा सुगंध ।
विश्वीं फांकिला विशद ।
यालागीं पावोनियां बोध ।
मी मधुकरी पातलें. ॥७२॥

आतें जनांचा पारिजात ।
ऐकोनि[7] आले अभ्याग्यवंत ।
भाग्यतेचें[8] आतिथ्य ।
तुवां केलें पाहिजे. ॥७३॥

सकळां अभ्यागतचि गुरू ।
म्हणोनी उचित आदरू ।
ऐसा धर्ममार्गीचा विचारू ।
आलियातें करावें. ॥७४॥

आसनाभावें[9] तृणासन ।
अन्नाभावें उदकदान ।
हेंही[10] न टिके, तरी वचन ।
अमृतोपम बोलावें. ॥७५॥

तरी सांगें योगींद्रा ! महाऋषी ! ।
कोण कामना वसे मानसीं ? ।
निर्वाण तपश्चर्या ऐसी ।
कोण काळ मांडिली ? ॥७६॥

वय तरी नव्हे वैराग्याचें ।
दिसे कर्तव्य अविचाराचें ।
शिकविलें तें न मनी कोणाचें ।
ते दुराग्रहाचे सांगाती. ॥७७॥

जीवात्म्याचे ऐक्यसोसें ।
परतत्त्वाचें ध्यानपिसें ।
न[11] करीं इंद्रियांचे निःशेषें ।
सर्व यामाजी जाणावें. ॥७८॥

---

१. पाठ--वसे. २. पाठ--तेंचि. ३. पाठ--अक्षोभ. ४. पाठ--मनी ते रंभा. ५. पाठ--येकाग्रचित्तें. ६. पाठ--ज्ञानैश्वर्य-उत्तमोत्तमवंता. ७. ऐकोनि आले अभ्यागत । अभ्यागताचें आतिथ्य । केलें तुम्ही पाहिजे. ८. पाठ--अभाग्यात. ९. पाठ--आसना द्यावें. १०. पाठ--देहीं नेटकें. ११. पाठ--न करीं इंद्रियार्थाचे निशेषें । संयमाचें, साजणे !

हें भोजनेंवीण अंचवणें ।
कीं कर्दळी[1] न फळतां खांडणें ।
शुष्क नदीचें पोहणें ।
वाळुवंटी पैं जैसें. ॥७९॥

न पेरितां जाण शेती ।
शिमग्यावीण शंखावती ।
प्रसूतिसमयाची आर्ती ।
कुमारीतें ज्यापरी. ॥८०॥

तेवीं[2] ये दशे संन्यासविधि ।
न[3] घडे, सांडी हे उपाधी ।
गुह्यगोष्टी बोल सुबुद्धी ।
जे जिव्हारीं वसतसे.' ॥८१॥

मात ऐकूनि रंभेची ।
मांदी देखोनि स्त्रियांची ।
म्हणे 'आजि[4] भ्रांतीची ।
विपरीत कांहीं दिसताहे.' ॥८२॥

ऐसें नावेक विचारिलें ।
ज्ञानदृष्टी अवलोकिलें ।
'माझिया तपा विघ्न मांडिलें ।
हें जाणवलें' सर्वज्ञा. ॥८३॥

'रंभा धाडिली अमरनाथें ।
ते छळावया आली मातें' ।
ऐसें जाणोनि[5] निश्चितार्थे ।
बोलता झाला तियेसी. ॥८४॥

शुक म्हणे, 'सुखवल्लभे ! ।
नंदनवाटिकेचे रंभे ! ।
दिव्यकंदर्पकर्पूरगर्भे ! ।
श्रृंगारकेळीं केळवसी. ॥८५॥

ते केळी[6] उपडोनी समूळीं ।
टाकिलीसे मरुस्थळीं ।
जेथें[7] जनवार्ता कर्णभूतळीं ।
विरूढलीं[8] तृणेंचि दुर्लभ. ॥८६॥

हें घोरारण्य भयानक ।
विलासियां दुःखदायक ।
तृषातुरां न मिळे उदक ।
तेथें आहारार्थ कैं लाहे ? ॥८७॥

ऐशा क्लेशरूप ठाया ।
तूं आलीस कवणा कार्या ? ।
कल्याण आहे कीं सुरालया ।
सुरांसहित इंद्राचें ? ॥८८॥

दैत्यदानवीं नेदितां त्रास ।
अमरावती न होतां वोस ।
तुवां सांडोनि स्वर्गवास ।
किमर्थ येथें आलीसी ? ॥८९॥

कवणा प्रयोजनाकारणें ।
तुज येथवरि झालें येणें ? ।
माझा आश्रम कथिला कोणें ।
निष्कारण द्वेषियें ? ॥९०॥

म्हणसी महारोगें पीडिलें ।
तें वैद्यातें शोधीं[9] वहिलें ।
अर्थापासीं स्वार्थार्थिलें ।
धांवे तंव उचित. ॥९१॥

तैशी धरोनी जे भावना ।
तूं आलीस यया वना ।
ते वंध्या वेलींच्या सुमना- ।
सारखी निर्फळ जाण, वो ! ॥९२॥

---

१. पाठ–कदळीनें फळ खांडणें. २. पाठ–तैंच. ३. पाठ–न घडे हे दंभोपाधी. ४. पाठ–अति. ५. पाठ–बाळांनी. ६. पाठ–कोणें. ७. पाठ–कर्णवार्तेची. कर्णमुळी. ८. पाठ–विरूढी तृणाची. ९. पाठ–शोधीत जाय.

चंद्रमंडळ भरलें अमृतें ।
परि तें मृगजल मानवांतें ।
पाताळधन निर्दैवातें[1] ।
मृत्तिकेसरी कां न म्हणावें ? ॥९३॥

पैं वो ! जें अप्राप्त आपणा ।
तें नाहींच ऐसें जाणोनि मना ।
कां सुख न द्यावें ? वासना ।
वाढविणें सखेदू. ॥९४॥

तैसा तुझा वो ! संकल्प ।
तो माझ्या ठायीं निर्फळरूप ।
मी वैराग्यचंपकविटप ।
तव कामनाभ्रमरीये. ॥९५॥

जेणें सर्पें दंशिलें[2] तूतें ।
त्याच्या विषउतारातें ।
धन्वंतरी नाहीं येथें ।
मागें, पुढें, आतांही. ॥९६॥

ऐसें जाणोनि[3] निःशेष ।
न धरीं निराशेची आस ।
म्हणशी वन पहावयाचा हर्ष ।
धरूनी येथें आलीयें. ॥९७॥

तरी सुखें अवलोकीं नयनीं ।
परि चिरकाळ दुःख पावसी मनीं ।
म्हससी ऐसीये कठिण स्थानीं ।
तूं कैसा वसतोसी ? ॥९८॥

तरी ऐक रंभे ! सावधान ।
भूतां भ्यासुर नव्हे मसण ।
विषकीटका विष जीवन ।
जें का गमे मरण दे सर्वां. ॥९९॥

तैसा मी येथें[4] जाण, ।
तुज संगेंवीण न गमे क्षण ।
मी निश्चल, तुझें मन ।
दाही दिशा धांवत.[5] ॥१००॥

त्यां सांडिली कामाची चाड ।
तूतें सर्व भोगांचें कोड ।
यालागीं मज हें स्थान गोड ।
अति अवघड तुजलागीं. ॥१०१॥

जो भाव धरोनी पोटीं ।
मज पाहसी कुटिळदृष्टी ।
तो अर्थ न लभे, हिंपुटी ।
जीव न करीं सर्वथा. ॥१०२॥

आतां आलीस जेणें पंथें ।
तेणें मार्गें शीघ्र परतें, ।
काळक्रमणा[6] व्यर्थ येथें ।
कार्यैवीण कां कीजे ?' ॥१०३॥

ऐसें शुकाचें निष्ठुर वचन ।
रंभेसी वाटलें उदासीन ।
जैसें असाध्य रोगियालागून ।
निराशा वैद्यें दाविली. ॥१०४॥

पुढतो वदे मधुर वाणी ।
'अन्यायेंवीण महामुनी ! ।
वोखटें मानूनियां मनीं ।
काय ऐसें बोलिजे ?[7] ॥१०५॥

मी काय बोलिलें अनुचित ।
साक्षेपें सांगतसें हित[8] ।
तितुकें[9] भावितां विपरीत ।
दुराग्रहेंकरूनी. ॥१०६॥

---

१. पाठ-निर्द्रव्यातें. २. पाठ-डंखिलें. ३. पाठ-जाण. ४. पाठ-येकाकी. ५. पाठ-धांडोळी. ६. पाठ-परी कालहरणा व्यर्थ येथें । कार्जेवीण कां करिसी ?. ७. पाठ-बोलतसां. ८. पाठ-स्वहित. ९. पाठ-जितुकें भावितसां.

मोक्षवस्तीची[1] वासना ।
धरूनी[2] दुराशा ब्राह्मणा ! ।
यया घोर दारुण वना- ।
माजी एकटे वसतसां. ॥१०७॥

हे[3] नानादुःखापदा ।
व्यथेनें विंधिती रोगव्याध ।
देहीं शोक संताप खेद ।
वाढो[4] धरिती आगळी. ॥१०८॥

आधींच[5] शैत्याची धरणी ।
त्यावरी हिमकाळाची[6] मिळणी ।
होतां, देहाच्या अंगणीं[7] ।
व्याधी घालिती गोंधळ. ॥१०९॥

वायू वाजतां झडझडाडें ।
स्पर्शतां अंगीं वात चढे[8] ।
गात्रें होती[9] लांकडें ।
बळें चाळितां न चळती. ॥११०॥

तृषे[10] न मिळे जीवन ।
तेथें भुकेला[11] कैचें अन्न ? ।
ऐसें त्रास देतें स्थान ।
कैसेनि मन स्थिरावे ?[12] ॥१११॥

स्थिर न होतां अंतःकरण ।
कैसें लागे स्वरूपीं ध्यान ? ।
यालागीं स्वस्थ[13] चित्त तें साधन ।
बुद्धि ब्रह्मीं मिळावया. ॥११२॥

चित्त तेंच होय स्वस्थ ।
जैं भोग[14] भोगुनी तृप्त ।
एरवीं[15] तुंबा बुडविला त्वरित ।
उसळोनी ये वरिता. ॥११३॥

तैसें मन प्रपंचीं धांवे ।
साधक पश्चात्तापीं भोंवे[16] ।
जैसें विवर्ती पडलें तें न पवे ।
ये थडी, ना ते थडी. ॥११४॥

कुशाग्रींचें[17] आसन ।
कीं कंपित पद्मजीवन[18] ।
तैसें[19] निश्चळ नव्हे मन ।
बुद्धि ऐकें तैसीच. ॥११५॥

शरीरदंडनादि तप ।
ब्रह्मचर्यव्रतसंकल्प ।
वनवासादि खटाटोप ।
सांडी संतापदायक. ॥११६॥

वाक्य माझें ऐक आतां ।
प्रसन्न व्हावया सुव्रता ! ।
मी आलें, ऐसें चित्ता ।
सुनिश्चयें मनीं मानीं तूं. ॥११७॥

भला गा ! भला महाप्राज्ञा ! ।
उत्तम वर देईन दाना ।
जे आवडी असेल मना ।
तें मुखें मागें मजलागीं. ॥११८॥

---

१. पाठ-मोक्षवस्तूची. २. पाठ-धरूनि आलें दुराशा ब्राह्मण. ३. पाठ-हे नाना दुःखाचे अपशब्द । वेदने विंधिती रोगव्याध. ४. पाठ-वोढी. ५. पाठ-शैत्यें हे धरणी. ६. पाठ-हिमकराची. ७. पाठ-रंगणीं. ८. पाठ-वाढे. ९. पाठ-होऊनि. १०. पाठ-तृषा सुटल्या न मिळे जीवन. ११. पाठ-भुकेल्या. १२. पाठ-स्थिर होय. १३. पाठ-स्पष्ट साधन. १४. पाठ-भोगभोक्तृत्व. १५. पाठ-येरवीं जळीं बुडविला त्वरित । तुंबा उसळोनि ये वरौता. १६. पाठ-भावें. १७. पाठ-सूच्यग्रींचें. १८. पाठ-पद्मावरील जीवन. १९. पाठ-तैसें आश्चर्य मानून । बुद्धि ऐकें तत्त्वतां.

तुझ्या वाक्यसुमनापाटीं ।
सिद्धिफळाची होय भेटी ।
म्हणोनि अपेक्षा गोड पोटीं[1] ।
असेल ते त्वां प्रगटणें. ॥११९॥

पृथ्वीमंडळामाझारीं ।
अनर्घ्य[2] द्वीपद्वीपांतरीं ।
राजकन्या ज्या सुंदरी ।
गुणलावण्यसमर्था. ॥१२०॥

पुष्करद्वीपींच्या पुष्करनयना ।
श्वेतद्वीपींच्या चंद्रवदना ।
प्लक्षद्वीपींच्या[3] आरक्तचरणा ।
अतिप्रवीणा कामशास्त्रीं. ॥१२१॥

कल्मषद्वीपींच्या[4] हस्तिणी ।
क्रौंचद्वीपींच्या चित्रिणी ।
शाकलद्वीपींच्या शंखिणी[5] ।
व्याळस्तनी[6] नवयौवना. ॥१२२॥

सिंहलद्वीपींच्या पद्मिणी ।
दक्षिणदेशींच्या नागिणी ।
उत्तरदेशींच्या[7] महागायनी[8] ।
गुर्जरणी[9] अतिगौरा. ॥१२३॥

ऐशा कुळजा भूपकन्या ।
चतुर सुरतीं परममान्या[10] ।
त्या देईन, भाग्यधन्या ! ।
नित्य भोगार्थ तुजलागीं. ॥१२४॥

जरि म्हणसील या मानविणी ।
तरि पाताळींच्या नागपद्मिणी ।
शृंगारिल्या[11] अनर्घ्य रत्नाभरणीं ।
त्याही आणीन तवाशें. ॥१२५॥

तेणें[12] तृप्त नव्हे मन ।
तरी स्वर्गमांदूसेचीं रत्नें ।
जी श्रवणींच दावितां, मदनें ।
सकाम कीजे क्रीडार्ते. ॥१२६॥

गंधर्वकन्या अतिसुकुमारा ।
विद्याधरी, दिव्याप्सरा ।
तुज देईन, या उत्तरा ।
झणीं अन्यथा मानिसी. ॥१२७॥

याहूनि ऐश्वर्य अधिक ।
सुखागार[13] इंद्रलोक ।
तेथें राहोनि अनेक ।
भोग स्वेच्छ[14] भोगणें ॥१२८॥

जैशा आवडती मना ।
अभुक्ता कीं नवयौवना ।
देवकन्या विचक्षणा ।
क्रीडे सुखें तयांशीं. ॥१२९॥

काहीं कल्पिसी संदेहो ।
उधार बोलणें कृत्रिम स्नेहो ।
तरी रोकडा माझा देहो ।
तुज म्यां भोगार्थ दिधला. ॥१३०॥

दिव्यवस्त्रें स्रक, चंदन ।
गीत, तांबूल, अमृतपान ।
आसनशयनादि संपूर्ण ।
भोग मजशीं भोगीं तूं. ॥१३१॥

---

१. पाठ-मोठी. २. पाठ-अनर्घ्य रत्नें. ३. पाठ-कुशद्वीपींच्या. ४. पाठ-शाल्मल द्वीपींच्या. ५. पाठ-हंसिणी. ६. पाठ-पीनस्तनी. ७. पाठ-उत्तरखंडांच्या. ८. पाठ-महागाणी. ९ पाठ-गुज्जरणी. १०. पाठ-सुमान्या. ११. पाठ-गुंडिल्या. १२. पाठ-तेणेंही तृप्ति न कीजे मनें. १३. पाठ-सुखाचें आगर. १४. पाठ-स्वेच्छया.

जेव्हां पाहिजे जें जें वैभव ।
तें तें तत्काळ पुरवीन सर्व ।
आतां ऊठ[1], देईं खेंव ।
अतिप्रीतीनें[2] मजलागीं. ॥१३२॥

संशय सांडोनी मनीं ।
माझे संगीं इंद्रभुवनीं ।
चिरकाळ क्रीडें[3] महामुनी ! ।
नाना सुखें अनुभवीं. ॥१३३॥

अथवा सत्यलोकाआंत ।
कां, वैकुंठीं वसें गा ! सत्य ।
शिवसदनीं ऐश्वर्यवंत ।
होईं सरी शिवाचे. ॥१३४॥

अथवा लौकिकभोगाची कांहीं ।
वांच्छा वसतसे हृदयीं ।
तरी पृथ्वीताटींचें वाण घेईं ।
कीर्तिदीपें सोज्वळ. ॥१३५॥

चक्रवर्तीचें[4] बासिंग ।
भाळीं बांधोनी सुभग ।
धरणीबोहलें अभंग ।
होईं पती सतीचा. ॥१३६॥

एवं तुज जो जो वल्लभ ।
तो तो कृतार्थ करीन लाभ ।
आतां कामकार्पण्यलोभ[5] ।
सांडोनि उठीं गा ! झडकरी.' ॥१३७॥

ऐसी अनुवादली रंभा ।
जैसी मातंगगृहाची शोभा ।
परी सदाचारीं आर्त[6] लोभा ।
पहावया नुपजेची. ॥१३८॥

कीं वारांगनेचा शृंगारू ।
नव्हे उत्तमा मोहकरू ।
कुबेराचा सुवर्णमेरू ।
निरपेक्षा[7] तृणतुल्य. ॥१३९॥

कीं वोकोनि टाकिजे अन्न ।
तें अत्यंत गोडीनें चाटी श्वान ।
निर्मळें अवलोकितां आपण ।
वांती उपजे विशेष. ॥१४०॥

तैसें रंभेचें बोलणें ।
शुकें वाळोनि सांडिलें मनें ।
जैसा अनामिकाचा ब्राह्मणें ।
पाक[8] दृष्टी नाणिजे. ॥१४१॥

यापरि तिचें ऐकोनी वचन ।
कंटाळलें शुकाचें मन ।
मग प्रत्युत्तर वदे आपण ।
अति गंभीर विवेकी.[9] ॥१४२॥

'रंभे ! तुझा वाग्जल्प ।
वृथा श्रम करिसी पाप ।
सन्निपाताचा प्रलाप ।
तैसा मज वाटतो. ॥१४३॥

सुरापानें[10] झाला मत्त ।
यद्वा तद्वा बडबडीत ।
सर्पें दंशिला तो म्हणत ।
अत्यंत गोड कडूतें. ॥१४४॥

सर्वे चोर जाणितल्यावरी ।
कोण त्याचा विश्वास धरी ? ।
काय[11] न जळे वैश्वानरीं ? ।
तेथें प्रमाण कायसें. ॥१४५॥

---

१. पाठ–उठोनि. २. पाठ–परी प्रीतीनें. ३. पाठ–विचरें. ४. पाठ–चक्रवर्तीचें. ५. पाठ–कामनाकार्पण्य. ६. पाठ–आरत. ७. पाठ–अपेक्षारहिता. ८. पाठ–कूप दुरूनि वाळिजे. ९. पाठ–विवेकें. १०. पाठ–कां सुरापानें झाला मस्त । अद्वातद्वा बडबड करीत । सर्पें डंखिला तो म्हणत । अत्यंत गोड विषातें. ११. पाठ–काया.

तैसे हे तुझे घातक बोल।
स्वहितमुरसें निरस फोल।
तुझी बुद्धि[1] जाली बाळ।
बोलूं[2] नेणें म्हणूनियां.[3] ॥१४६॥

आतां पुढती हेंचि बोलणें।
मजसन्मुख बोलसी वदनें।
तरितें निर्फळ हो[4] तुझें वचन।
हाचि[5] शाप तूजसी. ॥१४७॥

संसाराचा घेउनी त्रास।
म्यां मांडिला योगाभ्यास।
तो त्रास कैसा, जैं क्लेश।
जन्ममरण भोगितां? ॥१४८॥

योनिद्वारें जन्मा आलों।
मसणमार्गें[6] मरोनि गेलों।
जावोनि मेलेचि देह पावलों।
पावोनि मेलों पुनरपी. ॥१४९॥

शीतोष्ण, क्षुधा तहान।
गर्भवासाचे कष्ट दारुण।
अनेक जन्मीं अनेक जाण।
साहों न शकें ते साहिले. ॥१५०॥

ऐसें रंभे! यथार्थ मात।
सांप्रत म्हणजे या जन्मांत।
अनुताप उपजला अद्भुत।
दुःख स्मरोनी[7] मागिलें. ॥१५१॥

पुढती न पवें जन्ममरण।
ऐसें निष्काम साधन[8]।
साधीतसें मोक्षसदन[9]।
परमात्म्यातें पावावया. ॥१५२॥

नाहीं स्वर्गसुखाची आर्ती।
नाहीं अमरपदाची प्राप्ती।
इंद्रें भय घेऊनि चित्तीं।
व्यर्थ तूतें पाठविलें. ॥१५३॥

सडलें[10] प्रेताचें पिशित।
पूयकृमिदुर्गंधिभरित।
तें श्वान सेवी त्वरायुक्त।
भयें देखे[11] सभोंवतें. ॥१५४॥

तेथें भूपही[12] देखतां दृष्टी।
ऐसी भावना करी पोटीं।
माझें आमिष न्यावया निकटीं।
येतसे लवलाहें. ॥१५५॥

तैसे इंद्रादिक म्हणसी[13] श्रेष्ठ।
परी ते स्वर्गमर्कट।
तपोधन देखोनि, दुष्ट।
छळण[14] करीती अपभयें. ॥१५६॥

तैसाची[15] सत्यलोकींचा महिमा।
कर्में गुंतला मुख्य ब्रह्मा।
तेथें निष्कर्म सायुज्यब्रह्मा।
कोण विश्राम पावेल? ॥१५७॥

१. पाठ-शाहाणी २. पाठ-बोलों नेणसी म्हणोनियां. ३. पाठ-यानंतर अधिकच्या ओव्या—कृत्रिम चातुर्याचिर्त्रा वस्त्र। आहाच वरी वेढिलें, आंत छिद्र। कुटिलता कालिमा जे अपार। कंडू उद्भव पापाचा॥ जेथें जगाचीं स्थूळ छिद्रें। दोष द्रवती निदाहारें। तऱ्ही अग्नि शमेना आदरें। उंच पाय टाकिसी.॥ ऐसा ठाव जो कां गूढ। तां या शब्दा करवें उघड। पसरूनि दाखितां निवाड। दृष्टी पडिलें अंतरींचें.॥ ४. पाठ-होतू सुजाणे! ५. पाठ-हाचि श्रापू तयासी. ६. पाठ-मरणमार्गें. ७. पाठ-सरोनी. ८. पाठ-निजसाधन. ९. पाठ-क्षेमसदन. १०. पाठ-सांडिलें. ११. पाठ-पाहे. १२. पाठ-भूपाळही देखत दृष्टीं. १३. पाठ-म्हणती. १४. पाठ-चेष्टा करिती आप भयें. १५. पाठ-ऐसाचि सत्यलोकींचा महिमा। कर्में भूतळा ये मुख्य ब्रह्मा। तेथें निष्कर्म सायुज्य धर्मा। कोण विश्राम पावलें?.

शिवलोकींचिये[1] वस्ती ।
शिवपदींही[2] जीवित्वस्थिती ।
सारखी कर्मक्लेशसंपत्ती ।
दिसत[3] असे विचारें. ॥१५८॥

शत्रुमित्र या परिपाटीं ।
जीवाचे ठायीं विषमदृष्टी ।
तरी शिवाचिये ललाटीं[4] ।
तृतीयनेत्रवैषम्य. ॥१५९॥

जीव आसक्त स्त्रीसंगीं ।
गौरी शिवाचे अर्धांगीं ।
सखी गंगा उत्तमांगीं ।
मिरवी,[5] हें विशेष. ॥१६०॥

जीवासि जठरीं क्षुधाग्नि पोळी ।
शिव तीं ठायीं जळे ज्वाळीं ।
उदरीं, नयनीं, कंठनाळीं ।
अहोरात्र पोळत.[6] ॥१६१॥

त्रिगुणरजें माखिला जिऊ ।
चिताभस्में लेपिला शिऊ ।
जीवाहुनी शिवीं बहु ।
दिसे उपाधी कर्माची. ॥१६२॥

जीव व्यवसायी उदरापुरता ।
शिवासि त्रैलोक्याची चिंता ।
ऐशा शिवलोकाची आस्था ।
नुपजे मज कल्पांतीं. ॥१६३॥

विष्णूसही तैशीच परी ।
सांगें घेवून नानाप्रकारीं ।
अर्धरात्रीचे[7] अन्नमरीं ।
बहुरूपी[8] खेळ संपादी. ॥१६४॥

मग डोल लावूनि युगानुयुगीं ।
देतसे भक्तांच्या वोळगी ।
दैत्य न भजती, त्यांचे जगीं ।
पुतळे पायीं मिरवती. ॥१६५॥

म्हणोनि मायेच्या हाताखालचीं ।
तिन्ही बाळकें हीं गुणांचीं ।
शंका प्रबळ बागुलाची ।
दाविती, लपविती अव्यक्तीं. ॥१६६॥

यालागीं निर्भय ब्रह्मपद ।
याचेचि प्राप्तीचा मज वेध ।
येर हें सेवितां उन्माद ।
अतिखेद विनाशत्व.'[9] ॥१६७॥

ऐसें बोलिला शुक वरिष्ठ ।
जैसा अमृतनदीचा पाट ।
रंभा विषलता कडुवट ।
सेवितां नये मधुरते. ॥१६८॥

परिस लाविला खापरीं ।
कैसेन ये सुवर्णसरी ? ।
बेत[10] वाढला मलयगिरी ।
कैसे न ये चंदनत्व ? ॥१६९॥

इक्षुदंडरसाचे नीरीं ।
लावियल्या[11] विषवल्लरी ।
पालट नव्हे, तैसीपरी ।
पाखंडीया सत्संगें. ॥१७०॥

---

१. पाठ-कैलासलोकाची. २. शिव पाहीं जडत्वस्थिती. ३. पाठ-असे दिसती विचार. ४. पाठ-शेखा. ५. पाठ-मिरवी तेथें हा विशेष. ६. पाठ-पळिपतू. ७ पाठ-धर्मरात्रीचे. ८. पाठ-बहुत. ९. पाठ-विनाशत्वें. १०. पाठ-वेल वाढे पां मलयागिरी । कैसोंन चंदन होईल ११. पाठ-वाढली काचकुहिरी.

अमान्य करोनी शुकवचना ।
रंभा म्हणे, 'ऐक ब्राह्मणा ! ।
शृंगारशास्त्रीं न होवोनि शाहाणा ।
वंचलासी सुखातें. ॥१७१॥

विषयेंद्रियां घालोनी जोडी ।
नेणसी शरीरसुखाची गोडी ।
स्त्रीसंगाची अर्धघडी ।
क्लेश नाशी जन्माचे. ॥१७२॥

प्रत्यक्ष विषयसुखाचें कनक ।
सांडीतांक्षणीं नाडिले मूर्ख ।
मोक्षदेहें नाशाची राख ।
मागती भीक तीलागीं. ॥१७३॥

भरली अमृताची कनकवाटी ।
हातींची सांडोनि, करंटीं ।
धांवती मृगजळापाठीं ।
तैसी गोष्टी वैराग्या. ॥१७४॥

एक विषय इंद्रियां पावे ।
तें सुख सर्वेंद्रियें भोगावें ।
सर्वेंद्रिय भोगासवें ।
तें सुख दैवें सभाग्या. ॥१७५॥

आधींच नरदेह अनर्घ्य रत्न ।
विशेष तारुण्यपरिसाचे[१] गुण ।
जोडलें बहुत सुकृतेंकरून ।
परि परीक्षकहीना सांपडलें. ॥१७६॥

अजारक्षका अविचारा ।
हातीं पडलिया[२] हिरा ।
तेणें रक्षावया तया क्षेत्रा[३] ।
यमनियमीं गोफणिलें. ॥१७७॥

आयुष्याचिये तातडी ।
तारुण्यदशाचि मुखवाडी ।
भोग भोगी चढोवढी ।
धन्य तो एक दैवाचा. ॥१७८॥

वसंतमासीं मनोहर ।
वना पातला कुसुमाकर ।
पुष्पजाती देती संभार ।
उचित नाना सुमनांचे. ॥१७९॥

जाई जुई, राजसेंवती, ।
मंदार, वाटोगर, मालती, ।
चंपक, पाटला, पारिजाती, ।
वाट[४] पहाती परिमळें. ॥१८०॥

तैशी पुष्पवती[५] प्रमदा ।
देखोनि वल्लभ चढे अत्यानंदा ।
मग संघटे सुरतयुद्धा ।
तैसें[६] भ्रमरा होतसे. ॥१८१॥

किंवा उमाधवाचे पूजे ।
वना माधवें फुलें भिजें ।
पुष्पांजळी वोपिती सहजें ।
वनस्पती भूलिंगीं. ॥१८२॥

नारिंगी आणि क्षीरखोरी[७] ।
साखरनिंबोणिया रसभरी ।
फळें दावोनी अंतरीं ।
आठव देती स्तनांचे. ॥१८३॥

आम्रफळें बिल्वफळें ।
कठिन वर्तुळ ताळफळें[८] ।
स्त्रीस्तना जिहीं त्यजिलें ।
तें आठवोनी पडताती. ॥१८४॥

१. पाठ-तारुण्यपरिसाचा. २. पाठ-सांपडलें अचतुरा. ३. पाठ-तपोक्षेत्रा. ४. पाठ-पाट वाहाती. ५. पाठ-पुष्पवनीं. ६. पाठ-तेवां षट्पदा होतसे. ७. पाठ-द्राक्षी. ८. पाठ-ताळकौळें.

जिहीं तारुण्यदशेचीं कौतुकें।
वर्जिलीं कुचालिंगनसुखें।
त्यांच्या हृदयींचीं स्मरोनि दुःखें।
पक्क दाळिंबें उकललीं.[1] ॥१८५॥

तेथें रमणीय[2] सरोवरें।
आच्छादिलीं पद्मिणीपत्रें।
कामिनीअधरामृत अधरें।
जैंवी[3] लोपलें जनदृष्टीं. ॥१८६॥

भ्रमराचिये श्रुतीवरी।
कोकिला गाती रागोद्धारीं।
मृदंगशब्दें जळलहरी।
तीरीं आंदोळती सुतालें. ॥१८७॥

तया तालावरी स्वानंदें[4]।
मयूर नाचती आनंदें।
हे देखोनि हृदय विंधे।
पुष्पधन्वा निजशरीं.[5] ॥१८८॥

मंडप शाइले[6] केतकीदळीं[7]।
स्तंभी लाविल्या कर्पूरकदळीं।
कुंडें भरलीं सुपरिमळीं।
वाळियांचीं घमघमीत. ॥१८९॥

माजी सुमनांचिया सेजा।
दाट घालोनियां वोजा।
कर्पूरोदकें सिंपोनि[8], माजा।
मन्मथातें आणिती. ॥१९०॥

कंठीं आपाद सुमनहार।
सुमनांचीं वस्त्रें विचित्र।
वेष्टुनी[9] कामिनींचा भार।
मध्यें विलासी[10] विराजे. ॥१९१॥

तेथें एकी बाळस्तनिया।
कुसुमकळिया ऐशीया अणिया।
निघती जैशा चांदणिया।
गौरपणें दिसताती. ॥१९२॥

एकीचीं जैशीं सिंगीफळें[11]।
कठिण आणि वर्तुळें।
सुरंग नारिंगाचीं युगळें।
तैसे एकीचे मिरवती. ॥१९३॥

एकीचे जैशीं राजबेलें।
एकीचे जैसे पुष्पझेले।
बचके धरितां अणियाळे।
कनककलशासारिखे. ॥१९४॥

कंटकहीन कनकफळें।
एकीचीं अर्कफळें जावळें।
एकीचे स्थूळ नारिकेळें।
करिकुंभासारिखे. ॥१९५॥

सिंधुशत्रूचें जन्मस्थान।
तैसे एकीचे पीनस्तन।
मर्दे. भावोनी कठीन।
शुंडा घालीत स्वानंदें. ॥१९६॥

कंदुक[12]मढियेले मुक्तजाळीं।
तैसीं एकीचीं वाटोळीं।
तगटियेलीया कांचोळी।
हारावळी त्यावर्त्या. ॥१९७॥

---

१. पाठ–उललिया. २. पाठ–रमणीक. ३. पाठ–जें वोपिलें जनदृष्टी. ४. पाठ–विनोदें. ५. निजकरीं. ६. पाठ–शिवलें. ७. पाठ–केतकीतळीं. ८. पाठ–सिंपिती. ९. पाठ–वेढुनी. १०. पाठ–विलासें. ११. पाठ–पुगीफळें. १२ पाठ–कंचुकी मढिली मुक्तजाळीं। तैसे एकीचे कंचुकमेळीं। शोभती मुक्तप्रवाळीं। हारावळी त्यावरौत्या.

स्त्रीकदंबाच्या[1] तर्कें ।
इंदुची उगवला ऐसीं मुखें ।
दर्पणपद्मांचीं कौतुकें ।
कवीश्वर साम्य बोलती. ॥१९८॥

नयन नव्हती, चपळ मीन ।
कुमुद म्हणों[2] कीं मदनबाण ।
जिकडे करिती संधान ।
त्यजती[3] प्राण नरमृगें. ॥१९९॥

सुवर्ण कलशाचीं[4] युग्में ।
उरोज भासती गुच्छोत्तमें ।
किंवा पक्षब्रळाचे गरिमें ।
उड्डाण व्योमीं करिजेती. ॥२००॥

द्वादश आंगीं अळंकारीं ।
भासती सौदामिनीचिये सरी ।
किंवा नक्षत्रांचिया हारी[5] ।
कनकवल्ली[6] शोभती. ॥२०१॥

शाल्मलीतरूचीं कुड्मळें[7] ।
किंवा कंदुक[8] कटीफळें ।
वृंदावनाहूनि वर्तुळें ।
कठिण युगुळें दाटलीं. ॥२०२॥

वनिताहृदयीं कुभलक्षणें ।
मदनाचें सर्वस्व ठेवणें ।
कस्तुरीमुद्रिका खुणे ।
वरी कसणें चोळीचें. ॥२०३॥

किंवा लागेल जनदृष्टि ।
म्हणोनि सृष्टिकर्ता परमेष्टी ।
अंजन घेवोनियां स्वम्रोटीं ।
लेप केला मुखाब्जीं. ॥२०४॥

किंवा[9] जनदृष्टिकाळिमा ।
पाहोनि जाली स्तनयुग्मा ।
योगियांची शापमहिमा[10] ।
लज्जावसनीं निघाली. ॥२०५॥

ऐसीं स्त्रियांचीं कुचयुगुळें ।
जो आपुलेनी वक्षःस्थळें ।
निरंतर मर्दोनि मवाळें ।
गाढालिंगन न करीची. ॥२०६॥

प्रमदावक्षःस्थळ शाळुंखा ।
पयोधर पिंडी त्या सुरेखा ।
स्वहस्तें चंदन लावोनि जो कां ।
हृदयनिवेदन[11] न करीची. ॥२०७॥

देहस्थ आत्मया शिवाचा कोप ।
होवोनि हाचि घडे शाप ।
जो जपतपादि संताप ।
जाचणी मांडी देहाची. ॥२०८॥

संभोगक्रीडेच्या काळीं ।
हस्तद्वयाच्या[12] निमेळीं ।
जो खेळूनि स्तनाची चेंडूफळी ।
हारी नाणी वनितांतें. ॥२०९॥

जो स्त्रियांपुढें मोडिला ।
म्हणोनि त्यांहोनि हीन बोलिला ।
सेखीं नपुंसकेंही जिंकिला ।
पुरुषत्व असोनि अभागी.[13] ॥२१०॥

---

१. पाठ-कंदुकाच्या. २ पाठ-म्हणोनी ३. पाठ-घेती प्राण जपकांचे. ४. पाठ-कळसाची. ५. पाठ-हिरा. ६. पाठ-कनकवल्लरी. ७. पाठ. कुचमंडळें. ८. पाठ-कंदुककुंटीफळें. ९. पाठ-किंवा जनदृष्टि तोची काळिमा । पाहों जाले स्तनयुग्मा. १०. पाठ-शानमहिमा. ११. पाठ-हृदयीं वंदन. १२. पाठ-हस्त चौगुणा क्रिडोनि वळी. १३. पाठ-अभोगी.

ऐसा[1] यौवनाचे ठायीं ।
सौख्य न भोगी कांहीं ।
तो[2] जितेंद्रिय जैसा अही ।
वायु भक्षी विवरस्थ.[3] ॥२११॥

धिग् धिग् त्याचें जालें ।
धिग् धिग त्याचें अभ्यासिलें ।
जळो तयाचें तप, जें फळलें ।
देहदंडण दुःखेसीं. ॥२१२॥

तृणाचा कृत्रिमपुरुष ।
क्षेत्रीं[4] उभा रक्षीत पीक ।
त्या साच मानिती जंबुक ।
परि नव्हे सजीव निर्धारें. ॥२१३॥

तेंवि तयाचा वृथा देहो ।
प्रेताहूनि[5] अधिक पांहो ।
जो कांतासंगीं नेघे लाहो ।
विषयभोग सुखाचा.' ॥२१४॥

ऐसी रंभा बोललियावरी ।
शुक आश्चर्यहास्य[6] करी ।
म्हणे, 'कैसी भ्रमचक्रीं[7] ।
पडिली असे अविद्या. ॥२१५॥

बोले[8] तितुकें विपरीत ।
जैसें बोडंबरीचें वित्त ।
विषा नाम ठेवूनि अमृत ।
सेवा म्हणे पुढिलांतें. ॥२१६॥

कीं[9] मैंदाचें साजणें ।
कीं पारिधीयाचें अळवणें[10] ।
किंवा कंठभूषणा अर्पणें ।
उचित काळसर्पाचें. ॥२१७॥

तैसी रंभेची वचनोक्ती ।
जे साच[11] मानिती चित्तीं ।
ते प्रत्यक्ष आत्मघाती ।
नाहीं यदर्थी संदेहो. ॥२१८॥

वाग्निश्चय नरकाचा ।
इहीं उत्तरीं होय साचा ।
जिहीं मनातें पोकळ पांचा ।
विषयांहातीं दीधलें. ॥२१९॥

मोक्षरवीच्या दर्शनदृष्टी ।
जिहीं फोडिली आपुली विचारदृष्टी ।
जे साच मानोनि या गोष्टी ।
हांव धरती भोगार्थ.' ॥२२०॥

ऐसां[12] निश्चयी श्रीशुक ।
बोलता झाला निजविवेक ।
जेणें विषयकामनापंक ।
शोषोनि[13] जाय श्रोत्यांचा. ॥२२१॥

रंभे ! ऐक यथार्थ बोला ।
तो एक येथें जितची मेला ।
जो नरदेह पावोनि वहिला ।
आत्मसाधन न करीची. ॥२२२॥

तें[14] कैसें लक्षण म्हणसी ।
तरी ऐक सांगेन तुजपाशीं ।
नित्यानित्यविवेक ज्यासी ।
नेणवेची[15] अज्ञानें. ॥२२३॥

---

१. पाठ-ऐशा वनाचे ठायीं. २. पाठ-जो. ३. पाठ-वनस्थ. ४. पाठ-शेतीं. ५. पाठ-प्रेतही नव्हे पा वाहो. ६. पाठ-आश्चर्यें हास्य. ७. पाठ-भ्रमाचिया चक्रीं. ८. पाठ-बोल तितुके, ९. पाठ-अथवा. १०. पाठ-सुशील वर्तणें. ११. पाठ-साचार. १२. पाठ-ऐसेनि निश्चयें. १३. पाठ-वोहोटोनि. १४. पाठ-तों तूं क्लीबलक्षण म्हणसी. १५. पाठ-नेणें वचनीं अज्ञान.

इंद्रियें करूनी मार्जारें ।
राखे विषयमूषकद्वारें ।
उघडे विषयीं अविचारें ।
तोंड[1] शुची वारितां. ॥२२४॥

तेथें क्षमा, संतोष, विवेक ।
चौथा साधुसंग देख ।
हें मोक्षद्वारींचे निष्टंक ।
द्वारपाळ अर्जिले.[2] ॥२२५॥

त्यांशीं वोळखी असे[3] जया ।
माजी प्रवेश होय[4] तया ।
त्यांतें नोळखे जो प्राणिया ।
तो भवगर्ते लोटिजे. ॥२२६॥

म्हणोनि तोचि ये संसारीं ।
ज्ञानहीन प्रेतशरीरी ।
अमंगळ विषयविष्ठेवरी[5] ।
तनु पाळी शूकरन्यायें. ॥२२७॥

धिग्धिग् तयाचें शरीर ।
धिग्धिग् तयाचें ऐश्वर्य थोर ।
जळो तयाचें राजमंदिर ।
आत्मविचार जेथें नाहीं. ॥२२८॥

धिग् धिग् तयाचें शाब्दिक ज्ञान ।
धिग् धिग् तयाचें दांभिक भजन ।
धिग् धिग् तयाचें तामस मन[6] ।
स्फितीचें श्वान जया होतीं.[7] ॥२२९॥

आत्मसाधनीं सावध ।
वृथा न दवडिती[8] निमिषार्ध ।
याती पवित्र, कुळशील शुद्ध ।
तयाचेंची[9] त्रैलोक्यीं. ॥२३०॥

ते होत अवमानिले सधनीं ।
ते होत निंदिले दुर्जनीं ।
ते होत सांडिले स्त्रीजनीं ।
विषयीं निजांडे म्हणवोनी. ॥२३१॥

ते असोत गुरुत्वें हीन ।
ते[10] असोत शिष्यधर्माविहीन ।
नेणोत शास्त्रव्याख्यान ।
वेदाध्ययन सांगिक. ॥२३२॥

परी तेच[11] श्रेष्ठ निश्चित ।
ते अक्षयी कीर्तिवंत ।
जे आत्मविचारीं जागृत ।
ते निद्राभूत प्रपंचीं. ॥२३३॥

आत्मानंदामृत रसाळ ।
सेवोनि ज्याचें चित्त निश्चळ ।
आत्मचर्चातांबुळ[12] ।
निद्रा रंगे मुखचर्चीं.' ॥२३४॥

उदारपणें मेघनाथ ।
स्थळास्थळ[13] न विचारीत ।
तैसा रंभेप्रति परमार्थ ।
समदर्शनी शुक वदे. ॥२३५॥

तितुकें[14] अयुक्त मानूनि येरी ।
विवाद मांडला प्रत्युत्तरीं ।
जैशी परिव्राजकावरी ।
राजदासी संघटे. ॥२३६॥

---

१. पाठ–तोंडें स्तुती वारितां. २. पाठ–आपुले. ३. पाठ–जालिया. ४. पाठ–असे. ५. पाठ–विषयें वेष्टिलें वरी. ६. पाठ–ज्ञान. ७. पाठ–जे होती. ८. पाठ–करिती. ९. पाठ–तयाचेनी. १०. पाठ–ते असोत कां सेवेहीन. ११. पाठ–ये रितींचे. १२. पाठ–आत्मनिरूपणतांबूल. १३. पाठ–सुस्थळकुस्थळ. १४. पाठ–तितुकें ऐकूनि अयुक्त येरी.

वेदांतीयाशीं पाषांडीतर्क ।
भागवताशीं तंडे कोक ।
परम पंडिताशीं मूर्ख ।
तेंवि रंभा शुकाशीं. ॥२३७॥

ऐसेनी[1] अविचारें सुरवधू ।
शुकाशीं करी वितंडवादू ।
तोचि पुढले श्लोकीं विशदू ।
अर्थ परिसा आर्त हो ! ॥२३८॥

रंभा म्हणे, 'महामुनी ! ।
व्यर्थ कासया शिणवा वाणी ? ।
वळोनी शब्दांच्या श्रेणी ।
निरंजनीं रचितसां. ॥२३९॥

त्याचा काय उपयोग सांग ? ।
वृथा सांवरीची दांग ।
कीं मारवाडींचे सुरंग ।
तांबुल जैसे बोलाचे. ॥२४०॥

किंवा[2] विजयादशमीचे दिवशीं ।
सुवर्ण म्हणती शमिकेसी ।
किंवा 'मंगळ' भौमासी ।
शब्दारोप पैं जैसा. ॥२४१॥

तैशीं तुम्हीं हीं वचनें ।
शुक्तिकारजताचीं[3] भूषणें ।
जे साचार मानिती मनें ।
ते शाहाणे[4] तुजऐसे. ॥२४२॥

जाळिला कामहुताशनें ।
त्या वैराग्यरश्मीच्या उष्णें ।
निववला, हें बोलसी वचनें ।
जेंवि[5] अमर विषपानें. ॥२४३॥

तपोक्लेशीं[6] झाले तप्त ।
त्यांस निववावया येथ ।
संभोगच्छाया आणि अमृत ।
कामिनीच्या अधरींचें, ॥२४४॥

तेही अधर अतिकोमळ ।
सुरंग जैसें बिंबफळ ।
दंतपंक्ती देती झळाळ ।
फांके परिमळ बोलतां. ॥२४५॥

वेळा[7], लवंगा, दिव्य कर्पूर, ।
मुक्ताचूर्ण, केतकीखदिर, ।
जातिफळें, जातिपत्र ।
पूगीफळें[8] सोलींव. ॥२४६॥

नागलतिकापर्णोत्तमें ।
जैशीं तगटें घडिलीं हेमें ।
ऐसी त्रयोदशगुणीं कामें ।
तांबूल मुखीं सर्वदा. ॥२४७॥

तेणें सुरंग[9] सुपरिमळ ।
वदन जाहलें रक्तोत्पळ ।
तेथें आपुलें मुख अलिकुळ ।
होऊन चुंबन जो न करी. ॥२४८॥

कस्तूरीतिलकांकित निटिळीं ।
मस्तक मेळवोनि भाळीं ।
हस्त ठेवोनि कुचकमंडळीं ।
भोगकाळीं संभ्रमें. ॥२४९॥

---

१. पाठ-ऐसोनि शुकेंसी करी वितंडवादू । तोचि पुढिले श्लोकीं विशदू । सांगेन कथाप्रबंधू । अर्थ ऐका चतुर हो. २. पाठ-कीं विजयादशमीचे दिवशीं । सुवर्ण म्हणती मृत्तिकेसी । अथवा महाराष्ट्रदेशीं । लक्ष्मी म्हणिजे रक्षेतें ॥ ३. पाठ-रजतशुक्तीकेचीं. ४. पाठ-सारिखे. ५. पाठ-जेवीं कां घांवणें विषयांनीं. ६. पाठ-तपोवनीं. ७. पाठ-वेळालवंगादि. ८. पाठ--पुगीखंडें सोलिवें. ९. पाठ--सुगंधें परिमळें.

मग[1] अधरामृताची वाटी ।
बळें लावितसे[2] वोटीं ।
जो रस न घे दाटोदाटी ।
अमृतासाठीं[3] जो नये. ॥२५०॥

चुंबोनि अधर धरोनि दशनें ।
सोडितां मरण न[4] मने मनें ।
तो अरण्यशवासारिखा जाणें ।
हें सुख नेणे म्हणोनियां. ॥२५१॥

आत्मानुसंधानाच्या शूळीं ।
ज्यासि[5] रांविलें सर्व काळीं ।
यमनियमाचे कावुळीं ।
रक्तमांस आटिलें.' ॥२५२॥

ऐशीं रंभेचीं उत्तरें ।
जैशीं सोज्ज्वळ सुरापात्रें[6] ।
शुक सेवितां श्रोत्रकरें ।
विटाळ मानी अंतरीं. ॥२५३॥

मग सुधूत[7] मनवसन ।
भिजवोनि होईल सचैल स्नान ।
ऐसें वाक्य वदे सज्ञान ।
देहदूषणलक्षणीं. ॥२५४॥

'बरळे ! ऐक निर्धारें ।
देह खांचिजे जैवी[8] शस्त्राग्रें ।
तेथें वर्षाव कीजे रुधिरें ।
घाव पडे बीभत्स. ॥२५५॥

तो प्रतिदिनीं प्रक्षाळिजे ।
नूतन औषधीपिंड दीजे ।
तऱ्हीं च निके, येरवीं[9] माजे ।
पूय, दुर्गंधी, कृमिजाळ. ॥२५६॥

त्या घायाचें सुरंग वदन ।
चुंबावया कांक्षीत मन ।
त्याहोनि कश्मल तें आन ।
सांग कोणतें संसारीं ? ॥२५७॥

तेंवि ही मुखादि रंध्रें ।
स्रवति लाळरक्तमूत्रें ।
ते क्षाळूनि दुर्गंधि हरे ।
तांबूलगंधादि[10] लेपितां.[11] ॥२५८॥

विचारितां स्त्रियेचा देहो ।
नरकपंक[12] मूत्रडोहो ।
फुटेल म्हणोनि बळे पाहा हो ।
चर्मत्वचेनें बांधिला. ॥२५९॥

उद्योगसायास, ममता ।
मूर्खत्व, पापलुब्धता,[13] ।
अशौच, अलाज, निर्दयता ।
इहीं[14] गुणीं विवळे.' ॥२६०॥

रंभा तिरस्कारली चित्तीं ।
बोललीच[15] बोले पुढती ।
जैसा कोढी आपुला हाती ।
वारंवार लक्षीत. ॥२६१॥

नाक कादलिया सहसा ।
आपला भाव न सांडी पडसा ।
खांडण केलिया गोपुच्छा ।
नव्हे पालटी निजगुणा. ॥२६२॥

---

१. पाठ--मम. २. पाठ--लावूनिया होटीं. ३. पाठ-जो न ये साठीं पीयूषाच्या. ४. पाठ-मानीं मरण उणें. ५. पाठ-शिर. ६. पाठ--सुपात्रें. ७. पाठ-साधूत्तम न वासना. ८. पाठ-विषयशस्त्राग्रें. ९. पाठ-मानिजे. १०. पाठ तांबूलगंधलेपनें. ११. पाठ-काही प्रतींतील अधिकची ओवी अशी-तें भगद्वारीं लिंग सूयिजे। मुखें मुखलाळ चाटिजे। आणि कर्णाचार सुसेविजे। तिन्ही सारखीं जाण पां॥ १२. पाठ-नरककूप. १३. पाठ-पुन्हां पांचवें. १४. पाठ--इहीं दोषीं वसविते. १५. पाठ-बोलिलीच बोलें पुढती.

यापरी ते निर्जरनारी ।
प्रत्युत्तरें श्रृंगारशास्त्रीं ।
देती झाली, जीं अंतरीं ।
विकार करिती अविवेका.[१] ॥२६३॥

'अनर्घ्य वस्त्राची कंचुकी ।
जडली अमूल्य रत्नमाणिकीं ।
पत्रवेली सोडिल्या कनकी ।
चित्रविचित्र परिकरा. ॥२६४॥

पंखियांवरी मनोहरें ।
मुक्ताफळांचीं मयूरें ।
राजहंस, शुक, चकोरें ।
अतिसुंदरें मिरवती. ॥२६५॥

जडित मोतियांची जाळी ।
बिरडें कसिलें कनककमळीं ।
चंदनमृगमदाचे[२] मेळीं ।
वर लेपिला अर्गजा. ॥२६६॥

सुरतसंग्रामीं शीणला ।
मग भुजपंजरीं वहिला ।
मजऐसीये[३] पहुडला ।
हृदयडोल्हारा तुजऐसा. ॥२६७॥

कीं मजऐसीये हृदयमाचा ।
तुजसारिखा नर देवाचा ।
उशीसी[४] करूनि उभय कुचां ।
सुखनिद्रा अनुभवी. ॥२६८॥

तोचि एक धन्य येथ ।
सार्थक केलें तेणेंचि जीवित ।
जो[५] क्रीडाकौतुकें काढीत ।
वेळ कामिनीसुखसंगें. ॥२६९॥

जन्मोनि जननीचे पोटीं ।
या मुखाची भेटी गोष्टी ।
स्वप्नींहि नेणे तो ह्या सृष्टीं ।
प्रेताहूनी कनिष्ठ. ॥२७०॥

व्यर्थ नासारंध्रींचा रोम ।
व्यर्थ उष्ट्रपृष्ठींचें गुल्म ।
व्यर्थ अजाकंठींचें चर्म ।
'स्तन' हें नाम जयाचें ॥२७१॥

जवादीजनिताचे वृषण ।
भूपमौळीं बैसती समान[६] ।
काय करावे लंबायमान ।
रासभाचे पैं जैसे. ॥२७२॥

तैसा तो एक संसारीं ।
दरिद्रसंगीं पडिला कुहरीं ।
लोक देखोनि पळे दुरी ।
दिवाभीतासारिखा.' ॥२७३॥

ऐसी धिक्कारूनि रंभा ।
बोले, तरी हृदय क्षोभा ।
शुकाचे न पवेची, मग शुभा ।
वचनीं उत्तर देतसे. ॥२७४॥

,जीवें सजीव हा नरदेहो ।
त्या देहार्थ भोगसंग्रहो ।
तें देह दर्दुर[७] जालें पाहा हो ! ।
काळसर्पाचे आननीं. ॥२७५॥

कमळदळावरील जळ ।
तैसें जीवित अतिचंचळ ।
कीं गिळिजे नवनीताचा कवळ ।
त्याहोनि शीघ्र विनाशे. ॥२७६॥

---

१. पाठ-अविवेकें. २. पाठ-मृगनाभीचे. ३. पाठ-मग सुखेंसी. ४. पाठ-शिर्सें. ५. पाठ-जो क्रीडाकौतुकें फेडित । कंचुकीकच्छ सुखभोगा. ६. पाठ-जाण. ७. पाठ-दुर्धर.

हेमाभरणें रत्नादिक ।
जिहीं डहुळिलें[1] चित्तोदक ।
तेंही क्षणिक जैसी रेख ।
व्योमीं इंद्रधनुष्याची. ॥२७७॥

काळानळाचे चुलींत वेगें ।
सुपुष्ट सुरूप शरीरवांगें ।
लाविलें तें निमिषार्ध न लगे ।
तंव होय शीतळ विकारी. ॥२७८॥

आणि शुक्र बीजेचें चांदणें ।
तैसें तारुण्य पाहुणें ।
जातां, वार्धक्यमेहुणे ।
हांसवीत या जीवा. ॥२७९॥

आतां संभोगाचे जे भोग ।
कृपणाचें[2] धन सांग ।
वंध्यासुताचें उत्तमांग ।
व्योमकुसुमीं तुरंबिजे. ॥२८०॥

कीं अंवसेचे चंद्रामृतें ।
चित्रचकोरें होतीं तृप्तें ।
मृगजळाचेनि न्हदोदकें कउतें ।
छायापुरुषा[3] न्हाणिजे ? ॥२८१॥

तैसें शरीर मिथ्या समूळीं ।
तेंही काळाचे दंष्ट्रतळीं ।
चपळ विषयांची हे[4] तों फळी ।
खेळावया सुख कोण ? ॥२८२॥

जो करी देहाची भावना ।
तो मोहमल्हारीचा सूणा ।
असतां[5] नरत्व सोडोनि जाणा ।
श्वानपणा मिरवीत. ॥२८३॥

विषयहळदीचें कुट ।
त्या नांव ठेवी भंडार श्रेष्ठ ।
तेणें ममतेचें लल्लाट ।
चर्चोनि फिरे भुंकत. ॥२८४॥

तरी मृत्यूऐसा व्याघ्र ।
मुख पसरोनि समोर ।
तेथें विषय हिरवटाचार ।
देहधेनूतें केंवि रुचे ? ॥२८५॥

ऐसेपरी दुर्लभ देह ।
परमार्थाचें जोडतें गेह ।
जाणोनि आत्मसाधनीं स्नेह ।
धरोनि स्वहित जो न करी. ॥२८६॥

तो कल्पद्रुमाचे वाटिके ।
बैसोनि अभाग्य इच्छी भिके ।
कामधेनु[6] धिक्कारी दुःखें ।
रुचिकालागीं दुहितसे. ॥२८७॥

पहुडोनि चिंतामणीच्या घरीं ।
म्हणे मी एक दीन भिकारी[7] ।
व्यर्थ वांचोनि काय करी ।
ये संसारीं ? हतदैवा[8] । ॥२८८॥

परिस घेवूनियां करीं ।
बळें घांशीत खापरीं ।
गुण नव्हे, मग झुगारी ।
पाषाण म्हणवोनी हातींचा. ॥२८९॥

तैसा नरदेह तत्त्वतां ।
अवचट लाहे[9] पुण्यवंता ।
जेथें ईश्वरप्राप्ति पाहातां ।
हातातळीं आतुडे. ॥२९०॥

---

१. पाठ–डहुळिजे. २. पाठ–तें कृपणाचें शरीरें सांग. ३. पाठ–छायापुरुषें नाहिजे. ४ पाठ–हांतोफळी. ५. पाठ–असतें नरत्व सांडूनि. ६. पाठ–कामधेनूचें काम दुःखें. ७. पाठ–दरिद्री. ८. पाठ–हतदैवें. ९. पाठ–लाभे.

तो विसरोनि कार्यार्थ ।
वाढवोनि विषयस्वार्थ ।
आयुष्य नाशी जो स्त्रीजित ।
जीवन्मृत जाणावा. ॥२९१॥

मोहभ्रमाचे वोहळीं ।
मिथ्या ऐश्वर्य हरळी[१] ।
विषयरसें अतिरसाळी ।
मूढमती[२] जवळी खर जैसा. ॥२९२॥

ते[३] श्रुतिआळ्यतेचे भावीं ।
देखोनि प्रमदा गाढवी ।
पुरुषरासभ वोढवी[४] ।
नव्हे आडवी लोटितां.[५] ॥२९३॥

ऐसीये[६] रासभीमागें ।
जे धांवती विवेकत्यागें ।
जीवें लाज सांडोनी आंगें ।
'थू थू' जगें त्यां म्हणिजे. ॥२९४॥

चर्मकाचें चर्म जैसें ।
जमलें पाणी पिऊन पोसे ।
सेविलेचि विषय तैसे ।
सेवितां विकृती न मानिती. ॥२९५॥

ऐसी जीवन्मृताची कहाणी ।
असो, काय बोलावी वदनीं ?' ।
रंभा खोंचोनि अंतःकरणीं ।
काय[७] उत्तर देतसे. ॥२९६॥

मग बोलली त्याहूनि अधिक ।
विस्तारीत विषयसुख ।
अनुवाद करितों नावेक ।
श्रोतेजनीं परिसावा. ॥२९७॥

'सखोल नाभी अतिगंभीर ।
जैसें लावण्यसरोवर ।
वरी त्रिवळी सुंदर ।
श्यामोदकी सुरसरिता. ॥२९८॥

जैसें हिमालयाचें युगुल ।
तैसें स्तनद्वय वर्तुळ ।
उंच गौर सुशीतळ ।
स्पर्शतां निववीत संतप्ता.[८] ॥२९९॥

तया कुचयुग्मांतरीं ।
रम्य[९] रमणीय पाठारीं ।
तपें तपती निरंतरीं ।
मनें आसक्त पुरुषांचीं. ॥३००॥

जैसे कर्पूरकर्दळीचे स्तंभ ।
तैसें जानुद्वय स्वयंभ ।
चीर उकलितां सुप्रभ[१०] ।
गौरपणें भुलवीत जें. ॥३०१॥

कटिमंडित रत्नमेखळा[११] ।
तें तेज दावी नाभीतळा ।
तयाअंतरीं गुह्यस्थळा ।
देखाआगळे तो देखे. ॥३०२॥

अधरें न चुंबिती अधरा ।
करें न शिवती[१२] पयोधरा ।
गुप्त नलिनीमदनमंदिरा ।
रेतपाटा[१३] न लाविती. ॥३०३॥

१. पाठ हरियाळी. २. पाठ–मूढ ती जवळी. ३. पाठ–सुनीव अढयतेचा आडवी. ४. पाठ–वाढवी. ५. पाठ–ह्या ओवीनंतर अधिकच्या ओव्या अशा–ग्रासवास अथमळें । स्तुतिशब्दें सैर बोकाळे । पुच्छ · च्छ करी मोकळे । बळें खेंकाळे मसावया ॥ जेव्हां चारा नलगे तोंडी । रागें वदला पैं झाडी । धर्मस्पर्शे हृदय फोडी । घाली आढी पादपुच्छा. ६. पाठ–ऐशिया रासभा मागमागें. ७. पाठ–प्रत्युत्तर देतसे. ८. पाठ–संताप. ९. पाठ–रमें. १०. पाठ–सप्रभ. ११. पाठ–कटिमंडळा. १२. पाठ–सेविती. १३. पाठ–रेतपाट न चालावती.

स्त्रीमुख न चुंबिती जे वोष्ठ ।
ते भग्न भाजनाचे कांठ ।
कुच न मर्दिती ते कर थोटे ।
मोडियेले येरवींच. ॥३०४॥

लेपाहातीं[१] दिधलें शस्त्र ।
काय पुरुषार्थ करील थोर ।
तैसें त्याचें कामागार ।
निर्व्यापार लडबडी. ॥३०५॥

छत्रीविण फिरवी दंडु ।
गडी नसतां खेळे चेंडू ।
न गाळितां इक्षुदंडु ।
लाट पडिली काननीं. ॥३०६॥

कीं लोळिकेवीण घांट ।
वृषभकंठीं देतसे कष्ट ।
तैसे पुरुष अवयव श्रेष्ठ ।
न विचारीत त्यां हेतू.' ॥३०७॥

ऐसे रंभेचे वोखटे ।
शब्द[२] ऐकतां मन विटे ।
कर्णरंध्रीं घालोनि बोटें ।
अधोवदनीं निश्चळ. ॥३०८॥

मग विचारूनी प्रत्युत्तर ।
देता झाला चतुरेश्वर ।
जेणें शृंगाररससागर ।
दिसे मृगजळासारिखा. ॥३०९॥

ज्ञानवैराग्यनिरूपण ।
मागां[३] बोलिला विचक्षण ।
त्याहूनि[४] विस्तारें गहन ।
निजज्ञान प्रगटिलें. ॥३१०॥

'बुद्धिबोधा होय मिळणी ।
चित्तचैतन्या बुजावणी ।
अहंता राहे सोहंपणीं ।
मन उन्मनीं तल्लीन. ॥३११॥

या उभयांचा संयोग ।
तया म्हणिजे योग ।
ते संसारीं[५] सुखसंभोग ।
तें योगांतर जाणिजे. ॥३१२॥

कीं 'तत्' पद ऐसें बोलिजे शिवा ।
'त्वं' पद ऐसें जीवा ।
दोघे येती ऐक्यभावा ।
तें 'असि' पद बोलिजे.[६] ॥३१३॥

दोघांचिये मिळतिये संधी ।
लाधे महत्त्वानंदसमाधी[७] ।
तेचि योगांत बुद्धी ।
आत्मविदां मानली. ॥३१४॥

तेही कळा करूं उघडी ।
उकलूं[८] गुह्याची घडी ।
गुणग्राहक जोडी ।
जो जें स्वरूप ऐकतां. ॥३१५॥

ऐका 'तत्' पद तो ईश्वर ।
तो जाणावा द्विप्रकार ।
माया शबळ ब्रह्मविकार[९] ।
हा वाच्यार्थ तिहींचा. ॥३१६॥

मायाविनिर्मुक्त विष्कंप ।
सत्यज्ञानानंदस्वरूप ।
तोचि लक्ष्यार्थ निर्लेप ।
परमात्म्याचा जाणिजे. ॥३१७॥

---

१. पाठ–लेपाहातांचें हतियार. २. पाठ–शब्द स्पर्शतां शुक विटे. ३. पाठ–मग. ४. पाठ–त्याहूनि सर्वज्ञ गहन । अनुभवज्ञान प्रगटितू । ५. पाठ–सारसीं. ६. पाठ–योगरूप. ७. पाठ–महानंदसिद्धी. ८. पाठ–उकलूनि गुह्यांतराची घडी. ९. पाठ–ब्रह्म साकार.

'त्वं' पद तो जीव सहजे।
तोही द्विधा[१] जाणिजे।
वाच्य[२] लक्ष्य हे बोलिजे।
उभय अंश तयाचे. ॥३१८॥

स्थूल सूक्ष्म दोन्ही देह।
परिवेष्टुनी चैतन्य राहे।
तोचि वाच्यार्थ म्हणिजे पाहे।
सबळ अंश जीवाचा. ॥३१९॥

देह द्विधा[३] विनिर्मुक्त।
प्रत्यक् चैतन्य[४] निर्धूत।
तोचि बोलिजे लक्ष्यार्थ।
जीवात्म्याचा निर्धारें. ॥३२०॥

जीवेश्वराचे लक्ष्यांश दोनी।
निवडोनि करावी मेळणी[५]।
जैसें गंगायमुनेचें पाणी।
ऐक्यवादें समरसे. ॥३२१॥

प्रतिबिंब निजबिंबातें पाहे।
तंव बिंबत्व अंगीं लाहे।
दर्पणीं गिळलें तरी आहे।
प्रतिमुख[६] निज मुखीं. ॥३२२॥

कीं महदाकाश घटाकाश।
मिळविलें हे बोली वोस।
लहरी आणि क्षीराब्धीस।
वेगळीक[७] असेना. ॥३२३॥

ऐसी उभयांश[८] बळोपाधी।
त्याग करोनि विषयबुद्धी[९]।
अखंड ऐक्यत्वें अनादी।
जाणोनि, होतीं कृतकृत्य. ॥३२४॥

तें अखंडित कैसें काय?।
तरी विजातीय स्वजातीय।
स्वगतवादी[१०] भेदत्रय।
यारहित अखंड तें. ॥३२५॥

विजातिभेदरहित।
म्हणिजे निष्प्रपंच निर्धूत।
स्वजातिभेदातीत।
त्या आन[११] भेद असेना. ॥३२६॥

स्वगतभेदातीत[१२] म्हणिजे।
ब्रह्मीं ब्रह्मत्व विसरिजे[१३]।
जैसें[१४] सैंधव सिंधु होइजे।
वेगळेपण नुरवूनी. ॥३२७॥

तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त,।
सत्यस्वभाव, निर्गुणवंत,।
निरावेव, सर्वगत,।
निष्कळंकस्वरूप. ॥३२८॥

तो अवस्थात्रयातीत।
असंगब्रह्मैवाहमस्मीति।
योगी योगांतरें पावती।
सहजानंदें समाधी हे. ॥३२९॥

निरामय मायातीत।
सर्वकल्पनाव्यतिरिक्त।
तया अंतरीं अनंत।
सुखसंवाद साधका. ॥३३०॥

---

१. पाठ–द्विविध. २. पाठ–वाचोम्नि लक्ष हें. ३. पाठ–द्विविध. ४. पाठ– प्राक्चैतन्य. ५. पाठ–मेळवणी. ६. पाठ–प्रतिमुखा सन्मुख. ७. पाठ–जवनिक असे आडवी. ८. पाठ–उभयश्रांस. ९. पाठ–भेदबुद्धी. १०. पाठ–स्वयातीभेदय. ११. पाठ–आत्मभेद. १२. पाठ–भेदरहित. १३. पाठ–वोसरिजे. १४. पाठ–जैसा सैंधवे समुद्र होइजे। वेगळेपणा विरवूनी।

तया मुखासी नाहीं अंत ।
यालागीं बोलिजे अनंत ।
ज्याचा अळुमाळ स्पर्शतां वात ।
संसारभाव[1] विसरिजे. ॥३३१॥

ज्या सुखाचेनि स्वानंदें[2] ।
विषयभोगाचीं आस्पदें[3] ।
सार्वभौमादि[4] महेंद्रपदें ।
विरस मानिलीं विरक्तीं ॥३३२॥

पृथुपुरूरवायुधिष्ठिर-
जडभरतादि नृपवर ।
राज्य सोडोनि अपार ।
गेले वना[5] वीतरागें. ॥३३३॥

ज्या सुखाच्या प्राप्तीलागीं ।
जाले सर्पव्याघ्रसंगी ।
वैराग्याचे प्रबळ[6] आगीं ।
इंद्रियें करिती इंधनें. ॥३३४॥

महायोगाचे सागर ।
गोष्पदप्राय मानिती नीर[7] ।
अवघड तपाचे डोंगर ।
उडोनी मागां मांडिले.[8] ॥३३५॥

ऐशा सुखाचेनि बोधें[9] ।
ठावीं नव्हती देहद्वंद्वें ।
म्हणोनि आघात प्रल्हादें ।
न लेखितां साहिले. ॥३३६॥

जया सुखसिंधूचा लोट ।
भरोनि बुडवी मनाचा घट ।
इंद्रियद्वारीं[10] उत्कंठ ।
सुखानंद वोसंडे. ॥३३७॥

अष्टौ भावांचीं भूषणें ।
अंगीं बाणती अभिन्नें ।
तुर्येचेनी आलिंगनें ।
प्रपंच पुरता[11] पारुषे. ॥३३८॥

तेथें स्वदेहाची विस्मृती ।
'तेचि[12] स्वरूपाची स्मृति ।
लाज पळाली मागुती ।
ठावी न पडे कैं गेली ? ॥३३९॥

तेथें सुरतनदीच्या[13] पैलकुळीं ।
रेतप्रवाह ऐलपाळी ।
सुख उपजे सर्व काळीं ।
सुखें इंद्रिय कोंदाटे. ॥३४०॥

समाधिरतीचा संभ्रम ।
कामिनीसंगावीण निष्काम ।
आल्हाद उपजे तो निरुपम ।
विदेहावस्था सर्वदा. ॥३४१॥

कीं परमार्थनिद्रेच्या आधीं ।
प्रपंच जागराची समाधी ।
भाव उपजे तो संवादीं ।
गुप्त असे सर्वदा. ॥३४२॥

तेव्हां दृश्यद्रष्टादर्शनपणें ।
सच्चिदानंद भासे तेणें ।
जैसे दाळिंबाचे[14] दाणे ।
एकरसें गोटले. ॥३४३॥

---

१. पाठ-संसारभया. २. पाठ-सुखस्वादें. ३. पाठ-अपशब्दें. ४. पाठ-सर्वभोगादि. ५. पाठ-पुरुष वीतरागी. ६. पाठ-सबळ. ७. पाठ-नर. ८. पाठ-सांडिती. ९. पाठ-वेधें. १०. पाठ-इंद्रियशब्दद्वारीं. ११. पाठ-परता. १२. पाठ-लाज पावली मागुती । ठावी न पडे कैं गती । तें वैराग्य निकें आलिया. १३. पाठ-सुतनदीच्या वेलफुली. १४. पाठ-दाळिंब फळाचे.

ना तरी द्राक्षांचिये घडीं ।
भेदली अभेद एक गोडी ।
इक्षुदंडाचिये भिन्न कांडीं ।
स्वाद वसे अभिन्न. ॥३४४॥

तैसा त्रिपुटीचेनि मिसें ।
ब्रह्मानंदचि कोंदला[1] मुसे ।
ऐशा सुखाचे[2] दिवसें ।
अविद्याराती हरपली. ॥३४५॥

जे सुख सेवोनि म्हणती सुखी ।
ते वृत्ति विरे सुखोदकीं ।
तैं सौख्यांत हे विवेकी ।
ब्रह्मनिष्ठ[3] बोलिजे. ॥३४६॥

त्या निराकुला नाहीं अवधी ।
जैसा कल्पांतीं उदधी ।
अंत[4] पहातां वेदीं ।
'नेति'[5] म्हणोनि परतती जे. ॥३४७॥

अथवा मायाआवरणातीत[6] ।
सर्व अवस्थेव्यतिरिक्त ।
कीं निराकुल म्हणिजेत ।
तयारहित परमात्मा. ॥३४८॥

ज्ञानें चिन्मात्रैक स्फुरण ।
तद्रहित जें निजभावशून्य ।
तें ज्ञानांतर सुविज्ञ ।
दैवागळे सेविती. ॥३४९॥

सेवन म्हणिजे ऐशी युक्ती ।
'सोहमस्मि' या वृत्ती[7] ।
परमात्म्याचिया स्वरूप होती ।
कीटकीभृकुटीचे[8] न्यायें. ॥३५०॥

कीं नाना पंथीं एक स्थान ।
नाना उद्योग[9] एक धन ।
साधिजे तैसें स्वरूप जाण ।
वाखाणिलें बहु शब्दीं. ॥३५१॥

एवं विशेषणीं बहुतीं ।
आत्माचि प्रतिपादिला ग्रंथीं ।
जैसीं सोयरिकेचीं नातीं ।
पुरुषनामें भिन्नभिन्न. ॥३५२॥

तया अनुपम आत्मकनका ।
न पडे वाचकाची[10] टीका ।
तरी बोलिजे जैसें अर्का ।
चित्रामाजी रेखिजे.[11] ॥३५३॥

मुक्यानें केलें अमृतपान ।
वृक्षमुळीनें सेविलें जीवन ।
तें न[12] सांगतां अमरपण ।
सपल्लवें जग जाणे. ॥३५४॥

तैंवि अनुभवाची खूण ।
अनुभवी जाणती विचक्षण[13] ।
बोधितां न बोधिती, अज्ञान ।
ते पाषाण नरदेही. ॥३५५॥

येवूनियां नरदेहा[14] ।
येणें ज्ञानें देहमंदेहा[15] ।
न खंडिती ते भावडोहा- ।
माजी पडले चिरकाळ. ॥३५६॥

१. पाठ-आला. २. पाठ-सुदिवसें/ ३. पाठ-अनुभवनिष्ठी. ४. पाठ-त्याचें आरत पहा वेदीं. ५. पाठ-नेतिवादीं परतीजे. ६. पाठ-मायावर्णातीत. ७. पाठ-आवर्ती. ८. पाठ-कीटकभ्रमरीचे. ९. पाठ-उद्यमीं. १०. पाठ-वाचकां चेटिका. ११. पाठ-बोते. १२. पाठ--नसतां. १३. पाठ--सुविज्ञ. १४. पाठ-मनुष्यदेहा. १५. पाठ-ज्ञानसंदेहा.

एके मरणें न खंडे मरण ।
म्हणोनि मृतांतर हें वचन ।
सर्वदा प्रेतप्राय जाण ।
ज्ञानजीवन ज्यां नाहीं. ॥३५७॥

आत्मज्ञान जालें जया ।
ऐसें, 'पंडित' म्हणती[1] तया ।
जे न भुलती भोगविषया[2] ।
स्त्रीसंगादि कल्मषीं.[3] ॥३५८॥

स्त्रीदेह चर्माची कोथळी ।
भरली नरकपूयकृमिजाळीं[4] ।
अधोद्वारीं सदाकाळीं ।
अधोवातें उघडलें. ॥३५९॥

जैसी पायखोल[5] घाणीची मोरी ।
भरणाश्रय अमेध्यनीरीं[6] ।
तैसा द्रव योनिद्वारीं ।
म्हणोनि सदा अशौच. ॥३६०॥

अस्थिर म्हणजे न लागतां क्षण ।
तंव पालटे नव तारुण्य ।
जरेनें देतां आलिंगन ।
होय जर्जर[7] मर्कटी. ॥३६१॥

चर्मपात्र द्विधा भिन्न ।
अपानोद्गारें[8] जडलें जाण ।
त्या लागीं वेंचिती धन ।
ते मूढ जन संसारीं. ॥३६२॥

विष्ठामूत्राचें भाजन ।
जाणोनि रमेना ज्याचें मन ।
ते पंडित विचक्षण ।
मोक्षसदनीं ठाकती. ॥३६३॥

स्त्रीच्या देहीं दोषदृष्टी ।
देखिजे जैसें विवेकनिष्ठीं ।
तैसेंच आत्मदेहानिकटीं ।
विचारवंतें पाहिजे. ॥३६४॥

नरदेहींचें तारुण्य प्रबळ ।
तरंगभंगाहूनी चंचळ ।
होवोनी नासती जलकल्लोळ[9] ।
तैसी चंचळ धनलक्ष्मी. ॥३६५॥

कीं तृणाचे[10] अग्रीं जळबिंदु ।
पडतां न लगे क्षणपादु[11] ।
तैसा स्त्रीसंगाचा[12] आनंदु ।
रेतपातीं[13] लवमात्र. ॥३६६॥

दर्पण धरोनि कानवडा ।
त्यावरि[14] ठेवूनि निसरडा ।
पडतां वेळ लागे केव्हडा?[15] ।
वीर्यस्खलन त्या वेगें.[16] ॥३६७॥

कळे न कळे ऐसा संतोष ।
होवोनि, नासतां न लगे निमिष ।
शेखीं दुःख उरे अशेष ।
महापुण्यक्षय[17] करी. ॥३६८॥

वृश्चिकनांगीवरी मधुबिंदु ।
देखोनि धांवे बुद्धिमंदु[18] ।
चाखों[19] जातां खेदु ।
भोगा[20] आला अपार. ॥३६९॥

---

१ पाठ--म्हणिजे. २. पाठ--लोभविषया. ३. पाठ--कष्मळीं. ४. पाठ--नरकमूत्र. ५. पाठ--पायखोळणी मोहरी. ६. पाठ--आमध्य नारी. ७. पाठ--जरी. ८. पाठ--अपानद्वारीं. ९. पाठ--चपल जळ. १०. पाठ-तृणाग्नि पडतां. ११. पाठ-क्षणार्धपादू. १२. पाठ--स्त्रियांचा. १३. पाठ--वीर्यपातीं. १४. पाठ-त्यावरी उडीदानि सरडा. १५. पाठ जेव्हडा. १६. पाठ--योगें. १७. पाठ--क्षयकारीं. १८. पाठ--मुकुटमंदू. १९. पाठ--चाटूं जातां दुःखखेदू. २०. पाठ--भोग.

ना[1] तरी खड्गाचिये धारे ।
साखर माखिली, ते पामरें ।
चाखां जातां, जिव्हा चिरे ।
मुख केउतें कळेना. ॥३७०॥

तैसें स्त्रीसंगें जें सुख ।
तें आडनांवमात्र देख ।
विर्षे मरण तैसें दुःख ।
प्राप्त होय निर्धारें. ॥३७१॥

स्त्रीरमणीं[2] होय सुख ।
तें मिथ्या नेणती मूर्ख ।
स्त्रीचा[3] संगमात्र देख ।
होतां, तोष तेथें नाहीं. ॥३७२॥

शिवणीमाजी योनिस्थान ।
तेथें बिंदूचें आगमन ।
होतां, कंडू उद्भवे गहन ।
'मैथुनानंद' ज्या म्हणती. ॥३७३॥

योनीबिंदूची भेटी ।
सरतां[4] देहीं आल्हाद उठी ।
तें दोन्हीं स्थानें[5] पुरुषानिकटी ।
युजती पोटीं कळाविद. ३७४॥

म्हणूनि तिळतुल्य सुखाचिये चाडे[6] ।
सुकृत नासे मेरूएवढें ।
जाणोनि स्त्रीदेह दोषभांडें ।
नातळती सज्ञान.[7] ॥३७५॥

विष्ठा सूकरासीच गोड ।
श्वानासि स्वादिष्ट हाड ।
तैसा विषयासक्तमूढ[8] ।
तो लोलुप स्त्रीसंगा.' ॥३७६॥

ऐशीं वचनें शुकमुखीं ।
निघालीं, जैसा वर्षाव पीयूषी ।
परी तीं अपमानासारिखीं ।
रंभेच्या मनीं मानलीं. ॥३७७॥

मग राहोनि उत्तर देत निगुती ।
'मागां दूषिल्या त्याहूनी मी परती' ।
ऐसें विस्तारित अर्थी[9] ।
श्लोकसंकेत बोलता. ॥३७८॥

रंभा म्हणे, 'योगिराया ! ।
तुवां दूषिल्या मानुषी जाया ।
तयांसारिखी माजी काया ।
नव्हे, हें काय नेणसी ? ॥३७९॥

वस्तुवस्तूसी अंतर बहुत ।
ऐसें जाणती परीक्षावंत ।
एऱ्हवीं कुरूप स्वरूपवंत ।
गर्भांध काय ओळखे ? ॥३८०॥

उच्चैःश्रवा रवीचे रथीं ।
द्वय सहस्र आगळे द्वय शतीं ।
दोनी योजनें व्योमपंथीं[10] ।
निमिषार्धें जो क्रमी. ॥३८१॥

तयाऐसे माझे घोडे ।
ऐसें नर जो बोले तोंडें ।
तयातुल्य आन[11] वेडें ।
कोण असे त्रैलोक्यीं ? ॥३८२॥

---

१. पाठ–कां तीव्र. २. पाठ–स्त्रियां रमता. ३. पाठ–स्त्रियांचा स्पर्श. ४. पाठ–संसारीचे. ५. पाठ–स्तनीं. ६. पाठ–निवाडें. ७. पाठ–ज्ञानिये. ८. पाठ–कामासक्तमूढ । तो भुलला स्त्रीमांसा ॥ ९. पाठ–अती. १०. पाठ–अधिक पंथीं. ११. पाठ–अनावडें.

कालखडगाऐसी विळी ।
किंवा असिलतेसारखी पळी ।
गजवेलीसीं[1] भिडे कोहळी ।
कीं तवा तैसा दर्पण ? ॥३८३॥

ऐरावती देवेंद्राचा ।
समुद्रमथनीं उद्भव ज्याचा ।
तो वनकुंजरासमान साचा ।
म्हणे[2] तो काय विवेकी ? ॥३८४॥

चंदन चढे देवनिढळा ।
एक काष्ठ पडे[3] पायखोळा ।
कल्पतरूसम आभळा ।
कीं केळें तैसे रुईदोडे ? ॥३८५॥

अश्वत्थ लावूनि गंगातीरीं ।
प्रदक्षिणा करिती पुरुषनारी[4] ।
त्यांचे संकल्प क्षणमाझारीं ।
सिद्ध होती[5] प्रत्यक्ष. ॥३८६॥

आणि लाविलें मद्योदकाचें काष्ठ[6] ।
स्रवती माध्वीचेच[7] लोट ।
तयाऐसा तरुवरिष्ठ ।
हरिवृक्ष कैंवि[8] मागें ? ॥३८७॥

माणिक, मुक्ता, पाच, पेरोज, ।
नीळ, वैडूर्य, पुष्कराज, ।
गोमेद, प्रभाकर, मरगज, ।
पद्मराग, महामणी. ॥३८८॥

परिस, चिंतामणी, ज्या म्हणती ।
तेही[9] एक पाषाणजाती ।
म्हणोनि गारेसाठीं देती ।
ते मूर्ख कीं शहाणे ? ॥३८९॥

भरित जांबुनदाच्या तगटें ।
पालवीं मुक्ताफळें चोखटें ।
ऐशा दिव्यांबरेशीं रगटें ।
काय तुळणेतें पावे ? ॥३९०॥

करोनी शरीराचा चुना ।
शत यागांचा तांबूल जाणा ।
देवुनी उर्वशीच्या स्तना ।
स्पर्शावया अधिकार. ॥३९१॥

आणिक एक कपर्दिकेचे[10] चाडे ।
कच्छ फेडुनी रिघे फुडें ।
त्या मनुष्यदारेचेनि पाडें ।
दिव्यांगना[11] कैंवि होती ? ॥३९२॥

उदार, धीर, पवित्र, ज्ञानी, ।
दयाशील, यशस्वी जनीं, ।
शापानुग्रहसमर्थ, महामुनी ।
मूर्त अवतार विष्णूचे. ॥३९३॥

कृपण, अधीर, दोषी,[12] मूढ ।
विश्वपीडक, अकीर्तिकाबाड,[13] ।
आचारभ्रष्ट, पाखांडी, जड, ।
मुख्य अधिकारी नरकाचे. ॥३९४॥

एकाचे नामें जळती दोष ।
दर्शनें जोडे साधकां[14] मोक्ष ।
ऐसे महानुभाव पुरुष ।
संगें लोकां सुखकारी.[15] ॥३९५॥

१. पाठ–गजवेली तैसी कोहाळी. २. पाठ–म्हणती तो कैवरीं ? ३. पाठ–वैसे. ४. पाठ–भोंवत्या भोंवती नरनारी. ५. पाठ–होवोनी. ६. पाठ–घट. ७. पाठ-मद्याचेच. ८. पाठ–तुळावा. ९. पाठ-जे हे. १०. पाठ–परीचे जाडे. ११. पाठ–देवांगना. १२. पाठ–दोषे. १३. पाठ–अकीर्ति वाड. १४. पाठ--सिद्धिका. १५. पाठ--सुखप्राप्ति.

एकाचे स्मरणें पापप्राप्ती ।
दर्शनें नरकासी निश्चयें नेती ।
संगें पाडिती दुःखावर्ती ।
ते अधम उत्तम कैसेनी ? ॥३९६॥

एक प्रतापें जिंकिती क्षिती ।
एक हरविती वडिलांची वृत्ती ।
एकातें म्हणती चक्रवर्ती ।
एक[1] भक्षिती कोरान्न. ॥३९७॥

एक सुपुत्र कुळातें तारी ।
एक पूर्वजां पाडी अघोरीं ।
म्हणोनि अधम पुरुषा सरी ।
नाहीं जाणा निर्धारें. ॥३९८॥

विष्णुतीर्थें वैकुंठ जोडे ।
सुरापानीं रौरवीं पडे ।
दोन्ही उदकें एकापाडे ।
म्हणतां मूढ नाडले. ॥३९९॥

मंदाकिनी आणि वैतरिणी ।
सारिख्या म्हणती पापी प्राणी ।
जगें नाहिजे जान्हवीजीवनीं ।
कर्दमनदीतें[2] नातळती. ॥४००॥

म्हणोनी वस्तुवस्तूसी पाहें ।
अंतर महदंतर आहे ।
ऐसें जाणे तोचि लाहे ।
'चतुर' नाम विलोकीं.[3] ॥४०१॥

तेंवि आम्ही देवांगना ।
पुण्यावेगळ्या न भेटों कवणा ।
मानवीच्या[4] देहदूषणा ।
काया अमुच्या नातळती. ॥४०२॥

प्रत्यक्ष पाहीं माजें रूप ।
दिव्य देहीं लावण्यदीप ।
येथीचें सुरतसुख अमूप ।
तें स्वानुभव जाणावें. ॥४०३॥

हे आनंदरसाची कूपिका ।
गोडी आणी सर्व सुखा ।
आधीं चाखोनियां अधरपीयूषा ।
प्रतीति पाहें ययाची. ॥४०४॥

मग ग्राहक होईं शरीरा ।
संतोष देईन तनुअंतरा ।
मातें अव्हेरितां चतुरा ! ।
महाहाणीस मान.' ॥४०५॥

ऐसी रंभा अनुवादली ।
परी शुकानें धिक्कारिली[5] ।
जैसा नृसिंहउपासक बळी ।
महाभूतीं छळिजेना. ॥४०६॥

पुढती तिच्या कर्णकुंभा ।
भरिता झाला वैराग्यअंभा ।
ज्या तिरस्कारें लाजोनि रंभा ।
हृदय फाडी आपुलें. ॥४०७॥

शुक म्हणे, 'रंभे ! देख[6] !
कामें पुरुष झाला मूर्ख ।
वरी वरी लावण्य सुरेख ।
कामिनीचें देखोनी. ॥४०८॥

चाफेगोरटी सुकुमारी ।
डोळस श्यामांगी सुंदरी ।
वदनीं[7] कुंकुमकेशरीं ।
उटी साजिरी दिसतसे. ॥४०९॥

---

१. पाठ--येक आजन्म कोरान्नी. २. पाठ--कर्मनदीतें. ३. पाठ--त्रैलोकीं. ४. पाठ--मानिनीच्या. ५. पाठ--परी शुक धिक्कारीच बोली. ६. पाठ--ऐक. ७. पाठ--चंदन.

कस्तूरी रेखिली निटिळा।
त्यावरी जडित[1] भांगटिळा।
मुक्ताहार मिरवे गळां।
दिव्याभरणें शोभती. ॥४१०॥

ऐसें[2] वरी वरी देखतां डोळां।
अधोद्वारीं सुटती[3] लाळा।
तृष्णासर्पिणी[4] गुह्यबिळा।
तोंड घालीं लवलाहें. ॥४११॥

परि विचारें सारोनि चीर।
अंतर न पाहतीच पामर।
घायमुखासम छिद्र।
रक्त स्रवे सर्वदा. ॥४१२॥

दुर्गंधीचें जन्मस्थान।
संयोगाचेनि मिषें जाण।
चित्त, वित्त, आयुष्य, हरण।
हारोनि सांडी पुरुषार्थें. ॥४१३॥

म्हणसी मानविनी कनिष्ठ।
आपुलें देह वरिष्ठ।
हें बहुतांचें उच्छिष्ट ताट।
घोंगायलें विकारीं. ॥४१४॥

खरकटलिया पात्राचे कांठ।
चोहाटां[5] चाटिती श्वानांचे थाट।
तैसे स्वर्गांगनेचे वोंठ।
स्वर्गा जात्यानें चुंबावे. ॥४१५॥

देवळीं मांडिली भेरी।
बडवितीया कोण निवारी।
तैसी वक्षःस्थळाची परी।
आवडे तेणें मर्दावें. ॥४१६॥

कीं वाकळ पडे वाटेवरी।
ते काठीनें उचलिजे वाटसरीं।
तैसी नितंबवस्त्राची परी।
उघडिल्या[6] नाहीं निषेध. ॥४१७॥

बाळसमुदायाचे[7] साळे।
दगड कमाविले वाटोळे।
ते उचलावे पुरुषें सबळें।
तैसेपरी कुचयुग्म. ॥४१८॥

उखळ रोंविलें[8] धर्मशाळे।
भलती कांडी भलत्या वेळे।
तैसें कामालय मोकळें।
स्वर्गकामें यजिती त्यां. ॥४१९॥

कीं ग्रामद्वारें मांडिले खोडे।
अन्यायीपायीं मुदती देवडे।
तरी [9]तृप्ति न मानुनी तोंडें।
उघडें असिजे सर्वदा. ॥४२०॥

तैसें बहुतीं बहुत काळ।
सेवसेवूनी केलें शीतळ[10]।
तरी भोगित्यापुढें उतावेळ।
सन्मुख सदा पसरलें. ॥४२१॥

नरकार्णव[11] भयानक।
भोंवतें वडवाग्नीचें मुख।
पुरुषवीर्य सिंधूदक[12]।
नित्य सेवितां शमेना.[13] ॥४२२॥

---

१. पाठ--भांगटिळा जडिला. २. पाठ--ऐशी. ३. पाठ--सुटली. ४. पाठ--कृष्णसर्पीण. ५. पाठ--हटां. ६. पाठ--उघडिल्या- ७. पाठ--सळ व रितियाचे. ८. पाठ--मांडिलें. ९. पाठ--तृप्त न होऊनि. १०. पाठ--थल. ११. पाठ--नरक उदर. १२. पाठ--सिद्धोदक. १३. पाठ--ह्या ओवीनंतर एक अधिकची ओवी अशी—फुटोनि खार जाली हाडी। माजी पडिलें गाळूनि सांडी। तेथें विष्ठामूत्र तोंडीं। लाळ गळे सर्वदा.

मग भडाग्नीच्या आहें ।
जानुद्वय करपलें पाहें ।
त्यावरी[1] आच्छादिलें आहे ।
रम्या वस्त्रें करोनी. ॥४२३॥

ऐशी 'नारी' यया नांवीं ।
पुरुषउन्मादलता जाणावी ।
स्वर्गमोक्षमुखा[2] आडवी ।
मार्गार्गळा अवघड. ॥४२४॥

कळे स्त्रीदेही नरक पूर्ण ।
कळे भोगियां भवबंधन ।
न कळे कां पां तेथेंच मन ।
जाणोनिच[3] लुब्धलें. ॥४२५॥

स्त्रीदेह नरकसमुद्र ।
जाणोनि, तेथें रमती नर ।
ते नरकरूपी घोर संसार ।
कैशा[4] परी तरतील ? ॥४२६॥

जेथें जन्म, तेथें रमती, ।
हे[5] संसारिकांची रीती ।
विष्ठामूत्रद्वारीं रमती ।
ते कृमिरूप निर्धारें.'[6] ॥४२७॥

ऐसें छी ! छी ! करोनी देखा ।
निंदिता रंभा चढली तवका ।
मग करिती झाली काय, ऐका ।
जन्मेजया ! श्रोते ! हो ! ॥४२८॥

शुकशब्दउल्का शिवतां श्रोत्रीं ।
रंभा पोळली जिव्हारीं ।
तें शल्य काढावया बाहेरी ।
फाड करी स्वहृदयाचा. ॥४२९॥

दोहीं करींचीं दाही नखें ।
उदरीं रोवोनियां निकें[7] ।
द्विभाग करून म्हणे, 'देखें ।
निर्मळ कीं हें कश्मळ.' ॥४३०॥

मौक्तिकशुक्तीचीं[8] फुटें ।
उकलितां अंतरीं चोखटें ।
कर्पूरकेळीचे गोमटे ।
सारे पदर सोलिल्या. ॥४३१॥

ऐसें[9] जठर चिरोनी बोटीं ।
म्हणे, 'गुणग्राहका ![10] लक्षी दृष्टीं ॥
छेदिल्या नाहीं रक्तवृष्टी ।
व्यथामात्र असेना. ॥४३२॥

हें विद्यारत्नवैरागर ।
निर्मळतेचा क्षीरसागर ।
सुगंधाचा मलयागर ।
कीं भांडार[11] कळांचें.' ॥४३३॥

अंतरीं पाहे शुक योगींद्र ।
दिव्य कपात[12] कृष्णागर ।
वा चंदन[13] नव केसर ।
चोख जवादीमृगनाभी. ॥४३४॥

ऐशीया परिमळाची पेटी ।
उघडली, ते देखतां दृष्टी ।
परम आश्चर्य वाटलें पोटीं ।
देहीं रोमांच ऊठले. ॥४३५॥

---

१. पाठ--यापरी. २. पाठ--स्वर्गभोगसुखाची. ३. पाठ--जाणोनि नाच; जाणा नेणाच लाधलें. ४. पाठ--कैसेनी तरोनि जातील. ५. पाठ--हा ! ६. पाठ--संसारें. ७. पाठ-तिखें. ८. पाठ--जैसीं माणीकशिंपांचीं. ९.पाठ--ऐसें जठरीचेनि बोटी. १०. पाठ--हें गुणगर्भ न्याहाळीं दृष्टी. ११. पाठ--भार. १२. पाठ--पाता. १३. पाठ--वनश्रीगंध नवकेशर.

सात्त्विकभावें[१] पातला दये ।
नेणे[२] विकल्प, भेद, भय, ।
कन्या अथवा देखिजे माय ।
तैसें जालें ते काळीं. ॥४३६॥

मग काय, बोले उत्तर ।
परिसोत[३] श्रोते चतुर ।
जेणें होय निरुत्तर ।
वितंडवाद दोहींचा. ॥४३७॥

शुक म्हणे, 'ऐक जननी ! ।
माझे पूर्वकर्माची काहाणी ।
द्वादश वर्षें नरकयातनीं[४] ।
मातृगर्भीं[५] वसिन्नलों. ॥४३८॥

विष्ठामूत्राचा दाथर ।
जठराग्नीची आहे[६] थोर ।
जेतु[७] दुर्गंधी अपार ।
नाकींतोंडीं संचरती. ॥४३९॥

अत्यंत संकोचता ठाय ।
पसरूं न शकें हातपाय ।
उबाऱ्यानें कोंडलों पाहें ।
अधोवदनें[८] जाजायलों. ॥४४०॥

ऐसीं चतुर्विंशति अयनें ।
घटिका युगाचे समान ।
म्यां भोगिली आदानें[९] ।
गर्भवासीं अपार. ॥४४१॥

हें जरी जाणवतें[१०] अलुमाळ ।
तरी तुझे पोटीं होतों बाळ ।
येथेंच वसतां अनंत[११] काळ ।
निर्मळ गर्भी सुखरूप ॥४४२॥

तुजसारिखी पावतां माता ।
तरी कां पावतों[१२] दीर्घ व्यथा ? ।
गेली गोष्टी व्यर्थ आतां ।
आठवोनी फळ काय ? ॥४४३॥

ते हें महाहानीसमान ।
मी मानितों येथ जाण ।
चुकी पडलीया शेखीं[१३] मन ।
पश्चात्तापें तळमळी. ॥४४४॥

ऐकुनी शुकाचे अनुवादा ।
रंभा कांपिन्नली गदगदां ।
अश्रु लोटती नयनारविंदा ।
स्वेदकंप[१४] सर्वांगीं. ॥४४५॥

अवचट पाय लागला लिंगीं ।
नेणता अपमानिला योगी ।
तयाचा[१५] पस्तावा होय अंगीं ।
शारें भरे सुमनाचे. ॥४४६॥

तैसें जालें तयेचिया जीवा ।
बोलावया न वळे जिव्हा ।
नेणीव भेतीयापुढें सर्वा ।
पृच्छा जैशा पारुषती. ॥४४७॥

तेणें निरुत्तर जाला वाद ।
गर्भी सांठविला पुढील शब्द ।
युक्तिप्रयुक्तीचा कंद ।
खाणोनि परता सांडिला. ॥४४८॥

---

१. पाठ--साह्ये भावें पातले दये. २. पाठ--जेवीं विकल्पभेदाचा भोय. ३. पाठ--ते परिसतु एक चतुर. ४. पाठ--नरकपतनीं. ५. पाठ--मूत्रभागीं. ६. पाठ--अह्मी. ७. पाठ--जंतु किडे कृमी अपार. ८. पाठ--अधोमुख जाचावें. ९. पाठ--पतनें. १०. पाठ--जाणतों. ११. पाठ--चिरकाळ. १२. पाठ--जोडिती. १३. पाठ--सांतीं. १४. पाठ--खेदकंपू. १५. पाठ--तया प्रस्तावाच्या अंगीं.

प्रसूतीनंतर तारुण्य सरे ।
विशाखांतीं मेघ विरे ।
गीत परतोनियां भरे ।
गाणारहृदयीं लळितांतीं. ॥४४९॥

कीं शांति पावलिया[१] क्रोधीं ।
युद्धीं जालिया सामसंधी ।
मार्गीं जातां महोदधी ।
पांथिक जैसा पांगुळे. ॥४५०॥

कीं गुरुदर्शनें विरे[२] संसारू ।
विवेक खंडी पापाचारू ।
तैसा शुकवाक्यें विचारू ।
सर्व हरपला रंभेचा. ॥४५१॥

सुकली अभिलाषाची नदी ।
प्रगट जाली निष्कामबुद्धी ।
मग स्तुति मांडिली शुकशब्दीं ।
श्रीशुकाची ते ऐका. ॥४५२॥

म्हणे, 'आश्चर्य त्रिभुवनीं ।
एवढा अक्षोभ्य महामुनी ।
नाना परी मोहितां मनीं ।
विकार नेघे[३] तिळतुल्य. ॥४५३॥

योगीयांचा तूं परम ईश ।
यतींमाजी[४] परमहंस ।
त्रैलोक्य[५] चराचरीं पुरुष ।
तुजतुल्य नाहीं, विप्रेंद्रा ! ॥४५४॥

सुरासुर, पैं गंधर्व, ।
सिद्ध,[६] विद्याधर सर्व, ।
पाताळपन्नग आणि मानव ।
जितेंद्रिय संन्यासी. ॥४५५॥

कंदमूळफळाहारी, ।
शुष्कपर्णाशनी, अनीरी, ।
ऊर्ध्वपादीं, अधोवक्त्रीं, ।
वायु भक्षिती तपस्वीये. ॥४५६॥

तेही मातें देखतां त्वरित ।
कामें होती विव्हळ[७] बहुत ।
म्हणोनि तुजपाडें सत्य ।
तूंचि एक, ऋषिवर्या ! ॥४५७॥

सकळ योगियांत[८] योगसिद्धी ।
तुजचि लाधली[९] त्रिशुद्धी ।
सहनशीळ[१०] तुझी बुद्धी ।
तूंचि एक, मुनिराया ! ॥४५८॥

माझिया कटाक्षांचे शर ।
लागतां, भेदले सुरवर[११] ।
ते शर हाणतां रोमाग्र ।
वक्रता तुझें न पवर्चा.' ॥४५९॥

ऐशी गर्जूनियां[१२] गिरा ।
उभारोनी दक्षिण करा ।
शुकाचिया वैराग्यधीरा ।
रंभा वर्णी आगळें. ॥४६०॥

'मेरू सांडील स्वस्थान ।
विदेशा नेऊं येईल सदन ।
भूतळा सेवील उडुगण ।
ध्रुव तो होईल अध्रुव. ॥४६१॥

भूगोळप्रदक्षणेलागीं ।
मंदराचळ निघेल वेगीं ।
हिमगिरीचे आर्गी[१३] ।
आटों शके सुरसरिता. ॥४६२॥

१. पाठ-सरलिया. २. पाठ-सरे. ३. पाठ-नोहे. ४. पाठ-योगियांमाजी. ५. पाठ-त्रैलोकीं साचार तूंचि पुरुष. ६. पाठ. यक्ष. ७. पाठ-विव्हळभूत. ८. पाठ-योगाची. ९. पाठ-साधली. १०. पाठ-मननशीळ सत्त्वबुद्धी. ११. पाठ-सुरासुर. १२. पाठ-गर्जतां. १३. पाठ-अंगीं.

पूर्वेचा[1] चळेल सूर्य ।
घटीं कोंडिला जाईल वाय ।
शब्दासरिसा[2] वरुणालय ।
मागें मागें फिरवूं ये. ॥४६३॥

परी शुकाचा नेम अचळ ।
कल्पांतीं नोहे चंचळ ।
हें[3] त्रिसत्य वाक्य निर्मळ ।
ऐकती त्यां निज मोक्ष.' ॥४६४॥

## उपसंहार

सरला रंभेचा अनुवाद । पुढें व्यासाचा संवाद ।
पुत्र पित्याचा विवाद । ऐकतां[4] बोधू ये भेटी. ॥ १ ॥

जाणें नेणें मी यया[5] । कळस वाहिला तृतीयोध्याया ।
ध्वज[6] बांधला दत्तात्रेया । दर्शनें[7] मोक्ष जगातें. ॥ २ ॥

अर्चित कैवल्याचा दानी । यालागीं[8] नाम 'चिंतामणी' ।
सायुज्यमुक्ती तयाचे चरणीं । मुक्तेश्वर तेथ मागे.[9] ॥ ३ ॥

—× ×—

# १०. हरिश्चंद्राख्यान.

## अध्याय पहिला

ॐ नमो जी ! गजवदना ।
नागानना ! पन्नगभूषण ! ।
एकदंता ! त्रिनयना ! ।
मूषकवाहना ! तुज नमो. ॥ १ ॥

नमूं शारदा ब्रह्मनंदिनी ।
शुक्लांबरा शुक्लभूषणी[10] ।
अर्चुनी नमिली सुरमुनीं[11] ।
हंसवाहिनी ते नमो. ॥ २ ॥

नमो संसारमोहतमांतका ।
मुमुक्षुसाधकां स्वपददायका ।
दुर्घट भवार्णवतारकनौका ।
देहधारी द्विभुजा. ॥ ३ ॥

आतां नमो श्रोतेजन ।
ज्ञानवैराग्यभक्तिसाधन ।
मज देऊनि वरदान ।
कथानुसंधान परिसावें. ॥ ४ ॥

---

१. पाठ–पूर्वे चालती सोमसूर्यो. २. पाठ–शब्दासारिखा. ३. पाठ–हे सत्य त्रिसत्य विमळ. ४. पाठ–ऐकती त्यां निजमोक्ष. ५. पाठ–जै साम्या. ६. पाठ–ध्वजा बांधिली. ७. पाठ–दर्शनें सुख जयातें. ८. पाठ–म्हणोनी नामें. ९. पाठ–सांगतसे-एका हस्तलिखितात पुढील समाप्तिलेख आढळतो-इति श्रीमहाभारते शांतिपर्वणि शुकरंभासंवादो नाम तृतीयोध्यायः ॥प्रसंग३॥ संपूर्णमस्तु ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ १०. पाठ–शुकवंदिनी.; ११. पाठ–सुरगणीं.

मोक्षसिंहासनांची पायरी ।
प्रथम, नाम अयोध्यापुरी ।
धर्मस्वरूप जीमाज्ञारी ।
राज्य करी हरिश्चंद्र. ॥ ५ ॥

सूर्यवंशक्षीराब्धिसोम ।
कीर्तिप्रकाशे[1] उजळीत व्योम ।
प्रजावल्लीतें सुख परम ।
यालागीं नाम हरिश्चंद्र. ॥ ६ ॥

शत्रुकरिणांलागीं हरी ।
साधुसज्जना सुधाकारी ।
बळी[2] त्रासी यालागीं हरि- ।
श्चंद्र नाम तयाचें. ॥ ७ ॥

तो सत्यसत्त्वाचा[3] शिरोमणी ।
परोपकारी परमज्ञानी ।
दुःखदरिद्रवार्ता कर्णी ।
ऐकों नेदी जगाच्या.[4] ॥ ८ ॥

धीरसत्त्वाचा महामेरू[5] ।
दानीं मेघजैसा उदारू ।
प्रजापालनीं कमलावरू ।
शक्रातुल्य प्रतापी. ॥ ९ ॥

आपुली आज्ञा सिंधुवसनी ।
परिधान करुनी, धराकामिनी ।
प्रतापवीर्यें भोगुनी जनीं ।
वरासनीं[6] विराजे. ॥१०॥

ऐसा राजा चक्रवर्ती ।
सिंहासनीं[7] विराजमूर्ती ।
जैसा इंद्र अमरावतीं[8] ।
शोभे, तैसा शोभला. ॥११॥

सभे साधु ऋषीश्वरू ।
कथा[9], कीर्तन, रागोद्गारू ।
तेणें श्रवणें राजेश्वरू ।
सुखनिर्भर मानसें. ॥१२॥

बैसला वेष्टित वीरप्रधानीं[10] ।
उभय भागीं वेत्रपाणी ।
मंगल वाद्यांचिया[11] ध्वनी ।
नाद गगनीं न समाय. ॥१३॥

तों अकस्मात् गगनपंथें ।
नारदमुनी पातला तेथें ।
वीणा वाजवी मधुर हस्तें ।
वदनीं गात हरिकथा. ॥१४॥

जो ज्ञानारविंदमकरंदू[12] ।
वैराग्यवल्लीचा मूळकंदू ।
विवेकसागरींचा पूर्णेंदू ।
तो नारदू पातला. ॥१५॥

रायें देखतांचि नयनीं ।
धांवोनि मस्तक ठेविला चरणीं ।
जयजयकारें महामुनी ।
सिंहासनीं बैसविला. ॥१६॥

कनकपात्रीं शुद्धजळें ।
रायें चरण[13] प्रक्षाळिले ।
कस्तुरी चंदन चर्चिलें ।
भाळीं रेखिलें केशर. ॥१७॥

---

१. पाठ–कीर्तिप्रतापें. २. पाठ–क्षिती पाळी. ३. पाठ–धैर्यसत्त्वाचा. शुद्धसत्वाचा. ४. पाठ–काही पोथ्यांत ही ओवी चोविसाव्याओवीनंतर आहे. ५. पाठ–कनकमेरू. ६. पाठ–राज्यासनीं, नरासनीं. ७. पाठ–सभामंडळी विशाळकीर्ति. ८. पाठ सिंहासनीं निर्जरपंक्ती. ९. पाठ–कथावर्णा; कथाचरित्र. १०. पाठ–राजधानी. ११. पाठ–तुर्यांचिया. १२. पाठ–ज्ञानरवीचा मकरंदू. १३. पाठ–चरणप्रक्षालन केलें.

नानापुष्पजातिमाळा ।
गणित नाहीं सुगंधपरिमळा ।
नैवेद्यतांबूलादि सोहळा ।
करूनी पूजिला नारदू. ॥१८॥

देखोनि रायाची विनयभक्ती ।
नारद सुखावला चित्तीं ।
आज्ञा मागुनी, गगनपथीं ।
गमन केलें मुनींद्रें.[1] ॥१९॥

आला शक्राचिया भुवना ।
सवेग पातला मंडपस्थाना ।
इंद्रें नमूनियां चरणा ।
केलें पूजन विधियुक्त. ॥२०॥

सभा मिनली[2] घनदाट ।
बैसले विश्वामित्र, वशिष्ठ ।
आणीकही श्रेष्ठश्रेष्ठ ।
तपोनिष्ठ पैं आले.[3] ॥२१॥

लाहूनि शक्राचा बहुमान ।
नारदें आरंभिलें कीर्तन ।
पढता झाला महिमान ।
तया आयोध्यापुरीचें.[4] ॥२२॥

'भूमंडळीं शरयूतटीं ।
अयोध्यापुरी अतिगोमटी ।
मज पाहतां सकळ सृष्टी ।
न दिसे दृष्टीं आणिक. ॥२३॥

एक आज्ञा, एक छत्री ।
नवखंड सर्व धरित्री- ।
वरी विराजे वीर क्षत्री ।
हरिश्चंद्र नृपनाथ.' ॥२४॥

परिसोनी नारदाच्या गोष्टी ।
वशिष्ठ सुखावला पोटीं ।
सभे गर्जोनी म्हणे, 'सृष्टीं ।
उपमा त्यासी तो एक.' ॥२५॥

नारदवचनाचिया[5] वातें ।
गाधिजकुंडीं क्रोधाग्नि चेतें ।
वरी वशिष्ठवाक्याचिया घृतें ।
शिखा गगनातें कवळिती. ॥२६॥

खदिरांगारातुल्य[6] नयन ।
करुनी, वदनचापींहून ।
सोडिता झाला अतितीक्ष्ण ।
वाग्बाण[7] सुतेज.[8] ॥२७॥

वशिष्ठपादपाआडून ।
वधूं[9] इच्छी भूपहरिण ।
परी त्यासीं मारील[10] कवण ।
कृपा पूर्ण सद्गुरूची.[11] ॥२८॥

तयावरि सत्त्वाची पाखर ।
जडोनि ठेली सबाह्य[12] अभ्यंतर ।
तेथें श्रमीचें वाक्शर ।
कवीं शरीरीं स्पर्शती ? ॥२९॥

असो, विश्वामित्राचीं वचनें ।
बोलिला तीं ऐका[13] श्रवणें ।
कठोर परि मवाळ सुमनें ।
पुण्यपरागें[14] मघमघीत. ॥३०॥

---

१. पाठ--नारदें. २. पाठ–दाटली; घनवटली. ३. पाठ–बैसले. ४. पाठ–अयोध्यापुरपतीचें. ५. पाठ–नारदाचिया वचनवातें. ६. पाठ–खदिराग्निकुंडातुल्य. ७. पाठ–शब्दबाण. ८. संपूर्ण ओवीचा अन्य पाठ असा—असो, विश्वामित्र वचनें । बोलिला तीं परिसा श्रवणें । खदिरांगारतुल्य नयन । करूनि तीक्ष्ण शब्द बोले. ९. पाठ–विंधूं पाहे. १०. पाठ–मारिता. ११. पाठ–गुरूचा; श्रीगुरूची. १२. पाठ–सबाह्यांतर. १३. पाठ–तुम्हीं परिसावीं श्रवणें. १४. पाठ–पुष्पपरागें.

निर्जरसभेसी भूपाळकीर्ती ।
वर्णितां शंका नाहीं चित्तीं ।
हें अयोग्य वाटे मजप्रती ।
सत्य जाण, नारदा !'[१] ॥३१॥

समर्थापुढें रंकमहिमा ।
मेरूसि योजिली वल्मिकउपमा ।
कण्हेर[२] आणि कल्पद्रुमा ।
समान कैसें म्हणावें ?' ॥३२॥

वशिष्ठ म्हणे, 'जी ! ऋषिराया ! ।'
वृथा कोप कासया[३] ? ।
धैर्य,[४] सत्त्व, शांति, दया ।
असे जया, तो श्रेष्ठ. ॥३३॥

तो धीरसत्त्वाचा[५] महामेरु ।
अढळपदीं जैसा ध्रुरू[६] ।
सूर्यवंशींचा शृंगारू ।
हरिश्चंद्र नृपनाथ.[७] ॥३४॥

परिसोनि वशिष्ठाचिया गोष्टी ।
विश्वामित्र सक्रोधदृष्टी ।
म्हणे, 'मी या छळितां, सृष्टीं ।
रक्षिता पाठी कोण असे ? ॥३५॥

मज विश्वामित्रऋषीपुढें ।
भूपाळसत्त्व कायसें बापुडें ।
क्षणामाजी करीन वेडें' ।
वचन धडपुडें बोलिला. ॥३६॥

येरु म्हणे, 'हें तैंच घडे ।
जैं यवनमुखीं वेद पडे ।
माझे पूर्वज रौरवकुंडें ।
भोगिजेति[८] समही. ॥३७॥

ना तरी मी या शिखासूत्रा- ।
वेगळें होणें, कुरुक्षेत्रा- ।
माजी दान करपात्रां ।
स्पर्श करीन अधमाचें. ॥३८॥

आणिक एक[९] प्रतिज्ञावचन ।
नरकरोटीं[१०] सुरापान ।
आणि गोत्रजाचें हनन ।
हे दोष गहन मज घडोत. ॥३९॥

ऐसिया दोषांचे पर्वत ।
सत्त्व टाकितां नृपनाथ ।
मस्तकीं घेऊनि नरकांत ।
पूर्वजांसहित बुडेन.' ॥४०॥

परिसोनि वशिष्ठाचिया वचना ।
विश्वामित्रही करी प्रतिज्ञा ।
'नृपसत्त्व टाळीन नाना- ।
यत्नेंकरूनी सर्वथा. ॥४१॥

जरी उतरेल माझ्या कसीं ।
तरी देईन जोडल्या सुकृतासी' ।
'तथास्तु' शब्दें पल्लवाशीं ।
येरें ग्रंथी दीधली. ॥४२॥

'माझिया तपाच्या असंख्य कोटी ।
न समाती ब्रह्मांडघटीं ।
कोणतीं म्हणाल, तरि कर्णपुटीं ।
श्रवण केलें[११] पाहिजे. ॥४३॥

---

१. समग्र ओवीचा अन्य पाठ--निर्जरसभेंसी नृपाळकीर्ति। वानितां चित्तें न लाजती। सूर्यापुढें दीपज्योति। तेज कैसें मिरवेल ?॥ २. पाठ–कण्हेर अर्की कल्पद्रुमा। समानता केवि होय ? ३. पाठ–कासया वायां ?, ४. पाठ–धर्म. ५. पाठ–धैर्यशिखेचा. ६. पाठ–त्रैवि का धुरू. ७. पाठ–नृपवरू. ८. पाठ–भोगितील सर्वही. ९. पाठ–ऐकें. १०. पाठ–नरकपाळीं. ११. पाठ–करा सज्जन हो.

जेणें तपें म्यां अपरसृष्टी ।
निर्मिली आणि चर्मदृष्टी ।
रविबिंब अवलोकितां[1] कष्टी ।
गळोनी पडलीं बुबुळें. ॥४४॥

माजो निघाले ज्ञाननयन[2] ।
घेतलें सूर्याचें दर्शन ।
आणि वातांबुपर्णाशन ।
केलें वर्षें कोटी दहा. ॥४५॥

लोहचूर्ण सेवूनि वनीं ।
तपलों पंचाग्नि[3] साधुनी ।
रेतकुंडीं[4] पद्मासनीं ।
जपलों अब्दें कोटी दाहा. ॥४६॥

ऐसिया तपाचेनी बळें ।
मृत्यु जिंकिला तये वेळे ।
नृपातें वोपीन तात्काळें ।
जरी माझिये तुळे उतरेल.' ॥४७॥

ऐसा दोघांचा संवाद, ।
होतां, उठिला मुनि नारद ।
इंद्र म्हणे, 'कायगा वाद ? ।
शब्दें शब्द वाढला.'[5] ॥४८॥

हटीं पेटूनियां दोघे ।
प्रतिज्ञा करूनियां[6] निघाले वेगें ।
विश्वामित्र परमरागें ।
सिद्धाश्रमा तो गेला. ॥४९॥

सूर्यवंशींचा अभिमानी ।
अयोध्ये गेला वशिष्ठमुनी ।
विश्वामित्रें शिष्य दोन्ही ।
गुप्त पाठी पाठविले. ॥५०॥

'इंद्रसभेमाजी वाद ।
दोघां झाला प्रतिज्ञाशब्द[7] ।
यालागीं राजा सावध ।
करावया बोध तो गेला. ॥५१॥

तुम्हीं जाउनियां गुप्त ।
पाहोनि यावें सकळ वृत्तांत' ।
येरीं जाउनी पहातां तेथ ।
मुनी नेमस्त न सांगे. ॥५२॥

वशिष्ठ आला ऐसी[8] वाणी ।
ऐकतां, राजा धांवला, चरणीं ।
नमस्कारुनी, शिबिकायानीं[9] ।
बैसवूनी चालिला.[10] ॥५३॥

गुढ्या उभविल्या नगरीं ।
मखरें, तोरणें, घरोघरीं ।
जयजयकारें मंगळ तुरीं ।
वशिष्ठ नगरीं प्रवेशे. ॥५४॥

रायें आणुनी मंदिरालया ।
कनकपीठीं बैसवी तया ।
सहकुमार नरेंद्रजाया ।
येती जाली दर्शना. ॥५५॥

ऋषिचरणीं ठेवुनी माथे ।
येरें स्पर्शिलें अमृतहस्तें ।
हृदयीं आलिंगुनी तयांतें ।
मंगल शब्दें गौरवी. ॥५६॥

षोडशोपचारीं पूजापात्रें ।
कनककुंभीं जळें पवित्रें ।
पूजा करुनी सांग मंत्रें ।
धरी[11] छत्रें आवडी. ॥५७॥

१. पाठ-सृष्टी. २. पाठ-दिव्यनयन. ३. पाठ-पंचाग्निसाधनीं. ४. पाठ-रिक्त कुंड; प्रेतकुंड. ५. पाठ-वाढवा. ६. पाठ-करूं. ७. पाठ-प्रतिशब्द. ८. पाठ-ऐसे कर्णीं । शब्द ऐकतां. ९. पाठ-शिबिकासनीं १०. पाठ-आणिला. ११. पाठ-धराछत्रें.

अर्घ्य, पाद्य, दिव्य सुमनें[1] ।
सुगंध[2] माला, हरिचंदनें ।
नैवेद्य, तांबूल, निरांजनें, ।
कनकतबकीं वोपिलीं.[3] ॥५८॥

ऐसिया उपचारें पूजोनी मुनी ।
राजा उभा जोडोनि[4] पाणी ।
विश्वामित्रवचन मनीं स्मरोनी ।
बोलता जाला वशिष्ठ. ॥५९॥

'सविताचळापासून निर्मळ ।
इहपर्यंत[5] कीर्तिजल ।
भरूनी वाहे पूर तुंबळ ।
अरिअचळ भंगोनी.[6] ॥६०॥

ऐसी वंशगंगा[7] पवित्र ।
तियेसी जन्हु विश्वामित्र ।
शोषावया पवित्र वक्त्र ।
पसरुनी बैसे यज्ञासी. ॥६१॥

मूळींच पवित्र स्वर्गभुवनीं ।
वरी विरागे ऋषिवदनीं ।
पुढें मिरवे अभिधानीं ।
जान्हवी ऐसी प्रसिद्ध.[8] ॥६२॥

नृपसत्त्वशुद्धहाटक ।
वरी ऋषिकोपाग्निसंगें चोख ।
मोला चढे अधिकाधिक ।
हें जाणिजे सुजाणीं.[9] ॥६३॥

असो, ऋषि म्हणे, 'गा ! राया ! ।
सांगितलें धरीं हृदया ।
भलें सत्त्व, शांति, दया ।
असे जयातें तो श्रेष्ठ.[10] ॥६४॥

शिबिराजा चक्रवर्ती ।
सूर्यवंशीं प्रख्यात कीर्ति ।
सत्त्वरक्षणीं मांस तुकिती ।
देह कापुनी ताजवां. ॥६५॥

सूर्यवंशींचिया[11] राया ! ।
आणिक परिसें गुणालया ! ।
वना नवजावें, ऋषिचिया[12] ।
सदना गमन न करावें.' ॥६६॥

संकेत दाउनी रायासी ।
वशिष्ठ गेला तपासी ।
राजा सावध अहर्निशीं ।
अयोध्येसीं वर्तत.[13] ॥६७॥

येरीकडे सिद्धाश्रमीं ।
विश्वामित्र अभिचारकर्मी ।
मातंगयाग सकामी ।
करिता झाला साक्षेपें. ॥६८॥

शुद्ध पाहुनी भूमिका ।
आमंत्रुनी याज्ञिकां ।
अकरा कुंडें षट्कोणिकां ।
निर्मिलीं, मृत्तिका शोधुनी. ॥६९॥

अथर्वणवेदींचे पाठक ।
अभिचारकर्मी शांतिक[14] ।
नानाहोमद्रव्यें, अनेक ।
पुष्पमाला[15] आरक्त. ॥७०॥

---

१. पाठ–वसनें. २. पाठ–सुगंध सुवास सुमनें. ३. पाठ–ठेविलीं. ४. पाठ–कर जोडोनी. ५. पाठ–इह परत्र; इह पवित्र. ६. पाठ–भंगावयास. ७. पाठ–वसे गंगा; शिवगंगा. ८. पाठ–विख्यात. ९. पाठ–सुजाणा. १०. संपूर्ण ओवीचा अन्य पाठ–असो ऋषि म्हणे गा राया । भल्यानें सत्त्व रक्षणें, सांडणें काया । करूनि सांडिती ते स्वर्गालया । अक्षयी भोग भोगिती. ११. पाठ–ऐशिया वंशींचिया. १२. पाठ–मुनीच्या. १३. पाठ–सर्वदा. १४. पाठ–शांतिक. १५. पाठ–पुष्पयाती आरक्ता.

सिंदूर, कुंकुम, रक्तचंदन ।
अर्ककण्हेरजास्वदसुमन ।
रक्तकुंभ, प्रेतासन, ।
मांसपत्रें चरूचीं. ॥७१॥

तीर्थें पूर्ण भरिले घट ।
अशुद्धकवळें भरिलें ताट ।
स्थापुनी शक्तीचें पीठ ।
होम आरंभिला ऋषीनें. ॥७२॥

मंत्रयंत्र तंत्रोपकरणें ।
पूजुनी जुव्हती पात्र वचनें ।
शक्ति शेष करिती पानें ।
पंचमुद्रा संयुक्ता. ॥७३॥

स्नान करुनी शोणितीं ।
नग्नासनीं[1] बैसोनी, हातीं[2] ।
अभिचारकंकण बांधोनि, सोडिती ।
पिंगट जटा मोकळ्या. ॥७४॥

मध्यें बैसोनी आपण ।
कुंडीं प्रतिष्ठिला हुताशन ।
'स्वाहा' म्हणोनी[3] अवदान ।
मंत्रोच्चारें[4] टाकिती. ॥७५॥

आहुति टाकितां मेदमांसीं[5] ।
धूम्र दांटला आकाशीं ।
कर्पट घाणी बैसली शीर्षीं ।
वदन, घ्राण, दाटोनी. ॥७६॥

सप्तरंगी ज्वाळा उमटती[6] ।
अकरा कुंडीं सासष्ट आहुति ।
हुवितां, देवी पावली तृप्ती ।
मातंगशक्ति[7] भवानी. ॥७७॥

सहस्र अवदानें पूर्णाहुती ।
होतां, प्रगटली आदिशक्ती ।
कोण कामना तुझ्या चित्तीं ? ।
सांग निगुती,[8] मुनिवर्या !' ॥७८॥

ऋषि म्हणे, 'हेंचि मागणें ।
क्रूर श्वापदीं[9] भरीं काननें' ।
'निकें' म्हणोनी उदार[10] वचनें ।
देती झाली जगदंबा. ॥७९॥

विश्वामित्र तये वेळे ।
देवीवरदानाचेनि बळें ।
निर्मिता[11] जाला श्वापदकुळें ।
भयानक[12] काननीं. ॥८०॥

पक्ष, मासें, अयनें, अब्दें, ।
प्रसवलीं अनेक श्वापदें ।
विस्तारें वदिजेल, तरी शब्दें ।
ग्रंथ जाईल पाल्हाळी.[13] ॥८१॥

दंती, शृंगी, नखी, क्रूर ।
निर्मिले श्वापदगणांचे भार ।
पादहीन, पक्षधर ।
खेचर, भूचर, झोटिंग. ॥८२॥

कानन व्यापिलें, श्वापदें ।
मातलीं भक्षुनी मांस,[14] मदें ।
गर्जती भयानक शब्दें ।
त्रास देती जगातें. ॥८३॥

---

१. पाठ-यज्ञासनीं. २. पाठ-पात्रती. ३. पाठ-श्रुवा पात्रीं. ४. पाठ-मंत्रोपचारें. ५. पाठ-मद्यमांसीं. ६. पाठ-उठती. ७. पाठ-मातंगशक्ता. ८. पाठ-निरुती. ९. पाठ-श्वापदें. १०. पाठ-उत्तर वचन. ११. पाठ-करिता. १२. पाठ-जगर्हिंसक; जीवहिंसक. १३. समग्र ओवीचा अन्य पाठ-पक्षमास आयोनि आळें । प्रसवली अनेक श्वापदकुळें । विस्तारें वदिजे तरी सकळें । ग्रंथ जाईल पाल्हाळी. ॥ १४. पाठ-मांसमेदें.

कृषिक नवजाती कृषिकें ।
तीर्थयात्रेसीं पांथिकें ।
व्यवहार सांडिला व्यवसायिकें ।
धेनु वना नवजाती. ॥८४॥

भयें वनीं न रिघे[1] कोणी ।
कल्पांत भाविती सकळ प्राणी ।
म्हणती, 'घालूं राजकर्णी ।
जाऊनी सदनीं रायाचे.' ॥८५॥

प्रजा येउनी[2] राजसभे ।
जोहार[3] करुनी राहिले उभे ।
'तुझीये शौर्यसूर्यप्रभे- ।
माजी पशुतम दाटलें. ॥८६॥

सांगावया योग्य नव्हे मात ।
न सांगतां आमचा प्राणांत[4] ।
श्वापदें मातलीं वनांत ।
करिती घात जगाचा.' ॥८७॥

ऐकोनी पौर[5] यांची वाणी ।
राजा विचारी अंतःकर्णी ।
गुरुवचन तें मानुनी मनीं ।
राहतां, जनीं अपकीर्ति. ॥८८॥

वनीं निवडुनी श्वापदगणां ।
सुखी करावें सकल जनां ।
वशिष्ठ कोपेल, तरी चरणां ।
नमन करीन साष्टांगीं. ॥८९॥

ऐसें विचारुनी चित्तीं ।
पाचारिला वाहिनीपति ।
म्हणे, 'जाणें वनाप्रति ।
सेना सिद्ध करावी.' ॥९०॥

तेणें त्राहाटिल्या भेरी ।
वाजती रणतुरें मोहरीं[6] ;
वीरश्रीवसनें महावीरीं ।
परिधान केलीं तात्काळ. ॥९१॥

अश्वगजरथादि वहनीं ।
वळघल्या वीरांच्या श्रेणी ।
त्यांमाजी राजा प्रतापगुणी ।
वीरश्रिया शोभला.[7] ॥९२॥

सजिले[8] असंख्य रहंवर ।
पाठी चालती अश्वभार ।
मत्त कुंजरांचे भार ।
ऊर्ध्वशुंडें धांवती. ॥९३॥

तयांपृष्ठीं दिव्य पताका ।
भासती सेनासागरीं नौका ।
उभय कर्णामाजी मस्तका-[9] ।
वरी अंकुश[10] शोभले. ॥९४॥

नानावाद्यांचिया ध्वनी ।
राजा आरूढला वहनीं ।
तारामती शिबिकासनीं ।
सेनागर्भी चालत. ॥९५॥

छत्रच्छायेतळीं नृपवर ।
वीरश्रियेंसी विराजे[11] वीर ।
नगरीं ठेवुनी राजकुमर ।
पुरोबाहेर निघाला. ॥९६॥

---

१. पाठ–निघे. २. पाठ–जाऊनि. ३. पाठ–जोहारूनि. ४. पाठ–घात. ५. पाठ–पौरजांची. ६. पाठ–अपारीं. ७. पाठ–अयोध्यानगरीची मुखांतुनी। बाहेर सर्वही निघाले ।; अयोध्यानगरीच्या वदनींहुनीं । बाहेर सर्वही निघाल्या. ८. पाठ–आणिक असंख्यात स्वार । कण्हेरी अश्वरहंवर ।; पुढें पायांचे मोगर । पाठीं अश्वरहंवर. ९. पाठ–देखा. १०. पाठ–ऊर्ध्व तुंडें. ११. पाठ–राजेश्वर.

राजा प्रवेशला महावनीं ।
श्वापदकळप देखिले नयनीं ।
शस्त्रीं, शरीं, पाशबंधनीं ।
वधुनी[1] धरणी पाडीत.॥९७॥

ऐसे रायें मारिले कळप ।
एका अंगीं भरला कंप ।
उरलीं श्वापदें लंघिती नृप[2] ।
प्राणधाकें[3] पळताती. ॥९८॥

येरीकडे गाधिजमुनी ।
परम संतोष[4] मानुनी मनीं ।
पुरी त्यागूनियां महावनीं ।
राजा आला म्हणोनी. ॥९९॥

आश्रमा आणावया राव ।
ऋषीनें केलें लाघव ।
कुरंग निर्मिला अपूर्व ।
कनककांति साजिरा. ॥१००॥

'तुझ्या स्वरूपरज्जनें गळां ।
बांधुनी आणावें नृपाळा.'[5] ।
'निश्चें, म्हणोनी चरणकमळां ।
वंदुनी[6] गेला वनासी. ॥१०१॥

मृगराज आला समीपू ।
राजा पाहे तंव कनकवपू ।
नरनाथहृदयीं कामनासर्पू ।
फुंफाट करीत ऊठिला. ॥१०२॥

गुणीं लावुनियां बाण ।
घेवूं पाहे कुरंगप्राण ।
येरें फेडिलें[7] कीं रान ।
भूमीं चरण न थारे ॥१०३॥

राजा लागला तया पाठी ।
धांवतां जाला परम कष्टी ।
पळत पातला[8] आश्रमानिकटीं ।
विश्वामित्रऋषीच्या. ॥१०४॥

अंतरें राहुनियां उभा ।
पहात ठेला वनश्रीशोभा ।
वनसरोजीं नेत्ररोलंबा[9] ।
स्वादामोदा[10] लोभले. ॥१०५॥

वनश्री[11] वर्णावी कवणें ? ।
उपमे नंदनवन उणें ।
नानावृक्षीं फळें सुमनें ।
रसमुवासें दाटलीं. ॥१०६॥

एक सरळ शाखाविहीन ।
एक ते शाखामंडित पूर्ण ।
तया[12] ग्रीवा लतिका[13] वेष्टन ।
करुनी जाती मुरवाडें. ॥१०७॥

कर्पूरकर्दळी, नारीकेळी, ।
चूतवृक्ष लवले[14] फळीं ।
कंटकी फळांची[15] नव्हाळी ।
लागलों मुळीं असंख्य. ॥१०८॥

द्राक्षीमंडपातळीं दाट ।
वाहती[16] अमृतरसाचे पाट[17] ।
फणसफळें त्यागुनी देठ[18] ।
दाविती वाट सिंधूची. ॥१०९॥

---

१. पाठ–विधुनां रणीं पाडिती. २. पाठ–द्वीप. ३. पाठ–मृत्युधाकें. ४. पाठ–संतोषें तोषला मुनी. ५. पाठ–भूपाळा. ६. पाठ–नमुनी गेला. ७. पाठ–फोडिलें किराण. ८. पाठ–आला ९. पाठ–नेत्रारंभा. १०. पाठ–सुख आमोद लाधला. ११. पाठ–वनश्री वर्णवे कवणा ? १२. पाठ–तयाग्रीं. १३. पाठ–तया आंगीं मालती वेष्ठन. १४. पाठ–लविन्नलें. १५. पाठ–फळांचा. १६. पाठ–धांवती. १७. पाठ–लोट. १८. पाठ--वेष्ट.

जाई, जुई, चंपक, मालती, ।
बकुळ, मोगरे, कांचन, शेवती, ।
केतकीवनें मघमघिती ।
पराग क्षिती सुगंध.[1] ॥११०॥

अगरचंदन, देवदारू, ।
हरिचंदन, मैलागरू, ।
वृक्ष वेष्टित विषधरू ।
भूतें जैशीं निधाना. ॥१११॥

न्यग्रोध, पालाश, पिप्पलतरू ।
जे देवत्रयाचे अवतारू ।
बिल्व, तुळसी, हरि, हरू ।
ज्यांचे पत्रें तोषती. ॥११२॥

अनेक वृक्षांचिया जाती- ।
माजी पशुपक्षी क्रीडती ।
कनककल्हारीं[2] शोभती ।
पूर्ण जीवनीं तडाग. ॥११३॥

ऐसी सिद्धाश्रमाची वाटिका ।
देखोनि रायें वारिलें कटका ।
आपण, प्रधान, पट्टनायिका- ।
वांचुनी आणिका येऊं नेदी. ॥११४॥

प्रवेश करितां तये वनीं ।
राजा आश्चर्य देखे नयनीं ।
धेनु व्याघ्र एके स्थानीं ।
एकमेकां चाटिती. ॥११५॥

नकुळ सर्प क्रीडती सुखें ।
मार्जारीस्तना[3] लागती मूषकें ।
सिंह करिण करीत कौतुकें ।
वनामाजी विचरती. ॥११६॥

उलूका निरखूनी पिलीयांसीं ।
वायस जाती चारियासी[4] ।
विश्वामित्रमाया ऐसी ।
सहसा न कळे मानवा. ॥११७॥

निर्वैर श्वापदांचे गण ।
देखोनी विस्मित रायाचें मन ।
पुढें जातां सुगंध जीवन ।
तडागीं पूर्ण देखिलें. ॥११८॥

तया कासारजीवनें स्नान ।
करोनि[5] विश्रांति लाहिजे मनें ।
परिधान करुनी दिव्य वसनें ।
देवालया निघाला. ॥११९॥

कर्दळीद्रोणीं हेमकमळें ।
नाना पुष्पें सुपरिमळें ।
कनकपात्रीं भरुनी जळें ।
शिवागारीं प्रवेशे ॥१२०॥

सोमकांतश्वेत शिखर ।
माजीं विराजे[6] कर्पूरगौर ।
द्वारीं धवळा नंदिकेश्वर ।
मनोहर शोभत.[7] ॥१२१॥

भावें पूजुनी गिरिजावर ।
नमन केलें जोडोनी कर ।
भार्येसहित राजेश्वर ।
स्वच्छासनीं[8] बैसला. ॥१२२॥

विश्वामित्रें मातंगकामिनी ।
गुणी, सुरूप,[9] नाचणी, ।
रायासमीप दोघीजणी ।
देउळांगणीं प्रेरिल्या.[10] ॥१२३॥

---

१. पाठ--सुवर्णकमळें साजिरें. २. पाठ--कनक कण्हेर. ३. पाठ-स्तनालागीं; स्तना लागलीं. ४. पाठ--चरावयासा. ५. पाठ--करितां, करी. ६. पाठ--शोभला. ७. पाठ--शोभला; विराजे. ८. पाठ--स्वस्थानीं; स्वस्थासनीं. ९. पाठ--रूपसा. १०. पाठ--प्रवेशल्या.

ऋषिआज्ञेनें कामसरिता ।
लावण्यलतिका, गुणैकभरिता, ।
सालंकार,[1] शोभिता ।
नृपनाथासन्मुख.[2] ॥१२४॥

येऊनी नृत्यगायन[3] करिती ।
आविर्भावें[4] ताल तोडिती ।
नयनबाण विंधिती ।
चित्तकुरंग रायाचा. ॥१२५॥

त्यांचिया गायनाची विचित्र कळा ।
निर्झर पाझरती शिळा ।
पवन पांगुळे, गंगाकूळा ।
पूर तुंबोनी दाटती. ॥१२६॥

सभे श्रवणा बैसले[5] सादरें ।
नानाश्वापदजाती अपारें ।
वैर त्यागुनी परस्परें ।
मधुरस्वरें मोहिलीं.[6] ॥१२७॥

ऐसें देखोनि[7] धरारमण ।
म्हणे, 'धन्य धन्य चतुरानन ।
जेणें संगीतनिकेतन ।
कामिनीरूपें निर्मिलें.' ॥१२८॥

त्रिशंकुरायाचा नंदन ।
संगीतशास्त्रीं अतिप्रवीण ।
श्रवणें झाला सुप्रसन्न ।
करींचें कंकण काढिलें. ॥१२९॥

अनेक रत्नें धरामौळीं ।
हाटककंकणा जडियेलीं ।
नाचणी पाचारुनी जवळी ।
देता झाला तियेतें. ॥१३०॥

येरी न घेवोनी[8] बोले वचन ।
'आम्हां ऋषिधर्में काय उणें ?[9] ।
तव[10] भोगालागीं मनें ।
येथें आणिलें, नरेंद्रा ! ॥१३१॥

तुझ्याऐसा सुरूप[11] गुणी ।
दुजा न देखों त्रिभुवनीं ।
आम्हां ऐशा कुरंगनयनी[12] ।
अपर[13] कामिनी असती ना.' ॥१३२॥

ऐसें बोलतां मुनिवर्यदासी ।
राजा कोपला मानसीं[14] ।
आज्ञा करी[15] प्रधानासी ।
'मारून बाहेर घालाव्या.'[16] ॥१३३॥

येरें आज्ञा[17] वंदुनी शीर्सीं ।
बाहेर घातल्या तापसदासी ।
रुदितवदनें[18] आश्रमासी ।
ऋषिरायाच्या पातल्या. ॥१३४॥

आपल्या करें फाडोनि वसनें ।
कबरीं आच्छादिलीं वदनें ।
आंगीं धुळी चर्चुनी, नयनें ।
उष्ण जीवनें ढाळिती. ॥१३५॥

शरीर थरथरां कांपत ।
'हा ! हा !' शब्दें हृदय पीटित ।
आक्रोशें रडत, पडत[19] ।
बीभत्सरूपें कुपात्रा. ॥१३६॥

---

१. पाठ-अलंकारेंसीं. २. पाठ-जवळिकें. ३. पाठ-गीतनृत्य ४. पाठ-हावभावें. ५. पाठ-बैसलीं. ६. पाठ-मोडिलीं; दोहिलीं. ७. पाठ-ऐकोनियां. ८. पाठ-नेघोनी. ९. पाठ-न्यून. १०. पाठ-तुझिया स्वरूपा वेधलें मन । इच्छा संग कामाचा. ११. पाठ-रूपस गुणी. १२. पाठ-कुरंगिणी. १३. पाठ-अपार. १४. पाठ-निजमानसीं. १५. पाठ-करोनि. १६. पाठ-घालव्या; घालित. १७. पाठ-आज्ञा करितां; आज्ञा होतां प्रधानासी. १८. पाठ-रुदनवदनें, अधोवदनें. १९. पाठ-स्फुंदत.

ऋषिआंगणीं उभय कामिनी।
आंग टाकूनि[1] लोळति धरणी।
हें देखोनि गाधिजमुनी।
शांतवुनी पूसत. ॥१३७॥

'तुम्हां कवणें दिधला त्रास ?।
त्याचा समूळ करीन ग्रास[2]।
खेद सांडून सावकाश[3]।
श्रुत केलें पाहिजे' ॥१३८॥

येरी म्हणती, 'जी स्वामियां !।
तुमच्या वचनें देवालया।
जाउनी, गीतनृत्यें[4] राया।
तोषविलें, समर्था ! ॥१३९॥

उचित देतां नरभूषणें।
आम्ही नेघोनि[5] बोलिलों वचनें।
'तव[6] भोगालागीं मनें।
आणिलें तेथें नरेंद्रा !' ॥१४०॥

ऐसें आम्ही बोलतां वचन।
राजा कोपला दारुण।
प्रधानहस्तें मारून।
बाहेर घातलें आमुतें. ॥१४१॥

वसनें कंचुकी फाडूनी।
मुष्टिप्रहारें पृष्ठीं मर्दूनी।
प्रेतदशा पावोनी।
भूमीवरी पडलों[8] जी.[7] ॥१४२॥

दैवें स्मृति पावोनि उठतां।
बाहेर घातलें वोपोनि लाथा।
ऐसें वर्तलें, कृपावंता !'।
बोलोनि[9] गहिवरें दाटल्या. ॥१४३॥

त्यांची परिसोनी दीन वाणी।
ऋषि धांवे, वमीत क्रोधाग्नी।
भासे जैसा[10] समुद्रमथनीं।
व्याळ गरळा सांडीत. ॥१४४॥

कीं मदनदहनालागीं शंकर।
तृतीय नेत्रींचा वैश्वानर।
पसरी, तैसा ऋषीश्वर।
रायासमीप[11] पातला. ॥१४५॥

म्हणे, 'रायांमाजी अधमा !।
नेणसी माझा प्रतापमहिमा।
आतांचि बोळवीन धामा।
वैवस्वताच्या अविलंबें. ॥१४६॥

वशिष्ठ गुरूच्या पडिभरें।
मातलासि राज्याधिकारें[12]।
यालागीं मदाचें काविरें।
नयनीं आलें तूझिया. ॥१४७॥

अरे ! तुझिया गुरूसी।
प्रचीत असेल निज मानसीं।
म्यां एकशत पुत्रांसीं।
यमलोकासी पाठविलें.' ॥१४८॥

ऐसे ऋषीचे वाक्शर[13]।
वर्षती जैसे सौदामिनीवर।
नृपाअंगीं क्षमापंजर।
शांतिभूषणें मिरविला.[14] ॥१४९॥

---

१. पाठ–टाकिती लोटोनि. २. पाठ–नाश. ३. पाठ–मानस. ४. पाठ–नृत्यगीतें. ५. पाठ–नेघों. ६. पाठ–तवांगभोगालागीं मन; अंगसंगालागीं मन। असे तुमच्या नरेंद्रा। समग्र ओवीचा अन्य पाठ वसन कंचुकी फाडुनी नेमी। मुष्टीप्रहारें मर्दुनी, भूमी। वरी पडिलों जी ! आम्ही प्रेतदशा पावोनी. ८. पाठ–पडिलों जंव आम्ही. ९. पाठ–बोलतां गहिंवर दाटला. १०. पाठ–जणों, जेवि. ११. पाठ–रायापाशीं. १२. पाठ-राज्यांधकारें. १३. पाठ-वाक्यशर. १४. पाठ–शोभली.

राजा म्हणे, 'प्रतिसृष्टिजनका ! ।
विनापराधें कोप कां ।
करितां तुम्ही ? ऋषिनायका ! ।
हें मज कळलें पाहिजे.' ॥१५०॥

ऋषि म्हणे, राया ! कृतघ्ना ! ।
माझिया बाळकां श्वापदगणा ।
वधुनी[1] कां येणें सदना ।
तापसाच्या ? निर्लज्जा ! ॥१५१॥

निर्वैर श्वापदांच्या कोटी ।
वनीं विचरती, पाहें दृष्टी ।
ऐशियांतें वधूनि, शेवटीं ।
वायां[2] दासी मारिल्या ?' ॥१५२॥

रायें मस्तक ठेविला चरणीं ।
बोलता जाला मधुर वचनीं ।
मम अपराध न धरुनी[3] मनीं ।
क्षमा केली पाहिजे. ॥१५३॥

येका देहाची करणें[4] ।
तेथें रसना खंडिली दशनें ।
तर्जनीनखें फुटतां नयनें ।
द्वेष न धरिजे मानसीं. ॥१५४॥

म्हणतां,[5] 'श्वापदें आपुलीं बाळें' ।
सांगा, आम्ही कवणाचीं सकळें ? ।
क्रोध सांडोनी स्नेहाळें ।
क्षमा केली पाहिजे.' ॥१५५॥

तापसकोपाग्नीच्या[6] शिखा ।
नृपें केल्या मृगांकमरीचिका[7] ।
ऋषिआश्रमा त्यागुनी,[8] पादुका ।
वंदूनि, आला स्वस्थाना. ॥१५६॥

श्रमें श्रांतला[9] कुंभिनीवर ।
सुषुप्तीनें व्यापिलें अंतर ।
तारामतीअंक सुकुमार ।
उशी करूनि पहूडला. ॥१५७॥

आतां पुढें रसाळ कथा ।
निद्रा लागतां नृपनाथा ।
स्वप्नामाजी तत्त्वतां ।
दान मागेल कौशिक. ॥१५८॥

इति श्रीभारतवनपर्वणि[10] ।
नगरसंगे वरदायिनी ।
मुक्तेश्वराची वाग्भवानी[11] ।
भंवली[12] स्यानंदगोंधळीं. ॥१५९॥

—xx—

## अध्याय दुसरा

अंगनाअंकीं वाम कर्ण ।
ठेवुनी पहुडला[13] नरभूषण ।
देउळाद्वारीं , प्रधान ।
सावधान बैसला. ॥ १ ॥

अपर[14] देहींची सृष्टिजननी ।
मानसविलास राजधानी[15] ।
नसोनी साचोकार जनीं[16] ।
दावी जैसे मृगांबु. ॥ २ ॥

---

१. पाठ–कां आलासी. २. पाठ–वा रे. ३. पाठ--मानूनि. ४. पाठ--करणें. ५. पाठ--म्हणा. ६. पाठ--कोपाशखिशिखा. ७. पाठ--मृगांबुका. ८. पाठ--घालुनी. ९. शांतला. १०. पाठ--शांतिपर्वणि. ११. पाठ--वाग्वाणी. १२. पाठ--भरी; भरली. १३. पाठ--पहुडे नृपनंदन १४. पाठ--अपार देहाची सृष्टिजननी । मानसविलासें राजधानी. १५. पाठ--राजध्यानीं. १६. पाठ--नयनां.

कीं श्रमसागरीं वडवानळी ।
मानसवृक्षीं कामनावल्ली ।
सुखवाडोनी स्वप्नफळीं[१] ।
सुखदुःखरसेसीं. ॥ ३ ॥

ऐसी निद्रा लागतां राया ।
विश्वामित्राची[२] विचित्र माया ।
आपण स्वप्नीं प्रकटोनियां ।
रायापासीं द्विजरूपें.[३] ॥ ४ ॥

स्वप्नीं देखोनी द्विजातें ।
रायें नमिलें जोडोनि हस्तें ।
येरू गौरवी तयातें ।
'मनोरथावाप्तिरस्तु.' ॥ ५ ॥

राजा[४] बोले उदार वचनीं ।
'कोण कामनां इच्छूनि[५] मनीं ।
येथें आलेति ? तें श्रवणीं ।
श्रुत केलें पांहिजे.' ॥ ६ ॥

ब्राह्मण म्हणे, 'राया ! समर्था ! ।
संसारविपिनामाजी वसतां ।
दारिद्र्यव्याघ्र उठी अवचिता ।
आतुर[६] कंठीं झोंबला.[७] ॥ ७ ॥

तूं दयाशीळ धर्ममूर्ति ।
बहु वक्त्रीं ऐकिली कीर्ति ।
यालागीं शरण नृपति ! ।
तुज आलों, गृहस्था ! ॥ ८ ॥

ऐश्वर्यधनुष्यशरीं[८] ।
सेनापंजर घालुनी वरी ।
राजवहनीं वळघुनी, करीं ।
कोशशस्त्र[९] सुतेज. ॥ ९ ॥

ऐशियापरी दारिद्र्यव्याघ्रा ।
वधावया[१०] हेतु नृपवरा ! ।
धरूनी आलों मी पवित्रा ! ।
तुजपासीं याचक.' ॥१०॥

राजा म्हणे, 'याहून परता ।
लाभ तो कोण असे आतां ?' ।
रायें संकल्प घालितां ।
झाला बोलता द्विजवर. ॥११॥

'अंकुश, कडपाळें'[११] लेखणी, ।
इतुकें वोपीं माझ्या पाणीं.' ।
येरें 'दिधलें' म्हणोनी ।
उदक हातीं सूदलें. ॥१२॥

सर्वेचि आणिक देखे दृष्टी ।
काळपुरुष उभा निकटी[१२] ।
लोहार्गळा धरूनी[१३] हातीं ।
हाणी मस्तकीं निघातें. ॥१३॥

तेणें घायें[१४] भयाभीत ।
राजा स्वप्नामाजी बरळत ।
तारामतीनें त्वरित[१५] ।
जागृत केला स्वहस्तें. ॥१४॥

---

१. पाठ--स्वप्नकाळी. २. पाठ--ऋषीची जे अलोट माया. ३. पाठ--विश्वामित्र निजरूपें. ४. समग्र ओवीचा अन्य पाठ--राजा बोले मधुरवचनें । कोण कामना इच्छूनि मनें । येथें आलेनि तें मजलागुन । कथन केलें पाहिजे. ५. पाठ--इच्छा. ६. पाठ--अतुर, अतुट. ७. पाठ--शिरकला. ८. पाठ-शौर्य धरूनि शरीरीं. ९. पाठ-कोशशस्त्रें सुतेजें. १०. पाठ--वधावें हातें नृपवरा. ११. पाठ-- कडाळें; कडियाळें. १२. पाठ--पाठी. १३. पाठ--कवळोनि मुष्टी १४. पाठ--प्रहारें. १५. पाठ--जागृत । राजा केला हस्तकें.

निजरूप विसरुनी प्राणी ।
अज्ञानभ्रमें भ्रमतां योनी[१] ।
सुखदुःखाची[२] आटणी ।
भोगिजेती सर्वदा. ॥१५॥

हे जाणिजे भूत स्वप्न ।
'मी,' 'माझें' हें बरळणें ।
अज्ञाननिद्रेचें लक्षण ।
जीवदशा[३] बोलिजे. ॥१६॥

तया संसारविपिनामाजी ।
अज्ञाननिद्रेचिया सेजीं ।
वाहे जन्ममृत्यूचीं वोझीं ।
रंकरूपें समर्थ. ॥१७॥

ऐसिया अज्ञानतमाचा हंता ।
श्रीगुरु चिदात्मपददाता[४] ।
क्लेशातीत करी[५] तेवीं कांता ।
सावध[६] करी तयातें. ॥१८॥

उठोनि बैसला सावधान ।
करिता जाला हरिस्मरण ।
तारामती म्हणे, 'कोण ।
अवस्था जाली मानसीं ?' ॥१९॥

राजा म्हणे, 'सुकृतकोटी ।
राज्यदानें जोडिल्या शेवटीं[७] ।
एक[८] काळपुरुष निकटीं ।
लोहोदंडेसीं देखिला. ॥२०॥

तेणें दंड हाणितां शिरीं ।
भयें बरळलों स्वप्नांतरीं ।
तुवां[९] उठवितां सुंदरी ।
क्लेशातीत मी झालों.' ॥२१॥

येरी म्हणे, 'जी ! प्राणजीवना ! ।
यया तीर्थीं करावें स्नाना ।
घालुनी अग्निमुखीं अवदाना ।
स्वप्नदोष नाशेल.'[१०] ॥२२॥

प्रधान म्हणे, 'जी ! महाराजा ! ।
कांहीं दान वोपिजे द्विजां' ।
तंव अकस्मात[११] तपोतेजा ।
विश्वामित्रा देखिलें. ॥२३॥

राजा नमूनी बोले वचन ।
'स्वामी ![१२] आजी शयनीं स्वप्न ।
देखिलें त्याचें ज्ञान ।
प्रकट केलें पाहिजे. ॥२४॥

तुमच्या प्रतिमेचें रूपडें ।
ऐसा ब्राह्मण देखिला पुढें ।
आशीर्वाद[१३] करूनी तोंडें ।
इच्छा करी दानाची. ॥२५॥

'सिंहासनासह मेदिनी ।
राया ! दे गा ! मजलागुनी' ।
ऐसें बोलतां तें क्षणीं ।
उदक[१४] हातीं सूदलें. ॥२६॥

सिंधुवासा धेनुधरणी ।
नवखंडरत्नभूषणी[१५] ।
सुदोहा राज्यभाजनीं[१६] ।
आज्ञायुक्ता सवत्सा ॥२७॥

---

१. पाठ–व्योमी. २. पाठ–सुखदुःखाचा आरणी. ३. पाठ–जीव ऐसें. ४. पाठ–निजात्मपददाता. ५. पाठ–करूनि. ६. सावधान करी रायासी. ७. पाठ–हातीं; मूर्ष्टी. ८. पाठ–शेवटीं एक काळपुरुष दृष्टी. ९. पाठ–तंव. १०. पाठ–वारणें. ११. पाठ–अकल्पित. १२. पाठ–म्हणे. १३. पाठ–आशीर्वचनें बोलोनि तोंडें. १४. पाठ–दान वोपीं द्विजातें. १५. पाठ–भुवनीं. १६. पाठ–राजभाजनीं.

ऐसिया दानें मुक्तराशी ।
लाहतां, उदेली माजी विवशी; ।
काळपुरुष[1] लोहोदंडेसीं ।
देखें, हाणी मस्तकीं.' ॥२८॥

ऋषि म्हणे,'राया ! समर्था ! ।
असो स्वप्नींची मायिक वार्ता ।
दर्पणोंचें प्रतिबिंब जेवीं हाता ।
नये सर्वथा, तेवीं स्वप्न. ॥२९॥

प्रस्तुत मागावया तूतें ।
इच्छा धरूनी आलों येथें ।
औट तुक कनकातें ।
मज दिधलें पाहिजे. ॥३०॥

उदारपणें देसो जरी ।
उदक घालीं माझे[2] करीं' ।
राजा म्हणे, 'आपुले नगरीं ।
आलें पाहिजे, स्वामिया !'[3] ॥३१॥

ऋषि म्हणे, 'संकल्पाविणें ।
किंनिमित्त नगरा येणें ?' ।
रायें घेऊनियां जीवन ।
तया[4] हातीं सूदलें. ॥३२॥

रायें[5] स्नान कासारजीवनीं ।
सारूनी, गिरिजावर पूजोनि[6] सुमनीं ।
विश्वामित्र शिबिकायानीं[7] ।
बैसवूनी चालविला.[8] ॥३३॥

प्रधान, आपण,[9] तारामती ।
सरिसीं चरणचाली चालती ।
सिद्धाश्रम सांडुनी पुढती ।
आत्मनगरा[10] पातलीं. ॥३४॥

वाहिनीवेष्टित[11] रावो ।
चालतां, वाद्यां लागला धावो, ।
वीरश्रियेसीं धरानाहो ।
अयोध्येसी पातला. ॥३५॥

राजा आला म्हणोनी नगरी ।
श्रृंगारिली नानापरी ।
अनेक वहनीं वळघोनी, पुरी- ।
बाहेर थवे[12] दाटले. ॥३६॥

वाद्यगजरीं, मंगळ तुरीं ।
राजा प्रवेशला[13] नगरी ।
कामिनीवृंदें[14] माडियागोपुरीं ।
भूपचंद्रा लक्षिती. ॥३७॥

कनकताटीं हेमसुमनें ।
राजमुकुट लक्षूनि नयनें ।
अंजळी भरूनि वोपितां रत्नें[15] ।
सुमनघनें वर्षिजे. ॥३८॥

राजा प्रवेशला[16] मंदिरीं ।
तों विश्वामित्र बैसला द्वारीं[17] ।
दंड पडताळुनी करीं ।
तारामती लक्षिली. ॥३९॥

दंडें[18] हाणोनी मोडिली शिबिका ।
वेणिये कवळोनी नृपनायिका ।
'देईं' म्हणे 'माझिया कनका' ।
म्हणोनि तीतें मारीत. ॥४०॥

---

१. पाठ–काळरूपें. २. पाठ–माझिये. ३. पाठ–दयाळा. ४. पाठ–ऋषीहस्तीं सूदलें. ५. पाठ–राजा स्नान करोनी; राजकांता स्नान कासारजीवनीं. ६. पाठ–पूजनीं. ७. पाठ–शिबिकासनीं. ८. पाठ–चालिला. ९. पाठ–आणि. १०. पाठ–जातां सेना टाकिली. ११. पाठ–वहनीं १२. पाठ–थोवे. १३. पाठ–प्रवेशे अयोध्यापुरीं. १४. पाठ–ऐकोनि जनवृंद. १५. पाठ–तेणें. १६. पाठ–प्रवेशतां. १७. पाठ–दुरी. १८. पाठ–दंड.

येरी थरथरां कांपत ।
'हा! हा! शब्दें रुदन करीत[1] ।
राया जाणविली मात ।
आला धांवत ऋषीपासीं. ॥४१॥

राजा म्हणे, 'दयासागरा ![2] ।
कोण्या[3] अपराधें स्त्रिये मारा ।
तो दोष ठेवूनि[4] माझे शरीरा ।
खंडळ किजे तिळतुल्य.' ॥४२॥

'संकल्प करूनी आणिलें येथें ।
शेखीं द्वारीं टाकूनी मातें ।
दान वेदितां, सदनातें ।
प्रवेश केला, हा दोष. ॥४३॥

रायें पाचारुनी भांडारी ।
म्हणे कनक आणा झडकरी.' ।
धनाधीशें कोटीवरी[5] ।
हेममांदुसा आणविल्या. ॥४४॥

तुळे[6] उभवुनी घडा ।
कनक भरितां पारडां ।
ऋषि म्हणे, 'राया ! मूढा ! ।
सुवर्ण[7] देशी कवणाचें ? ॥४५॥

माझेंची मज देशी धन ।
या धर्माचें कोण लक्षण ? ।
मज दिधलें राज्यदान ? ।
तें काय हिरोन घेतलें ? ॥४६॥

वोपिलें दान हिरोनी घेती ।
ते पूर्वजांसहित[8] नरकीं पचती ।
सवितासुताचिया दूतीं ।
त्रासिजेती सर्वदा.'[9] ॥४७॥

राजा म्हणे, 'जी! दयार्णवा ! ।
बरवें[10] सुचलें देवाधिदेवा ।
राज्यदानें भवार्णवा- ।
माजी बुडतां तारिलें. ॥४८॥

संत भवार्णवीं तारक ।
मोहतमाचे चिदर्क[11] ।
सारूनि जीवित्वकळंक ।
शिवरूपीं मिळविती.' ॥४९॥

मग[12] म्हणे अमात्य प्रधाना ।
'छत्रमुद्रासिंहासना ।
ऋषिकरीं वोपोनी, नमना ।
करूनी, बोले सेवकां. ॥५०॥

नवखंड धरेची आज्ञा- ।
सुमनें पूजिलें प्राज्ञा[13] ।
तुम्हीं न करूनी अवज्ञा ।
ऋषिमतें[14] वर्तावें.' ॥५१॥

अंकुश, कडपाळें, लेखणी, ।
नृपें वोपिलीं ऋषिचरणीं ।
'हें पावलें.' म्हणे मुनी ।
'दान देई कनकाचें.' ॥५२॥

स्तंभीं बांधोनी राया ।
कठोर दंडें मारी तया ।
दुःखें समस्त नागरिकजाया[15] ।
शोक करिती आक्रोशें. ॥५३॥

---

१. पाठ–अट्टहास्यें रुदन करीत. २. पाठ–करुणाकरा. ३. पाठ–कोणा; कवणा. ४. पाठ–स्थापूनि. ५. पाठ–सत्वरीं. ६. पाठ–तुळा ऊभवी धडाधडा. ७. पाठ–कनक. ८. पाठ–पितरांसहित. ९. पाठ–सर्वथा; अपार. १०. पाठ–बरवें सुचिले. देवाधिदेवा ! ११. पाठ–विदारक. १२. समग्र ओवीचा अन्य पाठ–म्हणानि आत्मप्रधानें। छत्र मुद्रा सिंहासनें। ऋषीकरीं वोपुनी मनें। आज्ञा बोले सेवकां. १३. पाठ–म्या राज्ञा. १४. पाठ–ऋषीआज्ञा. १५. पाठ–नगरजाया; जनजाया.

तंव पातला रोहिदास ।
ऋषिचरणीं मस्तकास ।
ठेवूनि म्हणे, 'स्वामी ! दोष ।
कवण घडला रायातें ?' ॥५४॥

येरू पावकातुल्य नयन ।
करूनी म्हणे, 'हा[1] कवण ?' ।
राजा म्हणे, 'कुलभूषण ।
होय नंदन पैं माझा.' ॥५५॥

तया, देखतां पिता जननी, ।
अधिक मारी गाधिजमुनी ।
हें देखोनी नगरजनीं ।
हाहाकारें वर्तिजे. ॥५६॥

धनाढ्य पुरींचे सौदागर ।
करुणा भाकिती[2] ऋषीसमोर ।
'आम्ही धन देऊं, नृपवर[3] ।
सोडिला पाहिजे, स्वामिया !'[4] ॥५७॥

विश्वामित्र म्हणे तयां प्रति ।
'मातें वोपिली सर्व जगती ।
राज्य[5] आणि संपत्ति ।
यावेगळी दक्षणा. ॥५८॥

पृथ्वीवरील[6] जितुकें धन ।
तितुकेंही माझेंची प्रमाण[7] ।
यावेगळें कोटील[8] कोण ।
देईल धन मजलागीं ?' ॥५९॥

रोहिदास म्हणे, 'जी ऋषि ! ।
मी गहाण राहीन तुम्हापाशीं ।
पितृवचनऋणासी ।
उत्तीर्ण होईन सर्वथा.[9] ॥६०॥

ऋण, हत्या आणि वैर ।
मेलिया न चुके हा निर्धार ।
यालागीं धरूनी शरीर ।
जन्मोजन्मीं फेडिजे.'[10] ॥६१॥

परिसोनी बाळकाचीं वचनें ।
ऋषि चमत्कारूनी म्हणे[11] ।
'एकचित्तें[12] हीं तिघेंजणें ।
जालिया, न चले स्रष्ट्याचें.[13] ॥६२॥

सूर्यरश्मि आणि प्रभा ।
मिळोनी नाशिती तमशोभा ।
शमदमविरक्ति वल्लभा ।
स्पर्शो नेदी रतीच्या. ॥६३॥

कीं ज्ञान वैराग्य एकमेळें ।
असतां, भवाचें भय पळे ।
तेंवी भार्यासुतभूपाळें ।
एकचित्त जालिया. ॥६४॥

आमुच्या तपाचिया राशी ।
वेंचल्या,' ऐसें निज मानसीं ।
भावूनि, म्हणे नृपासी[14] ।
'आमुच्या देशीं न राहें.' ॥६५॥

राजा म्हणे, 'करुणामूर्ती ![15] ।
काशी नवखंडांपरती ।
तेथें जाऊनि, भलत्या रीती ।
ऋण तुमचें[16] फेडीन. ॥६६॥

---

१. पाठ–तूं कवणाचा. २. पाठ–करिती. ३. पाठ–राजेश्वर. ४. पाठ–दयाळा. ५. पाठ–राज्य आदिकरोनी संपत्ति. ६. पाठ–क्षितिवरील. ७. पाठ–जाण. ८. पाठ–कोटोनि. ९. पाठ–स्वामिया. १०. पाठ–फेडिती. ११. पाठ–मनें. १२. पाठ–एकचित्त हीं; एकचि हीं. १३. पाठ–श्रेष्ठाचें. १४. पाठ–नृपवरासी. १५. पाठ–क्षमामूर्ति. १६. पाठ–स्वामीचें.

एक मासाची अवधी ।
दिधली पाहिजे, कृपानिधी !'[१] ।
ऋषि म्हणे, 'नेमसंधी ।
टळतां शापूनि जाळीन.' ॥६७॥

निकें' म्हणोनि नमूनि चरणां ।
सव्य घालोनि प्रदक्षिणा ।
सहकुमरस्त्रियेशीं[२] विपिना ।
निघतां, जाला आकान्त. ॥६८॥

लोटला[३] पौरजांचा पाळा ।
नेत्रीं उदकें वाहती ढळढळां ।
एक करें पिटोनी कपाळा ।
सद्गदित बोलती. ॥६९॥

म्हणती, 'कैसा ब्राह्मणग्रहो ।
नृपचंद्रा लागला राहो ।
राजा दवडुनी,[४] पुरीनाहो ।
होऊं पाहे दुरात्मा.' ॥७०॥

वनिता सद्गदिता कंठीं ।
ऋषिवदन पाहोनी दृष्टी ।
व्यंकटा[५] करूनि भ्रुकुटी ।
रोषें मोडिती अंगोळिया. ॥७१॥

राय अवलोकुनी जनां ।
म्हणे 'स्नेह असों द्या, आम्ही वना ।
जातां, तुम्ही[६] तपोधना- ।
मतें वर्तलें पाहिजे.' ॥७२॥

राजा अवलोकी सदनाकडे ।
पशु पक्षी तितुका रडे ।
आहार विसरोनी, तोंडें ।
शब्द करूं लागलें. ॥७३॥

वाजी, वारण, उष्ट्रें[७] ।
पयोधरपशूचीं खिल्लारें ।
शिकारी श्वापदें महाक्रूरें[८] ।
तींही गहिंवरें दाटलीं. ॥७४॥

कनकपंजरीं[९] सारिका, रावे ।
हंस, तित्तिर, मयूर, लावे, ।
त्यांतें सोडोनि म्हणे-'जावें ।
निजस्थाना आपुलिया.' ॥७५॥

तयां सोडितां गगनोदरीं ।
पक्षी बोलती मंजुळ स्वरीं, ।
'आम्हां निरवुनी कवणा करीं ।
केउता[१०]जासी स्नेहाळा ?' ॥७६॥

चित्रशाळेचीं निर्जीव लेपें ।
गहिंवरें बोलती विलापें ।
'आम्हां सांडोनि,[११]कवणापें ।
स्वीकारीसी प्रवासा ?' ॥७७॥

नरनाथ[१२] सांडोनि ममता ।
तयां[१३] संबोखोनि म्हणे, 'आतां ।
तुम्हांसी रक्षो अपराधाता ।
प्रतिसृष्टीचा कौशिक.' ॥७८॥

ऐसें बोलोनियां, वेगें ।
बाहेर निघालीं त्रिवर्गें ।
सालंकार देखोनि,[१४] रागें ।
विश्वामित्र धाविन्नला. ॥७९॥

---

१. पाठ-दयानिधी. २. पाठ-सुकुमारस्त्रियेसीं. ३. पाठ-दाटला. ४. पाठ-होऊनि. ५. पाठ-विकटा. ६. पाठ-परंतु. ७. पाठ-खेचर उष्ट्रें. ८. पाठ-अपारें. ९. पाठ-कनक पिंजरा; कनकपाजिरा. १०. पाठ-कोठें. ११. पाठ-निरवूनि. १२. पाठ-सोडोनि. १३. पाठ-तयांसि बोलोनि. १४. सांगे.

तारामती धरूनि हातीं ।
म्हणे, 'माझिया राज्यांतील संपत्ति ।
भूषणें काढोनि, मजप्रति ।
देउनी जावें वनवासा.' ॥८०॥

राजा, रोहिदास, तारामती, ।
नगर सांडूनि वनाप्रती, ।
गेलिया[१] पुढें कैसी गती ।
वर्तली ? ते परियेसा.[२] ॥८१॥

संसारसागरींचें[३] जहाजें ।
धैर्यध्वजेशीं विराजे ।
सत्त्वकेणें भरिलें बोझें ।
सत्कीर्ति वसे मस्तकीं. ॥८२॥

गाधिजबंदरीं शुद्ध केणें ।
भरिलें[४], देउनी राज्यनाणें ।
गुरुकृपेच्या प्रभंजनें ।
कैवल्यपेठे जातसे. ॥८३॥

येरीकडे नगरवासी[५] ।
दुःखशोकें अधोवदनेंसी ।
वियोगदुःखें[६] कासाविसी ।
निजसदनासी[७] पातले. ॥८४॥

घोर वनांतरीं नृपति ।
सुकुमार[८] राणी तारामती ।
रोहिदास[९] धरूनि हातीं ।
जातां कैसें वर्तलें ? ॥८५॥

विश्वामित्रें तये[१०] वेळे ।
कृतांतजनका आज्ञापिले ।
म्हणे, 'आजी द्वादशकळें ।
तपलें पाहिजे ममाज्ञा.' ॥८६॥

कौशिकदर्पें सहस्ररश्मी ।
तपां लागला तीव्र[११] व्योमीं ।
तेणें तजें पर्वत भूमी ।
तापोनी ठलां पाहे ते[१२] काळीं ॥८७॥

सर्वेंची वरुणालागीं कोपें ।
म्हणे, 'येणें पंथें चालतां नृपें ।
सरितासरोवराचीं आपें ।
नेऊनी, शुष्क करावीं.' ॥८८॥

केवढें ऋषीचें सामर्थ्य ! ।
वरुणें केला निर्वारि पंथ ।
कूप, सरिता, तडाग, समस्त ।
आर्द्रता[१३] लोपली. ॥८९॥

कांता[१४], कुमर, चालतां पंथीं ।
उष्णें करपली सुकुमारकांती ।
कडिये कुमर तारामती ।
घेऊनि चाले नृपसंगें.[१५] ॥९०॥

अंतर शोषिलें[१६] तृषेनें ।
तनु करपली[१७] उष्ण किरणें ।
तेणें कोमेजलीं[१८] वदनें ।
देह[१९] घामें थबथबीत. ॥९१॥

रोहिदास म्हणे, 'जी ! ताता ! ।
तृषेनें प्राण जाईल आतां' ।
म्हणोनी कडेहूनी खालता ।
पडोनी, लोळे गडबडां. ॥९२॥

१. पाठ–गेली २. पाठ–अवधारा. ३. पाठ–संसारसमुद्रांचीं जाहजें. ४. पाठ–देऊनि भरिलें राज्यदानें. ५. पाठ–पौरजनासी. ६. पाठ–वियोगतापें. ७. पाठ–निजधामासी. ८. पाठ–कुमर आणि ९. पाठ–राजकुमर. १०. पाठ–काय केलें. ११. पाठ–क्रूर. १२. पाठ–तात्काळ. १३. पाठ–आरद्र तेही लोपिले. १४. पाठ–सहकांतापुत्र. १५. पाठ–हळूहळू. १६. पाठ–तापलें; कोरडें. १७. पाठ–तापली. १८. पाठ–कोमायलीं. १९. पाठ–देह सर्व लवथवित.

माता म्हणे, 'रे ! तान्हया ! ।
पैल वृक्षातळीं दिसे[1] छाया ।
तेथें बैसोनियां, तोया ।
आणूनी पाजूं तुजलागीं.' ॥९३॥

म्हणोनि गेली तरुतळीं ।
तंव सूर्यबिंब आलें मध्यमंडळीं ।
स्वल्प छाया दिसे मूळीं ।
जाऊनि तेथें बैसली. ॥९४॥

राजा पाहे वनांतरीं ।
कूपसरितासरोवरीं ।
बिंदुमात्र न दिसे वारी ।
हृदय जैसें अधमाचें. ॥९५॥

रायें शोधिलें सकळही वन ।
कोठें न मिळे जीवन ।
परतोनि[2] आला नंदन ।
होता जेथें मातेशीं. ॥९६॥

भार्या पाहे राजाकडे ।
मुखसरोज[3] दिसे कोरडें ।
उदक न देखोनि धडे ।
पृथ्वीवरी टाकिलों. ॥९७॥

राजा अवलोकी तयातें ।
तंव[4] धुळीमाजी जैसीं प्रेतें ।
पल्लवें[5] वारा घालुनी, हातें ।
स्पर्शोनि[6] केलीं सावध. ॥९८॥

कुमर म्हणे, 'द्यावें जीवन' ।
ऐकोनि, रायें उभय नयन ।
भरूनि, म्हणे सखेद वचन ।
'पुढें[7] येई डोळसा !' ॥९९॥

ऐसें बोलोनि, उभय करीं ।
कवळोनि, चालतां पुढारीं ।
विश्वामित्र[8] वनांतरीं ।
प्रकट जाला द्विजरूपें.[9] ॥१००॥

जरेकरूनि व्यापिली वपू ।
तेणें कंधरा[10] प्राप्त कंपू ।
संहनन[11] लवोनी जालाचापू ।
आला खोकत टेंकीत. ॥१०१॥

रायें देखोनि केलें नमन ।
येरें दिधलें आशीर्वचन ।
म्हणे, 'तुझी कीर्ति परिसोन ।
आलों येथें सकाम.' ॥१०२॥

राजा म्हणे, 'बोलिजे स्वामी !' ।
येरु म्हणे, 'तीर्थासी[12] आम्ही ।
भार्या, सुत,[13] समागमीं ।
जातां[14] चरण पोळती. ॥१०३॥

जो[15] देईल पादत्राणें ।
त्यासी कल्याण नारायणें ।
किजे' म्हणतां नरभूषणें ।
वसनें बोपिलीं चरणींचीं. ॥१०४॥

तिघें[16] चालती नग्नचरणीं ।
तळीं[17] तापली धरणी ।
माथे[18] पोळती उष्ण किरणीं ।
अंतर तृषेनें करपलें.[19] ॥१०५॥

---

१. पाठ–पडे. २. पाठ–टाकोनि. ३. पाठ–मुखसरोवर. ४. पाठ–जैसीं धुळींमाजी पडिलीं प्रेतें. ५. पाठ–पालवें; वल्लभें. ६. पाठ–उठवोनि. ७. समग्र ओवीचा अन्य पाठ–पुढें ये गा पाडसा ! ८. पाठ–तव विश्वामित्र. ९. पाठ–अवचिता. १०. पाठ–शरीरा. ११. पाठ–सिही; सीत. १२. पाठ–तीर्थवासी. १३. पाठ–कुमर. १४. पाठ–चालतां. १५. पाठ–आम्हांसि देतां पादत्राणें. १६. पाठ–तिघें जणें चालतां. १७. पाठ–पोळत पैं धरणी. १८. पाठ–माथां. १९. पाठ–पीडिलें.

ऐशिया दुःखें चालतां पंथीं ।
सुकुमार पाउलें पोळती ।
फोड उठोनि निघे[1] कांती ।
नखें उलती[2] बोटींचीं. ॥१०६॥

यापरी तिघें चालतां कष्टें ।
तापसें[3] घातलीं अव्हाटे ।
पायीं रिघती[4] पूर्ण कांटे ।
आणि सरांटे लागती.[5] ॥१०७॥

सुकुमार बाळ म्हणे, 'जी ! ताता ! ।
आकांत प्रळय मांडिला आतां ।
ऋषिऋण[6] न फेडितां मरतां ।
सर्व जाऊं नरकासी.' ॥१०८॥

ऐसीं[7] लंधितां वनोपवनें ।
पुढें विश्वामित्रें वाटिका जीवनें[8] ।
अतिरमणीय[9] प्रपास्थानें ।
मायामय निर्मिलीं. ॥१०९॥

विश्वामित्रें रमणीय[10] धाम ।
पुढें निर्मिलें मनोरम ।
जें देखता जाय[11] श्रम ।
दोष जैसे हरिनामें ॥११०॥

तेथें सुरतरूंची छाया ।
सदनीं रंभेऐसिया[12] जाया ।
कनकरांजणीं भरूनि तोया ।
वाळावेळासुगंधें[13] ॥१११॥

सुवर्णपात्रीं भरूनि चंदन ।
सुवास वाळ्याचें जीवन ।
पाकशाळेमाजी अन्न ।
नानाविध षड्रस. ॥११२॥

ऐसिया स्थानीं हेममंचकीं ।
मालतीमोगरेचंपकी ।
आरळ[14] घातले हस्तकीं ।
पथिकातें[15] पहुडावया. ॥११३॥

पुराण, गीत, धर्मचर्चा ।
महिमा वर्णिती ईश्वराचा ।
वारा नलगे श्रमाचा ।
जया श्रवणीं[16] पांथिका. ॥११४॥

ऐसी ऋषि[17] विर्मी पोहे ।
नृपवर दुरोनि पाहे ।
जीवनालागीं लवलाहें ।
जाता झाला पुढारां. ॥११५॥

सुत,[18] कांता, सांडुनी मागें ।
मायावनीं पातला वेगें ।
पोहे जाणुनियां, नेघे[19] ।
राजा[20] फिरे माघारा. ॥११६॥

आतां येथुनी कायावाहिनी ।
भरुनी चाले सत्त्वजीवनीं ।
नानाविघ्नगिरीं भंगुनी ।
कैवल्यसागरीं मिळेल ॥११७॥

मूळीं विश्वंभरगुरुकृपेची वांकडी ।
लागली, तेणें उभय थडी ।
भरून वाहे, ब्रह्मांडीं ।
सत्कीर्तिघोषें गर्जत. ॥११८॥

१. पाठ-वले कांती. २. पाठ-निघती. ३. पाठ-तापस घाली. ४. पाठ-निघती. ५. पाठ-रूतती. ६. पाठ-ऋण न फिटतां मरतां. ७. पाठ-लंघोनि वनें उपवनें. ८. पाठ-नयनें. ९. पाठ-रायें देखिलीं जै मनें. १०. पाठ-रमणीक. ११. पाठ विश्रमे. १२. पाठ-रंभेसारिख्या दाया. १३. पाठ-शीतळ. १४. पाठ-सेज करूनियां सेवकीं. १५. पाठ-पांथिकांसीं. १६. पाठ श्रवणें करूनि. १७. पाठ-कौशिकें निर्मिली. १८. पाठ-पुत्र. १९. पाठ-निघे. २०. तेथूनि सरे माघारीं.

इति श्रीभारते वनपर्वणि[1] ।
कथानर्मदा रसवाहिनी ।
वदे मुक्तेश्वराची वाणी ।
लीलाविश्वंभरप्रसादें. ॥११९॥

---

## अध्याय तिसरा

विरक्तें देखोनि लावण्यप्रमदा ।
नैराश्यें[2] अवलोकुनी संपदा ।
वैराग्यबोधें प्रपंचधंदा ।
देखोनि विटिजे ज्यापरी. ॥ १ ॥

कीं चंपकपुष्पाचा आमोद ।
साडूनियां जाय जेवीं षट्पद[3] ।
लिंगनिर्माल्यप्रसाद[4] ।
नातळती धार्मिक. ॥ २ ॥

ऐशिया परी प्रपामंदिर[5] ।
सांडोनि जातां राजेश्वर ।
तोयपात्र ऋषीश्वर ।
घेऊनि धांवे[6] पाठीशीं. ॥ ३ ॥

म्हणे, 'उभा राहें पांथिका ! ।
श्रमें भ्रांतलासी, घे उदका' ।
राजा म्हणे, 'हें[7] धार्मिकां ।
सेव्य नव्हे[8] सर्वथा. ॥ ४ ॥

अन्नसत्रींचें भोजन ।
धर्मपोईचें उदक जाण[9] ।
सेवित्याचें सुकृतधन ।
जाऊनि, होय महादोषी.[10]' ॥ ५ ॥

ऋषी म्हणे, 'तनुभांडवल ।
रक्षितां, सुकृतधन जोडेल ।
यालागीं बोलती वडील ।
शरीर रक्षी तो धर्म.' ॥ ६ ॥

ऐसें बोलोनि धरिला करीं ।
म्हणे, 'चाल[11] मम मंदिरीं ।
स्नान सारूनि भोजन करीं ।
नावेक शयनीं पहुडावें. ॥ ७ ॥

देवांगनातुल्य दासी ।
सादर तिष्ठती सेवेशीं ।
ज्यांचिया दर्शनें श्रमासी ।
बोळवण तत्काळ. ॥ ८ ॥

शीतळ चंदनी घेइजे उटी ।
सुमनमाळा घालिजे[12] कंठीं ।
परिमळद्रव्यें तुम्हांसाठीं ।
ठेविलीं, तीं सेविजे. ॥९॥

विश्रांति[13] पावल्या चित्तीं ।
सुखें जाइजे आपुल्या पंथीं ।
हें परिसोनियां नृपति ।
बोले उदार[14] मानसें. ॥१०॥

'विश्रांति पावलों समस्त ।
तुमच्या दर्शनें कृतकृत्य' ।
ऐसें बोलोनि नृपनाथ ।
शीघ्र चामके पुढारां. ॥११॥

---

१. पाठ–शांतिपर्वणि. २. पाठ–नैश्वर. ३. पाठ–द्विरद. ४. पाठ–शिवनिर्माल्यप्रसाद. ५. पाठ–पोईमंदिर. ६. पाठ–धांवत जात. ७. पाठ–हे धार्मिका ! ८. पाठ–नघडे. ९. पाठ–पान. १०. पाठ–महापापी. ११. पाठ–चला जी ! १२. पाठ–घालूनि. १३. पाठ–विश्राम. १४. पाठ–उदासमनेंसीं.

तारामती तया पाठीं ।
चालतां, झाली परम कष्टी ।
पोई जाणोनियां, दृष्टी[1] ।
मुरडोनियां चालली.[2] ॥१२॥

पोहे सोडूनियां सुंदरी ।
जातां देखिली ऋषीश्वरीं ।
तोयपात्र धरूनि करीं ।
पुढा येउनी ठाकला.[3] ॥१३॥

म्हणे, 'माये! श्रमलोस पथीं ।
उष्णें करपली सुकुमार कांती ।
चरणकमळीं[4] फोड दिसती ।
अधर[5] तृषेनें शोषला.' ॥१४॥

ऐसें बोलोनियां तोंडें ।
उदकपात्र वोडवी पुढें ।
येरी नेघोनियां मुरडे ।
आपुल्या पंथें जावया.[6] ॥१५॥

येरीकडे आश्रमांत ।
ऋषीनें केलें अत्यद्‌भुत ।
मायामय नृपनाथ ।
करूनि बैसवी मंचकीं. ॥१६॥

ऋषी म्हणे, 'वो ! पतिव्रते ! ।
तुझा पती पाचारी तुतें ।
पैल पालवीतसे हातें ।
मंचकी बैसूनी मंदिरीं.' ॥१७॥

येरी अवलोकी भीतरी ।
रायासि देखे मंचकावरी ।
चरणसेवा सुंदरी ।
सुकुमार करीं करिताती. ॥१८॥

एक लाविती चंदनउटी ।
एक माळा घालितीं कंठीं ।
एकी[7] उभिया निकटीं ।
मलयानिल ढाळिती. ॥१९॥

ऐसें अवलोकितां सती ।
म्हणे, 'हें काय घडलें ! श्रीपति ! ।
अंधकारामाजी गभस्ती ।
अडखळोनी कूपीं पडियेला. ॥२०॥

दशद्वयशताक्षें[8] शिरीं ।
वसुधा वाहिली सुमनापरी ।
तो भार मानुनी सांडी जरी ।
तरी[9] हें ऐसें घडों ये. ॥२१॥

दुष्टदंडना कमळापती ।
अवतार धरितां भागे चित्तीं ।
अस्तमान[10] होतां फिरे गभस्ती
तरी हें ऐसें घडों ये. ॥२२॥

कीं पर्वतमस्तकींचें[11] जळ ।
अधोपंथें धांवे तुंबळ ।
तें परतोनि पावे मूळ ।
तरी हें ऐसें घडों ये. ॥२३॥

कीं वेदमर्यादा ब्राह्मण ।
लंघुनी करी अनाचरण ।
कीं पतिव्रता पतिवचन ।
न मनी, तरी हें घडों ये. ॥२४॥

---

१. पाठ-पोटीं. २. पाठ-वृष्टी. ३. समग्र ओवीचा अन्य पाठ-पोहे सांडूनियां जातां दुरी । तोयपात्र घेऊनि करीं । विश्वामित्र ते अवसरीं । पुढें येऊ न ठाकला. ४. पाठ-चरणसरोजीं. ५. पाठ-शोषले बहुत. ६. पाठ-चालावया. ७. पाठ-येक उभी ठाकोनि निकटी. ८. पाठ-दशकद्वयशताक्षशिरीं. ९. पाठ-तरी ऐसें घडेल. १०. पाठ-अरत न होतां. ११. पाठ-शिखरींचें.

कीं परम श्रोत्रिय संकटीं ।
क्षुधेकरुनी होतां[1] कष्टी ।
अवर्णगेहीं[2] दाटोदाटी[3] ।
भोजन करी, तरी हें घडों ये. ॥२५॥

तैसा राजा सूर्यवंशी ।
धर्मशील सत्त्वराशी ।
क्लेश पावतां, पोईशीं ।
विश्रामेल, हें घडेना. ॥२६॥

असो, मी तंव न घें जीवन' ।
म्हणोनि केलें पुढारां गमन ।
विश्वामित्र म्हणे, 'कोण ।
सत्त्व इये सतीचें ?' ॥२७॥

मागें पाहे जंव कौशिक ।
तंव येतां देखिलें बालक ।
श्रमें शोषलें वदनांबुजक ।
अंतर तृषेनें करपलें. ॥२८॥

धांवोनि कडिये घेतलें ।
करतळे मुख कुरवाळिलें ।
सुंदर सुकुमार पाउलें ।
पाहतां, फोड दिसती.[4] ॥२९॥

म्हणे,'श्रमलासी चालतां पंथीं ।
या पोहसीं करी[5] विश्रांती ।
उदक प्राशूनियां पुढती ।
गमन करीं, बाळका !' ॥३०॥

रोहिदास म्हणे, 'स्वामिया ! ।
आम्ही न शिवों[6] ऐशिया तोया ।
कलंक लागेल आमुचिया ।
सूर्यवंशालागुनी.'[7] ॥३१॥

म्हणोनि घातलें दंडवता ।
'दुरी अंतरली मातापिता ।
तरी[8] कृपा करूनि आतां ।
आज्ञा दिधली पाहिजे.' ॥३२॥

ऋषिप्रती बोलोनि ऐसें ।
गमन केलें रोहिदासें ।
विश्वामित्र निजमानसें[9] ।
वोवाळीत बाळका.[10] ॥३३॥

'ऐशिया सत्त्वसवित्यांपुढें ।
आमुचें तप खद्योत बापुडें ।
वृथा सुकृत हारविलें, तोंडें[11] ।
प्रतिज्ञा करूनि सर्वथा.' ॥३४॥

असाध्य जाणूनि भूपाळसत्त्व ।
कौशिक कोपला अत्यद्भुत ।
भूतळीं[12] सृष्टी करावया हुत ।
जाणों शंकर अवतरला.[13] ॥३५॥

येरीकडे वसुधापती ।
पोहे लंधुनी जातां पंथीं ।
तयामागें[14] तारामती ।
कवळोनि चाले पुत्रातें.[15] ॥३६॥

महाघोर वनांतरीं ।
चालतां जाली कैशी परी ? ।
चित्त देऊनियां चतुरीं ।
श्रवण केलें पाहिजे.[16] ॥३७॥

१. पाठ-पीडतां पोटीं. २. पाठ-अवर्णघरीं. ३. पाठ-अन्नतांटीं. ४. पाठ-देखतसे. ५. पाठ-कीजे. ६. पाठ-नेघों. ७. पाठ-सूर्यवंशकुळासी; सूर्यवंशा समस्ता. ८. पाठ-दया करोनि कृपावंता. ९. पाठ-जीवें मानसें. १० पाठ-तयासी; सर्वस्वें. ११. पाठ-गाढें; मूढें. १२. पाठ-भूतसृष्टी. १३. पाठ-क्षोभला; कोपला. १४. पाठ-पाठी. १५. पाठ-कुमरातें. १६. समग्र ओंवीचा अन्य पाठ-महाघोर अरण्यांतरीं । चालतां तयां नवलपरी । प्राप्त जाली ते चतुरीं । श्रवण केली पाहिजे.

विश्वामित्रें जाऊनि पुढें ।
वणवा लाविला चहूंकडे ।
जळों लागलीं उर्भीं झाडें ।
श्वापदपक्ष्यां आकांत. ॥३८॥

धूम्रें दाटलें अंबर ।
भडके उठती भयंकर ।
तयामाजी राजेश्वर ।
सहपरिवारें सांपडला. ॥३९॥

ज्वाळा लागती शरीरा ।
तेणें पोळती चरचरा ।
नेत्र आणि प्राणद्वारां ।
धूम्र लागे तीक्ष्ण. ॥४०॥

विश्वामित्रें काय केलें ? ।
राया, रोहिदासा चुकविलें ।
तारामतीतें सावाइलें[1] ।
तया वणवियामाझारी ॥४१॥

मार्गे पाहे तारामती ।
पुत्र न देखोनी पडली क्षिती ।
पुढें पाहे तंव नृपती ।
तोही[2] तीतें दिसेना. ॥४२॥

म्हणोनि लोळे भूतळवटीं ।
आक्रंदोनी कपाळ[3] पिटी ।
म्हणे, 'कटकटा ! ललाटीं[4] ।
काय लिहिलें ? कळेना.' ॥४३॥

वणवियामाजी जळोनि मेले ।
ऐसें हृदयामाजी भाविलें ।
ललाट पिटोनि करतळें ।
शंखस्फुरणें करितसे. ॥४४॥

म्हणे, 'बाळा ! रोहिदासा ! ।
भेटी देईं या पाडसा ! ।
तुजवेगळया दाही दिशा ।
वोस वाटती[5] मजलागीं. ॥४५॥

अहा सूर्यवंशचूडारत्ना ! ।
माझिया प्राणपतिनिधाना ! ।
मजवेगळे सायुज्यसदना[6] ।
भोगावया गेलेती ! ॥४६॥

मज सांडूनि भवपुरीं ।
पेणें केलें दुरिच्या दुरी ।
कवण अपराध माझिये शिरीं ? ।
भेटी देउनी सांगिजे. ॥४७॥

ना[7] तरी वैधव्यदोषाचा मळ ।
स्पर्शों नेदीं मी अळुमाळ' ।
युगासमान वाटे पळ ।
म्हणोनी अनळ प्रार्थिला. ॥४८॥

'जया अनळे दाहिला पती ।
तया वोपीन वपु आहुती' ।
मनेंची सौभाग्यद्रव्यसंपत्ती[8] ।
वर्षती झाली पावकीं.[9] ॥४९॥

ब्रह्मरूप भाविला वन्ही ।
धर्मशिळे उभी राहुनी ।
उडी टाकावी[10] तंव ते क्षणीं ।
प्रकट झाला कौशिक. ॥५०॥

वणवा विझवुनी अंगें ।
सर्वासमीप[11] पावला वेगें ।
म्हणे, 'तूं कवण ? कवणाची ? सांगें ।
किमर्थ आलीसकाननीं ?'[12] ॥५१॥

१. पाठ–ठेविलें. २. पाठ–तोही दृष्टी न दिसे. ३. पाठ–हृदय. ४. पाठ–अदृष्टीं. ५. पाठ–पडल्या. ६. पाठ–सायुज्यभुवना. ७. पाठ–आतां वैधव्यदशेचा मळ. ८. पाठ–सौभाग्यद्रव्य सती. ९. पाठ–हुताशा. १०. पाठ–टाकितां तत्क्षणीं. ११. पाठ–सतीपुढें पातला. १२. पाठ–कामिनी.

येरी म्हणे, 'आम्ही पथिक ।
माझा पति आणि बाळक ।
या वणवियामाजी देख ।
जळोनि मेले कळेना.[१] ॥५२॥

तुम्हीं देखिले असती जरी ।
कृपेनें सांगिजे उत्तरीं' ।
ऋषी म्हणे, 'वो ! वनांतरीं ।
जळोनि पडलीं दोन शवें. ॥५३॥

एक पुरुष, एक[२] कुमर ।
जळोनि[३] पडिले लोध शरीर' ।
ऐसें परिसतां अंतर ।
कपोनि गेलें तियेचें. ॥५४॥

ऋषि म्हणे, 'माझियासवें ।
येशील तरी दावीन शवें' ।
ऐसें बोलोनि लघु लाघवें ।
प्रेतें निर्मिलीं वनांतरीं. ॥५५॥

तारामतीस नेऊन तेथें ।
दाविता झाला उभय[४] प्रेतें ।
त्वचा जळोनि पडली व्यस्तें ।
हस्तपाद पसरूनी. ॥५६॥

ओळखोनि पतिपुत्रांचीं मढीं ।
उभय हस्तें हृदय ताडी ।
शंखस्फुरण करी तोंडीं ।
लोळे क्षिती गडबडा. ॥५७॥

अवलोकुनी पतीचें[५] मढें ।
म्हणे, 'वल्लभा ! पाहे मजकडे ।
रुसणें सांडोनि, बोलिजे तोंडें ।
गुजगोष्टी मजसवें. ॥५८॥

मजवेगळें उदकपान ।
तुम्हांसी लागे विषासमान ।
जीवींचें[६] गुह्यवचन ।
अखंड सांगा मजलागीं. ॥५९॥

ते तुम्हीं आजी कवणा गुणें ।
क्रोध धरिला अंतःकरणें ? ।
मौन धरूनियां वचनें ।
कां न बोला मजसवें ?' ॥६०॥

रोहिदासतनु कवळोनी पोटीं ।
ललाट मेळवी ललाटीं ।
शोक करितां, श्वापदें[७] दृष्टीं ।
देखोनि गहिंवरें दाटलीं. ॥६१॥

'कवणा घालूं मी भोजन ? ।
कवणा वोपूं स्तनपान ? ।
कडिये घेउनी वचन ।
बोलों आतां कवणाशीं ?' ॥६२॥

ऐसा विलाप करितां सती ।
अस्तमाना गेला गभस्ती ।
ऋषि म्हणे, 'आतां किती ।
शोक करिशी शवांचा ? ॥६३॥

प्रेतें कवळुनी काय फळ ? ।
निघोनि गेला हंस[८] नीळ ।
वृथा पिटिशी कपाळ ।
शीण वाटे पाहतां.[९] ॥६४॥

आम्हीं परिशिली एक मात ।
तुम्हांस ऋण असे किंचित' ।
येरू म्हणे, 'जी ! सत्य, सत्य ।
देणें असें ऋषीचें.' ॥६५॥

---

१. पाठ–न कळेची; नकळे कीं. २. पाठ–दुजा. ३. पाठ–होवोनि. ४. पाठ–दग्ध. ५. पाठ–नृपाचें. ६. पाठ–जीविंचें गुजगुह्य ज्ञानवचन । आर्त सांगा मजपाशीं. ७. पाठ–श्वापदसृष्टी. ८. पाठ–हंस अनिळ. ९. पाठ–ऐकतां.

येरू म्हणे, 'पतीचें ऋण।
फेडी ते पतिव्रता जाण[1]।
तेणें अक्षय स्वर्गभुवन।
भोगावया जोडेल.[2] ॥६६॥

आतां प्राप्त जाली निशी।
श्वापदें भक्षिती तुजसी[3]।
शेखीं भोगणें[4] नरकाशीं।
घडे दोघें ऋणाच्या. ॥६७॥

आमच्या गृहीं क्रमुनी निशी।
प्रभातीं अग्नि देणें शवांसी।
भलतिया परी पतिऋणाशी।
हरुनी, स्वर्गा धाडिजे.'[5] ॥६८॥

तारामती म्हणे, 'दयाळा !।
केवीं सांडूं मी पति आणि बाळा ?।
धणीवरी पाहेन डोळां।
मुखकमळें दोघांचीं ?' ॥६९॥

ऐसें ऐकूनियां वचन।
अदृश्य झाला तपोधन।
कौशिक ऋषीनें विंदाण।
काय केलें वनांत ? ॥७०॥

घोर दाटली इंदुवल्लभा।
माजी उडुगणें दाविती शोभा।
पिशाचश्वापदांची सभा।
प्रेतें देखोनी पातली. ॥७१॥

तयांमाजी विश्वामित्र।
व्याघ्ररूप धरुनी क्रूर।
महाभयानक पसरोनि वक्त्र।
झेंप घाली अवचितीं.[6] ॥७२॥

सतीपुढोनि उभय प्रेतें।
वोढूनि नेलीं परौतें[7]।
उदर फाडोनि आंतें[8]।
काढुनी टाकी बीभत्स. ॥७३॥

दृष्टी लावुनी सतीकडे।
मांस भक्षीतसे तोंडें।
रागें गुर्गुरत पुढें[9]।
भय दावी क्षणक्षणा. ॥७४॥

तारामती म्हणे, 'गा ! श्रीपती !।
धांव, पाव[10], या आकांतीं।
कैशी प्राप्त झाली गती !।
ऐशी[11] वैरिया होऊं नये. ॥७५॥

अनळें दाहिलें उभय रत्नां।
सेर्वी[12] प्राप्त व्याघ्रवदना।
आतां मासियाही प्राणा।
न[13] सोडी हा सर्वथा. ॥७६॥

'जन्मल्या देहासी मरण।
कदा न चुके, ब्रह्मवचन।
परी त्या ब्राह्मणाचें ऋण।
फिटलें[14] नाहीं आमुतें. ॥७७॥

---

१. पाठ–जाण. २. पाठ–जोडिजे. ३. पाठ–तिघांसी. ४. पाठ–भोगाल. ५. समग्र ओवीचा अन्य पाठ–आमुचे गृही क्रमोनि रजनी। प्रभातें शवां देइजे अग्नी। भलतिये परी पति अऋणा। करोनि धाडीं स्वर्गासी। ६. समग्र ओवीचा अन्य पाठ–तयामाजी विश्वामित्रें। काय केलें परिसाश्रोत्रें। महा भयानक पंचवक्त्रें। झेंप घाली अवचिती॥; ते समयीं विश्वामित्रें। काय केलें परिसा श्रोत्रें। महाव्याघ्र वक्त्रें। झेंपा घालीत पातला. ७. पाठ–परतीं तेथें. ८. पाठ–अंत्रें. ९. पाठ–मुरडे. १०. पाठ–धांव. ११. पाठ–वैरिया न घडावी. १२. पाठ–शर्वे. १३. पाठ–न सोडाच हा व्याघ्र. १४. पाठ–न फिटेची आम्हांसी.

असो, पुढें जन्म[1] घेतां ।
ऋषिऋण फेडूं सर्वथा[2] ।
मी पतिसवें पतिव्रता ।
गमन करीन अविलंबें.' ॥७८॥

म्हणवुनी नयन[3] झांकिले ।
पंच प्राणांतें आकर्षिलें ।
प्राण द्यावा, तंव सूचलें ।
ज्ञानदृष्टी कौशिका. ॥७९॥

'तारामती सांडीतां[4] प्राण ।
आमुचें जाईल प्रतिज्ञावचन' ।
म्हणोनि आणी[5] दोघेजण ।
पतिपुत्र तीपुढें. ॥८०॥

कैंचा व्याघ्र ? कैंचा वणवा ? ।
जैसा मृगाब्धीचा[6] हेलावा ।
कीं दुष्ट स्वप्न भोगितां जीवा ।
वोडंबरीसारिखें. ॥८१॥

राजा म्हणे, 'हो ! अंगने ! ।
तुजलागीं[7] हिंडलों वनें ।
बहुत[8] श्रमलीस तृषेनें ।
म्हणोनी[9] एथें बैसलीस ?' ॥८२॥

तारामतीनें लोचन ।
उघडितां देखिले दोघेजण ।
धाउनी दिधलें आलिंगन ।
शोक करी आक्रोशें. ॥८३॥

राजा म्हणे, 'सौभाग्यसरिते[10] ! ।
किमर्थ शोक ? सांग मातें' ।
येरी म्हणे, 'तुम्हांतें ।
पुनर्जन्म देखिले. ॥८४॥

तुम्ही जळोनी मेलेति वणवां ।
कवळोनि बैसल्यें उभय शवां ।
परम दुःख वाटलें जीवा ।
शंका[11] वाटे सांगतां. ॥८५॥

अकस्मात्[12] व्याघ्रें झेंपू ।
घालोनी नेल्या दोन्ही वपू ।
भयें मातें भरला कंपू ।
मृत्युसमयो वाटला.[13] ॥८६॥

यालागीं झांकले[14] नयन ।
हृदयीं स्मरला नारायण ।
परिसोनी तुमचें वचन ।
नेत्र[15] उघडोनी पाहिलें.' ॥८७॥

राजा म्हणे, 'वैकुंठपाळ ।
ऐशींच विघ्नें भंगुनी सकळ ।
मोक्षपदीं स्थापिल अढळ ।
सत्व देखोनी आमुचें.'[16] ॥८८॥

असो, तिघें मिळोनी पंथीं ।
चालतां कष्ट पावलीं रातीं ।
भयानक वनें लंघिती ।
नदनदिया भयासुर. ॥८९॥

यापरी चालतां मध्यरात्रीं ।
पुढें[17] देखिली वोस नगरी ।
जे कां पिशाचादि खेचरीं ।
आणि श्वापदीं बसविली.[18] ॥९०॥

१. पाठ-पुढे तरी जन्मघेतां. २. पाठ-तत्वतां. ३. पाठ-दोन्ही नेत्र. ४. पाठ-सांडील. ५. पाठ-आणिलें. ६. पाठ-मृगार्णवींचा. ७. पाठ-तुम्हांलागीं. ८. पाठ काय श्रम जाले कीं तृषेनें. ९. पाठ-पीडितां. १०. पाठ-सौभाग्यसरिता. ११. पाठ-सांगतां वाटे जशंका. १२. पाठ-असंख्यात. १३. पाठ-पातला. १४. पाठ-झांकोनि नयन. १५. पाठ-नेत्र उघडिले लगबगां. १६. समग्र ओवीचा अन्य पाठ-राजा म्हणे वैकुंठपाळें । ऐशींच विघ्नं टाळिलीं सकळें । मोक्षपदीं स्थापिलें अढळें । सत्व देखोनि आमुचें. १७. पाठ-लागली वोस पुरी. १८. पाठ-वसियली.

वेताळझोटिंगमेळावा[1] ।
मेसको, मायराणी, प्रेतार्णवा ।
धुमण घालिती मानवा ।
अशौच्यातें छळणार्थ.[2] ॥९१॥

सिंह, शार्दूल, महिष, सूकर[3] ।
व्याघ्र, कुंजर[4], तरस, तगर, ।
उलूक, भालुका भयंकर ।
शब्द करिती टिटविया.[5] ॥९२॥

ऐसे परी वोस नगरी ।
लंघूनि जातां, पृथ्वीवरी[6] ।
मुख दावितां दिनकरकरीं ।
पळत[7] गेली तमशोभा. ॥९३॥

यापरी लोटला एक मास ।
राजा न[8] लभे सुखाचा लेश ।
दुःखावेगळें निमिष ।
जाऊं नेदी कौशिक. ॥९४॥

भूपाळसत्त्व[9] शुद्धरत्न ।
कौशिककोप न गणी[10] घन[11] ।
मशकनाशिकींच्या[12] प्रभंजनें ।
मेरु जैसा न हाले. ॥९५॥

कीं लावण्यरूपवयसुगुणी[13] ।
नम्र होवोनी[14] प्रार्थी कामिनी ।
शुकहृदयींचा कामफणी ।
सहसा नुचली मस्तक. ॥९६॥

कीं आस्तिकमंत्रें फणी तक्षक[15] ।
स्थापितां[16] न घडे[17] याज्ञिक ।
तेंवी त्या तपें नृपनायक ।
अचळ केला वसिष्ठें. ॥९७॥

असो, सहकुमरकांता नृपती ।
परमकष्टें चालतां पंथीं ।
मोक्षदायक पुरी अवचितीं ।
वाराणशी देखिली. ॥९८॥

अपर नीलकंठाचें पीठ ।
माजी घरटीकार सुभट ।
काळभैरव वाजवी साट ।
महादोषाच्या मस्तकीं. ॥९९॥

जिये नगरीं अमरगण ।
जन्म[18] इच्छिती पावोनी मरण ।
मग इतरांचा पाड कोण ? ।
निधनें[19] लाहिजे मोक्षातें.[20] ॥१००॥

जे का नवखंडावेगळी ।
पंचक्रोशी वसुधातळीं ।
जेथें वसे चंद्रमौळी[21] ।
द्यावया मोक्ष जगातें.[22] ॥१०१॥

लक्ष चौऱ्यासी जन्मभ्रमणा ।
चक्रीं घातले जीव नाना ।
जन्म न चुके चतुरानना, ।
पंचवदनावांचूनी. ॥१०२॥

---

१. पाठ–डाकिनीलांवा. २. पाठ–छळिताती. ३. पाठ–क्रूर. ४. पाठ–जंबुक. ५. पाठ–टिवटिव्या. ६. पाठ–पद्मिनींवर. ७. पाठ–पळोन गेली. ८. पाठ–नलगे. ९. पाठ–भूपाळ शुद्धसत्वलक्षणा: भूपाळ शुद्धसत्व लेश ना. १०. पाठ–मनी. ११. पाठ–घणघणा. १२. पाठ-मशकनाशकाच्या प्रभंजना. १३. पाठ–वयसा गुणीं. १४. पाठ–दाबोनि. १५. पाठ–तक्षका. १६. पाठ-स्थापिला न संपडे जेवीं याज्ञिका. १७. पाठ–पडे याज्ञिकां. १८. पाठ-मोक्ष. १९. पाठ–सुकृतें लाहिजे निधनातें. २०. पाठ-सुकृतधनातें. २१. पाठ–विराजे चंद्र मौळीं. २२. पाठ–भक्तांसी.

ते पुरी देखोनी भूपाळें।
साष्टांग लोटांगण[1] घातलें।
पुढें चालतां देखिलें।
तीर[2] भागीरथीचें. ॥१०३॥

श्रीधरनखेंदुसुधाधारा।
वोपिल्या भक्त भगीरथचकोरा।
त्यांचेनि योगें[3] चराचरा।
प्राप्त झाली सुदैवें.[4] ॥१०४॥

तया सुरसेव्य गंगाजळीं।
स्नान करूनी, चंद्रमौळी।
पूजा बांधूनी शुद्ध कमळीं।
बद्धांजली स्तवितसे. ॥१०५॥

'जय जय कैलासगिरिनायका!।
कर्पूरगौरा! कामांतका!।
त्रिगुणत्रिपुरभेदका!।
वृषभध्वजा! महेशा! ॥१०६॥

जय जय भक्तकामकल्पद्रुमा!।
रमारमणविश्रामधामा!।
वैराग्यमुकुटींच्या ललामा!।
नीलग्रीवा! जटधरा!'[5] ॥१०७॥

स्तवूनि,[6] पूजूनि विश्वनाथा।
विनयें चरणीं ठेविला माथा।
देउळाबाहेरी नृपनाथा।
निघतां, कैसें वर्तलें? ॥१०८॥

कौशिकें प्रकटोनी देउळीं।
नृप वोढिला धरूनी अंचळीं[7]।
'तूतें शोधितां महीतळीं[8]।
आजी एथें देखिलें. ॥१०९॥

जरी द्यावया नव्हतें धन!
तरी कां केलें वाग्बंधन?।
याचक शिणवूनि[9] दान।
केलियाचें फळ काय? ॥११०॥

मी तों न सोडीं एक कवडी।
तूतें घालीन बांदवडी।
काय नेणशी माझी प्रौढी?।
करीन वेडीं सुरासुरें.' ॥१११॥

राजा म्हणे, 'दयासागरा।
आंवरा क्रोधहयवाग्दोरा।
आजी अस्त न होतां भास्करा।
देईन शरीरा विकूनी. ॥११२॥

अस्ताचळा[10] वासरमणी।
न जातां फेडीन ऋण।
जरी नव्हे सत्य वचन।
तरी शापूनी[11] भस्म करीं.' ॥११३॥

ऐशिया परी तपोतेजा।
शांतवूनि वैसवी राजा[12]।
करींची मुद्रिका काढिली[13] वोजा।
जे त्रिशंकुरायवोटींची. ॥११४॥

ते देऊनीं घेतलें तृण।
आपणासहित जायानंदन।
माथां स्वहस्तें बांधूनीयां, वदन।
खालावूनी चालिला. ॥११५॥

---

१ पाठ-दंडवत. २. पाठ-नीर. ३. पाठ-प्रसादें. ४. पाठ-सदैव. ५. पाठ-महेशा. ६. पाठ-स्तवनीं. ७. पाठ-अंजली. ८. पाठ-महीमंडळीं ९. पाठ-श्रमवोनियां. १०. समग्र ओवीचा अन्य पाठ-अस्ताचळा वासरमणें। ऋण फेडीन नव्हतां पेणें। न फेडितां स्वामीचे ऋणें। शापूनि भस्म करावें. ११. पाठ-क्षोभूनि भस्म करावें. १२. पाठ-वोजा. १३. पाठ-काढोनि राजा.

पुढील कथेची सूचना[१] ।
पहिले[२] विकील निजांगना ।
तयापाठीं निजनंदना[३] ।
मग[४] आपणा विकील. ॥११६॥

पुढें वर्तली कैशी कथा ? ।
ते[५] आणावी श्रवणपथा ।
तयासारिखी क्लेशावस्था ।
कोणें भोगिली असेल ?[६] ॥११७॥

इति श्रीकथारससागर ।
श्रवणें नाशी भव दुस्तर ।
नाना आघातगिरिवर[७] ।
भस्म[८] होती निर्धारें. ॥११८॥

इति भारतवनपर्व[९] ।
पवित्र कथा अतिअपूर्व ।
श्रवणें नाशती दोष सर्व ।
मुक्तेश्वर कवि वदे.[१०] ॥११९॥

—× ×—

## अध्याय चौथा

छायापतिवंशमंडण ।
चाले माथां बांधोनी तृण ।
सरिसीं पवित्र जाया नंदन ।
फिरे[११] पाटणीं ग्राहकार्थ. ॥ १ ॥

पुरी फिरवूनी[१२] शेवटीं ।
कौशिकें आणिलीं हाटवटीं ।
राजलक्षणें देखोनि दृष्टी ।
विस्मय पोटीं जगाच्या. ॥ २ ॥

म्हणती, 'हा हरिश्चंद्र नृपती ।
दुजी सुकुमार तारामती ।
पुत्र[१३] तिचा पवित्रकीर्ती[१४] ।
रोहिदासासारिखा.' ॥ ३ ॥

एक म्हणती, 'यथार्थ वचन ।
रायें वोपिलें राज्यदान ।
दक्षिणेलागीं हा ब्राह्मण ।
चौथा दिसे कौशिक.' ॥ ४ ॥

ऐशी परस्परें मात ।
प्रकट[१५] झाली नगरांत ।
ऐकोनि धाविन्नले समस्त[१६] ।
धनवंत धनेंशीं. ॥ ५ ॥

तारामती म्हणे, 'प्राणेश्वरा ! ।
प्रथम विकूनि मम शरीरा, ।
उरलिया धनालागीं कुमरा ।
वोपोनी[१७] शांतवीं ऋषीतें.' ॥ ६ ॥

तंव रोहिदास पितृचरणीं[१८] ।
मस्तक ठेवूनि, उभय पाणी ।
जोडोनी बोले विनयवाणी ।
तें[१९] तूं ऐकें कुकवर्या ! ॥ ७ ॥

---

१. पाठ-रचना. २. पाठ-प्रथम. ३. पाठ-नृपनंदना. ४. पाठ-शेखीं. ५. पाठ-तूं ऐक धरित्रीनाथा. ६. पाठ-सांग पां. ७. पाठ-आंधारगिरिवर. ८. पाठ-भग्न. ९. पाठ-शांतिपर्व. १०. पाठ-एका पोथीतील समाप्तिलेख असा-इति श्रीमन्महाभारते महापुराणे शतसहस्रसंहितायां शांतिपर्वणि हरिश्चंद्राख्यानो नाम काशीप्रवेशो नाम तृतीयप्रसंग. ११. पाठ-फिरे पाटणग्राहिकां. /१२. पाठ-फिरोनि; फिरतां. १३. पाठ-पैल तिजा उत्तमकांती. १४. पाठ-उत्तमकोर्ति. १५. पाठ-प्रगटली नगराआंत. १६. पाठ-बहुत. १७. पाठ-विकूनि. १८. पाठ-मातृचरणीं; मातृवचनीं. १९. पाठ-म्हणे परिसें नृपवर्या !

'प्रथम माझिया धनारविंदें ।
कौशिकमौळीं[1] पूजा बांधें ।
जेणें[2] पुत्रपणाचीं ब्रिदें ।
वदनीं विबुधें वानिजे.' ॥ ८ ॥

ऐकोनी दोघांचीं विनयोत्तरें ।
आश्चर्य मानिलें ऋषीश्वरें ।
मग म्हणे, 'तुझ्या[3] शरीरें ।
ऋण कैसें फिटेल ? ॥ ९ ॥

नृपांगीं दोन तुकें ।
एक तुक नृपनायिके ।
अर्ध[4] उरलिया बाळकें ।
विकूनी द्यावें देहासी.'[5] ॥१०॥

कर्मरेखा करुनी मान्य ।
अंगनामस्तकीं बांधी तृण ।
रूपयौवनलावण्य ।
देखोनि, आलीं ग्राहकें. ॥११॥

ऐश्वर्यसंपन्न कुट्टिणी ।
शिबिके बैसोनी ते क्षणा ।
लावण्यवनिता देखोनी ।
येती[6] जाली जवळिके. ॥१२॥

तये वेश्येचिया धना ।
करूं शके कोण गणना ? ।
सुंदर[7] देखोनी अंगना ।
आणवी[8] द्रव्य तात्काळ. ॥१३॥

तुळे उभवुनी धडधडां[9] ।
कनककोटी[10] भरी पारडां ।
तारामतीच्या तनूचा धडा ।
करूनि, वोपी तापसा. ॥१४॥

ऋषिकरीं वोपूनि धन ।
हातीं धरिली[11] गुणनिधान ।
जैंवी का श्रुति अवर्णवदन ।
स्पर्श करी कल्पांतीं. ॥१५॥

कीं ते पवित्र शिळा गडंकी ।
पशुध्ने नेली मांसतुकीं ।
ना तरी जान्हवीजळ मद्यकीं ।
मद्यालागीं घेतलें.[12] ॥१६॥

तैशी पवित्र राजबाळा ।
शिबिके वाहूनि गुणवेल्हाळा ।
भोंवतीं वेष्टिती कामिनीपाळा[13] ।
उदक डोळां ढाळिती. ॥१७॥

कुमरकांतावियोगानळें ।
भडका उठतां हृदय पोळे ।
म्हणे, 'काय[14] जाश्वनीळें ।
तिघां केल्या तीन वाटा.' ॥१८॥

कुंटिणी म्हणे, 'गे! सुंदरी ! ।
तुझा[15] भाग्यलक्षणतमारी ।
उदयो झाला[16] म्हणोनी घरीं[17] ।
दैवें आलीस आमुच्या. ॥१९॥

आम्हांऐशिया तुझिया दासी ।
सकळ वैभवा स्वामिणी होशी ।
तूंचो पढियंती रायाशीं ।
होशील[18] पात्र प्रीतीचें.' ॥२०॥

१. पाठ-पूजावी ऋषीचा पदारविंदें. २. पाठ-सत्वरक्षा स्वानंदें. ३. पाठ-तुमच्या. ४. पाठ-उरले अर्थ त्यासी. ५. पाठ-धनासी. ६. पाठ-माल पुसे तियेचें. ७. पाठ-सौंदर्य. ८. पाठ-मागवांधना. °. पाठ-घडा. १०. पाठ-कनककोटी भरी; कनक भरिलें. ११. पाठ-धर्शनि. १२. पाठ-वोतिलें. १३. पाठ-कुंभिनीपाळा. १४. पाठ-हा ! कर्मा ! १५. पाठ-तुझ्या भाग्यें पद्मिणीवरा; तुझिया भाग्यपद्मावरी. १६. पाठ-केला. १७. पाठ-दारीं. १८. पाठ-झालीसी पात्र प्रीतिस्वें.

ऐशिया परी ते कुंटिणी ।
बुझावीत मवाळ वचनीं ।
तारामतीचा शोकवन्ही ।
विषादवार्ते[१] पेटला. ॥२१॥

शिबिके आंतुनी तारामती ।
उडी टाकुनी खालती ।
धावोनी म्हणे, 'प्राणपती ! ।
इच्या हातीं न द्यावें.' ॥२२॥

राजा म्हणे, 'तूं तपोधना ।
प्रार्थूनि सोडवीं आपणा' ।
येरी लागोनी ऋषिचरणा ।
'मज[२] सोडवीं यापासोनी.' ॥२३॥

इचें आचरण दिसे दुष्ट[३] ।
माझा[४] स्वधर्म पावेल भ्रष्ट ।
शेखीं माझ्या जिवा वाट ।
होईल प्राप्त नरकाची.' ॥२४॥

कांहीं कोप, कांहीं करुणा ।
करूनि, वोपिलें तिचिया धना ।
तंव काळकौशिक तया[५] क्षणा ।
ग्राहक आला सुंदरी. ॥२५॥

तो परम पवित्र श्रोत्री ।
सदाचारी अग्निहोत्री ।
धर्मशाळे अन्नसत्रीं ।
पाकालागीं घेतसे.[६] ॥२६॥

पवित्र तारामतीचें तुक ।
तुकोनि दिधलें शुद्ध कनक ।
राजांगनेसी[७] काळकौशिक ।
घेऊनी जातां आश्रमा. ॥२७॥

रोहिदास म्हणे,'जी! ताता ! ।
मातृस्नेहें[८] कळवळ चित्ता ।
'भेटोनि येईन मागुता ।
वेळ न लागतां क्षणमात्रें.'[९] ॥२८॥

राजा म्हणे सगद्गद[१०] वचनें ।
'भेटोनि मागुती शीघ्र येणें' ।
मातृ पाठीं धांवतां तेणें ।
आलें[११] देखे बाळक. ॥२९॥

उभी राहुनी वेल्हाळा ।
पोटेशीं[१२] कवळूनी बाळा ।
स्तन घालूनि मुखकमळा ।
कुरवाळुनी बुझावी. ॥३०॥

म्हणे,'बाळका ! कुळभूषणा ! ।
रोहिदासा![१३] आनंदघना ! ।
तुझ्या न देखतां वदना ।
मी दुःखी तुजविणें.' ॥३१॥

आंसवें भारुनी उभय नयन ।
'हाहा !' शब्दें करी रुदन ।
परतापक्लेशें[१४] सज्जन ।
नवनीत तैसे वितुळती. ॥३२॥

काळकौशिक म्हणे,'माते ! ।
स्नेह सांडूनि चालिजे चित्तें[१५] ।
कृपा केलिया कमळाकांतें ।
योग होईल दोघांचा.' ॥३३॥

---

१. पाठ–विशेष पेटे वचनानळें. २. पाठ–म्हणे माझिया प्राणां सोडवीं. ३. पाठ–नष्ट. ४. पाठ–माझें पतिव्रत्य पावेल नष्ट; माझें पतिव्रत पावेल भ्रष्ट. ५. पाठ–तपोधना. ६. पाठ–घेतली. ७. पाठ–तारामतीसि. ८. पाठ–कवळी. ९. पाठ–क्षणार्धें. १०. पाठ–सद्गदित. ११. पाठ–जननीं; जाणोनी देखे बाळका. १२. पाठ–पोटिसीं कवळिलें सुकुमार बाळा. १३. पाठ–तुझा वियोग झाला प्राणा; तुझा वियोग न साहवे प्राणा. १४. पाठ–परतापें क्लेश सज्जना. १५. पाठ–पंथें.

येरी ऋषीचे पादपद्मीं ।
नमूनि म्हणे,'तात ! स्वामी ! ।
माझें बाळक घ्यावें तुम्हीं ।
सेवा करील चरणाची.' ॥३४॥

करुणा येतां ब्राह्मणोत्तमा ।
अर्ध तुक वोपिलें हेमा ।
कुमारासहित राजभामा ।
स्वकीय धामा आणिली. ॥३५॥

तुकें दोन उरलें ऋण ।
यालागीं रायें घेतलें तृण ।
मायां चांधोनी आपण ।
उभा ठेला हाटवटीं. ॥३६॥

नगरवासी नारी नर ।
देखतां नयनीं ढाळिती नीर ।
म्हणती, 'चंडाळ ऋषीश्वर ।
विकाया[1] नृप घातला.' ॥३७॥

मात फांकली[2] नगरीं ।
वीरबाहो कुराचारी ।
श्वपच यातीचा प्रेतपुरी- ।
नाथ जाणा प्रत्यक्ष. ॥३८॥

तामस तनूची दुर्गंधी ।
विशाळरूपी तालस्कंधा[3] ।
तया देखोनि सज्जनमांदी ।
दुरी ठेली[4] पहात. ॥३९॥

होमशाळेमाजी श्वान ।
कीं ग्रहणीं सिंहिकानंदन ।
धनकुंभीं[5] पिशाचगण ।
प्रकटे तैसा पातला. ॥४०॥

तया डोंबाचिये गृहीं ।
धनालागीं मर्यादा नाहीं ।
गंगातटीं प्रेतदाहीं[6] ।
द्रव्य वोपिती तयातें. ॥४१॥

डोंब म्हणे, 'गा ! साचें ।
काय मोल सांग याचें ?' ।
ऋषि म्हणे, 'दे[7] ह्याचें ।
दोन तुकें सुवर्ण.' ॥४२॥

ऐसें बोलतांची[8] कौशिक, ।
डोंबें तुकोनी दिधलें कनक ।
नृपा नेतां सकळ लोक ।
शोक करिती आक्रोशें. ॥४३॥

हरिश्चंद्र पवित्र परम ।
त्यासही प्राप्त दुष्ट कर्म ।
भोगणें[9] घडे धाम ।
अंत्यजाचें अपवित्र. ॥४४॥

श्वपचगृहा[10] पवित्र नृपति ।
चालतां, मार्गीं पसरल्या अस्थी ।
गलद्रक्त चर्में वाळती ।
दुर्गंधी घ्राणीं बैसली. ॥४५॥

अस्थी चुकवुनी ठेवी पाय ।
तंव देखिलें डोंबालय ।
रत्नखचित हाटकमय ।
अतिरमणीय साजिरें. ॥४६॥

---

१. पाठ–विक्रया; विकरा. २. पाठ–प्रगटतांचि. ३. पाठ–अर्गळास्कंधी. ४. पाठ–जाहली पाहतां. ५. पाठ–निधानकुंभीं. ६. पाठ–प्रेतदाही; प्रेतवाही. ७. पाठ–गा ! तयाचें. ८. पाठ–बोले तों. ९. पाठ–भोगणें घडे अपवित्र धाम । अंत्यजाचें कुश्चिळ. १०. पाठ–श्वपच्र वाडा.

पण्यांगनेचें शृंगारयौवन ।
रसें[1] परिपक्व वृंदावन ।
कुटिल नराचें बाह्याचरण ।
पतिव्रतापण जारिणीचें. ॥४७॥

ऐशियापरी श्वपचधाम ।
ऐश्वर्य[2] मनोरम ।
जेवी का पशुघ्नाचें नाम ।
'दयाळ' ऐसें बोलिजे. ॥४८॥

तया धामशिखरावरी[3] पद्मिनी ।
रूपलावण्यचातुर्यखाणी[4] ।
उभी वल्लभा लक्षीत नयनीं ।
वेष्टित दासीदशकेंशीं. ॥४९॥

वल्लभापाठीं राजचिन्ही ।
पुरुष देखोनी भाविलें मनीं, ।
प्रेतदहनालागीं कोणी ।
धन घेउनी पातला. ॥५०॥

हर्षें उतरोनी लवलाहें ।
बाहेर येउनी जंव पाहे ।
तंव राजा कवळोनी बाहे ।
वीरबाहू[5] आणीत. ॥५१॥

आदरें बोलावूनि कांते ।
नृप वोपिला धरूनि हातें, ।
म्हणे, 'काज सांगिजे यातें ।
बाह्यवर्तांचें[6] सर्वदा.' ॥५२॥

ते म्हणे, 'हा रोड[7] रोगी ।
याच्या कामा[8] लागो आगी ।
शक्ती कैंची याचे आंगीं ? ।
सजीव प्रेता आणिलें.' ॥५३॥

रागें आणूनि घागरी ।
ठेविली नृपवराचे शिरीं ।
म्हणे, 'उदक आणीं झडकरी ।
भागीरथी गंगेचें.' ॥५४॥

कुंभ[9] घेऊनि भूपाळ ।
भरी भागीरथीचें जळ ।
कौशिकें येऊनि मांडिला छळ ।
तयावेळीं रायाचा.[10] ॥५५॥

कुंभ घेवोनि जातां पुढें ।
हाणोनि फोडियला दंडें ।
हातें लोटोनि देतां पडे ।
तोंडघशीं पालथा. ॥५६॥

शरीर थरथरा गळत[11] ।
अंत्यजें देखिला रिता येत ।
कोपा चढला अत्यद्भुत ।
धांवोनि मारी चडकणा. ॥५७॥

'वृथा पोशिला धष्टपुष्ट ।
प्रथम मुहूर्तीं फोडिला घट ।
तुझेनी न होती कष्ट ।
तरी कां आम्हां नागविलें ?' ॥५८॥

राजा म्हणे, 'विशाळ घागरी ।
भरूनि[12], गेलों जी ! चांचरी ।
कोप सांडुनी मजवरी ।
क्षमा केली पाहिजे.' ॥५९॥

---

१. पाठ-विलसे परिपक्व वृंदावन. २. पाठ-अधाचरण; अधाश्चर्य. ३. पाठ-धामासी खरी. ४. पाठ-रूपलावण्यगुणा विळासिनी. ५. पाठ-वीरबाहूनें आणिला. ६. पाठ-बाह्यसेवेचें अखंड; ब्रह्मवृत्तीचें सर्वथा. ७. पाठ-रोडांगी. ८. पाठ-कर्मा. ९. पाठ-गुप्तवेशें पाठीसी. १०. पाठ-कौशिकें वाटेशी निवाडें । येउनी मांडिला दगड. ११. पाठ-शरीर थरथरां कांपत. १२. पाठ-भारें.

मग[1] दुजी घागरी लहान ।
देऊनि म्हणे, 'भरीं रांजण ।
हे फोडिशी तरी प्राण ।
घेईन तुझा तात्काळीं.'[2] ॥६०॥

दुजा कुंभ घेउनी माथां ।
शीघ्र पाणी[3] भरुनी आणितां ।
रांजणां जाउनी गुप्तता[4] ।
फोडी तत्त्वतां बुडुखीं. ॥६१॥

उदयापासोनि अस्तवरी ।
राजा कष्टें उदक भरी ।
बिंदुमात्र न थारे[5] वारी ।
अभिषेकपात्रासारिखें. ॥६२॥

जैसा भाग्यहीनाचा उदिम ।
कीं वंध्यांगनेशीं रतिकाम ।
तेवीं अहोरात्र करितां श्रम ।
कष्ट त्याचे निष्फळ. ॥६३॥

ऐसेपरी तो नृपराज ।
क्लेश पावे करितां काज ।
अस्ताचळा मित्रराज[6] ।
जातां विनवी[7] अंत्यजा. ॥६४॥

'वर्णाश्रमाचा सेतु न ढळे ।
स्वामिसेवेचा पंथ चाले ।
ऐसें पाहिजे केलें ।
अन्नदान, स्वामिया !' ॥६५॥

अंत्यजें जाउनी आपण ।
नृपा वोपिलें शुष्कान्न ।
भार्गवशाळेचें भाजन ।
आणि इंधन आज्यादि. ॥६६॥

नृपें[8] बांधोनी पदरीं ।
घेउनी गेला[9] गंगातीरीं ।
स्नान सारुनी, सामुग्री ।
घेउनी, पाक सारिला. ॥६७॥

हृदयस्थदेवार्चन ।
करुनी, पात्रीं वोगरिलें अन्न ।
गोग्रास काढुनी, वदन ।
तृप्त केलें अग्नीचें. ॥६८॥

एक विष्णु सर्वा घटीं ।
सर्व भूतें ज्याचे पोटीं ।
तरी संकल्पविकल्पाची गोष्टी ।
कल्पनेची कायशी ? ॥६९॥

भोज्य, भोक्ता, भोजन, ।
त्रिरूपें एक नारायण ।
ब्रह्मी[10] ब्रह्म ब्रह्मार्पण ।
करिता झाला या बोधें. ॥७०॥

ग्रास घालावा जंव वदनीं ।
तंव ब्राह्मणवेशें[11] कौशिक मुनी ।
तेथें पातला, भोजनीं ।
इच्छा धरुनी, क्षुधार्थी. ॥७१॥

उदरपृष्ठीची घडी ।
करूनि चरणांची[12] वेंगडी ।
झोंक सांवरितां दंडीं ।
शब्द तोंडीं न बोलवे. ॥७२॥

---

१. पाठ-दुजी घा घागर बहु लहान. २. पाठ-अविलंबें. ३. पाठ-ऋषि छिद्र पाडी. ४. पाठ-तत्क्ता. ५. पाठ-नसे. ६. पाठ-मित्रपंकज. ७. पाठ-आणवी. ८. पाठ-नृप सुस्नात. ९. पाठ-आला. १०. पाठ-ब्रह्मभावें. ११. पाठ-ब्राह्मणरूपें. १२. पाठ-चरणावळ्या; चरणावली.

करसंकेत[१] देउनी मुखा।
देखोनि, दया आली नृपनायका।
म्हणे, 'त्रैलोक्यजनका![२]।
स्नान कीजे सत्वर.' ॥७३॥

स्नान सारितांच ब्राह्मण।
नृपें द्विभागिलें अन्न।
एक वोपी[३] मुनीलागोन।
एक ठेवी आपणा. ॥७४॥

ब्राह्मण देखोनी[४] क्षुधार्थी।
राजा म्हणे, 'इतुकेन तृप्ती।
कैशी पावेल हे मूर्ती!'।
म्हणोनि मागें राहिला. ॥७५॥

ब्राह्मण बैसवुनो पात्रीं।
जेवितां मिटक्या मारी[५] वक्त्रीं।
म्हणे, 'बहुतां दिवशीं नेत्रीं।
आजी अन्न देखिलें.' ॥७६॥

स्वकीय भाग तो भक्षिला।
दुजियाशीं[६] नेत्र लाविला।
नृपें जाणुनी, पात्र गोळा[७]।
करूनि, वोपिला[८] स्वभाग. ॥७७॥

तृप्ति पावोनि ऋषीश्वर।
उठिला देवोनि ढेंकर।
उदक[९] मात्र नृपवरें।
चार अंजली सेविल्या. ॥७८॥

पोट[१०] कसोनी कडासीं।
सदा सादर सेवसी।
भोजनकाळीं कौशिकऋषी।
येउनी अन्न भक्षीत. ॥७९॥

निराहार शक्तिहीन।
दिसे जैसा रंक दीन।
काज न होतां धांवोन।
बळें दासी धुमसिती. ॥८०॥

ऐशा परी तारारंगक।
सेवा करितां अब्द एक।
भरीं डोंबाघरीं गंगोदक।
करी भोजन अर्कोतीं.[११] ॥८१॥

दासी[१२] पाहाती रांजणीं।
बिंदुमात्र न दिसे पाणी।
नृप ताडुनीयां, मूर्ध्नीं।
कुंभ देउनी धाडिला. ॥८२॥

निबिड तमाचिया पोटीं।
चालतां पंथ न दिसे दृष्टी।
कुंभ भरुनी परम[१३] कष्टी।
आणुनी पाजी स्वामिया. ॥८३॥

तंव वीरबाहूची अंगना।
म्हणे, 'त्यासी ठेवावें स्मशाना।
काज[१४] न करी हा सदना।
योग्य नव्हे आमुच्या.'[१५] ॥८४॥

१. पाठ-करें संकत दाउनी मुखा. २. पाठ-त्रैलोक्यनायका. ३. पाठ-अर्पी. ४. पाठ-म्हणे बहु. ५. पाठ-वाजती. ६. पाठ दुजिया भागा लाविला डोळा. ७. पाठ-गाला। करूनि वोपिलें स्वभावें. ८. पाठ-योजिला. ९. पाठ-उदकआहार. १०. पाठ-कटासी कसोनी कासेसी। पटका कसोनी कासेसी. ११. समग्र ओवीचे पाठभेद-ऐशा परी ताररंग। सामग्री घेऊन सांग। भरी डोंबाघरीं गांग। करी संध्यास्नान अर्कोतीं ॥; ऐसिया परी तारारंग। सेवा करितां अब्दसीम। भरितां डोंब मांगे गांग। करितां भोजन रात्रीसी ॥; ऐसिया परी तारारंगें। सेवा करितां अब्दसंगें। कष्ट होती आन योगें। दुःख भोगी सकुमार. १२. पाठ-दासी जंव पाहाती भाजनीं. १३. पाठ-महाकष्टीं. १४. पाठ-श्रम करितां सदना. १५. पाठ-आमुतें.

अयोध्यापाळ पवित्र नृपती ।
डोंबें रक्षणा ठेविला प्रेतीं ।
मसणखांबा[1] ऐसें म्हणती ।
नाम त्याचें प्रसिद्ध. ॥८५॥

'माझिया आज्ञेविना सर्वथा ।
तुवां जाळूं न द्यावें प्रेता' ।
ऐसें सांगोनि नृपनाथा ।
नेउनी ठेविले[2] स्मशानीं. ॥८६॥

गंगातीरीं[3] अटोळा ।
घालुनी बैसविलें[4] नृपाळा ।
पुढें वर्तलें तें भूपाळा ![5] ।
श्रवण[6] करीं कुरुवर्या ! ॥८७॥

इति भारतवनपर्वणी ।
सकळ तीर्थांचिया श्रेणी ।
जोडती इये ग्रंथश्रवणीं ।
मुक्तेश्वरकवि वदे. ॥८८॥

—××—

## अध्याय पाचवा

प्रेतपाळें प्रेतरक्षणा ।
राजा[7] ठेविला स्मशाना ।
तारामती नृपवंदना ।
कोण कर्म वोढवलें ! ॥ १ ॥

काळकौशिकगृहीं सती ।
पाकशाळें तारामती ।
रोहिदास शिष्यपंक्तीं ।
सेवा करी सर्वदा. ॥ २ ॥

ऐसा क्रमिला किंचित काळ ।
कौशिकें येउनी मांडिला छळ ।
कुसुमवाटिकेमाजी बाळ ।
बडव्यांसंगें पातला. ॥ ३ ॥

तंव विश्वामित्र म्हणे,'तक्षका !।
दशनें दंशीं नृपबाळका' ।
आज्ञा[8] वंदुनी वाटिका[9] ।
ठाकुनी आला गुप्तत्वें.[10] ॥ ४ ॥

सुमनगर्भी वसे भोगी ।
जेवीं[11] कां विजनीं वसे[12] योगी ।
येथें[13] नृपनंदन अति वेगीं ।
आला समीप त्या ठायां. ॥ ५ ॥

परिमळकरंडा वामहस्तीं ।
सव्यें[14] सुमनें घेंवुनी भरिती[15] ।
जाळी वृक्ष यळी किती ।
एक[16] पहाती जळीं स्थळीं. ॥ ६ ॥

मालती[17] मोगरे शेंवती ।
कमळ पारिजात केतकी ।
मंदार कांचन चंपकजाती ।
तुळशी दवणे बिल्वादि. ॥ ७ ॥

---

१. पाठ-मसणखांब. २. पाठ-स्थापी. ३. पाठ-गंगेचिया तीरीं. ४. पाठ-बैसविला. ५. पाठ-नृपळा. ६. पाठ-श्रवणीं ऐकें. ७. पाठ-राजया ठेवियलें. ८. पाठ-ऋषिआज्ञेनें वाटिका. ९. पाठ-वारीका. १०. पाठ-जवळिके. ११. पाठ-वास. १२. पाठ-करिजे जनीं जेवीं योगी; करिजे जेवीं विजनीं योगी. १३. पाठ-भोगें वोढिला असतां वेगीं । तया सुमना पातला. १४. पाठ-सवेग सुमनें वेंचिती. १५. पाठ-धरिती. १६. पाठ-एक वेचिती जळस्थें. १७. पाठ-मालती मोगरे बकुळ केतकी । कमळें सेविती पारिजातकीं । कांचन मंदार चंपकीं । तुळसी दवणे बिल्वादि ॥

भूपाळबाळें बडवियांसंगीं ।
सुमनें वेंचितां लक्षीत[1] भोगी ।
दैवें[2] प्रेरिला असतां वेगीं ।
त्याचि सुमना पातला. ॥ ८ ॥

तक्षक जयामाजी बसत ।
तया[3] पुष्पा घातला हात ।
दंश[4] केला रोंवूनि दांत ।
उलथोनि पडे माघारा. ॥ ९ ॥

तक्षकविषाचा[5] अनळ ।
स्पर्शतां[6] अवरुधे आयुष्यमूळ[7] ।
तनुयंत्रींचा प्राणगोळ ।
जातां[8] पात्र रितें पडे. ॥१०॥

ऐशियापरी मागिले कडे ।
दशन[9] स्पर्शतां उलथोनि पडे ।
पंच प्राणांचें बिरडें ।
मोकळें जालें क्षणार्धें. ॥११॥

बडवे पाहाती जंव दृष्टी ।
तंव जाळीये व्याळ धुंदाटी ।
देखतां भयाभीत पोटीं ।
पळोनि गेले आश्रमा. ॥१२॥

मातेसी सांगावया सवडी[10] ।
न दिसे, गुंतली पात्रें वाढी ।
पाकशाळे जाउनी तांतडी ।
वृत्तांत कर्णी[11] सुचविला.[12] ॥१३॥

परिसोनि पुत्रनिधनवार्ता[13] ।
मातृहृदयीं शोकसरिता ।
पूर[14] उचंबळोनि गर्ता ।
पूर्ण होती नेत्रांच्या. ॥१४॥

गिळोनि पुत्रशोकार्णव ।
धैर्यें जाली कुंभोद्भव ।
म्हणे, 'कळतांचि भूदेव ।
अतृप्तीनें उठतील.' ॥१५॥

आंचळें पुसोनि नेत्रकमळें ।
करें कवळोनि पंचपाळें[15] ।
अन्नेंकरूनि ब्राह्मणकुळें ।
तृप्त केलीं षड्रसें. ॥१६॥

भोजनें होतां[16] सर्वांचीं ।
दीप्ति लोपली दिनकराची ।
पाउलें वंदुनी ऋषींचीं ।
सद्गदित अनुवादे. ॥१७॥

'रोहिदास पूजेचीं कमळें ।
आणूं गेला प्रारब्धकाळें ।
तेथें अवचिता काळव्याळें ।
दंशिला ऐसें ऐकिलें.[17] ॥१८॥

आतां जाईन कुसुमवना[18] ।
शोधूनि पाहेन निजनंदना' ।
ऐसें बोलोनि सजलनयना ।
वातवेगें निघाली. ॥१९॥

---

१. पाठ–लक्षिला. २. पाठ–भोगें वेढिला असतां वेगीं । तया सुमना रातला ॥; काळपाशें वेढिला म्हणोनि वेगीं । त्याचि सुमना रातला. ॥ ३. पाठ–रोहिदास तेथें ये त्वरित. ४. पाठ–दंश करोनि रोविता दांत. ५. पाठ–विषाचिया अनळा. ६. पाठ–स्पर्शतां आयुष्यधना मुकला. ७. पाठ–आयुष्यमळा. ८. पाठ–देतां पात्र माघारी. ९. पाठ–दशनस्पर्शें १०. पाठ–संवगडी. ११. पाठ–श्रवणीं. १२. पाठ–सूचिला. १३. पाठ–पुत्राची निधनता. १४. पाठ–पुढें उचंबळोनी गर्जतां. १५. पाठ–कनकपाळें. १६. पाठ–सारिती सर्वेची. १७. पाठ–सांगती. १८. पाठ–कमलवना.

मोहतमाच्या सागरीं ।
कवळीत शोकार्णवाच्या लहरीं ।
कुसुमवाटिके मातामगरी ।
अंचळत्यागें[1] भ्रमतसे.[2] ॥२०॥

म्हणे, 'बाळा ! कुळभूषणा ! ।
हृदयस्थानीं[3] प्रेमपान्हा ।
भेटोनियां[4] करीं पाना ।
अगा ! नंदना ! वेगेंसीं.' ॥२१॥

ऐशी विलापें भ्रमतां[5] वनीं ।
तंव शवा उचलूनि कौशिकमुनी ।
पुढें ठेवितां, चरणीं ।
लागुनी पडे अवचित. ॥२२॥

अवचट लागतां हाता ।
वोळखिलें निजतनयप्रेता[6] ।
पोटीं कवळोनि, माता[7] ।
भूमी माथा हाणीत. ॥२३॥

मुखें[8] करितसे शोक ।
हृदय पिटोनी, मारी हाक ।
दु:खें रडतां कौशिक ।
प्रकट जाला काननीं. ॥२४॥

म्हणे, 'तूं कवण ? कवणाची ? एथें ।
यक्षराक्षस भक्षिती[9] प्रेतें' ।
येरी म्हणे, 'जी ! बाळकातें ।
काळसर्पें डंखिलें.' ॥२५॥

ऋषि म्हणे, 'आहे कीं प्राण ?' ।
माता म्हणे, 'निमाला नंदन' ।
येरु बोले, 'किजे दहन ।
मोक्षपंथा[10] मेळवीं.' ॥२६॥

उदयो[11] केलिया पद्मिनीनाथें ।
धन वोपिल्यावीण एथें[12] ।
जाळूं नेदिती शवातें ।
दाहितां दंड पावशी. ॥२७॥

आतां जाईं स्मशानभूमी ।
धर्मार्थ काष्ठें[13] वोपूं आम्ही ।
शोक करितां निरयधामीं ।
पुत्र तुझा जाइल.' ॥२८॥

येरी म्हणे, 'निशा दाट ।
चालतां मातें न दिसे वाट' ।
ऋषि म्हणे, 'आम्ही तट ।
दाऊं तूतें गंगेचें.' ॥२९॥

ऐशी बोधुनी तारामती ।
शवासहित धरूनी हातीं ।
नेली, जेथें रक्षण पती ।
होता तिच्या स्मशानीं. ॥३०॥

चिताभितचीं[14] लांकडें ।
आणुनी, सरणीं घातलें मडें ।
मुनिहस्तें[15] उभय तोंडें ।
लागतां, शिखा दाटल्या.[16] ॥३१॥

पुत्रशोकाचा उमाळा[17] ।
धडके, धडकतांचि चितानळा[18] ।
ऋषि म्हणे, 'प्रेतपाळा ।
कळतां, देह[19] दंडील.' ॥३२॥

---

१. पाठ-अचल योगें, अचल अंगें. २. पाठ-जातसे. ३. पाठ-हृदयस्तनीं. ४. पाठ-मज भेटोनियां; देखोनियां. ५. पाठ-श्रमतां. ६. पाठ-निजसुताचिया. ७. पाठ-भूमी माथां । हाणित पिटोनियां कपाळा. ८. पाठ-उभय करसरोजीं करी शंख. ९. पाठ-भूत प्रेतें. १०. पाठ-मोक्षमाथां. ११. पाठ-उदयो करितां पद्मनाथें. १२. पाठ-तेथें. १३. पाठ-दाहों. १४. पाठ-चिताविनाचीं; चिताभिताचळाकडे. १५. पाठ-मातृहस्तें. १६. पाठ-धडकती. १७. पाठ-उबाळा. १८. पाठ-चित्तानळा. १९. पाठ-दंडें.

ऐसें बोलोनी आपण ।
गुप्त झाला तपोधन ।
प्रदीप्त देखोनी हुताशन ।
मसणखांबा[1] धाविन्नला. ॥३३॥

जळें विझवूनी सरण ।
शवा वोढिलें धरुनी चरण ।
मातेपुढें टाकून, ताडण ।
करिता[2] झाला दोर्दंडें. ॥३४॥

'आतां कळतां प्रेतनाथा ।
मातें दंडील तो सर्वथा' ।
ऐसें बोलोनियां लाथा ।
ताडोनि, गेला[3] तियेसी. ॥३५॥

तंव अर्धदाहित[4] प्रेत पोटीं ।
कवळोनि, माता हृदय पिटी ।
म्हणे, 'कटाकटा ! अदृष्टीं ।
काय लिहिलें, विधात्या ! ॥३६॥

सूर्यवंशीं विजयकेतू ।
हरिश्चंद्रनृपाचा सुतू ।
त्याचा मरणकाळपंथू ।
केवढा[5] घडला प्रारब्धें. ॥३७॥

व्याळदंशें[6] मरण ज्यासी ।
मोक्ष म्हणती नाहीं त्यासी ।
तें आजी घडलें यासी ।
बाळकासी माझिया. ॥३८॥

सर्पें दंशिलें म्हणोनि वन्ही ।
प्राप्त नव्हे तुजलागुनी ।
शेखीं अंत्यजाचा पाणि- ।
स्पर्श जाला तुजलागीं.'[7] ॥३९॥

ऐशीं तियेचीं विलापवचनें ।
मसणखांबा,[8] ऐकोनि श्रवणें ।
येउनी[9] म्हणे, 'तूं कवण ? ।
शोक करीशी कवणाचा ?' ॥४०॥

येरी म्हणे, 'गा ! प्रेतनाथा ![10] ।
हरिश्चंद्रनृपाची मी कांता ।
काळसर्पें डंखिलें सुता ।
रोहिदासा माझिया. ॥४१॥

धर्मार्थ एकें[11] दाविलें स्थळ ।
काष्ठें आणुनी वोपितां अनळ ।
तुवां धांवोनि उतावेळ[12] ।
सुकृतवांटा साधिला !' ॥४२॥

ऐकुनी अंगनेच्या वचना ।
अश्रु आले[13] उभय नयना ।
म्हणे, 'कर्मा ! निजनंदना ।
कष्टविलें कृतघ्नें.'[14] ॥४३॥

केवढें कर्माचें बळ ।
कर्में व्यापिला ब्रह्मगोळ[15] ।
भेदुनी मायेचें पडळ ।
ऐसें दुर्घट करविलें.' ॥४४॥

१. पाठ-मरणखांब. २. पाठ-करी तियेसी. ३. पाठ-मारूनि जाय स्वस्थाना. ४. पाठ-अर्धदाही. ५. पाठ-कैंचि. ६. पाठ-दशनें मृत्यु. ७. समग्र ओवीचा पाठभेद-सर्पें डंखिलें म्हणोनी । अग्निमाजी घातलें आणोनी । शेखीं अंत्यजाचे पाणी । प्राप्त झाले तुजलागीं. ८. पाठ-परतोनी आला. ९. पाठ-तूं कवण ? कवणाची ? म्हणे. १०. पाठ-डोंबा ! प्राणनाथा ! ११. पाठ-येथें. १२. पाठ-तात्काळ. १३. पाठ-लागले. १४. पाठ-भ्रष्टविलें सुकृतें. १५. पाठ-ब्रह्मांडगोळ.

येरी म्हणे, 'स्मशानवासी ।
मम दुःखें दुखित होसी ।
तूं[1] कोण ? हें मज मानसीं ।
कळलें पाहिजे, दयाळा ! ॥४५॥

येरू सांगतां पूर्व कथन ।
दोघां पडिलें आलिंगन ।
शोक[2] करितां अश्रुजीवनें ।
स्नान शवा घातलें. ॥४६॥

राजा म्हणे, 'अवो कांते ! ।
शोक करितां न पुरे येथें ।
मागूनि आज्ञा अंत्यजातें ।
अग्नि देऊं बाळका. ॥४७॥

'मी येई तंववरी स्मशाना ।
राहोनि, रक्षावें नंदना ।
आतांचि पुसोनियां वचना ।
येथें येईन अविलंबें.' ॥४८॥

ऐसें सांगुनी नरभूषण ।
जातांची पातला तपोधन[3] ।
म्हणे, 'माये ! हें प्रेत जाण ।
धरुनी[4] राहाणें किमर्थ ? ॥४९॥

निशीमाजी तूं एकटी ।
शवासहित स्मशानपोटीं[5] ।
श्वापदपिशाचांची[6] घरटी ।
मांस भक्षू येईल. ॥५०॥

शेखीं तुझिया जिवा नाशू ।
राहतां घडेल निःशेषू ।
पैल देवालयीं चंडांशू ।
उदया ये, तों बैसावें.' ॥५१॥

करें दाविलें देवालय ।
शवा घेउनी गेली माय ।
विश्वामित्रें नवल काय ।
येउनी केलें तें ऐका. ॥५२॥

घोर निद्रा लाविली[7] तीतें ।
प्रेत फाडुनी काढिलीं आंतें ।
रक्तें थबथबित[8] हातें ।
मातृवदनीं घातलीं. ॥५३॥

मांसरक्ताचा सडा ।
विखरोनि सांडिला[9] चहुंकडां ।
चूर्णकज्जल तोंडा ।
चर्चुनी केली बीभत्स. ॥५४॥

आपण जाउनी नगरमुखा ।
शंख करुनी मारी हाका ।
'कपाट[10] उघडीं नरनायका ! ।
लांव पाठीं[11] लागली.' ॥५५॥

क्षुद्रकपाटें घेतला आंतू ।
वृत्तांत पुसती राजदूतू ।
येरू म्हणे, 'माझा मृत्यू ।
होत[12] होता, वांचलों. ॥५६॥

या नगरांतूनि राक्षसी ।
भक्षीत आली बाळकासी[13] ।
माझे लागतां[14] पाठीशीं ।
पळोन आलों लगबगां. ॥५७॥

---

१. पाठ–तूं कवण, कवणाचा ? मानसीं । कळलें पाहिजे माझिया. २. पाठ–शोकें रडतां. ३. पाठ–ब्राह्मण. ४. पाठ–घेऊनि. ५. पाठ–स्मशानवाटीं. ६ पाठ–श्वापदपिशाचांचीं घरटीं । मांस भक्षूं येतील. ७. पाठ–लागली तियेतें. ८. पाठ–लवथवित. ९. पाठ–टाकिला. १०. पाठ–कपाटें. ११. पाठ–पाठीं पै लागे. १२. पाठ–होतां होतां चूकला. १३. पाठ–आम्हांसी. १४. पाठ–लागली.

बाळका भक्षीत देउळीं ।
जातां प्रत्यक्ष देखाल डोळीं' ।
तंव राजदूत[1] दीपिकाजाळीं ।
पाहों[2] आले सत्वर. ॥५८॥

नगरीं प्रगट जाली मात ।
जनलोक शस्त्रेंसीं धांवत ।
परी कोण्ही देउळाआंत ।
निर्भय चित्तें न रिघे. ॥५९॥

दुरूनि टाकिती पाषाणा ।
मुखें करिती गाढ[3] गर्जना ।
शस्त्रें परजुनी नाना[4] ।
भाव दाविती शौर्याचे. ॥६०॥

तैलदीपिका धरुनी हातीं[5] ।
देउळीं रिघोनी धीर[6] सुभटीं ।
वेणी[7] धरुनी फरफराटीं ।
वोढूनि बाहेर[8] आणिती. ॥६१॥

देउळाभीतरीं[9] मांसखंडें ।
पसरलीं दिसती चहुंकडे ।
गळतरक्त[10] आंतडें ।
मुखामाजी लांबेच्या. ॥६२॥

उभय दंडें कसुनी दूतीं[11] ।
दंडें दंडीत[12] नगरपंथीं ।
आणिली, तंव मार्तंडदीप्ती ।
प्रकाशली नभांत.[13] ॥६३॥

मात जाणविली रायासी, ।
'आम्हीं बळें धरिली राक्षसी ।
आतां इची आज्ञा कायशी ? ।
ते आम्हासी निवेदा.' ॥६४॥

राजा अविचारी[14] बुद्धिमंद ।
म्हणे, करूनि दृढ बंध ।
नगरा[15] भोंवडूनि, शिरच्छेद ।
करा इचा अविलंबें.' ॥६५॥

दूतीं मस्तकीं शेंदूर ।
भरुनी, फिरविली नगर ।
पाहों[16] आले नारी नर ।
बाळतरुणवृद्धादि. ॥६६॥

एक म्हणती, 'हे खेचरी ।
आम्हीं देखिली कौशिकघरीं ।
अन्नसत्रीं पाक करी ।
ते हे होय निर्धारें. ॥६७॥

इचे करींचें अन्न जेविलों ।
मरत मरत मी वांचलों' ।
दुजा[17] म्हणे, 'मी पडिलों ।
दुखणियां षण्मास.'[18] ॥६८॥

एक म्हणे, माझें बाळ ।
इणेंचि भक्षिलें वेल्हाळ' ।
दुजा[19] म्हणे, 'हे आळोआळ ।
भक्षीत फिरे बाळकां.' ॥६९॥

---

१. पाठ–राजदूतीं दीपिका उजळी. २. पाठ–पाहों गेले त्या स्थळा. ३. पाठ–गड. ४. पाठ–जाणा. ५. पाठ–मुष्टी. ६. पाठ–धीट; धैर्यगती. ७. पाठ–कुरळीं धरूनि तारामती. ८. पाठ–आणिली बाहेरी. ९. पाठ–देउळागर्भीं. १०. पाठ–गळत रक्तेंशीं. ११. पाठ–हातीं. १२ पाठ–दंडोनां उराप्रती; दंडित पुराप्रती. १३. पाठ–नभःपर्थी; नभातें. १४. पाठ–अतिचारी; अविचारबुद्धी मंद. १५. पाठ–दुर्गा भवंडुनियां छेद. १६. पाठ–पहावया मिनले. १७. पाठ–एक. १८. पाठ–एक मासवरी. १९. पाठ–एक.

असो जनाची चाउटी[१] ।
फिरवुनी आणिली गंगातटीं ।
वीरबाहू[२] शस्त्र मुष्टी ।
देउनी धाडी सेवका. ॥७०॥

स्नान घालूनि गंगाजळें ।
उभी केली अधोमौळें ।
निजवल्लभें शस्त्रतेजाळें[४] ।
काढुनी अंचळें पुशिलें. ॥७१॥

सत्त्व पहावया गगनीं ।
गण[५] गंधर्व निर्जर मुनी ।
सतियांसहित[६] विमानीं ।
कौतुक पाहों पातले. ॥७२॥

सुवर्णेसी[७] सहस्रकिरण ।
सहरोहिणी[८] निशारमण ।
स्वाहास्वधेशीं उभयवदन ।
समीरवरुणधनदादी. ॥७३॥

शचीसहित[९] वज्रपाणी ।
धर्मसंगीं संयमिनी[१०] ।
मुनिसंगें मुनिभामिनी ।
विमानयानीं पाहती. ॥७४॥

सहतारा बृहस्पती ।
वशिष्ठऋषि अरुंधती ।
अत्रीसह[११] अनसुया सती ।
सत्त्व पाहों पातली.[१२] ॥७५॥

रमेसहित मदनारीमित्र ।
सहसावित्री चतुर्वक्त्र[१३] ।
उमेसहित विषमनेत्र[१४] ।
पाहाती सत्त्व सतीचें. ॥७६॥

नृपसत्त्वद्रुमाच्या मूळीं ।
वसिष्ठ वोपी सुकृतांजली. ।
तया तोयें शाखा पूर्ण ब्राहाळी[१५] ।
कवळूनि, जाती चिद्गगनीं.[१६] ॥७७॥

वैकुंठकैलासब्रह्मपदें ।
ऐशिया[१७] फळीं फळला स्वादें ।
स्वयें तृप्त स्वानंदबोधें ।
चाड न धरी तयांची. ॥७८॥

तंव दूत म्हणती, 'खेचरी ! ।
आतां कुलदेवतास्मरण करीं ।
जयाची[१८] इच्छा पूर्ण अंतरीं ।
चिंतन करीं तयाचें.' ॥७९॥

सुकुमार चैमुनी पद्मासनीं ।
स्वरूपमुद्रा लाविली ध्यानीं[१९] ।
हृदयीं स्मरोनी चक्रपाणी ।
काय बोले कुरुवर्या ! ॥८०॥

म्हणे, 'आतां जन्मची नसावा[२०] ।
प्रारब्ध[२१] भोगवी जरी जीवा ।
तरी मागणें हेंचि देवा ! ।
जन्मोजन्मीं इच्छितें. ॥८१॥

---

१. पाठ-वटवटी. २. पाठ-वीरबाहूनें खड्गमुष्टी । देऊनि धाडिलें सेवका. ३. पाठ-आणुनी मेळे. ४. पाठ-शास्त्रजाळें. ५. पाठ-उमे. ६. पाठ-सर्वांसहित विमनयानीं; सर्वांसहित नारदमुनी. ७. पाठ-अरुणासहित. ८. पाठ-सरोहिणी शार्वरीरमण । स्वाहास्वधेसी उभयनयन. ९. पाठ-शचीरमण. १०. पाठ-जैमिनी; सत्यमनी. ११. पाठ-अत्रिऋषिचो. १२. समग्र ओवीचा पाठभेद-सहतारेंसीं वाचस्पति । वशिष्ट आणि अरुंधती । अत्रीसहित अनुसुया सती । सत्व पाहों पातल्या. १३. पाठ-चत्वारि वक्त्र. १४. पाठ-त्रिनयन. १५. पाठ-बाहाळी. १६. पाठ-चिद्गना. १७. पाठ-ऐशीं फळें आलीं स्वादें । परी स्वयंतृप्तीच्या स्वानंदबोधें । चाड न धरी त्या फळा. १८. पाठ-जे इच्छा असेल उदरीं. १९. पाठ-नयनीं. २०. पाठ--सरावा. २१. पाठ-प्रारब्धें भोगविलें या जीवा.

हरिश्चंद्रासारिखा कांत ।
रोहिदासासारिखा सुत ।
कुलगुरु अरुंधतीनाथ ।
जन्मोजन्मीं असावा. ॥८२॥

प्रतिसृष्टीचा अपरधाता ।
तपोतेजें तीव्र सविता ।
तोचि जन्मोजन्मीं मागता ।
याचक असो कौशिक.’’[1] ॥८३॥

ऐसें बोलोनि नृपभामिनी ।
हनना वोढवी[2] मूर्धी ।
शस्त्र पडावें तंव[3] ते क्षणीं ।
विश्वामित्र धांविन्नला. ॥८४॥

वल्कलवसनें जटाधारी ।
विभूति[4] चर्चूनी शरीरीं ।
हुताशन नेत्रीं मिरवे, करीं ।
दंडकमंडलू साजिरा.[5] ॥८५॥

शुद्धसत्त्वकळाषोडशीं ।
पूर्ण देखोनी नृपशशी ।
कौशिकहृदयपूर्णसिंधूसी[6] ।
प्रेमभरतें[7] दाटलें. ॥८६॥

प्रतिज्ञा लंघुनी वल्लरी ।
नयनीं लोटल्या अश्रुलहरी ।
उदित हातें वरिच्यावरी ।
शस्त्र धांवोनि[8] धरियेलें. ॥८७॥

कौशिककृपेच्या वरदवातें ।
डोलती विबुधपारिजातें[9] ।
सुकृतसुमनें परागभरितें ।
राजमुकुटीं वर्षती.[10] ॥८८॥

हरिश्चंद्रराजा तारामती ।
आवडी कौशिकें धरूनी हातीं ।
मातृजनकाचिये पंक्ती ।
रोहिदासा[11] बैसविलें. ॥८९॥

त्रिवर्ग बैसवूनी निकटीं ।
मूर्धी कवळोनी धरिलीं पोटीं ।
सुधाकरें[12] थापटी पाठी ।
धरुनी हनुवटी सप्रेमें. ॥९०॥

निज तपाच्या मौक्तिकें ।
तिघां शेस भरी कौतुकें ।
जयजयकारें सृष्टिजनकें ।
हर्षे टाळी पीटिली. ॥९१॥

‘राजा, कुमर, कांता तिन्ही’ ।
विबुध म्हणती, ‘स्वर्गभुवनीं[13] ।
विमानीं वाहुनी नेऊं’ तव[14] मुनी ।
म्हणे, ‘ऐका[15] देव ! हो ! ॥९२॥

स्वर्गसुखाचीं अचळ फळें ।
अंचळीं बांधिलीं तपोबळें ।
परी शरीरदुःखाच्या[16] अनळें ।
देह जालें जर्जर. ॥९३॥

---

१. पाठ–समग्र ओवीचा अन्य पाठ–तोची जन्मोजन्मीं मागता । याचक कौशिक असो पुरता । जन्मोजन्मीं जननी ताता । हेचि विधात्या ! असों दे. २. पाठ–वोपिला निज मूर्धी. ३. पाठ–तत्. ४. पाठ–तप्तहाटकतनु साजिरी. ५. पाठ–सुंदर,शोभला. ६. पाठ–सिंधुवेळेंसी. ७. पाठ–मोहोभरतें. ८. पाठ–जाऊनि वारिलें. ९. पाठ–विबुद्ध. १०. समग्र ओवीचा पाठभेद–कौशिककृपेचा वरदवात । डोलतां विबुधपारिजात । सुकृतसुमनें परागभरित । राजमुकुटीं वर्षती. ११.पाठ–रोहिदास बैसविला. १२. पाठ–शुद्धा करें. १३. पाठ–विमानयानीं. १४.पाठ–म्हणतां. १५.पाठ–ऐसें कां देव हो ! १६. पाठ–शरीरक्लेशाच्या; क्लेशदुःखाचिया.

राज्यहानीची काळिमा ।
लागलीसे मज उत्तमा ।
ते क्षाळुनी[1] स्वर्गधामा ।
आरूढवीन[2] ययांतें. ॥९४॥

उमा रमा सावित्री सती ।
लोपामुद्रा[3] अरुंधती ।
आपुलीं पुण्यें तारामती- ।
प्रति[4] वोपिती चोळिया.[5] ॥९५॥

विमानीं आरुढोनी[6] सुरवर ।
गेले, करुनी जयजयकार ।
तिघां घेऊनि ऋषीश्वर ।
निघता झाला अयोध्ये. ॥९६॥

वीरबाहू येउनी पुढें ।
नृपा हाकी तोलोनि दंडें ।
'माझा दूत[7] नेतां, तोंड ।
हाणोनि[8] फोडीन सर्वथा.' ॥९७॥

जाणोनि[9] अंत्यजाची अटक ।
पातला देवर्षिनायक ।
म्हणे, 'हा सवित्याचा बाळक ।
ऋषिशापें अंत्यज. ॥९८॥

पातली शापपरिहारवेळा[10] ।
यालागीं धाविन्नला[11] उतावळा ।
मुक्त करुनी प्रेतपाळा ।
बोळवावें स्वधामा.'[12] ॥९९॥

नारदवचनें गाधिजमुनी ।
दिव्यदेही दंडपाणी ।
करूनि,[13] बैसवी विमानीं ।
तपाचिया सामर्थ्यें. ॥१००॥

निमिष न लागतां सत्वर ।
नृप कांतासहितकुमर ।
तिघां घेउनी ऋषीश्वर ।
अयोध्यापुरा पातला. ॥१०१॥

प्रजां जाणविली मात ।
ऐकूनि सकळां[14] आल्हाद बहुत ।
जेंवी का मृतालागीं अमृत- ।
पान घडलें प्रारब्धें. ॥१०२॥

नगर श्रृंगारिलें मनोहर ।
वाद्यनादें गर्जे अंबर ।
नाना वहनी नारी नर ।
वळघोनी येती सामोरे. ॥१०३॥

वसनें भूषणें दिव्य सुमनें ।
छत्र चामर शिबिकायानें[15] ।
अश्वकुंजररथादि वाहनें ।
श्रृंगारुनि आणिलीं. ॥१०४॥

मुकुट कुंडलं कटिमेखला[16] ।
रत्नकंकणें दिव्यें दुकळा[17] ।
वाहोनियां[18] नृपाळा ।
कुमरदारऋषिसमवेत.[19] ॥१०५॥

---

१. पाठ–सारूनि, स्वकीय धामा. २. पाठ–रूढ करीन. ३. पाठ–तारा पुलोमा अरुंधती. ४. पाठ–प्रीति. ५. पाठ–कांचोलिये. ६. पाठ–विमानें वाहोनी. ७. पाठ–भृत्य. ८. पाठ–फोडीन आतां निघातें. ९. पाठ–ऋषी विचारी नावेक. १०. पाठ–शापहरणवेळा; शापापहारवेळ. ११. पाठ–धांवलासे दयाळ. १२. पाठ–स्वर्गासी; स्वर्गेस्था. १३. पाठ–करूनि धाढिला स्वर्गभुवनीं; करोनि धाडी स्वर्गासनीं. १४. पाठ–सकळ आनंदभरित. १५. पाठ–शिबिकासनें. १६. पाठ–मेखळामाळा. १७. पाठ–केयूर कंकणें दिव्य दुकुळा. १८. पाठ–वोपोनिया. १९. पाठ–कुमरदारा ऋषींसीं.

मंगळ वाद्यें वाजती[1] पुढें ।
वेष्टित चालिले वीर गाढे ।
भाट गर्जती पुढें पवाडे ।
वाडेंकोडें नृपाचे. ॥१०६॥

नगरद्वारप्रवेशकाळीं ।
द्विजां[2] वोपिल्या द्रव्यांजली[3] ।
पुढें चालतां राजमौळीं ।
सुमनें वर्षती जनजाया. ॥१०७॥

मंगल आरतिया घेउनी करीं ।
पुढें धांवलिया[4] नगरनारी ।
रायें सुमनांचे संभारीं ।
मेघ[5] केला कनकाचा. ॥१०८॥

शरत्काळींच्या निशारमणें ।
शोभा दाविजे उडुगणें ।
तेंवी तारानाथ, पुरजनें ।
वेष्टित, आला मंदिरा. ॥१०९॥

राजमंदिराची शोभा ।
काय वर्णू ? भूवल्लभा ! ।
सौंदर्यगिरीचिया गर्भा ।
कोरूनि[6] जैसें निर्मिलें. ॥११०॥

सर्व संपदाभरित ।
आशें रक्षिलें अचुंबित ।
तया मंदिरीं नृपनाथ ।
विश्वामित्रें आणिला. ॥१११॥

छपन्न देशींचे राजेश्वर ।
शाण्णव कुळींचे राजकुमर ।
आले[7] आणि ऋषीश्वर ।
विश्वामित्रें आणिले. ॥११२॥

वर्षाकाळीं सरिताओघ ।
सागरा येती[8] करीत वेग ।
तेंवी संपदा घेउनी जग ।
भेटों आलें गुणाब्धी. ॥११३॥

कौशिककोप राजोत्तमा ।
मिळणी झाली तेचि अमा[9] ।
अंतर बीजेचा महिमा ।
सखोल शशीदर्शनें.[10] ॥११४॥

तेंवी तो नरनाथशशी ।
पाहावया[11] हेतु सर्वांसीं ।
अयोध्यापुरप्रदेशीं ।
अष्टौ दिशा रोधिल्या. ॥११५॥

रथकुंजरांचे थाट ।
पुढें वाद्यांचे बोभाट[12] ।
उंच स्वरें गर्जती भाट ।
वर्णिती यश रायाचें. ॥११६॥

ऐशिया परी राजनृपति ।
देखोनी आल्हाद सर्वांप्रती[13] ।
राजा,[14] कुमार, तारामती ।
राज्यपदीं[15] स्थापिलीं. ॥११७॥

---

१. पाठ–गर्जती. २. पाठ–याचकां. ३. पाठ–दिव्यांजली. ४. पाठ–आल्या. ५. पाठ–वोघ केला हाटकाचा. ६. पाठ–कोरोनि कीजे ज्यापरी. ७. पाठ–आणिक कित्येक. ८. पाठ–येतां करिती वेग. ९. पाठ–नेत्रीं आम्हां. १०. पाठ–सुखोल्हास दर्शनीं. ११. पाठ–पाहावा हा हेत. १२. पाठ–घडघडाट; बोभाट. १३. पाठ–सर्वां चित्तीं. १४. पाठ–सहजावाद्भुत-नृपती. १५. पाठ–दिव्य पीठीं; राज्यपट्टीं.

## उपसंहार

राज्यीं[1] स्थापूनि तारारमणा ।
कौशिक गेला स्वर्गभुवना ।
ऐसे क्लेश कुरुनंदना ![2] ।
कोणें भोगिले सांग पां ? ॥ १ ॥

धनंजयासारिखा बंधु ।
द्रौपदी[3] ऐसी पवित्र वधू ।
भीम तरी धैर्यसिंधु ।
जाऊं नेदी सत्त्वासी ॥ २ ॥

धर्मराज[4] स्वधर्मपाळ[5] ।
लागों नेदी दरिद्राचळ ।
सारथी तरी वैकुंठपाळ ।
काय क्लेश तुम्हांतें ? ॥ ३ ॥

ऐकूनि बृहदश्वाचें उत्तर ।
चमत्कारला युधिष्ठिर ।
म्हणे, 'धन्य ! धन्य ! त्रिशंकुकुमर[6] ।
कीर्ति अपार तयाची.'[7] ॥ ४ ॥

असो हरिश्चंद्राचें आख्यान ।
श्रवणीं ऐकावें चित्त देऊन ।
ऋषी म्हणे, 'सावधान ।
कथा ऐकें गुणज्ञा!'[8] ॥ ५ ॥

इति श्रीवनपर्व[9] भारत ।
मुक्तेश्वरकविविरचित ।
सर्व[10] दोष दवडोनि देत ।
सुखसायुज्य श्रोतयां. ॥ ६ ॥

—××—

## ११. एकनाथचरित्र.

ॐ[11] नमो जी ! विश्वंभरू ।
तो देव दत्तात्रय जगद्गुरू ।
जनार्दना अभयकरू[12] ।
कटाक्षेंशीं बाणला. ॥ १ ॥

त्याचे चरणीं एकनाथें ।
सुमन ठेविलें पुरुषार्थें ।
सेवा आरंभिली भावार्थें ।
'जनीं जनार्दन' म्हणवुनी. ॥ २ ॥

एकाजनार्दनाच्या महिमा ।
गूढार्थ वाटे पुराणागमा ।
शमदमकरुणेची सीमा ।
पूर्ण गरिमा वाढली. ॥ ३ ॥

जो स्वयें जगद्गुरू ।
नेणें विधीचा अवतारू ।
किंवा ऐसे परीचे हरिहरू ।
धरिती अवतारू भक्तांलागीं. ॥ ४ ॥

---

१. पाठ–पदीं; पट्टीं. २. पाठ–कुरुभूषणा. ३. पाठ–सवें द्रौपदी सकुमार वधू. ४. पाठ–यादवराज. ५. पाठ–सत्वपाळ. ६. पाठ–जन्मले कुमर. ७. पाठ–रायांची; तयांचीं. ८. पाठ–पुढारीं; या समग्र ओवीचे अन्य पाठ–असो हरिश्चंद्राचें कथन । पुढें तीर्थयात्रा निरोपण । वैशंपायन म्हणे सावधान । कथा ऐकें गुणज्ञा !; असो हरिश्चंद्राचें कथन । पुढें यक्षाचें निरोपण । ऋषी म्हणे सावधान । कथा ऐक गुणज्ञा ! ९. पाठ–शांतिपर्व. १०. पाठ–श्रोते होवोनि सावचित्त । श्रवण केलें पाहिजे. ११. काही पोथ्यांत पहिल्या चार ओव्यांच्या ऐवजी पुढील ओवी आढळते–प्रतिष्ठानीं एकनाथ । अवतार मूर्तिमंत । ज्याचे गृहीं श्रीभगवंत । सेवा करी निजांगें. ॥ १२. पाठ–आभयंकरू.

गंगातीरीं[1] अतिपावन ।
विख्यात जगीं प्रतिष्ठान ।
तेथें[2] एकनाथ राहून ।
ब्राह्मणपूजन करितसे. ॥ ५ ॥

पूर्ण गुरुभक्तीचा सागर ।
भक्तीनें तोषविला रमावर ।
सदा वसवी त्याचें घर ।
गोदातीर अतिपावन. ॥ ६ ॥

अवलंबिलें सदावर्त ।
समयीं आलिया अभ्यागत ।
भोजन[3] देऊन इच्छा तृप्त ।
पूजा करी मनोभावें. ॥ ७ ॥

ऐसी जाणोनि तयाची स्थिती ।
रमारमणें मांडिली ख्याती ।
ब्राह्मणवेशें श्रीपती ।
द्वारकेहुनी पातले.[4] ॥ ८ ॥

भक्तसाह्यार्थी धाविन्नला ।
येउनी अगणीं उभा ठेला ।
एकनाथें दृष्टीं देखिला ।
सकृप जाला तत्काळ.[5] ॥ ९ ॥

ब्राह्मण बोले मंजुळ वचन ।
'दर्शनें तृप्त जालों तुमचेन ।
कांहीं काळ सेवा करीन ।
तुमची स्वामी ! आदरें. ॥१०॥

ऐक बापा ! एकनाथा ! ।
तुझिया सेवेसी रहावें आतां ।
ऐसी आवडी असे चित्ता ।
अनुग्रह आतां[6] मज कीजे. ॥११॥

मज नलगे सर्वथा वेतन ।
उदरापुरतें[7] पाहिजे अन्न ।
वस्त्रें[8] द्यावीं जीर्णजीर्ण ।
सेवा करीन निशिदिनीं.' ॥१२॥

मग एकनाथ बोलिले ।
'नाम सांगिजे आपुलें' ।
'परिग्रह काय ?' पुसियलें ।
'येणें जालें कोठोनी ?' ॥१३॥

येरू म्हणे, 'जी ! ऐका ।
माझा परिग्रह मीच इतुका ।
कृष्ण नाम ऐसें देखा ।
आहें ठाउका मी जनासी. ॥१४॥

तुझी कीर्ति आयकोनी श्रवणीं ।
या स्थळा आलों धावोनी ।
तुझिये सेवेलागोनी ।
निष्काम बुद्धी करूनियां.' ॥१५॥

ऐसें बोलोनि तये वेळां ।
श्रीहरि सेवेसी लागला ।
कावडी[8] भरूनि गंगाजळा ।
आपण आंगें पैं आणी. ॥१६॥

जीवन[9] वाहे जगज्जीवन ।
संपूर्ण भरी रांजण ।
ब्राह्मणालागीं सुचंदन ।
उगाळुनी ठेवितसे. ॥१७॥

१. पाठ-गंगातीर. २. पाठ-एकनाथ अभिधान जाण । ब्राह्मणभजन करीतसे. ॥ ३. पाठ-भोजन द्यावें इच्छाभूत । प्रीति बहुत अनाथीं. ॥ ४. पाठभेद समग्र ओवीचा-ऐसी जाणोनि तद्वृत्ति । द्वारकेहूनि आले श्रीपति । ब्राह्मणवेशें सेवेप्रती । भक्तसाह्यार्थी पावला. ॥ ५. समग्र ओवीचा पाठभेद-येरू उभा असे आंगणीं । ब्राह्मण भक्त शाङ्‌र्गपाणी । बोल बोलविती त्याचे वचनी । नम्र होउनीयां पैं देखा. ॥ ६. पाठ-तत्त्वतां. ७. पाठ-उदराप्रती. ८. पाठ-वस्त्र मात्र निर्वाहा जाण । केलिया आपण सेवेसी राहूं. ॥ ८. पाठ-कावडी घेऊनियां वहिला । चक्रपाणी जळ आणीतसे. ॥ ९. पाठ-स्वयें वाहातसे जीवन.

धोत्रेंपात्रें धूतसे पाहीं ।
सेवेसी सादर सर्वा ठायीं ।
देवपूजेचे समयीं ।
समीप लवलाहीं तिष्ठत. ॥१८॥

घागरी भरूनिया गंगाजळ ।
सुशीतळ आणि निर्मळ ।
ब्राह्मणाप्रती एक वेळ ।
पात्रें सकळ दे भरूनी. ॥१९॥

ऐसा तत्पर सर्वा ठायीं ।
आंग चोरूं नेणे कांहीं ।
देहधर्माची[1] वार्ता नाहीं ।
आनंद पाही सर्वदा. ॥२०॥

ऐसें द्वादश वर्षेंपर्यंत ।
अवलंबें[2] सेवा करीत ।
भक्तसाहाकारी भगवंत ।
राहटत असे निशिदिनीं. ॥२१॥

येरीकडे द्वारकेसी ।
ब्राह्मण[3] आला सद्भावेंसी ।
तप आचरावें सायासी ।
म्हणोनि पाहे सिद्धस्थान. ॥२२॥

कृष्णकृपेची आनंदलहरी ।
मोक्षसिद्धि वैकुंठास दुसरी ।
नगर रचिलें गोमतीतीरीं ।
अतिउत्तम द्वारका. ॥२३॥

गोमतीतीरीं तुळसीवन ।
श्रीवृक्षातळीं घालुनी आसन ।
सुमनीं पुजूनि श्रीचरण ।
मनीं ध्यान कृष्णाचें.[4] ॥२४॥

आहारनेम[5] अनुष्ठान ।
मुखें स्मरे 'कृष्ण कृष्ण,' ।
हरिच्छंदें परिपूर्ण ।
निजध्यास ब्राह्मणा. ॥२५॥

एकाग्र करूनियां मन ।
आणि शीत, उष्ण साहून ।
हृदयीं धरितां भगवान ।
जगज्जीवन कळवळिला. ॥२६॥

ऐसें द्वादशवर्षेंपर्यंत ।
भावें भजता भगवंत ।
प्रसन्न होऊनी, स्वप्नांत ।
मात सांगे ब्राह्मणा. ॥२७॥

'तूं जयालागीं तप करिसी ।
तो येथें नाहीं द्वारकेशी ।
प्रतिष्ठानीं सुखवासी ।
भक्तापाशीं राहिला. ॥२८॥

१. पाठ-देहश्रमाचा. २. पाठ-आश्रमें. ३. पाठ-ब्राह्मण येक तापसी । गौतमीसंगमीं करी तपासी । अति मानसीं भेटीचें. ॥ ४. पाठभेद ओवीचा-भावें करितां अनुष्ठान । गौतमीतीरीं घातलें आसन । आवडी हेचि पूर्ण । कृष्णदर्शन मज देई. ॥ ५. काही पोथ्यांत २५ ते २९ ओव्यां ऐवजी पुढील ओव्या आढळतात : तया थोर दर्शनाचें आर्त । आवडी लागली जीवांत । केव्हां भेटेल श्रीकृष्णनाथ । तप करी पूर्ण निष्ठा. ॥ बारा वर्षे तप जाण । भावें करितां अनुष्ठान । अवचित जालें स्वप्न । सांगे ब्राह्मण निद्रेमाजी. ॥ जयालागीं श्रम करिसी । आणूनि ध्यानीं उपवासी । तो तंव नाहीं द्वारकेसी । दर्शन मागसी कोणाचें ? गंगातीरीं प्रतिष्ठान । तेथें एकनाथ जनार्दन । महासाधु ज्ञानसंपन्न । अन्नदान सर्वां भूतीं. ॥ त्याचिये निज माहार्थी । भावें राहिलों तयापाशीं । सेवा करीं दिवानिशीं । भक्तप्रेमासी भूललों ॥ निरंतर असें तयाजवळी । ऐसी सेवा असे लाविली । बारा वर्षें पैं लोटिली । तया स्थळीं राहिलों. ॥

प्रतिष्ठानीं एकनाथ ।
अवतार स्वयें मूर्तिमंत ।
त्याचे घरीं मी निभ्रांत ।
सेवेलागीं तिष्ठलों.' ॥२९॥

नामें 'श्रीखंड्याकृष्ण,' ।
सांगितली निजखूण ।
जागृत होऊनी ब्राह्मण ।
स्वप्न क्षणक्षणा आठवी. ॥३०॥

'नवल देखिलें स्वप्नांत, ।
कैसा भक्त एकनाथ !' ।
मनीं होतसे विस्मित ।
'श्रीभगवंत करी सेवा.' ॥३१॥

उठोनी वैसे आसनीं ।
'कृष्ण, कृष्ण' गर्जे वाणी ।
आनंद न समाये गगनीं ।
जाला मनीं विस्मित. ॥३२॥

'धन्य ! धन्य ! एकनाथ, ।
सर्वाभूतीं भगवत ।
ऐसें आचरतां रमाकांत ।
सुखावलों तें ठायीं.' ॥३३॥

म्हणवून चालिला त्वरेन ।
'केव्हां पाहीन पैठण ? ।
केव्हां देखेन एकाजनार्दन ?' ।
तातडी मोठी दर्शनाची. ॥३४॥

मार्गीं चालिला अतित्वरा ।
सवेग पावला गंगातीरा ।
तंव कावडी घेउनी सामोरा ।
देखिला सोयरा जगाचा. ॥३५॥

तापसी पाहे न्याहाळून ।
जीवना आला जगजीवन ।
अज्ञानयोगें[1] जालें दर्शन- ।
समाधान तापसा. ॥३६॥

देवें तापसासी देखिलें ।
'याचें आगमन नव्हे भलें ।
येथुनी गमन पाहिजे केलें ।
प्रगट करील तापसी.' ॥३७॥

तंव ब्राह्मण तापसी ।
पुसता झाला आदरेंसी ।
'काय नाम जी ! तुम्हांसी ? ।
एकनाथासी जाणतां ?' ॥३८॥

आयकोनी अवश्य चालिला ।
कावडी भरोनियां जळा ।
कांहीं न बोले, उगाच राहिला ।
जंव बोलिला तापसी. ॥३९॥

देव म्हणे,'कोणा पुससी ? ।
मोठा अनुष्ठानी आलासी ! ।
शोधानि पाहें नगरासी' ।
म्हणोनी कावडसीं चालिला. ॥४०॥

'या गा ! प्रतिष्ठानाआंत ।
ज्यासी म्हणती एकनाथ ।
तयाचा आश्रम निश्चित ।
सांगें त्वरित मजपाशीं.' ॥४१॥

कावडो घेवोनियां त्वरित ।
देव चालिला त्वरें बहुत ।
मग तपस्वी विचारीत ।
'मी येथें आलों दर्शना. ॥४२॥

---

१. पाठ-ज्ञानयोगें.

तरी वेगें जाऊनियां आपण ।
आधीं घेऊं कृष्णदर्शन, ।
मग करूं गंगास्नान,' ।
म्हणोनी वंदन पैं केलें. ॥४३॥

वंदुनियां गंगाजळा ।
नगरामाजी उतावेळा ।
पातला एकनाथाच्या राउळा ।
विश्रांति सकळां जे ठायीं. ॥४४॥

आंगणीं येतां तापसी ।
एकनाथें देखिलें त्यासी ।
मग उठोनियां आदरेंसी ।
नमन तयासी पैं केलें. ॥४५॥

म्हणे तो,'अहा! जी! तपोनिधि! ब्राह्मणा!
बसा करूं द्या पूजना' ।
येरू म्हणे, आहे[१] विज्ञापना ।
श्रीकृष्णदर्शन मज करीं. ॥४६॥

मी आलों द्वारकेहुनी ।
गोमतीसंगमीं अनुष्ठानी ।
मनीं आवडी धरूनी ।
कृष्ण भेटवीं लवकरीं.' ॥४७॥

मग बोलिजे एकनाथें ।
'त्याविण काय आहे रितें ।
सर्वत्र व्यापिलें जेथिचें तेथें ।
पाहा, पाहा लक्षुनी. ॥४८॥

अरे! या विश्वामाजीं पाहीं, ।
विश्वीं विश्वामाजीं भेद नाहीं ।
विश्वामाजीं असे तोही ।
जो का विश्व आपणची. ॥४९॥

तेथें वेगळेपणें कैंचा ।
भेद कल्पिसी दर्शनाचा ? ।
दर्शन द्रष्टा[२] मालविली वाचा, ।
मग दृश्याचा विचार करीं.' ॥५०॥

तापसी बोलतसे, 'पाहीं ।
हें आत्मज्ञान सांगसी काई ।
आवडी धरूनियां जीवीं ।
आलों पाहीं या ठायीं. ॥५१॥

'प्रत्यक्ष होईल दर्शन' ।
स्वप्नीं सांगितली हे खूण, ।
कृष्णश्रीखंड्या जाण कवण ।
आहे तुमच्या घरीं ? ॥५२॥

वेगीं करीं दर्शन ।
नाहीं तरी त्यजीन प्राण' ।
ऐसें वचन ऐकोनि निर्वाण ।
ब्राह्मण आसनीं बैसविला. ॥५३॥

एकनाथ म्हणती शिष्यासी ।
'वेगीं पाचारा कृष्णासी ।
आतां भरूनी कावडीसी ।
गंगाजळासी आणिलें. ॥५४॥

पहा असेल देवघरीं ।
किंवा पाकशाळेभीतरीं ।
अथवा उपरीवरी ।
चारी स्थळें शोधावीं.' ॥५५॥

शिष्य पाहती त्वरित ।
तंव अदृश्य जाला जेथचा तेथ ।
ऐसें जाणोनी एकनाथ ।
आलापीत कृष्णासी. ॥५६॥

---

१. पाठ-नाहीं करुणा. २. पाठ-मावळे ठायींचा.

'जयजयाजी ! जगज्जीवना ! ।
जगव्यापका ! जनार्दना ! ।
जगपाळका ! जगनयना ! ।
जगतारणा ! सद्गुरु ! ॥'५७॥

कृष्णा ! कान्हा ! कमलनयना ! ।
वासुदेवा ! मधुसूदना ! ।
धावें, पावें मनमोहना ! ।
तपोनिधि तिष्ठतसे. ॥'५८॥

विश्वव्यापका ! अनंता ! ।
दीनानाथा ! कृपावंता ! ।
करुणाघना ! भगवंता ! ।
धांव, पाव ये काळीं. ॥'५९॥

श्रीवत्सलांच्छना ! वनमाळी ! ।
ब्रीद आपुलें सांभाळीं ।
तूंच वत्सातें न्याहाळीं ।
करुणा द्विजावरी करावी. ॥६०॥

तूं तरी करुणेचा सागर ।
नांदसी हृदयीं निरंतर ।
तापसी तुझ्या दर्शनासी आतुर ।
होऊनी आंगणीं तिष्ठतसे. ॥६१॥

तूं जरी न देशील दर्शन ।
तापसी त्यजील आपुला प्राण ।
हें शरीरही त्याकारण ।
मी त्यजीन निर्धारें. ॥६२॥

सत्वर यावें जगन्नाथा ! ।
भक्तजनासी तूं मातापिता ।
तापसासी दर्शन देई आतां ।
गुणातीता ! गुणालया ! ॥६३॥

आजी ! गेलासी कवण्या ठायां ? ।
ब्राह्मण बैसला जीव द्यावया ।
दर्शन न होतां, काया ।
जाईल विलया जाण[१] पां.' ॥६४॥

ऐकोनी एकाजनार्दनाची वाणी ।
हृदयीं द्रवला चक्रपाणी ।
दोन्ही कर माखिले सुचंदनीं ।
देवघरांतूनि निघाला. ॥६५॥

कंठ सद्गदित, सजल नयन ।
श्रीकृष्ण बोले मंजुळ वचन ।
'हा तापसी आला कोठून ? ।
मज येणें प्रगट केलें.' ॥६६॥

दर्शन जालें ब्राह्मणा ।
जयजयकारें करी गर्जना ।
हर्षें बोले, 'स्वामी ! श्रीकृष्णा ! ।
सनाथ तुझेनी मी जालों. ॥६७॥

सरला मनींचा मनोरथ ।
दर्शनें जालों कृतकृत्य ।
दृढ चरणीं ठेवुनी भावार्थ ।
स्वानंदसुख ओसंडलों.' ॥६८॥

समाधि लागली एकनाथा ।
पतीतपावन अनाथनाथा ।
ध्याना आणुनी आत्मस्था ।
स्वानंदसुखें सेवीत. ॥६९॥

तंव बोले हृषीकेशी ।
'येउनी तुझ्या आश्रमासी ।
जालीं द्वादश वर्षेंशी ।
होतों विश्रांतीसी जाण पां. ॥७०॥

---

१. पाठ–तयाचो.

पुरला नाहीं मनींचा सोस ।
तुजपासीं असावें सावकाश' ।
ऐसें बोलोनी जगन्निवास ।
अदृश्य जाला तत्काळ. ॥७१॥

समाधि उतरोनी एकनाथ ।
आधीं वंदिला अभ्यागत ।
'तुझेनि मी कृतकृतार्थ ।
मोठा समर्थ तूं तपस्वी.' ॥७२॥

ऐसा देवभक्ताचा तो सोहळा ।
नरनारी पाहतां डोळां ।
आश्चर्य करीती वेळोवेळां ।
देवही सकळ स्वर्गींचे. ॥७३॥

भक्तिभावार्थें विकिला ।
दास्यकामीं विनटला ।
ऐसी अपार प्रेमकळा ।
कमळापतीची. ॥७४॥

अंतरीं आणि दिगंतरीं ।
व्यापकपणें रक्षी हरी ।
भक्तसाह्यकारी मुरारी ।
रक्षी सर्व काळीं. ॥७५॥

ऐसें ऐकोनी ते समयीं ।
तापसी बोलतसे काई ।
'तारिलें, तारिलें निश्चयीं ।
श्रीकृष्णपाय दाखविलें. ॥७६॥

काय वानूं महिमान ? ।
ऐसें न देखां ब्रह्मज्ञान ।
सनाथ तुझेनी पैठण ।
गंगातीर देखिलें. ॥७७॥

माझेनी न वर्णवे महिमान ।
तूं स्वयें अवतार संपूर्ण ।
पूर्ण पुण्यफळ साचें जाण ।
म्हणोनी श्रीचरण देखिलें.' ॥७८॥

तापसी आणि एकनाथ ।
हर्षनादें संवादत ।
परस्परें सुधाब्धींत ।
जाणोनी मार्जन करिताती. ॥७९॥

ऐसा देवभक्ताचा संभ्रम ।
आपण आठवी पुरुषोत्तम ।
'जनीं जनार्दन' म्हणवुनी नेम ।
सेवा करिती निजभावें. ॥८०॥

पुजूनियां अभ्यागत ।
भोजन देउनी केला तृप्त ।
जाणे हाचि भगवंत ।
म्हणोनी प्रार्थना करितसे. ॥८१॥

'कायावाचाधनमनें ।
श्रीसहित तुमचीं [पाऊलें] जाणें ।
कृपा करावी जगज्जीवनें ।
मज दीनावरी समर्थें.' ॥८२॥

तंव द्विज बोले मंजुळ वचन ।
'जन्मवरी न विसरें तुमचे चरण' ।
आज्ञा घेउनी ब्राह्मण ।
जाता झाला संतोषें. ॥८३॥

कर्ता भोक्ता जनार्दन ।
सर्वदा ज्याचें अंतःकरण ।
त्याचें कोड पुरवी श्रीकृष्ण ।
नानारूपें करूनी. ॥८४॥

कृष्णचरित्र अतिगहन ।
निगमांही न कळे महिमान ।
द्वापारीचें महिमान ।
कलियुगीं दावितसे. ॥८५॥

सगुणीं आवड गोपिकांची।
निर्गुणीं अव्यक्तीं तों देवांची।
करोनी भेटी दोघांची।
समानत्व पावले. ॥८६॥

हेही पाहतां तैसीच गोष्टी।
एकाजनार्दनब्राह्मणभेटी।
करूनियां जगजेठी।
चरित्र करी भक्तांचें. ॥८७॥

उच्छिष्टें काढिलीं धर्माघरीं।
हें प्रसिद्ध पुराणांतरीं।
येथ पाहतां तेंच परी।
एकनाथाघरीं भगवंत. ॥८८॥

कृष्णकृपाक्षतारू।
भक्तभावार्थाचा दृढ दोरू।
धरूनि तरती संसारू।
अतिप्रेमळ भक्तीचे. ॥८९॥

न कळे, न कळे हरिचरित्र।
भावार्थाचा परम मित्र।
जीवीं ध्याउनी तारक मंत्र।
उद्धरिले महानुभाव. ॥९०॥

एकाजनार्दनीं स्वार्थ।
मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ।
धरूनि मूळचें सूत्र।
लीलाविश्वंभर म्हणविलें.' ॥९१॥

मुक्तेश्वरीं कथिली कथा।
वदतां धरूनि भावार्था।
ते पावती पुण्य पुरुषार्था।
यशस्वी होती तिहीं लोकीं. ॥९२॥

ऐसी हे कथा परम पावन।
वाढविलें भक्तांचें महिमान।
धन्य! धन्य! एकाजनार्दन।
आपली महिमा आपण दावी. ॥९३॥

चरित्र देखोनी मुक्तेश्वर।
बोलिले देवभक्तांचा विचार।
सर्वही लीलाविश्वंभर।
त्याचा पार तो जाणे.[1] ॥९४॥

—×✱×—

# १२. पदसंग्रह.

## पद पहिले

रघुवर मुक्तमनीं। प्रकटे ॥ ध्रुवपद ॥

मित्रान्वयनिधि कौसल्योदर-। शुक्तिकेंत जनी. ॥ रघु. ॥१॥

नगकन्याधव भूषण मिरवी। हृत्पदकीं जडुनी. ॥ रघु. ॥२॥

मुक्तेश्वर करि बद्धां मुक्तचि। मुक्तपणा हरुनी. ॥ रघु. ॥३॥

---

१. काही पोथ्यातील समाप्तिलेख असा—॥ श्रीखंड्याकृष्णाख्यान संपूर्ण ॥

## पद दुसरे

पुरुष म्हणे, 'मज करकर न सोसवे, होइन अरण्यवासी।
देवाचेनी धर्में मांडिला[1] संसार, मध्येंचि उठिली विवशी।
वित्त वेंचूनि या लोकांचीं[2] लेंकुरें आणिलीं बहु सायासीं।
फाडुनि वस्त्रें, तोडुनि जानवें, होइन मी संन्यासी।
आतां संसार पुरे पुरे। आतां घरचार पुरे पुरे. ॥ १ ॥

सासू म्हणे, 'सून तांडाळ[3] भांडे,' सून म्हणे, 'उगी रांडे !।
हाणोनियां लात पाडीन उताणी, मोडीन तुझीं[4] हाडें'।
पुरुष आला तेणें घातला डोळा, निष्ठुर भांडण भांडे।
सासुस मारुनी शंखनाद करी, उबगोनि संसारचाडे।
'आतां विष घेइन वो ! बाई ! जीव मी देईन गे ॥ २ ॥

घेईन विख, देइन प्राण, आग लागो ह्या जिणियासी।
मज मेलियामागें बाइल होऊनि, हेचि नांदो का यासीं'।
सून म्हणें, 'येई शेजारिणीबाई ! हस्तकीं धरीं हें तूं नाणें।
पसाऱ्याचें विख आणुनी देईं, फजीतीचें काय जिणें ?।
बारिक तांदुळ, सोलींव दाळीवरी हिंग, जिरें, मिरें, धणे।
तूप निथळत घेइन पोटीं, मग[5] कासिया वांचेन प्राणें ?' ॥ ३ ॥
सोजीऱ्या पोळया, साटीव साय, घृतशर्करेच्या मेळें।
वडे तेल बर, या आखारी घारियावरी लोणियाचे गोळे।
पुरळ पोळिया थिजल्या तूपें, सेवितां काळिज पोळे।
हें विख दारुण घेईन, तरी उन्हांत बैसती बाळें. ॥ ४ ॥
आंबियाचे रसें घोळियले मांडे, घेतला न्याहार पोटीं।
उतारालागीं सोलींव केळें, गिळिलीं शंभर साठी।
दादुला आतां होईल पोरटा, घालुं मी कोणाचे ओटीं।
दुधाचें दुधाणें लावोनियां होटीं, काळकूट ऐसें घोटीं. ॥ ५ ॥
काहळे भापळे पडवळें,[6] दोडके, कारलीं तळिलीं तूपें।
वृतांकें[7] सुंदर सोलींव नानापरी बघारिलीं तप्त तूपें।
चाकवतामाजी हिरवा हिंग, हें काय म्हणावें सोपें ?।
जावया प्राण फर्फरा घेतलें सामुचेनी संतापें. ॥ ६ ॥

---

१. पाठ-सपत्ति जोडिली. २. पाठ-लोकांचें लेंकरूं जोडिलें. ३. पाठ-ओढाळ ४. पाठ-माजीची. ५. पाठ-मग काय वांचेल प्राण ? ६. पाठ-कोवळी बाळक. ७. पाठ-पडोळी तोंडोळी नाना परी, वरी फोडणीं दिली तूपें.

सेवया, सरोळे, बोटवे, देठवे, दुधांत आळिल्या खिरी।
लोणकढें तूप, मेळ उन्ह उन्ह दूध, मेळविली रायपुरी।
पुरणाची पोळी घातली ताटीं, त्यावरी सायेची वाटी।
अफू आणि तेल सोमल, हें ऐसें झोंबेल माझिये कंठीं. ॥ ७ ॥

भरीतें रोटी तिळेल तेल, सोलीले पातीचे कांदे।
नपती आलें बेलें सालफळें दहींभाताचे मांदे।
ढोकळे, धीरडीं, पापड, फेणिया, सेवितां काळीज भेदे।
दह्याची दुधाणी लावुनी होटीं गरळदाहा ऐसें घोटीं. ॥ ८ ॥

तीन तीनदां सात सातरी हें विख सेविन बाई !।
चालवेना ऐसा भरंवसा जाला, आळसें नुठवे कांहीं।
दादुल्यासी म्हणे, 'चुरीं का पाउलें, आंगाला भोरण्या देई।
मज मेलिया मागें दारोदारीं हींडसी, आहें तो लाहो घेई.' ॥ ९ ॥

ऐसें हें विख सेवितां जीचें अंग सुजलें अरुवार।
घरांतुनी[1] सये ! बाहेर निघतां चालतां हादरे हें घर।
टेंकावयालागीं[2] मुसळ घेउनियां करी त्याचा चाराचूर[3]।
लीलाविश्वंभरा[4] हें विख देसील तरी फुकाचें राखिन घर. ॥ १० ॥

## पद तिसरें

भूतदयादिक हरिगुरुभजनीं नित्य प्रेमा नसतां।
चंबु, उटीनें मुद्रा लावुनी, वेष दाविती वरता. ॥ १ ॥

चतुर्थ आश्रम संपादुनियां दंडकमंडलु त्यजिती।
देहआकृती गेली नसतां परमहंस म्हणविती. ॥ २ ॥

कानामध्यें बोट घालुनी, दडपुनि डोळे धरिती।
हिरवे पिंवळे रंग पाहुनी स्वरूपमुद्रा म्हणती. ॥ ३ ॥

टाळमृदंगीं सुस्वर गायन पोटासाठीं करिती।
हरिचे भजनीं प्रेमा नसतां हरिचे दास म्हणविती. ॥ ४ ॥

मुक्तेश्वरकवि शिकवी सुजनां भजनाविणही न तरे।
या कलियूगीं व्यासें कथिलें, सांगतसें तुज हित रे ! ॥ ५ ॥

---

१. पाठ–दारीं न माये, घरांत चालतां तेणें हें मोडित घर. २. पाठ–टेंगणें. ३. पाठ–मुसळ घेतलें, मोडुनि जालें चूर. ४. पाठ–मुक्तेश्वर म्हणे हें विख देईल त्याचें.

## पद चौथे

अंतरीं वासना खोटी रे ! । कायसा 'रामराम' वोटीं रे ! ॥ ध्रुवपद ॥
हरिदास मी, एक लोकांत आगळा । सुरस माझें गाणें रे ! ।
थातमात संगीत गाणें नाचणें । निरूपणीं अर्थ जाणें रे ! ।
पुढें निवे त्यासीं मागेंचि लोटी । माजला मत्सरमानें रे ! ॥ ध्रुवपद ॥ १.
अंतरिं काम, क्रोध बाहेरि । देवचि भजना हांसें रे ! ।
दासांचिये पायीं पदरज होणें । हरिहर म्हणिजे वाचे रे ! ।
लीलाविश्वंभर भावासि भुलला । द्वारिंहि राखे त्याचें रे ! ।
खांदीं बैसवुनि नेउनि वैकुंठा । आपुले पदरज साचे रे ! ॥ ध्रुवपद ॥ २.

## पद पाचवे

सांग पां वैराग्य कोठें रे ! सर्व विडंबिलें पोटें रे ! ॥ ध्रु० ॥
बाइल सांडुनि शिष्यिण मेळविली । घर सांडुनि मठमाया रे ! ।
सोदर त्यागुनि शिष्यचि भोंवते । जीविकेसि घातला पाया रे ! ।
उदिम सांडुनि भिक्षेसी हिंडणें । देशाउरीं दंड कां या रे ! ॥ ध्रु० ॥
साजण सांडुनि गेरूचि नाशिलें । संन्यास घेतला काचा रे ! ।
मिष्टान्नभिक्षेलागुनि धांवती । जिव्हा येधली लांचा रे ! ।
करूं नये ते झांकुनि करिती । 'सर्व ब्रह्म' म्हणती वाचारे ! ।
लीलाविश्वंभर नेणवे 'जंयवरी । मोक्ष तों पावेल कैंचा ? रे ! ॥ ध्रु० ॥

## पद सहावें

गुरु गुरुपणें गाजे रे ! शिष्य शिष्यपणें लाजे रे ! ॥ ध्रु० ॥
मंत्रतंत्र देउनि शिष्यासि गोविलें । नेमुनि बांधिली पूजा रे ! ।
न पावतां कैसा गुरु मांडी । शिष्य तो नवजेचि काजा रे ! ।
सप्रेमभाव तो कुभाव जाला । विकल्प चढला माजा रे ! ।
गुरुशिष्य हा शब्दचि वाउगा । लटिकाचि लौकिक गाजा रे ! ॥ ध्रु० ॥ १.
तनुमनधन तिनि गुरूसि वोपी । तोचि एक शिष्य जनीं रे ! ।
शिष्यमुद्रा हे तयासिच साजे । येर तो बाहिर मुद्रा नाणी रे ! ।
खरा तो अर्जुन उद्धव गोरख । निवृत्ति ज्ञानदेव गुणी रे ! ।
सोपान मुक्ताबाई एकनाथ सत । वाउगी येर ते काहाणी रे ! ॥ ध्रु० ॥ २.
जीवत्व दवडुनि शिष्यत्व प्रगटवी । तोचि एक सद्गुरुरावो रे ! ।
जयाचेनि स्मरणें भवबंध निरसे । निवळे अनुभव भावो रे ! ।

लीलाविश्वंभर त्रिभुवनतारक । तयासि शरण जावो रे ! ।
घरोघरिं गुरुशिष्यचि अवघे । तयां हें दंडवत पावो रे ! ॥ध्रु०॥ ३.

### पद सातवें

भजा हो ! भजा माझ्या एकनाथासी ।
त्रिकाळीं श्रीदत्तात्रेयदर्शन ज्यासी ।
प्रतिष्ठान अधिष्ठान मान्य सर्वांसी ।
प्रकट परब्रह्म भानुदासाचे वंशीं. ॥ ध्रु० ॥

एकनाथा शरण जातां चुकलें भवभय ।
एकावांचुनि कांहीं न दिसे, अवघें अद्वय ।
एका नामें जपतां त्याची लागे निजसोये ।
एवढा महिमा ज्याचा वाचे वर्णितां नये. ॥ ध्रु० ॥ १.

करुणेचा अवतार तो हा विश्वतारक ।
कळेना स्वामीचें सहजासहज कौतुक ।
कर्ज त्याचें घरचें फेडी कमलानायक ।
करी देव दास्य, ज्याचा आज्ञाधारक. ॥ ध्रु० ॥ २.

नाम एकोबाचें गोड आवडे मना ।
नावडे आणीक मज कांहीं त्यावीना ।
नामामृत सेवितां भेटी झाल्या चिद्धना ।
नाठवे देहभाव प्रेमें करितां कीर्तना. ॥ ध्रु० ॥ ३.

थरथर कांपे काळ स्मरतां स्वामी समर्थ ।
थक्कित होउनि जन हे पाहती हर्षें परमार्थ ।
थकलें माझें चित्त पुरलें मनिंचे मनोरथ ।
थयथय नाचे मुक्तेश्वर म्हणे, 'मी झालों कृतार्थ.' ॥ ध्रु० ॥ ४.

—××—

## १३. आरतिसंग्रह.

### १. गणपतीची आरती.

जय देव ! जय देव ! जय वक्रतुंडा ! ।
सिंदुरमंडित विशाळ सुरवर भुजदंडा. ॥ ध्रुवपद ॥
उंदिरवाहन दोंदिल नाचसि बहु लीला ।
प्रसन्नभाळा ! कमळा करिं घेउनि विमळा ।

रुणझुण रुणझुण पायीं[1] घागरिया घोळा ।
सताल[2] सुस्वर गायन, शोभति अवलीळा. ॥ जय देव० ॥ १ ॥

सारीगमपधनि सगरि सप्तस्वर भेदा ।
धिमि धिमि धिमिकिट मृदंग वाजति गति छंदा ।
ताथै ताथै तूं तैं करिसी आनन्दा ।
ब्रह्मादिक अवलोकिति तव पदारविंदा. ॥ जय देव० ॥ २ ॥

अभया वरदा ! सुखदा ! राजिवदलनयना ! ।
परशांकुशधर लाडूशोभित शुभरदना ।
ऊर्ध्वे दोंदिल उंदिर कार्तिकेश्वर रचना ।
मुक्तेश्वर चरणांबुजिं अलिपरि करि भ्रमणा. ॥ जय देव० ॥ ३ ॥

## २. बहिरोबाची आरती.

जय देव ! जय देव ! जय भैरवनाथा ।
सुंदर पदयुग तुझें वंदिन निजमाथां. ॥ ध्रुवपद ॥
भैरवराया ! गौरव दे मज भजनाचें, ।
रौरवसंकट नाशीं जनना निधनाचें, ॥
निशिदिनिं देवा ! दे मज गुणकीर्तन वाचे, ।
कैरव पदनखचंद्रीं करिं मन मम साचें.[3] ॥ जय देव० ॥ १ ॥

भवभयभंजन ![4] सज्जनरंजन ! गुरुदेवा ! ।
पदरजअंजन लेतां, प्रकटे निजठेवा ॥
जेव्हां दर्शन देशी, भाग्योदय तेव्हां ।
अनन्त पुण्यें साधे, लाधे तव सेवा. ॥ जय देव० ॥ २ ॥

कलिमलशमना दमना दानव दे पाणी ।
डमरूरव अमरांतें निर्भय सुखदानी ॥
काशीरक्षक तक्षकमालाधर चरणीं ।
तोडर मिरवी अरिगण,[5] मस्तकिं मनकर्णी. ॥ जय देव० ॥ ३ ॥
लक्षी करुणाचक्षीं अनुचर निजपक्षीं ।
भक्षी[6] दुष्टांनष्टां, सुष्टां संरक्षी ॥

१. पाठ–करि. २. पाठ–सप्ता सुरवर. ३. पाठ–कलिमल मनसाचें. ४. पाठ–भवभव-भंजन. ५. पाठ–अरिवर. ६. पाठ–भक्षी करुणा दुष्टां सुष्टां सम रक्षी.

साक्षी कर्माकर्मीं, जगदंतरकुक्षी।
मुमुक्षुपक्षी वसती तवपदसुरवृक्षीं. ॥ जय देव० ॥४॥
सोनारी पुरधामीं भैरव कुळस्वामी।
स्मरतां, सत्वर पावसि संकटहर नामीं ॥
इच्छित देशी दासां जो जो जें कामी।
मुक्तेश्वरीं हेतू निश्चळ[1] कुळधर्मीं. ॥ जय देव० ॥५॥

## ३. महालक्ष्मीची आरती.

जय देवी! जय देवी! जय महालक्ष्मी!।
वसती व्यापकरूपें स्थूल हा स्थूलसूक्ष्मीं ॥ ध्रुवपद ॥
करवीरपुरवासिनी सुरवमुनिमाता।
पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता।
कमलाकारें जठरीं जन्मविला धाता।
सहस्रवदनीं भूधर न पुरे गुण गातां. ॥ जय देवी० ॥ १ ॥
मातुलिंगे गदा खेटक रविकिरणीं।
झळके हाटकवाटी पीयुषरसपाणी।
माणिकरसना, सुरंगवसना, मृगनयनी।
शशिधरवदना, राजस मदनाची जननी. ॥ जय देवी० ॥ २ ॥
तारा; शक्ति अगम्या; शिवभजकां गौरी।
सांख्य म्हणती प्रकृती[2] निर्गुण निर्धारीं।
गायत्री निजबीजा निगमागम[3] सारी।
प्रगटे पद्मावती निजधर्माचारीं. ॥ जय देवी० ॥ ३ ॥
अमृतभरिते सरिते! अघदुरितें वारीं।
मारीं दुर्घट असुरा, भव दुस्तर तारीं ॥
वारी मायापटला, प्रणमत परिवारीं।
हें रूप चिद्रूप तद्रूप दावीं निर्धारीं. ॥ जय देवी० ॥ ४ ॥
चतुराननें कुश्चितकर्माच्या ओळी।
लिहिल्या असतिल माते! माझे निजभाळीं।
पुसोनि चरणातळीं, पदसुमनें क्षाळीं।
मुक्तेश्वर नागर क्षीरसागरबाळी. ॥ जय देवी० ॥ ५ ॥

१. पाठ-निश्चय. २. पाठ- तूतें प्रकटे निर्धारीं. ३. पाठ-निगमश्रुति.

## ४. तुळसीची आरती.

( प्रथम )

जय देवी! जय देवी! जय तुळसी! माते!।
पादपरूपें तुजला धरिलें भगवंतें. ॥
ध्रुवपद ॥
सकळहि तीर्थें वसती तूझीये मूळीं।
मध्यभागीं देव राहाती सकळीं।
अग्नी वेद शास्त्रें सुखरूप राहीलीं।
ऐसी तूं तुळसी सकळां माऊली. ॥
जय देवी० ॥ १ ॥
दृष्टी तुज देखील्या अघें तीं पळती।
स्पर्शनमात्रें वपु या पावन होती।
नमनें करितां रोग सकळही शमती।
उदकें सिंपीलीया अंतक नाशी ती. ॥
जय देवी० ॥ २ ॥
नामस्मरणीं तुझिया उपजे सद्भावो।
एका तुळसीदळें संतुष्टे देवो।
कांहीं सेवा घडल्या चूके रौरवो।
मुक्तेश्वरीं सद्गुरुमुखें अनुभवो. ॥
जय देवी० ॥ ३ ॥

## ५. तुळसीची आरती.

( द्वितीय )

जय देवी! जय देवी! जय माये तुळसी!
अक्षय मोक्षाचेनी फळभारें फळसी. ॥
ध्रुवपद ॥
कमळा सांडुनि हृदयीं कोमळदळमाळा।
धरितां[1] प्रेमभावें साजे गोपाळा।
साधनपंथीं साधक गोवुनि भ्रमचाळा।
प्रगटे आपण विष्णु श्रीतुळसीजवळा. ॥
जय देवी० ॥ १ ॥
तुळसीमूळमृत्तिका जो चर्ची भाळी।
तुळसीतीर्थें[2] अनुदिन करितां आंघोळी।
तुळसीकाष्ठें ग्रीवा मंडित मणिमाळीं[3]।
तीसंगें क्रीडतो अखंड वनमाळी. ॥
जय देवी० ॥ २ ॥
मंजुरीया दिसती जैशा वज्राच्या धारा।
पापाचे पर्वत करिती[4] संहारा।
पळती यमकिंकर म्हणती रविकुमरा।
'तुळसीभूतळवासीं न दिसे अघधारा.' ॥
जय देवी० ॥ ३ ॥
तुझेन एकें दळें तोशविला देव।
म्हणुनी तुझे ठायीं जडला दृढभाव।
वृंदावनी देईं वस्तीसी ठाव।
सहज संगें भेटे वैकुंठराय. ॥
जय देवी० ॥ ४ ॥
मन हें तुळसीदळ हरिगुरुच्या पायीं।
अर्पी तया पुढती भवसंकट नाहीं।
अंतर[5] वृन्दावनीं निज निश्चळ राहीं।
मुक्तेश्वरस्वामी विश्वंभर पाहीं. ॥
जय देवी० ॥ ५ ॥

---

१. पाठ-मध्यें नटवर शोभा गोपाळा। वामांकीं सुंदर जांबुवतीबाळा ॥ २. पाठ-तुळसीतीर्थें वंदन. ३. पाठ-वनमाळी. ४. पाठ-त्यजिती तनुधारा. ५. पाठ-आतां.

## ६. ज्ञानदेवाची आरती.

जय देव ! जय देव ! जय ज्ञानदेवा ! ।
जीवा शिवा आदि, परब्रह्मठेवा. ॥ध्रुव०॥
इंद्रायणिच्या तटीं धरिता रहिवास ।
विश्व तारावया लक्ष्मीनिवास ॥
ज्ञानेश्वररूपें धरिला निजवेष ।
अनुभव जाणे तया सद्गुरुउपदेश ॥
जय देव० ॥१॥

कृष्ण एकादशी कार्तिकमासीं ।
पंढरिनाथ आपण सनकादिकांसीं ॥
यात्रेसी येताती स्वानंदराशी ।
दर्शन घडे तया निजमुक्तीं दासी. ॥
जय देव० ॥ २ ॥

सकळ सिद्धगणांमाजी तूं श्रेष्ठ ।
ज्ञानदेवीं अनुभव ज्ञानावरिष्ठ ॥
अनुतापदीप विश्वीं घनदाट ।
मुक्तेश्वरी न धरे प्रेमाचा लोट. ॥
जय देव० ॥ ३ ॥

---

## ७. श्रीएकनाथस्वामीची आरती.

### ( प्रथम )

जय देव ! जय देव ! जय एकनाथा ! ।
सज्जनवृंदामाजी देखों आधिकता. ॥
ध्रुवपद ॥

बाळपणीं कोणा डंखो आला काळ ।
तो काळचि कोण झाला कृपाळ ।
जन्मारंभीं कोणाचें वैराग्य प्रबळ ।
कोणाचें वैराग्य राहीलें अढळ. ॥
जय देव० ॥ १ ॥

क्षालन सद्गुरुपदपंकजिचें नीर ।
कोण त्याला मानुनि साराहुनि सार ।
कोण गुरुभक्तीसी जाहला तत्पर ।
सर्वां गुरुभक्तीसी एक आधार. ॥
जय देव० ॥ २ ॥

करतळामळ कोणी 'एकादश' केला ।
विश्वव्यापक ग्रंथ कोणाचा झाला ।
अनंत कोटी ब्रह्मांड ज्यासी अवलीला ।
त्यासी 'अनुभवसार' कोणा पैं वदला. ॥
जय देव० ॥ ३ ॥

भूसुरमहिमा कोणीं वाढविला ।
षट्कर्मांचा महिमा आंगीं दाखविला ।
.......................... ।
.......................... ॥
जय देव० ॥ ४ ॥

कोणाचें ऋण जाउनि कमलापति फेडी ।
कोणाचें हरिदास स्वयें अंगण झाडी ।
अनंत ब्रह्मांडांच्या करितो घडामोडी ।
कोणाचे घरीं खांद्या वाहे कावडी. ॥
जय देव० ॥ ५ ॥

कोणे मुक्या हातीं रामायण वदवी ।
समुद्रवलयांकित श्री कोणाची झाली ? ।
ऐसा अगम्य महिमा जाणति अनुभवी ।
भावें मुक्तेश्वर वांच्छित पदपदवी. ॥
जय देव० ॥ ६ ॥

—××—

## ८. श्रीएकनाथस्वामीची आरती

(द्वितीय)

जय देव ! जय देव ! जय एकनाथा ! ।
निर्विकार ब्रह्म तूंचि तत्त्वता ।
नामें भवकुजर ताडूनी लाथा ।
भक्तप्रतिपाळककळिकाळमाथा ॥ध्रुवपद॥

नानारूपीं चालक व्यापक तूं एक ।
म्हणुनी 'एका' नामें पाचारिति लोक ।
ज्याचेनि नामें न चले विषयाचा पंक ।
जनार्दनाजवळी कीर्तीचा जनक. ॥
जय देव० ॥ १ ॥

निर्मळ गोदातटीं मुनिराजहंस ।
निर्गुण प्रतिष्ठानीं केला रहिवास ।
लोकत्रयीं मिरवी कीर्तीचा घोष ।
आचार विचार निर्मल निर्दोष. ॥
जय देव० ॥ २ ॥

अपर भानुकुळीं उगवला भानू ।
सूर्याचाही सूर्य देदीप्यमानू[1] ।
काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मानू ।
कृपादृष्टी करुनी तारिसि रजरेणू. ॥
जय देव० ॥ ३ ॥

भगवद्भावें करुनी सकळांसी मैत्री ।
म्हणुनी जन्म विश्वामित्राचे गोत्रीं ।
विश्व तरलें हरिहरनामाचे मंत्रीं ।
पाहूं न शके जवळ कळिकाळ नेत्रीं. ॥
जय देव० ॥ ४ ॥

ब्राह्मणतीर्थीं पूजा, नामाचा महिमा ।
सत्कर्में लोटली मोक्षाची सीमा ।
नाना मतांचिया वंदूनी गरिमा ।
मुक्तेश्वरें तेथें धरियेला प्रेमा. ॥
जय देव० ॥ ५ ॥

## ९. विश्वंभराची आरती.

आरती विश्वंभरा ! । पूर्णसाक्षी ॐ कारा ! ।
सदया ! ने व्यापुनीयां योगिवृंदमाहेरा. ॥ ध्रुवपद ॥
निर्गुणा ! निरामया ! । निर्विकारा ! अद्वया ! ।
सच्चिदानंदरूपा ! निरंजन अद्वया ! ॥१॥
अचळा ! शाश्वता ! । निर्मळा ! अच्युता ।
सोज्ज्वळा ! शुद्धबुद्धी ! नित्य सत्य अनंता ! ॥२॥
ब्रह्मादिदेववंद्या ! । परमा वेदांतविद्या ! ।
अपार रूप तुझें शंकरासहित आद्या ! ॥ ३ ॥
सहस्रमुखीं शेषें । वर्णियेला विशेषें ।
न कळे परिवार गाती नारदादि घोषें. ॥ ४ ॥
..........पी तीर । जयासन्निध अवतार ।
प्रगटोनि धर्मासी तूं पापी तारियले थोर. ॥ ५ ॥

---

१. पाठ-दैदीप्यमानू.

शरण मी तूज आतां। पायीं ठेवीयेला माथा।
संतोषें सुत रक्षीं, गुरु विश्वंभरनाथा! ॥ ६ ॥

—××—

## १०. गोपाळाची भूपाळी.

उठिं रे! गोपाळा! उघडीं स्वरूपलोचना।
सरलि अविद्याराती उदय झाला रविकिरणा॥
इंद्रियगोधनें नेईं निर्गुणकानना।
सुटलीं मानसवत्सें तुजविण नाकळती कोणा. ॥ ध्रु० ॥
प्रबोध पहांट झाली सरले तिमिर तमरज।
गुरुकृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज॥
आत्मा दिनकर पाटी प्रगटे तात्काळिक सहज।
जिवचंद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज. ॥ १ ॥

दृश्यभास चांदणिया असतां ठायींच लोपलिया।
लिंगदेहकमळींचे मधुकर सुटले आपसया॥
बुद्धिबोधचक्रवाकें मिनलीं आपणियां।
देहबुद्धिकुमुदिनी सुकोनी गेलीसे विलया. ॥ २ ॥
योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं।
उपनिषद्‌भागार्थ शब्द केला कोकिळीं॥
वाग्वादांचे उलूक निघती मौनाचे ढोलीं[१]।
विकल्पअटवी साही चोरीं सांडियली. ॥ ३ ॥

विरागरश्मी जवळी धरितां चित्तरविकांत।
आत्मावन्हि प्रगटे विषयवन हें जाळीत॥
तृष्णेच्या श्वापदावरी प्रळय अद्भुत।
विश्व हें लटिकें मूढां मृगजळवत.[२] ॥ ४ ॥

जारव्यसनी जिव हा झाला उद्मीं सुविचार।
वासना कुंटिणिचा सहजें खुंटला व्यापार॥
लीलाविश्वंभरस्वामी[३] उठिला सत्वर।
चाले मुक्तेश्वर[४] संगीं धरूनियां कर. ॥ ५ ॥

---

१. पाठ–ढाळीं. २. पाठ–मृगजळवत. ३. पाठ–म्हणे ज्ञानदेव योगी झालासे स्थीर। निवृत्तीप्रसादें समाधि सवेग सार. ४. पाठ–मुक्तीश्वर.

# टीपा

[ खालील टीपांत शब्दांमागे छापलेले आकडे ओव्यांचे अनुक्रमांक आहेत. ]

## १. गजेंद्रमोक्ष

१. **तृषार्थी** – तृषार्त शब्द हवा होता. **गंडिका** – ही नदी नेपाळच्या मध्यभागी असलेल्या पर्वतात उगम पावून पुढे धवलगिरी व गोसेननाथ या पर्वतांतून वाहते. हिचे सात प्रवाह असल्यामुळे हिला सप्तगंडकी म्हणतात. त्यांपैकी सर्वांत मोठ्या प्रवाहास त्रिशूलगंगा म्हणतात. ह्या नदीला नेपाळात शाळग्रामी व उत्तर प्रांतात नारायणी अशी नावे आहेत. हिची लांबी १९२ मैल असून हिच्या तीरावर हरिहर नामक क्षेत्र आहे. ह्या नदीत शालिग्राम सापडतात. (भारतीय पौराणिक कोश [ श्रीमद्भागवत, कल्पतरूपी शेवटचा भाग ], १९२९, पृ. ८८). २. **शुंडा** – सोंडेला. **करकमळ** – मगरीने हाताने गजेंद्राच्या सोंडेला विळखा घातला. ४. **भ्रांती** – भ्रम, बुद्धीचा गोंधळ. ५. **टांकिले** – टाकिलें असा पाठ असावा. ६. **बोढी काढितां बाहेरी** – गजेंद्र सोंड बाहेर ओढून काढण्याचा प्रयत्न करीत असता. **पूर्ववैरी** – हत्ती व मगर पूर्व जन्मी जय व विजय होते. त्या दोघांचे यज्ञात मिळालेल्या द्रव्याच्या वाटणीवरून भांडण झाले होते. तो संदर्भ येथे आहे. (प्रस्तावना पाहा.) ७. **अवघीं** – स्त्री, पुत्र, मित्र इत्यादी. ११. **आवर्ती** – भोवऱ्यांत. १२. **बोभाये** – मोठ्याने ओरडू लागला. **धावण्या** – वाचविण्यास. १६. **हृदयकमळीं** – हा शब्दप्रयोग स्फुटकाव्यांत अनेकदा येतो. १७. **ओहट** – ओहटी, उतार. १८. **नातुडती** – प्राप्त होत नाहीत. २०. **श्रवण झाली** – कानांवर पडली. २१. **विश्रामधाम** – विश्रांतीचे ठिकाण. २२. **तुंबर** (तुम्बुरु किंवा तुम्बरु) – गंधर्वांची एक जात. २४. **सहोदरीं** – नातेवाइकांनी; सख्यासोबत्यांनी. २५. **गजेंद्रनक्रग्रहण** – हत्तीला मगरीने घट्ट पकडून ठेवले होते. २७. **उपजली** – केली असा पाठ हवा होता. २८. **नक्र** – नक्रा असा पाठ हवा होता. **चक्रीं** – सुदर्शन चक्राने. ३०. **त्याणें बंधन पावावे ?** – वस्तुतः पावू नये हा अभिप्राय. ३२. **वहिला** – तत्काळ, लवकर. ३३. **तयातें** – तयावरी हा पाठ हवा होता. ३४. **संगातें** – बरोबर. ३५. **स्वरूपता** – ईश्वररूपता. **सरूपता–रूप** मोक्ष. **सर्वथा** – कधीही. **नेदी** – टाकीत नाही. ३६. **आपुले** व **निज** हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत, त्यामुळे येथे पुनरुक्ती झाली आहे.

## २. हनुमंताख्यान

१. **परीस** – श्रवण कर, ऐक. २. **पाहों** – भेटू. ३. **रामअवताराचे** - येथे संधी अपेक्षित असून केलेला नसल्यामुळे विसंधी दोष झाला आहे. **निरुतीं** – खरोखर. **कृष्णअवतारीं** – येथेही विसंधी दोष आहे. स्फुटकाव्यांत या दोषाची उदाहरणे पुष्कळ आढळतात. ४. **सागरांचे पैल प्रांतीं** -- सहा समुद्रांपलीकडे. ५. **मनी** – मानीत. स्फुटकाव्यांत मनी व मानी अशी दोन्ही रूपे आढळतात. **पुरुषात** – पतीला. ६. **जितेंद्रियत्वचरणीं . . .** – मारुतीने इंद्रियजय करून मदनाला तुच्छतापूर्वक आपल्या पायाला बांधले आहे. म्हणून जणू मारुतीच्या पायांत मदनरूप नूपुर वाजतात. ७. **दंडपाणि** – राजदंड धारण करणारा. ८. **संजीवनी** – संजीवनी नामक वनस्पती. युद्धात लक्ष्मण मूर्च्छित झाला असता मारुतीने द्रोणागिरी उचलून आणला व मग वैद्याने संजीवनीच्या योगाने लक्ष्मणास सावध केले, ह्या रामायणीय घटनेचा संदर्भ. **ख्यात** – प्रसिद्धी, कीर्ती. ९. **वानूं** – वर्णन करू. **पुरुषार्थ पैं बळाचा** – सामर्थ्याचा प्रताप. १०. **वडिवार** – मोठेपणा. **किंकर** – सेवक. **दृढनिर्धार** – दृढनिश्चयी. ११. **रुद्रावतार** – मारुती हा रुद्राचा अवतार. मृगव्याध, सर्प, निर्ऋती, अजैकपाद, अहिर्बुध्न, पिनाकी, ईश्वर, कपाळी, दहन, भव व स्थाणू हे अकरा रुद्र. **पक्षीश्वर** – गरुडाने. येथे 'पक्षीश्वरें' असे रूप हवे होते. **विकल्प** – दु:ख. गरुडाला एका मर्कटाला बोलावून आणण्याचे काम सांगितले गेल्यामुळे झालेले दु:ख. १२. **परमकठिण** – परमगहन सेवाधर्म योग्यांनाही अगम्य वाटतो असे भर्तृहरीने म्हटलेच आहे. १४. **हें अनुचित . . .** या शब्दांत गरुडाचा गर्व प्रतीत होतो. **सत्राणें** – जोराने. १५. **पक्षें** – गरुड पक्ष्याने (की पंखांच्या मदतीने ?). पक्षी शब्दाच्या तृतीयेचे हे रूप सदोष आहे. **मदू** – मदाने, गर्वाने. **विशदू** – गोड्या पाण्याचा (की प्रशान्त? ) महासागर. १८. **वनचरें भयभीत** – गरुड जन्मत: अग्नीप्रमाणे तेजस्वी होता. परंतु पुढे आपल्यामुळे सर्व प्राण्यांना त्रास होतो हे ध्यानात आल्यावर त्याने आपले तेज संकुचित केले (भारतीय संस्कृतिकोश, दुसरा खंड, पुणे, प्रथमावृत्ती, १९६४, पृ. ७४०). १९. **दोन्ही. . .**दोन हातांनी जोराने टाळ्या वाजवून. २०. **लक्ष्या नाणी** – दुर्लक्ष केले या अर्थी वैशिष्टयपूर्ण शब्दप्रयोग. **गजबज** – गडबड. **मेरू** – हे उपमान स्फुटकाव्यांत अनेकदा प्रयुक्त झाले आहे. २२. **येरें** – दुसऱ्याने, हनुमंताने. २३. **देख** – बघ, ऐक. आख्यानकार राजास सांगतो. **चडकण** – थप्पड. २४. **भोंवरी** – चक्कर, भोवळ. **हृदयकमळीं** – स्फुटकाव्यांच्या कर्त्याचा आवडता शब्दप्रयोग. पाहा. गजेंद्रमोक्ष ओवी क्र. १६. २५. **उपविष्ट** – बसलेला. २७. **कथन** – हकीकत. **सन्मानुनीयां** – श्रीकृष्णाने गरुडाचा सम्मान केला. २८. **विषाद** – कुढाभाव. **विध** – विधी, प्रकार. ३२. **प्रळयानळासारिखा** – प्रलयकालीन अग्नीसारखा. ३३. **क्लेशनाशन** – दु:खहारक. ३६. **नवजे** – जाणार नाही. व्रज् – (प्रथम गण परस्मैपद) 'जाणे' या धातूचे वज हे प्राकृत रूप. **वानरक्रोधऊर्मी** – येथे विसंधी दोष आहे. ४१. अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा व

मंदोदरी या पंच पतिव्रतांचे स्मरण केल्याने महापातकांचा नाश होतो असा समज आहे. **अगमोगमीं** – तत्काळ. ४२. **जो मुनिजनांचें**. . . इत्यादी दोन चरण 'गजेंद्रमोक्षा'तील तेविसाव्या ओवीच्या दोन चरणांसारखेच आहेत. शिवाय, 'जो मुनिजनांचे ध्येयध्यान' शब्दांत 'योगिभिर्ध्यानगम्यं' वचनाचे प्रतिबिंब आहे. 'जो देवांचे देवतार्चन' ही उक्ती 'यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुत: स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैः' या प्रसिद्ध उक्तीची छाया आहे. **निधान** – भांडार. ४४. **द्वयमूर्ति** – दोघेजण. **ऊर्ध्वपथीं** – आकाशमार्गाने. **झाला** – या क्रियापदाचा कर्ता 'गरुड' अध्याहृत आहे. स्फुटकाव्यांत अनेक ठिकाणी अशा प्रकारे शब्द अध्याहृत मानावे लागतात. ४५. **अंतराळीं** – अंतरंगात. ४६. **महामार** – मार-मार (मारील). ४७. **एकसरें** – एकदम. ह्या ओवीच्या अर्थाचा विचार करता ही ओवी अठ्ठेचाळिसाव्या ओवीच्या स्थानी हवी होती, असे जाणवते. ५०. **सव्यभागीं** – उजवीकडे. **उभयवर्गी** – भरत व शत्रुघ्न हे भाऊ. ५१. गरुड व सत्यभामा या दोघांच्या गर्वाचे हरण करणे हे श्रीकृष्णाचे उद्दिष्ट होते असे कवीने प्रारंभिक ओवीतच सांगितले आहे. ५२. **तें जानकीरूप जालें** – यातील नपुंसकलिंगी प्रयोग सदोष आहे. ५३. **कृष्णमहिमा न वचे वर्णिली** – कृष्णाचा मोठेपणा वर्णिला जात नाही. (अर्थात शब्दातीत आहे). महिमा शब्दाचा स्त्रीलिंगी प्रयोग लक्ष-वेधक आहे. ५४. **आवडीं** – आवडीने. **साही** – राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता व हनुमान ही सहा जणे. ५९. **जयाम** – ज्या रामायणास. ६०. **द्वयकमळीं** – पुन्हा पुन्हा येणारा शब्द. **योग्गी अक्षरें** – रा व म ही दोन अक्षरे. ६२. **गोष्पदप्राय** – लहान.

## ३. मूर्खांची लक्षणे

१. **सर्वही**. . .सर्व जगत् एका ब्रह्मापासून झाले. तुळा – 'सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।' (गणपत्यथर्वशीर्ष), 'यत: सर्वाणि भूतानि भवन्त्यादियुगागमे । यस्मिंश्च प्रलयं यान्ति पुनरेव युगक्षये ।।' (विष्णुसहस्रनाम – श्लोक ११). २. **हरिहरांतें मानी भेद** – विष्णू आणि शिव यांचे ठिकाणी भेद मानू नये. 'शिवस्य हृदयं विष्णु: विष्णोश्च हृदयं शिव:' ही उक्ती प्रसिद्धच आहे. शिवाय, तुळा – 'शिव थोर विष्णु लहान । हरि विशेष हर गौण । ऐसें म्हणती जे त्यांलागून । आणोनि नरकीं घालावें ।।' (श्रीधरकृत शिवलीलामृत, अध्याय ११, ओवी ११६); तसेच, विश्वामित्रभोजन ओवी २, आणि अर्जुनकामनापूर्ति ओव्या ३ व ५४-५५ पाहा. **नेणोनि**–नीटपणे न जाणता. ३. **पाठमात्रें**– केवळ घोकंपट्टी केल्याने ज्ञान येते असा अभिमान बाळगणारा. ४. **मतांची राशी** – इतरांची मते केवळ संकलित करून लक्षात ठेवणारा; भारवाहक. ६. **पुढिलांचे** – लहा-नांचे. ७. **चाले उताणा** – छाती पुढे काढून (गर्वाने) चालतो. ८. **काळ** – सर्व प्राणि-मात्रांना धरणारा. ९. **शब्दज्ञान** – पोकळ बडबड. ११. **विरक्त** – ईश्वरभक्तिपरायण;

आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही वस्तूबद्दल आसक्ती न बाळगणारा. **योगी** – अतीन्द्रिय अर्थ (ब्रह्मतत्त्व) जाणणारा; 'ज्ञानविज्ञान – तृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः। युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ॥' (भगवद्गीता ६.८) १२ **कोपें अपस्मारी**–रागाच्या भरामुळे ज्याला विसर पडतो किंवा फेफरे येते तो. १३. **वैराग्य** – दृष्ट व अदृष्ट विषयांसंबंधी अनिच्छा. **विश्वासावीण** – श्रद्धेवाचून. १४. **आतां सर्व साधारणें** – तेराव्या ओवीपर्यंत विशेषलक्षणे सांगितलेली असून त्यानंतर शेवटपर्यंत सामान्यलक्षणे सांगितली आहेत. **त्यागार्थ** – सोडण्याच्या हेतूने. १५. **वारिया** – वाऱ्याकडे (पाठ करून). **वापीकूपीं**–वापी म्हणजे विहीर. कूप म्हणजे विहीर किंवा खळगा. कूपी म्हणजे लहान विहीर. १६. **फेडी** – सोडतो. **सांडवा** – नदी किंवा ओढा ओलांडण्यासाठी घातलेला बांध. १८. **पवित्र भवनीं** – मंदिर, गाभारा, सभामंडप इत्यादी पवित्र ठिकाणी. २०. **श्मश्रूकर्म** – हजामत. **समर्थवनिता** – धन-बल-अधिकार-संपन्न पुरुषाची पत्नी. २१. **हाटचोहटा** – बाजारातील चव्हाटयावर. २२. **चूर्ण** – चुना. **फोडणी** – विडा. २४. **थोटा** – दरिद्री असून कज्जेदलाल अशा लोकांस. २६. **गुह्य** – गुप्त गोष्ट. **श्लाघे** – स्तुती करतो. २८. **अल्पभोजी** – थोडे जेवणारा. **शीघ्रभोजी** – जलद जेवणारा. २९. **तापियाकोपियांसि** – तापट व रागीट यांस. ३०. **आडवीं** – प्रतिकूल. ३१. **हाटचोहटां**. . . रस्त्यात उभा राहतो, खातो व गातो. ३२. जो सुस्वरूप व तरुण दासीस घरात निर्भ्रांतपणे ठेवतो व त्यामुळे ज्याची पत्नी विरक्त बनते, तो एक मूर्ख जाणावा, हा अर्थ. ३३. **सुरवाड** – सुख. ३४. **न मनी** – मानीत नाही. **बुझावणी** – समजूत. ३५. **गोंवी** – गुंतवी; घाईघाईत चाललेल्या माणसास वचनबद्ध करतो. ३६. **विषमासनीं** – उंचसखल आसनावर. **खट्वासनीं**–खाटेवर बसून. ३७. **राहाटणें** – वागणे. ३८. **भंडमा** – हालअपेष्टा, उपहास. ३९. **धणी**–गृहस्वामी. ४१. **जागतया**– जागून. ४३. **वाटे** –रस्त्यावर. ४४. **मोडके** – पडझड झालेल्या, मोडकळीस आलेल्या. **स्वल्प मानूनि** – नदीचा पूर मोठा नाही असे मानून. ४५. **अवघडीं** –अवघड ठिकाणी. ४७. **बोल न खंडितां**. . . .दुसऱ्याच्या बोलण्याचे सप्रमाण खंडण न करिताच ते बोलणे खोटे आहे असे म्हणतो. ४८. **न पुसतां मात सांगणें** – विचारल्याशिवाय हकीकत सांगणे. ४९. **तांतडीभरें** – अविचाराने भराभर. ५१. **कदन्न** – वाईट अन्न. **संपादी** – मिरवितो. ५३. या ओवीतील दुसऱ्या व तिसऱ्या चरणांतील अर्थाच्या पूर्तीसाठी 'करी' ह्या क्रियापदाचा अध्याहार करावा लागतो. ५६. या ओवीवरून मुक्तेश्वराचे सूक्ष्म व्यवहारनिरीक्षण प्रत्ययास येते. ५७. **जेठा घालूनि** – ठिय्या देऊन. ५८. **जनाचिये दृष्टी** – चारचौघांसमोर. ५९. **द्विभार्यापति** – दोन बायकांचा दादला. ६५. **दुऱ्हावी** – दूर सारी. ६७. **हेळणा** – हेळसांड. ६९. **अभुक्त** – अल्पवयी स्त्री. ७०. **स्वगृहीं**. . . घरी पाहुणा जेवावयास आल्यास त्याला रुढीनुसार 'वाढू का?' असे जो विचारीत नाही तो. ७१. **राजवर्गी** – राजाच्या सेवकांना. ७२. **ध्यानस्था** – ध्यान लावलेल्या योग्यास. ध्यान हे योगाच्या यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान,

धारणा आणि समाधी या आठ अंगांपैकी सहावे अंग. दाटूनि – जाणूनबुजून. ७३. प्रवास करी – भटकण्यात वेळ दवडतो. ७४. माजे – उन्मत्त होतो. ७५. मांची – साठवतो, जमवतो. ७८. कर्पादिक – कवडी. ७९. श्रेष्ठ अश्रेष्ठ मानी मनीं – जो मनात कनिष्ठाला श्रेष्ठ मानतो. अयोग्य योग्यत्वें पूजणें – अयोग्य (अनधिकारी) व्यक्तीस योग्य मानून तिचा मानसम्मान करतो. ८३. साली – मेव्हण्याची बायको. मेहुणी – बायकोची वहीण. ८४. ब्रह्मद्वेषी – ब्राह्मणांचा द्वेष करणारा. वेदविकल्पी – वेदार्थाविषयी मनात विकल्प बाळगणारा. ८५. द्रव्य व्यवहारिता – आर्थिक व्यवहार करणारा. ८६. पलांडू – कांदा. श्रोत्रिय – वेद व वेदांगे यांत पारंगत व्यक्ती. अविधी – म्लेंच्छाप्रमाणे. ८८. 'अति सर्वत्र वर्जयेत् ।' हा उपदेश. जल्प – बडबड. विकल्प – संशय. ८९. उत्तर वयीं – उतार वयात, म्हातारपणी. जीविकेवीण – चरितार्थाचे साधन नसताना. ९०. विखंडी – तोडतो, बंद करतो. ९२. पाखांड – वितंडवाद. ९३. जेठियाशीं – मोठयांशी, समर्थांशी. होड बांधणें – स्पर्धा करणे. ९४. आडसांगडीं – सांगडीवाचून. सांगड–भोपळयापासून बनविलेले पोहण्यास उपयुक्त असे साधन. ९५. पैशुन्य – चहाडी, दुष्टपणा. हरिखें – हर्षाने, आनंदाने. ९६. विजया – भांग. आन – वेगळे, दुसरे. ९७. स्नुषा – सून. एकटगृहीं – घरी एकटीच असताना. ९८. शिजे – संतापतो किंवा चिडचिडा बनतो. नवाजे – स्तुती करतो. १०१. हिंपुटी – दुःखी, निराश. १०२. विषयावरी – विषयोपभोगाप्रीत्यर्थ. १०३. मनोनिग्रह – मन ताब्यात ठेवणे किंवा आवरणे. अध्यात्मशास्त्रात असे म्हटले आहे की, एकवार समुद्रपान करणे किंवा अग्निभक्षण करणे शक्य आहे, परंतु मनोनिग्रह करणे अशक्य आहे. १०५. काशीमरणें–काशीत मेल्याने मोक्ष मिळतो ही समजूत. अर्थवाद – केवळ प्रशंसापर अथवा निन्दापर वाक्य, अविश्वसनीय वचन, अतिशयोक्ती. १०६. सर्वदया – सर्वांवर दया करणे. हें विश्वास–विश्वास शब्दाचा हा नपुंसकलिंगी प्रयोग लक्षवेधक आहे. १०७. संन्यासी-विहित कर्मांचा विधिपूर्वक त्याग करून 'मी देह नाही तर मी आत्मा आहे,' असा निश्चय करणारा. सालंबी – आसक्त. या ओवीत ' आणि ' या अव्ययाचा अर्थ 'असून' असा घ्यावयाचा. १०८. साह्कारी – साह्यकर्ता. अदाता – दान न करणारा. महाधुरे – महाश्रेष्ठ. ११०. हें मत न बांधी या संकल्पा – अमुक एक मतच खरे अशी ठाम कल्पना करून न बसणारा, अमुक एका मताला मी बांधलेलो आहे असे न मानणारा. १११. राज्यधर – राज्यकर्ते, राजे. पाचार – निमंत्रण. ११२. देहीं – शरीरविषयक. भूतीं – प्राणिमात्रांविषयीचा. नाहीं झाला – नष्ट झाला. ११३. सांडावीं – टाकावी. मागे चौदाव्या ओवीत कवीने 'त्यागार्थ बुद्धी परिसावीं' असे म्हटलेच आहे.

# ४. भगवद्गीता

## अध्याय पहिला

१. भारतीय युद्धापूर्वी कौरव व पांडव यांची पूर्वापर सागरांप्रमाणे पसरलेली दोन्ही सैन्ये पाहून महर्षी व्यास धृतराष्ट्राकडे गेले. त्यांनी धृतराष्ट्राला शोकसंतप्त न होण्याचा उपदेश करून प्रत्यक्ष संग्राम पाहण्याची इच्छा असल्यास आपण दृष्टी देण्यास तयार आहोत असे सांगितले. परंतु धृतराष्ट्राने स्वकुळाचा वध पाहण्याची आपली इच्छा नाही, परंतु युद्धाचा वृत्तान्त ऐकण्याची मात्र आपल्याला इच्छा आहे, असे व्यासांना उत्तरादाखल म्हटले. तेव्हा व्यासांनी संजयाला वर देऊन धृतराष्ट्राला म्हटले, 'हा तुझा सूत संजय युद्धाचा सर्व वृत्तांत तुला सांगेल. रणांगणावरील कोणत्याही भागात चाललेले कोणत्याही प्रकारचे युद्ध याला परोक्ष होणार नाही, तर प्रत्यक्ष दिसेल. मी याला दिव्यदृष्टी देत आहे. त्या दिव्यचक्षूने युक्त झालेला हा संजय तुला युद्धाची इत्थंभूत हकीकत ऐकवील. माझ्या ह्या वराने तो सर्वज्ञ होईल. ह्याला प्रकट व अप्रकट तसेच दिवसा किंवा रात्री घडलेले सर्व वृत्त कळेल. याला शस्त्रे तोडणार नाहीत. याला श्रमाची बाधा होणार नाही. हा युद्धातून जिवंत परत येईल.' (महाभारत, भीष्मपर्व, अध्याय २). **कौरव** – धृतराष्ट्राने स्वपुत्रांचा असा तिऱ्हाईतासारखा केलेला निर्देश खटकतो. कवीने मुळातील 'युयुत्सवः' शब्द अनुवादातून वगळला आहे. २. **परियेसी** – ऐक. हा शब्द निरर्थक आहे. 'द्रोणापाशी' ऐवजी द्रोणासी असे हवे होते. कवीने मुळातील 'व्यूढं' शब्द वगळला आहे. शिवाय, 'संजय म्हणे रायासी' हे शब्द ओवीत योजून संपूर्ण श्लोकार्थात न्यून उत्पन्न केले आहे. ३. **द्रुपदपुत्रें** – धृष्टद्युम्नाने. कवीने मुळातील 'महतीं', हा शब्द वगळला आहे. ४. **महारथी** – जो वीर एकदम अकरा हजार योद्धयांशी लढतो व जो शस्त्रास्त्र-विद्येत प्रवीण असतो त्यास महारथी म्हणतात. ५. **अतितीक्ष्ण** – मुळात या अर्थाचा शब्द नाही. अर्थात ही कवीची पदरमोड आहे. **कौंति** – मुळात कुंतिभोज शब्द आहे. ६. **सौभद्रेय** – सुभद्रेचा पुत्र अभिमन्यू. ७. **विशिष्ठा** – नामांकित. विशिष्ट शब्द हवा होता. **सुभटा** – मोठे योद्धे. मुळातील 'संज्ञार्थं' शब्द अनुवादात नाही. ८. **तूं** – मुळात भवान् (आपण) असा शब्द आहे. **नीतिसंपूर्ण** – मुळात 'समितिंजयः' असे विशेषण आहे. कदाचित मुक्तेश्वरापुढील संहितेत नीतिसंपूर्ण हा किंवा ह्या अर्थाचा शब्द असावा. ९. **प्रेरणार** – मुळात 'प्रहरणाः' शब्द आहे. १०. **प्रौढी** – प्रौढपणे, पराक्रमाने. ही कवीची पदरमोड असली तरी मार्मिक वाटते. **बलहीन** – ह्याला मुळात आधार नाही. तरीही ही पदरमोड अन्वर्थक आहे. **बलाने** – एतदर्थक शब्द मुळात नाही. शिवाय हा शब्द योग्य नाही. ११. मुळातील 'अवस्थिताः' शब्द वगळला आहे. शिवाय या ओवीचे अखेरचे दोन चरण मुक्तेश्वरकल्पित आहेत. १२. **सिंहनाद** – मोठी गर्जना. मुळातील 'उच्चैः' (मोठ्याने) शब्दाचा 'प्रतापें' हा कविकृत अनुवाद खटकतो. १३. **पणवानकें** – झांजा व

मृदंग. **एकसरीं** – एकदम. **थोर** – हा मळातील 'तुमुल' शब्दाचा अनुवाद निष्प्रभ आहे १४. मुळात कृष्ण व अर्जुन असा क्रम आहे. कवीने तो पांडव व श्रीपती असा बदलला आहे. १५. **वीर** – ही कवीने घातलेली भर चांगली आहे. परंतु मुळातील 'महाशंखं' हे अर्थपूर्ण पद कवीने वगळले आहे. **पांचजन्य** – पंचजन नामक दैत्यापासून हा शंख कृष्णास मिळाला. **देवदत्त** – इंद्राने अर्जुनास हा शंख दिला. **वृकोदर** – खादाड. १६. मुळातील कुंतीपुत्र व सुघोष हे दोन शब्द कवीने वगळले आहेत. १७. **थोर**–कवीची ही पदरमोड सुखावह आहे. १८. **विख्यात** – हा कविकृत अभिमन्यु-गौरव रास्त आहे. मुळातील 'महाबाहुः' विशेषणापेक्षा 'विख्यात' हे विशेषण अधिक चांगले आहे. १९. मुळातील 'तुमुल' हा अर्थपूर्ण शब्द कवीने वगळला आहे. मुळातील 'धार्तराष्ट्राणां' शब्दाचे **दुर्योधनासि** हे भाषान्तर चुकीचे आहे. तसेच 'नभश्च पृथिवीं' (आकाश व पृथ्वी) या शब्दांचे '**पाताळशिखरें**' हे भाषांतरही चुकीचे आहे. 'दुःखानळ भरे' ही कवीची पदरमोड अनावश्यक आहे. २०. **कपिध्वजवीर** – ज्या वीराच्या निशाणावर वानर आहे असा अर्जुन. **देखोनि शस्त्रबडिवार** या शब्दांनी मुळातील 'प्रवृत्ते शस्त्रसंपाते' शब्दांचा अर्थ बिनचूकपणे व पूर्णपणे व्यक्त होत नाही. **वहिलें** हा कविप्रयुक्त शब्द अनावश्यक आहे. २१. मुळातील इदं शब्दाचा अर्थ अनुवादात उतरला नाही. **निगुती** – निर्भ्रान्तपणे. हा शब्द अप्रस्तुत आहे. २२. या ओवीचे अन्तिम दोन चरण मुळाला सोडून आहेत. मुक्तेश्वरासमोरील संहितेत वेगळा पाठ असावा. २३. **कौरवपती** – कौरवपतीचे. **निगुती हा शब्द** पादपूरणार्थक आहे. २४. **बोलोनियां**–बोलल्यावर. पण हा अर्थ ओढून-ताणून लावावा लागतो. २५. मुळातील द्रोण व सर्वेषां हे शब्द वगळले आहेत. शिवाय, **'पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरून्' ही कृष्णोक्ती वगळून तिला कवीने वर्णनरूप दिले आहे.** २६. **पितृव्य – हा शब्द** मुळात नाही. मुळातील पितॄन्, मातुलान् व पौत्रान् हे शब्द अनुवादात नाहीत. २८. मुळातील 'कृपया परयाविष्टो विषीदन्' या व्यासकृत अर्जुनवर्णनाचे मुक्तेश्वराने अर्जुनवचनात केलेले रूपान्तर अस्वाभाविक वाटते. २९. **दुःख**–हे मुळातील सीदन्ति शब्दाचे भाषान्तर सदोष आहे. ३०. **संतापान**–संतापाने. यमकाच्या सोयीसाठी कवीने असा रूपभंग केला आहे. मुळातील अर्थाच्या क्रमाच्या दृष्टीने पाहता मुक्तेश्वरी ओवीतील तिसरा चरण चवथ्याच्या जागी व चवथा तिसऱ्याच्या जागी हवा होता. ३१. **सुख** – मुळातील श्रेयस् शब्दाचा हा अनुवाद अपर्याप्त आहे. ३२. **चाड**–गोडी. मुळातील 'कांक्षे'चा हा अनुवाद फिका आहे. **राज्यसुखाची**–मुळातील 'राज्यं सुखानि च' शब्दांचे हे एकत्रीकरण असमाधानकारक आहे. मुळात अर्जुनाने राज्य, भोग व जीवित या तीन गोष्टी निरुपयोगी असल्याचे म्हटले आहे. अनुवादात जीवित शब्दाचा अर्थ न आल्यामुळे तो निर्जीव झाला आहे ! ३३. मुळातील राज्यं व सुखानि या शब्दांचे अर्थ अनुवादात उतरले नाहीत. मुळात प्राण व धन शब्द असमस्त आहेत. ३४. **बोलिजे वाचे** हे कवीच्या पदरचे शब्द अनावश्यक आहेत. मुळातील श्वशुराः, पौत्राः व सम्बन्धिनः हे शब्द वगळले आहेत. ३५. **केंवा** –

पाड. ३६. **सुख**–मुळातील प्रीतिः शब्दाचे हे रूपान्तर अनुत्कट आहे. शिवाय मुळातील प्रश्नाला विधानाचे रूप दिल्यामुळे जोरकसपणा उरला नाही. तसेच आततायिनः हा अत्यन्त महत्त्वपूर्ण शब्द वगळला आहे. ३७. स्वजनं व अर्हा हे अर्थपूर्ण शब्द वगळले आहेत. ३८. मूळ श्लोकाच्या तुलनेने ओवीची रचना विस्कळित आहे. शिवाय, लोभोपहतचेतसः हे महत्त्वपूर्ण विशेषण अनुवादात नाही. ३९. **पापापासाव** – पापापासून. प्रपश्यद्भिः शब्द वगळला आहे. 'ऐसें आहे' ही कवीने घातलेली भर अर्थशून्य आहे. ४०. मुळातील सनातनाः शब्द वगळला आहे. अधर्म शब्दाचा पाप हा अनुवाद बिनचूक नाही. ४१. अभिभवात् शब्दातील अर्थच्छटा अनुवादात नाही. स्त्रीषु दुष्टासु शब्दांचे 'अधर्म चालल्यियावरी' हे रूपान्तर चुकीचे आहे. ४२. **अघोरीं** – घोर नरकात. मुळातील कुलघ्नानां शब्दाचा अनुवाद झाला नाही. मूळ श्लोकाचा उत्तरार्ध अनुवादात स्पष्टपणे व पूर्णपणे उतरलेला नाही. ४३. मुळातील शाश्वताः शब्दाचा अर्थ अनुवादात नाही. शिवाय **बुडे** हे उत्साद्यन्ते शब्दाचे भाषान्तर फिके आहे. ४४. **अधर्म** – हा मुळातील कुलधर्माणां शब्दाचा अनुवाद सदोष आहे. अघोरीं व श्रीहरी हे दोन्ही शब्द अनावश्यक आहेत. नियतं हा महत्त्वपूर्णशब्द अनुवादात उतरला नाही. ४५. मुक्तेश्वरी ओवीत मुळातील अर्थ सुसंगतपणे आलेला नाही. ४६. **उगला** – उगाच. मुळातील क्षेमतर शब्दाचे क्षेम हे रूपान्तर सौम्य वाटते. ४७. मुळातील संख्ये, रथोपस्थः व संविग्नमानसः ह्या शब्दांचा अनुवाद झालेला नाही.

## अध्याय दुसरा

२. **कश्मल**–मोह. **विषमकाळी**–आणीबाणीच्या वेळी. ५. **भिक्षा**–क्षत्रियास न साजेशी भिक्षावृत्तीही परवडली हा भाव. **रुधिराक्त**–रक्ताने माखलेले. ८. **त्रिदशेंद्रलक्ष्मी** – इंद्राची धनदौलत. १०. **हांव**–इच्छा. ११. **पंडित**–पण्डायुक्त ( पण्डा म्हणजे बुद्धी ). १२. **असंख्यात** – अगणित जन्म व मृत्यू. १४. **विषय** – रूप, रस, गंध, स्पर्श व शब्द हे पाच विषय. १५. **मोक्ष** – निखिलदुःखनिवृत्तिपुरस्सरं स्वात्मानन्दावाप्तिः। चार्वाक, माध्यमिक, योगाचार, विज्ञानवादी, जैन, त्रिदण्डी, वैष्णव, रामानुजीय, माध्व, वल्लभीय, माहेश्वर, पाशुपत, हैरण्यगर्भ, रसेश्वरवादी, तार्किक, भाट्ट, प्राभाकर, पाणिनीय, योगी, सांख्य इत्यादी विविध दार्शनिकांनी आपापल्या परंपरेनुसार मोक्षलक्षण केले आहे. (पाहा–भिक्षु–गौरीशङ्कर–संगृहीत सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः, वाराणसी, संवत् २००६, पृ. १६३–१६५) १६. **दोन्हीपण**–भाव व अभाव १९. **हा**–आत्मा. २२. **कलेवर**–देह, शरीर. २३. **बुडविणार**–मुळातील क्लेदयन्ति शब्दाचे हे भाषान्तर युक्त नाही. २४. **न**–न बुडे, न तुटे, न शोषे असा अन्वय. २५. **अव्यक्तीं** – वस्तुतः व्यक्ती असा शब्द हवा. ३०. **वचे** – वजे–जात. ३४. **तेणें**–तें असा शब्द हवा. पाठभेद योग्य आहे. ३५. **रथियांसी**–योध्द्यांस. ३६. **लाज**– दुष्कीर्ती. ४०. **निष्काम**– फलाशारहित. **प्रत्यवाय**– विधीचे उल्लंघन केल्याने

घडणारे पाप. **महाभयें**–मोठ्या आपत्तींपासून. ४१. **बहुभाव्य**–चंचल, अस्थिर. ४४. **कामनाहृत** – वासनांनी आकर्षिलेला. **समाध** – समाधी. ४५. **त्रिगुणात्मक** – सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त. **द्वंद्व** – आपपर, सुखदुःख इत्यादी. ४६. **ऱ्हदाचे**– सरोवराचे. ४८. **योग** – समाधानाने व परमेश्वरार्पण बुद्धीने कर्म करणे. ५०. **हरपती** – नाहीशी होतात. ५३. **श्रवणसंदेह** – श्रवणामुळे होणारा बुद्धीचा गोंधळ. ५५. **नातळे**–स्पर्श करीत नाही. ५६. **वीतरागी** – मनाने विरक्त. ५७. **आनंदबुद्धि** – आनंदी वृत्ती. ५८. **आंवरी** – आखडून घेते. **सरसें** – अंगा-बरोबर. ५९. **फांसे** – पाश. **ब्रह्मदर्शनें**–ईश्वराच्या दर्शनाने. ६०. **प्रयत्नविचक्षण** – प्रयत्नशील बुद्धिमान. ६३. **मोहो** – ममत्वबुद्धी; चित्ताची विकलता. ६४. **रागद्वेष**– प्रीती व तिटकारा. **प्रसाद**–मनःशांती. ६५. **बोहरी**–भस्म. ६७. **विचरत**–भटकत. ६८. **करी वंचना**–दूर राहणे. ७०. **कामनालीन** – ज्याच्या अंतःकरणाला कामना क्षुब्ध करीत नाहीत तो. ७१. **निस्पृह**–वासनारहित.

## अध्याय तिसरा

१. **अघोरकर्मी** – क्रूर कर्मामध्ये २. **मिश्रितवाक्ये** – उभयार्थक वचने. ३. **ज्ञानदाता** – ज्ञानयोग. ४. **सिद्धी** – मोक्ष ५. **दाटूनियां** – इच्छेविरुद्ध. ६. **कर्मेंद्रियांतें** –हात, पाय, तोंड, गुद व उपस्थ ही पाच. **सांडी** – त्याग. ७. **स्वभावीं**– मनापासून. ८. **देहअवसानीं** – येथे विसंधी दोष आहे. ९. **बद्ध** – कर्मबद्ध. १०. **उत्तरें** – आशीर्वादवचने. ११. **भावें** – मनोभावे. १२. ही ओवी मूळच्या ओवीशी अर्थ-दृष्ट्या जुळत नाही. १३. **यज्ञशेष** – यज्ञीय देवतांना हवी अर्पण केल्यानंतर उरलेला भाग. १५. **अक्षराहूनी** – अविनाशी तत्त्वापासून. १७. **न लागती** – आव-श्यकता नाही. १९. पहिल्या दोन चरणांचा अन्वय 'सकाम कर्म निष्काम करावें' असा लावावा. २०. **विदेह** – विरक्त. २१ **प्रमाण** – मान्य. २२. **अवाप्त** – न मिळालेले. २३. **न वर्तवीं** – केले नाही तरी. **पडे** – घडणार नाही. २४. **संकर** – वर्णसंकर. पूर्वी पहिल्या अध्यायाच्या ४१ – ४३ श्लोकांत अर्जुनाने संकराची भीती व्यक्त केली आहे. तिला अनुलक्षून येथील कृष्णवचने ध्यानात घ्यावीत. २५. **श्रेष्ठीं**– श्रेष्ठ पुरुषाने. **दोनी सोई** – दोघांच्या सोयीसाठी २६. **ज्ञानीं** – ज्ञानी व्यक्तींनी २७. **नेणत्या** – अडाणी माणसास. २९. **खवळूं** – चाळवू. ३२. **चेवले** – ढळले. ३६. **वार्ष्णेया !** – कृष्णा ! ३७. **निपजती** – निर्माण करतात. ३८. **मळें** – धुळीमुळे. **जाळें** – वारेने. शेवटच्या चरणात झाकला हे क्रियापद अध्याहृत आहे. ३९. **तेणें** – अज्ञानाने. ४१. **इंद्रियदमना !** – इंद्रिय-दमन करणाऱ्या अर्जुना ! **नियमीं**–नियमन कर. **असें**–राहा. ४२. **पर** – मोठी. ४३. **वैराग्यअग्नीनें** – हे विसंधी दोषाचे उदाहरण.

## अध्याय चवथा

१. **रवी**–विवस्वान. हा सूर्यवंशाचा मूळ पुरुष. २. मूळच्या श्लोकाचा उत्तरार्ध

ह्या ओवीच्या शेवटच्या चरणद्वयाहून वेगळा आहे. ३. **अनादी**–सनातन. ४. **आलीकडे**–अलिकडील. ५. **जीवत्वें**–मायेमुळे. ६. **अव्यय**–नाशरहित. ७. **ईश्वर**–नियन्ता. **स्थानभ्रष्टता** – ग्लानी. **पर्येसीं**–ऐक. ८. **साधु** – ' निर्वैरः सदयः शान्तो दम्भाहङ्कारवर्जितः । निरपेक्षो मुनिर्वीतरागः साधुरिहोच्यते ।' ( सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः, वाराणसी, संवत् २००६, पृ. २२० ). ९. **पावती** – येऊन मिळतात. १०. **स्वरूपीं** – मत्स्वरूपी. ११. **माझे मार्गी** – माझ्या प्राप्तीसाठी; माझाच मार्ग. १२. **क्षणीं** – तत्क्षणी. १३. **वर्ण** – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण. १४. **जाणते** – ज्ञाते. **कर्मी** – कर्मांनी. १५. मुक्तेश्वरासमोरील संहितेतील ह्या श्लोकाचा पाठ वेगळा असावा. कारण मुक्तेश्वरी ओवी अर्थदृष्टया या गीताश्लोकाशी जुळत नाही. १७. **विकर्म** – विरुद्ध कर्म. १९. **दाहकारी** – दहन करणारा. २०. **न बाधिजेल** – बद्ध होत नाही. २२. **चाड** – पर्वा. **विचारी** – आत्मचिन्तक. २३. **यज्ञार्थ** – यज्ञयागासाठी. २४. **कर्मब्रह्मसमाधि** – ब्रह्मचिन्तनरूप कर्मसमाधी. २५. **यज्ञरीतींच** – यज्ञ करतात त्याप्रमाणेच. २७. **निरोधाग्नींत** – इंद्रियनिरोधरूप अग्नीमध्ये. २८. **त्रिविध** – कायिक, वाचिक व मानसिक. **स्वाध्याय** – श्रेष्ठ ग्रंथांचा अभ्यास. ३०. **प्राणीं** – प्राणवायूमध्ये. ३२. **विस्तारले** – विस्तृतपणे सांगितले. **सूटसी** – मुक्त होशील. ३३. **ज्ञानीं** – ज्ञानात. **संपती** – संपुष्टात येतात, गतार्थ होतात. ३५. **ऐक्यतेसी** – अभेदपणे. येथे भाववाचक नामाचे भाववाचक नाम बनविले आहे ! ३७. **महाभार** – पुष्कळ. ३८. **सिद्धियोग** – योगाभ्यास. **ज्ञानेंकरूनि**– कालेंकरूनि असा पाठ असावयास हवा होता. ३९. **थोरत्व** – मोक्ष. थोर या प्राकृत शब्दाला त्व हा संस्कृत प्रत्यय लावला आहे. ४०. **संशयबुद्धी** – संदेहात्मा. **दोन्हीं लोक** – इहपरलोक. ४१. **शास्त्रें** – शास्त्राध्ययनाने. ४२. **संशय करून** – संशय उत्पन्न झाल्यामुळे. **योग** – कर्माचरण.

## अध्याय पाचवा

१. **संन्यासकर्म**–संन्यासयोग व कर्मयोग. **निश्चय**–निःसंदिग्धपणे. २. **एक**–मोक्ष. ३. **द्वंद्व**–द्वैतभाव. **बंधापासोनि**–बंधनापासून ४. **सांख्ययोग**–सांख्य म्हणजे कर्मसंन्यास आणि योग म्हणजे कर्मयोग. **ज्ञानी**–अज्ञानी असा पाठ असावयास हवा होता. ५. **सांख्यें**–सांख्य मार्गाने. **योगानें**–कर्मयोगाने. ७. **विषयां**–वेगवेगळया इंद्रियांचे वेगवेगळे विषय. ८. **म्हणती**–फलाशारहित कर्माचरण करणारे म्हणतात. ९. **पातें**–डोळयाची पापणी. या ओवीतील शेवटच्या चरणात ज्ञानी हा कर्ता अध्याहृत आहे. १०. **संग**–आसक्ती. १२. **कामनाबंधें**–फलेच्छेच्या आसक्तीमुळे. १३. **देही**–देहधारी. **नवद्वारपुरीं**–दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुडया, एक तोंड, एक गुद व एक उपस्थ अशी नऊ द्वारे असलेल्या शहरात. १४. **या लोकांत**–मूर्ख लोकांत. १५. **न घे**–या क्रियापदाचा अध्याहृत कर्ता ईश्वर. १६. **तो**–आत्मज्ञानी. १९. **सम**–समत्व. **ब्रह्मीं**–

ब्रह्माच्या ठायी. **सम**—समबुद्धियुक्त. २२. **गरलसार**—अत्यन्त जालीम विष. २३. **वेग**—आवेग. २४. **प्रकाशे** – उजळते. **अंतरसुख** – आंतरिक सुख. **आराम** – विश्रांतिस्थान. २६. **ब्रह्मात्मवित्**—ब्रह्मवेत्ता. २७. **भोंवयांवर**—भुवयांच्या मध्यभागी. २९. **जाणता**—मला जाणणारा. **सखा**—मित्र.

## अध्याय सहावा

१. **साग्निककर्माचा**—अग्निहोत्र—होमहवनादी कर्मांचा. ३. **निभ्रांत**—खरोखर. **शमबुद्धि**—ज्याची बुद्धी स्थिरावली आहे तो. ४. **आपण**—आपोआप. ६. **बंधुरात्मा**—आत्मा हाच बंधू. ७. **परनिष्ठा**—ईश्वरनिष्ठ. ८. **अविनाश**—चिरंजीव. **नकळे**—सोने व माती ही दोन्ही ज्याला वेगळी वाटत नाहीत. ९. **उदासीन**—तटस्थ. १०. **आशापरिग्रह**—मायेचा गुंता. ११. **कुशचर्मवस्त्र**—प्रथमतः दर्भ, मग त्यावर मृगचर्म व नंतर वस्त्र. १३. **काया**. . .काया, कटी, हनवटी सम( सरळ )करून. **परिपाटी** – चलनवलन. १५. **निजवस्तु**—परतत्त्व. १६. **लक्ष्यीं**—ईश्वरचिंतनी. १७. **बोध**—ज्ञान. **योग**—जीवात्म्याचा परमात्म्याशी संयोग. १८. **युक्त**—गरजेपुरता. **सिद्ध**—योगी. १९. **नेमिलें**—नियमन केले. **निर्वातसदनीं**—जेथे वायू नाही अशा स्थळी. २१. **अगोचर**—अगम्य. **चळे**—ढळे. २२. **बाहीं**—अवस्थेत. २४. **झाले**—उत्पन्न झालेले. २५. **करूनि**—स्थिर करून. **धारणेनें**—चित्ताच्या स्थिरतेने. **मन**—मनात. २६. **सैराट**—इतस्ततः. **विचार राहे आत्मतत्त्वीं**—आत्म्याच्या ठायी विचार राहील असे वाग. २७. **ब्रह्मभूत**—ब्रह्मस्वरूपी. **प्रशांती**—उत्तम शांती. २८. **किल्बिषें**—पापे. २९. **आत्मत्वें**—आपल्या ठायी. ३१. **मजवेगळें**—माझ्यापासून वेगळा. ३२. **आपलें**—आपल्यासारखे. ३५. **अभ्यासवैराग्यें**—अभ्यास व वैराग्य यांच्या योगाने. ३६. **दुःखें करूनि**—कितीही क्लेश सोसले तरी. ३७. **चळोनि**—मन चळल्यामुळे. ३८. **उभयभ्रष्ट**—कर्म व ज्ञान या दोन्ही मार्गांपासून भ्रष्ट. ३९. **संशयपरिहरिता**—संशयाचा परिहार करणारा. ४०. **दुर्गती न जाय**—दुर्गती प्राप्त होत नाही. ४१. **पुण्यश्लोक**—पवित्र कीर्तीचे. ४२. **या लोकीं**—या जगात अवतार घेतात. शेवटच्या दोन शब्दांचा अध्याहार करावा लागतो. ४४. **पूर्वी**—गतजन्मी. ४७. **अंतःकरण**—परमेश्वराचे ठायी अंतःकरण ठेवतो. ४७. **मानला**—मान्य झाला.

## अध्याय सातवा

१. **जयापरी**—ज्यायोगे. २. **जाणितलिया**—जाणल्यावर. **जाणणे**—जाणण्याजोगे. ३. **जाणे** – पूर्णपणे किंवा यथार्थपणे जाणतो. ४. **आठ** – पृथ्वी, उदक, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी व अहंकार ही आठ. **जुनाट** – पुरातन. **वेगळाली** – विभागलेली. ५. **आणीक** – भिन्न. ६. **योनी** – मूळ कारण. **सती**-? ७. **पटीं तंतू**—ही कवीची मुळात भर. ८. **ॐकार**– ॐमध्ये अ, उ व म अशी तीन अक्षरे आहेत. ती अनुक्रमे विष्णू, शिव व ब्रह्मा यांची वाचक आहेत. ९. **जीवनठाय** – प्राण. ११. **कामरागविवर्जित** – इच्छाद्वेषरहित. **धर्माविरुद्ध**—धर्मास धरून. **भूतीं** – प्राणिमात्रांत. १२. **तयांमाजी** –

त्यांच्यामध्ये १३. **चुकले** – चुकलेले. १५. **हरपलें** – नाश पावले. **असुरभाव** –राक्षसी वृत्ती. १६. **अर्थकामी** – धनार्थी. १७. **नित्ययुक्त** – ज्याचे लक्ष सदा ईश्वरावर लागलेले असते असा. **आवडें** – मी आवडतो. १८. **उदार** – मोठे. १९. **वासुदेव** – सर्व जग वासुदेवमय आहे असे जाणून. २० **अन्यदेवता** – माझ्याखेरीज इतर क्षुद्र देवता. **स्वप्रकृतीवश** – आपापल्या स्वभावाच्या अधीन. **नेमें** – उपासनेचे भिन्न नियम. २१. **देवतेनें** – देवतेकरवी. २२. **अचळश्रद्धा** – दृढ भक्ती. २३. **गती** – फळ. **पावती** – माझ्याकडे हा शब्द अध्याहृत मानावा. २४. **उत्कृष्टभाव** – सर्वश्रेष्ठ स्वरूप. **मूढपणें** – अज्ञानामुळे. २५. **वेष्टिलें** – मज शब्द अध्याहृत समजावा. २६. **वर्ततें** – जिवंत आहेत. २९. **आश्रयें** – माझा आश्रय करून. **कर्म अध्यात्म अवघें** – त्यांना (ब्रह्मज्ञान), कर्मज्ञान, अध्यात्मज्ञान इत्यादी सर्व प्रकारचे ज्ञान होते.

## अध्याय आठवा

१. **निवाडा** – खुलासा. **निवडूनी**–वेगवेगळे करून. २. **तूं**– तुला. **यतचित्तीं** – आतमसंयमी पुरुषांनी. ३. **विसर्गकर्म** – उत्पत्ती व वृद्धी करणारे सर्व कर्म. ४. **सर्वांत** – सर्व चराचरामध्ये व देहात. ६. **त्यांतें** – त्या देवतांच्या स्वरूपात. ७. **मनबुद्धि** – मन आणि बुद्धी. ९. **कवि** – सर्वद्रष्टा. **लोकशिक्षा** – चराचराचे शासन. १०. **चंचळ** – मुळात अचलेन शब्द आहे. **बळी**–योगबलसंपन्न. **भ्रुकुटी भेदी** – प्राणवायूस भुवयांच्या मध्यभागी स्थिर करतो. ११. **ज्ञान**–ज्ञानसंपन्न. **तयातें**–अविनाशपदाला. १२. **द्वारें**–इंद्रिये. **मस्तकासि** – मस्तकात. १४. **योगयुक्त** – समाधिनिष्ठ. १५. **चोज** – नवल. **थोरगती**–मोक्ष. १६. **मागुती पतन** – पुनर्जन्म. १७. **ब्रह्मयाचा दिवस** – **ब्रह्मदेवाचा** एक दिवस म्हणजे मानवी सहस्र युगे. **संकेत**–प्रमाण. **ही**–ही गोष्ट. **अहोरात्रिज्ञानी**–ज्योतिषी. १९. **उपजे**–उत्पन्न होते. **जाय**–नाश पावते. **पुढतपुढती**–पुन:पुन:. **दिवसीं**–ब्रह्मदेवाचा दिवस उगवला की. २२. **भूतीं** – चराचराचे ठायी. २३. **पुनरावृत्ती** – पुनर्जन्म. २४. **तेथे** – दिवस व शुक्ल पक्ष यांच्या देवता व अग्नी या सर्वांचे अधिष्ठान आहे तेथे. २७. **सृती** – मार्ग, गती.

## अध्याय नववा

१. **गुह्य**–गुप्त ज्ञान. २. **राजविद्या**–श्रेष्ठ ज्ञान. **धर्म**–धर्मसाधक. ३. **जन्मसंसारीं**–जन्ममरणांच्या फेऱ्यांत. ४. **मज आश्रयो नसे**–मला त्यांचा आश्रय नाही. ५. **ऐश्वर्य**–प्रभुत्व. **निरुतें**–खरोखर. **आरुतें**–अलिकडे. ६. **अव्यक्तमूर्ती**–निरवयव. ७. **साठवून**–प्रकृतीत समाविष्ट करून. **कल्पादीं**–कल्पाच्या म्हणजे ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या आरंभी. ८. **मागुतेमागुतेनी** – पुन्हापुन्हा. **भूतग्राम**–चराचरांचा समूह. ९. **उदास** – अनपेक्ष, नि:संग. **नव्हें**–नमतो. ११. **मूढलोक**–अज्ञानी लोक (मला मनुष्य समजतात). **ईश**–सर्वांचा निर्माता. १२. **मोहिनी**–मोहपूर्ण. १३. **महासुबुद्ध**–उत्कृष्ट ज्ञानी. **सदाश्रित**–पूज्य ईश्वराच्या ठायी आश्रय घेणारे. १४. **कीर्तन**–श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन,

अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन या नवविधा भक्तीपैकी एक. **उपासना**–आराधना, सेवा. १५. **विश्वतोमुखी**–विश्वव्यापी. १६. **याग**–यज्ञ. **यज्ञ**–भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ व ब्रह्मयज्ञ. **स्वधाकार**–हवी. **औषधी**–वनस्पती. **आज्य**–तूप. **हुत**–आहुती. १७. **चहूं**–ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद या चार वेदांचा. १८. **गती**–पुरुषार्थ. **स्थान**–राहण्याची जागा. **अधिष्ठान**–आश्रयस्थान. **बीज**–मूळ कारण. १९. **सदसत्**–अस्तित्व व अभाव. २०. **सोमपान**–सोमवेलीचा रस पिणे. हा शरीर, मन व बुद्धी यांच्या शक्तींची वृद्धी करणारा असतो. **दिव्य**–स्वर्गीय, देवांना मिळणारे. २१. **मायीक**–निस्सार. **कामी**–कामना बाळगणारे. २२. **अन्यठायीं**–अन्य देवतांचे ठिकाणी. **योगक्षेम**–चरितार्थ. न मिळालेले मिळविणे व मिळालेल्याचे रक्षण करणे. २३. **सोई**–रीती, उपाय. २४. **च्यवतील**–भ्रष्ट होऊन जन्ममरणांच्या फेऱ्यात सापडतील. २८. **सुटे**–नाहीसा होतो. २९. **द्रोही**–अहितेच्छू, अनिष्टचिंतक. ३१. **ते**–दुराचारी पण ईश्वरोपासक. **धर्मी**–धर्मपरायण. ३२. **पापयोनि**–अंत्यज. ३३. **सुखलोक**–'असुखं लोकम्' असे शब्द मुळात आहेत. ३४. **मजउद्देशें**–माझ्यासाठी.

## अध्याय दहावा

१. **हितोपदेशितों**–हितकारक उपदेश करतो. २. **सुरवर**–इंद्रादी देव. ३. **मनुष्यांतें**–मनुष्यांत. **बंधापासूनियां**–मायापाशापासून. ५. **मजपासुनी**–हा शब्द मुळास सोडून आहे. ६. **मनू**–एकूण मनू चौदा, ते असे–स्वायंभुव, स्वारोचिष, औत्तमि, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत, सावर्णि, दक्षसावर्णि, ब्रह्मसावर्णि, धर्मसावर्णि, रुद्रसावर्णि, देवसावर्णि आणि इंद्रसावर्णि. ८. **प्रवृत्ति**–चैतन्य. **भावयुक्त**–भक्तियुक्त. ९. **गाथा**–लीला, माहात्म्य. ११. **सोज्वळ**–प्रकाशमान. १४. **साच**–सत्य, खरोखर. १५. **भूतभावन**–विश्वाचा उत्पत्तिकर्ता. १६. **विभूतीं**–विभूतींच्या द्वारे. १९. **येरा**–इतर. २०. **निर्धारीं**–खरोखर. २१. **अदितिपुत्रांत**–अदिति ही कश्यप ऋषीची पत्नी. तिचे बारा पुत्र असे–धाता, मित्र, अर्यमा, इंद्र, वरुण, सूर्य, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वष्टा व विष्णू. **मरुद्गणांमाजी**–मरुत् सात आहेत, ते असे–अवह, प्रवह, विवह, परीवह, उद्वह, संवह, आणि परिवह. २२. **इंद्रियांत**–कर्मेंद्रियांत. २३. **रुद्रांमध्ये**–वीरभद्र, शंभु, गिरीश, अजैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली आणि स्थाणू या अकरा रुद्रांमध्ये. **यक्षांमध्यें**–यक्ष हे कुबेराचे सेवक. **वसूंमध्यें**–वसू पुढीलप्रमाणे आठ आहेत– धर, ध्रुव, सोम, अह, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास. **पर्वतांत**–महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, ऋक्ष, विंध्य व पारियात्र या सात कुलपर्वतांत. **मेरू**–सुवर्णमय व रत्नमंडित पर्वत, देवांचे निवासस्थान. २५. **ऋषींमाजी**–कश्यप, अत्रि, वशिष्ठ, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व भरद्वाज ह्या सात ऋषींमध्ये. **एकाक्षर**–ॐ हे अक्षर. **स्थावरीं**–अचल पदार्थांमध्ये. २६. **अश्वत्थ**–पिंपळ. २७. **उच्चैःश्रवा**–समुद्रमंथनातून उत्पन्न झालेला अश्व. ह्याला सात तोंडे असून हा सूर्याचे वाहन आहे. **ऐरावत**–इंद्राचे

वाहन असलेला चतुर्दंत हत्ती. २८. **वज्र**–अमोघ शस्त्र. **परिकर**–समूह. २९. **अनंत**–शेष. **संयमांत**–शासन करणाऱ्यांमध्ये. ३१. **शस्त्रधरांत**–योद्धयांत. **झषांमाजी**–जलचरांमध्ये. ३२. **विद्यांमध्यें** –ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद, शिक्षा, कल्प, व्याकरण' निरुक्त, छन्दोविचिति, ज्योतिष, आन्वीक्षिकी, मीमांसा, स्मृतितन्त्र व पुराण अशा एकूण चौदा विद्या. **वादांत**–तत्त्वनिर्णय हे ज्याचे फळ असते अशा विशिष्ट वचनसंदर्भाला वाद म्हणतात. ३३. **द्वंद्व**–उभयपदप्रधान ३४. **श्री**–संपत्ती. **नारींत**–स्त्रियांमध्ये. ३५. **बृहत्साम** – सामवेदातील एक स्तोत्र. ३७. **कवींमाजी** – बुद्धिमंतांमध्ये. ३८. **निवाड** – निश्चितपणे. **ज्ञानमुंड** – श्रेष्ठ ज्ञान. ३९. **बीज**–उत्पत्ति–कारण. ४२. **बहु सांगितलिया**–अधिक सांगण्याची (काय गरज ?). **तुज**–तूं असा पाठ हवा.

## अध्याय अकरावा

१. **मोह्**–ममत्वामुळे उत्पन्न झालेला बौद्धिक गोंधळ. ४. **दाखवूं येईल**–दाखविणे शक्य असेल तर. **पहावें**–पाहण्यास मी लायक असल्यास. ५. **शतसहस्र**–अमित,-अगणित. ६. **अश्विनीदेव**–अश्वरूपधर सूर्यापासून अश्विनीस झालेले दोन पुत्र–नासत्य व दस्र. हे देवांचे वैद्य होते. **आश्चर्यरूप**–अद्‌भुत. ८. **न देखवे** – पाहू शकणार नाहीस. १०. **ज्यामाजी**–त्या रूपामध्ये. ११. **गहन**–गंभीर. **सन्मुख**–सर्वत्र. १२. **एकसरसी**–एकाच वेळी. १६. **अनंतापरीचीं**–नाना प्रकारची. **नोळखे**–कळत नाही. १८. **निधान**–आश्रयस्थान. **मानला** – मान्य झालास. १९. **त्रिजगत्प्रकाशा** – तिन्ही जगांना उजळून टाकणाऱ्या. २०. **लोकभय** – तिन्ही लोकांचे भय जणू भ्याले ही मुक्तेश्वराची स्वतंत्र कल्पना रम्य आहे. २२. **जेसु** – मुळात उपमपा शब्द आहे. २३. **लोकांसहित** – ही सहोक्ती मुक्तेश्वरनिर्मित आहे. २४. **पवे** – पावत. २५. **प्रळयअवसरीं** – येथे विसंधी दोष आहे. २६. **मुखीं प्रवेशती**–तोंडामध्ये शिरून नाश पावत आहेत. २८. **सरिताउदकें** – सरितोदकें असे रूप हवे होते. ३०. **ललन**–हलणे. ३१. **प्रवृत्ति** –लीला. ३२. **तुज वेगळें** – तू युद्धात सामील झाला नाहीस तरी. ३५. कंठ शब्दाचा नपुंसकलिंगी प्रयोग लक्षवेधक आहे. ३६. **कीर्ति** – कीर्तीच्या योगाने. ३७. **सत्**–अविनाशी तत्त्व. ३८. **रूपें** – विराट स्वरूपाने. ३९. **महात्म** – महात्मा. ४०. **पूर्वपश्चिमे** – सर्व बाजूंनी. **होसी** – सर्व हे तुझे नाव पडले. ४१. **सखया**–मित्रा. **प्रीतोनें** – सलगीने. ४२. **विहार**. . .विहार वगैरे करताना. **असत्कारिला** – अपमान केला. **करवितों** – 'करीं तू' असा पाठ असावयास हवा होता. ४८. **विधिनें कर्माचरणें** – विधिपूर्वक कर्म आचरल्याने. **कवणें** – कोणीही. ५०. **मागुतेंनी** – पुन्हा. **आश्वासिला** – धीर दिला. ५१. **ज्ञान** – भान. ५२. **अनूप** – अनुपम. ५४. **भक्तीचेनि** – अनन्यभक्तीने. ५५. **होण** – यमकाच्या सोयीसाठी होणे शब्दाचा असा रूपभंग केला आहे. **समावे** – लीन होतो.

## अध्याय बारावा

१. **एक** – काही. ३. **अनिर्वाच्य**–अवर्णनीय. ४. **नेमून**– संयमन करून. ५. **देहवंत** –

सामान्य लोक. ७. **भवसागरीं** – संसाररूप सागरामधून. **परियेसीं** – ऐक. **तारक** – उद्धारकर्ता. ८. **मनमिळणी** – तादात्म्य पावल्यावर. १०. **कर्म** – शास्त्रविहित कर्म. **सिद्धी** – मोक्ष. ११. **पाठीं रिघावें**– शरण जावे. **सुखस्पृहा** – सुखोपभोगाची इच्छा. १२. **त्याग** – कर्मफलत्याग. १३. **मैत्री** – सर्व प्राणिमात्रांशी मैत्री. १५. **नव्हती** – होत नाहीत. १६. **अपेक्षा** – इच्छा. **दक्ष**–अनलस. १७. **कांक्षेचे** – लोभाचे. **शुभअशुभत्यागी** – येथे विसंधी दोष झाला आहे. १८. **शीतउष्ण** –हा शब्द शीतोष्ण असा हवा. १९. **स्थिर** – स्थिरचित्त.

## अध्याय तेरावा

१. **क्षेत्र** – शरीर. **निवडावा** – जाणावा. ही पहिली ओवी मुक्तेश्वररचित आहे, त्यामुळेच मुक्तेश्वरी गीताटीकेतील ओवीसंख्या ७०१ झाली आहे. या पहिल्या ओवीत अर्जुनाने प्रश्न केल्याचे मुक्तेश्वराने कल्पिले आहे. २. **नेमेंसी** – नियमपूर्वक. ३. **ज्ञानी** – क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांविषयी जाणकार ४. **वोजें** – काळजीपूर्वक. ६. **असे** – आठ प्रकार. ७. **बुद्धिवंत** म्हणती, असा अन्वय. ८. **आर्जव**– ऋजुता. **अंतःकरण निरोधी**– अंतःकरणाचे नियमन कर. ९. **विषयवैराग्य** – विषयांविषयी विरक्ती. **दोषदर्शन** – सदोष आहेत हे ज्ञान. १०. **समचि** – हर्षखेदरहित. १२. **जाणिवेचे** – ज्ञानाचे. **उलटी**– विरुद्ध. १३. **जय**– परब्रह्मप्राप्ती. **सत् असत् नसे**– आहे असेही नाही, नाही असेही नाही. १५. **असक्त** – आसक्तिरहित. १७. **गिळी** – खाई. **उगळी** – ओकून टाकी. १८. **पर** – निराळे. **ज्ञानज्ञेय** – ज्ञानाने जाणण्यासारखे. २०. **अनादि** – जन्मरहित. **विकार** – भिन्न स्वरूप. २१. **सुखदुःखभोगीं...**सुखदुःखांच्या भोगास पुरुष कारणीभूत असतो हा अर्थ. २३. **देही**– देहामध्ये असणारा. २७. **आकारासी आले**– उत्पन्न झाले. २८. **नासून**– नाश पावली तरी. **डोळस** – द्रष्टा. ३०. **आपणया** – आत्म्याला. **पाहता** – यथार्थज्ञानी. ३४. **ये रितीं** – अशा प्रकारे.

## अध्याय चवदावा

१. **मागुती** – मागाहून. **येथून** – संसारातील जन्ममरणांच्या बंधनांपासून. २. **समानत्व.**– सरूपता. **न आले**– उत्पन्न झाले नाहीत. ४. **बीजनिक्षेपकर्ता**– बीजारोपण करणारा. ५. **देहासवें देऊन** – मुळात 'निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्' असे वचन आहे. ६. **अनघ** – निष्पाप अर्जुना ! ७. **संगेंकरून** – रजोगुणाच्या योगाने. **बांधे**– बद्ध करतो. ८. **अज्ञानीं** –अज्ञानापासून. ९. **तमें** – अज्ञानाने. १०. रज व तम यांना दाबून टाकून सत्त्व गुण प्रकट होतो, सत्त्व व तम यांना दाबून टाकून रजोगुण प्रकट होतो व सत्त्व व रज यांना दाबून टाकून तम प्रकट होतो. ११. **प्रकाशज्ञान** – ज्ञानाचा प्रकाश. **वाढे** – वृद्धिंगत होतो. १२. **लोभप्रवृत्ती** – हावरेपणा. **अशांती** – अस्वस्थता. **विलास** – खेळ. १३. **अस्फूर्ति** – उत्साहाभाव. १४. **ठाव** – स्थान. १५. **वृक्षादिक** – मुक्तेश्वरासमोरील संहितेतील पाठ वृक्ष शब्दास जुळता असावा. कारण प्रचारातील

गीतेतील पाठ मूढयोनिषु असा आहे. १९. **मत्स्वरूपता** – माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी तादात्म्य. २२. **सत्त्वादिलक्षणें** – प्रकाश, प्रवृत्ती व मोह. २३. **उदासीन** – अनपेक्ष. **काज** – कार्य. २५. **आरंभ** – कर्मारंभ. २६ **अव्यभिचारी** – एकनिष्ठ. २७ **प्रतिष्ठा** – निवासस्थान. **सोहळा** – गौरव. **मुक्तेश्वर** – जीवन्मुक्तांमध्ये श्रेष्ठ. येथे कवीने स्वत:च्या नावावर कोटी केली आहे.

## अध्याय पंधरावा

१. **वृक्षाचें**–प्रपंच वृक्षाचे. **अर्थवक्ता**–मुळात वेदवेत्ता असा शब्द आहे. २. **अधो**–खाली. ३. **प्रतिष्ठा**–अस्तित्व. **अश्वत्थ**–प्रपंच उद्या राहीलच असा भरंवसा नसल्यामुळे त्यास अश्वत्थ म्हणतात. **असंगशस्त्रें**–वैराग्याच्या शस्त्राने. ५. **मानमोह**– अभिमान व मोह. ६. **शाश्वतनभा**– शाश्वत स्वरूपाच्या आकाशाला. **तेजधाम**–तेजस्वी स्थान. **अनादिशोभा**–ज्याच्या शोभेला प्रारंभ नाही असे. ह्या ओवीचा अर्थ मूळच्या श्लोकार्थाहून वेगळा आहे. ७. **प्रकृतीं**–देहाकृतीत. ९. **सेवन**–उपभोग. १०. **असणें**–देहामध्ये असणे. ११. **अबुद्धि**–बुद्धिहीन, मूढ. १२. **माझेनि**–माझ्यामुळे. १३. **भूतें**–सर्व प्राणिमात्र. **धरोनी**–धारण करून. **औषधी**–वनस्पती. १४. **वैश्वानर**–अग्नी. **जाठराग्नि**– पोटातील अग्नी. **प्राणापान समान करूनी** – हे मुळाहून वेगळे आहे. **चतुर्विध**–लेह्य (चाटून खाण्याचे), पेय (पिण्याचे), चोष्य (चोखून खाण्याचे) व खाद्य (चावून खाण्याचे) असे चार प्रकारचे अन्न. १६. **क्षर**–विनाशी. **अक्षर**–अविनाशी. १७. **आणिक**– भिन्न, निराळा. १८. **धरी**–धारण करतो. **तीन लोक**–स्वर्ग, मृत्यू य पाताळ हे तीन लोक. १९. **सर्वभावें**– काया, वाचा व मन या तिहींच्या योगें. २०. **अतिपवित्र**– मुळात शास्त्राला उद्देशून हे विशेषण नाही. **यंत्र**– हे शास्त्राचे विशेषणही कविकल्पित आहे. मुक्तेश्वरी ओवी गीतोक्त श्लोकाहून अर्थदृष्ट्या भिन्न आहे.

## अध्याय सोळावा

१. **दमयज्ञ**–इंद्रियांचे दमन हाच यज्ञ. **स्वाध्याय**–धर्मग्रंथांचा अभ्यास. **आर्जव**– ऋजुता, सरळपणा. **सत्त्वें**–सत्त्वगुणाच्या योगाने. २. **सर्वत्र**–सर्व प्राणिमात्रांचे ठायी. **चपलता**–चंचलता. ३ **परमशुची**–अत्यंत पवित्र. **द्रोह साभिमान**–गर्वासह अनिष्ट चिंतनाची प्रवृत्ती. **जाण**–(लाभते असे) समज. लाभते असे हे शब्द अध्याहृत मानावे लागतात. ४ **पारुष्य**– कठोरपणा. **आसुरसंपदी**–आसुरी संपत्ती मिळविणारा. ५ **शोका अयोग्य**–शोक करू नकोस. ६ **दोन्ही**–दैवी व आसुरी अशी द्विविध. ७ **प्रवृत्ति**–कर्माचरणाची वृत्ती. **निवृत्ति**–कर्माचरण न करण्याची वृत्ती. **शौच**–पवित्रता. **आचार**– सदाचार. ८ **असत्य**–खोटे. **अप्रतिष्ठित**–धर्माधाररहित. ९ **क्षयाकारणें**–नाशासाठी. १० **कामकामनीं**–विषयवासनेमध्ये. **मोहें**–मोहवश होऊन. **अशुचिव्रत**–अमंगळ आचरण करणारे. १२. **अन्यायधनें**–अन्यायाने मिळविलेल्या द्रव्याच्या मदतीने. १३. **आलें**–प्राप्त झाले. १५ **सुखतर**–अधिक आनंदी. **झांकोळला**–आच्छादित झाला. १७ **मातले**–उन्मत्त

झाले. **नाममात्र**–श्रद्धारहित. २१ **आत्मया**. . . .आत्म्याचा नाश करणारी. २३ **इच्छे-करूनि**–वाटेल तसे, मनःपूत. २४ **शास्त्र**–या शब्दाची व्याख्या अशी– 'प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च पुंसां येनोपदिश्यते । तद्धर्माश्चोपदिश्यन्ते शास्त्रं शास्त्रविदो विदुः।।' ( सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः, काशी, संवत् २००६, पृ. २०३ ). अर्थात जे व्यक्तीला सत्कर्माचरणास प्रवृत्त करते व असत्कर्माचरणापासून परावृत्त करते ते शास्त्र. **कार्याकार्याकारणे** – कर्तव्य व अकर्तव्य यांसंबंधी. **योग्य** – क्षात्रधर्मोचित कर्म करण्यास योग्य.

## अध्याय सतरावा

१. **कोण ?** – सात्त्विक, राजस की तामस ? ३. **तद्रूप** – देवाच्या ठायी तादात्म्य पावतो. ५. **अशास्त्रविहितें घोरें** – शास्त्रविरुद्ध व भयंकर (कृत्ये). **अहंदंभें** – अहंकाराने व दांभिकपणाने. ८. **तिखट प्रकार** – हे मुळाला सोडून आहे. ९. **तीक्ष्ण** – झणझणीत. ११. **एकास** – विशिष्ट देवास. १२. **मनें** – मनाने, मनापासून. **फळइच्छा** – येथे विसंधी दोष आहे. १५. **परापवादहीन** – परनिंदारहित. **सत्यप्रियहित** – खरे, गोड व हितावह. **आथिलें** – युक्त. १७ **त्रिविध** – कायिक, वाचिक व मानसिक तप. १८. **सन्मान पूजा** – सत्कार-सम्मानादींची हाव. **अशाश्वत** – अनिश्चित. १९. **मूढत्व झाला अंगीकारी** – मूर्खपणा पत्करला झाला. २०. **उपकारविण**–प्रत्युपकाराची अपेक्षा न बाळगता. २१. **कष्ट** – दुःखाने. २२. **अदेशीं अकाळीं** – अयोग्य ठिकाणी व अयोग्य वेळी. **नेणता** – न जाणता. २३. **ब्रह्मवादियाची** – ब्रह्मज्ञानी पुरुषाची. २४. **येणें** – ॐ, तत् व सत् या त्रयीच्या योगाने. २५. **निष्काम** – फलेच्छारहित. २६. **सद्भाव** – अस्तित्व, चांगलेपण व मंगलत्व. २८. **असत्** – वाईट. **साधु मेणें** – मी ते चांगले मानीत नाही. **मेल्या जितां निरर्थक** – मृतास व जिवंत व्यक्तीस निरुपयोगी.

## अध्याय अठरावा

१. **तत्त्वलक्षणा** – तत्त्व व लक्षण या दोहोंची इच्छा. **कवणा ?** – कशास ? २. **कामनाफळें** – काम्य कर्मांचे अकरण. **त्याग** – कर्म करावयाचे पण त्याचे फळ ईश्वरास अर्पण करावयाचे. ३. **एक**–काही. संस्कृतातील एके शब्दाचा अनुवाद. **गती**– अंतिम स्वरूप. ४. **मायीक** – खोटे. **त्रिविध** – सात्त्विक, राजस व तामस किंवा फलेच्छा, ममत्व व अहंता असा त्रिविध त्याग. ६. **मानिलें** – मान्य झाले. ७. **दुणवावें** – दुप्पट करावे. **त्यजी** – कर्म टाकतो. ८. **शरीरकष्टें भयें** – शरीरास कष्ट होतील या भीतीने. **यास जग राजस म्हणती** – असा अन्वय. ९. **नित्य** (संध्यावंदनादी) **कर्म अवश्य करी** असा अन्वय. १०. **सत्त्वनिष्ठा वरी**–सत्त्वगुणावरील निष्ठा धारण करतो. **बुद्धिच्छिन्न-संशय** – बुद्धीमुळे ज्याचा संशय नाहीसा झाला आहे असा. १२. **मिश्रित** – इष्टानिष्टमिश्रित. **पावे** – मिळवितो. **न पावती** – भोगत नाहीत. १४. **आत्मापरिकर** –

आत्म्याचा परिवार. **करण** – साधने. **चेष्टा** – हालचाली, व्यापार. **अदृष्ट** – दैव. १५. **युक्तीं** – योगाने. १६. **देखे** – समजे. **शास्त्रदृष्टिही** – ज्ञानदृष्टी. १८. **कर्तव्यता कर्म** असा अन्वय. १९. **गुणभेद** – गुणोत्पन्न भेद. २१. **वृत्ति** – भेदभाव. २३. **फळउद्देशें** – फळ मिळेल या आशेने. येथे विसंधी दोष आहे. २४. **सायासें** – कष्टपूर्वक. २६. **सरी** – सारखीच. २७. **लुब्धक** – लोभी. **अशुची** – अपवित्र. **सवेंची** – एकदम. २८. **अयुक्त** – व्यग्र चित्ताचा. ३१. **यथाविधी** – यथार्थपणे. ३२. **जेणें** – ज्या बुद्धीच्या योगे. ३३. **योगपण**–योगीपणा. ३५. **परती**– वेगळी. ४४. **स्वभावज**–स्वभावसिद्ध. ४६. **स्वकर्में** – स्वकर्मांपासून. ४७. **कल्याण** – हितकारक. ४९. **असक्त** – निःसंग. **निस्पृह** – निरिच्छ. ५१. **आत्मत्वीं** – आत्म्याच्या ठायी. ५३. **परिग्रहादिक** – परिवार इत्यादी. **निर्मम** – ममत्वरहित. ५५. **तयांत** – आत्मस्वरूपामध्ये. ५६. **प्रारब्धें** – प्रारब्धामुळे. ५९. **मनी** – मानलेस. **प्रकृति** – स्वभाव. **तुज** – तुजकडून. ६३. **सार** – रहस्य. ६६. **संचित** – पूर्वजन्मार्जित कर्म. **क्रियमाण** – चालू जन्मात मृत्यूपर्यंत केली जाणारी कर्मे. ७०. **माझी बुद्धी निश्चित** – माझी खात्री आहे. ७२. **गेले** – केवळ यमकसुखार्थ मोह शब्दासाठी अनेकवचनी क्रियारूप वापरले आहे. ७३. **सावचित्त** – सावध चित्त. **वचन** – उपदेश, आदेश. ७४. **देवपार्थाचा** – श्रीकृष्ण व अर्जुन यांचा. ७५. **प्रसादें** – मागील १ . १ वरील टीप पाहा. ७६. **राया !** – धृतराष्ट्रा ! **अतिअद्भुत** – येथे विसंधी दोष आहे. ७७. **रूप**– विश्वरूप. ७८. **अचळ** – अखंड.

## उपसंहार

१. **भवबाधा** – संसाराचे दुःख. २. **अर्थी** – अर्थाविषयी. ४. **न संशय** – यात संशय नाही. ६. **मज** – श्रीकृष्णाचे ठायी.

## ५. विश्वामित्रभोजन

१. **हस्तिनावतीस** – हस्तिनापुरास. २. **म्हणती** या क्रियापदाचा कर्ता ब्राह्मण. ३. **सभेचा** – सभेत बसलेला. ४. **म्हणे** या क्रियेचा कर्ता दुर्योधन. **अयुक्षण** – आयुष्य. ५. **त्यां**–पांडवांना. ६. **गाधिसुतासी**–विश्वामित्रास. ७. **बैसला** शब्दापुढे होता शब्द अध्याहृत समजावा. ८. पहिल्या चरणात दुर्योधनाने ह्या शब्दाचा अध्याहार करावा. हृचा व पूर्वीच्या चवथ्या ओवीतील 'स्वामिया!' हे संबोधन लक्षवेधक आहे. ९. **माग प्रश्न** – वर माग. १०. **अच्युतवृक्षबीज** – अमृतवृक्षबीज असा पाठ असावा. नकलनविसाने 'अच्युत'. . .ही चूक केलेली असावी. **अग्नीं संस्कारिलें** – भाजले. ११. **सध्या** – सद्यः – तत्काळ. १२. **सर्वदा** – नेहमीचे. धर्म शब्दाऐवजी धर्मा शब्द हवा होता. १३. **बळिहरण** – वैश्वदेव केल्यानंतर टाकावयाचा बळी. १४. **' स्वामिया !'** संबोधनाचा अतिरेकी प्रयोग. १६. **बीज** – कोय. **करतळीं** – तळहातावर. १७. **युधि-**

ष्ठिराकारण – युधिष्ठिरास. ' स ' ऐवजी कारण हा प्रत्यय यमकसुखार्थ वापरला आहे. हा प्रत्यय स्फुटकाव्यांत अनेक ठिकाणी वापरला गेला आहे. १८. मुनींद्रा – ऋषिश्रेष्ठा! २१. तुमचेनें – तुमच्या हातून. आज्ञा द्यावी – निरोप द्यावा. २२. परिपूर्ण शब्दापुढे होतील हे क्रियापद हवे होते. २३. तुम्हांपाशीं – तुमच्या हातून (चूक झाली तर). शब्द–दोष, बोल. २४. हृत्कमळीं – मागील गजेंद्रमोक्ष ओवी १६, हनुमंताख्यान ओव्या २४ व ६० बघा. २५ व २६ या ओव्यांतील धावा करुणासागरा, जगज्जीवना व कृपाळुवा या समर्पक संबोधनांमुळे लक्षवेधक झाला आहे. २७. जीवन– अश्रू. २८. ऐकोनी या स्तवनासी असा सुश्लिष्ट चरण कवीला लिहिता आला असता. तुम्हांसी ? – तुमच्यावर. २९. या ओवीतील चवथ्या चरणाचा अर्थ तिसऱ्या चरणाच्या स्थानी व्यक्त व्हावयास हवा होता. ३०. म्हणे या क्रियापदाचा कर्ता कृष्ण हा आहे. साहीजण – पाच पांडव व द्रौपदी. ३१. धर्माकारण – वरील सतराव्या ओवीवरील टीप पाहा. अणीक – हा रूपभंग खटकतो. आणिक असे रूप कवीने अनेक स्थळी वापरले आहे. ३२. वाढावे – वाढावा. दुपानी – ज्याच्या कोंभातून दोन पाने फुटली आहेत असा. ३४. पाणितळी – हाताखाली. ३५. अघमर्षण – संध्येमधील एक पापहारक विधी. ३६. विकस्मीत – चकित. ३७. ऋषीकारण – वरील ओव्या १७ व ३१ वरील टीपा बघा. षोडशोपचार – आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीयक, स्नान, वस्त्र, उपवीत, गंध, माल्य, धूप, दीप, नैवेद्य, नमस्कार, प्रदक्षिणा व उद्यापन हे १६ उपचार. षड्रस – गोड, कडू, तिखट, आंबट, खारट व तुरट. ३८. विधले – या क्रियापदाचा कर्ता 'युधिष्ठिराने'. ४०. अनुष्ठान शब्दापुढे केले हा क्रियाशब्द हवा. ४२. कृपणाचें – तपोधन खर्चण्याचे बाबतीत कंजूष. ४४. या ओवीतील दुसरा चरण पूर्वीच्या ओवीतील चवथ्या चरणासारखा आहे. वस्तुत: कृष्णाने अगोदर वृक्ष अदृश्य केला, मग पांडवांचा निरोप घेतला व त्यानंतर तो द्वारकेस गेला असे क्रमबद्ध वर्णन हवे होते. ४५. सुमनी–सुमनासारखे, फुलाप्रमाणे.

## ६. दुर्योधनशल्यपरिस्फोट

१. सुमनें – फुले. वसुंधरे–पृथ्वीवर. २. एकोत्तरशत– एकशे एक. ३. गांधार – दुर्योधन. ४. विकर्ण – दुर्योधनाच्या शंभर भावांपैकी एक. दुर्योधनापासून क्रमाने नववा : दुर्योधनाच्या बंधूंनी भीष्मादींना आणले हे वर्णन योग्य. पण विकर्णाला म्हणजे स्वत:च्याच भावाला आणले हे अयोग्य. ५. सनातन – निश्चल. हा प्रयोग लक्षवेधक आहे. श्वेतवाहन – अर्जुन. दाहा नांवें – अर्जुन, फाल्गुन, जिष्णू, किरीटी, श्वेतवाहन, बीभत्सू, विजय, कृष्ण, सव्यसाची व धनंजय. ६. अभ्युत्थान– आदर दर्शविण्यासाठी उठून उभे राहणे. मयंकु – चंद्र. ७. अवलोकिती– अवलोकी असे रूप हवे. ९. देवद्वार – देवदारू. १०. अर्जुनाची मालती( चमेली )पुष्पाशी केलेली तुलना निष्प्रयोजन आहे. १२. रायानें – दुर्योधनाने. लज्जित – कुपित किंवा क्षुब्ध असा शब्द

हवा होता. **हुताशन** – अग्नी. १३. **पैशून्य** – निंदा. या ओवीतील चरणांची पुनर्रचना आवश्यक आहे. **पाळी** – द्रौपदी ही पाच पांडवांची पत्नी असल्यामुळे ती प्रत्येकाजवळ वर्षातून दोन महिने बारा दिवस ह्याप्रमाणे पाळीपाळीने राहात असे. त्या प्रथेस अनुलक्षून येथील प्रश्न आहे. १७. **सतेज** – घायाळ करणारा, प्रखर. १८. **भानुमती** ही दुर्योधनाची पत्नी. १९. सुंदर हा शब्द निरर्थक व प्रामादिक आहे. २०. **षोडशोपचार** – 'विश्वामित्रभोजन' आख्यानाच्या सदतिसाव्या ओवीवरील टीप पाहा. ह्या ओवीच्या शेवटच्या चरणाला भानुमतीकृत प्रार्थनेचे स्वरूप नाही. २३. **स्नेह** – तेल. २५. **मर्दन** –तेल डोक्यास चोळले. **क्षितीसीं** – जमिनीवर २९. **कवंते** – चिरत आहे. ३०. **रविनंदन** – सूर्यपुत्र कर्ण. **भवन**– गृह. ३१. **त्या समयी** – शेषाच्या येण्याच्या वेळी. ३२. **भाष्य** – आश्वासन. **निशी** – रात्रीच्या वेळी. **मार्तंड** – सूर्य. ३३. **अतुर्बळी** – बलवान. ३८. **सविस्तारू** – विस्ताराने. ४०. **निशी जाली** – रात्र झाली. ४१. पहिल्या चरणात शेषाने हा शब्द अध्याहृत आहे. ४२. **अरुणोदयप्रमाण** – अरुणोदय होईपर्यंत. **जातां** – जाताना. ४३. **विचारा** – विचार (करिती) ४७. **बैसावया कनकासन** – चौघांनी बसण्यासाठी सुवर्णासन घेतले हा अर्थ. ४८. **प्रधान** – शकुनी. ५१. **पर्वतपात** – पर्वतावरून कडेलोट करून जीव देणे. ५२. **योजन** – आठ मैल. ५३. **ब्रीद** – कीर्ती. ५५. **विहंगमासारिखा** – पक्ष्याप्रमाणे. श्रीकृष्णाची पक्ष्याशी केलेली तुलना सदोष आहे. ५७. **भरंसा** – भरवसा, खात्री. ५८. **षोडशोपचारी** – ठराविक कल्पनांच्या पुनरावृत्तीमुळे त्यांचे वैशिष्ट्य उरत नाही. ५९. **मानिवास**. .श्रीनिवास. .लागला हे क्रियापद अध्याहृत धरावयाचे. ६२ **ऐसें** – विषयासक्त. ६३. दुसऱ्या चरणात श्रीकृष्णाने शब्द अध्याहृत मानावा. ६४. **कांती** – जुनी त्वचा. ६६. **अधीरपणें** – उतावळेपणाने. ६९. **नून्य** – न्यून. हा रूपभंग नकलनविमाने केलेला असावा. ६९. **रवरव** – रौरव नामक नरक. ७०. **मौन्य** – मौन.

## ७. अर्जुनकामनापूर्ति

१. **महिमान** – माहात्म्य. **नवविधा** – मागील भगवद्गीता ९.१४ वरील टीप पाहा. ३. **नरनारायण** – अर्जुन व श्रीकृष्ण. ४. **स्नान केलें** – स्नान करोनि शब्द हवेत. **हृषीकेशीं** – कृष्णाने. **देवतार्चनीं** – देवपूजेस. **अभिनव** – आश्चर्यकारक. ७. **हृत्कमळीं** – कवीचा लाडका शब्दप्रयोग. ८. **कर्णी** – हा शब्द मणी असा असावा. १०. **मैलागिरी** – मलयगिरी. ११. **सेजसुमन** – पुष्पशय्या. **विश्रांत** – विसावा घे. १३. **सौख्य** – सुखसोयी. १४. या ओवीत मोहग्रस्त अर्जुनाचे वर्णन आहे. १५. कामविद्ध अर्जुनाच्या मनःस्थितीवर 'विसरला' या एकाच क्रियापदाने चांगला प्रकाश टाकला आहे. **जिव्हार** – अंतःकरण. **महादुर्धर** – हा कवीचा आवडता शब्द आहे. उदा. शेप महादुर्धर (दुर्योधनशल्यपरिस्फोट – ओवी ४०). १६. **दुर्गंधेसी** –

मत्स्यगंधा. पराशर ऋषींना मत्स्यगंधेविषयी आकर्षण वाटले. **उर्वशीमागे** – येथे मेनकेमागे असा पाठ हवा. १७. **विषयसंगें** – इंद्राने गौतमपत्नी अहिल्येचे धर्षण केल्या-मुळे त्याच्या शरीराला अनेक छिद्रे पडली. १८. **वृंदेचें** – वृंदा ही जालंदर नामक राक्ष-साची पतिव्रता स्त्री होती. विष्णूने तिचे पातिव्रत्य हरण केले. त्यामुळे जालंदर मेला. तेव्हा ही सती गेली. विष्णूला तिचा वियोग सहन होईना. म्हणून तो तिच्या स्मशा-नात जाऊन बसला, अशी प्राचीन कथा आहे. **कन्यारत्न** – सरस्वती. हिच्याविषयी ब्रह्मदेवाच्या मनात अभिलाषा उत्पन्न झाली. १९. **ते** – ती. २०. **ब्रह्मकुमार** – नारदास संसार करण्याची इच्छा झाली तेव्हा तो नारदी झाला. तिचे पोटी साठ संवत्सर जन्माला आले अशी कथा आहे. २१. **सहोदर** – सख्ख्या बहिणीप्रमाणे. २२. **विकार करिती** – विकार जागृत करिती. २३. **षोडशशृंगार** – तेलाने अभ्यंगस्नान, वस्त्र, चोळी, कुंकू, काजळ, कानातील दागिने, मोत्यांचा हार, मोत्यांचे अलंकार, वेणी, पायांत पैंजणे, चंदनाचा लेप, कमरपट्टा, हातात तोडे, तोंडात विडा, मनगटात बांगड्या आणि कामव्यवहारात चतुरता हे सोळा शृंगार. २४. **स्वरूप** – लावण्य. २५. **तयेसी** – तियेसी असे रूप हवे. ३०. **निशीसी** – रात्री. **आण** – शपथ. ३१. **विचार** – मनात विचार करी. ३२. चिंता करी हे शब्द अर्जुनाची मन:स्थिती यथार्थ-पणे व्यक्त करतात. ३३. या ओवीनंतर अर्जुन कुंजवनाहून हस्तिनापुरास गेल्याचे वर्णन करणारी ओवी हवी होती. ३५. **महगा** – तत्क्षणी. हा शब्दप्रयोग औचित्यपूर्ण आहे. ३६. **क्रोधे भरला हे** वर्णनही अतिशय स्वाभाविक आहे. ३७. **असती** – साध्वी नव्हेत त्या. ३८. **विरोचनासी**–सूर्याला. संज्ञा ही सूर्याची पत्नी व छाया ही तिची नि:सत्त्व प्रतिमा होय. एकदा संज्ञेने छायेला आपल्याबद्दल ठेवून सूर्याला फसविले व ती पितृगृही गेली. संज्ञेच्या गैरहजेरीत सूर्याला छायेच्या पोटी तीन मुले झाली. ही पौराणिक कथा येथे कवीस अभिप्रेत असावी. ३९. **वदे** – न दे असा पाठ असावा. ४०. **दरुषण** – दर्शन. हे अशुद्ध रूप कविलिखित नसावे. **आलें** – येईल. ४२. **मंदिरीं**–द्वारकेस आपल्या महालात. ४३. **रुक्मीण** – रुक्मिणी. **लज्जित**–शब्द श्रीकृष्णाच्या मन:स्थितीचा निद-र्शक असल्यामुळे अन्वर्थक आहे. ४६. **सौहस्त्र**? ४७. **सविस्तर सांगती** – येथे 'पार्थ सांगे' असा पाठ अधिक योग्य झाला असता. ४८. **लांच्छन** – कलंक. **वंचनार्थ** – प्रतारणा. फसवणूक. ४९. या ओवीच्या दुसऱ्या चरणात मुद्रिका शब्द अध्याहृत मानावयाचा. ५१. या ओवीत पहिला चरण दुसऱ्याचे स्थानी व दुसरा पहिल्याचे स्थानी असावयास हवा होता. शिवाय मागे पसरोनि पीतांबराला असा पाठ अधिक योग्य झाला असता. ५२. **कज्जळपूर्ण** – अश्रुपूर्ण. अर्जुनाच्या डोळ्यात पाणी आले हे वर्णन सूक्ष्म व स्वाभा-विक आहे. ५३. **निर्वाण**–निकराचा प्रसंग. ५४. अर्जुन अधोवदन करिता जाला हे वर्णन मार्मिक आहे. **द्वैत** – भेदभाव. ५६. **महाभारती** – महान वक्ता. हा कवीने केलेला आत्मगौरव नव्हे काय?

## ८. शतमुखरावणवधाख्यान

१. **सद्‌गुरुकृपावसंतकाळ** – सद्‌गुरुकृपारूप वसंत ऋतू. **मनआरामीं**–मनरूपी बागेत. **माजतां**– प्रकर्ष पावता. **जिव्हा कोकिळ**– जिव्हारूप कोकिळ. या ओवीतील रूपकासारखी रूपके पुढील अनेक ओव्यांत आहेत. २. **युद्धसमयप्राप्तसंधी**– युद्धाची वेळ येऊन ठेपली तेव्हा. **वंशवृद्धी**– वंशवृद्धी होण्यास. **अवचट**– आकस्मिक. ३ कुंभ व निकुंभ हे कुंभकर्णाचे मुलगे. **दारा**– संस्कृतात दार या पत्नीवाचक पुंलिंगी शब्दाचा नेहमी बहुवचनी प्रयोग करतात. येथील स्त्रीलिंगी प्रयोग लक्षवेधक आहे. ५. **पौंड्रिक**- सर्व प्राचीन ग्रंथांत याचे नाव पौंड्रक असेच आढळते. **श्रवणमर्मी खडतरला**– कानरूपी मर्मस्थानावर आदळला. ७. **निशाचरी**– राक्षसीण (निकुंभपत्नी). **शोकसरितापूरीं**– शोकरूप नदीच्या पुरामध्ये. **कुमारदृष्टी**–कुमाराकडे बघून (जिवंत राहिली).कुमार-दर्शनाने तिचे रक्षण करून तिला पुरातून बाहेर ओढून काढले व काठावर आणले (**आणी तटाका**) ८. .**ऊर्जिताची**– उत्कर्षाची. **तयें**– तिला. **पुत्रप्रौढत्वदिव्यऔषधी**- पुत्राचे मोठेपण हेच दिव्य औषध. येथे विसंधी दोष आहे. **अवधीमात्रा**– योग्य संधीची तेवढी (वाट बघत होता). ९. **बाल्य. . .** बाल्यरूप स्वप्न; कौमार्यरूप सुषुप्ती. **तारुण्य-जागृती**– तारुण्यरूप जागृती. १०. **मात**– हकीकत. **वैधव्य** – वैधव्यरूप अंधकूपात. **सूदलें**– टाकले. ११. **श्रीरामकुठार**–श्रीरामरूप कुऱ्हाड. **दंड**–दांडा. **समूळेंसीं**– मुळा-पासून. १२. **मातृगिरा**–आईचे बोलणे. **गोत्र**–कुळनाशरूप पापकर्मास. १३. **प्राणनाशा**– ठार न मारता. **लंघवीन**–भटकावयास लावीन. **स्नुषा**–सून. **एकली**–अद्वितीय. १४. **सवेग**–अतिशय वेगाने. १५. **चंद्रसूर**–चंद्रसूर्य. १६. **दिनकरा**–सूर्यास. **धुरा**–श्रेष्ठ. **नाम**–नावाचा. १७. **करूनी श्रवण**–ऐकवून. १८. **राक्षस**–राक्षसवंशरूप गृह. **होणे** – होऊ इच्छितो. २०. **शतमौळ**–शंभर मस्तके आहेत ज्यास तो शतमुख रावण. **गगन-पंथें**–रावण आकाशमार्गाने कसा चालला ? **मेघाकृती**–मेघाच्या आकाराचा. २१. **झुंजार**–लढवय्या. २२. **आगळें**–थोर, मोठे. इतके प्रचंड सैन्य चाल करून येईल अशी कल्पना नसल्यामुळे असंभाव्य. २३. **बिभीषण**–बिभीषणाचे सैन्यरूप हत्ती. **झगटतां**– लढता. **लाहे**–मिळवी. २४. **संचरला**–गेला. २५. **विजयउत्सवो**–येथे विसंधी दोष आहे. २६. **जाला**–स्फुटकाव्यांत जाला, जाहला, झाला अशी विभिन्न रूपे आढळतात. **राजालयीं**–राजवाड्यात. २७. **विबुधांच्या**–देवांच्या; बुद्धिवंतांच्या. २९. **श्रीराम...** श्रीरामाच्या चरणरूप कमळातील पराग. **लंकेश...**विभीषणाचे नेत्ररूप भृंगे. **अनुवादे**– बोले. ३१. **यासि**–चिंतेस. **हरितलें**–हिरावून नेले. ३२. **शुषमे**–प्रज्वलित होई. ३३. **उपवासी**–भोजनरहित. प्रतिज्ञा करण्यासाठी रामाने एक प्रहर लोटू दिला. तसे कर-ण्यास विशेष प्रयोजन कोणते ? ३४. **तमारी**–अंधकाराचा शत्रू, सूर्य. **तुतें**–तुला. तूतें असे रूप हवे होते. **पारणें**–उपवास फेडणे. **उणें**–कमीपणा. ३५. या ओवीच्या अखेरच्या चरणातील अखेरचे तीन शब्द गद्यप्राय आहेत. ३७. **असाध्य**–अशक्य. **नेमव्रत**–निश्चय,

प्रतिज्ञा. ३८. **तारू**–(भक्कम) नाव. ३९. **हेम**..सुवर्णासनावर. **सुधावचनीं**–अमृत-मधुर शब्दांनी. ४०. **चित्त**...मन हेच पवित्र गंगोदक. **चिंताकर्दमीं**–काळजीरूप चिखलात. **खडूळ**–गढूळ. या ओवीतील विटाळ शब्द वैरस्यकारक आहे. ४१. **पण**–निश्चय. ४२. **सामर्थ्यहस्तें**–हातांच्या बळाने. **चिंतार्णवीं**–चितारूप सागरात. ४३. **ब्रह्मतनय**–ब्रह्मदेवाचा पुत्र, नारद. **मृगाबु**...मृगजळाच्या नदीच्या पुराच्या भीतीने. **अगस्ति**–समुद्रास प्राशन करणारा ऋषी. अगस्तीने मृगजळनदीचा पूर पाहून भिणे हे जितके आश्चर्यकारक तितकेच रामाने शतमुखवधाची प्रतिज्ञा पुरी होईल किंवा नाही या विचाराने सचित होणे आश्चर्यकारक, हा नारदवचनाचा आशय. ४४. **आकर्णी**–ऐक. ४५. **सुधा**–(हनुमंतरूप)अमृत. **युक्तिशब्दा**–उपायाचे वचन. **स्तवी**–स्तुती करी. ४६. **सप्ताब्धिगर्ता**–सात समुद्र ज्यास एखाद्या खळग्याप्रमाणे आहेत अशा हनुमंता ! वस्तुतः रावणवधप्रसंगी रामाने ह्याच हनुमंताच्या व इतर वानरांच्या साह्याने समुद्रावर सेतू बांधून लंका गाठली होती. त्यामुळे सागराच्या पलीकडे कसे जावयाचे या शंकेने हतबुद्ध होण्याचे रामास काहीच कारण नव्हते. तरीही त्याला ही 'सात असाध्य व चिंताजनक' वाटावी हे आश्चर्यकारक वाटते ! ४७. **वाळिन्नला**–वाढला, मोठा झाला. **सत्यलोका**–भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः व सत्य या सात लोकांपैकी अगदी वरचा लोक. **मौळ**–डोके. **मेरूसारिखा**– स्फुट-काव्यांच्या कर्त्याने मेरू हे उपमान अन्य संदर्भांतही वापरले आहे. उदा. धार्तराष्ट्रांच्या पराक्रमापुढे मेरूदेखील ठेंगणा (दुर्योधनशल्यपरिस्फोट २). ४८. **विधेयधामा**–मोक्ष-प्राप्तीचे स्थान. **वाळांधिजे** – लांबकळा. **शरीरद्रुमा**–शरीररूप वृक्षावर. सैन्याच्या हालचालीची या ओवीत वर्णिलेली रीत अद्‍भुतच आहे. ४९. नारदही रणांगणावर जातो हे विशेष ! **कपि**..वानरशरीररूप पर्वतावर. **वळघले**–चढले. ५०. **अंजनी**..हनुमंताच्या शरीररूप आकाशात. **हारी**–(वीररूप नक्षत्रांच्या) रांगा. **अवयव**..निर-निराळ्या अवयवांच्या सांध्यांच्या रूपाच्या पर्वतगृहांत. ५१. **वामचरण**–डावा पाय. **सव्य**–उजवा. **कदनगोंधळा**–युद्धाची धुमश्चक्री. लष्कराच्या स्थलान्तराचे या ओवीतील वर्णन 'मौलिक' आहे ! ५२. **भुते**–तुळजापूरच्या भवानीचे पुजारी. **दीपिकापोत**–काकडे. तृप्त–दंग झाले. ५३. **चौडंकीं**–चोंडके, गोंधळ्याचे तुणतुणे. **उदो उदो**–उदय होवो. ५४. **समेळ**–विशिष्ट वाद्य. **वाहटितां**–वाजविता. **महाशब्दव्याळ**–प्रचंड ध्वनिरूप सर्प. **झोंबिला**–डंख केलो. ५५. **शत्रुभूतसंचार**–शत्रुरूप भूतांच्या हालचाली. ५६. **बाधा**–शत्रुभूतबाधा. **म्हणे**–शतमुख म्हणाला. **प्रबुद्धा**–अतिशय बुद्धिमान. **काळकेतु**–शत-मुखाच्या प्रधानाचे नाव. ५७. **पंचाक्षरी**–मांत्रिक. **आंगबळें**–स्वपराक्रमाने. **कटक**–सैन्य. **उजू**–समोर. ५८. **श्रीबाणा**..बाणास्त्ररूप मंत्र. **येरीं**–रामसैन्यातील वानरांनी. **न गणून**–पर्वा न करता. **निर्भयता**–निर्भयतेने. ५९. **हनुमंत**–हनुमंताचे प्रचंड व आश्चर्य-कारक रूप **सत्राणें**–जोराने, नेट धरून. ६०. **प्राणमत्स्य**–प्राणरूप मासे (शरीररूप पाण्याबाहेर काढले). येथील रूपक मनोरम आहे. ६१. **काळकेतक**–काळकेतू. **भृत्य**–

यमकसुखार्थ हा रूपभंग. **अंगलंग** – दुय्यम सेनापती. **सांग** – अंगांसह, तपशीलवार. सांग–सांगती असा पाठ वाचणेही तितकेच रम्य आहे. अंगलंगादींनी रामसैन्याचा इतका धसका घेतला होता की, त्यांनी युद्धाची हकीकत आठवून–आठवून व शतशीर्षाला फिरून-फिरून सांगून जणू इतःपर रामाशी युद्ध नको असे सुचविले. ६२. **विखारी** – सापासारखे. **बाणरदें** – बाणरूप दातांनी. **डंखिलें** –(शत्रूच्या मर्मस्थानी) दंश केला. **धन्वंतरी** – देवांचे वैद्य. **नेदिती** – देत नाहीत. ६३. **कालेयकालकूटें** – कालियानामक सापाच्या विषाने. **श्रीराम. . .**श्रीरामरूप शंकराने. **घोटोनि** – पिऊन. **निर्विष** – विषरहित. ६४. **वृत्तांतघृत** – हकीकतरूप तूप. **श्रवणकुंडीं** – कानांच्या रूपाच्या कुंडात. **वमतां**– ओकता. येथील रूपक समर्पक व अर्थसुंदर आहे. ६५. **वृंद**– समूह. **राघवउजू**– राघवासमोर, राघवास उद्देशून. **जल्पत**– बडबडला. ६६. **भेटावया**– भेटीसाठी. ६७. **शबराघरीं**– पारध्याच्या घरात. **कांतारीं**– अरण्यात. **गजभार**– हत्तींचे कळप. ६९. **दवडावया**– घालविण्यासाठी. **मरणधना**– मरणरूप धन. **स्वहस्तकीं**–आपल्या हातांनी. ७०. **बाणखदिरांगारीं**– बाणरूप अग्नी. ७१. **घायें**– प्रहारांनी. **अरिवर्म**– शत्रूचे कवच. **स्तोम**– जमाव, **शत. . . .**शतमुखरूप पृथ्वीवर. **रिचवीत**–टाकला. ७२. **संधान**– शरसंधान. ७३. **सोडी**– ह्या क्रियेचा कर्ता राम. **खंडी**– तोडी, नाश करी . . . . **गरुड**– श्रेष्ठ. प्रळयरुद्र हे उपमान स्फुटकाव्यांत एकाधिक वेळा आले आहे. ७४. **वज्रांतराच्या हारीं** – निरनिराळ्या वज्रांच्या ओळी. **मायकतृणें**– बाणरूप गवत. ७५. **विश्वतश्चक्षु**– राम. ७६. **संकल्पमात्रें**– इच्छामात्रेकरून. ७७. **वस्तीं**– ठिकाणी. **आकाश**– निर्गुण आदिशक्ती. पूर्वी समुद्र कसा तरून जावा ह्याबद्दलचा सल्ला नारदानेच रामाला दिला होता व आता आदिशक्तीच शतमुखाला जाळण्यास समर्थ आहे हा सल्लाही नारदच रामाला देतो. एकूण नारद रामाचा रणांगणावरील सल्लागार दिसतो ! ७८. **वर्म**– रहस्य. ७९. **मुनि. . . .**नारदाचे भाषण हेच अमृतपान. **राजीवनयन**– कमलनयन. **विनयशब्दें**– विनम्र भाषेने. ८०. **परिवारा**– सैन्याला. **जीववावया**–वाचवावया. ८१. **जानकीद्रोणाचळा**– सीतारूपी द्रोणागिरी. ८२. **ठाण**– सैन्यव्यूह. ८३. **मनसागरी** – मनरूपी समुद्रामध्ये. **युक्तिमुक्ता** – युक्तिरूपी मोती. ८४. **शब्दघोष**– आवाज. गोंगाट. स्पर्श करता कामा नये असा अन्वय. ८५. **उर्वीतें**– जमीन. **जनकात्मजा. . . .**सीतारूप गोवर्धन पर्वत. रूपकगत अनौचित्य आहे. ८६. **सदननाव**– गृहरूप नौका. **करआकाशीं**– हातरूपी आकाशात. येथे विसंधी दोष आहे. **गृहइंदुदीप्तीं**– घर हाच चंद्रप्रकाश. **सतरावी**– चंद्राच्या सोळा कळा प्रसिद्ध आहेत. जानकी ही जणू सतरावी कळा. ८७. **कपींद्रसुपर्ण** – वानरश्रेष्ठरूप गरुड. **क्षितिजानारायण**– भूमिकन्या सीतारूप विष्णु. **रण. . . .**रणांगण हेच सरोवर. ८८. **रघुनाथगजेंद्र**– रामरूप गजश्रेष्ठ. **शतमुखनक्र**– शतमुखरूप मगर. **सीताश्रीधर**– सीतारूप विष्णू. **भक्तधावण्या**–भक्ताला वाचविण्यासाठी. या ओवीत गजेन्द्रमोक्षाच्या कथेचा संदर्भ आहे. या पुस्तकात छापलेले पहिलेच काव्य बघावे. ८९. **धाम**– सीतेचे

घर. **अवनी**– जमिनीवर. **कोदंडपाणी**– धनुष्य आहे हातात ज्याच्या अशा रामास. ९०. **सदनदेउळा**– गृहरूप मंदिरात. रामाने सीतागृहाला मंदिर मानावे हे मौजेचे वाटते. **वोवरीगर्भी**– ओवरीरूप गाभाऱ्यात. ९१. **स्वप्नजागृती**–स्वप्न व जागृती ह्या उपाधी. **जगदानंदी**– जगाला आनंद देणारी. **तूलिकापीठीं**–कापसाच्या बिछान्यावर. **लयस्थ**– ध्यानस्थ. ९२. **बीजोच्चारें**– मंत्राचा उच्चार करून. **पुरश्चरण**– मंत्रपठण. ९३. **पहुडली**–निजली. ९४. **साचळ**– चाहूल. ९५. **सन्मुख**– समोर. **रमण**– पती. ९६. **भ्रांती**–भ्रम, मोह. **साचचि**– खरी. हे स्वप्न की सत्य अशी सीतेची स्थिती झाली. ९७. रामाने पत्नीला उद्देशून 'तुम्हांसी' हे बहुवचन वापरले आहे, ते मनोरंजक वाटते ! ९९. **निशाचरम्हैसा**– राक्षसरूप रेडा. **जिणोनी**–जिंकून. **सामर्थ्यमूळ**– सामर्थ्याचे उत्पत्तिस्थान असा शतमुखरावण. १००. **निधनमद्य**–मरणरूप मदिरा. **सुरां**–देवांना. १०१. **वृत्तांतश्रवणस्नान**– हकीकतीचे श्रवण हेच स्नान. **वर्णोपचार** – शब्दरूपी पूजासाहित्य. **सांगोपांग**– अंगोपांगांसह. १०३. **ब्रह्मांड**. . . पृथ्वीवर ब्रह्मांडरूपी घटास प्रसविणाऱ्या देवी ! १०५. **भक्तिअनन्यता**– भक्तीची एकाग्रता. **प्रकटोनी**– प्रकट करून. १०६. **रणभूमि**. . . .रणभूमीवर. **भ्यासुर**– भेसूर. १०७. **यमवी**– धेतास. १०८. **अंतराळा**– आकाशात. १०९. **त्रास**–भीती. ११०. **कार्मुकीं**– धनुष्यास. **सायक**– बाण. **शतवरी**– शेकडो. १११. **शतकंधरीं**– शतमस्तकी. **अंबरीं**–आकाशात. **अवनिये**– जमिनीवर. ११२. **मौळ**–मस्तक. **निःशेष**– पूर्णपणे. ११३. **इळा**– विळा, कोयता. **कणसें**– मस्तकरूपी कणसें. ११५. **अक्षोभजळें**– शांततारूपी जलानें. **चापशर**. . .धनुष्यरूपी हाताने व बाणरूपी बोटांनी. ११६. **राक्षस**. . .राक्षसाचा मृत्यु हेच लग्न, त्याची सफलता. **सैन्यसांदी** – सैन्यसमूह. **विजयधेंडा**– महाराष्ट्रातील काही जातींत मंगलकार्यात धेंड्याचा कुळाचार पाळण्याचा प्रघात आहे. मुंजीत मुंज मुलाला किंवा लग्नात वधूला वा वराला न्हावी कडेवर घेऊन नाचतो. याल्राच धेंडा किंवा झेंडा नाचविणे असे म्हणतात. ११७. **सांडिती**– हे क्रियारूप खटकते. वर्षती हा शब्द हवा होता. ११८. **परिमार्जुनी**– टाकून देऊन. **दीर्घाकृती** – प्रचंड रूप. **येउनियां**. .पूर्वीचे रूप धारण करून. **आरूढली** – बसली. ११९. **भूरमा**. . .पृथ्वीवरील रमारूप गंगानदीचे विशाल रूप. **उगमा** – उगम पावते तेव्हा. **नानुमाने**– अंदाज करता येत नाही. १२०. **विशाळरूपनग** – विशाल रूप हेच दागिने. **पूर्वा**. . .पूर्वशरीररूप सोने. **रविकुळ**. . .सूर्यवंशश्रेष्ठ (राम) १२१. **कपि**. . .वानरशरीररूप नौकेत. **वावर** – संचार. **मार्गअंबुधी** – मार्गरूप महासागर. १२४. **घात**–संहार. १२५. **पिता**. . .आजोबा जो कुंभकर्ण त्याचा धाकटा भाऊ जो बिभीषण त्याचे अधीन. **निकें** – मान्य. १२६. **राज्यपीठीं**–राज्यासनावर. १२७. **चळंघे**–चढला. **कपिकायाहय**–हनुमंताच्या शरीररूप घोड्यावर. **निमिषार्ध**– डोळ्याची पापणी लवण्यास जो काळ लागतो त्यास निमिष म्हणतात. १२८. **कपिचरण**. . .वानराचे पाय ह्याच दोन नद्या. **त्रिवेणीतीर्थ** – गंगा, यमुना व सरस्वती

यांच्या संगमाचे स्थान, प्रयाग. १२९. **जिरउनी** – रग जिरवून. **ब्रह्मद्रोही**–परब्रह्म जो राम त्याचा द्वेष करणारे. १३०. **राउळ** – राजवाडा. **संध्याजपनेम**–संध्या, जप, इत्यादी व्रते. १३१. मागील ३४ व्या ओवीत वर्णिलेली रामप्रतिज्ञा येथे पुरी झाली. १३३. **उलथा** – भाषांतर.

## ९. शुकरंभासंवाद

१. हे इंद्राचे रंभेस उद्देशून भाषण. **कामाक्षी** – हे देवीचे नाव. **कामनाजाणीव** – इच्छारूप ज्ञान. **अविकारी** – विकारशून्य. २. **डाक** – वाद्यविशेष. ३. रंभेची संबोधने अर्थपूर्ण आहेत. **तपसोमकांत** – तपश्चर्यारूप चंद्रकांत मणी. ४. **वज्रपाणी** – इंद्र. ५. **शक्रवाक्येंदुरश्मिस्पर्शे** – इंद्राच्या वाक्यरूप चंद्रकिरणांच्या स्पर्शाने. **मिसें** – निमित्ताने. या ओवीतील रूपक रम्य आहे. ६. **वाटोगार** – एक प्रकारचे सुगंधी फूल. **संभ्रमें** – आवडीने. ७. **अर्गळा** – अडसर. ८. **नेमिष्ठ** – तपोनिष्ठ. **पोतडी** – पिशवी. ९. **वोढण** – ढाल. १०. **न संटे** – मावेना. ११. **सुभद्रे !** – शुभांगे ! **तपी** – तपश्चर्या करणारा शुक. १२. **कामकळे** – कामशास्त्रातील कलाकौशल्याने. **आपैसा** – अंकित. १३. **गुरुत्वमानें** – मोठेपणाच्या लालचीने. १४. **उर्वसीया** – मेनकेने असे असावयास हवे होते. १६. **तरणी** – सूर्य. धाता, मित्र, अर्यमा, शक्र, वरुण, अंशुमान्, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वष्टा व विष्णु असे बारा सूर्य. हे कश्यप - अदितीचे पुत्र होत. **किंकिणी** – बारीक घंटा. १७. **पुष्पकीं** – विमानात. **प्रभा** – तेजाने. १८. **बाळा** – सोळा वर्षांची मुलगी, जिने नुकतेच यौवनात पदार्पण केले आहे अशी कुमारी. १९. **हस्तिनी** – लठ्ठ व कामुक स्त्री. **चित्रिणी**–कामशास्त्रात वर्णिलेला स्त्रियांचा एक प्रकार. **चांपे**. . . चाफेकळीसारखी गोऱ्या रंगाची. **सुरतासनीं** – रतिक्रीडेतील विविध आसनांमध्ये. २०. **कामाचीं** . . . स्त्री हीच कामदेवाची फौज. २१. **पन्नासिलीं**–शृंगारिली. **कडेलागीं**– कमरेभोवती. २२. **रणतुरें** – रणवाद्ये. **भेदरें** – थरकाप. २३. **कराग्रें** – बोटे. **खड्गाकारें**– तरवारीप्रमाणे. **नेमियां** – तपोनिष्ठांना. २४. **त्रिवळी** – पोटाला पडणाऱ्या तीन सुरकुत्या. **खेटक** – ढाल. २५. **अणियाळी** – अणकुचीदार. **फळी** – पाते. २६. **नेहटीं** – पाहा. **टोप** – शिरस्त्राण. २७. शुकाचा तपोभंग करण्यासाठी मदनाने पाठविलेल्या सुंदरींत रंभा मुख्य होती हा भाव. २८. **गर्जविती**– प्रतिध्वनित करतात. २९. **अप्रसिद्धे** – विचित्र. ३०. **ताळीं** – तालांत. ३१. **सरिसा** – बरोबर. **कुसुमाकर** – फुलांचा साठा. **विकार** – कामविकार. ३५. **स्वांगें** – स्वेच्छेने. ३६. **चित्रीव** – सचित्र. **आसनांचे** – रतिक्रीडेतील बंधांचे. ३७. **आहाच** – वरच्यावर. ३८. **कोडी** – कोटी. ३९. **ताळ** – झांजा. **तंत्र** – तंतुवाद्य. ४०. **दांगें** – अरण्ये. **तापपापाचा** – आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक ताप व पापकृत्ये यांचा. ४१. **मेळा** – समुदाय. **शक्ती**. . . देवी. **कोढीं**– कोड आलेल्यांनी. **कुब्जीं** – कुबड्या लोकांनी. कोडासारखे रोग देवतोपासनेने बरे होतात अशी समजूत मुक्तेश्वरकाळी असावी. ४२. **लोपी** – झाके. **आत्मप्रभे** –

स्वत:च्या तेजास. **कार्पण्य** – कृपणता. **यशशोभे** – यश व शोभा. **४३. स्थाना** – शुकाश्रमा. **वेढोनी** – घेरून. **४४. भ्रमातें** – मोहाला. **४५. निर्नासिका** –नासिकारहित. **पुढारीं** – पुढे. **४६. झांकोळला**–झाकला गेला. **४७. नागवूनी** – लुटून. **मनो**. . . मनोवृत्तिरूप नाणी. **जडत्व** – जडपण. **४८. सांडती** – खाली पडती. **कंचुकीगोणी** – चोळी हीच गोण (पिशवी). **कसणी** – चोळीचा बंद. **कशी** – कसते, आवळते. **४९. हेलावत** – हालत. **५०. इक्षुदंड** –ऊस. **कामकोदंड**–मदनाचे धनुष्य. **तुकीतसे**. . . डोलवीत असे. **५१. बळी** – समर्थ. **५३. हुंबत** – कुथतात. **५४. वरौतें** – बाहेरून. **५६. सत्त्वमूर्ति** – सत्त्वगुणाचा पुतळा. **विभूती** – भस्म. **५८. गरिमा** – मोठेपणा. **आथिलेपणा** – थोरपणा. **६०. कृष्णाजिन** – हरिणाचे कातडे. **उपवीत** – जानवे. **मुद्रा** – ध्यान. **६१. पातीं** – पापण्या. **६२. कुशासनीं**–दर्भासनावर. **६३. सत्त्वाथिला**–सत्त्वगुणयुक्त झाला. **६६. चाड** – महत्त्व. **वाड** – श्रेष्ठ. **बहुकाळींचें** – जुने. **६७. थोरावला** – थोर झाला. **आन** – अंतर. **६८. विकळ** – कळाहीन. **७०. धिवसा** – भरवसा. **७१. मिनल्या** – एकत्र झाल्या. **७२. मधुकरी** – भ्रमरी. **७६. निर्वाण** – घोर. **कोण काळ** – केव्हापासून. **७७. दुराग्रहाचे** – हट्टाचे. **७८. ऐक्यसोसें** – ऐक्याच्या हव्यासाने. **७९. अंचवणे**– हात धुणे. **खांडणें** – तोडणे. **८०. शंखावली** – शंखनाद करणे. **आर्ती** – वेदना. **८१. उपाधी** – पीडा. **जिव्हारीं**– अंत:करणात. **८२. मांदी** – मेळा. **८३. विचारिले**–स्वगत विचार केला. **८५. केळवसी** – पर्मावितेस. **८६. विरूढलीं**–उगवली. **८७. लाहे** – मिळणार. **८८. सुरालया** – स्वर्गा. **८९. वोस** – निर्जन. **९०. निष्कारण** – अकारण. **९३. मृगजल**– दुष्प्राप्य वस्तू. **निर्देवातें** – दुर्भागी मनुष्याला. **मत्तिकेसरी** – मातीप्रमाणे. **९५. विटप** – वृक्ष. **९६. मागें**. . .पूर्वी, आता व पुढे देखील. **९७. न धरीं निराशेची आस** – निराशेची आशा धरू नकोस (व्यर्थ आशा बाळगू नकोस). **९९. जीवन** – प्राणधारणेचे साधन. **१००. निश्चल** – स्थिरचित्त. **१०१. चाड** – आकर्षण. **कोड** – हौस. **१०२. कुटिळदृष्टी**– वक्र दृष्टीने. **हिंपुटी** – दु:खीकष्टी. **१०४. उदासीन**–वस्तुत: उदासीन म्हणजे अनपेक्ष, तटस्थ किंवा पक्षपातरहित. येथे उदास किंवा दु:खी या अर्थाचा शब्द हवा होता. **१०५. वोखटें**–वाईट. **१०६. साक्षेपें** – साग्रह. **१०७. दुराशा** – दुष्प्राप्य इच्छा. **१०८ रोगव्याध** – रोगरूपी पारधी. **१०९. धरणी** – पृथ्वी. **११०. चाळितां** – चलनवलन केले असता. **११२. स्वरूपीं** – ब्रह्मस्वरूपी. **मिळावया** – तन्मय होण्यास. **११३. तुंबा** – भोपळा. **११४. साधक** – योगसाधना करणारा. **भोंवे** – गिरक्या खातो. **विवर्तीं** – भोवऱ्यांत. **थडी** – किनाऱ्यास. **११५. पद्मजीवन** – कमळावरील पाणी. **११७. सुनिश्चयें** – निश्चितपणे. **१२०. अनर्घ्य** – बहुमोल. **१२१. पुष्कर** – कमळ. **प्लक्ष** – पळस. **१२२. व्याळस्तनी** – विशालस्तनी. पुष्कर, श्वेत, प्लक्ष, कल्मष, क्रौंच, शाकल व सिंहल ही सात द्वीपे. **१२३. नाचणी**–नर्तिका. **१२४. कुळजा**– कुलीन. **१२५. मानविणी**–मानवी स्त्रिया. **१२६. स्वर्गमांदूसेची** – स्वर्गरूप पेटीतील. **१२८. स्वेच्छ** – यथेष्ट.

१२९. **अभुक्ता** – न भोगिल्या गेलेल्या. १३०. **उधार बोलणे** – वरपांगी बोलणे. **रोकडा** – प्रत्यक्ष. १३१. **स्रक्**– फुलांची माळ. १३२. **खेंव** – मिठी. १३४. **सरी** – सारखा (शिवासारखा). १३६. **चक्रवती** – चक्रवर्ती, सार्वभौम अधिराजा, समुद्रापर्यंत पसरलेल्या पृथ्वीचा सम्राट. **सुभग** – शोभिवंत. **अभंग** – अक्षय, चिरकाळ. **सतीचा** – साध्वीचा, पतिव्रता स्त्रीचा. १३७. **वल्लभ** – प्रिय. हे लोभाचे विशेषण. १३८. **मातंग** – मांग. १३९. **उत्तमा** – अभिजात व्यक्तीस. **सुवर्णमेरू** – मेरूइतके सोने. **निरपेक्षा** – निरिच्छ माणसास. **तृणतुल्य** – क्षुल्लक, कस्पटाप्रमाणे. १४०. **आपण** – सहज. १४१. **वाळोनि** – निरस्कारून. **अनामिकाचा**– महाराचा. **पाक** – स्वयंपाक. १४३. **वाग्जल्प** – बडबड. **सन्निपाताचा प्रलाप** – विषमज्वरातील बडबडणे. १४४. **यद्वा तद्वा** – मराठीत याचेच अद्वातद्वा असे रूप झाले आहे. **कडूलें** – सर्पदंश झालेला मनुष्य अतिशय कडू वा निरवट वस्तूलाही गोड म्हणतो. १४५. **काय** – काया, शरीर. **वैश्वानरीं** – अग्नीमध्ये. **प्रमाण** – पुरावा. १४७. **हो** – होवो. १४९. **मसण**– स्मशान. १५१. **अनुताप** – पश्चात्ताप. १५२. **निष्काम** – फलेच्छारहित. १५३. **आर्ती** – आवड. १५४. **सडलें** – कुसलेले. **पिशित** – मांस. **पूयकृमिदुर्गंधिभरित** – पू, किडे व घाण यांनी भरलेले. १५५. **आमिष** – मांस. १५६. **स्वर्गमर्कट** – स्वर्गातील माकडे. **अपभयें**– अस्थानी भीती बाळगून. १५७. **विश्राम**–विसावा. १५९ **परिपाठीं**– प्रघाताने. १६०. **सखी**– सखी असाव पाठ योग्य. **उत्तमांगीं**–डोक्यावर. १६१. **तीं ठायीं**– तीन ठिकाणी – पोटात क्षुधाग्नी, कंठात विषाग्नी व कपाळावर तृतीयनेत्राग्नी. १६२. **त्रिगुणरजें**– सत्त्व, रज व तम या त्रिगुणांच्या धुळीने. **उपाधी**– त्रास. १६४. **परी**– प्रकार. १६५. **डोल**– खुबी. **बोळगी**– सेवा. **पुतळे पायीं सिरवती**– पुतळे करून पायांस बांधणे, तुच्छ मानणे. १६६. **हातातळचीं**– तळहातावरील. **तिन्ही बाळकें**– ब्रह्मा, विष्णू व महेश. **अव्यक्तीं**– स्वतःला अव्यक्त स्वरूपात दडवतात. १६८. **पाट**– प्रवाह, ओघ. **नये मधुरते**– मधुरता न धरी. १७०. **पाखंडीया**– पाखंडी मनुष्यात सज्जनाच्या संगतीने काही फरक होत नाही हा भावार्थ. १७१. **वंचलासी**– मुकलास, आचवलास. १७२. **जोडी**–गाठभेट. १७४. **करंटीं**– दुर्भागी माणसे. १७७. **अजारक्षका अविचारा**– अविवेकी मेंढपाळाच्या. **क्षेत्रा**– शरीरास. **गोफणिलें**–गोफणीत घालून भिरकावून दिले. १७८. **सुखाडी**– सुखसमृद्धी. **चढोवडी**–ईर्ष्येने. १८०. **पाटला**– पाडळीचे फूल. १८१. **पुष्पवती**–तरुण. १८२. **उमाधवाचे**– शंकराचे. **बिजें**–गमन. **भूलिंगीं**–पृथ्वीरूप शिवलिंगावर. १८४. **ताळफळें**– ताडफळे. आम्रफळे इत्यादी कठिणपणात स्त्रीस्तनांहून निकृष्ट. त्यामुळे ती फळे गळून पडत होती हा आशय. १८६. **अधरें**– ओठांनी. **जनदृष्टी** – लोकदृष्टीपासून १८८. **विंधे** – भग्न करी. **पुष्पधन्वा**–मदन: या ओव्यांतील नादमाधुर्य चित्तास प्रसन्न करणारे आहे. १८९. **शाइले**–आच्छादिले. १९०. **वोजा**– टापटिपीने. १९२. **अणिया**–बोंडी. १९४. **पुष्पमेळे**–पुष्पगुच्छ. **अणियाळे**– अणकुचीदार. १९५. **कनकफळें**–धोतऱ्याची फळे. **जावळें**–दोन (आवळे–

जावळे). **करिकुंभ**– हत्तीचे गंडस्थळ. **१९६. सिंधुशत्रूचें जन्मस्थान**–सिंधू (सागरा) चा शत्रू तो अगस्त्य ऋषी, त्याचे जन्मस्थान तो कुंभ (अगस्त्याला कुंभोद्भव म्हणतात हे प्रसिद्ध आहे.) अर्थात कुंभाच्या आकाराचे स्तन. **पीन**– पुष्ट. **१९७. मुक्तजाळीं**– मोत्यांच्या जाळीने. **त्यावर्त्या**– त्यावर. **१९८. स्त्रीकदंब**– स्त्रीसमूह. **१९९. नरमृगें**– मनुष्यरूपी हरिणे. **२००. उरोज**– स्तन. **२०१. द्वादश**– मस्तकावरील भांग, दोन कान, नाक, गळा, दोन दंड, दोन मनगटे, कटी (कंबर) व दोन घोटे (पाय) अशी दागिने घालण्याची बारा अंगे. **सौदामिनी**– वीज. **हारी**–रांगा. **२०२. शाल्मलीतरू**–शेवरीचे झाड. **कुड्मळें**– कळ्या. **कटीफळें**–लांबट मिरी. **वृंदावनाहूनि**– कंवडळापेक्षा. **२०३. मुद्रिका**– खूण. **२०४. अंजन**– काजळ. **मुखाब्जीं**–मुखकमळावर. **२०६. मवाळें**– मऊ. **२०७. हृदयनिवेदन**–हृदयार्पण. **२०८. जाचणी**–छळ. **२०९. हारी नाणी**– हरवीत नाही, जिंकत नाही. **२१०. सेखीं**–शेवटी. **२११. अही**–साप. **विवरस्थ**– बिळात राहणारा. **२१२. जालें**–जन्मास येणे. **२१३. कृत्रिम पुरुष**– बुजगावणे. **२१५. अविद्या**– अज्ञानाने; अज्ञानमूर्ती. **२१६. बोडंबरीचें**–गारुड्याची मंत्रविद्या. **२१७. मैंद**– मोहिनी घालून लुटणारा. **साजणें**–मैत्री. **अळवणें**–आळवणी, प्रार्थना. **उचित**– देणगी. **२१९. पोकळ**–व्यर्थ. **विषयांहातीं**–शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पाच विषयांच्या हाती. **२२०. फोडिली** – नष्ट केली. **२२२. जितची मेला**–जिवंत असूनही मेल्यासारखा. **२२३. नित्या..**.शाश्वत व अशाश्वत वस्तुंविषयी विवेक करणारा. **२२४. अन्वय असा** – शुची (शुद्धाचरणी व्यक्तीने) वारितां (निषेध केला तरी) अविचारें (अविवेकाने) विषयीं (विषयांच बाबतीत) तोंड उघडे (प्रयत्न करतो) **२२५. निष्टंक**–पक्के. **२२६. भवगर्तें**–संसाररूपी खळग्यात. **२२७. शूकर**–डुक्कर. **२२९. स्फितीचें**–महत्तेचे. **२३१. होत**–होवोत. **सधनीं**–धनवंतांनी. **निजोडे**–न शोभणारे. **२३२. सांगिक**– अंगांसह. वेदांची अंगे अशी–शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदोविचिति व ज्यौतिष. **२३५. मेघनाथ**–पर्जन्य. **स्थळास्थळ**–योग्यायोग्य स्थान. **समदर्शनी**–सर्व प्राणिमात्रांचे बाबतीत समभाव बाळगणारा. **२३६. सघंटे**–तोंडास तोंड देई. **२३७. कोक**–कामुक. **२३८. आर्त**–श्रवणोत्सुक. **२३९. निरंजनीं**–परब्रह्माचे ठायी. **२४०. दांग**–रान. **२४१. शमिकेसी**–शमीच्या वृक्षाच्या पानांस. **भौमासी**– पृथ्वीपुत्रास. **शब्दारोप**–केवळ लटके शाब्दिक वर्णन. **२४५. सुरंग**–उत्तम रंगाने युक्त. **बिंबफळ**–तोंडले. **२४६. वेळा**–वेलदोडा. **केतकीखदिर**–केवड्यांचा कात. **जातिफळें**– जायफळे. **पूगीफळें**–सुपाऱ्या. **तगटें**–वर्ख. **त्रयोदशगुणी**– तांबूलाचे तेरा गुण असे– कटु, तीक्ष्ण, उष्ण, मधुर, क्षार, कषाय, वातघ्न, कफनाशन, कृमिहर, दुर्गंधिनाशन, मुखभूषण, शुद्धिकरण व कामसंदीपन. **कामें**–आवडीने. **२४८. अळिकुळ**–भुंग्यांचा समुदाय. **२४९. संभ्रमें**–सादर. **२५०. दाटोदाटी**–उत्कटतेने. **अमृतासाठी**– अमृताच्या साठ्यात. **२५१. न मने**–न मानी. **२५२. कावुळी**– कावळ्यांनी. **२५४. सुधूत**–अतिशय शुद्ध. **मनवसन**–मनरूपी वस्त्र. **सचैल**–वस्त्रांसह. **२५५. बरळे!** –बरळणाऱ्या स्त्रिये,

रंभे ! **खोंचणे** – जखम करणे. २५६. **माजे**–वाढतो. २५७. **कश्मल**–पाप, दुष्कृत्य. २५९. **विचारितां** – विचार करता. २६०. **उद्योगसापास** – नसती उठाठेव. २६१. **कोढी** – कुष्टरोगी. **हातीं** – हात. २६२. **नाक** – नाकातील शेंबूड. **पडसा** – सर्दी-पडसे. **खांडण** – खंडन, तोडणे. २६३. **निर्जरनारी** – ज्यांना जरा (वृद्धत्व) नाही त्या निर्जरांची स्त्री, रंभा. **अविवेका** – विवेकशून्य पुरुषास. २६४. **परिकर** -- रमणीय. २६५. **पखियांवरी** – बाजूंवर. २६६. **मृगमद** – कस्तुरी. २६८. **हृदयमाचा** – हृदय-रूप पलंगावर. २७१. **उष्ट्रपृष्ठींचें गुल्म** – उंटाच्या पाठीवरील मदार. २७२. **जवादी-जनित** – जवादी मांजर. **समान** – मानसम्मानासकट. २७३. **दिवाभीत** – घुबड. २७४. **शुभ** – हितकारक. २७५. **दर्दुर** – बेडूक. २७७. **डहुळिलें** – ढवळले, घुसळले २७८. **होय शीतळ विकारी** – शीतळ (अविकारी) विकारी होय, असा अन्वय. २८०. **तुरुंबणे** – पूजणे. २८१. **ऱ्हद** – लहान जलाशय. २८२. **फळी** – समुदाय. २८३. **सूणा** – श्वान, कुत्रा. २८४. **कुट** – कूट, पूड. **लल्लाट** – मस्तक. या ओवीतील खंडोबाच्या भंडाऱ्याचा उल्लेख कालविपर्यासात्मक आहे, कारण वर्ण्यविषय शुक-रंभासंवादाचा आहे, तो प्राचीन आहे. २८५. **हिरवटाचार** – हिरवा चारा. २८६. **जोडतें** – जोडणारे. २८७. **रुंचिक** – रुईच्या झाडाचा चीक. २८८. **हतदैवा !** – दुर्भाग्या ! २९०. **अवचट** – अचानक. **लाहे** – लाभतो. **आतुडणे** – स्पर्श करणे. २९२. **वोहळीं** – ओहळात, प्रवाहात. **हरळी** – गवत. **खर** – गाढव. २९३. **श्रुति-आळघतेचे** – वेदसंमत अभिमानबुद्धी. २९५. **चर्मक** – चांभार. २९६. **खोंचोनि** – दु:खी होऊन. २९७. **नावेक** – थोडा, अल्प. २९९. **संतप्ता** – संतप्त पुरुषास. ३००. **पाठारीं** – पठारावर. ३०१. **सुप्रभ** – तेजस्वी. ३०२. **दैवाआगळा** – सुदैवी. ३०४. **भग्न भाजनाचे** – फुटक्या भांड्याचे. ३०५. **लेप** – चित्र. ३०६. **लाट** – उसाच्या घाण्यातील दंडगोलाकृती लाकूड. ३०८. **वोखटे** – त्रासदायक. ३१०. **मागां** – मागाहून. ३११. **मिळणी** – तादात्म्य. **बुजावणी** – समजूत. **उन्मनी** – ब्रह्मलीन मन:स्थितीत. ३१५. **कळा** – शास्त्र. ३२३. **वांस** – व्यर्थ. ३२७. **सैंधव** – मीठ ३२८. **निरावेव** – निरवयव, निराकार. ३३१. **अळुमाळ** – किंचित. ३३२. **विरक्तीं** – विरक्त पुरुषांनी. ३३३. **पृथु** – वेन राजाचा बलवान पुत्र. ह्याने पृथ्वी सपाट केली. तिने गायीचे रूप धारण केले असता ह्याने तिचे दोहन करून अनेक रत्ने, फळे औषधी इत्यादी काढली व तिला आपली कन्या मानिली. म्हणून पृथ्वी हे नाव पडले. **पुरूरवा** – सोमवंशातील पहिला राजा. बुध व इला यांचा मुलगा. हा उदार, न्यायी, रूपवान व सत्यप्रिय होता. ह्याला उर्वशीने वरले होते. कालिदासाच्या विक्रमोर्वशीयम् नाटकाचा हाच नायक होय. **युधिष्ठिर** – धर्मराज म्हणून प्रसिद्ध. कुन्तीला यमापासून मन्त्रसामर्थ्याने झालेला मुलगा. पांडवांतील ज्येष्ठ भाऊ. तो दयाळू, न्यायी, धार्मिक व सत्यवचनी होता. त्याने अपार वैभव संपादून राजसूय यज्ञ केला. परंतु, दुर्योधनाशी द्यूत खेळून त्याने ते वैभव गमावले. भारतीय युद्धात विजय मिळाल्यावर

याला हस्तिनापूरच्या सिंहासनावर राज्याभिषेक करण्यात आला. **जडभरत** – भरताने जडचर्येचा अंगीकार केल्यामुळे त्यास जडभरत म्हणत असत. ३३४. **संगी** – मित्र. ३३७. **बोसंडे** – बाहेर सांडणे. ३३८. **अष्टौ भावांचीं** – अष्ट सात्त्विक भाव असे – स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, वेपथु, वैवर्ण्य, अश्रु व प्रलय. **तुर्येचेनी** – मनाची चवथी अवस्था ( जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या व उन्मनी या पाच अवस्था ). **पारुषे** – खुंटे. ३४०. **कोंदाटे** – पूर्णपणे भरून जाई. ३४५. **त्रिपुटी** – ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान. ३४७. **अवधी** – मर्यादा. ३४९. **सुविज्ञ** – पंडित. ३५०. **कीटकीभृकुटीचा न्याय** – कुंभारीण नामक पक्षीण आपल्या घरट्यात लहान किड्यास नेऊन त्याला टोचून-टोचून स्वरूपाप्रत नेते. ३५२. **पुरुषनामें.** – एकाच पुरुषास ज्याप्रमाणे पती, पिता, काका, मामा इत्यादी अनेक नावे असतात त्याप्रमाणे. ३५४. **पल्लवें** – पाने. ३५८. **कल्मष** – पाप. ३६०. **अमेध्यनीरीं** – घाणेरड्या पाण्याने. ३६३. **भाजन** – पात्र, भांडे. ३६७. **कानडा** – तिरकस, वाकडा. ३६८. **अशेष** – निःशेष. ३६९. **भोगा** – अनुभवा. ३७४. **बुजती** – घाबरतात. **कळाविद** – शास्त्रवेत्ते. ३७७. **पीयूषीं** – अमृतमय. ३७८. **निगुती** – युक्तीने. **परती** – निराळी. ३८०. **गर्भांध** – जन्मापासून आंधळा. ३८३. **गजवेल** – नागवेल. ३८५. **पायखोळा** – पायखान्यात. **रुईबोंडे** – रुईची फळे. ३८७. **मद्योवकाचें काष्ठ** – ताडाचे वगैरे झाड. **हरिवृक्ष** – हरिचंदन नामक वृक्ष. ३९०. **भरित** – भरलेले. **आबुनव** – सोने. **तगट** – वर्ख. **पालवीं** – पदरात. **रगटें** – फाटके जुने वस्त्र. ३९४. **अकीर्तिकाबाड** – दुष्कीर्तिरूप ओझे वाहणारा. ३९७. **वृत्ती** – चरितार्थाचे साधन. ३९९. **एकापाडे** – एकसारखीच. ४०२. **न भेटों** – प्राप्त होत नाही. **मानवीच्या** – मानवी स्त्रीच्या. ४०४. **कूपिका** – काचेची लहान बाटली. **तनुअंतरा** – शरीरास व अंतःकरणास. ४०६. **नृसिंहउपासक बटीं** – निष्ठावान नृसिंहभक्त. ४०७. **वैराग्यअंभा** – वैराग्यरूपी जल. ४१०. **भांगटिळा** – भांगामधील शेंदुराची चिरी. ४१२. **चीर** – वस्त्र. **घाय** – घाव, जखम. ४१४. **घोंगायलें** – बुजबुजले. **विकारीं** – मनोविकारांनी. ४१५. **चोहाटां** – चव्हाट्यावर. **थाट** – समुदाय. **जात्याने**–जाणाऱ्याने. ४१६. **भेरी**–नगारा. ४१७. **वाकळ**–गोधडी. ४१८. **साळे**–पाठशाळेत. **सबळें** – बलसंपन्न. मुलांच्या शाळेत वाटोळे मोठे दगड उचलण्याची कवाईत शिकवीत असावेत. ४१९. **यजितां** – यज्ञ करणारे. ४२०. **अन्यायीपायीं** – अपराध्याच्या पायांत. **सुवती** – घालतात. **देवडे** – देवडीवर. ४२१. **शीतळ** – थलथलीत. ४२२. **वडवाग्नि** – समुद्रातील अग्नी. **सिंधूदक** – समुद्राचे पाणी. ४२३. **आहें** – आचेने. ४२४. **नारी** – स्त्री (या नावाची). **पुरुष**...पुरुषास उन्मत्त करणारी वेल. **मार्गार्गळा** – रस्त्यातील अडथळा. ४२५. **भोगियां** – उपभोग घेणाऱ्यांस. ४२८. **तवका** – त्वेषास. ४२९. **शुक**...शुकमुनींच्या शब्दरूप उल्का. ४३०. **निकें** – खरोखर. **कश्मळ** – अपवित्र. ४३३. **वरागर** – खाण. **भांडार** – खजिना. ४३४. **चोख** – शुद्ध. ४३६. **विकल्प** – शंका. ४३९. **बाथर** – दादरा. **आहे** – ज्वाला. ४४०.

**संकोचता** – संकुचित. **जाजावलों** – गांजलो. ४४१. **चतुर्विंशति अयनें** – चोवीस अर्धवर्षे. **आदानें** – संकटे. ४४४. **शेखीं** – शेवटी. ४४५. **नयनारविंदा** – नयनकमळी. **स्वेदकंप** – घाम व थरकाप. ४४६. **लिंगीं** – महादेवाच्या पिंडीस. **पस्तावा** – पश्चात्ताप. **शारें** – शहारे. ४४७. **नेणीव घेतीयापुढें** – मुद्दाम अज्ञान प्रकट करणाऱ्यांपुढे. **पारुषती** – खुंटती. ४४८. **परता** – पलीकडे, दूर. ४४९. **विशाखांतीं** – विशाखा नक्षत्रानंतर. **ललितांतीं** – ललिताच्या वेळची पदे वगैरे गायल्यानंतर. ४५०. **सामसंधी** – मैत्री. **पांथिक** – प्रवासी. **पांगुळे** – पांगळा होई. ४५१. **विचारू** – तपोभंगाचा निश्चय. ४५२. **शुकशब्दीं** – गोड (पोपटाच्या) वाणीने. ४५३. **अक्षोभ्य** – मोहातीत. ४५४. **यती** – संन्यासी. **परमहंस** – कुटीचक, बहूदक, हंस व परमहंस असे यतींचे चार प्रकार आहेत. परमहंस हा सर्वश्रेष्ठ यती. ४५५. **पाताळपन्नग** – पाताळातील नाग. ४५६. **शुष्कपर्णाशनी** – सुकलेली पाने खाणारा. **अनीरी** – नीर म्हणजे पाणी, ते न पिणारा. **ऊर्ध्वपादीं** – वर पाय व खाली डोके करून राहणारा. ४५७. **विव्हळ** – आतुर. **तुजपाडें** – तुझ्यासारखा. ४५८. **लाधली** – लाभली. **त्रिशुद्धी** – निश्चितपणे. ४५९. **सुरवर** – मी मी म्हणणारे देव. ४६०. **गर्जूनियां** – मोठ्याने बोलून. **गिरा** – वाणी, भाषण. **दक्षिण** – उजवा. **आगळें** – थोर, फार, पुष्कळ. ४६१. मेरूचा उल्लेख स्फुटकाव्यांत अनेक ठिकाणी आला आहे. याच काव्यात पूर्वी ओवी क्र. ३७५ मध्येही तो आला आहे. **विदेशा** – अन्य स्थानास. **उडुगण** – ग्रह, नक्षत्र, तारका इत्यादी. **ध्रुव**–ध्रुवाचा तारा. **अध्रुव** – हलणारा. अढळ असलेला ध्रुवताराही ढळेल, पण तुझे वैराग्य विचलित होणार नाही, हा आशय. ४६२. **भूगोळप्रदक्षणेलागीं** – पृथ्वीप्रदक्षिणेसाठी. **आगीं** – उष्णतेमध्ये. **सुरसरिता** – देवनदी, गंगानदी. ४६३. **वाय** – वायू. **शब्दासरिसा**–शब्दोच्चाराबरोबर. **वरुणालय** – सागर. ४६४. **नेम** – वैराग्यनिश्चय. **निर्मळ** – शुद्ध.

## उपसंहार

१. **अनुवाद** – भाषण. **पुत्र पित्याचा** – शुक व त्याचे वडील व्यास यांचा. **बोधू** – उपदेश. २. **तृतीयोध्याया** – शांतिपर्वाचा तिसरा अध्याय? या ओवीत कवीने आपल्या आराध्य देवतेचा उल्लेख स्पष्टपणे केला आहे. ३. **कैवल्याचा** – मोक्षाचा. **दानी** – दान करणारा, दाता, मोक्षदायक हा अर्थ. **सायुज्यमुक्ती** – सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता या मोक्षाच्या चार पायऱ्यांपैकी अखेरची.

# १०. हरिश्चन्द्राख्यान

## अध्याय पहिला

१. ॐ हा मांगल्यवाचक आहे. त्याचे अ, उ व म असे तीन घटक असून ते अनुक्रमे विष्णू, महेश व ब्रह्मा यांचे बोधक आहेत. **गजवदना** – गणपती हा 'सुखकर्ता, दुःखहर्ता व विघ्नाची वार्ता नुरविणारा' असल्यामुळे त्यास कवीने वंदन केले आहे. **नागानना** – नाग म्हणजे हत्ती, त्याप्रमाणे आनन म्हणजे मुख असलेला तो गणपती. २ **शारदा** – शार म्हणजे ज्ञान, ते देणारी ती शारदा. **शुक्लांबरा** – शुभ्रवस्त्रा. **सुरमुनीं** – देव व ऋषी यांनी ५. अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका व द्वारका या सात मोक्षदायक नगरी आहेत. **जीमाझारी.** – जिच्यामध्ये. **हरिश्चंद्र** – सूर्यवंशीय राजा, त्रिशंकूचा पुत्र. ६. या ओवीत रम्य रूपक अलंकार आहे. या व पुढील ओवीत हरिश्चंद्र नावाचे निर्वचन केले आहे. ९. **कमलावरू** – लक्ष्मीचा पती म्हणजे विष्णू. १२. **रागोद्धारू**– गायन. १३. **वीरप्रधानीं**– शूर व मंत्री यांनी; शूर मंत्र्यांनी. **वेत्रपाणी** – हातात छडी धारण करणारे. **समाय** – सामावे. १५. **मूळकंदू** – उत्पत्तिस्थान. १७. **कनकपात्रीं** – सुवर्णपात्रांत. २१. **मिनली** – भरली. २२. **लाहूनि**– लाभून, पावन. २३. **अतिसोमटी** – अतिशय प्रेक्षणीय. २४. **नवखंड** – नऊ खंडांची नावे – ऐंद्र, कसेर, ताम्रपर्ण, गभस्तिमान, कुमारिका, नाग, सौम्य, वारुण व गांधर्व. **क्षत्री** – क्षत्रिय. २६. **येते** – प्रज्वलित होई. २७. **सुतेज** – प्रखर. २८. **भूपहरिण** – हरिश्चंद्र राजा हेच हरिण. ३०. **सुमनें** – फुले. **मघमघीत** – घमघमीत. अन्तर्गत वर्ण-विपर्यय नमूद करण्याजोगा आहे. ३१. **निर्जर** – जरारहित असे देव. ३२. **रंक**–भिकारी, दरिद्री. **वल्मिक** – मुंग्यांचे वारुळ. ३४. पूर्वीच्या ९ व्या ओवीचा प्रथम चरण व या ओवीचा प्रथम चरण एकच आहेत. **धुरू**–ध्रुव. **शृंगारू** – भूषण. ३५. **रक्षिता** – वाली; संरक्षक. ३६. **बापुडें** – बापुडवाणे. **धडपुडें** – कठोर. ३७. सप्त नरक असे – क्षार-कर्दम, रक्षोगणभोजन, शूलप्रोक्त, दंदशूक, अवटनिरोध, पर्यावर्तन व सूचिमुख. ३९. **गहन** – गर्हणीय. ४१. **टाळीन** – चुकवीन. ४२. **कसीं** – कसोटीस. **सुकृतासी** – पुण्यास. **पल्लवासी** – पदरास. वशिष्ठाने विश्वामित्राचे आव्हान स्वीकारताना पदरास गाठ मारली. ४४. **चर्मदृष्टी**– चर्मचक्षूंनी. ४५. **वातांबुपर्णाशन**– वारा, पाणी व पाने खाणे. ४६. **पंचाग्नि** – चार दिशांना चार अग्नी व डोक्यावर सूर्य हा पाचवा अग्नी. **अब्दें** – वर्षे. ४७. **वोपीन** – अर्पण करीन. ४९. **सिद्धाश्रमा** – ऋषींच्या आश्रमास. ५०. **पाठी** – वशिष्ठांच्या मागून. ५२. **नेमस्त** – इंद्रसभेतील हकीकत. ५३. **शिबिका-यानी**– पालखीत. ५४. **तुरीं** – वाद्ये. ५५. **महींद्रालय** – राजवाडा. ५८. **हरिचंदन** – चंदनविशेष. ६१. **जन्हु**– एक सोमवंशीय राजा. ६३. **हाटक** – सुवर्ण. **चोख** – स्वच्छ-पणा. ६५. **शिबिराजा** – उशीनर राजाचा पुत्र. औदार्यासाठी प्रसिद्ध. एकदा

याची कसोटी पाहाण्यासाठी इन्द्र व अग्नी अनुक्रमे ससाण्याचे व कपोताचे रूप घेऊन आले. कपोत आत्मरक्षणासाठी शिबिराजाला शरण गेला. ससाण्याने आपले भक्ष्य परत मागितले असता शिबिराजाने कपोताच्या भारंभार स्वत:चे मांस देण्याची तयारी दर्शविली. परंतु प्रत्यक्षात वजन करण्यास सुरुवात झाली असता कपोत जड होऊ लागला. शेवटी शिबिराजा स्वत: तराजूच्या पारड्यात चढला तेव्हा इंद्र व अग्नी संतुष्ट झाले व त्यांनी आपली खरी रूपे प्रकट करून शिबिराजाचे शरीर पूर्ववत केले. **सूर्यवंशी** – शिबी सोमवंशीय होता. **तुकिती** – तोलतात. **ताजवां** – तराजूमध्ये. ६६. **नवजावें** – न जावे. **ऋषिचिया** – विश्वामित्राच्या. ६८. **अभिचारकर्मी** – मंत्रतंत्रकर्म करणारा. **मातंगयाग**– देवीस वश करण्यासाठी केलेला यज्ञ. ६९. **शोधुनी** – शुद्ध करून. ७०. **शाक्तिक**–शक्तिदेवीचे उपासक. ७१. **चरु**– होमाचा भात. ७२. **अशुद्ध** – रक्त. ७३. **पंचमुद्रा** – खेचरी, भूचरी, अगोचरी, चाचरी व अलक्ष या पाच मुद्रा. ७४. **अभिचारकंकण** – दुष्कर्मयज्ञाचे कंकण. ७५. **अवदान** – आहुती. ७६. **दाटोनी** – भरून. ७८. **निगुती** – खात्रीने. ७९. **निकें** – बरे आहे. ८१. ग्रंथविस्ताराच्या भीतीपोटी संक्षिप्त वर्णन केले आहे, हा अभिप्राय. **अयनें** – अर्धवर्षे. ८२. **भार** – समुदाय. **खेचर**– आकाशात संचार करणारे. ८४. **नवजाती** – न जाती. **कृषिके** – शेतीमाठी. **व्यवसायिकें**– व्यापाऱ्यांनी. ८५. **भाविती** – मानिती. ८६. **जोहार** – मुजरा. **प्रजा** – प्रजाजन. **पशुतम** – श्वापदरूपी काळोख. ८८. **पौर** – नगरवासी लोक. **अपकीर्ति** – प्रजाभयाचे निवारण न केल्याने लागणारा कलंक. ८९. **निवटुनी** – नाश करून. ९०. **वाहिनी** – सेना. ९१. **त्राहाटिल्या** – वाजविल्या. ९२. **वळघल्या** – चढल्या. ९३. **रहंवर** – श्रेष्ठ रथ. **ऊर्ध्वशुंडें** – सोंडा वर करून. ९५. **गर्भी** – मध्यभागी. ९६. **राजकुमार** – राजपुत्र रोहिदास. ९७. **पाशबंधनीं** – जाळ्यांत. १००. **लाघव** – युक्ती. **कुरंग** – हरिण. १०२. **कनकवपू**–सोनेरी शरीर. १०३. **गुणीं** – धनुष्याची दोरी. १०५. **अंतरें** – अंतरावर. **रोलंब** – भ्रमर. १०७. **एक** – काही. **मुखवाडें**– मुखाने. १०८. **चूतवृक्ष** – आम्रवृक्ष. **लवले** – भाराने वाकले. **कंटकी फळे** – फणस. **नव्हाळी** – गोडी. **मुळीं** – मुळापासून. १०९. **सिंधूची वाट दाविती** – फणसाचा रस वाहून जात होता. १११. **विषधरू** – साप. **निधान** – द्रव्यनिधीला. ११२. **न्यग्रोध** – वड. **पालाश** – पळस. **देवत्रयाचे** – ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे. तुळसी, बिल्व असा पाठ असता तर क्रमभंग टळला असता. कारण बेल शंकराला आवडतो व तुळस विष्णूला आवडते. ११४. **कटका** – सैन्यास. **यांचुनी** – शिवाय. ११६. **नकुळ** – मुंगूस. ११७. **उलूक** – घुबड. **निरखूनी** – सोपवून. येथील ओव्या ११५ ते ११७ मधील वर्णनाशी कालिदासकृत ऋतुसंहारान्तर्गत प्रथम सर्गातील श्लोक १३ ते २० आणि दामोदरपण्डितरचित वच्छहरण या प्राचीन मराठी काव्यातील ओव्या १८६ – १८८ यांची तुलना करण्याजोगी आहे. १२०. **शिवागार** – शंकराचे मंदिर. १२३. **नाचणी** – नर्तिका. १२५. **ताळ तोडणे** – ठेका साधणे. १२६. **पांगुळे**–गतिरहित झाला. **कूळ** – काठ. १२८.

**धरारमण** – राजा. **संगीतनिकेतन** – संगीताचे निवासस्थान. १३२. **कुरंगनयनी** – हरिणाक्षी. १३३. **मुनिवर्यदासी**– विश्वामित्राच्या सेविका. १३४. **येरें** – प्रधानाने. **शीर्सी** – मस्तकी. १३५. **कबरीं**–केशकलापांनी. १३६. **कुपात्रा**– पृथ्वीरूप भांड्यावर. १३७. **टाकूनि** – लोटून, झोकून. १३८. **ग्रास** – घास, नाश. १३९. **समर्था**–हे विश्वामित्राचे संबोधन. १४०. **नरभूषणें** – नरश्रेष्ठाने, राजाने. **नेघोनि**– न घेऊन. १४२. **कंचुकी** – चोळी. **प्रेतदशा** – मरेस्तो मारले हा भावार्थ. १४३. **घोपोनि** – घालून. १४४. **व्याळ**–सर्प. १४५. **वैश्वानर**–अग्नी. १४६. **वैवस्वत**–यम. १४७. **पडिभर**–बळ. **काविरें** – धुंदी. १४८. **प्रचीत** – अनुभव. १५०. **प्रतिसृष्टिजनका** – प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्या. १५२. **कोटी** – प्रकार. **वायां** – व्यर्थ. १५४. **करणें** – इंद्रिये. **तर्जनीनखें**– तर्जनीच्या नखाने. १५५. **स्नेहाळें**–स्नेहशील अशा आपण. १५६. **मृगांकमरीचिका**– चंद्रकिरण. **पादुका**– ऋषींच्या पादत्राणांना. १५७. **कुंभिनीवर** – पृथ्वीपती. १५८. **कौशिक** – विश्वामित्र. १५९. **वाग्भवानी** – वाणी हीच तुळजापूरची भवानी.

## अध्याय दुसरा

२. **साचोकार** – खरोखर. **मृगांबु** – मृगजळ. ३. **वडवानळ** – शिवाच्या तृतीय नेत्रातून निघालेला अग्नी. ५. **या** ओवीचा शेवटचा चरण संस्कृतात आहे. (मनोरथाची प्राप्ती होवो.) ७. **आतुर** – उत्सुक. ९. **पंजर** – कवच (लाक्षणिक). ११. **संकल्प** – संकल्पाचे उदक सोडणे. १२. **अंकुश** – हत्ती. **कडपाळें** – लगाम (घोडे). **लेखणी** – कार्यालय. १३. **सवेंचि** – तत्काळ. **लोहागळा** – लोखंडाची कांब. **निघातें** – जोराने. १४. **घायें** – घावाने, प्रहाराने. १५. **योनी** – जन्म. **आटणी** – जाच, त्रास. १७. **सेजीं** – बिछान्यावर. २४. **ज्ञान** – स्वप्नाचा अर्थ. २६. **मूदलें** – घातले, सोडले. २७. **सिंधुवासा** – समुद्रवसना. **नवखंडरत्नभूषणी** – नवखंडरूप रत्नांनी अलंकृत. **राज्यभाजनीं** – राज्यरूप पात्रांत. २८. **माजी** – मध्येच. **विवशी** – जखीण. ३०. **औटतुक** – साडेतीन भार, २८ हजार तोळे. ३५. **वाद्यां**. . . वाद्ये वाजू लागली. **धरानाहो** – धरानाथ, पृथ्वीपती. ३९. **पडताळुनी** – उगारून. ४२. **तिळतुल्य** – तिळाइतके. ४३. **शेखीं** – शेवटी. ४४. **भांडारी** – खजिनदार. **हेममांदुसा** – सोन्याच्या पेट्या. ४५. **तुळा** – तागडी. **धडा** – वजन. ४७. **पचती** – शिजतात. **सवितासुत** – सूर्यपुत्र यम. ४८. **सुचलें** – सुचविले. ४९. **चिदर्क** – ज्ञानसूर्य. ५३. **स्तंभीं** – खांबाशी. ५७. **सौदागर** – व्यापारी. ६०. **उत्तीर्ण** – ऋणमुक्त. ६२. **स्रष्टयाचें** – ब्रह्मदेवाचे. ६३. **रतीच्या वल्लभा**– मदनाला. ६५. **भावूनि** – मानून. ६६. **भलत्या रीती**– काही तरी करून. ६७. **नेमसंधी**– नेमलेली मुदत. ६९. **पाळा** – समुदाय. ७१. **व्यंकट**–वाकडी. **अंगोळिया** – बोटे. ७३. **तितुका** – सर्व. **आहार** – खाणेपिणे. ७४. **वारण** – हत्ती. **उष्टरें** – उंट. **खिल्लारें** – कळप. ७५. **सारिका** – मैना, साळुंक्या. **राघे** – पोपट. ७७. **लेपें** – चित्रे ७८. **संबोखोनि** – संबोधून. **अपरधाता** – प्रतिसृष्टीचा निर्माता,

विश्वामित्र. ८२. **धैर्यध्वज** – धैर्यरूप पताका. **फेणें** – व्यापारी माल. ८६. **कृतांतजनक**- यमाचे वडील, सूर्य. **द्वादशकळे**– सूर्याच्या बारा कळा. ८८. **वरुण** – जलपती. **आपें**- पाणी. ८९. **निर्वारि** – निर्जल. ९४. **मूळीं** – तळाशी. ९५. **वारी** – पाणी. ९७. **धडें** – शरीरे. १०१. **जरेकरूनि** – वार्धक्याने. **कंधरा** – मान. १०२. **येरें** – विश्वामित्राने. १०४. **चरणींची वसनें** – पायाची वस्त्रे, जोडे. १०५. **नग्नचरणीं** – अनवाणी. १०६. **कांती** – कातडे. १०७. **अव्हाटें** – आडवाटेस. १०९. **वाटिका** – बाग. **प्रपास्थानें** – पाणपोया. १११. **सुरतरूंची** – कल्पतरूंची. **वेळा** – वेलदोडा. ११२. **सुवास**– सुगंधित. ११३. **आरळ** – मऊ बिछाने. ११५. **पोहे** – पाणपोई. ११६. **मायावन** – कपटाने निर्मिलेले अरण्य. ११७. **कायावाहिनी** – शरीररूप नदी. ११८. **वांकडी** – पावसाची झड. ११९. **कथानर्मदा** – कथारूप नर्मदा नदी.

## अध्याय तिसरा

२. **आमोद** – सुवास. ३. **प्रपामंदिर** – पाणपोईचे स्थान. ४. **हें** – पाणपोईतील पाणी. ८. **देवांगनातुल्य** – अप्सरांसमान. **बोळवण** – रवानगी ११. **चामके** – निघून गेला. १५. **बोडवी** – केले. **मुरडे** – परत फिरे. १७. **पालवीतसे** – खुणेने बोलावीत आहे. १९. **उभिया** – उभ्या. **मलयानिल** – सुखावह व सुवासिक वारा. २१. **दशद्वयशताक्षें** – दोन हजार डोळ्यांच्या शेपाने. २२. **दुष्टदंडना** – दुष्टांना शिक्षा करण्यासाठी. **कमळापती** – विष्णु. २३. **तुंबळ** – जोराने. **मूळ** – उत्पत्तिस्थान. २५. **श्रोत्रिय**– जो ब्राह्मण कुळात जन्माला आलेला आहे, ज्याचे मौंजीबंधनादी संस्कार झाले आहेत व ज्यास विद्या प्राप्त झाल्या आहेत त्यास श्रोत्रिय म्हणावे. **अवर्ण** – खालच्या वर्णाच्या वा जातीच्या. २८. **वदनांबुजक** – सुकुमार वदनकमळ. ३३. **बोबाळणे** – आरोळी करणे. ३५. **असाध्य** – हरण करण्यास कठीण. ४१. **सावाइलें** – मान्य केले. **वणवियामाझारी** – वणव्यामध्ये. ४३. **कटकटा** – अरेरे ! ४४. **शंखस्फुरणें** – शंखध्वनी. ४६. **मजवेगळे** – मला टाकून. **सायुज्यसदना** – मुक्तीच्या घरी. सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता या मोक्षाच्या चार पायऱ्या. ४७. **भवपुरीं** – संसार-नगरीत. **येणें** – गमन. ४८. **अळुमाळ** – किंचित. ४९. **पावकीं** – अग्नीत. ५०. **धर्मशिळे** – धर्मरूप शिळेवर. ५१. **अंगें** – स्वत: ५४. **लोध** – प्रेत. ५५. **लघु लाघवें** – मोठ्या चातुर्याने. ५६. **व्यस्तें** – अस्तव्यस्त. ५७. **मडीं** – प्रेते. ६४. **हंस** – आत्मरूपी हंस पक्षी. **नोळ** – घरटे. ६६. **जोडेल** – प्राप्त होईल. ६७. **निशी** – रात्र. ६९. **धणीवरी** – तृप्ती होईपर्यंत. ७०. **विंदाण** – कपट, चमत्कार. ७१. **इंदुवल्लभा** – चंद्रप्रिया, रात्र. ७३. **परौतें** – पलीकडे. ७५. **आकांतीं** – संकटामध्ये. ७९. **सूचलें** – कळले. ८०. **तीपुढें** – तारामतीसमोर. ८१. **हेलावा** – लाट. **वोडंबरी** – गारुडी विद्या. ८७. **वणव्यां** – वणव्यात. ८६. **वपू** – शरीरे. ८९. **भयासुर** – भेसूर. ९१. **मेसको, मायराणी** हे देवताविशेष व **प्रेतार्णव** हा पिशाचविशेष. **धुमस**– धुमाकूळ. ९२. **तगर** – मेंढा. **भालुक**–

कोल्हा. ९५. **घन** – लोखंडी घण, हातोडा. **प्रभंजन** – वारा. ९७. **त्या तपें**– वशिष्ठ-कृत तपाने. ९९. **धरटीकार**– गस्त घालणारा. **साट** – काठ्यांचा जुडगा. १०२. **पंचवदन** – शंकर. या पाच मुखांची नावे अशी – सद्योजात, तत्पुरुष, अघोर, वामदेव व ईशान. १०४. **श्रीधरनखेंदुसुधाधारा** – विष्णूच्या नखरूप चंद्रापासून निघणाऱ्या अमृतधारा. १०६. **त्रिगुण**. . .सत्त्व, रज व तम हे तीन गुण हीच तीन पुरे. ओव्या १०६ व १०७ यांतील स्तवनात शंकराचे निवासस्थान, त्याचा वर्ण, त्याचा पराक्रम, त्याचा ध्वज, देवांतील स्थान, भक्तप्रेम, माहात्म्य, स्वरूप, अद्‌भुत कृती व शरीरविशेष यांचे वर्णन केले आहे. हे लहानसे स्तोत्र परिणामकारक आहे. १०९. **अंचळ** – पदर. ११०. **वाग्बंधन** – वचन देऊन बांधणे. १११. **बांदवडी** – अटकेत. ११२. **क्रोधहयवाग्दोरा** – क्रोधरूपी घोड्याला बांधून ठेवण्याची वाणीरूप दोरी. ११४. **वोजा** – काळजीने. ११६. या ओवीत पुढील अध्यायातील कथावस्तू सूचविली आहे. मागील पहिल्या अध्यायातील ओवी क्रमांक १५८ व दुसऱ्या अध्यायातील ओवी क्रमांक ११७ अशाच स्वरूपाच्या आहेत. 'सर्गान्ते भाविसर्गस्य कथायाः सूचनं भवेत्!' या काव्यशास्त्रीय दंडकाचे पालन येथे केलेले आहे, असे जाणवते. ११८ व ११९ या दोन ओव्यांत हरिश्चंद्राचे हे कथानक दोषनाशक व संसारविध्वंसक असून श्रोत्यांची हिंमत वाढविणारे आहे, असे म्हणून मुक्तेश्वराने आपले प्रयोजनच जणू सूचविले आहे. हरिश्चंद्राची ही कहाणी रसाळ असल्याचे कवीने पूर्वी १।१५८ व २।११९ या ओव्यांतही म्हटले आहे.

## अध्याय चौथा

१. **छायापति**–सूर्य. त्याच्या वंशाचे भूषण म्हणजे हरिश्चंद्र राजा. २. **हाटवटीं** – बाजारामध्ये. ६. **उरलिया** – बाकी देणे चुकते करण्यासाठी. **वोपोनी** – विकून. ११. **कर्मरेखा** – भाग्यरेषा. १२. **कुट्टिणी** – कुंटीण. १४. **धडधडां** – धडाधड. **धडा** – वजन. १५. **गुणनिधान** – सद्‌गुणांचा खजिना अशी तारामती. **अवर्ण** – नीच जातीतील व्यक्ती. १६. **गंडकी** – गंडकी नदीतील शाळिग्राम. **पशुघ्न** – पशूंची हत्या करणारा, खाटिक. **मद्यक** – मद्य बनविणारा कलाल. १८. **जाश्वनीळ** – शंकर. १९. **भाग्य**. . .सद्‌भाग्यस्वरूपी सूर्य. २०. **पढियंती** – प्रिय. २१. **मवाळ** – मृदू. २३. **यापासोनी** – या संकटापासून. २४. **स्वधर्म** – पातिव्रत्यधर्म. **शेखीं**–शेवटी. २५. **मुंदरी** – मुंदरीला विकत घेण्यासाठी. २६. **पाक** – स्वयंपाक. २७. **तुक** – वजन. ३१. **म्हणे** – तारामती म्हणाली. ३३. **योग** – संयोग, मीलन. ३५. **धामा** – घरी. ३८. **श्वपच** – चांडाळ. **प्रत्यक्ष** – साक्षात्. ३९. **तालस्कंधी** – ताडाच्या झाडाइतके उंच खांदे आहेत ज्याचे असा. ४०. **सिंहिकानंदन** – राहू. ४२. **साचें** – खरोखर. ४५. **गलद्रक्त** – ज्यांतून रक्त गळत होते अशी. ४७. **बाह्याचरण** – ढोंग. ४८. **दयाळ** – नाव दयाळू पण करणी चांडाळाची. ४९. **दासीदशकेंशीं**–दहा दासींनी. ५०. **भाविलें** –

मानिले. ५१. **बाहे** – हाताने. ५२. **बाह्यवर्तीचें** – घराबाहेरचे. ५३. **सजीव** – जिवंत असून प्रेताप्रमाणे. ५७. **अंत्यजें** – डोंबाने. **रिता** – रिकाम्या हाताने. ५८. **तुझेनें** – तुझ्याच्याने. ५९. **चांचरी गेलों** – पाय अडखळून पडलो. ६१. **बुडुखीं** – बुडाशी. ६२. **थारे** – स्थिर राही. **वारि** – पाणी. ६४. **मित्रराज** – सूर्य. ६५. **वर्ण** – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण. **आश्रम** – ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम. **सेतु** – मर्यादा. ६६. **शुष्कान्न** – न शिजविलेले अन्न. **भार्गवशाळा** – कुंभाराचा कारखाना. **भाजन** – पात्र, मडके. ६८. **वोगरिले** – वाढले. ७०. **भोज्य** – खावयाचे अन्न. **भोक्ता** – खाणारा. ७१. **क्षुधार्थी** – भुकेलेला. तुळा – तृषार्थी (गजेंद्र-मोक्ष १.) ७२. भुकेलेल्या ब्राह्मणाचे या ओवीतील शब्दचित्र हृदयंगम आहे. **वेंगडें**– वाकडी. **दंडीं** – काठीवर. ७३. **करसंकेत** – खुणेने सांगून. ७५. **मागें राहिला** – ब्राह्मणाबरोबर भोजनास बसला नाही. ७७. **पात्र** – पात्रातील अन्न. ७९. **कडासों** – घट्ट. ८०. **धुमसितां** – ठोकून काढीन. ८१. **तारारंगक** – तारामतीला आनंद देणारा, हरिश्चन्द्र. **अब्द** – वर्ष. **अर्कांतीं** – सूर्यास्ताच्या वेळी. ८७. **अटोळा** – शेतातील माळा. **पुढें वर्तलें तें** – तुळा अध्याय ३, ओवी ११६.

### अध्याय पाचवा

१. **नृपनंदना** – रोहिदास. ३. **बडव्यांसंगें** – पुजाऱ्यांबरोबर. ४. **दशनें** – दाताने. ५. **भोगी** – सर्प. **विजनीं** – अरण्यामध्ये. ६. **परिमळकरंडा** – फुलांची करंडी. **जाळी** – झाडांची गर्दी. १०. **अनळ** – अग्नी. **अवरुधे** – उपटे. १२. **धुंवारें** – झडप घाली. **व्याळ** – सर्प. १४. **नेत्रांच्या गर्ता** – डोळ्यांच्या खाचा. १५. **कुंभोद्‌भव** – अगस्ति-ऋषी. १६. **आंचळें** – पदराने. १७. **दीप्ति** – प्रकाश. १९. **सजलनयना** – साभि-प्राय विशेषण आहे. २०. **मातामगरी** – मातारूप मगर. **अंचळत्यागें** – पदर न साव-रता. २३. **अवचट** – अकस्मात्. २६. **निमाला** – मरण पावला. २७. **पद्मिनीनाथ** – सूर्य. २८. **निरय** – नरक ३०. **बोधुनी** – सल्ला देऊन. **रक्षण** – रक्षक. ३१. **सरणीं** – चितेवर. **शिखा** – ज्वाळा. ३४. **दोर्दंडें** – हाताने. ३६. **अर्धदाहित** – अर्धवट जळलेले. **कटाकटा !** – हायहाय ! **अदृष्टीं** – दैवात. ३७. **केवढा** – कसा. ३९. **पाणिस्पर्श** – विटाळ. ४०. हरिश्चन्द्र व तारामती ही दोघे एकमेकांना ओळखत नाहीत हे आश्चर्य आहे ! ४२. **सुकृतवांटा** – पुण्यांश. ४४. **पडळ** – पडदा. ४८. **वचना** – आज्ञा. ४९. **तपोधन**–विश्वामित्र. ५०. **घरटी**–फेरी. ५३. **आंतें** – आतडी. ५४. **चूर्णकज्जल** – चुना व काजळ. ५५. **मुख** – वेस. **कपाट** – दरवाजा. **लांव** – राक्षसीण. ५६. **क्षुद्र-कपाट** – लहान दरवाजा. ५८. **जातां** – जाल तर. **दीपिकाजाळीं** – दिवट्या लावून. ६०. **पाषाण** – दगड. **गाढ** – प्रचंड. **परजुनी** – तोलून. ६१. **सुभट** – मोठे पराक्रमी लोक. ६३. **दंडीत** – झोडपीत. ६५. **भोंवडूनि** – फिरवून. ६७. **खेचरी** – आकाशात फिरणारी राक्षसीण. ६९. **वेल्हाळ** – प्रिय. **आळोआळ** – प्रत्येक आळीत. ७०.

**चाउटी** – वडबड. **मुष्टी** – मुठीत. ७१. **निजवल्लभें** – हरिश्चंद्राने. **तेजाळें** – धारदार. ७२. **निर्जर** – देव. ७३. **सुवर्णा** – अग्नीच्या सप्तजिव्हांपैकी एक. **निशारमण** – चंद्र. स्वाहा व स्वधा या अग्नीच्या स्त्रिया. **उभयवदन** – द्विवदन. **समीर** – वायू. **धनद** – कुबेर. ७४. **शची** – इंद्राणी. **धर्म** – यमधर्म. **संयमिनी** – यमनगरी. ७६. **मदनारीमित्र** – मदनाच्या शत्रूचा ( = शंकराचा) मित्र म्हणजे विष्णू. **चतुर्वक्त्र** – ब्रह्मदेव. **विषमनेत्र**–त्रिनेत्र, शंकर. ७७. **बाहाळी** – टवटवी. **चिद्गगनीं** – ज्ञानरूप आकाशात. ७८. **चाड** – इच्छा. **तयांचीं** – वैकुंठादी फळांची. ८०. **सुकुमार** ऐवजी सुकुमारी असा पाठ अधिक योग्य झाला असता. **स्वरूपमुद्रा** – ऊर्ध्व दृष्टी. ८३. **अपरधाता** – विश्वामित्र. ८४. **वोढवी** – पुढे केली. **मूर्ध्नी** – मस्तक. ८५. **विभूति** – भस्म. ८६. हरिश्चंद्राचे शुद्ध सत्त्व याच हरिश्चन्द्ररूप चंद्राच्या सोळा कळा, हा पहिल्या दोन चरणांतील रूपकार्थ. ८७. **उदित हातें** – वर हात करून. ९०. **सुधाकरें** – अमृतयुक्त हाताने. ९१. **शेस** – कपाळास शुभसूचक तांदूळ लावणे. ९४. **कालिमा** – शब्दाचा येथील स्त्रीलिंगी प्रयोग लक्षवेधक आहे. ९५. **लोपामुद्रा** – अगस्तिऋषीची पत्नी. सतींनी तारामतीस निजपुण्यरूप चोळया दिल्या हा आशय. ९७. **लोलोनि** – उगारून. ९८. **अटक** – हरकत. १००. **दंडपाणी** – यम. १०३. **वळघोनी** – बसून. १०५. **दिव्येंदुकळा** – स्वर्गीय चंद्राप्रमाणे तेजस्वी. १०६. **पवाडे** – कीर्तिपाठ. **वाडेंकोडें** – कौतुकाने. १०७. **जनजाया** – पुरुष व स्त्रिया. १०८. **मेघ** – सुवर्णाची (मेघ) वृष्टी. १०९. **तारानाथ** – तारामतीचा नाथ हरिश्चंद्र; तारकांचा नाथ चंद्र. येथील श्लेष हृद्य आहे. ११०. राजमंदिर जणू सौंदर्यपर्वताचा गाभा कोरून निर्माण केलेले होते ही कल्पना अभिनव व रमणीय आहे. १११. **अचुंबित** – बिनचूक. ११२. **शाण्णव कुळींचे** हा शब्दप्रयोग कालविपर्यासात्मक आहे. ११३. **गुणाब्धी** – गुणांच्या सागरास, हरिश्चंद्रास. या वाक्यातील उपमा भव्य व सुंदर आहे. ११४. **अमा** – अमावास्या. **बीजेचा** – द्वितीयेचा. **सखोल** – गूढ. ११६. **थाट** – मांडणी. **बोभाट** – आवाज. ११७. **राजनृपति** – श्रेष्ठ राजा.

## उपसंहार

३. **दरिद्राचळ**–दारिद्र्यरूप पर्वत. ४. बृहदश्व हे ऋषीचे नाव. ६. **सुखसायुज्य**–सुख व सायुज्य (मोक्ष).

## ११. एकनाथचरित्र

१. **विश्वंभरू** – परमात्मा. जनार्दनस्वामी हे एकनाथांचे गुरू. **अभयकरू** – वरदहस्त. २. **सुमन** – सद्भावयुक्त अंतःकरण. **भावार्थें** – भक्तीने. ३. **शम** – शांती. **दम** – इंद्रियनिग्रह. **गरिमा** – थोरवी. ५. **गंगातीरीं** – गोदातीरी. ६. **घर वसवी** –

घरात निवास करी. ७. **सदावर्त**–अन्नच्छत्र. ९. **सकृप**.– कृपावंत, दयार्द्र. १२. **वेतन** – पगार. **जीर्णजीर्ण** – जुनीपुराणी, फाटकीतुटकी. १३. **परिग्रह** – परिवार. पुसियलें हे क्रियापद निष्प्रयोजन आहे कारण 'एकनाथ बोलिले' असा वाक्यारंभ आहे. १६. **आंगें**– स्वत:. १७. या ओवीतील 'जीवन' शब्दावरील श्लेष मनोरम आहे. १८. **लवलाहीं** – त्वरेने. २०. **आंग चोरणे** – मन:पूर्वक काम न करणे. **देहधर्म** – मलमूत्रविसर्जनादी शरीरक्रिया. २१. **अवलंबें** – आश्रयास राहून. **राहटत** – वागत. २२. **सायासी** – परिश्रमपूर्वक. २४. **सुमनीं** – श्रद्धायुक्त अंत:करणाने. २८. **सुखवासी** – सुखात राहणारा. २९. **निभ्रांत** – नि:संशय. ४३. तपस्व्याची मानसिक उतावीळ चांगली वर्णिली आहे. ४४. **राउळा** – घरी. ५३. **निर्वाण** – अखेरचे. ५५. **उपरीवरी** – माडीवर. ५६. **आलापीत** – आळवी. ६०. **ब्रीद** – व्रत. ७४. **विनटला**–तत्पर झाला. ७९. **हर्षनादें**– हर्षभरित आवाजाने. **मार्जन**– प्रोक्षण. ८०. **संभ्रम** – सत्कार. ८५. **निगम** – वेद. ८९. **कृष्णकृपाक्षतारूं** – कृष्णाची दयार्द्र दृष्टी हेच तारू. ९०. **महानुभाव**– थोर पुरुष.

## १२. पदसंग्रह

**पद पहिले** – **मुक्तमनीं**– जीवन्मुक्ताच्या मनात. **मित्रान्वयनिधी** – सूर्यवंशाचे भांडार. **जनो** – जन्म. **नगकन्याधव** – पर्वताची कन्या ती पार्वती. तिचा पती शंकर. **बद्धां** – मायापाशबद्धांना.

**पद दुसरे** : **विवशी** – जखीण. **उबगोनि** – कंटाळून. **पसाऱ्याचे** – पैशाचे ? **आरवारी** – खुसखुशीत. **न्याहार** – न्याहारी. **पोरटा** – निराधार. **दुधाणे** – दूध तापविण्याचे भांडे. **घोटीं** – गिळते. **वृतांकें** – वांगी. **बघारिलीं** – तळली. **रायपुरी** – साखर. **भोरण्या** – आळोखेपिळोखे ? **लाहो** – लाभ. **चाराचूर** – चक्काचूर.

**पद तिसरे** : **वरता** – बाह्यात्कारी. **देहआकृती** – शरीरासक्ती. **परमहंस** – श्रेष्ठ संन्यासी.

**पद पाचवे** : यातील मावळण शब्दाचा प्रयोग समाजेतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. **काबा** – वरपांगी.

**पद सहावे** : **वाउगा** – निरर्थक. **शिष्यमुद्रा** – शिष्यत्वाचे लक्षण. या पदात अर्जुनादी आठ नात्यांचा साक्षात उल्लेख आहे. **निरसे** – नष्ट होतो.

**पद सातवे** : **अधिष्ठान** – निवासस्थान. **घरचें फेडी** – एकनाथाचे कर्ज देवाने फेडले अशी दंतकथा आहे. **करी देव दास्य** – एकनाथाच्या घरी देव कावडींनी पाणी भरत असे, असे एकनाथचरित्रात (ओवी १६) जे पूर्वी वर्णन केले आहे ते येथे ध्यानात ठेवावे. **थकित**– चकित.

# १३. आरतिसंग्रह

**बहिरोबाची आरती : कैरव** – चंद्रविकासी कमळ. **पदरजअंजन**–पायाची धूळ हेच अंजन. **निजठेवा** – भूमिगत द्रव्यसंचय. **चरणीं अरिगण तोडर मिरवी** – पायात शत्रुसमुदायरूप पुतळे बांधणे. **करुणाचक्षीं** – दयापूर्ण नेत्रांनी. दुसरे कडवे अर्थमधुर व श्रुतिसुभग आहे.

**महालक्ष्मीची आरती : भूधर** – शेष. **नागर** – सुसंस्कृत. चौथे कडवे प्रासपूर्ण व प्रवाही आहे.

**तुळसीची आरती** (प्रथम) : **पादपरूपें**– वृक्षरूपाने. या आरतीतील दुसरे कडवे रचनादृष्ट्या शिथिल आहे.

**तुळसीची आरती (द्वितीय) : ग्रीवा** – मान, गळा. **अघथारा** – पापाला थारा.

**ज्ञानदेवाची आरती :** कृष्ण एकादशी ही ज्ञानेश्वरांची समाधितिथी.

**श्रीएकनाथस्वामींची आरती** (पहिली) : **अधिकता** – प्रतिष्ठा. **'एकादश'** – भागवत महापुराणाचा अकरावा स्कंध. त्यावर एकनाथांनी लिहिलेली टीका. **अनुभवसार** – नाथांच्या दुसऱ्या एका ग्रंथाचे नाव. **भूसुर** – पृथ्वीवरील देव. **षट्कर्मे** – यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह. **कोणाचे घरीं खांद्या वाहे कावडी** – हा उल्लेख पूर्वीच्या एकनाथचरित्रात व पद क्रमांक ७ मध्येही येऊन गेला आहे. **मुक्या हातीं रामायण** – मुक्तेश्वर पहिल्याने मुका होता, नाथांच्या कृपेने त्यास वाचा फुटली अशी दंतकथा आहे.

**श्रीएकनाथस्वामींची आरती (दुसरी) : भवकुंजर** – संसाररूप हत्ती. 'एकनाथ' शब्दाचे निर्वचन लक्षवेधक आहे. **भानुकुळ** – भानुदासांच्या वंशात. **भानू** – सूर्य. येथील श्लेष हृद्य आहे.

**विश्वंभराची आरती** : पहिल्या व दुसऱ्या कडव्यांतील संबोधने विश्वंभर-गुणदर्शक अतएव अन्वर्थक आहेत.

**गोपाळाची भूपाळी** : भूप रागातील पद्यरचनेस भूपाळी म्हणतात. **अविद्याराती**– अज्ञानरूप रात्र. **इंद्रियगोधनें** – इंद्रियरूप गुरे. **सुटलीं** – सैरावैरा धावू लागली. **मानसवत्सें** – मनरूपी वासरे. **प्रबोध**– आत्मज्ञान. **आपसया** – सहज. **मिनलीं** – भेटली. **वाग्वादाचे उलूक**–वितंडवादरूप घुबड. **विकल्पअटवी** – संदेहरूप अरण्य. **साही चोरीं**– काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे सहा चोर. **विरागरश्मी** – वैराग्य-किरण. **चित्तरविकांत** – मनरूप सूर्यकांतमणी.

## संहितेचे शुद्धिपत्र

| पृष्ठांक | पद्यांक | चरणांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | ९ | १ | नायक | नायका |
| ४ | १२ | २ | कठिन | कठिण |
| ५ | २८ | ४ | तो | तों |
| १३ | ७१ | ३ | प्रभुस्त्रियासगीं | प्रभुस्त्रियासंगीं |
| १४ | ८० | ४ | आंगीं | अंगीं |
| १५ | ९५ | २ | हीरखें | हरिखें |
| १८ | १० | १ | सेवा | सेना |
| २४ | ५२ | २ | तरसी | तरती |
| ३३ | १२ | २ | टकिती | टाकिती |
| ३३ | २० | २ | दुख | दु:ख |
| ३६ | ३२ | १ | सुखदुख | सुखदु:ख |
| ४० | १३ | १ | ॐमिति | ॐमिनि |
| ४३ | २८ | २ | कर्मवेध | कर्मबंध |
| ४४ | ७ | ४ | ऐथें | एथें |
| ४७ | २ | ४ | महात्म्य | माहात्म्य |
| ५० | ४३ | २ | अणि | आणि |
| ५६ | २१ | ३ | उव्लंघिलेंसें | उल्लंघिलेंसें |
| ५७ | ९ | १ | श्रोत्र . . . प्राण | श्रोत्र . . . घ्राण |
| ५९ | ८ | १ | अप्रष्ठित | अप्रतिष्ठित |
| ६० | २२ | १ | अज्ञनाचीं | अज्ञानाचीं |
| ६० | २३ | १ | शास्त्रविधो | शास्त्रविधी |
| ६२ | २२ | १ | अकाळीं | अकाळी |
| ६२ | २ | ४ | इश्वरार्पण | ईश्वरार्पण |
| ७० | २७ | २ | कंठी | कंठीं |
| ७० | ३२ | ४ | पानीदु | दुपानी |
| ७२ | ७ | ४ | अवलोकिनी | अवलोकिती |
| ७३ | २५ | ३ | क्षितिसीं | क्षितीसीं |
| ७७ | ४ | ३ | हृपीकेषीं | हृपीकेशीं |
| ७९ | ३३ | ३ | प्रवतल | प्रवर्तेल |
| ८० | ५५ | ३ | बेदव्यासाचें | वेदव्यासाचें |

| पृष्ठांक | पद्यांक | चरणांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ८४ | ५० | ३ | अवयवसांध... | अवयवसंधि... |
| ८४ | ५२ | १ | श्रीरामजगज्जनीचे | श्रीरामजगज्जननीचे |
| ८५ | ६२ | १ | विरवारी | विखारी |
| ९४ | ३३ | २ | थामा | माथा |
| ९६ | ५५ | १ | रभा | रंभा |
| ९७ | ७३ | २ | अभ्याग्यवंत | अभाग्यवंत |
| ९९ | ९८ | ३ | म्हससी | म्हणसी |
| १०३ | १४७ | ३ | तरितें | तरि तें |
| १०४ | १६९ | ३ | बेत | वेत |
| १०४ | १७० | ३ | पालठ | पालट |
| १०८ | २१४ | २ | पांहो | पां हो |
| ११२ | २६८ | २ | देवाचा | दैवाचा |
| ११३ | २७७ | ४ | इद्रधनुष्याची. | इंद्रधनुष्याची |
| ११४ | ३०२ | ४ | देवाआगळे | दैवाआगळा |
| १२४ | ४३१ | १ | फुटें | पुटें |
| १२५ | ४३९ | ३ | जेतु | जंतु |
| १२६ | ४५४ | ४ | विप्रेंशा ! | विप्रेंद्रा ! |
| १२७ | ४६३ | १ | पूवंचा | पूर्वेचा |
| १२९ | २२ | ४ | आयोध्यापुरीचें | अयोध्यापुरीचें |
| १३४ | ९६ | ४ | पुरोबाहेर | पुरीबाहेर |
| १३७ | १२५ | ३ | नयनबाण | नयनबाणें |
| १३७ | १३४ | १ | बंदुनी | वंदुनी |
| १४३ | ४३ | ३ | वेदितां | नेदितां |
| १४६ | ८२ | ३ | बोझें | वोझें |
| १४६ | ८७ | ४ | ठलों | उलों |
| १४८ | ११५ | १ | विर्मो | निर्मो |
| १४८ | ११८ | ३ | ब्रह्मांहीं | ब्रह्मांडीं |
| १५० | १५ | १ | तोर्डे | तोंडें |
| १५१ | २९ | २ | करतळे | करतळें |
| १५२ | ५१ | २ | सर्वासमीप | सतीसमीप |
| १५५ | ८१ | १ | भ्याघ्र ? | व्याघ्र ? |
| १५५ | ९० | ४ | बसविली | वसविली |

| पृष्ठांक | पद्यांक | चरणांक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १५६ | ९१ | ३ | धुमण | धुमस |
| १५७ | १०७ | ४ | जटधरा! | जटाधरा ! |
| १५८ | ७ | ४ | कुकवर्या! | कुरुवर्या ! |
| १६० | ३२ | १ | भारुनी | भरुनी |
| १६१ | ३६ | ३ | मायां | माथां |
| १६४ | ७९ | २ | सेवसी | सेवेसी |
| १६५ | १ | ३ | नृपवंदना | नृपनंदना |
| १६८ | ३८ | १ | गरण | मरण |
| १६८ | ३९ | १ | देशिलें | दंशिलें |
| १७३ | १०० | ३ | वैसवी | वैसवी |
| १७४ | ११० | २ | वणू ? | वर्णू ? |
| १७४ | ११४ | ४ | शशीदर्शनें | शशिदर्शनें |
| १७८ | ३२ | १ | वैंसे | वैसे |
| १७९ | ५३ | २ | त्याजीन | त्यजीन |
| १८० | ६२ | ३ | शीरीरही | शरीरही |
| १८२ | ८६ | ३ | भेटो | भेटी |
| १८३ | ४ | २ | आग्वारी | आरवारी |
| १९० | ६।१ | १ | धरिता | धरिला |
| १९० | ७।१ | २ | कोण | कोणा |
| १९१ | ८।५ | १ | ब्राह्मणनीर्थी | ब्राह्मणतीर्थी |
| १९२ | १०।३ | २ | उपनिषद... | उपनिषद्... |

## आमची काही अनमोल प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. संगीत संशय कल्लोळ<br>( अभ्यासपूर्ण प्रस्तावनेसह )<br>प्रा. भालचंद्र खांडेकर | रु. | ३–०० |
| २. संगीत एकच प्याला<br>( अभ्यासपूर्ण प्रस्तावनेसह )<br>प्रा. भालचंद्र खांडेकर | रु. | ४–०० |
| ३. मराठीतील कांही कथाकार<br>प्रा. म. ना. अदवंत | रु. | ७–०० |
| ४. ज्ञानेश्वरी अध्याय १ | रु. | १०–०० |
| ५. ज्ञानेश्वरी अध्याय ६ | रु. | १२–०० |
| ६. ज्ञानेश्वरी अध्याय १२ | रु. | ६–०० |
| ७. ज्ञानेश्वरी अध्याय १५ | रु. | १०–०० |
| ८. ज्ञानेश्वरी अध्याय १६ | रु. | ५–०० |
| ९. ज्ञानेश्वरी अध्याय १७<br>प्रा. म. ना. अदवंत व प्रा. भालचंद्र खांडेकर | रु. | ८–०० |
| १०. चक्रधर-निरुपित श्रीकृष्ण चरित्र<br>( महानुभावीय मराठी गद्य ग्रंथ )<br>संपादक - रा चिं. ढेरे | रु. | ८–०० |
| ११. टीका आणि टीकाकार<br>( विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संदर्भ ग्रंथ )<br>डॉ. वा. भा. पाठक | रु. | २५–०० |
| १२. महिकावतीची बखर<br>संपादक - रा. चिं. ढेरे | रु. | १२–०० |
| १३. मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्य<br>डॉ. वा. के. लेले | रु. | २०–०० |

प्रमुख विक्रेते :

# रसिक साहित्य

अप्पा बळवंत चौक, पुणे ३०.